म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहाचा क्रमांक

पुस्तकाचें नांव

३६

सं. क्र.

युनायटेड स्टेट्सची
भोकास्थिती (भा. १ ला)
(भू-प्रवास)

# युनाइटेड् स्टेट्स्‌ची लोकस्थिति


आणि

# प्रवासवृत्त

हा ग्रंथ,

**पंडिता रमाबाई**

यांणीं केला.



**मुंबई,**

निर्णयसागर छापखान्यांत छापिला.

सन् १८८९ इसवी.

मराठी ग्रंथ संग्रहालय

# भाग पहिला.

## हें पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें.

**वि. एम्. वाळवेकर आणि कं.** बुकसेलर्स व पब्लिशर्स, यांचें दुकान **रामवाडी मुंबई.**

**म्यानेजर सुबोधप्रकाश छापखाना** गिरगांव **मुंबई.**

पहिल्या भागाची किंमत १॥ रुपया.

---

(सर्व प्रकारचे हक्क राखून ठेविले आहेत.)

# प्रस्तावना.

युनाइटेड् स्टेट्स् किंवा 'अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें' हें नांव पुष्कळांस ऐकून ठाऊक असेल आणि पुष्कळांनीं भूगोल शिकतांना त्या देशाचा नकाशा पाहिला असेल. परंतु त्या संयुक्त संस्थानांची खरी योग्यता केवढी आहे, तेथील मनुष्यें काय करतात, त्यांची सामाजिक स्थिति आणि राज्यव्यवस्था कशी आहे इत्यादि गोष्टींची माहिती ज्यांस असेल, अशीं मनुष्यें आमच्या देशांत फारच थोडीं असतील. मी इ० स० १८८६ च्या आरंभीं इंग्लंडाहून युनाइटेड् स्टेट्स्ला गेलें; त्या वेळीं त्या देशाच्या नांवावांचून त्याविषयीं दुसऱ्या कोणत्याच गोष्टीची मला माहिती नव्हती. पण तेथें गेल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्या राष्ट्राची योग्यता थोडी थोडी समजूं लागली, तेव्हां [illegible] कांहीं काळपर्यंत तिकडेच राहून, त्याची चांगली माहिती करून घेण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्याप्रमाणें मी १८८६ च्या मार्च महिन्यापासून १८८८ च्या नवेंबर महिन्याच्या अखेरीपर्यंत तेथें राहून त्या देशांत सुमारें ३०००० मैलांइतका प्रवास करून, कांहीं गोष्टींची माहिती मिळविली. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें असतांना मला तिकडच्या अद्भुत गोष्टी पाहून जो आनंद झाला, त्याचा थोडाबहुत तरी वांटा माझ्या प्रिय देशबंधुभगिनींना न दिल्यास, तो अपूर्ण राहील, म्हणून मी हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध करीत आहें. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें असतांनाच ह्याचा पुष्कळ भाग लिहून ठेवला होता; बाकी इकडे आल्यानंतर लिहिला आहे.

थोड्या दिवसांपूर्वीं मीं 'युनाइटेड् स्टेट्स्ची लोकस्थिति' या विषयावर मुंबईंत व पुण्यांत मिळून आठ नऊ व्याख्यानें दिलीं होतीं. तीं ऐकून, कांहींकांस मी बोललें त्यांत अतिशयोक्ति आहे, असें वाटलें असेल. मी

काय बोललें त्यांत अतिशयोक्ति नव्हती, हें मी खात्रीपूर्वक सांगतें. व्यापार-धंदे विद्याखातें इत्यादिकांमध्यें ज्या अचाट संख्या सांगितलेल्या आहेत, त्यांच्या खरेपणाविषयीं कोणांस शंका आल्यास त्यांनीं इ० स० १८८० सालच्या यु० स्टे० च्या खानेसुमारीचे आंकडे पहावे. मी लिहिलें ह्यांत कांहीं खोटें असल्यास ज्यांस मराठी भाषा येते, असे विद्वान् अमेरिकन् गृहस्थ व स्त्रिया ह्या मुंबई शहरांत पुष्कळ आहेत. त्यांनीं माझ्या चुक्या दुरुस्त कराव्या अशी माझी त्यांस विनंति आहे.

आणखी एक पक्षाच्या मंडळीनें, मी युनाइटेड् स्टेट्स्चें चांगलें तेवढें सांगितलें; वाइटाचा उल्लेखच केला नाहीं असा दोष मला दिला आहे. त्यांस माझें एवढेंच सांगणें आहे कीं, ज्या फार वाईट गोष्टी सर्वांच्या नजरेस येण्यासारख्या आहेत, त्यांचा ह्या पुस्तकांत ठिकठिकाणीं उल्लेख केलेला आपल्या वाचण्यांत येईल. परंतु मी एवढें कबूल करतें कीं मी युनाइटेड् स्टेट्स्च्या लोकांचे जितके दोष काढावे म्हणून कित्येकांस वाटतें, तितके ते काढले नाहींत. माझ्या पूर्वी त्या देशांत गेलेल्या आमच्या एका धार्मिक देशबंधूनें अमेरिकन् समाजाचे दोष काढून ठेवले आहेत. (दोषावांचून त्यांस अमेरिकेंत दुसरें कांहींच मिळालें नाहीं असें वाटतें; नाहीं म्हणायाला त्या देशांत फिरून हिंदुस्थानांत येऊन पोहोंचे तोंपर्यंत हवा तितका प्रवासाचा खर्च त्यांस मिळाला होता, एवढें बरीक खरें!) न्यू यार्क् संस्थानांत प्रवास करीत असतां एका गृहस्थानें मला विचारलें कीं "आमच्या देशामध्यें अतिनिंद्य असें तुमच्या पाहाण्यांत काय आलें!" मीं म्हटलें, 'मित्रा, मीं तुमच्या देशांतील दोष पाहायाला आलें नाहीं; तुमचे गुण तेवढे मला हवे आहेत, मी त्यांच्या शोधांत आहें, तेच मला मिळतात.' चांगल्या विशाल व प्रशस्त रस्त्यांत चालत असतां अवचित् जसा एखादा धोंडा किंवा कांटा पायास लागावा, त्याच प्रमाणें अमेरिकन् लोकांचे दोष क्वचित् माझ्या दृष्टीस पडले; ह्यास्तव

निरुपायानें त्यांचा उल्लेख एथें केला आहे. चांगले वाईट लोक सर्वत्र आहेत; गुण आणि दोष सर्वांमध्यें आहेत; आपण गुणांच्या शोधांत असलों तर गुणच आपल्यास सांपडतील आणि त्याच्या उलट असलों तर विपरीत फळ मिळेल, हें कोणास नव्यानें सांगायाला नको.

ह्या पुस्तकाचीं प्रुफें शोधण्यांत फार काळजी घेतली असूनही कोठें कोठें चुका राहून गेल्या आहेत, ह्यास माझा नाइलाज आहे.

ह्या पुस्तकाच्या वाचनानें माझ्या प्रिय देशबंधुभगिनींच्या हृदयांत उद्योगप्रियता आणि आमच्या भारतमातेची सेवा करण्याबद्दल सदिच्छा आतां आहे त्यापेक्षां थोडीतरी अधिक उत्पन्न झाल्यास, माझा हा अल्प प्रयत्न सार्थक झाला असें मी समजेन.

शारदासदन, मुंबई.<br>
माहे डिसेंबर,<br>
सं० १८८९ इ०

रमाबाई.

# विषयानुक्रम.

## पहिला भाग.


| | पृष्ठ. |
|---|---|
| लिवर्पूल्पासून फिलाडेल्फियापर्यंत प्रवास.— | १ |
| पाताळ किंवा अमेरिका खंड.— ... ... | १३ |
| शासनपद्धति.— ... ... ... ... ... | ४१ |
| लोकस्थिति.— ... ... ... ... ... | ७७ |
| गृहस्थिति.— ... ... ... ... ... | ९७ |
| विद्याव्यासंग. ... ... ... ... ... | १६२ |
| धर्ममतें आणि दानधर्म.— ... ... ... | १९१ |
| स्त्रियांची स्थिति.— ... ... ... ... | २१४ |
| व्यापारधंदे.— ... ... ... ... ... | ३१० |

[stamp]

# युनाइटेड् स्टेट्सची लोकस्थिति आणि प्रवासवृत्त.

## लिवरपूल्पासून फिलाडेल्फियापर्यंत प्रवास.

इ० स० १८८५ च्या जानुअरी महिन्यांत डाक्तर रेचेल् बाड्ले—फिलाडेल्फिया येथील स्त्रियांच्या वैद्यविद्यालयाच्या "डीन्"—ह्यांनीं मला एक पत्र लिहिलें, त्यांत १८८६ च्या मार्च महिन्यांत सौ० आनंदीबाई जोशी यांस वैद्यकीची पदवी देण्याचा समारंभ होणार त्या वेळीं म्यां फिलाडेल्फियांत येऊन तो समारंभ पाहावा म्हणून मला त्यांनीं आग्रहपूर्वक बोलावणें केलें होतें. त्या वेळीं मी इंग्लंडांतील चल्टन्हम् शहरच्या स्त्रीविद्यालयांत अध्ययन आणि अध्यापन करीत होतें. प्रथमतः मीं कांहीं विशेष कारणामुळें त्यांचें बोलावणें स्वीकारलें नाहीं, परंतु त्यांनीं पुनः स्वतः आणि सौ० आनंदीबाई जोशी आणि रा० गोपाळराव जोशी ह्यांकडून पत्रें लिहवून मला अमेरिकेस जाण्याचा आग्रह केला. तेव्हां मला किती अडचणी असल्या तरी माझ्यानें त्यांचें बोलावणें नाकारवेना. कारण एक तर बाड्लेबाई परजातीय आणि परधर्मी असूनही त्या हिंदुस्त्रियांविषयीं इतका कळवळा बाळगतात हे त्यांचे आम्हांवर मोठे उपकार आहेत. दुसरें असें कीं, वैद्यकीसारखा कठिण विषय शिकून पदवी मिळविली असें साऱ्या हिंदुस्त्रियांपैकीं आनंदीबाई जोशी यांचें हेंच पहिलें उदाहरण आहे. तेव्हां त्यांस पदवी मिळण्याचा आनंदकारक समारंभ पाहाण्याची मला उत्कट इच्छा होती; ह्मणून मला इकडे येण्यास पुष्कळ अडचणी होत्या तरी सर्वशक्तिमान् परमेश्वरावर सर्व भार टाकून मी माझ्या कन्येसह इ० स० १८८६ सालांतील फेब्रुअरी महिन्याच्या सतराव्या तारखेस "ब्रिटिश प्रिन्सेस्" नांवाच्या

तारवांत बसून, इंग्लंडांतील लिवर्‌पूल्‌चे बंदराहून अमेरिकेकडे प्रयाण केलें. माझ्या इंग्रजी मित्रमंडळीच्या मनांतून मी ह्या देशीं यावें असें मुळींच नव्हतें; तेव्हां माझें इकडे येणें त्यांस पसंत पडलें नाहीं, हें सांगायाला नको. त्यांपैकीं कित्येक मैत्रिणींनीं तर, आम्ही तारूं फुटून समुद्रांत बुडून मरून जाऊं असें भाकित करून ठेवलें होतें. कारण फेब्रुअरी महिना समुद्रयानास फारसा अनुकूल नसतो. तशांत ह्या वर्षी त्या महिन्यांत फारच तुफानें झालीं, आणि अमेरिकेच्या किनाऱ्यानजीक पुष्कळ तारवें फुटलीं. न्यू यार्क् शहरानजीक आणि आसपास पंचवीस तीस मैल समुद्रांत कडक थंडीमुळें पाणी थिजून अमेरिकाखंडाला बर्फाचें वेष्टण पडलें होतें. असो. आमचें तारूं लिवर्‌पूल् बंदरांतून निघाल्यावर तीन दिवस तुफानाचें कांहीं चिन्ह दिसलें नाहीं; परंतु चवथ्या दिवशीं, इंग्लंड आणि अमेरिका ह्या दोन देशांच्या मध्यें आट्लांटिक् समुद्रांत एक सैतानाचा किंवा भुतांचा हांडा (Devil's Pot) नांवाचा भाग आहे, त्याच्या नजीक आमचें तारूं आलें. तेव्हां भयंकर तुफानास आरंभ झाला आणि समुद्राचें भयाण स्वरूप आमच्या पाहण्यांत येऊं लागलें.

ही वेळ समुद्रप्रवासाला अनुकूल नव्हती, म्हणून आमच्या नावेवर फारसे उतारू नव्हते. पहिल्या वर्गांत चार पुरुष आणि तीन बायका, आणि तिसऱ्या वर्गांत बायका, पुरुष, मुलेंबाळें मिळून सुमारें १९० माणसें होतीं. हीं एकशें नव्वद माणसें यूरोपांतील निरनिराळ्या प्रदेशांतून अमेरिकेंत वसाहत करण्याला आलेलीं होतीं. (पुढें एके ठिकाणीं इकडे वसाहत करण्याकरितां जे लोक येतात त्यांच्या स्थितीबद्दल संक्षिप्त माहिती दिली आहे ती पाहा).

ह्या एकशें नव्वद उतारू लोकांपैकीं कांहीं धार्मिक लोकांनीं आदित्यवारं नावेच्या मधल्या मजल्यावर उघड्या भागांत जमून संगीतें गाऊन

ईश्वरोपासना केली. त्या रात्रीं फारच कडाक्याचें तुफान झालें. ह्या प्रसंगीं मीं एका बाईच्या तोंडून एक चमत्कारिक गोष्ट ऐकिली, ती एथें लिहिल्यावांचून राहावत नाहीं. सदरील बाई आमच्या शेजारीं पहिल्या वर्गांतील एका खोलींत राहत असे, तेव्हां जलप्रवासांत तिच्याशीं माझें विशेष संघट्टण होतें. ही बाई रोमनक्याथोलिकमताची होती. तिनें मला सांगितलें कीं, सदरीं सांगितलेले उतारू संगीतें गात होते, तेव्हां नावेंतील एका मनुष्याला तें सहन न होवून त्यानें "आज रात्रीं खचीत तुफान होईल" असें भाकित करून उतारू लोकांच्या वर्त्तनाविषयीं कुरकुर केली. तो म्हणाला कीं, हे लोक ईश्वराची उपासना करून सैतानाला कोपवीत आहेत, तो आज तुफान आणून आमच्याशीं युद्ध केल्यावांचून राहणार नाहीं. कर्मधर्मसंयोगानें त्या रात्रीं तुफान होऊन त्याचें भाकित खरें झालें. पुढें आणखी एके दिवशीं रात्रीं ते लोक कांहीं पदें गाऊं लागले तेव्हां तर त्या मनुष्याला फारच राग आला. त्यानें पूर्वीप्रमाणेंच तुफान होईल असें भाकित केलें; आणि तें खरेंही झालें. पुढें दुसऱ्या रविवारीं कांहीं मुलें तो दिवस प्रसन्न असून फारसें तुफान नव्हतें म्हणून नावेच्या वरच्या बाजूस येऊन "हालेलुया, हालेलुया"—(ह्या हिब्रू शब्दाचा अर्थ 'ईश्वराची स्तुति करा' असा आहे)—असें गाऊं लागलीं, तेव्हां आमच्या कर्णधाराचा राग त्याच्या पोटांत मावेना. त्यानें लागलींच बाहेर जाऊन त्या अविचारी मुलांचीं तोंडें बंद केलीं. परंतु त्या दिवशीं खरोखरच सैतानानें ह्या कर्णधाराची पाठ पुरविली म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्या दिवशीं आमची नाव समुद्रास्तृप्यंतु होण्याच्या बेतांत होती. ही ह्या कर्णधाराची गोष्ट खरी असल्यास इंग्लंडांतील सुशिक्षित आणि सुधारलेल्या लोकांपैकीं कित्येक अद्यापि भूतप्रेतपिशाचबाधेविषयीं दृढ विश्वास बाळगतात असें म्हटलें पाहिजे! असो.

ह्या तुफानामुळें आम्हाला फारच त्रास झाला. क्षणोक्षणीं समुद्राच्या मोठाल्या लाटा आमच्या खोल्यांच्या खिडक्यांवर येऊन आदळत असत, तेव्हां ही नाव आतां बुडते कीं घटकेनें बुडते असा संशय येई. तीन चार दिवसांत आमच्याच्यानें नुसतें डोकेंसुद्धां वर करवेना; मग उठून चालण्या-फिरण्याची गोष्ट तर लांबच राहिली. शेवटीं आमच्या खोलींतील वारा इतका अशुद्ध झाला कीं तेथें राहून श्वासोच्छ्वास करणें फारच अवघड वाटूं लागलें; तेव्हां आतां काय पाहिजे तें होवो पण एकदां नावेच्या वरच्या मज-ल्यावर जायाचेंच असा निश्चय करून आमची स्वारी जणूं काय जीव मुठींत धरून खोलीच्या बाहेर पडली. पण पुढें चालून वरतीं जावें कसें. नावेच्या हलण्यामुळें नावेच्या तळावर माझा पाय ठरेना. शेवटीं कसें तरी करून एकदांची वर जाऊन एका खुर्चीवर बसलें. तेथें गेल्यावर सुमारें पावतासाच्या आंत समुद्राची स्वच्छ हवा लागून माझ्या शरीरांत जणूं काय नवीन जीवनी शक्तीचा प्रवेश झाला. एका घटकेच्या पूर्वी समुद्राची लाट खिडकीवर आद-ळत असतां कांहीं चमत्कारिक भीतीमुळें माझ्यानें तिकडे पाहावत सुद्धां नसून पोटांत धस्स होत असे. पण घटकेंत काय अद्भुत चमत्कार झाला तो पाहा. आतां वरच्या मजल्यावर उभी राहून नाव बुडूं बुडूं होत असतां तें समुद्राचें अफाट आणि भयंकर रूप पाहूनही मला काडी इतकें देखील भय वाटलें नाहीं; उलट उत्साह, आनंद आणि शांति माझ्या हृदयांत उदित होवूं लागली. ह्या वेळीं ह्या स्वाभाविक घटनेपासून मी जो धडा शिकलें तो कधीं विसरणार नाहीं. मनुष्य जोंपर्यंत धैर्यानें विपत्ति आणि शत्रु यांचा सामना करीत नाहीं तोंपर्यंत त्याला त्यांचा मोठा बाऊ वाटतो. भितेरें मनुष्य जसजसें भेकडपणानें घरांत किंवा अंथरुणांत डोकें खुपसून बसण्या-कडे वळतें तसतसें त्याचें भय वाढून निराशेमुळें त्याच्या दाहा दिशा अंध-कारमय होवून जातात. पण गड्या, एकदां “कार्यं वा साधयेयं, देहं

वा पातयेयं" (एक तर कार्य साधीन, नाहीं तर शरीर टाकीन) असा निश्चय करून तुझ्या शत्रूंचा आणि निराशादि विपत्तींचा सामना कर, म्हणजे भय हा शब्द तुझ्या स्मरणांतून नाहींसा होईल, आणि तूं जीवन्मुक्ताप्रमाणें निर्भय होवून सारें जग तुझ्या विरुद्ध असलें तरी सत्यावर आणि सत्साहसावर अवलंबून आपलीं कार्यें साधशील. ह्या अगाध संसारसमुद्रांत आमच्या वाताहत नावांना किती तुफानांचा सामना करावा लागत नाहीं? त्या वेळीं धैर्य धरून भयंकर समुद्रकल्लोलाशीं झुंजलों तर खचीतच आम्हाला जयश्री मिळेल आणि मनाला शांतिही प्राप्त होईल. परंतु पाल पसरण्याच्या किंवा गुंडाळण्याच्या उद्देशानें डोलकाठीवर चढत किंवा उतरत असतांना जर करतां मिथ्याभयरूपी भूतानें आमच्या हृदयांत संचार केला आणि आमचे हात पाय थरथरां कांपूं लागले तर मात्र आमची दशा कुत्र्यालाही नकोशी होईल.

आमची नाव पांच सहा दिवस "भुताच्या हांड्यांत" पिंगा घालीत होती. ह्या हांड्यामध्यें आल्यावर तिच्यांतील वाफेचें यंत्र कांहींसें बिघडलें. तें दुरुस्त केल्यावांचून नाव वेगानें चालविली असती तर ती समुद्रार्पण होण्याला कांहीं उशीर लागला नसता आणि यंत्र दुरुस्त करावें म्हटलें तर समुद्र कल्लोलांपुढें नाव एक ठिकाणीं उभी करतां येईना. बिचाऱ्या नावाध्यक्षाला ह्या वेळीं मोठें संकट पडलें; परंतु शेवटीं हळू हळू यंत्र दुरुस्त करून पुनः पहिल्याप्रमाणें नाव चालूं लागली. "भुताच्या हांड्यां" तून निघाल्यावरही समुद्रांत तुफानाची कांहीं कमताई दिसून आली नाहीं. समुद्राच्या पर्वतप्राय लाटांच्या जोरानें आमची नाव एकदां आकाशांत आणि एकदां पाताळांत जाई तेंव्हां ती आतां बुडते कीं क्षणांत बुडते असा संशय सहज मनांत येई. त्या आफाट पारावारशून्य समुद्रांत वरच्या बाजूस कधीं स्वच्छ, कधीं अभ्राच्छादित अशा आकाशाचा गोल चांदवा,

खालीं हिमालयाच्या लहान लहान टेंकड्यांएवढाले कल्लोल आणि त्यांवर आपटत असलेली आमची नाव—भोंवतालच्या देखाव्याशीं तुलना करून पाहिल्यास आमची नाव पाण्यावर तरंगत असलेल्या लहानशा उडत्या माशासारखी दिसत होती, म्हटल्यास चिंता नाहीं—हा मनोरम, भयाण व विचित्र देखावा पाहून प्रेक्षकांच्या मनांत कसकसे विचारांचे तरंग येतात त्याचें वर्णन करतां येत नाहीं. तुफानाच्या वेळेस गल नांवाचे सामुद्रपक्षी चोहोंकडे समुद्रांत तरंगत असलेले दिसतात. हे पक्षी खरोखरच तुफानाचे अग्रदूत आहेत. तुफान व्हायाचें असलें म्हणजे ते मोठ्या वेगानें समुद्रावर उडत फिरूं लागतात. आणि तुफानाच्या वेळेस समुद्रकल्लोलांवर बसून मोठ्या हर्षानें जलक्रीडा करूं लागतात. चोहोंकडून मोठमोठाल्या लाटा उसळून येऊन एकमेकांवर आपटत आहेत, वारा मोठा सोसाट्याचा वाहात आहे, समुद्राच्या वरल्या भागावर पराकाष्ठेचें धुकें पडलें आहे आणि समुद्राच्या व मेघांच्या गर्जनेनें लोकांच्या कानठळ्या बसत चालल्या आहेत. तरी ह्या आनंदी पक्ष्यांना त्याचें कांहीं वाटत नाहीं. ते खुशाल मजा करीत असतात. एकादा आरब जसा आपल्या तरुण तेजस्वी घोड्याला वायुवेगानें दामटीत जातो त्याप्रमाणें ते मोठमोठाल्या कल्लोलांच्या पाठीवर बसून जसेकाय शर्यत खेळत असतात. केव्हां केव्हां मेघांचीं पटलें फोडून सूर्यनारायण विजयी वीराप्रमाणें आकाशांत प्रकाशमान होई तेव्हां गगनमंडळांत सबंध इंद्रधनुष्याचा देखावा मोठा वर्णनीय व आनंदकारक असा होत असे. कधीं कधीं दीड किंवा दोन इंद्रधनुष्यें पाहाण्यांत येत. केव्हां केव्हां समुद्रकल्लोल नावेवर किंवा एकमेकांवर आदळल्यानंतर वाऱ्याच्या जोरानें कांहीं दूरपर्यंत तुषार उडत जाई तेव्हां त्यावर सूर्यप्रकाश पडून इंद्रधनुष्य उत्पन्न होत असे. अहाहा! त्या वेळची समुद्राची व आकाशाची शोभा किती तरी वर्णावी! ती शोभा पाहात असतां डोळ्यांच्या

पांपण्या मिटणेंही बरें वाटत नसे, इतकी ती चित्तवेधक आणि दृष्टिरंजक होती. तुफानाचा कांहींसा उपशम झाल्यावर आमची नाव अमेरिकाखंडापासून तीन दिवसांच्या रस्त्यावर येऊन पोहोंचली तेव्हां कित्येक उडते मासे समुद्रावर उडत असतां आमच्या दृष्टीस पडले.

मार्च महिन्याच्या तिसऱ्या तारखेस संध्याकाळचे सुमारें साडेचार वाजतांना, इ० स० १४९२ त ज्या भूखंडाला पाहून क्रिस्टोफर कोलंबसानें आपण भूगोलाभोंवताल्रून जलयात्रा करून हिंदुस्थानास येऊन पोहोंचलों असा सिद्धांत केला, त्या पश्चिमगोलार्धांतील अमेरिकाखंडाचा किनारा आमच्या दृष्टीस पडला. ह्या वेळीं मला जो काय आनंद झाला तो वर्णितां येत नाहीं. मीं मनांत म्हटलें, आमच्या हिंदुस्थानी मित्रांनो, आतां आमच्या पायांचे तळवे तुमच्या तळपायांकडे वळलेले आहेत. एथें ढवळा दिवस असून तुमच्याकडील भागावर रात्रीचें पांघरुण पडलें आहे. आतां आम्ही एथें नावेवर शतपावल्या करीत गोष्टी सांगत आहों आणि तुम्हीं तिकडे अंथरुणांवर घोरत पडलां आहां! हा पाहा काय चमत्कार आहे तो.

अतिशय थंडीमुळें जमीनीच्या कांठाशीं समुद्राचें पाणी थिजून अमेरिकाखंडाला बर्फाचें वेष्टण पडलें होतें, असें वर सांगितलेंच आहे. त्यावर सूर्यकिरणें प्रतिबिंबित झालीं असून त्यांच्याकडे पाहिल्यावर डोळे दिपल्यासारखे होत. संध्याकाळच्या वेळेला आमची नाव डेलवेयर नदीच्या मुखापाशीं येऊन पोहोंचली, तेव्हां त्या ठिकाणची आणि डेलवेयर नदीच्या अंतर्भागांची ज्यास चांगली माहिती आहे असा एक नाखुदा नावेवर आला. ह्या नंतर आमच्या नावेच्या अध्यक्षानें आपली नाव पुढें चालविण्याचें काम त्या नाखुदाच्या हवालीं केलें.

मनुष्य कोणत्याही कामांत केवढा माहितगार असला तरी एकादवेळ त्याच्याकडून चुकी झाल्यावांचून राहात नाहीं. तेव्हां ह्या नाखुदाच्या

हातून ह्या वेळीं चुकी झाली यांत कांहीं नवल नाहीं. त्यानें झोंपेच्या नाहीं तर कशाच्या तरी गुंगींत येऊन आमची नाव जी धूम सपाट्यानें पुढें चालविली ती फिलाडेल्फिया शहरापासून सुमारें साठ पांसष्ट मैलांवर डेलवेयर नदीमध्यें चिखलांत खिळून टाकिली ती दोन तीन दिवसांपर्यंत जागची हाललीच नाहीं. आज सोळा सत्रादिवसांपासून आम्हाला जमीनीचें दर्शन झालें नव्हतें. बारा दिवसांचा रस्ता काढायाला सतरा दिवस लागले. शेवटीं एकदांचें भूमिदर्शन झालें; पण आतां आपली इच्छित जागा इतकी जवळ असूनही तेथें जाण्यास हें एक विघ्न उपस्थित झालें. त्या दिवशीं रात्रीं आमची जलयात्रा संपून दुसऱ्या दिवशीं मोठ्या पाहांटेस फिलाडेल्फिया नगरींत जाऊन उतरण्याचा आमचा बेत होता, तो असा एकाएकीं खुंटला, हें पाहून आमचा जो कांहीं हिरमोड झाला तो सांगतां येत नाहीं. परंतु परमेश्वरानें, आमच्या नावेला भयंकर तुफानांतून व यंत्राची अव्यवस्था झाल्यामुळें ती समुद्रांत भटकूं लागण्याचें जें भय पडलें होतें, त्यांतून तिचा बचाव करून, आम्हाला सुरक्षितपणें ह्या गोलार्धांत आणून पोहोंचविलें ह्याबद्दल आम्हीं त्याचे फार फार आभार मानले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून पाहातों तों आमच्या नावेभोंवतालीं बर्फाचें वेष्टण पडलें होतें. त्या दिवशीं आणि दुसऱ्या दिवशीं चार पांच लहान लहान वाफेच्या तारवांनीं तेथें येऊन आमच्या नावेभोंवतीं फिरून आपल्या अणीदार अग्रभागांनीं बर्फाच्या जाड फळ्यांचे तुकडे तुकडे करून आमचा रस्ता मोकळा केला, तरी आमची नाव जागची हालेना. तेव्हां भरतीच्या वेळीं तीन चार तारवांनीं मिळून तिला अडकविलेले मोटमोठाले दोर ओढून तिला चिखलांतून वर काढण्याचा प्रयत्न केला, परंतु तोही व्यर्थ होऊन, नाव जागची हालली नाहीं. तेव्हां मार्चच्या सहाव्या तारखेस सकाळीं आमच्या वर्गांतील उतारू लोकांस दुसऱ्या एका नावेंत घालून

फिलाडेल्फियाकडे रवाना केलें. दुसऱ्या वर्गांतील उतारूंस पुरण्याइतकी जागा त्या नावेंत नव्हती, म्हणून आम्ही निघून येतांना ते बिचारे हिरमुसलीं तोंडें करून आमच्याकडे पाहात राहिले. आम्हाला त्यांबद्दल फार वाईट वाटलें, पण करावें काय? दुसरा उपायच नव्हता, तेव्हां आम्ही त्यांना त्या थोरल्या नावेंत राहूं देऊन निघून आलों. दुसऱ्या दिवशीं इतर सर्व उतारू लोकांस फिलॅडेल्फियांत पोहोंचविण्याची तजवीज करण्यांत आली. सहाव्या तारखेस रात्रीच्या आठ वाजतां आम्हीं फिलाडेल्फियांत येऊन पोहोंचलों. रा० गोपाळराव आणि सौ० आनंदीबाई जोशी हीं उभयतांही आम्हाला नदींच्या धक्क्यावर येऊन भेटलीं. त्यांनीं प्रीतिपूर्वक आमचें आगतस्वागत करून आम्हांला बिऱ्हाडीं नेलें. तेव्हां रात्रीं आम्हीं अतिशय थकून गेलों होतों, म्हणून बिऱ्हाडीं गेल्यावर लागलीच अंथरुणाची वाट धरली.

इ० स० १८८६ तील मार्च महिन्याच्या ११ व्या तारखेस सकाळीं अकरा वाजतां आम्हीं फिलाडेल्फिया शहरांतील 'अकाडेमी आफ् सायन्स्' नांवाचे सभागृहांत गेलों. तेथें वैद्यविद्यालयांत शिकून परीक्षोत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींस पदवी देण्याचा समारंभ पाहाण्याकरतां स्त्रीपुरुष मिळून सुमारें ३०००।३५०० मंडळी जमली होती. ह्याच दिवशीं आमची देशभगिनी सौ० आनंदीबाई जोशी यांस वैद्यकीची पदवी मिळाली. ह्या समारंभाचा देखावा फारच मनोरंजक होता. आम्हाला हा दिवस फारच आनंदकारक वाटला, कारण आनंदीबाई ही पहिली हिंदु स्त्री वैद्यकी शिकून पदवी पावली आहे. तशांत ही बाई आमच्या आप्तांपैकीं आहे म्हणून आम्हाला तिचा फार अभिमान वाटतो. आज सुमारें चार वर्षांमागें हिंदुस्थानांत एका मद्रासे वांचून दुसरे कोठेंही स्त्रियांस वैद्यकी शिकण्याची सोय नव्हती. आणि मद्रासेंतही फार वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळण्याची सोय नव्हती. लोकमत साधारण स्त्रीशिक्षणास सुद्धां अनुकूल असें नव्हतें; तें स्त्रियांस

वैद्यकीचें शिक्षण देण्याविरुद्ध फारच कडाक्याचें होतें हें सांगायाला नको. इ० स० १८८३ या सालांत पुण्यास 'एज्युकेशन कमिशन' नांवाच्या मंडळी पुढें,—चालू असलेल्या स्त्रीशिक्षणांत कोणकोणते फेरफार आणि सुधारणा करणें उचित आहे ह्याविषयीं माझें मत देण्यास सदरील कमिशनानें मला बोलावलें तेव्हां—मी स्त्रियांस वैद्यकीचें शिक्षण अवश्य मिळावें म्हणून सूचना केली. त्यानंतर त्या मंडळीचे अध्यक्ष डा० हंटर यांनीं मला सांगितलें कीं वैद्यकी हा विषय साधारण विद्याशिक्षणांत मोडत नसल्यामुळें त्याविषयीं सरकारास ह्या मंडळीकडून आमच्यानें सूचना करवणार नाहीं; परंतु मी घरगुती रीतीनें ही गोष्ट वरिष्ठ सरकारापुढें आणीन. पुढें पुष्कळ सज्जनांच्या उद्योगानें विलायतेहून स्त्रीवैद्य आणविण्याकरतां एक मोठी वर्गणी जमा झाली. आणि सरकारानेंही हा विषय शिकणाऱ्या बायकांकरतां कांहीं नेमणुका करून देऊन बायकांकरतां पुरुषांच्या वैद्यकशाळांमधून वर्ग काढले. पण रीतिप्रमाणें त्यांनीं आधीं मोठ्या मोठ्या विद्वानांचें ह्याविषयीं काय मत आहे असें विचारलें. तेव्हां जसे त्रिविध जन असतात तशींच त्रिविध उत्तरें सरकाराला मिळालीं हें एथें नव्यानें सांगायाला नको. ह्यांत आश्चर्य मानण्याची गोष्ट एवढीच कीं, कांहीं सुधारक आणि स्त्रीजनोन्नतीच्छु म्हणविण्याऱ्या मंडळीचें मतही स्त्रियांस वैद्यक शिकवूं नये असें पडलें. बंगाल देशांतील भारतवर्षीय ब्राह्मसमाजाचे पुढारी केशवचंद्रसेन ह्यांचें मत असें पडलें कीं स्त्रियांस विश्वविद्यालयां (युनिवर्सिटी) मधून परीक्षा देण्याची सुद्धां मोकळिक नसावी; आणि वैद्यक शिकल्यानें स्त्रियांचें स्त्रीत्व राहाणार नाहीं. आणि त्या असला कठिण विषय शिकण्यास उपयुक्त नाहींत. इ० तरी कित्येक विद्वान गृहस्थांची अशी खात्री होती कीं स्त्रियांस हा विषय शिकतां येईल. तो शिकण्याला त्यांच्या शरीराचा बांधा आणि मेंदूचा कमीपणा यांजकडून कांहीं अडथळा होणार नाहीं. ह्या शिवाय हा विषय शिकल्यानें

स्त्रियांचें स्त्रीत्व जाणार नाहीं. ह्या गृहस्थांचीं अनुकूल मतें घेऊन सरकारानें वैद्यविद्यालयाचीं द्वारें स्त्रियांस उघडून दिलीं, तरी अद्यापि कोणी फारशा हिंदु स्त्रिया वैद्यकी शिकण्यास पुढें सरसावल्या नाहींत. दोन मुली मद्रासेंत आणि एक बाई बंगल्यांत शिकत होती परंतु ह्या बाया परीक्षोत्तीर्ण झाल्याचें वर्त्तमान मला अजून कळलें नाहीं. हिंदुस्थानांत स्त्रीवैद्यांची फार जरूर आहे. पुष्कळ प्रकारचे स्त्रीरोगांत आणि विशेषेंकरून प्रसूतीच्या समयीं पुरुषांस आपली स्थिति कळविण्याला आमच्या लज्जावती हिंदुस्त्रियांस फार संकोच वाटतो. पुष्कळ प्रसंगीं त्या प्राण गेला तरी पुरुष वैद्यास आपली स्थिति कळविणार नाहींत. अशा स्थितींत स्त्रीवैद्यांची जरूरी आहे हें कोणालाही सहज कळून येणार आहे. परंतु दुराग्रहानें कोणत्याही देशांतील मनुष्यांस वगळलें नाहीं. कोणी अज्ञानानें, कोणी मत्सरानें आणि कोणी आपस्वार्थीपणानें स्त्रियांस वैद्यविद्या शिकूं देण्याच्या विरुद्ध आहेत.

सौ० आनंदीबाई ही जशी पहिलीच वैद्यशास्त्र शिकून तयार झालेली हिंदुस्त्री आहे, तसेंच ती ज्या विद्यालयांत शिकली तेंही सर्व पृथ्वींत स्त्रियांकरतां म्हणून स्थापिलेलें असें पहिलेंच वैद्यविद्यालय आहे. इ० स० १८५० त ह्याची प्रथम प्राणप्रतिष्ठा झाली. आरंभीं लोकमत ह्याच्या विरुद्ध होतें. ह्या विद्यालयाच्या स्थापकांस आणि शिक्षकांस गरीबी, लोकांच्या तोंडची निंदा इत्यादिक पुष्कळ त्रास भोगावे लागले. परंतु ईश्वरकृपेनें आज हें विद्यालय चांगल्या भरभराटीस आलें आहे. पुष्कळ लोकांकडून ह्याला पैशाची वगैरे मदत मिळते. ह्या विद्यालयाची "डीन" राचेल एल् बाड्ले ही बाई मनोभावानें रात्रं दिवस परिश्रम करून सर्व प्रकारें त्याची भरभराट होण्याकरतां झटते. तिच्याच कारकीर्दींत त्याला एवढें मोठें रूप आलें. परमेश्वर तिला ह्या कामांत उत्तरोत्तर ज्यास्ती यश देवो अशी त्यापाशीं आमची प्रार्थना आहे. "फ्रेंड्स्" किंवा केकर मताच्या लोकांचें ह्या

कामास फार साहाय्य आहे. ह्या मताचे लोक बहुतकरून उदार मनाचे असून दुराग्रही नसतात हें मीं दुसऱ्या एका ठिकाणीं सांगितलेंच आहे.

ह्या देशांत, विशेषेंकरून फिलाडेल्फियांतील वैद्यविद्यालयांत शिकून तयार झालेल्या वैदिणी पुरुषवैद्यांप्रमाणेंच वैद्यक्रिया करूं लागल्या, तेव्हां "फिलाडेल्फिया काउंटी मेडिकल् सोसाइटी" नांवाच्या पुरुषवैद्यांच्या सभेनें, स्त्रियांनीं शिकविणें हें आपल्यास पसंत नाहीं असें म्हणून, आपल्या सभासदांनीं स्त्रीवैद्यांची सल्ला घेऊं नये आणि स्त्रियांस वैद्यकी शिकण्याकरितां कोणत्याही प्रकारचें उत्तेजन देऊं नये, असा नियम केला. परंतु त्यांच्या त्या नियमानें कालगतीला आणि स्त्रियांच्या उन्नतीला कांहींएक अडथळा आला नाहीं. काळ फिरावयाचा तो फिरला आणि स्त्रियांची उन्नति व्हावयाची ती झालीच.

---

१. परंतु १८८८ च्या जून महिन्यांत ह्याच काउंटी मेडिकल सोसायटीनें एथील बायकांच्या वैद्यविद्यालयांतील व्यवस्थापिका महाविदुषी डीन् बाड्ले हीस तिची पायधरणी व विनवण्या करून तिला आपल्या मंडळीची सदस्या केली. ह्यानंतर दोनतीन दिवसांनीं ह्या बाईला एकाएकीं देवाज्ञा झाल्याचें वर्तमान मीं ऐकलें. डीन् बाड्ले ही माझी अत्यंत प्रिय मैत्रिण होती. डा० आनंदीबाईवर आणि माझ्यावर तिचें निष्कपट प्रेम होतें. ती आमच्या देशभगिनींविषयीं जो कळवळा बाळगीत असे, त्याबद्दल आणि आह्मां दोघींस आमच्या प्रयत्नांमध्यें तिनें जी मदत केली त्याबद्दल मी तिची फार उपकारी आहें.

डीन् बाड्ले ह्या मर्त्यशरीर सोडून इहलोकांतून गेल्या. त्यांचा विरह आह्मास फार जड जातो; तरी त्यांचें पुण्यकीर्तिमय शरीर ह्या पृथ्वीवर चिरकालपर्यंत राहील; ह्याचें आह्मास मोठें समाधान आहे. त्यांच्या सारख्या सद्गुणी पुण्य-



डीन् रेचेल् बाड्ले.

# पाताळ किंवा अमेरिकाखंड.

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत येऊन पोहोंचल्या नंतर म्यां एथें काय पाहिलें व एथली लोकस्थिति कशी आहे हें सांगण्याच्या पूर्वीं ह्या देशाचा इतिहास संक्षेपानें सांगणें अवश्य आहे. माझ्या शिक्षित देशबंधुभगिनींना बहुतकरून त्या अपूर्व इतिहासाची माहिती असेलच; परंतु ज्यांनीं अमेरिकेचा शोध लागल्याचा व पुढें तेथें झालेल्या पाश्चात्य लोकांच्या वसाहतींचा इतिहास वाचला नसेल अशा कांहीं लोकांनीं हें पुस्तक वाचयाला घेतल्यास त्यांस ह्यांतील युनाइटेड् स्टेट्स्ची राज्यव्यवस्था व लोकस्थिति यांचा पाया कसा पडला हें समजणार नाहीं. म्हणून एथें अमेरिकेच्या शोधाची, तेथील मूळच्या रहिवाशांची व युनाइटेड् स्टेट्स् ह्या राष्ट्राच्या उत्पत्तीची संक्षिप्त हकीकत दिली आहे.

शेंकडो वर्षांमागें जेव्हां लोकांना आपल्या पृथ्वीची आकृति कशी आहे हें पुरतेंसें माहित नव्हतें तेव्हां ते आपल्या मनाला वाटेल तशी पृथ्वीच्या आकाराची कल्पना करीत असत. आपल्या हिंदूंचे आणि इतर जातीच्या लोकांचे आजे पणजे पृथ्वी सपाट आहे असें समजत होते, आणि म्हणूनच जसे शहरांतील मोठमोठाल्या घरांना मजले असतात तसेच ह्या जगाला मजले असून भूलोक हा मधला मजला आहे अशी त्यांची कल्पना झाली होती. हिंदूपुराणांच्या मतें हें जग चवदा मजली वाड्यासारखें असून पृथ्वीलोकावर सहामजले किंवा सहा लोक, आणि पृथ्वीच्या तळास म्हणजे खालच्या बाजूला सात मजले किंवा लोक आहेत. त्यांपैकीं सगळ्यांतील खालच्या मजल्याला 'पाताळ' असें नांव दिलेलें आहे. आतां शोधाअंतीं

---

स्त्रियांना पृथ्वीवर धाडून त्यांच्याकरवीं परमेश्वरानें आमच्या हीन दीन स्त्री-जातीचा उद्धार करावा हेंच त्या दयानिधीपाशीं आमचें मागणें आहे.

ह्या गोष्टी खोट्या ठरल्या आहेत. जग हें, चवदामजली वाड्यासारखें नाहीं आणि पृथ्वी सपाट नाहीं असें सर्वांस समजूं लागलें आहे.

इ० स० १४३५ ह्या सालीं यूरोपखंडांतील इटाली देशच्या जेनोआ नांवाच्या गांवीं कोणी ख्रिस्तोफर कोलंबस नांवाचा मुलगा जन्मला. तो लहान असतांना त्याची योग्यता कोणाला माहीत नव्हती. त्याचा बाप गरीब असून लोंकर पिंजरण्याचें काम करीत असे. परंतु ख्रिस्तोफराला थोडेंसें कळूं लागल्यापासून त्यानें आपण नावाडी होवून समुद्रावर सफर करण्याची इच्छा दर्शविली. आपल्याला चांगला नावाडी होतां यावें ह्मणून ख्रिस्तोफरानें भूगोल, गणित आणि नौकाशास्त्र यांचा चांगला अभ्यास केला. तो चवदा वर्षांचा होता तेव्हां त्यानें प्रथम समुद्रावर सफर केली.

सुमारें सात आठशें वर्षांखालीं यूरोपखंडांतील ख्रिस्ती लोकांनीं तुर्की-वगैरे मुसलमान लोकांशीं धर्मसंबंधी लढाया केल्या, त्यांस 'क्रूसेडस्' असें म्हणतात. ह्या लढायांच्या संबंधानें युरोपियन लोकांचें मुसलमानांशीं दळणवळण पडलें. मुसलमानांपासून युरोपियनांस पुष्कळ गोष्टींची माहिती झाली. त्यांनीं मुसलमानांच्या तोंडून, आपल्या म्ह० हिंदुस्थान देशाचें वर्णन ऐकिलें. पूर्वकाळच्या सर्व लोकांची, विशेषेंकरून मुसलमानांची अशी चाल होती कीं त्यांनीं एकाद्या पदार्थाचें वर्णन करावयाचें असलें म्हणजे त्याचें चागलें किंवा वाईटपण शतपट वाढवून सांगावें. तेव्हां तुर्की लोकांनीं युरोपियनांना हिंदुस्थानाविषयीं गोष्टी सांगतांना पराचा कावळा आणि मोहोरीचा डोंगर करून सांगितला ह्यांत मोठेंसें नवल नाहीं. त्यांनीं थोडक्यांत हिंदुस्थानाचें वर्णन करावयाचें असलें ह्मणजे 'हिंदुस्थान हें सोन्याचें पांखरूं आहे' असें म्हणून दाखवावें. ह्याचा अर्थ असा कीं हिंदुस्थानांत जिकडे तिकडे सोनें भरलेलं आहे, तो देश इतका श्रीमंत आहे. ख्रिस्ती शकाच्या दहाव्या शतकाच्या शेवटल्या भागापासून मुसल-

मानांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून तेथील लोकांपाशीं असलेलें सोनें, रुपें, जवाहीर वगैरे लुटून नेण्याचा क्रम चालविला होता. मुसलमानांच्या तोंडून ह्या मोठमोठाल्या लुटींच्या गोष्टी ऐकून हिंदुस्थानांतील संपत्तीच्या लालचीनें युरोपियन् लोकांच्या तोंडाला पाणी सुटलें. तेव्हां ते सुलभ रीतीनें हिंदुस्थानास जाण्याचा रस्ता पाहूं लागले. उत्तरेकडून अफगाणिस्थानांतून खुष्की रस्त्यानें हिंदुस्थानास यावें, तर त्यांत पुष्कळ अडचणी होत्या; म्हणून ते एक स्वतंत्र जलमार्ग शोधूं लागले. आफ्रिका खंडाला प्रदक्षिणा घालून जलमार्गानें हिंदुस्थानाला येतां येईल अशी कल्पना कांहींकांच्या मनांत आली होती. परंतु ख्रिस्तोफर् मोठा झाला तेव्हां तो गणित, भूगोल आणि नौकाशास्त्रांत मोठा ज्ञाता झाला होता. तो म्हणाला पृथ्वी गोल आहे, ह्यास्तव पश्चिमेकडून नाव चालवून पृथ्वीगोलाला प्रदक्षिणा घालीत घालीत, मी आपली नाव थेट हिंदुस्थानाला नेऊन पोहोंचवीन.

ख्रिस्तोफरानें, मी आपली कल्पना खरी करून दाखवीन अशी प्रतिज्ञा करून, इटाली, पोर्तुगाल्, इंग्लंड् आणि फ्रान्स् ह्या देशांच्या राजांपाशीं मदत मागितली; पण त्यात्या देशांतील लोकांनीं त्याला वेडा ठरवून मदत देण्याचें नाकारलें! असा हिरमोड झाल्यावरही त्यानें प्रयत्न करायाचा सोडला नाहीं. तो स्पेन् देशच्या राजाला भेटला, आणि म्हणाला मी तुम्हाला हिंदुस्थानासारख्या श्रीमंत देशाला सुलभ रीतीनें जाण्याचा रस्ता काढून देतों, तुम्ही मला ह्या कामांत मदत करा. राजानें त्याचें कांहीं ऐकलें नाहीं; तेव्हां स्पेन्‌ची राणी इसाबेला हिला त्याची दया आली. तिनें त्याला बोलावून आपले डागिने विकून त्याच्या कामाला लागणारा पैसा देण्याचें वचन दिलें. तेव्हां तीन तारवें, कांहीं होतकरू मनुष्यें आणि पुष्कळ दिवसांस पुरण्या इतकें खाण्यापिण्याचें सामान बरोबर घेऊन, ख्रिस्तोफर् कोलंबस् पश्चिमेकडून जलमार्गानें प्रवास करीत

करीत "सोन्याचें पांखरूं" हिंदुस्थान ह्याची पारध करण्यास निघाला.

पुष्कळ दिवस प्रवास केल्यानंतर आफ्रिकाखंडाच्या वायव्य दिशेस कनेरी नांवाचीं द्वीपें आहेत तेथें कोलंबसाच्या नावा येऊन लागल्या. तीं द्वीपें सोडून गेल्यावर जमीनीचा मागमूस नाहींसा होऊन चोहोंकडे अफाट समुद्र दिसूं लागला, तेव्हां कोलंबसाबरोबरच्या लोकांची पांचांवर धारण आली. पण कोलंबस् म्हणाला, "कांहीं चिंता नाहीं, घाबरूं नका, चला, पुढें चला." स्वदेशांतून निघाल्यावर तिसऱ्या महिन्यांत म्ह० इ० स० १४९२ तील अक्टोबरच्या १२ व्या तारखेस एक बेट कोलंबसाच्या दृष्टीस पडलें. त्या बेटांत चोहोंकडे रान वाढलेलें असून त्यावर पुष्कळ रानटी मनुष्यें फिरत होतीं. सकाळचें चांगलें दिसूं लागल्यावर कोलंबसानें स्वतः स्पेन्चें निशाण हातांत घेऊन, प्रथम त्या बेटावर पाय ठेवला. मग एका हातांत नागवी तरवार आणि दुसऱ्या हातांत स्पेन्चें निशाण घेऊन कोलंबसानें स्पेन्च्या राजाच्या नांवानें या बेटाची मालकी घेतली. हें बेट हिंदुस्थानाच्या जवळच कोठें तरी आहे असें समजून त्यानें तेथल्या लोकांस 'इंडियन्' म्ह० हिंदुस्थानी असें म्हणण्याचा परिपाठ घातला. ह्यानंतर कांहीं दूर पुढें गेल्यावर त्यानें 'हेति' नांवाचें बेट पाहिलें. कोलंबसानें चारदां ह्या नव्या देशाची सफर केली. त्यानें आणखी पुढें जाऊन दक्षिण अमेरिकेचा शोध लावला. आपण जो देश शोधून काढला तो हिंदुस्थान देश होय असा कोलंबसाचा पक्का समज झाला होता, म्हणून त्यानें त्या देशाला 'इंडीज्' म्हणजे हिंदुस्थान म्हणण्याचा प्रघात पाडला. पुढें शोधाअंतीं तो देश हिंदुस्थान नव्हे असें समजून आल्यावरून, यूरोपियन् लोकांनीं त्याला 'अमेरिका' असें नांव दिलें. ह्याचें कारण अमेरिगो वेस्प्यूची नांवाचा कोलंबसाचा एक मित्र कोलंबसाच्या मरणानंतर, ह्या नवीन शोधून काढलेल्या देशांत गेला. तेथून परत येतांना त्यानें कित्येक पत्रांमध्यें

आपण जो नवा देश पाहिला होता त्याचें वर्णन केलें. तीं पत्रें एका जर्मन भूगोलशास्त्रवेत्त्यानें छापून प्रसिद्ध केलीं, आणि ह्या अमेरिगोच्या नांवानें तो नवा देश प्रसिद्धीस यावा अशी आपली इच्छा दर्शविली. तेव्हांपासून अमेरिगो ( किंवा अमेरिको असेंही ह्या नांवाचें उच्चारण होतें, ) च्या नांवानें अमेरिकाखंडाची प्रख्याति झाली. खरें म्हटलें असतां कोलंबसानें ज्या भूमीचा शोध लावला तिला कोलंबिया असें नांव पडावें; पण श्रम करतो एक आणि त्याचें यश मिळतें दुसऱ्याला, अशी जी जगांतील पूर्वापार चाल आहे तिच्याच अनुरोधानें कोलंबसाच्या श्रमानें लोकांच्या माहितींत आलेली भूमि अमेरिकोच्या नांवानें प्रसिद्धीस आली असावी. मेक्सिको आणि मध्यअमेरिका यांच्या पूर्वेकडे कांहीं बेटें आहेत त्यांना अद्यापि 'वेस्ट इंडीज्' म्ह० पश्चिम हिंदी बेटें असें म्हणण्याची चाल आहे. अमेरिकेंतील मूळच्या लोकांना 'इंडियन्' म्हणजे हिंदुस्थानी असें म्हणण्याची जी चाल पडून गेली आहे, ती अद्यापि बदलली नाहीं. आमच्या देशी लोकांत आणि त्यांच्यांत असलेला फरक ध्यानांत यावा म्हणून त्यांच्या नांवाला 'तांबडे' असें टोपण लावतात. ह्याप्रकारें हीं आमचीं 'तांबडीं' भावंडें आणि त्यांचा देश पाताळलोक ह्यांचा शोध इ. शकाच्या पंधराव्या शतकांत लागला.

## हलवायाच्या दुकानावर ब्रह्मार्पण.

हा शिरोलेख वाचून वाचकांना थोडेंसें नवल वाटेल. कोणी गप्पीदास, सोदे, आणि चिकू मनुष्यें आपल्या जवळची कवडी सुद्धां खर्चीं न घालतां, केवळ शब्दांनींच किंवा लोकांचा माल लुटून, परोपकार आणि दानधर्म करीत असतात. असल्या मनुष्यांच्या कृत्यांचें वर्णन करावयाचें असलें म्हणजे 'हलवायाच्या दुकानावर ब्रह्मार्पण' असें म्हणण्याची आपल्याकडची

चाल आहे. ह्या ब्रह्मार्पणाच्या अप्रतिम मासल्याची एक मोठीच गोष्ट यूरोपाच्या इतिहासांत घडून आली आहे. त्या गोष्टीचा आमच्याशीं आणि आमच्या पाताळवासी तांबड्या बहिणभावंडांशीं फार निकट संबंध आहे, म्हणून ती तुम्हास सांगितलीच पाहिजे. ती अशी:—

यूरोपखंडांत इटाली नांवाचा एक देश आहे. त्या देशाची राजधानी रोम ही नगरी रोमन किंवा रूमी लोकांच्या चढत्या काळांत फार प्रख्यातीस आली. रूमी लोकांच्या पडत्या काळांत ‘ पोपां ’ च्या संबंधानें ही नगरी मोठ्या पदवीस चढली. आतां पोपांचीही उतरती कळा आहे. त्यांचें माहात्म्य फारसें उरलें नाहीं, तरी ती नगरी फार जुनी असल्या कारणानें विद्वान् आणि जुन्या वस्तूंची आवड धरणारे पुष्कळ लोक रोम पाहायाला जातात. वर ज्या पोपांची गोष्ट सांगितली ते ख्रिस्ती धर्मांतील ‘ क्याथोलिक ’ पंथाच्या लोकांचे मुख्य गुरु होत. आमच्या देशांत श्रीशंकराचार्यांच्या शिष्यांनीं आपल्या मुख्य गुरूंस जशी ‘ जगद्गुरु ’ अशी पदवी दिलेली आहे, तशीच क्याथोलिक पंथाच्या ख्रिस्ती लोकांनीं आपल्या मुख्य गुरूंस ‘ पोप ’ अशी पदवी दिली आहे. ‘ पोप ’ ह्या शब्दाचा अर्थ “ बाबा,” ‘ वडील.’ असा होतो. ख्रिस्ती शकाच्या पांचव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत सुमारें एक हजार वर्षें ह्या पोपांचें माहात्म्य सगळ्या यूरोपखंडांत फारच वाढलें होतें. प्रथम हे पोप गरीब धर्मपरायण अशा क्याथोलिक संन्यासी वैरागी लोकांच्या मठाचे महंत होते. पैसा जमविण्याशीं आणि राज्यकारभाराशीं त्यांचा कांहींच संबंध नव्हता. ख्रिस्ती शकाच्या चवथ्या शतकांत रोमचा बादशाहा कान्स्टंटीन् ह्याणें ख्रिस्ती धर्म घेतला, तेव्हांपासून त्या महंतजींचा राजकारस्थानांत थोडा थोडा शिरकाव होत चालला. पुढें पोपजी इतके डोईजड होत चालले कीं, त्यांनीं एकाचें राज्य त्याला विचारल्यावांचूनच आपल्या मर्जीतील दुसऱ्या कोणाला तरी देऊन

टाकावें. मग पोपजींना वाटूं लागलें कीं, 'आपणच काय ते जगद्गुरु आहों. नुस्ते जगद्गुरु नव्हे, तर परमेश्वराच्या खालोखाल ह्या पृथ्वीचे आपण मालक आहों. आपल्याला वाटेल त्याला राजा किंवा रंक करण्याची शक्ति परमेश्वरानें आपल्यास दिली आहे. आपल्याकडून कधीं पाप किंवा चूक होत नाहीं. आपण पश्चिमेला पूर्व म्हटलें तर तेंच खरें आहे.' लक्षावधि भोळे लोक 'जगद्गुरु पोपजी' ह्यांचें मत अक्षरशः खरें आहे असें मानून त्यांची पूजा आणि त्यांची आज्ञा शिरसामान्य करूं लागले. जरकरतां कोणी हट्टी मनुष्यानें पोपजींचें सांगणें ऐकलें नाहीं तर, पोपजी त्याला वाळीत टाकीत असत. असा मनुष्य ह्या लोकीं जीवंत असतां वाळीत टाकला जाई एवढेंच नव्हे, तर परलोकीं स्वर्गांत सुद्धां त्याला कोठें राहण्यास जागा मिळूं नये असें करून टाकण्याचें सामर्थ्य पोपास आहे म्हणून, भोळे लोक पोपाला फारच भीत असत. साधारण गरीबगुरीब लोकांची गोष्ट तर राहूं द्या, पण मोठमोठाले सत्ताधारी राजे आणि विद्वान् लोक सुद्धां पोपाच्या भीतीनें थरथरां कांपत असत. सर्वच राजे म्हणजे धर्मबुद्धीनें पोपाला मान देत होते असें नाहीं. कोणी कोणी ढोंगी राजे पोपाची खुशामत करून आपलें काम काढून घेत असत.

कोलंबसासारखे दृढनिश्चयाचे आणि विद्वान् लोक जलमार्गानें भूगोलावर जिकडे तिकडे प्रवास करून नवे नवे संपत्तिमान् देश शोधून काढण्यास सिद्ध झाले तेव्हां रोमच्या एका पोपजींनीं हलवायाच्या दुकानावर एक खासें ब्रह्मार्पण केलें! पंधराव्या शतकांत स्पेन आणि पोर्तुगल देशांचे राजे पोपाच्या मर्जीतले शिष्य होते. स० १४९३ त सहावा आलेग्जांडर ह्या नांवाच्या पोपमहंतजींनीं अत्यंत प्रसन्न होऊन ह्या आपल्या प्रिय शिष्यांना दोन मोठ्या देणग्या दिल्या. पोपांनीं 'बुल्' नांवाचा हुकुमनामा प्रसिद्ध करून असें ठरविलें कीं, स्पेन आणि पोर्तुगल ह्या दोन्ही संस्थानांच्या मद-

तीनें जितकीं ह्मणून नवीं राष्ट्रें किंवा बेटें शोधून काढण्यांत येतील तीं सर्व त्या संस्थानांच्या मालकांनीं घ्यावीं. ह्या दोघांचें भांडण होऊं नये म्हणून आट्‌लांतिक समुद्राच्या मध्यें उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत एक कल्पित रेघ ओढून त्यांना सांगितलें कीं, नवीं म्ह० जीं अमेरिका वगैरे महाद्वीपे आणि द्वीपें पश्चिमगोलार्धांत सांपडलीं आहेत किंवा पुढें सांपडतील तीं सगळीं स्पेनच्या राजानें घ्यावीं; आणि सदरीं सांगितलेल्या रेघेच्या उजव्या बाजूस पूर्व गोलार्धांत असलेलीं अफ्रिका, हिंदुस्थान आणि त्यांच्या आसपासचीं बेटें हीं पोर्तुगलच्या राजानें घ्यावीं.

अफ्रिका, अमेरिका, हिंदुस्थान आणि त्यांच्या आसपासचीं द्वीपें पोपाच्या बापाचें काय लागत होतीं? तीं स्पेन आणि पोर्तुगलच्या राजांला देण्याचा हक्क पोपाला कोठून मिळाला? पण ढोंगी आणि पाखंडी मनुष्यें केव्हां काय करतील ह्याचा नेम नाहीं. म्हणूनच ह्या पोपाच्या कृत्याला 'हल-वायाच्या दुकानावर ब्रह्मार्पण' हें नांव शोभण्यासारखें आहे असें मला वाटतें.

## सोनें, सोनें आणा सोनें !

इ० स० १४९२ त कोलंबस स्पेनच्या राणीच्या मदतीनें पश्चिमेकडून अमेरिकेची (त्याच्या समजुतीप्रमाणें हिंदुस्थानाची) सफर करून आल्यावर, १४९७ त वास्कोडिगामा हा पोर्तुगी सरकाराच्या मदतीनें अफ्रिकेला प्रद-क्षिणा घालून हिंदुस्थानाची सफर करून गेला. स्पेन आणि पोर्तुगाल

---

१ रा० रा० विनायक कोंडदेव ओक ह्यांनीं आपल्या 'हिंदुस्थानकथारस' नांवाच्या पुस्तकांत 'हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांचा प्रवेश' ह्या सदराखालीं वास्कोडिगामाच्या सफरीचें उत्तम वर्णन केलें आहे, तें वाचून पाहा.

देशच्या लोकांनीं नवे देश शोधून काढले ते केवळ 'सोन्याकरतां.' नवीन सांपडलेले देश जर बळकट लोकांच्या हातीं असले, तर तेथें वारा जिकडून येईल तिकडे पाठ फिरवावयाची अशा प्रकारची नीति अवलंबून त्या प्रबळ लोकांशीं आपल्याला ह्या देशांत व्यापार करण्याची मोकळिक असावी म्हणून विनंति करायाची. परंतु तेथले लोक जर अज्ञान, रानटी आणि आपल्याशीं झुंजण्यास असमर्थ असे असले, तर त्यांचा देश आपल्या राज्याला एकदम जोडावयाचा. आणि त्या लोकांना बळानें नाहीं तर छळानें गुलाम करून गुरांढोरांप्रमाणें बाजारांत नेऊन विकायाचे, असा त्या युरोपियन लोकांचा मतलब होता, हें त्यांच्या आचरणावरूनच स्पष्ट दिसून येतें. कोलंबस ह्या नव्या देशांत आला तेव्हां, त्याचा आणि त्याच्या बरोबरच्या लोकांचा रंग, आकृति, त्यांची विचित्र नाव वगैरे पाहून सान सल्वाडोर[१] बेटांतील मूळच्या रहिवासी लोकांना वाटलें कीं, हे कोणी देव आहेत. म्हणून ते मोठ्या भक्तिभावानें ह्या गोऱ्या देवांची सेवा करूं लागले. गोऱ्या देवांनीं त्या बेटावर आपल्या तांबड्या भक्तांचा हक्क आहे किंवा नाहीं ह्याची विचारपूस केल्यावांचून स्पेनचा राजा फर्डिनंद आणि राणी इसाबेला ह्यांच्या नांवानें तें बेट एकदम आपल्या राज्यास जोडलें! ते इतकेंच करून राहिले नाहींत तर, पुढें कोलंबसाच्या दुसऱ्या सफरीच्या वेळेपासून आणखी पुष्कळ स्पानियार्द (स्पेन देशचे लोक) इकडे येऊं लागले, तेव्हां त्यांनीं बिचाऱ्या पाताळवाशी निरुपद्रवी लोकांस धरून गुलाम करून विकण्याकरतां स्पेन देशास नेलें. आणि पुष्कळांस तेथल्या तेथेंच गुलाम करून सोन्याच्या

---

१ ह्याच द्वीपावर प्रथम कोलंबसानें पाय ठेवला. पश्चिमहिंदी किंवा वेस्ट इंडीज बेटांपैकीं हें एक बेट असून बहामा बेटांमध्यें मोडतें. ह्याचें मूळचें नांव ग्वानाहानी असें होतें. त्याला सानसल्वाडोर हें नांव कोलंबसानेंच दिलें. ह्याचा अर्थ 'पवित्र तारणारा' असा आहे.

खाणी खणण्यास लावलें. त्यामुळें शेंकडों तांबडे लोक अतिशय परिश्रम आणि गांजणूक यांनीं पटापट मरून गेले. जर कोणीं हट्ट धरून गुलामाप्रमाणें काम करण्याचें नाकारलें तर, स्पानियार्द देवांनीं त्याला धरून खूप मारावें. इतकेंही करून त्याचा हट्ट नरमावला नाहीं तर त्याचे हालहाल करून त्याच्या स्वजातीचे लोकांपुढें त्याचा जीव घ्यावा. म्हणजे हट्ट केल्यास आपलीही अशीच दुर्दशा होईल अशा दराऱ्यानें गोऱ्या पिशाचांचे तांबडे भक्त आपले प्रभू सांगतील त्याप्रमाणें हूं का चूं न करतां काम करीत. पण असे सतत श्रम करण्याची त्यांना संवय नसल्यामुळें ते लवकर मरून जात. पाताळवासी तांबडे लोक जन्मापासून स्वतंत्र असून त्यांना कोणाची गुलामगिरी करण्याची संवय नसे. स्पानियार्द आणि दुसरे पुष्कळ युरोपियन लोक त्यांस जबरीनें गुलाम करूं लागले तेव्हां ते उपास करून किंवा गळ्यास फांस लावून आपल्याच हातांनीं आपल्याला मारून घेत असत. स्पानियार्दासारख्या अधाशी आणि क्रूर मनुष्यांचे गुलाम होवून जन्मभर जाच सोसण्यापेक्षां, त्यांना मरण पतकरत असे. एकदां असें झालें कीं, पुष्कळ तांबड्या लोकांनीं क्रूर परदेशी प्रभूंच्या हातून आपली सुटका करून घेण्याकरतां सर्वांनीं मिळून एकदम फांशीं टांगून घेण्याकरितां म्हणून एक दिवस नेमला. त्यांची ही मसलत त्यांच्याकडून गुलामगिरीचें काम करविणाऱ्या एका गोऱ्या मनुष्याला समजली. तो स्वभावाचा अतिशय क्रूर असून जबरीनें गुलाम केलेल्या तांबड्या मनुष्यांस नित्य मारहाण करून गांजीत असे. वर सांगितल्याप्रमाणें नेमलेल्या दिवशीं आपापल्यास फांशी देण्याच्या दोऱ्या घेऊन फांशीं लावून घेण्याकरतां ते एका गुप्त ठिकाणीं जमले; तेव्हां हा क्रूर मनुष्य आपल्या हातांत एक दोरी घेऊन त्यांच्यामध्यें जाऊन थडकला. त्याला तेथें आलेला पाहून त्या बिचाऱ्यांना केवढें भय आणि आश्चर्य वाटलें असेल तें सांगतां पुरवत नाहीं. मग तो

त्यांस म्हणाला—'गुलामांनो, तुमची मसलत मला कळणार नाहीं असें तुम्हांला वाटलें होतें काय? मला तुमच्या मनांतील गोष्टी देखील समजतात. आतां तुम्ही आपल्याला फांशीं लाऊन घेऊन मरा तर खरे, मी ही एक दोरी हातांत आणली आहे ही पाहिलीत ना? तुम्ही फांशीं जाऊं लागा. मीही आपल्या नरड्याला हा फांस लाऊन तुम्हांला परलोकीं एथल्यापेक्षां शतपट जास्ती गांजायाला तुमच्यावरोबरच मरून जातों पाहा!" त्या बिचाऱ्या भोळ्या माणसांना त्याचें म्हणणें खरें वाटलें. मग हा खरोखरच आपल्याबरोबर मेला तर परलोकीं आपल्याला एथल्यापेक्षां जास्ती दुःख देईल अशा भीतीनें त्यांनीं आपला फांशीं जाण्याचा बेत सोडून दिला. आणि ते पहिल्याप्रमाणें गोऱ्या मालकांचे अंकित होऊन मरेमरेतों काम करूं लागले. ह्या गोष्टीवरून ज़ेथें जबरीनें आपलें काम निघालें नाहीं, तेथें लबाडीच्या युक्तीनें भोळ्या लोकांवर आपली छाप बसविण्याची विद्या गोऱ्यांना कशी साधली होती हें चांगलें दिसून येतें.

कोलंबसासारखे थोर मनुष्यसुद्धां अशी लबाडी करायाला चुकले नाहींत. कोलंबसाला आपल्या प्रवासांच्या अवाढव्य खर्चामुळें पुष्कळ ऋण झालें होतें. हें ऋण फेडण्यास त्यानें अशी युक्ति काढली कीं, त्यानें पश्चिम हिंदीबेटांवरील सुमारें पांचशें तांबड्या लोकांना निरनिराळ्या वेळीं फसवून किंवा जबरीनें धरून, आपल्या तारवांवर लादून स्पेनांत गुलाम करून विकण्याकरतां पाठविलें. त्यांना विकून जो पैसा मिळाला तो घेऊन त्यानें आपलें कांहींसें ऋण फेडून टाकलें! ह्यांत विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, कोलंबस आणि त्याच्या मागून इकडे आलेले लोक यांना, आपण करतों हें परमेश्वराच्या इच्छेस अनुसरूनच आहे असें वाटत असे. ज्या गरीब निरपराधी मनुष्यांना त्यांच्या मुलांमाणसांपासून, आणि घरेंदारें स्वातंत्र्याचें सुख, स्वदेश इत्यादि अमोलिक वस्तूंस

(ज्या असल्यानें मनुष्याला वांचावेंसें वाटतें त्यांस) व सुखाच्या आशेस मुकवून स्पेनांत गुलाम करून विकलें, आणि तेथें त्यांना गुलामगिरीच्या अवर्णनीय यातना भोगायाला लावलें, हे त्यांवर आपले मोठे उपकार झाले असें कोलंबसाला वाटलें. कारण ते होते मूर्त्तिपूजक. त्यांना स्पेनासारख्या ख्रिस्तीदेशांत पाठवून तेथें ख्रिस्ती क्याथोलिकपंथाची दीक्षा देवविण्याची आपण सोय करून दिली ह्यांत आपण शक्त्यनुसार ईश्वराची सेवा केली असा त्याचा समज होता! थोर मनुष्यांच्या आचरणावर अशा विलक्षण राक्षशी कृत्याचा कालिमा लागावा ही गोष्ट किती वाईट आहे बरें?

मनुष्याच्या अंतःकरणांत बरें वाईट समजण्याची जी बुद्धि असते तिला विवेक म्हणतात. वाईट कृत्य करतांना किंवा केल्यावर मनुष्याचें मन त्याला खात असतें. तेव्हां ह्या मनांतील यातना कमी व्हाव्या म्हणून आपल्या कृत्याला चांगलेपण आणण्याकरतां त्याला कांहींना कांहींतरी उपाय शोधून काढावे लागतात. धर्माची द्वाही देणें हा एक अशा प्रकारचा उपाय आहे. स्पेनच्या राजानें जेव्हां कोलंबसाला आणि त्याच्या मागून गेलेल्या माणसांना पुष्कळ मदत देऊन पुनः पाताळाकडे पाठविलें, तेव्हां त्याणें व अशीं माणसें पाठविणाऱ्या इतर राजांनीं त्यांच्यापासून तीन करार करून घेतले होते. त्यांपैकीं पहिला, आणि सर्वांत जास्ती महत्वाचा हा कीं, त्यांनीं सोनें धुंडाळून आणावें; दुसरा, तांबड्या इंडियनांना ख्रिस्ती करावें; तिसरा, नवे देश शोधून काढावे व साधल्यास ते काबीज करून आपल्या राज्यास जोडावे. परदेशीं जाऊन तेथली संपत्ति लुटणें हाच त्यांचा मुख्य उद्देश, परंतु त्यानें त्यांच्या विवेकाचें समाधान होणारें नव्हतें, म्हणून स्वधर्माचा प्रसार करणें ह्या दुसऱ्या उद्देशाचें घोडें पुढें घातलें. ह्या सोन्याच्या शोधाला गेलेल्या लोकांबरोबर कित्येक चांगले परोपकारी लोक मनोभावानें स्वधर्माचा प्रसार करण्याकरतां पाताळास गेले.



आमचा तांबडा भाऊ.



शिकारीस चाललेला
"तांबडा इंडियन्".

त्यांनीं मनापासून तांबड्या लोकांचें हित केलें. पुष्कळ प्रसंगीं त्यांनीं सोन्याचे अधाशी यूरोपियन यांच्या आणि त्या गरीबलोकांच्या मध्यें पडून त्यांच्यावर होणारे जुलूम न व्हावे असें केलें. अशा सज्जनांस आम्हींच काय पण सर्व देशांतील सर्व जातींचे लोक चांगले म्हणतील, आणि त्यांची स्तुति करतील.

## आमच्चीं तांबडीं भावंडें आणि त्यांच्या चालीरीती.

पाताळांतील लोकांना 'तांबडे' असें टोपण नांव दिलेलें आहे हें मीं वर सांगितलेंच आहे. आतां हें टोपण नांव त्यांना कसें मिळालें, व त्यांच्या चाली रीति कशा होत्या आणि निरनिराळ्या ठिकाणीं त्यांची स्थिति कशी होती ह्या गोष्टींची संक्षिप्त माहिती देण्याचा माझा उद्देश आहे. कोणत्याही देशांतील लोकांच्या किंवा पदार्थांच्या गोष्टी ऐकण्यापूर्वी ते लोक किंवा पदार्थ कसे असतात, त्यांच्या आंगचे गुण आणि अवगुण कोणकोणते आहेत तें कळून घेतल्यावर, त्या गोष्टी समजून घेऊन ध्यानांत ठेवण्याला बरीच मदत मिळाल्यासारखी होते.

आम्ही आपल्या देशांत मनुष्यांच्या कातडीचे निरनिराळे रंग रोज पाहात असतों. आमच्या देशी माणसांपैकीं कांहीं गोरीं, कांहीं काळीं कुळकुळीत, कांहीं सांवळीं, कांहीं फिकट रंगाचीं, कांहीं घारींभुरीं, आणि कांहीं 'न धड गाढव न धड ब्रह्मचारी' ह्या म्हणीप्रमाणें कोणत्याच रंगांत न मोडणारीं अशीं असतात हें सर्वांस ठाऊक आहे.

वर सांगितल्याप्रमाणें स्पानियार्द लोकांनीं जेव्हां पाताळ शोधून काढलें तेव्हां तेथें त्यांस जीं मनुष्यें दिसलीं त्यांचा रंग कांहींसा गेरूसारखा तांबडा आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यांनीं प्रथम न जाणून त्या तांबड्या लोकांस 'हिंदुस्थानी' असें नांव दिलें, पण पुढें त्यांची चूक कळून आल्यावर

पाताळच्या मूळ रहिवाशांस त्यांच्या रंगावरून "तांबडे लोक" किंवा 'तांबडे इंडियन्' असें म्हणण्याची चाल पडली. हे लोक उत्तर अमेरिकेंत कधीं आणि कोठून आले हें कोणाला माहित नाहीं. उत्तर अमेरिकेंत ह्या लोकांची वसाहत होण्यापूर्वी तेथें दुसऱ्या कोणत्या तरी जातीचे लोक राहिले असावेत असें पुष्कळांचें अनुमान आहे. कारण ह्या देशाच्या निरनिराळ्या भागांत जुन्या इमारतींच्या पडींव भिंती, डोंगरांत कोरून काढलेल्या गुहा, मोठमोठाले बंधारे, आणि जमीन फार खोल खणीत असतां मिळालेलीं मडकीं, भांडीं, डागिने, बाणांचीं अग्रें वगैरे पाहिलीं असतां तीं ह्या तांबड्या लोकांच्या काळांत झालेलीं नाहींत असें समजून येतें.

'तांबडे इंडियन्' अंगापिंडाचे मोठे धिप्पाड, उंच, सशक्त, चपळ आणि नाकाडोळ्यांनीं बरे असे आहेत. बायका पुरुषांपेक्षां कांहींशा ठेंगण्या, आणि त्यांपैकीं कित्येक चांगल्या सुरेख असतात. ह्या लोकांचा स्वभाव इतर देशीलोकांपेक्षां निराळ्या तऱ्हेचा आहे असें नाहीं. कोणी त्यांच्या वाटेला गेलें नाहीं तर ते विनाकारण कोणाला उपद्रव देत नाहींत, परंतु कोणी त्यांची खोडी केली तर त्याचा सूड उगवावा कसा हें त्यांस चांगलें समजतें. आणि तें समजत नाहीं कोणाला? कांहीं गोरेलोक म्हणतात कीं तांबडेलोक सोदे, लबाड, विश्वासघातक, खुनशी आणि क्रूर आहेत, पण तें खरें नाहीं. पुष्कळ चांगल्या स्वभावाच्या गोऱ्या मनुष्यांनीं 'तांबड्यां'च्या सहवासांत राहून त्यांची परीक्षा करून पाहिली आहे. ते सांगतात कीं 'तांबडे इंडियन्' मोठे संभावित, उपकार स्मरणारे, कोणी नवखा त्यांस भेटायाला आला तर उत्तमप्रकारें त्याचें आदरातिथ्य करणारे, मायाळू स्वभावाचे असे आहेत. आतां त्यांपैकीं सगळेच चांगले आहेत असें नाहीं. आणि गोऱ्यांमध्यें तरी कोठें सगळेच लोक चांगले आहेत? सारांश लोक चांगले आणि वाईट असणें हें एकाद्या जातीवर किंवा देशावर अवलंबून

नाहीं. सर्व जातींत आणि सर्व देशांत चांगले वाईट लोक सांपडतात, तसेच ते ' तांबड्या इंडियनां 'मध्येंही सांपडतात. इसवी शकाच्या पंधराव्या शतकांत तांबडे लोक बहुतकरून सगळे रानटी स्थितींत होते. ते अंगाला तऱ्हतऱ्हेचे रंग लावीत. पारधींत मारलेल्या जनावरांचीं कातडीं कमावून त्यांचीं आंगडीं आणि पांघरुणें करीत आणि पांखरांचीं रंगीत पिसें लावून त्यांना शोभा आणीत असत. अद्यापि ही चाल त्यांच्यामध्यें चालू आहे. आलीकडे युरोपियन लोकांच्या सहवासानें त्यांस सुताचीं आणि लोंकरीचीं वस्त्रें वापरण्याची आणि सुधारलेल्या जातींतील माणसांच्या दुसऱ्या पुष्कळ संवयी लागल्या आहेत. पूर्वी त्यांस लोखंडाचा उपयोग कसा करावा हें माहित नव्हतें. गारा कापून त्याचीं बाणाग्रें ( बाणांचीं डोकीं, किंवा टोंकें ) भाले, बर्च्या वगैरेंचीं टोंकें, इ० करून ते आपलें काम चालवीत. ते मोठे चतुर तिरंदाज होते. सोडगीं किंवा सोटे खेळण्यांत ते वस्ताद होते. त्यांना दारुगोळा, तरवारी, बंदुका, तोफा वगैरेंचा उपयोग मुळींच माहित नव्हता. दगडाविटांचीं घरें चुना लावून बांधण्याचें त्यांस माहित नव्हतें. ते फारशी शेतीभाती करीत नव्हते. कांहीं कांहीं ठिकाणीं मक्याचें धान्य बहुत श्रम केल्यावांचून पुष्कळ उत्पन्न होत असे तें, रानांतलीं फळें, आणि शिकारींत मारलेल्या जनावरांचें मांस मासे इत्यादि पदार्थांवर त्यांचा चरितार्थ चालत असे. त्यांच्यांत पत्रें पुस्तकें वगैरे लिहिण्यास लिपि नव्हती. त्यांच्या पुष्कळ जाती असून प्रत्येक जातीची भाषा निराळी होती; तरी कांहीं अंशीं त्या भाषांचें एकमेकींशीं साम्य होतें. उत्तर अमेरिकेच्या दक्षिणटोंकावर 'मेक्सिको' म्हणून एक भाग आहे, तेथील लोकांची स्थिति अगदींच रानटी नसून बरीच सुधारलेली होती.

ह्या रानटीलोकांचीं घरें म्हणजे लहान लहान झोंपड्या होत. दहा पांच लांब लांब सरळ काठ्यांचे बुंधे एकमेकांपासून दूर दूर वर्तुळाकार भु-

ईत पुरून त्यांचीं टोंकें एकवट करून बांधायाचीं आणि जनावरांचीं कातडीं, झाडांच्या साली किंवा चटया त्यांच्यावर घालून लहान तंबू करायाचे. त्यांच्या वरच्या बाजूस मधोमध धुराला निघण्याकरतां लहानसें भोंक आणि समोर छोटेंसें दार असायाचें. हें दार लांकडाचें नसून एक लहानसा पडदा घातलेला असतो. घरांत जातांयेतांना हा पडदा उचलला म्हणजे झालें. त्यांच्या ( पुरुषांच्या ) नित्य कृत्यांमध्यें, पारध करणें, मासे धरणें, झाडांच्या सालींच्या होड्या करणें, गारा आणि माशांचीं हाडकें वगैरे घेऊन त्यांचीं हत्यारें करणें, कातडीं कमावणें, हीं मुख्य होत. बायकांनाच बहुतकरून इतर सगळीं कामें करावीं लागत असतात. ह्यांपैकीं जमीन नांगरणें, शेताची रखवाली करणें, पेरणें, स्वैपाक करणें, इत्यादि कामें मुख्य आहेत. त्यांच्या शेतांत बहुतकरून मका, तंबाखू, भोंपळे, मुगवे भोंपळे, घेवड्या वगैरे उत्पन्न होतात. त्या लोकांना तंबाखू ओढण्याची मोठी चहा असते. तंबाखू हा पदार्थ चारशें वर्षांपूर्वी पूर्व गोलार्द्धांतील लोकांस मुळींच माहित नव्हता. हें रत्न प्रथम पाताळांतून यूरोपांत आलें, तेव्हांपासून भूगोलावरील बहुतेक सर्व देशांमध्यें लोकांना तंबाखू ओढण्याचें दुर्व्यसन लागलें.

तांबड्या रानटी मनुष्यांमध्यें व्यापाराचें फारसें माहात्म्य नव्हतें, तरी पूर्वेकडचे लोक 'वाम्पम्' नांवाच्या माळा करून आणि पश्चिमेचे लोक खाणींतून तांबें काढून विकीत असत. 'वाम्पम्' म्हणजे कांहीं जातींच्या काळ्या, पांढऱ्या किंवा जांभळ्या रंगाच्या कवड्या दोऱ्यांत गोवून केलेल्या माळा असत. ह्या माळा रुपये, पैसे, मोहरा इत्यादि नाण्यांच्या ऐवजीं चालत होत्या इतकेंच नव्हे; तर दोन राजांचा किंवा जातींचा तह व्हायाचा असला म्हणजे त्याचे कंबरपट्टे करून दिल्यास ते तहनाम्याच्या ऐवजीं चालत होते. ह्याशिवाय घारीचीं पिसें देऊन आणि एका प्रकारच्या निलिमीमधून

तंबाखू ओढून तह करण्याचीही कित्येक जातींची चाल होती.

त्यांची राज्यव्यवस्थाही फारच साधी होती. एकाद्या बळकट मनुष्याला सर्वानुमतें राजा ठरवून त्या जातींतील सर्व मनुष्यांनीं त्याच्या आज्ञेंत वागायाचें असें होतें. त्यांच्यांत वंशपरंपरेनेंच राज्यपदवी मिळत असे. शेजारच्या एकाद्या जातीशीं लढाई करण्याची वेळ आली म्हणजे राजा कमकुवत असला तर आपल्या जातींतील एकाद्या शूर आणि चतुर अशा पुरुषाला सर्वानुमतें पसंत करून सेनापतीची पदवी देई. आणि राजा स्वतः शूर असला तर तोच सेनापति होई. त्यांच्या पुष्कळ जाती होत्या. त्यांचे परस्परांशीं तंटे बखेडे पुष्कळ होत असत.

त्यांचा धर्म ( थोडक्यांत सांगूं गेलें असतां ) असा होता कीं, कोणी मोटा परमात्मा सर्वांचा सृष्टिकर्त्ता आणि संरक्षणकर्त्ता आहे. त्याची सत्ता सर्वांवर आहे. त्याच्या हाताखालीं पुष्कळ लहान सहान देवता आणि भूतें आहेत, त्यांपैकीं कोणी चांगल्या आणि कोणी वाईट स्वभावाचे आहेत. चांगले सुख देतात आणि वाईट दुःख देतात. वाईट स्वभावाच्या भूतांनीं उपद्रव देऊं नये म्हणून त्यांना बळी देऊन त्यांची पूजा केली पाहिजे. स्वप्नें आणि शकुन ह्यांच्या द्वारें पुढें होणाऱ्या गोष्टी कळून येतात. मरणानंतर पुण्यवान् लोक अमर होवून अनंतकाळ सुखानें शिकारी खेळत असतात. शिकार खेळणें हें त्यांच्या मतें सर्वोत्तम सुख आहे.

लढाईंत पाडाव करून आणलेल्या मनुष्यांस एक तर देवळांत नेऊन बळी द्यायाचे नाहींतर त्यांचे हाल हाल करून मारायाचे अशी त्यांची चाल होती. जो जितके हाल सोशील त्या मानानें तो कमी किंवा ज्यास्ती धाडसाचा मनुष्य आहे असें समजावयाचें. लोकांचे हाल हाल करून मारणें ही त्यांच्या जातींतली चाल होती, ह्यावरून ते लोक जात्या क्रूर आहेत असें नाहीं. रानटी आणि अज्ञानस्थितींत असतांना लोकसमाजांत पुष्कळ वेड्या वांकड्या

चाली असतात. इंग्लंडांतील लोक रानटी स्थितींत असतांना मनुष्य बळी देत होते. पुढें सर्व यूरोपांत खिस्ती धर्माचा जिकडे तिकडे प्रसार होवून लोक सुधारत आले, तरी त्यांच्यांत धर्मसंबंधांत किंवा राज्यकारस्थानांत पडून अपराधी ठरलेल्या मनुष्यांस जीवंत जाळून किंवा इतर प्रकारांनीं त्यांचे हाल हाल करून मारण्याची चाल होती. परवां ब्रह्मदेश खालसा केल्यावर तेथील 'बंडवाल्यांचे' मनस्वी हाल केल्याबद्दल चोहोंकडे पुकारा झाला होता, आणि होत आहे.

कित्येक जातींतील 'तांबडे इंडियन्' मनुष्यांना देवांपुढें बळी देऊन त्यांचें प्रसादी मांस खात असत. जलचरप्राण्यावांचून इतर कोणतेही सृष्टींतील प्राणी बहुतकरून स्वजातीच्या प्राण्याचें मांस खात नाहींत असें अनुभवास येतें; परंतु मनुष्य एवढा उत्तम प्राणी असून तो आपल्या जातीच्य प्राण्याचें मांस खातो ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. सुधारलेलीं मनुष्यें बहुत करून इतर मनुष्यांचें प्रत्यक्ष मांस खात नाहींत, हें खरें आहे; परंतु मांस खाल्ल्यावांचून इतर पुष्कळ प्रकारांनीं स्वजातीच्या प्राण्यांस खाण्याची विद्या सुधारलेल्या लोकांना उत्तम रीतीनें साधलेली आहे! प्रत्येक देशाच्या आणि जातीच्या इतिहासाचीं पानें ह्या मनुष्यभक्षणाच्या वर्णनानें भरलेलीं आहेत. आजकाल यूरोपांत मनुष्यभक्षणाच्या पुष्कळ नव्या नव्या युक्ती निघत आहेत. कोणी आपल्या शेजाऱ्याला धरून तो हिरवा कच्चा असतांनाच खाऊन टाकतो, आणि कोणी त्याला भाजून, तळून किंवा त्याची चटणी वाटून खातो एवढाच काय तो फरक. बाकी मनुष्य खाण्याची चाल अद्यापि कोणत्याही देशांत नाहींशी झाली आहे असें नाहीं. पाहाहो सावध राहा, तुम्ही मात्र एकमेकांस खाऊं नका, म्हणजे मोठेंच मिळविलेंत असें समजा!

## तांबड्या लोकांचें स्वातंत्र्य जाऊन त्यांचा नाश होण्याचीं कारणें.

एथपर्यंत थोडक्यांत आमच्या तांबड्या भावंडांच्या चालीरीती कशा होत्या हें सांगितलें. आतां त्यांचें स्वातंत्र्य जाऊन त्यांचा बहुतेक नाश होण्याचीं कारणें संक्षेपानें सांगून हा भाग पुरा करितें.

यूरोपियन लोकांनीं पाताळांत जाऊन तेथलें सोनें खणून आणि मनुष्यांस धरून आणण्याची सुरवात केली, तेव्हां तांबडे लोक कसे अज्ञानी आणि रानटी स्थितींत होते हें वर सांगितलेंच आहे. त्यांना दारूगोळा, तोफा, बंदुका वगैरे प्राणिघातक शस्त्रास्त्रांचा उपयोग कसा करावा, आणि तीं काय आहेत हें मुळींच माहित नव्हतें. ह्याशिवाय अमेरिकेंत घोडे मुळींच नव्हते. हीं विलक्षण तेजस्वी, चपळ आणि बलिष्ठ जनावरें ज्या मनुष्यांच्या अर्ध्या वचनांत वागतात ते साधारण नसून कोणी तरी देवांशी आहेत, असा त्या रानटी लोकांचा समज झाला. आपण पुराणांमधून अग्न्यस्त्र, वज्रास्त्र, वायव्यास्त्र वगैरे अद्भुत आणि अजिंक्य अस्त्रांच्या गोष्टी ऐकतों, तीं अस्त्रें काय आहेत, कशीं आहेत, त्यांचा उपयोग कसा करावा, हें आम्हाला माहित नाहीं. अशा स्थितींत तीं अस्त्रें जाणणारा असा एकादा मनुष्य आमच्या देशांत आला आणि आम्हाला भिववून जिंकण्याचें त्याच्या मनांत आलें तर, तो तें सहज करूं शकेल. त्याच्या पुढें तीं अस्त्रें न जाणणाऱ्या लक्षावधि लोकांच्यानेंही टिकाव धरवणार नाहीं; इतकेंच नव्हे तर त्याला ह्या अद्भुत विद्या माहित असल्यानें तो आपल्यापेक्षां उत्तम आणि देवांशी आहे असा अज्ञ लोकांचा समज होवून जातो, त्यामुळें ते त्याला विनाकारण भिऊं लागतात. ह्या बिचाऱ्या तांबड्या इंडियनांची हीच अवस्था झाली. ते म्हणजे यूरोपियनांपेक्षां कमकुवत होते, किंवा त्यांना स्वातंत्र्याची आवड

नव्हती, आणि यूरोपियन लोक त्यांच्या स्वातंत्र्यांत हात घालूं लागले तेव्हां त्यांना तांबड्या लोकांनीं अटकाव केला नाहीं असें नाहीं. परंतु ते अज्ञामी, भोळे, आणि कांक्षेखोर होते. शकुनांना आणि दुर्निमित्तांना भिऊन कधीं कधीं त्यांनीं आपल्या शत्रूंस अटकाव केला नाहीं. कधीं शत्रूंचीं बंदुका, तोफा वगैरे अग्न्यस्त्रें आणि घोडे पाहून त्यांना ते भ्याले. विचारे करतील काय? तुम्ही जरी हजारों मनुष्यें मिळून शत्रूचा सामना करण्यास सिद्ध असलां तरी, तुमच्या एकट्या शत्रूनें तुम्हावर विस्तवाचा आणि तापलेल्या गोळ्यांचा पाऊस पाडला तर तुमच्यानें त्याच्या पुढें उभें राहवणार नाहीं; कारण त्याच्याशीं झुंजण्याला उपयुक्त अशीं शस्त्रें तुम्हापाशीं नाहींत. अशा स्थितींत दहा पांच हजार यूरोपियनांनीं लक्षावधि इंडियनांचा संहार केला ह्यांत मोठेंसें नवल नाहीं. हें त्यांचें करणें केवळ एकाद्या बलिष्ठ शस्त्रधारी पुरुषानें, अनाथ, अज्ञान, निःशस्त्र अशा लक्षावधि तान्ह्यावाळांचीं डोकीं कापल्यासारखें होतें. ह्या कृत्याला कोणी खरें शौर्याचें कृत्य म्हणणार नाहीं. ह्याच यूरोपियनांनीं आपलीं अग्न्यस्त्रें टाकून तांबड्या इंडियनांशीं कुस्ती खेळून किंवा त्यांच्याच सारखे तीरकमठे, गारांच्या सुऱ्या, हाडकांचे भाले वगैरे घेऊन त्यांच्याशीं युद्ध करून त्यांना जिंकलें असतें तर खरोखरच ते शूर ठरले असते. परंतु सांगण्यास परमावधि दुःख वाटतें कीं, जे आपल्याला धार्मिक म्हणवून अज्ञान्यांना ज्ञान द्यायाला, नरकांत पडत असलेल्या लोकांस स्वर्गाची वाट दाखवायाला म्हणून गेले, त्यांनीं अथपासून इतिपर्यंत कपट, छलयुद्ध, क्रूरपणा आणि खोटें भाषण करणें, अशी दुष्टनीति अवलंबून बिचाऱ्या निरपराधी इंडियनांस धुळीला मिळविलें. आतां तांबडे इंडियन म्हणजे पहिल्यापासून शेवटपर्यंत निरपराधीच होते असें माझें म्हणणें नाहीं, परंतु ते होवून कधीं यूरोपियनांच्या वाटेला गेले नाहींत. त्यांनीं होवून कधीं फसवणुक करण्याचें आरंभिलें नाहीं. ह्याच्या उलट त्यांनी

युरोपियन लोक आपल्या देशांत प्रथम आले तेव्हां, ते सूर्याचे पुत्र आहेत असें समजून मोठ्या आदरानें त्यांचें आगत स्वागत केलें. आपल्या शक्त्यनुसार त्यांना सोनें, फळें वगैरे नजराणे देऊन संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला. असें असूनही ह्या गोऱ्या देवतांनीं संतुष्ट न होतां, उलट इंडियनांचा ऊंस गोड लागला म्हणून तो मुळासकट खाण्यास आरंभ केला. तेव्हां अशा सर्व भक्षक देवांस अटकाव न करील असा कोण मनुष्य पृथ्वीवर आहे? त्यांनीं आपले हक्क राखण्याचा हरतऱ्हेनें प्रयत्न केला ह्याबद्दल त्यांस माझ्यानें दोष देववत नाहीं. त्यांचें अज्ञान हें त्यांचें दुर्दैव होय. तें अज्ञान नाहींसें करण्याचीं कांहीं साधनें त्या वेळेस त्यांच्या आटोक्यांत नव्हतीं. जो मनुष्य आपलें अज्ञान घालविण्याचीं साधनें जवळ असूनही तें घालविण्याचा प्रयत्न करीत नाहीं, तो त्याबद्दल दोषी आहे ह्यांत संशय नाहीं. परंतु साधनें नसल्यामुळें त्यानें तसें न केलें तर त्यांत त्या बिचाऱ्याचा दोष काय? इंडियनांचा इतिहास वाचला म्हणजे हें अज्ञान—(भोळेपणा, कांक्षेखोरपणा, शकुनापशकुनांची भीति, भूतप्रेतपिशाचांची भीति, इत्यादिक ह्याचे पोटभाग आहेत.)—त्यांच्या नाशाच्या मुख्य कारणांपैकीं एक आहे असें स्पष्ट दिसून येतें.

"दोघांचें भांडण आणि तिसऱ्याला लाभ," अशी एक म्हण आहे. एकमेकांविषयीं मत्सरबुद्धि असणें हें लहान मोठ्या कुटुंबांस, समाजांस, आणि देशांस मोठें घातक आहे. खरोखर म्हटलें असतां अज्ञान हेंच मत्सराचें मूळ होय. एकमेकांविषयीं कांहीं हलक्यासलक्या कारणानें वाईट समज झाल्यावरून मनुष्याच्या मनांत मत्सर उत्पन्न होतो. एकदां मत्सर उत्पन्न झाला कीं, भांडणाचा सुकाळ. भांडणामुळें मनुष्यें एकमेकाला शत्रु समजतात, आणि हरप्रयत्नानें आपल्या शत्रूचा मोड करूं पाहातात. शत्रु प्रबल असला तर त्याचा मोड करण्याला एखाद्या तिऱ्हाइताची मदत घेणें

अवश्य आहे असें वाटतें. आणि दोघांच्या भांडणांत तिऱ्हाइताचा एकदां प्रवेश झाला, म्हणजे तो त्या दोन्ही भांडखोरपक्षांतील लोकांना आपल्या हातांत बाहुल्यासारखीं करून घेऊन, आपलें काम साधून घेतो. मग 'न तुला न मलान् घाल कुत्र्याला,' अशी स्थिति होणारच. कोणत्याही कुटुंबांतील किंवा देशांतील माणसांचें आपसांत भांडण होणें फार वाईट आहे. आमच्या देशीलोकांच्या आपसांतील तंट्याबखेड्यांमुळें परदेशीलोकांचा आमच्यांत शिरकाव होवून आम्हाला परस्वाधीन व्हावें लागलें, हें हिंदुस्थानचा इतिहास वाचणाऱ्या प्रत्येक मनुष्याला ठाऊक आहे. आमच्या तांबड्या भावंडांचीही अशीच गत झाली. ते आपसांत भांडणें करीत असतां गोऱ्या लोकांचा पाताळांत प्रवेश झाला. त्यांच्यापैकीं ज्या कमकुवत लोकांचें प्रबल जातीशीं पटेनासें झालें होतें, त्यांनीं ह्या बाहेरून आलेल्या गोऱ्यांची मदत घेऊन स्वजातींतील प्रबल शत्रूंचा नाश करण्याचें मनांत आणलें. त्यांनीं गोऱ्यांना आपल्या देशांत घेऊन जाऊन त्यांना लागेल तशी मदत दिली. ह्यामुळें गोऱ्यांकडून त्यांच्या स्वजातींतील शत्रूंचा नाश तर झालाच, परंतु त्यांना स्वतःला त्यापासून कांहीं फायदा न होतां उलट त्यांचें मोठें नुकसान झालें. गोऱ्यांनीं त्यांच्या शत्रूंचा नाश केल्यावर त्यांना गचांडी देऊन त्या देशांतून हाकून दिलें; आणि गोरे प्रभु स्वतः त्या देशाचे एकच्छत्री राजे होऊन बसले! ह्यावरून स्वजातींतील शत्रूंचा मोड करण्यास गोऱ्यांना मदत देणारे कमकुवत इंडियन, आणि आमच्या देशांतील तशाच प्रकारचे नीच लोक, 'कुऱ्हाडीचे दांडे गोताला काळ' झाले हें उघड आहे.

स्पानियार्ड, पोर्तुगी, फ्रेंच, इंग्लिश, डच इत्यादि युरोपियन जातींनीं वर सांगितलेल्या प्रकारच्या संधि पाहून, निरनिराळे उपाय योजून, इंडियनांची जन्मभूमि त्यांच्यापासून हिसकावून घेतली; व तेथें नव्या वसाहती करून आपलीं राज्यें स्थापिलीं. आतां इंडियन लोक सगळ्या अमेरिकेभर फुटलेल्या

कांचेच्या पात्राप्रमाणें छिन्नभिन्न होऊन, विखरून पडले आहेत. त्यांच्या देशावर राज्य करणाऱ्या त्यांच्या गोऱ्या शत्रूंनीं जें दिलें तें खाऊन, त्यांच्या ओंजळीनें पाणी पिऊन, जन्मास आले तसे कांहीं काळ पृथ्वीवर राहून, गोऱ्या लोकांच्या शिकारींत बळी पडून, रानांतील पशुपक्ष्यांप्रमाणें मरून जाणें एवढेंच इंडियन लोकांच्या जन्माचें सार्थक्य बनून राहिलें आहे. असो.

## युनाइटेड् स्टेट्स्‌चा संक्षिप्त इतिहास.

कोलंबसानंतर सातवा हेन्री गादीवर असतां क्याबट् नांवाचा एक मनुष्य इ० स० १४९४ त अमेरिकेंत जाऊन आला. त्याच्या मागून फ्रेंच, स्पानियार्द, पोर्तुगीज आणि डच इत्यादि पुष्कळ लोकांनीं अमेरिकेंत जाऊन वसाहती केल्या. ह्या पुस्तकाच्या प्रतिपाद्य विषयाशीं इंग्लिश वसाहतींवांचून दुसऱ्या कोणाचा संबंध नसल्यामुळें, त्यांचा उल्लेख एथें करीत नाहीं. सर वाल्टर राले नांवाच्या मनुष्यानें इ० स० १५८५ त अमेरिकेस जाऊन वसाहत करण्याचा उद्योग केला. त्या वेळेस त्याच्या बरोबर जे मनुष्य गेले होते, त्यांनीं आपण वसाहत केली तेथली जमीन नांगरून लागवडीस आणून सभ्य मनुष्यांप्रमाणें तेथें राहण्याचें सोडून, सोनें शोधण्याचा व इंडियन लोकांवर जुलूम करण्याचा झपाटा चालविला. तेव्हां त्या नव्या भूमीवरची त्यांची वस्ती त्यांस सुखावह झाली नाहीं हें सांगावयास नको. पुढें कोणी जान् स्मिथ् नांवाचा मनुष्य रालेनें शोधून काढलेल्या वर्जिनिया प्रांतांत जाऊन वसाहत करण्याच्या उद्योगास लागला. त्या वेळीं त्याच्या बरोबर जीं माणसें होतीं त्यांमध्यें पुष्कळ बायका असल्यामुळें, अमेरिकेंत वसाहत करावयास गेलेलीं मनुष्यें कुटुंबव्यवस्थेनें राहूं लागलीं. जान् स्मिथ् या मनुष्यालाच अमेरिकेंत इंग्लिशांची पहिली वसाहत स्थापन केल्याचें यश मिळालें. त्यानंतर पियोरिटन् पंथांतील कांहीं लोकांनीं अमे-

रिकेस जाऊन न्यू इंग्लंड नांवाच्या वसाहती केल्या. याप्रमाणें उत्तर अमेरिकेंत एका मागून एक इंग्लिश वसाहती अस्तित्वांत येऊं लागल्या. त्या वसाहतींतून राहणाऱ्या लोकांनीं नानाप्रकारचीं संकटें आणि विपत्ती भोगून आपला दृढ निश्चय न सोडितां अमेरिकेची जमीन लागवडीस आणून तेथील अरण्यांच्या जागीं मोठालीं शहरें आणि गांवें वसविलीं. कलाकौशल्याची जिकडे तिकडे समृद्धि केली. त्यांचें साहस; पराक्रम, दृढ निश्चय आणि दीर्घोद्योगीपणा, हे गुण फार वर्णनीय होते.

अठराव्या शतकाच्या शेवटच्या भागांत उत्तर अमेरिकेंतील इंग्लिश वसाहती एकंदर १३ होत्या. त्या वसाहतींतील स्वजातीय लोकांची समृद्धि पाहून, इंग्लंडांतील इंग्लिश लोक त्यांचा हेवा करूं लागले. त्यांना वाटूं लागलें कीं, अमेरिकेंतल्या वसाहतींपासून आपल्याला पुष्कळ फायदा झाला पाहिजे. आपण शोधून काढलेल्या देशांतील उत्पन्नानें इंग्लंड सधन झालें नाहीं तर, तो देश इंग्रजांनीं शोधून काढल्याचें सार्थक काय झालें? असे विचार मनांत आणून, त्यांनीं या वसाहतींतून पुष्कळ पैसा मिळविण्याचे निरनिराळे उपाय योजिले. त्यांपैकीं पार्लमेंटांत ठराव करून, अमेरिकेंतील वसाहतींच्या व्यापारास व त्यांच्या उन्नतीस जे अडथळे आणिले, ते मुख्य होते. पार्लमेंटचा ठराव असा होता कीं, या इंग्लिश वसाहतींमधून राहणाऱ्या लोकांनीं अमेरिकेंतील सोनें, रुपें, तांबें, लोखंड इत्यादि धातु खाणींतून खणून काढावे; परंतु त्यांनीं त्यांचे कांहीं पदार्थ घडूं नयेत. खाणींतून जितके कच्चे धातु निघतील, तितके सगळे इंग्लंडास पाठवावे. दुसऱ्या कोणत्याही देशास पाठवूं नयेत. या वसाहतींनीं इंग्लंडावांचून दुसऱ्या कोणत्याही देशाशीं प्रत्यक्ष रीतीनें व्यापार करूं नये. या आणि अशाच दुसऱ्या जुलमी कायद्यांमुळें, अमेरिकेंत वसाहत करून राहिलेल्या लोकांना इंग्लंडाचा फार त्रास येऊं लागला होता. परंतु असले कायदे करूनही इंग्लिशांच्या लोभाची तृप्ति

झाली नाहीं. त्यांनीं फ्रेंच आणि इंडियन लोकांशीं लढाई करण्याकरितां जें कर्ज केलें होतें, तें फेडण्याच्या उद्देशानें अमेरिकेंतील वसाहतींमध्यें "स्टांप् आक्ट्" नांवाचा कायदा अमलांत आणण्याचा निश्चय केला. या कायद्याच्या योगानें असें झालें कीं, प्रत्येक अमेरिकन मनुष्याला पावत्या, करारनामे इत्यादि दस्तैवज, खरे आणि कायदेशीर ठरण्याकरितां त्यांवर इंग्लंडांत छापलेलीं टिकिटें विकत घेऊन लावणें भाग पडूं लागलें. इंग्लंडांत छापलेला स्टांपाचा कागद विकत घेतल्या वांचून, एकादा दस्तैवज लिहिण्याचा उपाय नाहींसा झाला. तेव्हां अमेरिकेंतील वसाहतदारांनीं म्हटलें कीं, हा कायदा फार जुलमाचा आहे. तो अमलांत आणणाऱ्या इंग्लिश अधिकाऱ्यांची त्यांनीं पुष्कळ पूजा केली. शेवटीं हें प्रकरण फारच विकोपास जाऊन, स्टांप् आक्टाच्यापायीं त्या वसाहतींमधली शांति नाहींशी होत आहे, असें इंग्लिश सरकारास कळून आलें. हा कायदा सरासरी वर्षभर अमेरिकेंत चालू होता. तितक्याकाळांत स्टांप् विकून सोळा हजार पौंड इंग्लिश सरकाराला मिळाले; आणि तितकेच पौंड अमेरिकन लोकांकरवीं बळजबरीनें स्टांप् घेवविण्यांत खर्च झाले. आणि तेथें इंग्लिश अमल राखण्याकरतां जें सैन्य ठेवावें लागलें त्याचा खर्च चालविण्यासाटीं इंग्लिश सरकारास वर्षाकांठीं त्याच्या पांचपट म्ह० ८० हजार पौंड खर्च येऊं लागला.

त्या वेळीं अमेरिकेंतील लोकांमध्यें दोन पक्ष होते. पैकीं टोरी पक्षांतल्या लोकांचें मत इंग्लंडास अनुकूल होतें. पण व्हिग् नांवाच्या पक्षांतील लोकांचें मत पार्लमेंटच्या कायद्याविरुद्ध होतें. स्टांप् आक्टापासून आपल्याला कांहीं फायदा होत नाहीं असें पाहून, इंग्लिश सरकारानें तो कायदा रद्द करून, चहा वगैरे कित्येक अत्यावश्यकीय पदार्थांवर कर बसविला. तो देखील अमेरिकन लोकांस आवडला नाहीं. इंग्लिश पार्लमेंटमध्यें इंग्लिश

लोकांचे प्रतिनिधी असत, तसे प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार अमेरिकेंत वसाहत करून राहिलेल्या लोकांस नव्हता. इंग्लंडच्या लोकांनीं आपल्यास वाटतील तसे कायदे करावे, व आपण ते निमूटपणें मानावे, हें आपल्यास मोठें लांछन आहे, असें अमेरिकन लोकांस वाटूं लागलें. ते म्हणाले कीं, ज्या पदार्थांवर कर आहे असले पदार्थ आम्हीं मुळींच घेणार नाहीं. स्टांप् आक्ट झाल्यापासून बहुतेक सगळ्या अमेरिकन लोकांचा असा निश्चय झाला होता कीं, इंग्लंडांत उत्पन्न झालेले जे पदार्थ घेतल्यापासून आपल्या देशाच्या व्यापाराला धक्का पोंचतो, ते आपण उपयोगांत आणावयाचे नाहींत. या त्यांच्या निश्चयामुळें इंग्लिश व्यापाऱ्यांच्या व्यापारास मोठाच धक्का बसला. तेव्हां त्यांच्या विनंतीवरून इंग्लिश सरकारानें बहुतेक सगळ्या पदार्थांवरचे कर काढून टाकून, चहावर बसविलेला कर तेवढा राहूं दिला. हा कर फारसा फायद्याचा नसून केवळ इंग्लंडच्या वर्चस्वाचा दर्शक होता. तरी तेवढा देखील अमेरिकन लोकांस सहन झाला नाहीं. इंग्लिश सरकारानें अमेरिकन लोकांवर आपलें वर्चस्व कितपत आहे, हें पाहण्याकरितां **ईस्ट् इंडिया कंपनी**कडून चहानें भरलेलीं कांहीं गलबतें अमेरिकेस पाठविलीं. तीं इ.स. १७७३ या सालीं फिलाडेल्फिया सारख्या मुख्य बंदरांमध्यें येऊन पोहोंचलीं. त्यांच्या नायकांनीं न्यू यार्क आणि फिलाडेल्फिया एथें आपला माल कोणी घेत नाहीं असें पाहून, इंग्लंडाची वाट धरली. चार्ल्स्टन् या शहरांत गलबतांतील चहा उतरला खरा, परंतु तेथील लोकांनीं तो विकतच घेतला नाहीं. तो कोठ्यांमधून सांठवून ठेविला होता, तेथेंच कुजून नासून गेला. बोस्टन शहरामध्यें इंग्लिश चहा तीन गलबतांत भरून आला तेव्हां, बोस्टनच्या कित्येक तरुण पुरुषांनीं गलबतांवर जाऊन, त्यांतील चहाच्या तीनशें पेट्या फोडून, त्यांतला चहा समुद्रांत फेंकून दिला. ह्या टोळीला अद्यापपर्यंत युनाइटेड् स्टेट्स्चे लोक "बोस्टन्-

टीपार्टी" म्हणजे चहा घेण्यास गेलेली बोस्टन्ची मंडळी, असें विनोदानें म्हणतात.

ह्या बोस्टन् शहरांत घडलेल्या बंडाळीचें वर्तमान इंग्लंडास पोहोंचलें तेव्हां, इंग्लिश सरकाराला बोस्टन्करांचा फारच राग आला. तेव्हां त्यानें "बोस्टन् पोर्ट् बिल्" नांवाचा कायदा अमलांत आणून, कोणत्याही इंग्लिश व्यापाऱ्यानें बोस्टिन् शहराशीं व्यापारसंबंध ठेवूं नये, असा हुकूम केला. त्यामुळें त्या शहरच्या रहिवाशांस बरेच कष्ट सोसावे लागले. परंतु इतर ठिकाणच्या लोकांनीं बोस्टन्करांस आवश्यकीय पदार्थांचा पुरवठा करून, पुष्कळ मदत केली. त्यानंतर अमेरिकेंतल्या वसाहतींमधून जिकडे तिकडे इंग्लिश सरकारच्या जुलमीपणाबद्दल गवगवा झाला. इ. स. १७७४ त बोस्टन्करांस शिक्षा करण्याकरितां इंग्लिशांचें सैन्य मासचुसेट्स् संस्थानांत येऊन राहिलें. पुढें हें प्रकरण फारच विकोपास गेलें. अमेरिकेंतील वसाहतींतले लोक म्हणूं लागले कीं, इंग्लिश पार्लमेंटमध्यें आमचे प्रतिनिधी कोणी नाहींत. ज्यांच्यामुळें आमचें बरें वाईट होणार, असले कायदे करण्यांत आमचें मत अवश्य घेतलें पाहिजे. आमचें मत घेतल्या वांचून आमच्यावर मनमानते कर बसविल्यास, तें इंग्लिश सरकाराचें करणें न्याय्य होणार नाहीं. हें त्यांचें युक्तियुक्त आणि कायदेशीर म्हणणें इंग्लिश सरकारानें मान्य केलें नाहीं एवढेंच नव्हे; तर त्यांस आपल्या दाबांत ठेवण्याकरितां सैन्य पाठवून, तें त्यांच्याच खर्चानें तेथें राहावें अशी व्यवस्था केली. हें अमेरिकन लोकांस बरें वाटलें नाहीं. या प्रसंगीं अमेरिकन लोकांनीं एकचित्त होऊन, आपला हक्क राखण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं निरनिराळ्या वसाहतींतून आपले प्रतिनिधी निवडून फिलाडेल्फिया शहरास पाठविले. ह्या ठिकाणीं अमेरिकन् लोकांची **राष्ट्रीयसभा** स्थापन झाली. त्या सभेंतील प्रमुख प्रमुख कामदारांकडून अमेरिकन लोकांनीं आपल्या राष्ट्राच्या

शासनाचें आणि व्यवस्थेचें काम चालविलें. यानंतर इंग्लिशांच्या आणि अमेरिकन लोकांच्या पुष्कळ लढाया झाल्या. इ. स. १७७५ च्या शेवटल्या भागीं अमेरिकन कांग्रेसनें जॉर्ज् वाशिंग्टन् यास आपल्या सैन्याचा अधिनायक नेमिला. तेव्हांपासून इंग्लिशांशीं लढून आपला निभाव लागेल, अशी उमेद अमेरिकन् लोकांस येऊं लागली. सन १७७६ च्या जुलै महिन्याच्या ४ थ्या तारखेस अमेरिकन लोकांनीं इंग्लिश सरकाराशीं आपला संबंध अगदीं तोडून टाकून, आपण आतां स्वतंत्र झालों असें जगास जाहीर केलें. त्या वेळीं अमेरिकन संस्थानांमध्यें पुरुष, बायका आणि मुलें मिळून सरासरी तीस लक्ष मनुष्यें होतीं. त्यांच्या जवळ फारसा पैसा नव्हता आणि इंग्लिश सरकाराच्या हातीं असलेलीं लढाईचीं उत्तम साधनेंही नव्हतीं. परंतु त्यांची स्वातंत्र्येच्छा इतकी प्रबळ होती कीं, तिच्या योगानें त्यांच्या समोर जीं पर्वतप्राय संकटें वारंवार उभीं राहत होतीं तीं त्यांस तिलप्राय वाटूं लागलीं. त्यांनीं आठ वर्षांपर्यंत एक सारखें इंग्लिश लोकांशीं युद्ध केलें. शेवटीं इ. स. १७८१ त इंग्लिशांवर जय मिळविला. आणि आपलें **युनाइटेड् स्टेट्स्**चें राष्ट्र स्वतंत्र करून सोडलें. १७८३ पावेतों इंग्लिश सरकार मधून मधून त्यांशीं लढाई करीत होतें, परंतु अमेरिकेच्या स्वतंत्र संस्थानांत त्याची डाळ शिजली नाहीं.

या लढाईमुळें त्यांच्या राष्ट्रास पुष्कळ दारिद्र्य आलें होतें. आणि नवीनच स्थापित झालेल्या राष्ट्रास ज्या अडचणी येणें स्वाभाविक आहे, त्या सगळ्या आल्या होत्या. परंतु वाशिंग्टन्, फ्रांक्लिन, जेफर्सन इत्यादि विद्वान्, दूरदर्शी व देशहितैषी मनुष्यांच्या बुद्धीच्या आणि राजनीतीच्या बळानें त्यांच्या सगळ्या अडचणी नाहींशा झाल्या. इ. स. १७८७ त युनाइटेड् स्टेट्स्च्या **राष्ट्रीय सभेनें** एक **राष्ट्रीय शासनपद्धति** तयार करून ती आपल्या राष्ट्रांत चालू केली. तिच्या योगानें युनाइटेड् स्टेट्स्मध्यें राज्यव्यवस्था उत्तम-



जोर्ज् वाशिंग्टन्.

युनाइटेड् स्टेट्स्चा पहिला राष्ट्राध्यक्ष.

रीतीनें चालून चोहोंकडे स्वस्थता झाली. जिच्या योगानें ह्या स्वतंत्र संस्था-नामधले लोक परमसुखी असून, त्यांचें राष्ट्र पृथ्वींतील सगळ्या राष्ट्रांपेक्षां अधिक संपत्तिमान् आणि उन्नत झालें आहे, त्या युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय शासनपद्धतीविषयीं आतां थोडासा विचार करूं.

---

# शासनपद्धति.

आमच्या देशांतील जुन्या राजनीतींत सात राज्यांगें होतीं; तीं:—स्वामी, अमात्य, मित्र, कोश, राष्ट्र, किल्ले आणि सेना, हीं होत. राज्य ह्मणजे राजाच्या सत्तेंत असलेला देश, आणि राज्याचें मुख्य अंग झटलें ह्मणजे स्वामी—राजा—असें मानलेलें आहे. ह्यावरून राष्ट्र, कोश इ० राज्याचें धन, प्रजा इत्यादि वस्तू, राजाच्या सोईकरितां आणि सुखाकरतांच निर्मिलेल्या, असा सर्वांचा समज झालेला आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या "बळी तो कान पिळी" ह्या ह्मणींत प्रतिपादिलेल्या रानटी चालीप्रमाणें, राजा देव, आणि राजाच्याच हातांत प्रजांचीं अदृष्टसूत्रें असावयाचीं. "यथा राजा तथा प्रजा" आणि "राजा कालस्य कारणं" ह्या वाक्यांतून राजाचें प्रजांवर एकाधिपत्य आणि मनास वाटेल तें करण्याचें स्वातंत्र्य लोकांच्या मनांत कसें बिंबून गेलें आहे, हें चांगलें दिसून येतें. राजाशिवाय ह्मणजे एखाद्या बलिष्ठ शासन कर्त्यावांचून एखादा देश चांगल्या स्थितींत असूं शकेल, अशी नुसती कल्पना देखील प्राचीन काळच्या लोकांच्या मनांत आली नाहीं. ह्मणूनच त्यांनीं 'अंधाधुंदी' किंवा "झोटिंगपाच्छाई" यांस "अराजक" (ह्मणजे राजशून्य, किंवा राजाचा दाब जेथें नाहीं, असा देश), असें नांव दिलें असावें.

युनाइटेड् स्टेट्स्‌च्या प्रजासत्ताक राष्ट्रांत असा समज मुळींच नाहीं. एथें राजा नाहीं, प्रजा नाहीं, तरी ह्या राष्ट्राची शासनपद्धति सर्वोत्कृष्ट असून, ऐथें 'झोटिंगपाच्छाई' किंवा 'अंधाधुंदी'ही नाहीं. ह्याचें मुख्य कारण काय तें सांगणें हा ह्या अध्यायाचा उद्देश आहे. ज्या उत्तम नीतीच्या दृढ पायावर ती अद्भुत लोकसत्ताक राष्ट्ररूपी इमारत बांधलेली आहे, तिचा सारांश पुढें उतरून घेतलेल्या वाक्यांत सांपडतो.

**"सर्व मानवप्राणी स्वतंत्र आणि समान करून सृजिलेले असून, सृष्टिकर्त्यानें त्यांस जिणें, स्वातंत्र्य आणि सुख प्राप्त करून घेण्याचा यत्न इत्यादि कित्येक अनपहरणीय[1] देणग्या दिल्या आहेत; हीं सत्यें स्वतःप्रमाण[2] आहेत असें आह्मीं मानतों."**

ह्या सर्व गोष्टींच्या आधारभूत नियमांत ह्या राष्ट्रांतील रहिवासी मनुष्यमात्राचें एकमेकांशीं साम्य प्रतिपादिलें आहे. येथील सर्व कायदे सर्व चाली रीती आणि कल्पना, ह्या सनातन सत्यास अवलंबून आहेत. ह्यांतून अमुक एकास अमुक हक्क आहे आणि अमुकास तो नाहीं असा अर्थ काढण्यास जागाच मुळीं ठेविलेली नाहीं; ह्मणून उच्चनीच जाति आणि कुलभेद संभवत नाहीं. ही अमेरिकन जाति एक आहे. आमच्या देशामध्यें **कृतयुगांत जसा एक शुक्लवर्ण होता आणि ह्मणूनच सर्व लोक एक मतानें वागत—आणि ह्याच कारणानें कृतयुगांत सर्व लोक सुखी आणि समान होते**—त्याचप्रमाणें ह्या देशांत ह्यांची एक जात असल्यानें ह्यांस एकीपासून उद्भवणारें सर्वोत्कृष्ट सुख प्राप्त झालें आहे.

---

१ अपहरण करण्यास अयोग्य.

२ ज्याची सत्यता सिद्ध करायाला दुसरें प्रमाण नको तें, आपणच जें आपलें प्रमाण तें.

येथें कोणी आपली अमुक जात आणि आपलें अमुक कुळ ह्मणून, आपली वढाई करील तर, तो अमेरिकन ह्या महाजातीचा अपमान करतो असें समजतात. अमेरिकनांची कुलदेवता स्वातंत्र्यदेवी आपल्या राष्ट्रांत आलेल्या प्रत्येक (चीनी मनुष्याशिवाय) मानवप्राण्याच्या कपाळावर "**अमेरिकेचा जानपद**" असें नांव लिहिते. हें नांव ज्या भाग्यशाली मानवाच्या कपाळावर चमकत आहे, त्याला रत्नभूषित मुकुट धारण करणाऱ्या हजारों मानवांपेक्षां अधिक मर्यादा आणि अधिक भूषण आपल्यास आहे, असें वाटतें. रत्नकिरीटी राजराजांना सुद्धां त्याचा हेवा वाटेल तर नवल नाहीं.

"**हें राष्ट्र लोकांचें लोकांकरतांच अस्तित्वांत आलेलें आणि लोकांनीं शासिलेलें** आहे," हा अमेरिकन जानपदाचा मूलमंत्र आहे. येथें वाशिंग्टन्, लिंकन्, ग्रांट्, अशा देशाध्यक्षांचें किंवा फ्रांकलिन्, जेफर्सन, आणि एमर्सन् ह्यांसारख्या विद्वानाचें मत एकाद्या यःकश्चित् निग्रो जानपदाच्या मतापेक्षां गुंजभर देखील अधिक भरत नसून, ह्या दे-

१ American citizen ह्याचें भाषांतर अमेरिकेचा जानपद असें केलें. सिटिझन् (citizen) ह्या शब्दाचा साधारण अर्थ शहरवासी असा आहे. परंतु अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रांत ह्या शब्दाचा अर्थ सदरील अर्थापेक्षां फार गहन आणि महत्त्वाचा असा होतो. तेथें सिटिझन् ह्म० जो त्या राष्ट्राचा रहिवासी आणि ज्यास त्याचें शासन करण्याचा अधिकार आहे तो मनुष्य, असा समजला जातो. आमच्या भाषेंत ह्या शब्दाचा अर्थबोध करून देणारा एकही शब्द नाहीं. "जानपद" हा संस्कृत शब्द अमेरिकेंतील सिटिझन् शब्दाच्या कांहींसा जवळ जवळ येतो. जनपद ह्म० देश किंवा राष्ट्र त्यांत राहाणारा तो जानपद. असा ह्याचा अर्थ आहे, तो थोडासा बदलून जनपद ह्म० देश ज्याचा, ज्याच्या सत्तेंत आहे तो, असा बहुव्रीहि केल्यास "जानपद" हा शब्द अमेरिकन सिटिझन् या शब्दाचा प्रतिशब्द केल्यास कांहीं चिंता नाहीं.

शाचे 'जानपद' ह्या नात्यानें त्या प्रसिद्ध पुरुषांस जे जे हक्क होते त्यांपैकीं एक तरी हक्क ज्यास लभ्य नाहीं, असा एकही जानपद येथें नाहीं.

युनाइटेड् स्टेट्स्‌च्या निरनिराळ्या संस्थानांच्या शासनपद्धतींत पुष्कळ भेद आहे व त्यांचे कायदेही वेगळाल्या प्रकारचे आहेत. हें राष्ट्र लोकांच्या सत्तेंत आलें तेव्हां, येथें इंग्रजी कायदे चालू होते, तेच थोडेसे बदलून कायम ठेवण्यांत आले. परंतु, लोकांची सुधारणा होऊन मतें बदलत चाललीं, तसतसा जुन्या कायद्यांतूनही फेर बदल होत चालला. आलीकडे चाळीस-एक वर्षांत जीं संस्थानें ह्या राष्ट्रास जोडण्यांत आलीं, तीं मात्र अगदीं अमेरिकन तऱ्हेचीं असून, त्यांतील कायदे सोपे आहेत. आणि जुनीं संस्थानेंही दिवसंदिवस आपल्या नव्या भावंडांचें अनुकरण करीत आहेत.

## स्थानिक राज्यव्यवस्था.

राष्ट्रीयशासन हें केवळ स्थानिक व प्रांतिक राज्यव्यवस्थेचें मोठें रूप आहे. स्थानिक राज्यव्यवस्था ही बीजासारखी असून तीपासून उत्पन्न होणारा जो राष्ट्रीयशासनरूपी वृक्ष तो बीजाच्याच जातीचा असून, त्याची योग्यता व फलोत्पादनशक्ति हीं त्या बीजाच्या योग्यतेवरच अवलंबून असावयाचीं; हें सत्य स्वतःसिद्ध आहे. ह्मणून ह्या लोकसत्ताक राष्ट्रीय शासनपद्धतीचा विचार करण्यापूर्वी तिच्या मूळकारणाचें स्वरूप काय आहे हें पाहूं.

आयोवा हें संस्थान नव्या अमेरिकन तऱ्हेचें असून तें ह्या राष्ट्रांतील मासलेवाईक संस्थान आहे, असें ह्मटल्यास चालेल. एकेकाळीं तें संस्थान रानावनांनीं भरलेलें होतें. कांहीं काळापूर्वी मी आयोवा संस्थानांत असतांना, तेथें जाऊन ज्यांनीं प्रथम वसाहत केली अशा कित्येक लोकांची व माझी ओळख पडली. त्यांनीं कोणत्या प्रकारें वसाहत केली आणि स्थानिक राज्यव्यवस्था स्थापिली ह्याची माहिती पुढें देत आहें.

प्रथम एक साहसी उद्योगी मनुष्य अदृष्टपरीक्षा पाहाण्याकरितां म्हणून बायकोला बरोबर घेऊन किंवा एकटाच घरून निघून, नव्या व जंगली प्रदेशांत जातो. त्याच्या जवळ एक कुऱ्हाड, कांहीं हत्यारें, आउतें, एक घोड्यांची जोडी, थोडीं बियें, इतकें सामान असतें. तो आपल्या पसंतीच्या जाग्यांत जाऊन पोहोंचला म्हणजे स्वतः झाडें तोडून एक खोपट बांधतो; मग रान तोडून जमीन नांगरतो आणि आपल्याबरोबर आणिलेलीं बियें पेरून एक लहानसें शेत तयार करतो, आणि फळझाडें लावतो. कांहीं दिवसांनीं आणखी दहापांच लोक त्याचा कित्ता गिरवून, तेथें येऊन त्याच्या शेजारीं थोड्याथोड्या अंतरावर आपापल्या जमिनीच्या तुकड्यावर झोंपड्या किंवा घरें बांधून राहूं लागतात. ह्याप्रमाणें दहापंधरा कुटुंबें एका ठिकाणीं सुखवस्तु राहूं लागलीं म्हणजे, लवकरच दोन अगत्याच्या गोष्टींकडे त्यांचें लक्ष्य लागतें. ह्यांपैकीं पहिली, एका घराहून किंवा पेंठेपासून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यायेण्यास सोईवार रस्ते बांधणें; आणि दुसरी, मुलांकरतां शाळा स्थापणें, ही होय. आतां ह्या सोई करून देण्याला तेथें सरकार नाहीं, तेव्हां त्या चिमुकल्या वसाहतींतील मंडळी आपल्या उणीवी नाहींशा करण्यास आपणच प्रयत्न करते. कांहीं दिवसांनीं तेथें पांचपंचवीस जणांची सभा भरते. सभासद आपण ह्या कामाकरतां अमुक इतका कर देऊं असा आपसांत करार करतात. आतां हा कर किती असावा हें सांगणारा, तो जमा करणारा, त्याची योग्य व्यवस्था लावणारा, आणि त्याचा जमाखर्च लिहून ठेवणारा, अशीं निरनिराळीं कामें पाहणाऱ्या मनुष्यांची आवश्यकता प्राप्त झाली तेव्हां, कर बसविणारा जमाबंदी करणारा, गांवकीची देखरेख करणारा, कुळकरणी, इत्यादि कामदारांचें निर्माण होतें. ह्यानंतर चौकीदार आणि कनिष्टप्रतीचे न्यायाधीश ह्यांची योजना होते.

गांवांतील रहिवाशांच्या सोईकरतां अशा कामांची आणि कामदारांची

मृष्टि होते, ती सगळ्यांचें मत घेऊन होते. जमलेल्या सर्व रहिवाशांपैकीं कोणी तरी अमुक एक मनुष्य अमक्या कामावर योजावा आणि अमुक इतका पैसा अमक्या कामास लावावा अशी सूचना करतो; त्यावर सर्वांचें मत विचारण्यांत येतें. (ह्या मताला " वोट् " म्हणतात.) त्यानंतर बहुत लोकांचें मत ज्या मनुष्यास किंवा गोष्टीस अनुकूल असें पडेल त्याप्रमाणें त्या मनुष्याची इच्छित कामावर योजना इत्यादि गोष्टी करण्यांत येतात. ह्याप्रमाणें सर्व गोष्टींत लोकमत घेतांना कोणी कोणाला कुलाच्या उच्चनीचतेबद्दल, जातीबद्दल आणि योग्यतेबद्दल प्रश्न करीत नाहीं. मनुष्य कोणत्याही जातीचा असो, तो त्या गांवचा रहिवासी संभावित (कायदेशीर) वर्तणुकीचा आहे, तो अपराधी नाहीं, वेडा किंवा भ्रमिष्ट नाहीं, त्याचें वय एकवीस वर्षांखालीं नाहीं, तो पुरुष आहे (बायकांस अद्यापि कायदेशीर हक्क मिळाले नाहींत; वायोमिंग् व क्यान्सस् ह्या ठिकाणीं त्यांस हे हक्क आहेत.) इतक्या गोष्टी त्यास अनुकूल असल्या म्हणजे पुरेत. मग तो गरीब असो, श्रीमंत असो, विद्वान् किंवा अविद्वान् असो, काळा असो, गोरा असो, त्याच्या मताचें वजन देशाध्यक्षाच्या मताच्या वजनापेक्षां गुंजभारसुद्धां कमी किंवा जास्ती भरत नाहीं.

ह्या राष्ट्रीय शासनपद्धतींत गांवकीची म्ह० स्थानिक राज्यव्यवस्था ही फार महत्त्वाची आहे. प्रत्येक गांवाच्या राज्यव्यवस्थेंत, राष्ट्रीय राज्यव्यवस्थेचीं बहुतेक सगळीं मूलतत्वें आहेत. प्रत्येक गांवकी आपापल्या ठिकाणीं एक स्वतंत्र राष्ट्रच आहे म्हटलें तरी चालेल. आमच्या देशांतील स्थानिकराज्यव्यवस्थेला कमकुवत करणाऱ्या उणीवी व अल्पस्वातंत्र्य, आणि हेल्लास म्ह० ग्रीस देशाच्या स्वातंत्र्यनाशास कारणीभूत झालेलें अतिस्वातंत्र्य, हीं दोन्ही युनाइटेड् स्टेट्स्च्या स्थानिक राज्यव्यवस्थेंत नाहींत, हें फार चांगलें आहे. आमच्या देशांतील स्थानिक राज्यव्यवस्थेंत स्वराज्याचीं कित्येक

मूलतत्वें आहेत. आमचे लोक जिला "पंचायत" म्हणतात, ही एकप्रकारची लोकप्रतिनिधींची मंडळीच आहे म्हटलें तरी चालेल. परंतु लोकसत्ताक राज्यांतील लोकनियुक्तमंडळीप्रमाणें इच्या अंगीं कर्तृत्वशक्ति नाहीं, ह्याचें कारण, ही मंडळी गांवांतील दाहापांच प्रमुख लोकांनीं पसंत केलेली असते. सर्व लोकांनीं विचारपूर्वक प्रसिद्धपणें आपलें मत देऊन निवडलेल्या मंडळींत आणि हींत पुष्कळ अंतर आहे. हिला सर्वसाधारण लोकमताचें पाठबळ नसतें; कायदेशीर रीतीनें व सुव्यवस्थेनें केलेल्या गोष्टीला जितकें महत्त्व व कर्तृत्वशक्ति असते, तितकी ती ह्या मंडळींत येण्याचा संभव नाहीं. ह्याशिवाय पंच निवडणें हें कधीं कधीं ज्या दोन पक्षांचें भांडण असेल त्यांच्याच हातीं असतें. त्यांत सार्वजनिकता मुळींच नाहीं. ज्या गोष्टींत **सार्वजनिकता** नाहीं तींत **सार्वजनीनत्व** (सर्व लोकांस हितावहत्व) संभवत नाहीं, म्हणूनच आमच्या देशांत पंचायती होत्या तरी स्थानिकस्वराज्याचें ज्ञान व त्यापासून होणारें सुख व त्याच्याच योगानें मनुष्यसमाजांत येणारी एकी, ह्यांपैकीं एक देखील आमच्या लोकांस पाहावयास मिळालें नाहीं. ("क" हें परिशिष्ट पाहा.)

हेल्लास देशांत ज्या वेळीं लोकसत्ताक राज्य होतें तेव्हां हेल्लेणी लोकांस स्थानिक स्वातंत्र्य फार महत्त्वाचें वाटत असे. त्या देशांत युनाइटेड् स्टेट्सप्रमाणें संयुक्त लोकसत्ताक राज्य कधींच स्थापित झालें नाहीं. ग्रीक लोकांनीं आपलें स्वराज्य चिरस्थायी करील, अशी बळकट व दूरवर विचार करून केलेली साधारण राज्यशासनपद्धति निर्मून, ती सर्व देशांत चालू केली नव्हती. ग्रीसचें लोकसत्ताक राज्य म्हणजे प्रत्येक शहर स्वतंत्र व पूर्ण राजसत्ताधारी असणे, हें होतें. अशीं पुष्कळ पूर्ण सत्ताधारी शहरें जवळ जवळ असलीं म्हणजे, एकाद्या सामान्य किंवा विशेष कारणावरून ह्यांचें भांडण कधींना कधीं तरी उपस्थित होणारच. मग एका लहानशा

शहरानें दुसऱ्या शहराशीं युद्ध करण्याचें आरंभिलें म्हणजे उभय पक्षांतून कोणत्या तरी एका पक्षाचा जय व्हावयाचाच. त्यामुळें त्यांच्यामध्यें उद्भवलेला वैराग्नि सतत धुमसत असावयाचा. अशा परस्परांशीं भांडत असणाऱ्या लहान लहान शहरांच्यानें एकाद्या प्रवल राष्ट्राशीं युद्ध करून टिकाव धरवतो कसा? त्यांनीं एकमेकांशीं सलगीनें वागून एकी करावी तर, त्या सर्वांस ऐक्य पाशांत गुंफणारी एकादी सर्वमान्य सामान्य राष्ट्रीय नीति मुळींच नव्हती. जो तो आपापल्या ठिकाणीं स्वतंत्र. ज्याला जसें वाटेल तसें त्यानें करावें. अशा प्रत्येक स्वतंत्र शहरामध्यें असणाऱ्या अव्यवस्थितपणामुळें, एकमेकांपासून तुटून असलेल्या हेल्लासच्या अनेक लोकसत्ताक राज्यांस परचक्राचा जबर धक्का बसला, तेव्हां तीं एका मागून एक मोडून लयास गेलीं. हेल्लास देशांतील अकिया नांवाच्या प्रदेशांत एके समयीं पुष्कळ शहरें मिळून एक राष्ट्र करण्याचा प्रयत्न झाला होता. तो सफल झाला नाहीं. ह्यास कारण, संयुक्त राष्ट्र होण्याला निरनिराळ्या स्वतंत्र शहरांनीं जितके आपले महत्त्वाचे अधिकार स्वसंतोषानें राष्ट्राच्या हवालीं करून, राष्ट्राला बळकटी आणणें अवश्य होतें, तितके ते दिले नव्हते, हें एक; आणि दुसरें कारण असें कीं, ही एकी करण्याची बुद्धि त्यांस उत्पन्न होऊन, तीप्रमाणें कार्य करून फलद्रूप होण्यास त्यांस जितका वेळ मिळावा तितका मिळाला नाहीं. मासिडोनिया आणि रोम या दोन शत्रूंनीं अकियाच्या भूमीवर एकीची अमृतवल्ली उगवून बद्धमूल होण्याच्या पूर्वीच तिच्यावर घाला घातला. प्रत्येक शहरांतील आणि गांवांतील रहिवाशांनीं प्रतिनिधि निवडून, त्यांस आपले मोहोरप्ये होऊन आपल्या वतीनें बोलण्याचा व कार्य करण्याचा पूर्ण अधिकार देऊन, एका साधारण संस्थानिक किंवा राष्ट्रीय कायदे करणाऱ्या सभेस पाठवून, तेथें बहुमतानें पसंत ठरलेले कायदे आपापल्या शहरांत चालू करण्याची कल्पना देखील हेल्लेणी किंवा

रोमन लोकांच्या मनांत आली नाहीं. दुसऱ्या एका शहरांत केलेले कायदे आपल्या शहरांत चालू करणें म्हणजे, आपल्या स्वतंत्र राज्यसत्ताधारी शहराचा अपमान करणें होय, असें त्यांस वाटलें असल्यास कांहीं नवल नाहीं. गांवाच्या किंवा परगण्याच्या स्वातंत्र्याविषयींच्या कल्पना ग्रीक आणि रोमन लोकांमध्यें बहुतांशीं सारख्याच होत्या.

युनाइटेड् स्टेट्स्च्या स्थानिक राज्यव्यवस्थेंत वर सांगितल्या प्रकारचें अल्प स्वातंत्र्य आणि अति स्वातंत्र्य नाहीं, ही गोष्ट ह्या देशांतील शासनपद्धति कशी आहे ती समजून घेतल्यावर सहज कळून येईल. या शासनपद्धतींत स्थानिक, प्रांतिक आणि संस्थानिक राज्यव्यवस्थेंत जितकें स्वातंत्र्य असल्यावांचून राज्यव्यवस्थेच्या अंगीं स्थैर्य आणि कार्यकारित्व येणार नाहीं, तितकें तें तिच्या ठायीं वसत आहे. आणि जें स्वातंत्र्य तिच्यांत असल्यानें, गांवें, परगणे आणि संस्थानें यांच्यांत विरोध उत्पन्न होऊन, अनैक्यामुळें राष्ट्रास अपाय होण्याचा संभव आहे, तें स्वातंत्र्य तिच्या ठायीं मुळींच नाहीं.

सहा मैल औरस चौरस जमीनीचा भाग टाउन्शिप् म्ह० गांवकी म्हणविला जातो. ह्याचप्रमाणें सरकारी मोजणीदारांकडून जमीन मोजवून सुभे संस्थानें इत्यादि देशाचे विभाग करतात. वर सांगितलेल्या गांवाप्रमाणें जिकडे तिकडे नवीं गांवें वसूं लागलीं म्हणजे बारा किंवा पंधरा गांवक्या मिळून एक सुभा बनतो.

## सुभे.

सुभ्यांतील सगळे कामदार गांवांतील कामदारांसारखेच लोकानुमतानें निवडून आपापल्या कामावर नेमले जातात. ते बहुतकरून दोन वर्षांपर्यंत आपल्या अधिकारावर असतात. कित्येक संस्थानांतून दरवर्षी अशा

कामदारांची निवडणूक होत असते. कामदारांस त्या त्या ठिकाणच्या ठरावाप्रमाणें दरमहा पगार मिळतो, पण तो फारच बेताचा असतो. सुभ्याचें मुख्य गांव कोणतें, हें सुभ्यांतील सगळ्या लोकांचें अनुमत घेऊन ठरविण्यांत येतें. थोड्या थोड्या काळाच्या अंतरानें निवडणुक होऊन सुभ्यांतील नाजर, फौजदार, रस्त्यांची पहाणी करणारे आणि विद्याखात्याची देखरेख करणारे इत्यादि पदस्थ व इतर अधिकाऱ्यांचीं लोकानुमतें नेमणुक होते इतकेंच नाहीं; तर त्या त्या ठिकाणचे कनिष्ठ प्रतीचे न्यायाधीश देखील लोकांच्या पसंतीनें निवडून घेण्यांत येतात. न्यायाधीशांचीही योजना लोकानुमतें व्हावी हें ठीकच आहे. कारण न्यायासारख्या सार्वजनिक गोष्टींशीं सर्व लोकांचा फार निकट संबंध असतो. गरीब गुरीब काबाडकष्ट करून निर्वाह करणाऱ्या अशा कुटुंबवत्सल लोकांचीं भाग्यसूत्रें बहुतकरून न्यायाधीशासारख्या अधिकाऱ्यांच्या हातीं असतात. ते अधिकारी जर निष्काळजी, कठोरमनाचे, उद्धट आणि जुलमी असले तर गरीब, अधिकारशून्य लोकांचे प्राण धन आणि अब्रू किती धोक्यांत असते, हें कोणाला सांगायाला नको. राजशासित राज्यांत, तशांतून अज्ञानी व आपल्या मर्जींतल्या अधिकाऱ्यांचे हातीं सर्व कामें संपवून केवळ ऐषआरामांत निमग्न असणाऱ्या राजांच्या राज्यांत ह्या गोष्टींचीं उदाहरणें पदोपदीं दिसून येतात. एका मनुष्याच्या किंवा एकाद्या कल्पनाजन्य थोर पदवीच्या निवडक वर्गाच्या हातीं, सर्व लोकांच्या सुखदुःखाचा ज्यांशीं निकट संबंध आहे, असे अधिकार असून, ते त्यापासून काढून घेण्याची सत्ता लोकांस नसणें हें फार वाईट आहे. अशानें गरीबगुरीबांस योग्य न्याय मिळत नाहीं. श्रीमंत, जोरदार व पदस्थ लोकांचाच बहुतकरून जय होतो आणि तेथें नित्यशः अन्यायाच्या पायीं न्यायदेवतेचा बळि पडतो.

# संस्थानें.

वर सांगितल्या प्रकारचे पुष्कळ सुभे मिळून एक संस्थान बनतें. सुभ्याची राज्यव्यवस्था जशी स्थानिक राज्यव्यवस्थेचें मोठें रूप आहे, तशीच संस्थानाची राज्यव्यवस्था हें सुभ्याच्या राज्यव्यवस्थेचें थोरलें रूप आहे. प्रत्येक संस्थानावर एक मुख्य अधिकारी असतो, त्यास गव्हर्नर म्हणतात. तो त्या संस्थानांतील सर्व लोकांच्या संमतीनें निवडला जातो. युनाइटेड् स्टेट्स्च्या प्रेसिडेन्ट याचें सर्व राष्ट्रांशीं जें नातें आहे, तेंच संस्थानाशीं गव्हर्नरचें नातें आहे. स्थानिक आणि सुभ्याच्या राज्यव्यवस्थेपेक्षां संस्थानिक राज्यव्यवस्थेमध्यें एक दोन अंगें अधिक आहेत तीं फार महत्त्वाचीं आहेत. प्रत्येक संस्थानाला आपापले कायदे करण्याचा अधिकार आहे. संस्थानाच्या मुख्य शहरांत म्हणजे राजधानींत एक संस्थानिक सभागृह असतें. त्यांत संस्थानाचे कायदे करणाऱ्यांची सभा, गव्हर्नरचें कार्यालय आणि संस्थानांतील वरिष्ठ न्यायसभा संस्थानिक विद्याखात्यावरच्या मुख्य अधिकाऱ्याचें कार्यालय हीं असतात. प्रत्येक संस्थानांतील कायदे करणाऱ्या मंडळीमध्यें दोन भाग असतात. त्यांपैकीं एका भागाला लोकप्रतिनिधींची सभा म्हणतात, आणि दुसऱ्या भागाला कारभाऱ्यांची सभा म्हणतात. लोक प्रतिनिधि आणि कारभारी हे संस्थानांतील सर्व साधारण लोकांनीं निवडिलेले असतात. ह्या दोन्ही मंडळ्या मिळून संस्थानास लागणारे सगळे कायदे करितात. युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय शासनपद्धतीस विरोध आणणार नाहींत, असलेच कायदे करण्याचा संस्थानिक सरकाराला अधिकार आहे. संस्थानांतले कायदे अंमलांत आणणें हें गव्हर्नरचें काम आहे. संस्थानाच्या वरिष्ठ न्यायसभेंत न्यायाधीश असतात, ते राष्ट्रीय सभेचें अनुमत घेऊन देशाध्यक्षानें नेमलेले असतात व ते संस्थानिक शासनपद्धतीप्रमाणें आपल्यासमोर आले-

त्या खटल्यांचा निवाडा करितात. संस्थानिक विद्याखात्याचा वरिष्ठ अधिकारी सगळ्या संस्थानांतील शाळांची देखरेख करितो. प्रत्येक संस्थानाचा खजीना निराळा असतो. संस्थानाची जमाबंदि वगैरे संस्थानिक सरकारच करितें. ह्याचप्रमाणें प्रत्येक संस्थानाचें सेनाखातेंही निराळेंच असतें; मात्र ह्या खात्याचा उपयोग राष्ट्रांतील निरनिराळीं संस्थानें आपसांत भांडण्यामध्यें करीत नाहींत. आणि युनाइटेड् स्टेट्स्‌च्या एकाच संस्थानाला कोणत्याही परराष्ट्रांशीं युद्ध किंवा तह करण्याचा अधिकार नाहीं. तो अधिकार राष्ट्रीय सरकाराकडे आहे. संस्थानिक सेनाखात्याचा व विद्याखात्याचा वगैरे खर्च संस्थानिक सरकारानेंच पुरवावा असा नियम आहे. सारांश एखाद्या स्वतंत्र राज्याला किंवा राष्ट्राला जितके अधिकार किंवा अंगें असावीं, तितकीं तीं संस्थानिक राज्यव्यवस्थेंत असलेलीं दिसून येतात. परराष्ट्रांशीं तह करणें इत्यादि कित्येक महत्त्वाचे अधिकार सर्वांच्या सोईकरितां आणि संस्थानांत एकी राहावी म्हणून, संस्थानिक सरकारानें स्वसंतोषानें राष्ट्रीयसरकाराकडे सोंपून दिले आहेत. ह्याशिवाय इतर सर्व गोष्टींत प्रत्येक संस्थान आपआपल्या ठिकाणीं स्वतंत्र राष्ट्र आहे.

## उपसंस्थानें.

संस्थानांच्या खालोखाल महत्त्वाचा विभाग म्हटला म्हणजे उपसंस्थान होय. उपसंस्थानांतील लोकांना स्वतः आपला गव्हर्नर निवडून घेण्याचा अधिकार नाहीं. कारण उपसंस्थान म्हणजे सगळ्या राष्ट्राची सामान्य स्थावर संपत्ति आहे. संस्थानाला जितके लोक हवे लागतात तितक्यांची वस्ति उपसंस्थानांत झाली म्हणजे त्याला संस्थानाचें रूप येतें. त्यानंतर युनायटेड् स्टेट्स्‌च्या शासनपद्धतीप्रमाणें राष्ट्रीयसभेमध्यें तें उपसंस्थान संस्थानवर्गांत घ्यावयाचें असा ठराव झाला म्हणजे, त्याला संस्थानास आहेत

तितके सगळे अधिकार मिळतात. उपसंस्थानांमध्यें स्थानिक आणि सुभ्याची राज्यव्यवस्था ह्या संस्थानांप्रमाणेंच स्वतंत्र रीतीनें चालतात. उपसंस्थानांमध्येंही एक गव्हर्नर आणि वरिष्ठ न्यायसभा असते. त्यांतील अधिकाऱ्यांचे अधिकार संस्थानांतील अधिकाऱ्यांसारखेच असतात. ते अधिकारी राष्ट्राध्यक्षानें राष्ट्रीयसभेचें अनुमत घेऊन त्या त्या हुद्यांवर नेमून उपसंस्थानांत पाठविलेले असतात. उपसंस्थानांस आपल्या वतीनें प्रतिनिधि आणि कारभारी राष्ट्रीयसभेस पाठविण्याचा अधिकार नाहीं; तरी प्रत्येक उपसंस्थानाचा डेलिगेट म्हणजे मुख्त्यार, वाशिंग्टन एथें जाऊन राहात असतो. तेथें जरी राष्ट्रीयसभेंत त्याचा प्रवेश होत नाहीं तरी उपसंस्थानांसंबंधी ठराव आणि कायदे करीत असतांना राष्ट्रीयसभेंतील सदस्यांस हा मुख्त्यार महत्त्वाच्या सूचना करूं शकतो. उपसंस्थानांस आपले प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार नाहीं, यामुळें राष्ट्राचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडण्यांत त्यांचें अंग नसतें.

## राष्ट्र.

ह्या प्रकारचीं अडतीस संस्थानें आणि बारा उपसंस्थानें मिळून **युनाईटेड् स्टेट्स्** म्हणजे संयुक्त संस्थानें या नांवाचें हें थोरलें लोकसत्ताक राष्ट्र बनलेलें आहे. ह्यांत अमुक इतकींच संस्थानें असावयाचीं, अशी कांहीं इयत्ता केलेली नसल्यानें त्यांत पाहिजे तितकीं नवीं संस्थानें सामील करतां येतील. हीं संस्थानें नुसतीं लहान लहान जिल्ह्यासारखीं नसून स्वतंत्र राष्ट्रें आहेत हें मागें सांगितलेंच आहे. प्रत्येक संस्थानांत एक प्रतिनिधींची व कारभाऱ्यांची कायदे करणारी सभा, संस्थानाचा अध्यक्ष (गवर्नर), वरिष्ठ न्यायाधीश, सेना, कोश, शासनपद्धति, हीं सगळीं राज्यांगें निरनिराळीं असल्यानें सगळीं संस्थानें आपल्या ठिकाणीं स्वतंत्र राजसत्ताधारी आहेत. हीं

संस्थानें एकेक निरनिराळीं होऊन राहिल्यानें परचक्रापुढें ह्यांच्यानें टिकाव धरवणार नाहीं आणि व्यापाराला व देशाच्या उन्नतीला मोठा जबर धक्का पोंचेल, म्हणून आपसांत कांहीं निर्बंध करून त्या नियमांस अनुसरून एक विचारानें वागतात. आणि आपली ही एकी दृढ व्हावी व आपल्या राज्यव्यवस्थेस बळकटी यावी, म्हणून त्यांनीं स्वसंतोषानें कित्येक एकाधिपत्याचे अधिकार देऊन एक संयुक्त राज्यव्यंवस्था निर्मिली आहे. ह्या संयुक्त राज्यव्यवस्थेचीं सूत्रें देशाध्यक्षाच्या हातीं आहेत. पण, तो स्वतंत्र नाहीं. त्याला देशांतील सर्व जानपदांच्या प्रतिनिधींचे व कारभाऱ्यांचे विचार घेऊन राज्यव्यवस्था पाहावी लागते. ह्या संयुक्त राज्यव्यवस्थेचें मुख्य स्थान वाशिंग्टन नगरी ही अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांची राजधानी असून ती डिस्ट्रिक्ट ऑफ् कोलंबिया ह्या महालांत आहे. हा महाल एक विशेष संस्थान नसून तेथील संयुक्त राज्यव्यवस्थेप्रमाणेंच युनाइटेडस्टेट्स्‌च्या सर्व संस्थानांची साधारण संपत्ति आहे. राष्ट्रीय कोश वगैरे सगळ्या संस्थानांचा ज्यांवर सारखा हक्क आहे असे पदार्थ, न्यायसभा, विद्याखातें, शास्त्रीय विचारालयें, वगैरे वाशिंग्तन शहरांत आहेत.

## राष्ट्रीय न्यायसभा.

ह्या सयुक्त राज्याला स्थैर्य आणि बळकटी आणणारें एक थोरलें अत्युत्कृष्ट साधन आहे, तें युनाईटेड् स्टेट्स्‌ची **वरिष्ठ न्यायसभा** (The Supreme Court of United States) ही होय. संस्थानिक आणि राष्ट्रीय ह्या दोन सरकारांमध्यें कोणास कोणते अधिकार आहेत आणि ते कोणी कोठवर चालवावे ह्याविषयीं व दुसऱ्या राष्ट्रीय गोष्टींबद्दल वाद उपस्थित झाल्यास, राष्ट्रीय न्यायसभा त्याचा निवाडा करिते. सर्व संस्थानांचें मत घेऊन राष्ट्रीय सरकार एखादा नवा कायदा करी तोंपर्यंत, संस्थानिक

आणि राष्ट्रीय अशा दोन्हीं सरकारांनीं ह्या वरिष्ठ न्यायसभेनें केलेल्या निवाड्याप्रमाणें वागलेंच पाहिजे. हें लोकसत्ताक राज्य स्थापन होतांच जी राष्ट्रीय नीति सर्व संस्थानांच्या अनुमतानें मंजूर करून घेण्यांत आली, तिच्या विरुद्ध जर एखादा नवा कायदा करून युनाइटेड्स्टेट्स्ची राष्ट्रीय सभा तो अमलांत आणूं पाहील, तर सदरील वरिष्ठ न्यायसभा त्या कायद्याच्या युक्तायुक्ततेबद्दल विचार करून, तो रद्द करण्याचा हुकुम देते. ह्यावरून राष्ट्रीय न्यायसभेची शक्ति अपरिमित आहे असें कोणी समजूं नये. कांग्रेस प्रेसिडेंट् इत्यादि युनाइटेड्स्टेट्स्ची शासक मंडळी सुद्धां ह्या सभेची आज्ञा शिरसामान्य करून घेते खरी, पण ह्या सभेला राष्ट्रीय नीतीला अनुसरून खटल्यांचा निवाडा करणें, ह्यावांचून इतर कोणत्या गोष्टी आपल्या मर्जीस वाटतील तशा करण्याचा अधिकार नाहीं. नवे कायदे करणें किंवा चालू असलेले कायदे अमलांत आणणें, हेंही तिच्या हातीं नाहीं. जेव्हां एखादी गोष्ट रीतीप्रमाणें तिच्यापुढें आणली जाईल, तेव्हां ती राष्ट्रीय नीतीस अनुकूल आहे कीं नाहीं याचा विचार करून, वरिष्ठ न्यायसभा त्या गोष्टीस अनुकूल किंवा प्रतिकूल असें आपलें मत देते. ह्याप्रकारें रीतीप्रमाणें एखादि गोष्ट आपल्यापुढें येण्याच्या अगोदर संस्थानिक, व स्थानिक सरकार किंवा प्रेसिडेंट् यांच्या कारभारांत हात घालून ढवळाढवळ करण्याचा हक्क सदरील सभेला नाहीं. आणि आपण केलेले निवाडे कोणते व ते तसे करण्याचीं कारणें काय हेंही तिणें सर्व लोकांस कळविलें पाहिजे. अशा रीतीनें राष्ट्रीय न्यायसभेची शक्ति समर्याद केलेली आहे. अशा नियमांत राहून आपल्या राष्ट्रानें आपणास दिलेल्या अधिकारांच्या बळानें राष्ट्रीय नीतीला अनुसरून ही सभा कोणत्याही गोष्टीचे युक्तायुक्ततेविषयीं जें मत देईल तें अन्यथा करण्याची शक्ति (कायदेशीर रीतीनें) ह्या राष्ट्रांत कोणासच नाहीं.

निरनिराळ्या संस्थानांतील कायदे करण्याऱ्या सभा आपापल्या ठिकाणीं हवे तसे कायदे करण्यास स्वतंत्र आहेत; तरी ते कायदे कोणत्या तरी गोष्टींत राष्ट्रीय नीतीच्या विरुद्ध असतील, तर ते रद्द करण्याचा अधिकार राष्ट्रीय न्यायसभेस आहे, असें सर्वांस ठाऊक असल्यानें, त्या सभा नवे कायदे करण्याच्या वेळीं ते राष्ट्रीय नीतीस विरोधी होणार नाहींत ह्याविषयीं फार काळजी घेतात. राष्ट्रीय नीतीच्या विरुद्ध कायदे करण्याचें मुळीं कारणच नाहीं; कारण सगळ्या संस्थानांनीं आपल्या संरक्षणाकरतां म्हणून स्वसंतोषानें जे काहीं हक्क देऊन संयुक्त राष्ट्राला आपल्या शासकाच्या जागीं नेमलें आहे, त्याच्या नीतीस प्रतिकूल असे कायदे करण्यास आधीं संस्थानांतील रहिवासीच आपलें मत देणार नाहींत. परंतु कदाचित् असा प्रसंग आलाच आणि एकाद्या संस्थानानें राष्ट्रीय नीतीच्या बाहेर कांहीं कार्य केलेंच, तर त्याचें करणें बरोबर नाहीं म्हणून सांगण्याचा अधिकार कोणास तरी असावा, तो राष्ट्रीय न्यायसभेला आहे हें ठीकच आहे. युनाइटेड् स्टेट्स्ची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत कायतो एकदांच अशा प्रकारचा खटला ह्या सभेपुढें आला होता. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीं कांहीं दाक्षिणात्य संस्थानांनीं हवशी लोकांस गुलामगिरींत ठेवून, आपली तुंबडी भरण्याच्या उद्देशानें आपण युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रांतून वेगळीं होणार व तसें करण्याचा अधिकार आपल्यास आहे, म्हणून ह्या संयुक्त राष्ट्रांतून विभक्त होण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळीं ती गोष्ट राष्ट्रीय नीतीच्या बाहेर आहे, संस्थानांस राष्ट्रांतून विभक्त होण्याचा अधिकार नाहीं, असें राष्ट्रीय न्यायसभेनें आपलें मत दिलें. दाक्षिणात्य संस्थानांनीं तिचा हुकूम न मानून बंड केलें; पण उत्तरेच्या व राष्ट्रीय ऐक्य इच्छिणाऱ्या संस्थानांनीं मिळून तें बंड मोडलें.

संस्थानांच्या अधिकारांच्या मर्यादेविषयींचे खटले फारच थोडे असतात,

त्यांवर आपलें मत देण्याचें प्रसंग ह्या सभेस फारसे येत नाहींत; तरी निर-निराळ्या संस्थानांच्या रहिवाशांचे मोठ्या रकमेबद्दल किंवा फार महत्त्वाच्या गोष्टींविषयीं आपसांत तंटे झाल्यास, ते निवाड्याकरतां ह्या राष्ट्रीय न्यायसभे-पुढें नेतां येतात; म्हणून ह्या सभेला हातपाय जोडून स्वस्थ बसण्यास सवड सांपडत नाहीं.

ह्या सभेंत नऊ न्यायाधीश असतात. इतर सरकारी ( म्ह० प्रेसिडेंट व त्याचे प्रधान इ० ) कामदारांप्रमाणें थोड्या थोड्या वर्षांनीं ह्यांच्या ठिकाणीं दुसऱ्या सभासदांची नेमणूक होत नाहीं. एकदां ह्या सभेंत त्याची नेमणूक झाली, म्हणजे एक तर आपलें काम बजावण्यास ते समर्थ नाहींत असें दिसून आल्यास, किंवा राष्ट्रीय सभेनें त्यांवर कांहीं ठपका आणून तो शाबीत झाल्यास मात्र, त्यांस राष्ट्रीय सरकार कामावरून काढतें. एरवीं त्यांस आपापलें कर्तव्य करण्याची शक्ति असे तोंपर्यंत आपल्या हुद्यावर राहण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यांपैकीं एखादा इसम मरून वगैरे त्याची जागा रिकामी झाल्यास प्रेसिडेंट योग्य मनुष्यास पसंत करून त्याची त्या ठिकाणीं योजना करतो; परंतु योजना करण्यापूर्वीं प्रेसिडेंटानें सिनेट सभेला ह्या गोष्टीस रुकार दे-ण्याची विनंति केली पाहिजे. सेनेट सभेचा विचार घेतल्यावांचून किंवा तिच्या मर्जीविरुद्ध राष्ट्रीय न्यायसभेंत नव्या सभासदांची नेमणूक करण्याचा अधिकार प्रेसिडेंटाला नाहीं. ह्या सभेच्या सभासदांस (प्रत्येकीं ) दरवर्षी दहाहजार डालर पगार मिळतो; आणि त्यांपैकीं मुख्य न्यायाधीशास पांचशें डालर अ-धिक म्ह० साडेदहा हजार डालर मिळतात. त्यांपैकीं ज्याचें वय सत्तर वर्षांचें झालें असेल त्यानें आपल्या कामाचा राजीनामा देऊन घरीं बसावें; त्यानं-तर तो जीवंत असे तोंपर्यंत त्याला आपल्या हुद्यावर असतांना मिळत होता तितका पगार दरवर्षास मिळत जातो.

युनाइटेड् स्टेट्स्मध्यें दुसऱ्या पुष्कळ कामदारांस आणि वकीलांस ह्या-

पेक्षां दहापट अधिक पैसा मिळत असेल. धनलाभाच्या मानानें पाहिलें असतां राष्ट्रीय न्यायसभेच्या सभासदांची पदवी मोठी स्पृहणीय आहे असें नाहीं. एकाद्या वकीलाला किंवा शिक्षकास देखील त्यांच्या तिप्पट चौपट पगार मिळतो. परंतु त्यांच्या पदाची योग्यता पैशाच्या योगानें मिळणारी नव्हे. त्यांची थोर पदवी हीच त्यांच्या अनन्यसाधारण योग्यतेस कारण आहे. ह्या राष्ट्रांतील सर्व जानपद त्यांस बहुमान देतात. संस्थानांचे आणि राष्ट्राचे अध्यक्ष व राष्ट्रीय सभेसारखीं थोरलालीं प्रकरणें, त्यांची आज्ञा शिरसामान्य करतात. ते न्यायदेवतेचे प्रतिनिधि असून राष्ट्रीय न्यायासनासारख्या अत्युत्तम पदावर आहेत; त्या पदाच्या बरोबरीचें पद ह्या जगांत दुसरें कोठें नसेल, असल्या पदावर चढण्याला पैशाची लालूच जर कारण होईल, तर मग न्यायदेवतेचा मान राहील कसा? म्हणून त्या पदावर चढण्याची इच्छा करण्यास धनासारखें जबरदस्त प्रलोभन नाहीं, हें फार चांगलें आहे. राष्ट्रीय न्यायसभेचे सभासद बहुतकरून सुशील, वजनदार, विद्वान्, व्यवहारशास्त्रवेत्ते आणि अनुभवी गृहस्थ असतात. त्यांची राहण्याची आणि पोशाख वगैरे करण्याची रीति अगदीं साधी असते, ह्यामुळें त्यांच्या योग्यतेस अधिकच इभ्रत येते.

ह्या राष्ट्रीय वरिष्ठ न्यायसभेचें मुख्य ठिकाण वाशिंग्तन शहरांत आहे. तेथें नेहमीं तिचें काम चालतें. परंतु तिच्या सभासदांपैकीं प्रत्येक असामी पाळीपाळीनें दरवर्षीं नेमलेल्या वेळीं ह्या राष्ट्रांतील सर्व प्रांतांत जाऊन तेथील खटल्यांचा वगैरे तपास करण्यांत त्या त्या ठिकाणच्या न्यायाधीशांस मदत देतात. न्याय करण्याच्या कामीं सोईचें पडावें म्हणून, राष्ट्रीय सरकारानें ह्या राष्ट्राचे नऊ भाग केलेले आहेत, आणि त्या भागांचे विभाग करून निरनिराळे महाल केलेले आहेत. ह्या सगळ्या महालांतून न्यायगृहें आणि न्यायाधीश आहेत. हीं न्यायगृहें राष्ट्रीय असल्या कारणानें त्यां-

तून न्यायाधीशांच्या नेमणुका व्हावयाच्या त्या प्रेसिडेंटाच्या सूचनेवरून सिनेट सभेच्या अनुमतानेंच होत असतात. ह्या पदावर नेमलेल्या न्यायाधीशांची चाकरी (त्या कामास त्यांच्या नालायकीबद्दल किंवा गैर वर्त्तणुकीबद्दल पुरावा मिळून, दोष शाबीत झाला नाहीं तर) जन्मभर कायम असते.

## राष्ट्रीयसभा.—कांग्रेस् (The Congress).

ज्या कायद्यांच्या अन्वयें न्यायाधीशांनीं लोकांच्या तंट्यांचे उलगडे करायाचे आणि देशांत सामाजिक व्यावहारिक, आणि राष्ट्रीय नीतीची सुव्यवस्था ठेवायाची, ते कायदे करणारी मंडळी कोणती, ह्याचा आतां विचार करूं. राष्ट्रीय नियम करणाऱ्या मंडळीच्या (कांग्रेसच्या) दोन शाखा आहेत, पैकीं एक लोकप्रतिनिधींची सभा ( House of Representatives ) आणि दुसरी कारभाऱ्यांची सभा (The Senate). ह्या दोन्ही सभा वाशिंग्तन शहरीं असून आपापलीं कामें करतात. त्या दरवर्षी मार्च आणि डिसेंबर ह्या महिन्यांतून नेमलेल्या तारखांस जमून आपल्या कामास सुरुवात करतात. प्रतिनिधींच्या सभेंत हल्लीं तीनशें पंचवीस सभासद आहेत. प्रत्येक संस्थानांत जितके रहिवासी असतील त्या मानानें त्या संस्थानांतून गेलेल्या प्रतिनिधींची संख्या लहान किंवा मोठी असते. राष्ट्रीय सरकार दहा दहा वर्षांच्या अंतरानें खानेसुमारी करून संस्थानांची लोकसंख्या कळल्यावर, त्यांतून किती प्रतिनिधि राष्ट्रीय सभेस पाठविण्याचा हक्क आहे हें सांगून देतें. ह्या देशची लोकसंख्या वाढत जाते त्याप्रमाणें प्रतिनिधि निवडणारांची संख्याही मोठी केली जाते. १८७० त, एक लक्ष अडतीस हजार रहिवाशांनीं एक प्रतिनिधि पाठवावा असा ठराव झाला होता. १८८० त तो बदलून एक लक्ष चौपन्न हजार रहिवाशांस एक प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क आहे असें

ठरलें. ह्या तरतुदीनें सगळ्या संस्थानांस आपापल्या लोकसंख्येप्रमाणें प्रतिनिधि निवडण्याचा समान अधिकार मिळून, कोणाशीं कोणाचें भांडण राहत नाहीं.

लोकप्रतिनिधि दोन वर्षे आपल्या कामावर राहातात. मार्च महिन्याच्या चौथ्या तारखेस कांग्रेसचें काम बंद होतें, त्याबरोबर प्रतिनिधींच्या अधिकाराची मुदतही सरते; परंतु ते जर आपल्या कामांत हुशार व लोकप्रिय असले, तर पुनः त्यांची निवडणुक होऊन त्यांस आणखी दोन वर्षें राष्ट्रीय सभेंत काम करण्याचा अधिकार मिळतो. ह्यामुळें नव्यानें ह्या महत्त्वाच्या पदावर आलेली मंडळी चांगल्या अनुभवी, जुन्या मुत्सद्यांच्या देखरेखीखालीं असते. एकेका प्रतिनिधीस वर्षास पांचहजार डालर पगार व वाटखर्चास कांहीं पैसा मिळत असतो. राष्ट्रीय सरकारच्या कामदारांस पगार मिळावयाचे ते राष्ट्रीय नीतीच्या नियमानुसार त्या सरकाराच्या खजीन्यांतून मिळतात.

## कारभाऱ्यांची सभा.

ह्या सभेस प्रत्येक संस्थानांतून दोन दोन सभासद निवडून पाठविण्यांत येतात. दर संस्थानांत लोकांच्या पसंतीनें स्थापित झालेली संस्थानची कायदे करणारी मंडळी कारभारी निवडून, आपल्या संस्थानाच्या वत्तीनें काम करण्यास पाठविते. कारभाऱ्यांच्या कामाची मुदत सहा वर्षें असून त्यांलाही दर वर्षास पांच हजार डालर पगार व वाटखर्च मिळतो. सगळ्याच कारभाऱ्यांच्या कामाची मुदत एके वेळींच सरूं नये अशी तजवीज केलेली आहे. दर दोन वर्षांनीं कारभाऱ्यांच्या मंडळींपैकीं एकतृतीयांश सभासद आपल्या कामाचा राजीनामा देतात; परंतु ते हुशार व लोकप्रिय असल्यास पुनः निवडले जाऊन, आणखी सहा वर्षें आपल्या कामावर रुजू

होतात. कारभाऱ्यांच्या मंडळींतल्या सभासदांस आपापल्या संस्थानांतून ज्या तटाचें वर्चस्व झालें असेल त्याचेंच पक्ष समर्थन करावें लागतें खरें; परंतु प्रतिनिधिमंडळीप्रमाणें ह्या मंडळीचा झोंक लोकमताबरोबर एकाएकीं बदलत नाहीं. कारभाऱ्यांच्या मंडळीला फारच महत्त्वाचे आणि मोठे अधिकार आहेत. ह्यामुळें राष्ट्रीय सभेचें हें अंग फारच शक्तिमान आहे. नव्या कायद्यांचे मसुदे प्रतिनिधींच्या मंडळीनें पसंत केल्यावर कारभाऱ्यांच्या मंडळीपुढें नेतात. ह्या मंडळीनें त्यांस आपली मंजुरी दिली नाहीं तर कोणताच कायदा अमलांत यावयाचा नाहीं. परराष्ट्रांशीं केलेले तह, कारभारी मंडळींतील दोन तृतीयांश सभासदांचें मत अनुकूल नसल्यास, कायम होत नाहींत.

युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकाराकडून परराष्ट्रांस जाणारे वकील आणि गुमास्ते, ह्या मंडळीनें पसंत केले पाहिजेत. प्रेसिडेंटाला आपल्या पसंतीचे बरेच कामदार निरनिराळ्या कामावर नेमतां येतात खरे, परंतु त्यास कारभारी मंडळीची मंजुरी मिळाली नाहींतर, एकच नाहीं पण दहा प्रेसिडेंटांच्यानेंही आपल्या मर्जींतील लोकांस कामें देववणार नाहींत. प्रतिनिधींच्या सभेंत काम केल्यावर त्या सभासदांची वढती होऊन कारभाऱ्यांच्या मंडळींत त्यांचा प्रवेश होणें, हें अमेरिकन लोकसमाजांत फारच मोठें मान्यतेचें लक्षण असें मानलेलें आहे. ह्या राष्ट्राला आपल्या कारभारी मंडळीचा मोठा अभिमान आहे, तो पोकळ नाहीं. राष्ट्रीय वरिष्ठन्याय सभेप्रमाणेंच ह्या मंडळीच्या समान योग्यतेच्या व इतक्या प्रतापशाली मंडळ्या कोठेंच नाहींत. इंग्लिश पार्लमेंट सभेंत सुद्धां ह्या मंडळीची बरोबरी करणारी दुसरी मंडळी नाहीं. इंग्लिश पार्लमेंटांत "हौस ऑफ् कामन्स" म्ह० साधारण लोकांची व "हौस आफ् लार्ड्स्" म्ह० अमीरांची मंडळी असे दोन भाग आहेत. हौस ऑफ् कामन्स मध्येंच केवळ सर्व साधारण लोकम-

ताचा कांहींसा मान आहे. अमीरांच्या मंडळींत लोकमत म्ह० कस्पटा-सारखें असून तेथें केवळ बड्या लोकांचा प्रवेश होतो; मग तीं बडीं धेंडें साधारण लोकांस आवडोत किंवा न आवडोत. इंग्लिश राणीचे हल्लींचे मुख्य प्रधान लार्ड् साल्स्बरी ह्यांचें म्हणणें आहे कीं–"अमेरिकन लोकांमध्यें राष्ट्रीयन्यायसभा आहे तिची मला मोठी ईर्षा वाटते. अमेरिकन लोकांमध्यें कारभाऱ्यांची मंडळी आहे हें तुम्हास ठाऊकच आहे. आमच्या देशांतही असली एखादी मंडळी असावी अशी मला उत्कट इच्छा आहे. त्या मंडळीची गुणाकारिता आणि शक्ति ह्या कांहीं विलक्षण आहेत." ह्या विलक्षण शक्तीच्या आणि गुणाकारितेच्या पाठीशीं लोकमताचें जबरदस्त टेंकण आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. सर्व साधारण लोकांस आपल्या भावी, हिताहिताचा विचार करून राष्ट्रीय कारभार चालविण्यांत आपलें मत देण्याचा अधिकार असणें, हें राष्ट्राचें मुख्य बळ होय. अशा वीर्यवान् मुळापासून जिची उत्पत्ति व लोकमतरूपी रसाच्या पानानेंच जिची वाढ होते, त्या कारभारी मंडळीरूपी वल्लीच्या अंगीं विलक्षण शक्ति आणि गुणाकारिता कां असणार नाहीं?

कारभारी मंडळीच्या संमतीवांचून परराष्ट्रांशीं तह किंवा लढाई करण्याचा अधिकार ह्या राष्ट्रांत कोणाला नाहीं; ही व हिच्याच सारख्या दुसऱ्या कित्येक गोष्टी ह्या राष्ट्राच्या मोठेपणास कारण झाल्या आहेत. कारभारी मंडळीच्या विचारी वर्तनामुळें, पुष्कळ अविचाराच्या गोष्टी केल्यापासून होणारे भयंकर परिणाम ह्या राष्ट्राला भोगावे लागले नाहींत, ज्या राज्यांतून एका किंवा दहा पांच माणसांच्या हातीं कांहीं वेळपर्यंत राज्याचीं अदृष्टसूत्रें असतात, तेथें त्या पदस्थ मनुष्यांना आपली महत्त्वाकांक्षा तृप्त करून, लोकांकडून शाबासकी मिळविण्याकरितां, क्षणभर चांगल्याशा वाटणाऱ्या व बाहेरून भपकेदार पण परिणामीं सर्व

राष्ट्रास तोंडघशीं घालणाऱ्या भयंकर गोष्टी करण्याची उत्कट इच्छा उत्पन्न होऊन, ती सफळ होण्याचा पुष्कळ संभव आहे. तीं मनुष्यें परिणामीं कोणती गोष्ट राष्ट्राला हितावह होईल ह्याचा विचार न करतां, सद्यः काय केलें असतां लोकांचे डोळे दिपून जनांत आपली वाहवा होईल, ह्याचाच आधीं विचार करतात. राजसत्तेंतील प्रधानांच्या किंवा सेनापतींच्या हातांत ज्यांचीं अदृष्टसूत्रें आहेत, अशा देशांवर पडणाऱ्या ह्या आकाशाच्या कुऱ्हाडीचा घाव प्रजासत्ताक राष्ट्राच्या गळ्यावर पडण्याचा संभव नाहीं. एथें अमुक एक अदूरदर्शीपणाचें कृत्य केल्यानें अमुक व्यक्तिविशेषाचें वैभव वाढेल, व तें न केल्यानें त्याला कोंपऱ्यांत बसून कालक्षेप करावा लागेल असें मुळींच नाहीं. व्यक्तिविशेषाचा ज्या गोष्टीशीं संबंध नाहीं ती केल्यानें किंवा न केल्यानें कोणाचा मान किंवा अपमान होत नसून, ती झालीच पाहिजे असा हट्ट धरण्याचें कोणासच कारण नाहीं. कारभाऱ्यांची म्ह० सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींची मंडळी खोल विचार करून ज्या गोष्टीस अनुकूल किंवा प्रतिकूल असें आपलें मत देईल, ती सर्व मान्य होते. जेणेंकरून परिणामीं राष्ट्राचें हित होईल तेंच कृत्य करावें; तेंच सर्व मान्य असावें. राष्ट्राच्या हिताहिताकडे लक्ष न देतां जेणेंकरून अमुक एका मनुष्याची प्रधानकी कायम राहील किंवा अमुक मनुष्याची वाहवा होईल, असल्या कृत्याला एथें कोणी विचारीत नाहीं. परराष्ट्राशीं लढाई करण्याचा प्रसंग आलाच तर त्याचीं कारणें काय, ती लढाई करून मनुष्यरक्ताचा पात करण्यापर्यंत ठेप नेण्यापुरतीं तीं सबळ आहेत कीं नाहींत, लढाईपासून आपला नफा किंवा नुकसान काय होणार, ह्या गोष्टींची वाटाघाट व विचार करून, प्रतिनिधि, कारभारी व प्रेसिडेन्ट ह्यांचें मत एकसारखें पडून बहुमतानें लढाई करण्याचें ठरल्यावांचून, युनाइटेड् स्टेट्स्चें सरकार असल्या राक्षशी कृत्यांत हात घालीत नाहीं. सदरील गोष्टींची

चाटाघांट होऊन निर्णय होण्यास पुष्कळ वेळ लागतो. तितक्या अवकाशांत राष्ट्रांतील सर्व रहिवाशांस सरकारच्या कृत्यावर आपापलें मत देण्यास संधि सांपडते, आणि कधीं कधीं कालक्रमेंकरून परराष्ट्रांशीं भांडण करण्याचीं कारणेंही नाहींशीं होतात. मग युद्धाची जरूरच राहत नाहीं आणि युद्ध करण्याचा ठरावच झाला तर राष्ट्राचे सगळे प्रतिनिधि, कारभारी आणि अध्यक्ष त्याची जबाबदारी घेतात. अमुक साहेबांचा अमक्यानें अपमान केला म्हणून त्या साहेबानें मनःपूत कृत्य करून सूड उगविण्याकरतां लढाई केली, आणि मग निर्दोषी मनुष्यांस तिचे परिणाम भोगावे लागले, असें कांहीं मुळींच घडून येत नाहीं. ब्रिटिश राज्यव्यवस्थेंतील कित्येक नियमांशीं ह्या लोकसत्ताक राष्ट्रांतील कांहीं नियमांची तुलना करून पाहिल्यास ह्यांचें उत्तमत्व तेव्हांच कळून येईल. ब्रिटिश राज्यांत कांहीं सार्वजनिक लोकोपयोगी कृत्य करण्याचें झाल्यास सगळ्या पार्लमेंट सभेचें अनुकूल मत पडून त्याविषयीं कायदा करावा लागतो. इजिप्त, ब्रह्मदेश, अफगाणिस्थान वगैरे देशांशीं लढाई करून समराग्नींत हजारो लक्षावधि मनुष्य प्राण्यांचे बळी देऊन, हिंदुस्थानासारख्या गरीब देशाला अतोनात कर्जाच्या भाराखालीं दडपून गुदमरायाला एक दोन किंवा साहा सात प्रधान मंडळींनीं मान हालवून हो म्हटलें म्हणजे पुरतें. ह्यांत कोणी पार्लमेंटाची सल्ला घेत नाहीं. पांच सहा स्वार्थी मनुष्यांनीं राणीच्या नांवानें—(आणि राणी किंवा राजा ह्या कांहीं सत्ताधारी व्यक्ति नसून त्या पदस्थ प्रधानांच्या हातांत बाहुल्यांसारखीं ते नाचवितील तशीं नाचणारीं गरीब मनुष्यें आहेत, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे,)—सगळ्या राष्ट्राला आग लावून द्यावी, किंवा परराष्ट्रांशीं अविचाराचा तह करून आपल्या व आश्रित राष्ट्रांच्या माना कसायाच्या सुरीखालीं खुशाल द्याव्या. हें काय तर म्हणे एका सुधारलेल्या राष्ट्राची सुधारलेली राजनीति.

ह्या लोकसत्ताक राष्ट्राचा कित्ता वळवून ब्रिटिश सरकार जर बहुत विचारी लोकांच्या विचारानें वागतें आणि दहा पांच मनुष्यांस परराष्ट्रांच्या घरगुती गोष्टींत रिकामा हात घालून लुडबुड करूं न देतें, तर किती बरें झालें असतें! युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकाराची ठरींव नीति अशी आहे कीं, आपण परराष्ट्रांच्या गोष्टींत हात घालावयाचा नाहीं आणि कोणाला आपल्या घरगुती प्रकरणांत रिकामे कारभार करूं द्यावयाचे नाहींत. ह्या राष्ट्रांत दोन प्रबळ तट आहेत. त्यांपैकीं पाहिजे त्याची चलती असो, परराष्ट्रांशीं भांडण करण्याचीं सबळ कारणें असलीं, तरी त्यांनीं लोकांशीं एकदम हातघाईवर न येतां आधीं तिऱ्हाईताच्या मध्यस्थीनें त्या कारणांचा पूर्ण विचार करून शांतपणें ह्या गोष्टीचा निकाल लावण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे; अशी त्यांची प्रतिज्ञा आहे. थोडक्या काळापूर्वी युनाइटेड् स्टेट्स् आणि इंग्लंड या दोन्ही सरकारांमध्यें असा तह झाला आहे कीं, आपसांत तंटे उपस्थित झाल्यास त्यांनीं परस्परांस शस्त्रप्रहार न करितां तिऱ्हाइत राष्ट्रांच्या मध्यस्थीनें त्या तंट्यांचा निकाल करून घ्यावा. ही गोष्ट त्यांच्या सभ्यतेस मोठी भूषणास्पद आहे. यु. स्टे. सरकार इतर राष्ट्रांशींही असा करार करण्यास सिद्ध आहे. त्यांशीं भांडण होण्याचा प्रसंग आल्यास मध्यस्थीनें आपसांतील तंट्याचा निकाल लावावा असें युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकारानें सांगून धाडल्यावरही जर प्रतिपक्ष त्या सांगण्याचा अनादर करून "युद्धं देहि" म्हणेल, तर मात्र हें सरकार निरुपायास्तव त्याच्याशीं युद्ध करण्यास पुढें होईल.

## राष्ट्राध्यक्ष.

येथपर्यंत ह्या राष्ट्राच्या शासक मंडळ्यांविषयीं आपण विचार केला. आतां ह्या मंडळ्यांचा मोहोरक्या होऊन त्यांनीं चांगले व देशांत चालू करण्यास योग्य म्हणून ठरविलेले कायदे अमलांत आणणारा त्यांचा एक मुखत्यार

आहे, त्याविषयीं थोडा विचार करूं. ह्या मुख्त्यारास युनाइटेड् स्टेट्स्‌चा **अध्यक्ष** (प्रेसिडेंट President) म्हणतात. तो राष्ट्रीयसभेच्या संमतीनें ह्या राष्ट्रानें आपल्यास दिलेले अधिकार हातीं घेऊन राष्ट्राच्या वतीनें सगळीं कामें करतो. त्याच्या कामाची मुदत चार वर्षें असते; मुदत भरल्यानंतर तो फारच लोकप्रिय असल्यास युनाइटेड् स्टेट्स्‌चे लोक पुनः रीतीप्रमाणें त्याला निवडून आणखी चार वर्षांपर्यंत प्रेसिडेंटाच्या पदावर त्याची योजना करतात. जोर्ज वाशिंग्टन, टामस् जेफर्सन, जेम्स म्याडिसन, जेम्स मन्रो, आंड्र्यू जाकसन आणि युलिसेस् ग्रांट् ह्यांनीं दोन दोन वेळां यु. स्टे. चे प्रेसिडेंट होऊन आठ आठ वर्षें त्या पदाचा उपभोग घेतला. आठ वर्षांहून अधिक काळ कोणालाच प्रेसिडेंट नेमीत नाहींत. जोर्ज वाशिंगटन्‌नें ज्याप्रमाणें राजपद घेण्याचें नाकारून आपली कीर्ति अजरामर केली, त्याचप्रमाणें त्यानें आपल्या देशाच्या भावि हिताहिताकडे लक्ष्य देऊन लोकांची इच्छा होती तरी तिसऱ्यान्दां प्रेसिडेंट होण्याचें नाकारलें. एकाच मनुष्याला तीन चारदां प्रेसिडेंटाचें पद मिळाल्यास यु. स्टे. च्या स्वातंत्र्याला मोठा धक्का बसणार आहे असें समजून त्यानें तिसऱ्या वेळीं प्रेसिडेंटपद न घेऊन आपल्या देशभक्तीचें उत्तम स्मारक करून ठेवलें; व पुढील युनाइटेड् स्टेट्स्‌च्या प्रेसिडेंटांस चांगला कित्ता घालून दिला.

युनाइटेड् स्टेट्स्‌चा प्रेसिडेंट म्हणजे प्रधानांनीं नाचविलें तसें नाचणारें नांवापुरतें सिंहासनावर बसवून ठेवलेलें बाहुलें नाहीं. तो सगळ्या राष्ट्राचा अध्यक्ष आहे तसाच राष्ट्रांतील वरिष्ठ फौजदार, व जमिनीवर लढणाऱ्या आणि नाविक सैन्यांचा मुख्य सेनापति आहे. तो आपल्या पदावर असतां त्याची राज्यसत्ता निस्सीम आहे. राष्ट्रांतील न्याय, मुलकी, सेना इत्यादि खात्यांत त्याच्या हुकुमावांचून कांहीं फेरबदल व्हावयाचा नाहीं व कांहीं विशेष काम चालावयाचें नाहीं. त्यानें हुकूम केल्याबरोबर तो अमलांत आ-

णायाला सर्व लोक सिद्ध असतात. सर्व संस्थानांतील सेनाखातीं मिळून युनाइटेड् स्टेट्स्ची खडी फौज २५ किंवा २६ हजारांवर नाहीं; परंतु प्रेसिडेंट्चा हुकुम मिळाल्यावरोबर आज कांहीं नाहीं तरी साठ सत्तर लक्षांहून अधिक बलिष्ठ पुरुष तो सांगेल त्याच्याशीं देशसंरक्षणार्थ युद्ध करण्यास तयार होतील. ह्या सगळ्या शिपायांना जन्मभर राष्ट्राच्या खजिन्यांतून पगार द्यावा लागत नाहीं. ते कामावर असेतोंपर्यंत त्यांचा निर्वाह चालविणें हें राष्ट्राचें काम आहे. ते लढतात ह्याचा राष्ट्रावर उपकार नसून ते **आपल्या देशाच्या संरक्षणाकरतां लढतात. ते कोणा एका माणसाच्या गौरवाकरतां लढत नसून, आपल्या देशाच्या संरक्षणाकरतां फुकट प्राण देण्यास नेहमीं सिद्ध असतात.** प्रेसिडेंट हा सेनेंतील पाहिजे त्या अधिकाऱ्याला योग्य कारण मिळाल्यास पदच्युत करूं शकतो. लोकांनीं त्याला आपला प्रतिनिधि केला आहे म्हणून त्याच्या निस्सीम शक्तीला कोणी सीमा घालूं इच्छित नाहीं. प्रेसिडेंट्चें करणें लोकांला आवडलें नाहीं तर त्याच्याबद्दल आपलें मत द्यायाचें तें ते पुढील अध्यक्षाच्या निवडणुकीचा काळ येईतोंपर्यंत राखून ठेवतात. प्रेसिडेंट आपली निस्सीम शक्ति अमलांत आणतो ह्याचा लोकांस मत्सर वाटण्याचें कांहीं कारण नाहीं; कारण, ह्या लोकनियुक्त वरिष्ठ अधिकाऱ्यानें अयोग्य काम केलें तर त्यास पदच्युत करणें हें लोकांच्या शक्तीपलीकडे नाहीं. प्रेसिडेंट अधिकारावर असेतोंपर्यंत त्याला दरवर्षास ५०,००० डालर पगार मिळतो; आणि वाशिंग्टन शहरांत राष्ट्रीय सभागृहाच्या जवळ त्याला राहायाला एक मोठा वाडा, आणि कधीं कधीं बाहेरगांवीं जाऊन विश्रांति घ्यायाला म्हणून शहरापासून थोड्या मैलांवरील एक उद्यानगृह त्याच्या स्वाधीन केलेलें असतें. प्रति आठवड्यांत नेमलेल्या वेळीं कांहीं तासांपर्यंत प्रेसिडेंट लोकांची भेट घेतो. प्रेसिडेंटावर त्या राष्ट्रांत

राहाणाऱ्या धनकुबेरापासून तों निष्कांचन मजुरापर्यंत सगळ्यांचा हक्क सारखा आहे; ज्यानें पाहिजे त्यानें ह्या नेमलेल्या वेळीं प्रेसिडेंट्ला भेटून यावें; प्रेसिडेंट्नें सगळ्यांचा योग्य मान राखला पाहिजे. ह्या आणि अशाच दुसऱ्या पुष्कळ चालींच्या योगानें त्या राष्ट्राची सत्ता एका व्यक्तींत नसून सर्व जानपदांमध्यें सारख्या परिमाणानें ती वसत आहे; ह्या गोष्टीचें प्रेसिडेंटाला वारंवार स्मरण होतें. लोकांनीं निवडलेला मनुष्य देशाध्यक्षाच्या पदावर वसतांना आपलें मंत्रिमंडळ[1] आपणच नेमून घेतो. प्रेसिडेंट हा स्वतःच आपला प्रधान असल्याकारणानें त्याच्या मंत्र्यांच्या पदव्यांत लहान मोठी असें तारतम्य नसून, सगळ्या एकाच योग्यतेच्या असतात; ह्या मंत्र्यांना “ चिटणीस ” असें म्हणतात. जसें लढाईखात्याचा चिटणीस, जामदारखान्याचा चिटणीस इ० इ०. हे मंत्री कायमचे नसतात. ते अयोग्य ठरल्यास त्यांच्या ठिकाणीं दुसऱ्यांची योजना करण्यास कांहीं अडचण नसते. मंत्रिमंडळी जातीनें कायदे करणाऱ्या मंडळीपुढें जात नाहीं. आपल्यास

---

१ हे मंत्री एकंदर सात असतात त्यांचा अनुक्रम असा:—सेक्रेटरी आफ् स्टेट, सेक्रेटरी आफ् दि ट्रेझरी, सेक्रेटरी आफ् वार, अटर्नी जनरल, पोस्टमास्तर जनरल, सेक्रेटरी आफ् दि नेवी, आणि सेक्रेटरी आफ् दि इंटीरियर्.

राष्ट्राध्यक्ष निवडण्याच्या वेळींच एक उपाध्यक्ष निवडला जातो. त्याच्या कामाची मुदत प्रेसिडेंटाच्या मुदती इतकीच असते. त्याला दर वर्षी नऊ हजार डालर पगार मिळतो. प्रेसिडेंट आपल्या पदावर असतांना मरण पावल्यास किंवा पदच्युत झाल्यास ह्या उपाध्यक्षालाच त्याची मुदत सरे तोंपर्यंत प्रेसिडेंट करतात. आणि उपाध्यक्षही मयत किंवा पदच्युत झाल्यास सदरीं सांगितलेल्या अनुक्रमानें मंत्रि मंडळीपैकीं एखाद्या व्यक्तीस मुदत संपे तोंपर्यंत प्रेसिडेंटाचे अधिकार मिळतात.

काय सूचना करावयाच्या असतील त्या लिहून कळविते. पूर्वी कांग्रेसच्या प्रत्येक बैठकीचे वेळीं प्रेसिडेंट स्वतः राष्ट्रीयसभेंत हजर असून आरंभींचें भाषण करीत असे; परंतु कायदे करतांना ते अमलांत आणणारी व्यक्ति तेथें नसणें अधिक महत्त्वाचें आहे असें कळून आल्यावरून, ही चाल मोडून टाकण्यांत आली आहे. आतां कांग्रेसला कांहीं सूचना करावयाच्या त्या प्रेसिडेंट लिहून धाडतो. एखादी अधिकउणी गोष्ट करणें राष्ट्राच्या हिताला कारणीभूत होणार आहे असें वाटल्यास ती गोष्ट कांग्रेसला कळविण्याचीही मोकळिक त्याला आहे. ह्या देशाध्यक्षाची शक्ति फार मोठी आहे असें म्हटलें आहे. ह्याच्या जितक्या म्हणून खुणा आहेत, तितक्यांत त्याची प्रतिषेधाधिकारशक्ति ही फार मोठी आहे. प्रतिषेधाधिकार म्हणजे मुक्त्यारांच्या व कारभाऱ्यांच्या पसंतीस पडून जो कायद्याचा खरडा अध्यक्षाच्या मंजुरीकरतां त्याच्याकडे येईल, तो आपल्यास पसंत नसल्यास योग्य कारण दाखवून प्रेसिडेंटानें त्याचा प्रतिषेध करणें म्ह० तो कायदा करण्यास आपलें अनुमोदन न देणें हा अधिकार. प्रेसिडेंटानें नापसंत केलेला खरडा कायदा होत नाहीं. अध्यक्षानें सांगितलेलीं कारणें योग्य नाहींत असें वाटल्यास राष्ट्रीय सभेच्या दोन्हीं भागांतील दोन तृतीयांश सभासदांचें मत त्यास अनुकूल असें पडल्यास, पुनः त्याचा विचार करून तो कायम करण्यांत येतो. ह्याप्रमाणें एकाअर्थी अध्यक्षाची शक्ति निस्सीम असूनही तिला सीमाबद्ध करणें राष्ट्रीयशासक सभेच्या आटोक्यांत आहे.

आपले देशाध्यक्ष निवडून काढण्यांत अमेरिकन लोकांच्या हातून फारशा चुक्या होत नाहींत. आजपर्यंत जे प्रेसिडेंट होऊन गेले ते बहुतेक चांगलेच झाले. वाशिंग्टन, आडम्स्, जेफर्सन, लिंकन, गार्फील्ड ह्यांसारखे कित्येक अध्यक्ष तर अप्रतिम सदाचरणी आणि राज्यकार्यज्ञता इत्यादि गुणांहीं सर्व प्रकारें लोकप्रिय देशाध्यक्ष होण्यास योग्य होते. लिंकन आणि गार्फील्ड हे लक्षा-

धीश नव्हते, व मोठ्या ऋषींच्या किंवा राजांच्या कुलांतून उत्पन्न झालेलेही नव्हते. त्यांची मूळची गरीबी, विद्याभ्यासाची अडचण, व निष्कांचनत्व, आणि ह्या सगळ्या विघ्नांतून उद्योगाच्या व सदाचरणाच्या बळानें पार पडून ते यःकश्चित् गरीब शेतकऱ्यांच्या मुलांचे विद्वान्, शिक्षक, वकील, युनाइटेड् स्टेट्स्‌चे देशाध्यक्ष आणि आपल्या आंगच्या सौजन्यादि गुणांनीं अमर झाले; ह्या गोष्टी मनांत आणल्या म्हणजे आमचें मन सानंदाश्चर्यानें थक्क होऊन, यु. स्टे. मधील सर्व साधारण लोकांस जाति, कुल, धन ह्या तीन प्रबल शक्तींचा आश्रय घेतल्यावांचूनच आपापल्या योग्यतेनुरूप उन्नत पदावर आरूढ होतां येतें, हें समजून तिच्याविषयीं आमच्या हृदयांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते. देशाध्यक्ष निवडण्यांत जेथें म्हणून चूकी झाली असें अमेरिकन लोकांस दिसून येतें, तेथें ती दुरुस्त करण्याचे उपाय त्यांस सुसाध्य आहेत. अध्यक्षाच्या आचरणाकडे आणि कार्यपद्धतीकडे सगळ्यांची नजर लागलेली असते. लोकांस न आवडणारीं अशीं एकदोन कृत्यें त्याच्या हातून झालीं कीं पुरे, देशभर वर्तमानपत्रांतून त्यांचा गवगवा होतो. प्रसिद्ध ठिकाणीं व्याख्यानांतून त्यांचा उल्लेख होतो. पुढच्या वेळीं अध्यक्ष नेमावयाचा तो आतांच्या अध्यक्षापेक्षां अधिक नीतिमान् आणि कार्यदक्ष असलाच पाहिजे असें सर्व लोक म्हणूं लागतात. हें ऐकून अनीतीकडे ज्याचा कल आहे असला देशाध्यक्ष बहुतकरून सावध होतो. नाहींच झाला तर त्याची मुदत सरल्यानंतर त्याच्या जागीं दुसऱ्याला नेमण्याचे प्रयत्न चाललेलेच असतात. युनाइटेड् स्टेट्स्‌च्या राष्ट्रीय कायद्यांविरुद्ध त्याचें वर्तन असल्यास साधारण मनुष्याप्रमाणेंच राष्ट्रीय न्यायसभेपुढें त्याचा तपास होऊन त्याला पदच्युत करतां येतें. अध्यक्षाची काम करण्याची मुदत सरल्यावर तो इतर साधारण जानपदांप्रमाणें आपल्यास इष्ट वाटेल तें काम करूं लागतो. कोणी वकीलीचा व कोणी शेतकीचा धंदा करतो. कोणी आपल्या मूळच्या संस्थानाचा लोकनियुक्त प्रति-

निधि होऊन राष्ट्रीय सभेंत राहून देशाची चाकरी करतो. माजी प्रेसिडेंटाला "पेन्शन्" म्ह० वैठा पगार मिळत नाहीं. तो प्रेसिडेंट असतांही अमेरिकन जानपद असतो, आणि त्या वेळेस त्याच्या संस्थानाचा गवर्नर निवडण्याची वेळ आली म्हणजे साधारण जानपदांप्रमाणें त्या संस्थानांतील आपल्या मूळच्या ठिकाणीं जाऊन ह्या निवडणुकींत आपलें मत देऊन येतो. तो प्रेसिडेंट म्हणून त्याच्या मताचें वजन जेम्स् शेतकऱ्याच्या किंवा साम्युएल कोळसेविक्याच्या मतापेक्षां गुंजभर देखील अधिक भरत नाहीं. तो आपल्या शहरांत आला म्हणून कांहीं विशेष कारण असल्यावांचून शहरची म्युनिसिपालिटी मोठा समारंभ करून, गरीब लोकांकडून घेतलेल्या पैशाचा अपव्यय करीत नाहीं; परंतु त्याचा योग्य मान राखण्यास सर्व लोक फार उत्सुक असतात. हा मान त्या व्यक्तीचा नव्हे, तर त्याच्यांत जी लोकसत्ता विराजमान आहे तिचा मान असें समजायाचें. तो मागें प्रेसिडेंट होता म्हणून त्याला कोणी बेतापेक्षां ज्यास्ती मान देत नाहीं. आपणास अध्यक्ष करून अमेरिकन जानपदांनीं सर्वोत्कृष्ट मान दिला म्हणून तोच त्यांचा आभारी असतो.

प्रेसिडेंटाची निवड करायाची ती सर्व लोक मिळूनच करतात, परंतु ती प्रत्यक्ष रीतीनें करीत नाहींत. दर संस्थानाला त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणानें कमी किंवा जास्ती लोकप्रतिनिधि राष्ट्रीयसभेंत पाठवितां येतात; त्याचप्रमाणें कमी किंवा जास्ती " इलेक्टर्स् " म्ह० निवडणारे नेमतां येतात. ह्या निवडणारांनीं आपापल्या संस्थानांतील लोकमत घेऊन वाशिंग्टन शहरास जायाचें, आणि तेथें अमुक मनुष्यास अमुक इतकीं मतें मिळालीं असें सांगून यायाचें; मग ज्यास अधिक मतें मिळालीं असतील त्याला अध्यक्ष नेमतात. दर चार वर्षांनीं एकदां नवेंबर महिन्याच्या सहाव्या तारखेस प्रेसिडेंटाची निवडणुक होते. आणि त्यानंतर चार महिन्यांनीं म्हणजे मार्च

महिन्याच्या चौथ्या तारखेस जुना प्रेसिडेंट नव्या प्रेसिडेंटाच्या हातीं आपलें काम सोंपून देतो. त्या वेळेस नवा प्रेसिडेंट मी इमानें इतबारें युनाइटेड् स्टेट्स्‌चे कायदे अमलांत आणीन व प्रामाणिकपणानें देशाची सेवा करीन, अशी शपथ घेतो. प्रेसिडेंट निवडण्याकरतां दरवेळेस सहा लक्ष डालर म्ह० सरासरी अठरा लक्ष रुपये खर्च येतो; परंतु हा सगळाच खर्च प्रेसिडेंटाप्रीत्यर्थ होतो असें म्हणतां येत नाहीं. लोकप्रतिनिधि निवडण्याच्या वेळीं प्रत्येक संस्थानांत प्रेसिडेंट निवडणारे देखील निवडून काढावे लागतात; तेव्हां एकाच्या पोटांत दुसऱ्याचा खर्च भागून जातो.

युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें इंग्लंडाप्रमाणेंच कोणत्या तरी दोन राजकारणी मंडळ्या प्रबळ असतात. अशा प्रकारच्या मंडळ्या आजपर्यंत पुष्कळ होऊन गेल्या. कोणती तरी एखादी महत्त्वाची गोष्ट घेऊन तिच्या सिद्धीकरतां झटणें हें ह्या मंडळ्यांचें काम आहे. पंचवीस तीस वर्षांमागें रिपब्लिकन मंडळी अस्तित्वांत आली; हिचा उद्देश अफ्रिकन मनुष्यांना दास्यमुक्त करणें, हा होता. डेमक्राटिक मंडळीचा मूळचा उद्देश व्यक्तिमात्राचें स्वातंत्र्य राखणें, हा फार चांगला होता; परंतु ह्या मंडळीला आतां साठी आली तेव्हां तिची बुद्धि नाटी होत चालली आहे ह्यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. रिपब्लिकन मंडळीसही आतां चाळशी येत चालली आहे. हल्लीं आणखी तीन नव्या मंडळ्या निघाल्या आहेत. त्यांत प्रोहिबिशन म्हणजे मद्यनिषेधक मंडळी ही फार महत्त्वाची आहे. ह्या मंडळीस उत्पन्न होऊन फार वर्षें झालीं नाहींत, तरी ही यु. स्टे. मधील नीतिमान् स्त्रीपुरुषांच्या साहाय्यानें प्रबल होत चालली आहे. मागें जसा डेमक्राटिक मंडळीचा चालता काळ होता, आणि आतां रिपब्लिकन मंडळीचा जय झाला आहे, त्याचप्रमाणें पुढें ह्या प्रोहिबिशन मंडळीच्या यत्नास यश येऊन यु. स्टे. चें राष्ट्र मद्यरूपी भयंकर शत्रूच्या कचाटांतून सुटेल अशी आशा पुष्कळ लोकांस आहे. विचारस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य सगळ्यांस हवें अस-

सल्यामुळें कोणी आपल्याविरुद्ध पक्षांतील मंडळीशीं वैर धरीत नाहीं. प्रत्येक मंडळीचे अनुयायी उघड रीतीनें साधक बाधक प्रमाणें देऊन आपल्या मंडळीच्या पक्षाचें समर्थन करतात; आणि तशा प्रसंगीं कांहीं कमज्यास्त बोललें तरी कोणी त्याचा राग धरीत नाहीं. एका कुटुंबांतील माणसें, म्ह० भाऊभाऊ, बापलेंक हे स्वतंत्रपणें दोन विरुद्ध मंडळ्यांचे अनुयायी असूनही परस्परांविषयीं त्यांचें प्रेम व पूज्यबुद्धि कमी होत नाहीं. प्रेसिडेंट इत्यादि राष्ट्रीय संस्थानिक किंवा स्थानिक अधिकारी नेमावयाचे ते कोणत्या तरी विशेष मंडळीनें पसंत केलेले उमेदवार असतात; मग सार्वजनिक मत घेऊन जो बहुमतानें पसंत ठरेल तो कोणत्याही पक्षाचा असला तरी निर्दिष्ट अधिकारावर नेमला जातो.

## युनाइटेड् स्टेट्स् सरकाराचें उत्पन्न.

युनाइटेड् स्टेट्स्मध्यें जी राज्यव्यवस्था सुरू आहे तिच्या नियमांप्रमाणें गांवाचा खर्च गांव, परगण्याचा खर्च परगणा आणि संस्थानाचा खर्च संस्थान भागवितें. या देशाला ह्याच्या मोठेपणाच्या मानानें जें ऋण आहे तें फारच थोडें आहे. पुष्कळ संस्थानांस मुळींच कर्ज नसून संस्थानिक उत्पन्न, संस्थानाचा राज्यकारभार चालविण्यास पुरेसें आहे. युनाइटेड् स्टेट्सच्या एकंदर शहर–म्युनिसिपालिट्यांचें कर्ज सत्तावन्न कोट पन्नास लक्ष डालर आहे. आणि लोकसंख्येच्या मानानें पाहूं गेलें असतां दर मनुष्याच्या मागें तीस डालर म्हणजे एक अब्ज पन्नास कोट डालर राष्ट्रीय कर्ज आहे. इ० स० १८३५ त ह्या युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्राला कर्ज नव्हतें इतकेंच नाहीं, तर खजीन्यांत जमून राहिलेल्या पैशाचें काय करावें हेंच त्याच्या चालकांस सुचत नव्हतें. १८६१ पासून १८६५ पर्यंत अमेरिकन लोकांमध्यें जी भयंकर यादवी माजली होती, तिच्या योगानें युनाइटेड् स्टेट्स्च्या


त्यांच्यावर मोठाच ऋणभार लादला गेला. १८६६ त ह्या राष्ट्राला तीन अब्ज डालरांवर कर्ज झालें होतें. त्याचें व्याज १४ कोट ६० लक्ष डालर दरवर्षी भरावें लागत असे. इ० स० १८८५ पर्यंत त्यांतून अर्ध्याहून अधिक कर्ज वारण्यांत आलें. आणखी दहाबारा वर्षांनीं बहुतकरून सगळें कर्ज वारलें जाईल असा रंग दिसत आहे. आलीकडे दोन वर्षांत सत्तावीस कोट डालर कर्ज वारलें जात आहे, हें पाहून पुष्कळ कर अजीबाद काढून टाकण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें अमेरिकन यादवींत सरकाराकडून लढलेल्या शिपायांस व त्यांच्या विधवांस शेंकडा पंचवीस टक्केप्रमाणें बैठा पगार वाढवून देण्यांत आला आहे. ब्रिटिश सरकार जितक्या जलदीनें आपलें कर्ज वारतें त्याच्या आठपट जलदीनें युनाइटेड् स्टेट्स्‌चें सरकार आपलें ऋण फेडीत आहे, हें पाहून मि० ग्लाडस्टोन एके ठिकाणीं म्हणतात कीं, शहाणपण, स्वार्थत्याग, आत्मसंयमन आणि दीर्घदर्शीपणा हे गुण ब्रिटिश सरकाराच्या अंगीं जितके आहेत त्याच्या आठपट युनाइटेड् स्टेट्स्‌च्या सरकारांत वसत आहेत. वर सांगितलेल्या गृहस्थांसारख्या राज्यकार्यधुरंधरांनीं या लोकनियुक्त सरकाराबद्दल ह्या प्रकारचे आपले अभिप्राय देणें ही कांहीं लहानसहान स्तुति नव्हे.

इ० स० १८३० ह्या सालीं यु. स्टे. सरकारचें सालीना उत्पन्न दर मनुष्यामागें सवा डालर होतें आणि १८६० त दर मनुष्यामागें पावणे दोन डालर म्हणजे एकंदर पांच कोट ६० लक्ष डालर उत्पन्न होतें. हें उत्पन्न बहुतकरून विदेशांतून आलेल्या मालावरची जकात आणि सार्वजनिक जमिनींची विक्री यांपासून होत असे. १८६१ पासून १८६५ पर्यंत दासांच्या व्यापाराच्या निमित्तानें अमेरिकन लोकांचें आपसांत भांडण झालें, त्यासंबंधानें झालेलें तीन अब्ज डालर ऋण फेडण्याकरितां त्या काळापासून पुढें बऱ्याच वर्षांपर्यंत यु. स्टेट्स्‌च्या लोकांवर पुष्कळ कर बसले. सन १८६६ त कराचा वसूल व


जमिनींचें उत्पन्न मिळून ५५ कोट ८० लक्ष डालर उत्पन्न झालें. १८६१ पासून १८६७ पर्यंत दरवर्षी ४० कोटपासून ५० कोट डालरांपर्यंत केवळ कराच्या वसुलाचें उत्पन्न होत होतें. त्या काळापूर्वी दर मनुष्यामागें पावणे दोन डालर कर होता तो ह्या कर्जामुळें १७ डालरांपर्यंत वाढविणें भाग पडलें. आलीकडे राष्ट्रीय ऋण जसजसें कमी होत जात आहे, तसतसे निरनिराळे करही माफ होत आहेत. इ० स० १८८३ त यु० स्टे० सरकारानें उत्पन्न ४० कोट डालरांइतकें होतें. ह्यांतून राष्ट्रीय ऋणाचें व्याज पांच कोट डालर; अमेरिकन यादवींत सरकाराच्या तर्फे लढलेल्या शिपायांचा बैठा पगार ६ कोट ६० लक्ष डालर; सेनाखात्याचा व नाविक सैन्याचा खर्च ६ कोट ४० लक्ष डालर (ह्यांपैकीं एक कोट डालर बंदरांची दुरुस्ती व इतर जलमार्गांची सुधारणा करण्यांत खर्च झाले); व ६० लक्ष डालर अमेरिकन इंडियन लोकांच्या निर्वाहार्थ देण्यांत आले; (यु० स्टे० सरकार इंडियन लोकांस दरवर्षी ६० लक्ष डालर धर्मार्थ देत आहे असें कोणी समजूं नये. त्यांच्याकडून बळजबरीनें किंवा छलानें हिसकावून घेतलेल्या अतोनात जमिनींच्या किमतीबद्दलीं जो अगदीं थोडा पैसा त्यांस दिलेला म्हणून यु० स्टे० च्या राष्ट्रीय खजीन्यांत ठेवला आहे, त्याचें व्याज ६० लक्ष डालरांहून अधिक येतें. तेंच त्यांच्या चरितार्थाकरितां त्यांच्या निरनिराळ्या जातींस थोडथोडें वांटून दिलें जातें. तें त्यांस पुरण्यासारखें नाहीं). ६ कोट ८० लक्ष डालर लोकोपयोगी सार्वजनिक कामांकरतां खर्ची पडतात. (हीं कामें कोणतीं हें पुढें सांगायाचें आहे.) राष्ट्राचा सगळा कारभार चालविणारी मंडळी म्ह० युनाइटेड् स्टेट्स्चा अध्यक्ष, राष्ट्रीयसभेचे दोन भाग (मुखत्यारांची व कारभाऱ्यांची मंडळी) आणि उपाध्यक्ष यांचा पगार एकंदर २० लक्ष ५४ हजार डालरांइतका

झाला. हे ठळक ठळक खर्चाचे आंकडे आहेत. ह्याहून अवांतर खर्च आणखी पुष्कळ आहेत.

ह्याप्रमाणें युनाइटेड् स्टेट्स्‌च्या शासनपद्धतीची संक्षिप्त माहिती आहे. एथें युनाइटेड् स्टेट्स्‌च्या नक्षत्रांक पताकेचें चित्र दिलें आहे तें पहा. ह्या राष्ट्राचा पहिला देशाध्यक्ष जोर्ज वाशिंग्टन याची ढाल नक्षत्रें आणि तांबडे व पांढरे पट्टे यांनीं चित्रित होती. ती फार सुरेख होती. आपली राष्ट्रीय पताका त्या ढालीसारखी असावी असें वाटून, अमेरिकन लोकांनीं वाशिंग्टनाच्या सन्मानार्थ त्याच्या ढालीवरील चित्रें आपल्या राष्ट्रीय पताकेवर घातलीं. ही पताका किती सुंदर आहे म्हणून सांगूं! आकाशासारख्या घननील पटावर पांढरीं नक्षत्रें व त्यांपुढें तांबडे व पांढरे पट्टे असतात. इतकी सुंदर पताका कोणत्याच राष्ट्राची नाहीं—आणि इतकें सुंदर सुव्यवस्थेनें चाललेलें जानपदसुखधाम राष्ट्र तरी दुसरें कोणचें आहे? स्वच्छ नील नभोमंडलांत आनंदी तारे जसे स्वतंत्रपणें चोहोंकडे फिरत असून आम्हां पृथिवीस्थ लोकांचें नयनमनोरंजन करतात त्याचप्रमाणें, पृथ्वीवर अट्लांटिक् व प्रशांत महासागरांच्या स्वच्छ नील जलांच्या मध्यभागीं राहून हीं अमेरिकेचीं स्वतंत्र संस्थानें आपल्या भव्य शांत तेजानें सर्व सहृदय मनुष्यांच्या हृदयास आनंद देत आहेत. युनाइटेड् स्टेट्स्‌ची पताका पाहिल्याबरोबर राष्ट्राच्या शासनपद्धतीचें स्वरूप ध्यानांत येतें. हिच्या योगानें संस्थानें व उपसंस्थानें मिळून निरनिराळीं पन्नास राज्यें आपापल्या ठिकाणीं स्वतंत्र असूनही—पृथ्वी, बुध, शुक्र इत्यादि ग्रहमंडळें जशीं स्वतंत्र गतिस्थितिविशिष्ट असूनही एक सूर्यमंडळाच्या अनुरोधानें चालतात त्याचप्रमाणें—तीं एक वाशिंग्टनच्या राष्ट्रीय सरकाराच्या अनुरोधानें चालतात. ह्या सगळ्या संस्थानांचें क्षेत्रफळ आमच्या हिंदुस्थानाच्या अडीचपट असून त्यांची संपत्ति तर फार मोठी आहे. एवढें थोरलें राष्ट्र इतक्या थोड्या काळांत सर्व प्रकारचीं विघ्नें व विपत्ति यांचा सामना करून ज्या शासन-



युनाइटेड् स्टेट्स्‌ची नक्षत्रांक पताका.



युनाइटेड् स्टेट्सच्या शिक्क्यावरील गरुड पक्षी.

पद्धतीच्या जोरावर पृथ्वींतील सर्व राष्ट्रांपेक्षां अधिक उन्नत व संपन्न होऊन सुरळीतपणानें चालूं लागलें आहे, त्या महाशक्तीची योग्यता केवढी म्हणून सांगावी! त्या शासनपद्धतीची उत्पादक सर्व सुखांची खाण, मनुष्यजातीची खरी जीवनी शक्ति जी स्वतंत्रता, तिची मूर्ति युनाइटेड् स्टेट्स्च्या दिल्लीदरवाज्यासारख्या न्यूयार्क बंदरांत उभी राहून आपल्या शांत, पवित्र, मनोहर तेजानें सर्व जगाचें मन मोहून टाकीत असून, सर्व जगतावर स्वातंत्र्याचा प्रकाश पाडण्याकरतां एका हातांत मशाल व ज्ञान देऊन मनुष्यजातीचें अज्ञान घालविण्याकरतां दुसऱ्या हातांत पुस्तक घेऊन उभी आहे तिचें, आणि स्वातंत्र्यदेवतेचें सिंहासन व ज्ञानाची आणि उन्नतीची विहारभूमि जी युनाइटेड् स्टेट्स्, तिचेंही दर्शन करून, दास्यदुःखदग्ध मानी मनुष्याचें मन आनंदभरित होतें आणि तेथें असतांना तें मनुष्य घटिकाभर आपली दुःस्थिति विसरून स्वर्गीय स्वातंत्र्यसुखांत तल्लीन होऊन जातें, आणि जगांतील सर्व देशांस सर्व मनुष्यजातींस असली शासनपद्धति, असलें स्वातंत्र्य, असली एकता आणि बंधुप्रीति मिळावी म्हणून मनापासून इच्छितें, ह्यांत कांहीं नवल नाहीं.

---

## लोकस्थिति.

एकाद्या चित्रशाळेंत शिकणाऱ्या माणसांच्या अभ्यासाकरतां एक मनुष्य किंवा पदार्थ एके ठिकाणीं ठेवून, त्यासभोंवतीं विद्यार्थिवर्गास बसवून, त्या पदार्थाचें किंवा मनुष्याचें चित्र काढायाला सांगतात. त्या वेळीं कोणी पुढें, कोणी बाजूस, कोणी पाठीमागें, कोणी तिरकस कोनांत बसून, त्या वस्तूचें चित्र काढतात, तेव्हां ती वस्तु ज्या ठिकाणाहून जशी दिसली तसें तिचें चित्र काढण्यांत येतें. आम्हांला जर त्या वस्तूच्या उजव्या बाजूचें चित्र दिसलें तर तिला डावी बाजू नाहीं; किंवा पुढच्या भागाचें चित्र दिसलें तर

तिला पाठ नाहीं असें होत नाहीं. आम्हांला चित्रांत ज्या पदार्थाची जी बाजू दिसते तीच चित्रकाराच्या पाहाण्यांत आली, इतर बाजू त्याला दिसल्या नाहींत इतकेंच त्यावरून समजावयाचें. एका मनुष्यानें एककाळीं सर्व बाजू पाहून कोणत्याही पदार्थाचें चित्र काढणें असंभवनीय आहे; ह्याचप्रमाणें एकाद्या देशांतील लोकस्थितीच्या वर्णनाची गोष्ट होय. एका मनुष्याला लोकस्थितीचीं सर्व अंगें दिसून येत नाहींत, म्हणून त्या गोष्टीविषयीं एकाचें मत अचूक आहे असें गृहीत धरून चालतां येणार नाहीं.

इंग्रज आणि अमेरिकन मनुष्यांनीं हिंदुस्थानांत पर्यटन करून आमच्या चालीरीतीचीं आणि लोकस्थितीचीं वर्णनें केलीं आहेत, तीं वाचलीं म्हणजे, विदेशी मनुष्याला तो गेला असेल त्या देशांतील मनुष्यें किती निराळ्या तऱ्हेचीं दिसून येतात, हें चांगल्या रीतीनें कळून येण्यासारखें आहे. म्हणून अमेरिकन लोकस्थिति अशाच प्रकारची आहे, आणि तिचे अमुक इतकेच प्रकार आहेत असा अचल सिद्धांत करून न सांगतां, मला ती कशी आहे असें वाटलें हेंच सांगण्याचा ह्या अध्यायाचा आणि सर्व ग्रंथाचा उद्देश आहे.

अमेरिकन लोकस्थितीचें जें अंग सर्वत्र स्पष्ट दिसून येतें तें त्या लोकांच्या विचाराचा, राज्यशासनाचा आणि इतर ठळक ठळक गोष्टींचा **सार्वजनीनपणा** ( सर्व जनास हितावहत्व ) हें होय. हिंदुस्थान, इंग्लंड किंवा इतर जुन्या राष्ट्रांमध्यें एखाद्या निवडक वर्गाकरतां सर्व सोई आणि सर्व गोष्टी केलेल्या असून, त्या साधारण मनुष्यसमुदायास लभ्य नसतात. असा प्रकार युनाइटेड् स्टेट्स्मध्यें फारच विरळा. इकडच्या राज्यशासनपद्धतीचा **सार्वजनिकपणा** हा ह्या बहुतेक सगळ्या गोष्टींच्या **सार्वजनीन**पणाचें मुख्य कारण आहे. येथें राजा म्हणजे प्रजांचा पाळक आणि मालक असून, प्रजा आणि इतर सर्व गोष्टी राजाच्या सुखा-

करताच पृथ्वीवर सृष्ट झाल्या आहेत, असें कोणी समजतच नाहीं; कारण येथें प्रजाच राजा, आणि जें सर्व प्रजांस हितावह तेंच राज्य शासनपद्धतींत असणें योग्य आहे असा सगळ्यांचा समज आहे. ह्या "**लोकांच्या, लोकांनीं शासिलेल्या, आणि लोकांकरतांच अस्तित्वांत आलेल्या**" राष्ट्रांत सर्व लोकांचें मत घेऊन बहुमतानें जें चांगलें ठरेल तेंच अमलांत आणलें जातें. लोक आपल्याला पाहिजे तो देशाचा संस्थानाचा आणि गांवाचा अध्यक्ष निवडून त्याची योग्य ठिकाणीं योजना करतात. लोकच आपल्याला पाहिजे तो कायदा करून घेतात. राजाच्या मर्जीप्रमाणें प्रजांवर हवे तसे करभार घालून चैन मारणाऱ्या लोकांस ह्या देशांत मनमानते पराक्रम करायाला सवड सांपडत नाहीं.

येथें उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ असे वर्ग लोकसमाजांत मुळींच नाहींत. जातिभेद आणि जातिमत्सर हा जरी थोडाबहुत सर्वत्र आहे, तरी तो आमच्या देशांतील किंवा इतर जुन्या राजशासित राष्ट्रांतील जातिभेदासारखा कडक आणि राष्ट्रास अपायकारक असा नाहीं. हल्लीं असलेला जातिभेद दूर करण्यास जे पुष्कळ उपाय योजले आहेत, त्यांत सर्व साधारण मुलांस शाळांतून फुकट मिळणारें विद्याशिक्षण हा मुख्य होय. युनाइटेड् स्टेट्स्च्या सगळ्या रहिवाशांच्या मुलांस शाळ्यांतून फुकट शिक्षण मिळतें. तेथें सर्व मुले एकाच जातीचीं, आणि एकाच राष्ट्रांतील रहिवाशी ह्या नात्यानें परस्परांशीं सलगीनें व सभ्यतेनें वागायाला शिकतात. त्यांस आपल्या समाजांत अमुक एक जातीनें मोठा आणि अमुक एक जात्या नीच, असें शिक्षण मिळत नसून आपण सगळीं **माणसें** आहों, आपल्यास परस्परांशीं मनुष्यपणाचें वर्त्तन केलें पाहिजे अशी यांची समजुत होईलसें शिक्षण मिळतें. आपण आज अगदीं गरीब नादार अवस्थेंत असलों तरी प्रयत्न केल्यानें उद्यां आपल्याला ह्या देशाचें अध्यक्षत्व प्राप्त होणें संभवनीय आहे;

अशी प्रत्येक मुलाची खात्री आहे. त्याला आपल्या योग्यतेनुरूप आपल्या समाजांत उत्तम किंवा अधम पद मिळेल असें पक्कें ठाऊक आहे. कोणत्याही प्रकारच्या स्थितीस आणि पदास **जाति** हें कारण नसून, मनुष्यमात्राची **योग्यता** हेंच उत्तमत्व किंवा अधमत्व प्राप्त करून घेण्याचें मुख्य साधन आहे.

शहरांतून आणि खेड्या गांवांतून सुद्धां रस्ते, सभागृहें, वस्तीगृहें पदार्थांचे भाव, इ० सर्व जनांच्या सोईकरतां केलेले असतात. शहरांतील मोठाले रस्ते बहुतकरून गोल किंवा चौकोनी दगडांनीं नाहींतर विटांनीं फरसबंदी केलेले असून त्यांवरून लोखंडाच्या कांबींचे रस्ते करून घोडे, गाड्या स्वस्तदरानें जिकडे तिकडे जायाला सोईवार केलेल्या असतात. श्रीमंती थाटानें पांच डालर दराच्या बग्यांत बसून ह्या रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांस चांगले धक्के खावे लागतात. दोन आणे भाडें देऊन चारचार पांचपांच मैलांवर फिरणाऱ्या गरीबांस तसे धक्के खावे लागत नाहींत. हें एक इकडील बहुत लोकांच्या सोईकडे लक्ष्य देऊन केलेल्या गोष्टींचें उदाहरण आहे. मनुष्याला रस्त्यांतून जाण्यायेण्यास कांहीं अडथळा नसून मार्ग चांगला प्रशस्त असणें हें फार अवश्य आहे, म्हणून या देशांत प्रत्येक शहरांतले रस्ते चांगले मोठाले केलेले असतात. रस्त्यांत दुतर्फा चिरेबंदी वाटा असतात. त्या पायवाटांखालून किंवा रस्त्यांच्या मधोमध आंतील बाजूस नाले बांधून गांवांतील मोऱ्यांचें पाणी जाण्यास मार्ग केलेले असतात. पायवाटा असल्याकारणानें रस्त्यांच्या मधून जेथें गाड्यांचें येणेंजाणें आहे, तेथून मनुष्यांला चालण्याची जरूर नाहीं. यामुळें त्यांचें जाणेंयेणें अबाधित असतें. अर्थातच घरांतून कामावर जाण्याच्या व येण्याच्या वेळीं, फारसा वेळ मोडत नाहीं. त्याचप्रमाणें शहरांतील गटारें खुलीं नसल्यानें मोऱ्यांच्या दुर्गंधीपासून त्यांस त्रास होत नाहीं.

१ आपल्या देशांत जसे पुरुष पाहिजे तेथें रस्त्यावर बसून घाण करतात,

इकडच्या म्युनिसिपालिट्या आमच्या देशांतल्या स्वराज्यसंपन्न विचारयुक्त म्युनिसिपालिट्यांसारख्या शहाण्या आणि कर्तव्यदक्ष नाहींत, हें युनाइटेड् स्टेट्स्च्या लोकांचें महद्भाग्यच समजलें पाहिजे. कारण, आमच्या तिकडले म्युनिसिपालिट्यांचे विद्वान् व्यवस्थापक कोणी साहेब आले म्हणजे शहर शृंगारण्यांत आणि रोषनाई करण्यांत, त्याचप्रमाणें साहेब असतील तेथें एखादें सर्वगुणसंपन्न सर्वतोभद्र वन सृष्ट करण्यांत पुष्कळ पैसा खर्ची घालतात; म्हणून शहरांत स्वच्छता ठेवण्याच्या आणि सर्व साधारण लोक जेथें फार जातात येतात अशा ठिकाणीं दिवेबिवे लावण्याच्या कामीं खर्च करण्यापुरता पैसा त्यांच्या हातीं नसतो. अर्थातच साधारणप्रतीच्या मनुष्यांस स्वच्छतेचें सुख आणि आरोग्यसुख व सोई मिळाव्या तितक्या मिळत नाहींत. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें असला प्रकार घडून येण्याचा संभवच नाहीं. एथें शहरवासी लोक घरपट्टी देतात ती आपल्याच सोईकरितां देतात. ती सोय जर त्यांना मिळाली नाहीं, तर ते म्युनिसिपालिटीच्या हयगईबद्दल नुस्ता गवगवा करूनच राहत नाहींत, तर एकदां दोनदां सूचना करूनही जर व्यवस्थापकमंडळी कर्तव्यतत्पर झाली नाहीं, तर लागलीच तिची उचलबांगडी करितात. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें कोणी पाहिजे ते साहेब आले तरी त्यांच्याप्रीत्यर्थ म्युनिसिपालिटीच्या खर्चानें शहर शृंगारण्याची चाल मुळींच नाहीं.

---

तसे इकडे कोणी करीत नाहीं. सदरील अत्यंत निर्लज्जपणाचा प्रकार बंद करण्याची खटपट कोणी करीत नाहीं ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें. इतर सगळ्या सामाजिक सुधारणांप्रमाणेंच ही सुधारणा होणें फार इष्ट आहे. संभावित बायका व लहान मुलें रस्त्यांतून जात असतां असले घाणेरडे आणि निर्लज्जपणाचे प्रकार त्यांच्या दृष्टीस पडणें फार भयंकर व अपायकारक आहे. आमच्या देशांतील म्युनिसिपालिट्यांनीं अशा जागा पाहून पुष्कळ मोऱ्या बांधल्याच पाहिजेत, असा लोकांचा आग्रह पडला तर हें काम सहज होण्यासारखें आहे.

म्हणून सार्वजनिक रस्त्यांवर दिवे लावण्याकरितां व मोऱ्या वगैरे साफ करण्याकरितां दिलेले पैसे, साहेबांच्या सन्मानार्थ कमानी बांधण्यांत आणि निशाणें उभारण्यांत व्यर्थ खर्चून जात नाहींत. म्युनिसिपालिट्यांना लागून एक आरोग्यरक्षक मंडळी असते, ती कोणी सांगितल्यावांचूनच चोहोंकडे जाऊन शहराच्या आरोग्याची देखरेख करिते. बाजारांत विक्रीस ठेविलेले भाजीपाले, मांसें, दूध, लोणी इत्यादि पदार्थ नीरोग आणि खाण्याजोगे आहेत कीं नाहींत हें तपासून पाहण्याकडे त्यांचें विशेष लक्ष असतें. त्याचप्रमाणें शहराच्या ज्या भागांत कोणाला कांहीं विशेष रोग उद्भवला असेल त्यांतील मोऱ्या विऱ्या साफ आहेत किंवा नाहींत, व ते रोग उद्भवण्याचीं कारणें यांचा शोध करून, तीं नाहींशीं होतील असा प्रयत्न करण्याची फार काळजी घेतात. शहरांमधून ठिकठिकाणीं सार्वजनिक उद्यानें आणि हवा खाण्याच्या जागा केलेल्या असतात. हीं उद्यानें म्हणजे अमुक एका विशेष वर्गाच्या घराभोंवतालींच असलीं पाहिजेत असें नाहीं. जेथें जाणें सर्व लोकांना सोईचें पडेल, अशा ठिकाणीं तीं केलेलीं असतात. श्रीमंत लोक आपल्याला पाहिजे तर स्वतःचा पैसा खर्च करून पाहिजे तसे घरगुती बगीचे किंवा दुसरीं सुखाचीं साधनें करून घेवोत; परंतु म्युनिसिपालिट्या गरीब लोकांचा पैसा खर्च करून श्रीमंतांच्या घराभोंवतीं शोभा आणून सर्व साधारण लोकांची गैरसोय करणार नाहींत. कोणत्याही प्रकारची माहिती मिळविण्यास फार श्रम किंवा खर्च करावा लागत नाहीं. शहरांमध्यें आणि गांवांतून पोलिसाचा बंदोबस्त फार चांगला असतो. आमच्या देशांतील पोलिसाप्रमाणें घरांत चोरी किंवा रस्त्यांत मारामारी होऊन अपराध्याला पळून जाण्याचा अवकाश दिल्यानंतर हळूच गडबड झालेल्या ठिकाणीं येऊन शेंदाडशिपायगिरी करण्याची विद्या युनाइटेड् स्टेट्स्च्या पोलीस शिपायांस अ-

जून साधली नाहीं. कोणा अनोळखी मनुष्याला शहराच्या रस्त्यांची माहिती वगैरे विचारणें झाल्यास ती पोलीसच्या शिपायास विचारली म्हणजे तो मोठ्या अदबीनें सांगतो. दर चौकांत चवाठ्यावर व फार गर्दीच्या रस्त्यावर, गल्ल्या कुच्यांतून, आणि रस्त्यांच्या वळणांवरून पोलीसचे शिपाई एकमेकांपासून थोडथोड्या अंतरावर पाहारा देत उभे राहिलेले असतात. सार्वजनिक घोडे गाड्या चालविणारे, आगगाड्यांचे चालक, तिकिटे गोळा करणारे वगैरे लोक, उतारू लोकांशीं फार अदबीनें वागतात. (आगगाड्यांच्या व्यवस्थेविषयीं मला आणखी कांहीं बोलावयाचें आहे, तें पुढें आगगाड्यांची माहिती देतांना बोलेन.) शहरांतल्या जितक्या व्यवस्था आहेत, त्यांच्यामध्यें नळाच्या पाण्याची व्यवस्था फारच महत्त्वाची आणि उत्तम असते. शहरापासून थोड्या अंतरावर किंवा शहराजवळच दररोज उपयोगास लागणाऱ्या पाण्याचा सांठा केलेला असतो. इकडे गोडें पाणी विपुल आहे म्हणून कधीं पाण्याचा दुष्काळ पडत नाहीं. जेथें पाणी सांठवून ठेवतात, त्याला "वाटर रिझर्वोयर" म्हणतात. त्यांतून वाफेच्या यंत्राच्या जोरानें पाणी शहरांतल्या नळांत जातें. दिवसाच्या किंवा रात्रीच्या कोणत्याही भागांत नळांतून पाणी येण्याचें बंद होत नाहीं. शहरांतून ठिकठिकाणीं जनावरांस आणि जाणाऱ्या येणाऱ्या मनुष्यांस पाणी प्यावयास मिळावें म्हणून हौद आणि नळ बांधलेले असतात. कोठें घरांला किंवा वखारींना आग लागल्यास ती विझविण्याला पाणी जवळ असावें म्हणून, थोडथोड्या अंतरावर रस्त्यांच्या कोंपऱ्यांवरून पाण्याचे बंब बांधून ठेवलेले असतात. घरास आग लागली म्हणजे ती विझविण्याच्या ज्या सोई आहेत, त्या फार उत्तम व लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. थोडथोड्या अंतरावर "फायरस्टेशन्स्" म्हणजे आगीचीं ठाणीं बांधलेलीं असतात त्यांमधून आगी विझविण्याच्या कामांत फार कुशल आणि मोठ्या धाडसाचे

लोक त्याच कामाकरितां ठेविलेले असतात. त्यांना पगार मोठमोठाले असतात. आमचें सरकार जसें लढाई नांवाच्या वधस्थानीं मनुष्यांचे प्राण बळी द्यावयास आपल्या ऐपतीच्या बाहेर पैसा खर्च करून जंगी सैन्य ठेवीत असतें, त्याचप्रमाणें युनाइटेड् स्टेट्स्‌चें स्थानिक सरकार लोकांचे प्राण वांचविण्याकरितां हें अग्नीशीं लढणारें सैन्य तयार करून ठेवीत असतें. त्यांची कवाईत, काम करण्याची चपळाई आणि व्यवस्थेशीरपणा हीं फार आश्चर्यकारक आणि उत्तम असतात. त्यांच्या घोड्यांनासुद्धां आपलें काम उतम रीतीनें करितां यावें असें शिकविण्यांत येतें. आग विझविण्याच्या कामीं लागणाऱ्या शिड्या, रबराचे बंब, खोरीं, कुदळी, कुऱ्हाडी आणि बंबांतून पाणी वर चढविण्याकरितां अवश्य लागणारें वाफेचें यंत्र इत्यादि पदार्थ उचलून नेण्यास घोडे हवे लागतात. त्या घोड्यांचें सामान अशा कांहीं व्यवस्थेनें जागच्या जागीं तयार करून ठेविलेलें असतें कीं, तें घोड्यांवर घालण्यास अगदीं उशीर लागत नाहीं इतकेंच नव्हे तर इकडे इशारतीच्या घांटेचे ठोके ऐकिल्याबरोबर स्वतः घोडेच त्या सामानापाशीं जाऊन, तें हलवून आपल्या पाठीवर उतरून घेतात; इतके ते शिकलेले असतात. त्यांची बुद्धि पाहिली म्हणजे मनाला मोठाच चमत्कार वाटतो. गांवांतील निरनिराळ्या ठिकाणीं थोड थोड्या अंतरावर आगीच्या ठाण्यांस इशारत देण्याकरितां यंत्रांच्या मुठी लावून ठेविलेल्या असतात. त्यांना तारा जोडून विजेच्या योगानें तारायंत्रासारखी उपयोगिता त्यांच्यांत आणलेली असते. त्या कोठें आहेत, हें प्रत्येक घराच्या मालकास माहीत असतें. ठिकठिकाणीं कोनाड्यांत किंवा पेटींत लावून ठेविलेल्या छापील नियमांप्रमाणें ती मूठ फिरवावी किंवा दाबावी म्हणजे तिला लागून असलेल्या तारेच्या हालण्यानें जवळील आगीच्या ठाण्यांत घांट वाजते. त्या घांटेच्या ठोक्यांच्या संख्येवरून जेथें आग लागली असेल, तें घर कोणत्या मोहल्यांत व कोणत्या

रस्त्यावर आहे हें कळून येतें. मग त्या रस्त्यास नजीक असलेल्या टाण्यावरचे लोक पांच सेकंदांच्या आंत सर्व तयारी करुन, आगीशीं युद्ध करण्यास लागणाऱ्या शस्त्रास्त्रांनीं आणि कवचांनीं सज्ज होऊन मोठ्या वेगानें संकटांत पडलेल्या मनुष्यांचें साहाय्य करावयास जातात. ज्या घरास आग लागलेली असते तें घर किती उंच असलें आणि आग किती भयंकर असली तरी त्यांनाः वर चढून आग विझविण्याचें काम करण्यास भय किंवा आळस मुळींच वाटत नाहीं.

इकडचे लोक कोणी संकटांत पडले असतां त्याच्या साहाय्यास जाण्यास आळस करीत नाहींत. रस्त्यांत गाड्या विड्या अडल्या असल्या तर चांगले उंची पोशाक घातलेले पुरुष देखील चिखलांत किंवा गटारांत जाऊन गाडी बाहेर काढण्यास साहाय्य करतील. आमच्या देशांतील संभावित गृहस्थ असल्या प्रसंगीं हें काम आपल्या जातीस आणि पदास योग्य नाहीं असा विचार करून शांतपणें पुढें निघून जातील.

कोणत्याही देशांतील लोकस्थितीचें खरें स्वरूप पाहाणें असल्यास मुंबई कलकत्त्यासारख्या मोटाल्या शहरांतून तिचा मासला न घेतां खेड्या गांवांतून लोकांची अवस्था कशी आहे हें पाहाणें उचित आहे. मला इकडे आल्यापासून शहरांत राहूनच पुष्कळ काळ घालवावा लागला, परंतु खेड्या गांवांची माहिती मिळवून घेण्यासही बरीच संधि सांपडली. पेन्‌सिल्वेनिया, न्यूयार्क, न्यूजर्सी, कनेटिकट व मासचूसेट्‌स् हीं संस्थानें जुन्या, आणि इलिनोइस, आयोवा, निब्रास्का, कॉलराडो व क्यालिफोर्निया हीं संस्थानें नव्या तऱ्हेच्या लोकस्थितीचीं दर्शक आहेत, असें म्हटल्यास चिंता नाहीं.

लहान गांवांतून आणि खेड्यापाड्यांमधून बहुतेक सर्व कुटुंबें आपापल्या घरांतून राहतात, आणि तीं घरें जीवर बांधलेलीं आहेत ती जागाही त्यांचीच असते. जमीनदार आणि कूळ व त्यांचा परस्परांशीं असणारा संबंध हे जरी ह्या

देशांत अगदीं नाहींसे नाहींत, तरी ते फारच विरळा. एखादा मनुष्य पुष्कळ जमीनीचा मालक किंवा मोटा धनिक असल्यानेंच समाजांत त्याला थोरवी मिळत नाहीं, तो हजारांसारखा एक अमेरिकन; एवढीच कायती त्याची प्रतिष्ठा. स्थावर किंवा जंगम मालाच्या देण्याघेण्यांविषयींचे कायदे फारच सोपे आणि सोईवार आहेत. ह्यास्तव प्रत्येक घराचा किंवा जमीनीचा मालक जरी आपल्या मालाचा स्वतंत्र धनी आहे तरी तो जाहागिरदार किंवा जमीनदार म्हणविला जात नाहीं. कारण, इंग्लंड, स्काट्लंड वगैरे जुन्या देशांतून जमीनदारांवर सदोदित अवलंबून असणारा जसा कुळांचा एक निराळाच वर्ग आहे, तसा तो ह्या देशांत कोठें नाहीं. मोठ्या विस्तृत जमीनीचा धनी देखील स्वतः शेतकी करतो. त्याचे मुलगे नाहीं तर मोलकरी त्याला काम करूं लागतात. लहान लहान शेतांचे मालक आपल्या शेतांत आणि घरांत काम करून, उरलेल्या वेळांत दुसऱ्या मोठ्या शेताच्या मालकाला काम करूं लागून चार पैसे मिळवितात. अशानें म्हणजे मोलकरी त्या श्रीमंत शेतकऱ्यापेक्षां योग्यतेनें कमी ठरतो असें नाहीं. म्हणूनच संभावित गरीब गृहस्थांना मोलानें पाहिजे तें काम करून पैसा मिळविण्यास ओशाळगत वाटत नाहीं.

घरांतून ह्या गृहस्थांच्या बायका आणि मुलीच सगळें काम करतात. शेत कापणीच्या दिवसांतून कामाची गर्दी असते तेव्हां एखाददुसरी मोलकरीण दोनएक महिने काम करूं लागते. त्यांना आमच्या देशांत अतिनिकृष्ट अशा मानलेल्या भंग्याच्या कामापासून तों सगळ्यांत श्रेष्ठ अशा शिक्षकाच्या आणि उपदेशकाच्या कामापर्यंत ज्या ज्या वेळीं जीं जीं कृत्यें करावीं लागतील, तीं यथास्थित करण्याची मोकळीक असून अमुक एक काम केल्यानें कोणाची मर्यादा कमी होते असें वाटत नाहीं. मात्र तें काम कोणाच्या अब्रूला धक्का न लावणारें असें असलें पाहिजे.

अशी सर्वत्र सर्व प्रकारचीं कामें करण्याची चाल आहे, तरी इकडचे गांवकरी गांवढेकरांसारखे गंवार असलेले दिसून येत नाहींत. दरिद्री आणि भिकाऱ्यासारखे दिसणारे फाटकीं वस्त्रें नेसलेले असे लोक फार विरळा. गांवांत कोणी मोठे डौलदार पोशाक करून मिरवत प्रतिष्ठा दाखवीन म्हणेल, तर त्याकडे कोणी फारसें लक्ष्य देत नाहींत. एकादा मनुष्य कामाच्या वेळीं साधारण मळकट पोशाक घालून वाटेनें चालत असल्यास, कोणी नवखा तो गरीब म्हणून दया येऊन त्याला अधेली रुपया द्यायास काढील, तर ही मोठी बेअदबी आहे असें समजतात.

लहान गांवांतून फारसे गुन्हे, आणि दारू पिणें, तमाखू ओढणें ह्यावांचून इतर दुर्व्यसनें असलेलीं दिसून येत नाहींत. चोरीचें भय फारच कमी. कधीं कधीं लोक घरांच्या दारांस आंतून कड्या कोंयडे लावल्यावांचूनच निजतात आणि बाहेर जातांना कुलूपही लावीत नाहींत. एक हजार मनुष्यांची जेथें वस्ती आहे, अशा लहानशा गांवांत बहुतकरून एक भिकारी घर किंवा छत्र असतें. तेथें फार झाल्यास पांचसहा म्हातारीं कोतारीं किंवा कांहीं रोगामुळें काम करण्यास अशक्त अशीं अनाथ मनुष्यें, त्या गांवांतील रहिवाशांच्या खर्चानें पोसलीं जातात. गांवकऱ्यांमध्यें जशी सर्वप्रकारचें काम करण्याची चाल आहे तशीच त्यांस विद्याव्यासंगाची फार चाड असलेली दिसून येते. हजार मनुष्यें जेथें राहतात अशा गांवांत बहुतकरून एक सार्वजनिक पुस्तकालय असतें तेथें हलकींसलकीं पुस्तकें नसून, हक्सलेसारख्या महाविद्वानांनीं रचलेले, शास्त्रीय, ऐतिहासिक, कायद्यांचे, धर्मनीतिविषयक ग्रंथ, काव्यें (गद्यपद्यमय) शिल्प, चित्रकला, गायन, वैद्यक, उत्तम कादंबऱ्या, यूरोपांतील व ह्या देशांतील प्रसिद्ध-आणि लोकप्रिय दोनचार मासिक पुस्तकें, साप्ताहिक आणि रोज निघणारीं वर्तमानपत्रें वगैरे सर्वांस वाचायाला मिळण्याची सोय असते. अशा गांवांत निदान एक तरी वरिष्ठ शाळा आणि लहान

मुलांकरितां पांचसहा प्राथमिक शिक्षणाच्या शाळा असतात; ज्यांस लिहितां वाचतां येत नाहीं असे मनुष्य फारच विरळा. सकाळीं आपण ज्या मनुष्याला अंगांत मळके कपडे घालून खांद्यावर आउतें घेऊन शेत नांगरायाला, खत घालायाला किंवा लांकडें फोडायाला जातांना पाहिलें, तोच संध्याकाळीं स्वच्छ कपडे नेसून आपल्या घरांत सुखानें शेगडी तापत, बायकोशीं आणि मुलांशीं आनंदानें गोष्टी सांगत बसलेला आहे; किंवा "सेंचुरी" "अट्लांटिक् मंथ्ली" नाहीं तर "नॉर्थ अमेरिकन रिव्यू" सारखें मासिकपुस्तक, किंवा दुसरें एखादें पुस्तक वाचीत बसलेला आहे; असें आपल्या पाहाण्यांत येईल. त्याच्या घरांत बसण्याच्या खोलीमध्यें एक वाद्ययंत्र आहे; मेजावर एकदोन वर्तमानपत्रें, आणि पोथ्या ठेवण्याच्या फळीवर मिल्टन, टेनिसन्, लॉंगफेलो, गिबन्, मेकाले आणि इतर प्रसिद्ध विद्वानांचे व कवींचे ग्रंथ ठेवलेले आहेत, ते नुस्ते शोभेकरितां नव्हे, तर त्या कुटुंबांत त्यांचा चांगला व्यासंग होत असतो. भिंतींवर निदान पांचसहा तरी चित्रें टांगलेलीं आहेत. कुटुंबांतील माणसांस आपल्या व दुसऱ्या देशांत काय काय गोष्टी घडत आहेत, ह्याचीही बरीच माहिती आहे. त्याची घरधनीण व मुली सकाळीं स्वैंपाक, धुणें, भांडीं घांसणें वगैरे घरचें काम करीत होत्या हें आपण पाहिलें आहे. दुपारून किंवा संध्याकाळीं जेवण आटपल्यावर त्यांपैकीं एक मोजे विणीत किंवा कशीदा काढीत आहे, कोणी मधुर वाद्य वाजवीत आहे, नाहीं तर चीनी मातीच्या पेल्यांवर किंवा पटांवर सुंदर पुष्पांचीं वगैरे चित्रें काढीत आहे, कोणी लाटिन् व्याकरणाचें पुस्तक घेऊन (एकाद्या मोठ्या विद्यालयांत प्रवेशपरीक्षा देऊन तेथें अध्ययन करण्याच्या उद्देशानें) रोजचे धडे शिकत आहे, असें आपल्या पाहाण्यांत येईल. नित्य सकाळीं आणि संध्याकाळीं, घरधनी किंवा घरधनीण धर्मग्रंथाचे एकदोन अध्याय वाचून देवाची प्रार्थना करतात; आणि आई आपल्या लहानग्या मुलांस धर्मग्रंथांतील किंवा इतिहासांतील

आणि इतर पुस्तकांतील गोष्टी वाचून त्यांचें मनोरंजन करते. आपल्या शूर-पूर्वजांनीं किती दुःखें भोगून कष्ट साहून आपल्याला हें स्वतंत्र राष्ट्र मिळवून दिलें, आणि त्यांचे पराक्रम केवढे होते; अमुक एक लिंकन लहान असतांना किती गरीब होता परंतु तो उद्योगाच्या आणि उत्तम स्वभावाच्या योगानें कसा ह्या देशाचा अध्यक्ष झाला; इत्यादि ऐतिहासिक गोष्टी आईच्या तोंडून ऐकून लहान मुलांच्या हृदयांत देशभक्ति, महत्त्व प्राप्त करून घेण्याची इच्छा, आणि आपण उद्योग केल्यास वाशिंग्तन, लिंकन, गार्फील्ड ह्यांसारखें आपल्यासही यश आणि उत्तमत्व मिळेल, अशी आशा अंकुरित होते. मुलींना ह्मणजे निराश व्हावें लागतें असें नाहीं. त्याही उत्तम व प्रसिद्ध स्त्रियांचीं चरित्रें ऐकून आपल्याला कधींना कधीं त्यांच्यासारखें होतां येईल अशी आशा धरितात. वेळ मिळेल तेव्हां आपली आई विद्याव्यासंगाच्या उद्देशानें किंवा परोपकारार्थ किंवा धर्मप्रसारार्थ स्थापिलेल्या एखाद्या सभेस जायाला निघाली, ह्मणजे तिच्याबरोबर जाऊन तेथें कायकाय चाललें आहे हें पाहातात, त्यामुळें त्यांस विद्याभिरुचि व परोपकारेच्छा उत्पन्न होते. त्यांस आमच्या तिकडच्याप्रमाणें सामाजिक बालविवाह रीतीच्या जुलमामुळें होणारा मातृवियोग आणि सासुरवास भोगावा लागत नाहीं. आपण बायको माणूस ह्मणून आपल्याच्यानें कांहीं होणार नाहीं, आपल्याला पराधीनतेंत सारा जन्म घालविला पाहिजे; स्वातंत्र्यसुख आपल्या कपाळीं नाहीं; उद्यां आपला नवरा मेला तर लोकें आपल्याला बाळविधवा ह्मणून आपला अपमान करतील, गांजतील, उपास घालतील आणि आपल्याला इच्छेविरुद्ध काबाडकष्ट करायाला लावतील, शिव्या शाप देतील, न्हाव्याकडून आपले केंस काढवून टाकतील किंवा आपण निराश्रित ह्मणून आपला तिरस्कार करतील; इहपरलोकीं आपला वाली कोणी नाहीं; अशी निराशेची आणि दुःखाची ज्वाला अमेरिकन मुलीच्या हृदयांतील आशांकुराला जाळून टाकीत नाहीं! ती बा-

**यको** किंवा पराधीन **मुलगी** आहे, असें ह्मणून तिचा कोणी पाणउतारा करीत नाहीं. ती आपल्या भावाप्रमाणेंच आईबापांच्या लाडास आणि प्रीतीस पात्र असते. तिला आपल्या भावाप्रमाणेंच विद्या, कला, आणि शिल्पें शिकण्याच्या सोई आहेत. आणि कधींनाकधीं तरी ती आपली मालकीण, आपल्या घराची धनीण, आणि आपल्यावर अवलंबून राहाणारी स्वतंत्र अमेरिकन जानपद होऊं शकेल, अशी आशा तिला असते. ऱ्हें आनंदकारक अमेरिकन कुटुंबाचें वर्णन करतां मीं त्या देशांत जीं पुष्कळ कुटुंबें पाहिलीं, तीं माझ्या डोळ्यांपुढें मूर्तिमान उभीं आहेत. उदाहरणार्थ त्यांपैकीं एका कुटुंबाची गोष्ट सांगितल्यास पुरे आहे.

न्यूयार्क संस्थानांत गिल्बर्टविल् नांवाचें एक लहानसें गांव आहे. एक वर्षापूर्वीं मी त्या गांवांत गेलें होतें. १८८७ च्या मे महिन्यांत कोर्नेल युनिवर्सिटींतील पुष्कळ विद्यार्थिवर्गाची माझी ओळख झाली; त्यांपैकीं एका विद्यार्थ्यानें मला, आपल्या गांवांत येऊन तेथें भाषण करा, म्हणून आमंत्रण केलें. सुट्टीच्या वेळीं त्यानें घरीं जाऊन सर्व तयारी केल्यावर त्याच्या आईनें मला आमंत्रणपत्र पाठविलें. मी गिल्बर्टविल् येथें जाऊन पोहोंचल्यावरोबर जोर्ज ( हें त्या मुलाचें नांव ) आपली गाडी घेऊन आगगाडीपाशीं येऊन, मला आपल्या घरीं घेऊन गेला. त्याचें घर गांवापासून सुमारें अर्ध कोसावर होतें. जोर्जाची आई आणि बहिण ह्या पुढच्या दारावर उभ्या होत्या. त्या आम्हीं तेथें पोहोंचल्यावर गाडीजवळ येऊन मोठ्या आदरानें माझें स्वागत करून, मला घरांत घेऊन गेल्या. इकडे जोर्ज घोड्यांना घेऊन जवळच शेतावर चरायाला सोडून आला. संध्याकाळीं त्याचा बाप आणि भाऊ शेतावरून काम करून घरीं आले; त्यांचे कपडे अगदीं मळीण होते. त्याची आई स्वैपाक करूं लागली, आणि बहिण मेजावर ताटें, वाट्या, चमचे वगैरे मांडून जेवणाची तयारी करूं लागली. मग सर्व सिद्धता झा-

त्यावर कुटुंबांतील सगळीं माणसें हात तोंड धुऊन स्वच्छ कपडे नेसून मेजाभोंवतीं खुर्च्यांवर बसून जेवलीं. इकडच्या लोकांस पुरुषांनीं आधीं आणि बायकांनीं मागून जेवण्याची चाल माहीत नाहीं! घरधनी, घरधनीण आणि मुलें सगळीं एकाच वेळीं जेवतात. मुलगी, मुलगा किंवा दुसरें कोणीतरी उठून मध्यें लागणारे पदार्थ आईच्या हाताशीं आणून देतें. जेवणखाण व घरांतील काम संपल्यावर कुटुंबांतील सगळीं माणसें बसण्याच्या खोलींत आलीं. आई लिहिण्याच्या मेजापाशीं जाऊन पत्रें लिहीत बसली. बाप आणि भाऊ मुलगी वाद्य वाजवीत होती तिच्या मागें उभे राहून तिच्या मधुर स्वराशीं सूर मिळवून गाणें गाऊं लागले. मग कांहीं वेळानें आम्हीं चार इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगत मोठ्या आनंदानें काळ घालविला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं घरधनी, जोर्ज आणि त्याचा भाऊ मळ्यांत जाऊन काम करूं लागले. जोर्जाची आई आणि बहिण गृहकृत्यांत निमग्न झाल्या. जेवणानंतर दोन वाजतां आमची सभा भरायाची होती. जोर्जाची आई ह्या सभेच्या अध्यक्षस्थानीं बसावयाची होती. ती येथील धर्मप्रसारार्थ व परोपकारार्थ स्थापन झालेल्या मंडळीची अध्यक्ष आहे. तेथें तिनें चांगलें भाषण करून सभेचें काम उत्तम रीतीनें चालविलें. घरीं तिला स्वैंपाक करतांना पाहणारास तिणें जन्मांत कधीं स्वैंपाकावांचून दुसरें कांहीं काम केलें नसावें, असें वाटलें असतें. सभेंत ती उत्तम शिक्षण पावलेली असून शिष्टाचार आणि लोकरीति तिला विदित आहेत, असें दिसून आलें. तिचा नवरा शेत नांगरतो, गुरें चारतो, गाड्या जुंपतो, खत घालतो, लांकडें फोडतो, गवत कापतो, व मळ्याची देखरेख करतो. शेतांत काम करीत असतांना त्याला ह्याच कामाची उत्तम माहिती असून दुसऱ्या कोणत्याही विषयांत त्याची गति नसेल असें वाटणार. परंतु दुपारून घरीं आल्यावर तोच शेतकरी तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगतो, ग्रीक शब्दांचीं उच्चा-

रणें, लाटिन् व्याकरणाशीं ग्रीक व्याकरणाचा निकट संबंध, आर्नोल्ड्कृत "लाइट् आफ् एशिया" काव्यांत आणि ख्रिस्तचरित्रांत किती साम्य आहे, थियासफी व तिच्या प्रसारकांविषयीं माझें काय मत, इंग्रजी आणि एतद्देशीय राज्यशासनपद्धतींत काय भेद आहे, इत्यादि गोष्टींचा ऊहापोह करीत आहे. मुलगा घरीं असताना पक्का शेतकरी; पण तीन सुट्टीचे दिवस संपल्यावर विश्वविद्यालयांत शिकायास जाणार आणि चवथ्या वर्षाच्या शेवटीं परीक्षा देऊन, पुढें एक तर धर्मोपदेशक नाहीं तर व्यापारी होणार. दुसरा एक मुलगा विद्याभ्यास संपवून, न्यूयार्क शहरांत एका महत्वाच्या कामावर आहे. तिसरा मुलगा घरींच राहून शेतकी करणार. एक मुलगी विद्याध्ययन संपवून आपल्या पसंतीच्या मनुष्याशीं लग्न करून, स्वतंत्रपणें आपला संसार चालवीत आहे. "माझी धाकटी मुलगी भावाबरोबर कोर्नेल युनिवर्सिटींत जाऊन शिकेल, तर बरें होईल. माझा जोर्जा कांहीं दिवस काम करून खर्चापुरता पैसा मिळवून, पुनः युनिवर्सिटींत जाऊन विद्याभ्यास करील. माझ्या मुलीनेंही तसेंच करावें अशी मला मोठी हौस आहे. तिला जोर्जाबरोबर तेथें जाऊन पढण्याची मोठी उत्सुकता आहे." हें बोलतांना त्या प्रेमळ आईला आपल्या दोन्ही मुलांबद्दल केवढा अभिमान वाटला असेल! आणि अहाहा, तिणें आपली मुलगी ही मुलासारखीच विश्वविद्यालयांत शिकायाला जावी म्हटलेलें ऐकत असतां मला केवढा आनंद वाटला म्हणून सांगूं! आमच्या देशांतील मुलांचीं आईबापें असें केव्हां म्हणूं लागतील? मुलापेक्षां मुलीची योग्यता किंवा सामर्थ्य कमी आहे हा त्यांचा वाईट समज केव्हां नाहींसा होईल!

तिसऱ्या दिवशीं जोर्जाला विद्यालयांत जाण्याची वेळ आली. आईनें त्याला पुष्कळ फळें, मोदक वगैरेची शिधोरी बांधून दिली. बहिण भावाबरोबर गाडींत बसून त्याला आगगाडीपर्यंत पोहोंचवायाला आली. वाटेंत

जातांना बहिणभावंडें आनंदानें गाऊं लागलीं. त्या निष्कलंक, शुद्ध आनंद-गीतें गात, जंगलांतून आगगाडीकडे जात असलेल्या सुखी बहिणभावंडांस पाहून आमच्या देशांतील प्राचीन काळच्या ऋषिबालकांची गोष्ट माझ्या मनांत आली. तीं दोघें किती सुखी, किती आनंदी होतीं म्हणून सांगूं! दोघांसही आपल्या जन्माचें सार्थक होईल अशी आशा, दोघांसही सारखे हक्क, सारखी योग्यता असून, उन्नतीचे सगळे रस्ते मोकळे आहेत. त्यांपैकीं एक जातीनें मुलगी म्हणून तिला अस्वातंत्र्यापासून उद्भवणारी निराशा स्वप्नींही ठाऊक नाहीं. दुसरा पुरुष म्हणून उद्धटपणानें वागून, बोलानें किंवा कृतीनें आपल्या बहिणीचा पाणउतारा करीत नाहीं. दोघेंही उद्योगी आणि महत्त्व इच्छिणारीं आहेत. दोघांसही समान स्वातंत्र्य असल्यामुळें, कष्ट किंवा दीर्घ उद्योग करून कां होईना, पण सरस्वतीची आणि लक्ष्मीची कृपा संपादून घेतां येईल. ज्या राष्ट्रांत असें स्त्रीपुरुषांचें व सर्व मनुष्यजातीचें साम्य आहे व ज्यांत सर्व लोक आपल्या जिण्याचे, धनाचे, स्वातंत्र्याचे आणि विवेकबुद्धीचे मालक आहेत, तें राष्ट्र उन्नत, आणि त्यांतील रहिवासी सुखी असावे ह्यांत मोठेसें नवल नाहीं. सगळींच अमेरिकन कुटुंबें सदरीं सांगितलेल्या कुटुंबासारखीं असतात असें नाहीं. "गांव आहे तेथें म्हारवाडा आहे," ही म्हण अमेरिकेसही लागू आहे. अमेरिकन खेड्यांतूनही उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ प्रकारची मंडळी आहे. कोणी हलक्या ऐषआरामांत निमग्न असून वृथा जल्पना करणारे, कोणी गंभीर स्वभावाचे उद्योगी व आत्मसंयमी, कोणी समाजाचे चालक, कोणी गतानुगतिक, कोणी अहंकारी, कोणी निरभिमानी, कोणी शुंठमूर्ख, कोणी चाणक्ष, किंवा कपटी, असे सगळे प्रकार अमेरिकन समाजांत असलेले पाहाण्यांत येतात. तरी एकंदरींत अमेरिकन समाज स्वतंत्र असून

केवल स्वातंत्र्याच्या योगानेंच जी उन्नति लोकसमाजांत असणें संभवतें, तिचीं चिन्हें त्यांत सर्वत्र असलेलीं दिसून येतात.

समुद्राच्या किंवा नदीच्या प्रत्येक बिंदूच्या अंगीं जसे समुद्रांत किंवा नदींत असणारे सर्व गुण विद्यमान असतात, तसेच युनाइटेड् स्टेट्स्सारखें स्वतंत्र राष्ट्र उत्पन्न करणारे सर्व गुण प्रत्येक अमेरिकन गांवांत, आणि मंडळींत विद्यमान आहेत. जी उत्तम राज्यव्यवस्था ह्या राष्ट्राच्या उन्नतीस कारणीभूत झाली आहे, ती ह्यांच्या गांवांतून व समाजांत विद्यमान असलेल्या **आत्मशासनाचें**[1] फळ आहे. अमेरिकन जानपदाला आत्मशासनाची आणि राज्यव्यवस्थेची रीत जशी काय बाळगुटीबरोबरच पाजलेली असावी, असें दिसून येतें. लहानशा गांवांतून किंवा मोठ्या शहरांतून पाहिजे तेथें जा, ह्यांची एकी व व्यवस्थेशीर काम करण्याची रीत आपल्या पाहण्यांत येईल. अमुक एक काम करावयाचें असें कोणाच्या मनांत आलें कीं, आपल्या माहितीच्या चारचौघांस बोलावून आपला उद्देश कळवावयाचा, आणि बहुमतानें जें योग्य टरेल तें करावयाचें. मग तें काम कितीका लहान असेना, तें करायाला एक मंडळी पाहिजे; आणि ती मंडळी कितीका लहान असेना, तिची व्यवस्था ठेवण्याला निदान तीन तरी अधिकारी असले पाहिजेत; ते अध्यक्ष, चिटणीस आणि खजीनदार हे होत. दोन तीन मनुष्यें मिळून सुद्धां अशा प्रकारची मंडळी होते; आणि ह्या मंडळीचें काम कोणत्या रीतीनें करावयाचें तें एका नियमावलींत प्रतिपादिलेलें असतें. ह्याप्रमाणें बहुतेक सर्व महत्त्वाचीं कामें करण्यास मंडळ्या, मंडळ्यांस आपापल्या कामीं योग्य रीतीनें तत्पर ठेवण्यास नियम, ते नियम करण्यांत मंडळींतील सर्व मनुष्यांचें मत विचारणें, आणि ते नियम एकदांचे बहुमतानें

---

१. आत्मशासन=आपणावर आपली सत्ता ठेवून लोकांचे हक्कांस जेणेंकरून धक्का लागणार नाहीं, अशा प्रकारचें विचारपूर्वक आचरण.

स्वीकारल्यावर त्यांस अनुसरून चालणें, हीं जीं आत्मशासनाचीं मुख्य बीजें तीं येथें बहुतेक सर्वत्र असून त्याच बीजांस अंकुर येऊन स्थानिक राज्यरूपी रोप उपजलें; त्या रोपास सुभ्यांच्या राज्यव्यवस्थारूपी पुष्कळ फांद्या फुटल्या; त्यांस संस्थानव्यवस्थेच्या रूपानें उत्तम फुलें आलीं, आणि त्याच फुलांपासून युनाइटेड् स्टेट्स्ची राष्ट्रीय शासनपद्धति हें दिव्य फळ उत्पन्न झालें आहे. मुलांस कुटुंबांतून आणि शाळांमधून ह्या प्रकारच्या आत्मशासनाचें शिक्षण मिळतें. घरांत त्यांचीं आईबापें नेमल्या रीतीनें सर्व कामें करतात. शाळांतून मुलांस खेळाच्या वेळीं कोणता खेळ खेळावयाचा, तो बहुमतानें ठरविण्याची आणि व्यवस्थेशीर रीतीनें वागण्याची संवय लावण्यांत येते. होईल तसें करून शक्त्यनुसार आपल्यास लागणारें सर्व काम आपण करून घ्यावें, आणि लहानसहान गोष्टीकरतां लोकांस भीड घालूं नये व लोकांची मदत मागूं नये, असा समज मुलांच्या मनांत पक्केपणीं बिंबवून देण्याचा प्रयत्न करतात.

युनाइटेड् स्टेट्स्ची राज्यव्यवस्था अशा प्रकारची आहे कीं, वाशिंग्तन् शहरांतील वरिष्ठ सरकार संस्थानिक सरकाराच्यानें करवेल अशा कामांत मुळींच हात घालीत नाहीं. आणि सुभ्याच्या हातून होण्याजोग्या कामांत संस्थानचें सरकार मदत देत नाहीं. आणि जें काम स्थानिक व्यवस्थेच्या योगानें पार पडण्यासारखें आहे त्यांत सुभा हात घालून चिवडाचिवड करीत नाहीं. ही उत्तम व्यवस्था अमेरिकन लोकांस आत्मशासनांत तरबेत करते. आणि ह्यामुळें ते लोक स्वावलंबी झाले आहेत. ह्या स्वावलंबनाचें बीज प्रत्येक कुटुंबांत असलें पाहिजे, आणि तें तेथें असेल तरच सहस्रावधि लक्षावधि कुटुंबें मिळून झालेल्या राष्ट्राच्या अंगीं स्वावलंबनासारखा उत्तम गुण असणार. अमेरिकन कुटुंबव्यवस्था राष्ट्रव्यवस्थेसारखीच आहे. बायकोच्यानें करवेल अशा कामांत नवरा आपलें घोडें पुढें घालीत

नाहीं. आणि मुलांच्या हातून होण्याजोगें काम आईबापें आपण पुढें होऊन करीत नाहींत.

ह्यांच्या स्वदेशभक्तींत आणि देशाभिमानांत अहंपणाचें बरेंच मिश्रण आहे. इंग्रजी लोक आपल्यास सर्व जातींत श्रेष्ठ असें म्हणत असतात. अमेरिकनांचे पूर्वज इंग्रजी जातीचेच असल्याकारणानें ह्यांच्या अंगीं इंग्रजी पूर्वजांचा अहंपणा असावा हें ठीकच आहे; परंतु हा देश नवा, आणि नव्या जमिनीवर सर्व कांहीं लवकर वाढतें, ह्या नियमाप्रमाणें यांच्या आंगचा अहंकार ह्या पिकाऊ जमिनींत रुझल्यापासून फारच वाढत गेला आहे; आणि हे लोक " बापसें बेटा सवाई " झाले आहेत. आपल्या देशांतील कांहीं गोष्टींचें वर्णन करावयाचें झालें म्हणजे ह्यांना इतर देशांतील गोष्टींशीं त्यांचें तारतम्य करून आपण व आपलें तें सर्वांपेक्षां **उत्तम,** असें म्हणण्याची जणूं संवयच लागून गेली आहे. " आमचा कारखाना सगळ्यांत मोठा, आमचा देश सर्वोत्तम, आमचें राष्ट्र सर्वश्रेष्ठ, आमच्या ज्ञानतंतूंची रचना, आमचे मेंदू, सर्वांहून अधिक नाजूक व सुरेख आहेत; असे एक का दोन ? आमचें तेवढें सर्वोत्तम म्हणण्याची ह्यांची खोड सर्व प्रसिद्ध आहे. भजनमंदिरांत उपदेश ऐकायाला जा, तेथें उपदेशक म्हणतो, आमचा धर्म, आमचा समाज किंवा आमची सामाजिक रीति हीच सर्वोत्तम, एकाद्या जनरल ग्रांटसारख्या सेनापतीनें लिहिलेलें पुस्तक वाचा, तो म्हणतो, आमची सेना पृथ्वींतील सर्व राष्ट्रांतील सेनेपेक्षां अधिक युद्धकुशल. एकाद्या सभेस जा, तेथें वक्ते आपले आपल्या देशांतील आणि जातींतील चालीरीतींचे पोवाडे गात आहेत. ह्यांस आपल्या तेजापुढें लोकांचें कांहींच वाटत नाहीं. सर्व साधारण लोकांमध्यें नम्रतेची विशेष उणीव असलेली दिसून येते. तरी एकंदरींत अमेरिकन लोक लोकांस योग्य मान देण्यास कमी करीत नाहींत; कारण आत्मशासनाचे धडे लहानपणापासून शिकल्यामुळें आत्मस-

म्मान ह्या उत्कृष्ट गुणाचा त्यांच्या अंगीं विकास झालेला आहे; ज्या मनुष्याला आपल्या अब्रूची किंमत कळून ती राखतां येते, त्याला लोकांच्या अब्रूचीही विशेष काळजी असते.

---

# गृहस्थिति.

ही सर्व साधारण लोकस्थिति झाली. शहरांमधून आणि खेड्यागांवांतून वगैरे गृहस्थिति कशी असते ह्याबद्दल आतां दोन शब्द सांगितले पाहिजेत. गृहामध्यें गृहिणी ही मुख्य आहे असें जरी साधारणतः सर्वत्र मानतात, तरी अमेरिकन गृहांत गृहिणी ही विशेषेंकरून मुख्य मानिली जाते. अमेरिकन गृहिणी ही खरोखरच गृहश्री असते. (ह्या नियमाला अपवादही आहेत). गृहिणीला राहायाला गृह हें अवश्य असलें पाहिजे, तेव्हां तिचें वर्णन करण्यापूर्वी इकडील घरांबद्दल एकदोन शब्द बोलल्यास अप्रासंगिक होणार नाहीं. गांवठ्यांतील आणि शहरांतील घरांच्या आंतल्या भागाची रचना बहुशः सारखीच असते; परंतु बाहेरच्या बाजूची रचना निराळ्याप्रकारची असते. शहरांत बहुतकरून दगड आणि विटांच्या भिंतींचीं घरें असतात. खेड्यांतून आणि लहान शहरांमधून लांकडाच्या फळ्यांचीं घरें फार असतात. इकडे जळणाबद्दल सर्वत्र कोळशांचा उपयोग होत असून जिकडे तिकडे झाडांची विपुलता असल्यामुळें, लांकडांचा खप घर बांधण्यांतच फार होतो. घराचा पाया विटा नाहीं तर दगड घालून बांधलेला असतो; वरची इमारत लांकडाच्या फळ्या, तुळया आणि खांबे मिळून बांधलेली असते. बाहेरून घराच्या भिंती झिलमिल्यांच्या खिडक्यांच्या दारांसारख्या दिसतात. आंतून त्यांना जाड फळ्या किंवा कागद लावून गिलावा नाहीं तर गच्ची केलेली असून, त्या चित्रविचित्र रंगारंगाच्या कागदांनीं मढवितात. हीं काग-

दांचीं आच्छादनें चांगलीं टिकाऊ असून त्यांत ढेंकणांना वगैरे राहाण्यास जागा नसते. घरांना पुष्कळ खिडक्या असतात त्यांतून पुष्कळ उजेड आणि विपुल स्वच्छ हवा घरांत येऊन चोहोंकडे खेळत असते. खिडक्यांना मोठालीं कांचेचीं तावदानें लावलेलीं असतात; त्यामुळें थंडीच्या दिवसांत खिडक्या बंद कराव्या लागल्या तरी घरांत अंधेर पडत नाहीं. उन्हाळ्याच्या दिवसांत माशा, चिलटें इत्यादिकांची समृद्धि असते म्हणून कांहीं अंशीं तरी त्यांचा उपद्रव नाहींसा करण्यास्तव, बारीक तारेच्या जाळीचीं दारें लावतात, म्हणजे घरांत हवा येण्याला अटकाव न होऊन माशांचा उपद्रवही कमी होतो. खिडक्यांस शोभा आणण्याला व अतिशय उजेड घरांत न पडावा म्हणून, निरनिराळ्या प्रकारचे जाळीदार किंवा साध्याच कापडाचे पडदे लावलेले असतात, ते पाहिजे तेव्हां एकीकडे सारायाची वगैरे उत्तम सोय केलेली असते. स्वैंपाकघर आणि दरवाज्याच्या पायऱ्या ह्यांवांचून घरांत सर्वत्र जमीनींवरून व जिन्यांवरून गालीचे किंवा चटया विछावलेल्या असतात. त्यांखालीं भुई लांकडाच्या फळ्या घालून कडीपाट केलेली असते. वर्षांतून एक दोनदां गालीचे आणि चटया काढून झाडवून स्वच्छ करण्यांत येतात. साधारण घरांत एक बसण्या उठण्याची खोली, जेवणाची खोली, स्वैंपाकघर, पाहुण्याची खोली, व प्रत्येक माणसाला निजायाला निरनिराळी खोली असते. पोशाक टांगून ठेवण्याला फडताळें, पुस्तकें ठेवण्याला फळ्या, मेजें, खुर्च्या इत्यादि पुष्कळ सोई केलेल्या असतात. तळघरांत सर्पण, भाजीपाला, दूध इत्यादि पदार्थ ठेवण्यांत येतात. शहरांतील घरांतून एक न्हाणी असते, त्या न्हाणींत जस्ताच्या पत्र्यानें मढविलेलें मोठें लांबट हौदासारखें पातेलें असतें, त्यास स्नानाचा "टब्" म्हणतात. त्यांत एक थंड्या व दुसरा गरम पाण्याचा असे दोन नळ आणलेले असतात. गरम पाण्याचा नळ स्वैंपाकघरांतील चुलीजवळील नळाकृति हांड्याला

लागलेला असतो; ह्यामुळें वर पाणी वाहून नेण्याचे श्रम व पाणी तापवायाला निराळी चूल करावी लागत नाहीं. खेड्यांतील बहुतेक घरांतून न्हाणी नसते. ह्यामुळें ज्यांस दररोज स्नान करण्याची संवय आहे, त्यांस मोठी अडचण सोसावी लागते. बहुतकरून इकडचे सर्व लोक रोज स्नान करीत नाहींत; तांब्याभर पाणी हात धुण्याच्या घंगाळांत घालून फडकें ओलें करून आंग पुसतात; आणि कधीं कधीं स्नान करतात. खेड्यांतील लोक महिनोगणती "वस्त्रस्नान" करूनच तृप्त राहतात. थंडीच्या दिवसांतून तळघरांत एक मोठी आगटी पेटवितात, आणि तिचा ऊष्मा सर्व घरांत जावा ह्मणून त्या शेगडीला लोखंडाचे नळ लावून प्रत्येक खोलींत नेलेले असतात; ते स्वेच्छेनुरूप उघडण्याची किंवा बंद करण्याची सोय केलेली असते, ह्यास "रेजिस्टर्स्" म्हणतात.

इकडच्या बहुतेक शहरांतून आणि लहान गांवांमधूनही घरांमध्यें आणि रस्त्यांवरून धुराचे दिवे लावतात. ह्या देशांत जाळण्याच्या उपयोगी खनिजवात किंवा "ग्यास" विपुल आहे. पिट्स्बर्ग् नांवाच्या शहरांत आणि दुसऱ्या कित्येक गांवांमधून तर ह्या ज्वालाग्राही वाताच्या योगानेंच रांधणें, यंत्रें चालविणें, घरांत शेक आणणें, घरांतील आणि रस्त्यावरची रोशनी, इत्यादिक सगळीं कामें होतात. ज्या लहानसहान गांवांमधून ज्वालाग्राहीवात तयार करण्याचे कारखाने नाहींत, तेथें खनिज तेलाचा उपयोग करतात. पश्चिमेकडच्या नवीन वसलेल्या शहरांतून एकंदर विजेचे दिवे लावतात. पूर्वेकडच्या आणि बऱ्याच जुन्या शहरांमधून कोठें कोठें विजेचे दिवे लावलेले पाहाण्यांत येतात.

घरांतील जेवणाखाणाची व्यवस्था यूरोपियनांसारखीच असते. जेवायाच्या मेजावर घालण्याचीं पांढरीं वस्त्रें, जेवतांना हात तोंड पुसण्याचे पांढरे रुमाल, प्रत्येक खोलींत तेथें राहाणाऱ्या मनुष्यांस हात पाय आणि अंग

पुसण्यास लागणारीं वस्त्रें, म्ह० पंचे, बिछान्यावरच्या चादरी आणि उशांचे अभ्रे इत्यादि वस्त्रें घरांतच धुण्याची चाल आहे. स्वैंपाकीण किंवा परिचारकीण, कधीं कधीं स्वतः घरधनिणी सुद्धां आपणच धोबिणी बनून तीं वस्त्रें धुतात, व त्यांवर इस्त्री करतात. स्वैंपाकीण बहुतकरून निग्रो किंवा आयरिश जातीची असते. पुष्कळ गरीब अमेरिकन बायकाही लोकांच्या घरीं स्वैंपाकिणी होऊन राहातात. आमच्या तिकडल्याप्रमाणेंच इकडेही चाकर ज्यांस धार्जिणे आहेत, अशीं मनुष्यें फार थोडीं. बुद्धिवान् विचारी घरधनीण स्वतः सर्व कामें करायाला शिकते; ती चाकरणीला काम करण्यांत मदतही करते. परंतु अविचारी घरधनिणी इकडे बऱ्याच आहेत. पुष्कळांना स्वैंपाक करतां येत नाहीं; म्हणून इकडे स्वैंपाक शिकविण्याच्या शाळा घातलेल्या आहेत. शहरांतून घर करून राहाण्याला फार खर्च पडतो, म्हणून पुष्कळ लोक बिऱ्हाड करून राहातात. महिन्याचे पंचवीस किंवा तीस डालर (एका डालराची किंमत सरासरी ३ रुपये आहे,) दिल्यास एक मनुष्याला साधारण चांगलें बिऱ्हाड मिळतें. बिऱ्हाडकऱ्याला घरांत एक स्वतंत्र खोली दिलेली असून इतर कुटुंबांतील माणसांबरोबरच त्याच्या जेवणाखाण्याची व्यवस्था केली जाते. संभावित मनुष्यांस कुलीन सुस्वभावाच्या कुटुंबांत बिऱ्हाडास राहातां येतें. इकडे पुष्कळ चांगल्या बाया गरीबीमुळें घरांत बिऱ्हाडकऱ्यांस राहून घेऊन, आपला चरितार्थ चालवितात. मध्यम प्रतीच्या बऱ्याच सधन अशा कुटुंबांतूनही बिऱ्हाडकरी घेण्याची चाल आहे. खाणावळींतून किंवा मोठाल्या वस्तीगृहांतून राहण्यास विशेष खर्च लागतो इतकेंच नव्हे; तर तेथें गृहसुख मुळींच मिळत नाहीं.

सुमारें दोन वर्षांपर्यंत मी फिलाडेल्फियांत एका बाईच्या घरीं बिऱ्हाडास राहिलें होतें. ही बाई स्वभावानें फार चांगली आहे. सर्वत्र म्हणजे बाया अशा चांगल्या सुग्रणी, आणि उत्तम स्वभावाच्या व गृहकार्यदक्ष असतात,

असें नाहीं. तरी ह्या बाईच्या संसार करण्याच्या रीतीवरून इकडील बहुतेक गृहिणींच्या नित्य कृत्याची माहिती होण्याजोगी आहे. ही बाई सकाळीं साडेपांच किंवा सहा वाजतां उठून स्नान (अंग पुसणें किंवा सचैल) करून, वेणी घालून पोशाक करून खालीं येते. (शहरांत घरांना तीनचार मजले असतात, खालच्या मजल्यावर स्वैंपाकघर, जेवणघर आणि बसण्याउठण्याची खोली असते.)" त्यानंतर स्वैंपाकघरांत जाऊन न्याहारीला काय काय पदार्थ करावयाचे हें स्वैंपाकिणीला सांगते, आणि जेवणघर झाडून मेजावर सुऱ्या, कांटे, चमचे, रुमाल, बशा, चहाचे पेले, पाणी पिण्याचे कांचेचे पेले इत्यादिक जेथल्या तेथें मांडून, मग एक कानटोपी घालून अंगावर शाल किंवा कांवळें, आणि हातांत परडी घेऊन मंडईत जाते; तेथून नित्य घरांत लागणारा भाजीपाला, फळफळावळ विकत घेऊन घरीं आणते. सात वाजतां ती स्वतः नाहीं तर स्वैंपाकीण एक घांट वाजविते. घांटेचा शब्द ऐकला म्हणजे घरांतील सर्व माणसें अंथरुणावरून उठून, तोंडबींड धुऊन स्नान करून पोशाक घालून तयार होतात. साडेसात वाजतां दुसरी एक घांट वाजते; ती ऐकून सगळीं माणसें न्याहारी करायाला खालीं येतात. आठ वाजतां न्याहारी, उरकली म्हणजे स्वैंपाकीण माडीवर जाऊन सगळ्यांच्या निजायाच्या खोल्या झाडून अंथरुणें झाडून पुनः पलंगावर घालून येते. बायका बहुतकरून आपापलीं अंथरुणें झाडून बिछावून घेतात, आणि खोलीची नीट व्यवस्था ठेवितात. घरांत बिऱ्हाडाला असलेले पुरुष कामाच्या गर्दीमुळें म्हणा, किंवा आळसामुळें म्हणा, हें काम चाकरिणीवर टाकून जातात. ह्या अवकाशांत बाई उष्टीं ताटें (चिनी मातीचीं) वाट्या, पेले, चमचे, सुऱ्या वगैरे साबणानें व उष्ह पाण्यानें धुऊन पुसून ठेवते. मग दुपारच्या स्वैंपाकाकरतां भाजी चिरून झाली म्हणजे, बाई जमाखर्चाचा हिशोब तपासते. त्यानंतर थोडा वेळ वर्तमानपत्रें वाचते, आणि दुसरें कांहीं काम

करावयाचें असल्यास तें वेळच्या वेळीं करते. मग बाजारांतून कांहीं आणावयाचें असल्यास बाहेर जाऊन सौदा करून येते. ती स्वैंपाकिणीला बरीच मदत करिते. स्वैंपाकीण घरांतील धुणें, झाडणें, खरकटीं घांसणें, केर काढणें,—दाराच्या पायऱ्या आणि अंगण धुऊन स्वच्छ करणें, आगट्या, चुली वगैरे पेटवणें इत्यादि सगळीं कामें करते. तिला दरमहा १६ डालर म्ह० ४८ रुपये पगार आणि पोटगी देण्यांत येते. सोमवारापासून मंगळवारापर्यंत घरांत धुण्याचा सपाटा चाललेला असतो. परसामध्यें मोठाले 'टब' ठेवून त्यांत आधण आलेलें पाणी घालून साबण लावून कांहीं वेळ वस्त्रें भिजवून मग धुतात. इकडे धुणीं दगडावर आपटीत नाहींत; एका लांकडी फळीवर (तिला बोटाबोटाच्या अंतरानें समांतरावर लहान लहान तरंगांसारख्या उंचसखल रेघा पाडलेल्या असून, ती टिनाच्या पत्र्यानें मढविलेली असते, तीवर) साबण लावून वस्त्रें घांसून धुतात. मग तीं निळीच्या पाण्यांत भिजवून पिळून वाळवितात. वस्त्रांना खळ लावून किंवा खळ लावल्यावांचूनच इस्त्री करून त्यांच्या घड्या करतात. ह्याप्रमाणें प्रत्येक घरांत एक एक धोबीखाना असतो.

दुपारून बारावर एक वाजतां दुपारचें जेवण होतें. ह्या वेळींही घरांतील माणसांना जेवायाला बोलावण्यास घांट वाजते. स्वैंपाक इकडच्या रीतीप्रमाणें चांगलाच असतो. उकडलेले बटाटे, गोबी, सलगम, बीट किंवा दुसऱ्या ज्या भाज्या ज्या वेळीं मिळत असतील त्या, मांस किंवा मासे, अंडीं, कोशिंबिरी दाखल 'लेट्स्' नांवाचा पाला नाहीं तर तांबडे मुळे, टुमाटो म्ह० विलायती वांगीं, खिऱ्याच्या दिवसांत खिरे चिरून जेवायाच्या मेजावर आणून ठेवतात. आमच्या तिकडल्याप्रमाणें भाज्यांस मसाला घालून फोडणी देणें ह्यांस ठाऊक नाहीं. मेजावर मीठ आणि मिऱ्यांची व मिरचाची पूड असते, ती ज्याला जशी लागेल त्यानें तशी घ्यावी. कोशिंबिरीकरतां शिरक्याची कुपी असते तींतून पाहिजे तितका शिरका घ्यावा. कधीं कधीं,

वांगीं किंवा बटाटे चरबींत तळतात. ह्याशिवाय "केक" नांवाचें एक पक्वान्न केलेलें असतें; तें, व कित्येक प्रकारच्या खिरी जेवणाच्या शेवटीं वाढतात. फळांच्या दिवसांतून फळें वाढतात. ज्या माणसाला मत्स्य, मांस, किंवा आंडीं आणि चरबी घालून केलेले पदार्थ खाण्याचा कंटाळा असेल, त्याचे जेवणाखाण्याचे इकडे पुष्कळ हाल होतात. अशा माणसांना बहुतेक दूध भाकरी आणि फळें ह्यांवरच निर्वाह करावा लागणार.

दुपारून किंवा सकाळीं न्याहारी झाल्यावर बाई फाटकीं वस्त्रें शिवते, ठिगळें लावते, किंवा नवीं वस्त्रें शिवून तयार करते. प्रत्येक घरांत बहुतकरून एक शिवण्याचें यंत्र असतें. ह्या थंडीच्या देशांत त्याचा फार उपयोग आहे. सकाळच्या प्रहरीं किंवा दुपारून लोक भेटायाला येतात. घरचें काम आटपल्यानंतर मिळेल त्या वेळांत बाई पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचते, आणि व्याख्यानें ऐकायाला जाते, ह्याशिवाय ती कित्येक परोपकारी कृत्यांस मदत देते. एथें एक पतित बायकांचा आश्रम आहे, ही बाई त्या आश्रमाचें पोषण करणाऱ्या मंडळीची चिटणिशीण आहे. ह्याशिवाय ती दुसऱ्या पुष्कळ धर्माच्या आणि परोपकाराच्या कृत्यांस यथाशक्ति पैशानें व अंगमेहनतीनें मदत करीत असते. कधीं कधीं दवाखान्यांत जाऊन दुखणाईतांचा समाचार घेते.

ज्या कुटुंबांमधून मुलेंबाळें असतात तेथें आया उत्तम प्रकारें मुलांची जोगवण करतात. जेथें आईबापें व मुलें चांगल्या रीतीनें वागून आपापल्या कर्तव्यकर्मांत तत्पर असतात, असलें अमेरिकन् गृह सुखाचें माहेरघर असतें. संध्याकाळच्या वेळीं जेवणखाण आटपलें म्हणजे मुलांना घेऊन आईबापें बसण्याच्या खोलींत शेगडीपाशीं तापत बसून, सुखाच्या आणि मौजेच्या गोष्टी सांगतात आणि मधुर शब्दांनीं बोलतात. हा त्यांचा समय फार सुखाचा असतो. मुलें "प्रिय आई" "प्रिय बाबा" म्हणून हाक मारतात. आईबापें मुलांस "माझ्या लाडक्या" किंवा "बाळा," असें मधुर संबोधन कर-

तात. त्यांच्या बोलण्यांत अपत्यप्रेम हें सर्वदा व्यक्त होत असतें. नवराबायको एकमेकांशीं बोलतांना "माझ्या प्रिया," किंवा "प्रिये" असें संबोधन केल्यावांचून राहात नाहींत. संभावित घराण्यांतून कधीं कोणी वाईट शब्द किंवा शिवी तोंडीं आणीत नाहीं. शपथा वहाणें, शिव्या देणें, किंवा वाईट उद्धटपणाचें बोलणें हें पाप असून, असभ्यतेचें लक्षण आहे असें समजतात. साधारण कोणाला कांहीं मागावयाचें किंवा काम करायास सांगावयाचें असलें तर, "आपण कृपा करून एवढें कराल काय?" "कृपा करून अमुक अमुक करा," आणि कोणी सांगितलेलें काम केल्यावर कांहीं निरोप सांगितल्यावर किंवा पदार्थ आणून दिल्यावर आणि अशाच दुसऱ्या प्रसंगीं "मी तुमचे उपकार मानतों," असें मोठ्या अदबीनें म्हणतात. दोन मनुष्यें बसलेलीं किंवा उभीं असतां त्यांच्यामधून किंवा एखाद्याच्या समोरून जात नाहींत, तसें करण्याचा प्रसंग आलाच तर मला "माफी करा" असें म्हणतात. घरांत चार मंडळी जेवायाला बसली असतां तेथून उठून जाणें अवश्यच असल्यास घरधनिणीची किंवा धन्याची परवानगी मागतात. कोणी कांहीं बोललें तें आपल्यास ऐकूं आलें नाहीं तर पुनः विचारून घेतांना "माफी मागतों, आपण काय म्हटलें?" असें म्हणतात. मुलांस लहानपणापासून असें शिष्टाचाराचें शिक्षण मिळतें, ह्यामुळें त्यांचें मोठें हित होतें.

संभावित लोक कुटुंबांमध्यें आणि समाजांमध्यें बायकापुरुषांचा यथायोग्य सन्मान ठेवतात. पुरुष बायकांस पुष्कळ रीतीनें बहुमान देतात. ते कोणा बाईशीं—मग ती कोणीही असो—बोलावयाचें झालें म्हणजे टोपी उतरतात, आणि 'बाईसाहेब' म्हणून संबोधन करतात. घरांत किंवा सभेंत बायकांना प्रथम आसनें बसावयाला मिळतात. आगगाड्यांतून आणि सार्वजनिक घोडेगाड्यांतून फार भीड असली आणि तेथें कोणी बाया आल्या तर पुरुष जागचे उठून बायकांना सोय करून देतात—(सगळेच पुरुष

असें शिष्टसंप्रदायाचें अनुसरण करतात असें नाहीं.)—तरुण आणि सशक्त बायका वृद्ध किंवा अशक्त मनुष्यांस ह्याच रीतीने बहुमान देतात.

समजदार आणि संभावित बायका कोणाशीं भांडत नाहींत. वर सांगितलेल्या "गांव आहे तेथें म्हारवाडा आहेच" ह्या म्हणीप्रमाणें इकडे भांडणें आहेतच; पण तीं आमच्या तिकडल्यासारखीं ओरडाआरडीचीं व शिव्यागाळ्यांच्या सुकाळाचीं नसतात. कोणाला कोणाचा राग आला, म्हणजे त्याशीं फारसें दळणवळण ठेवलें नाहीं म्हणजे झालें. साधारण भांडणाच्या वेळीं बोलण्याचा सूर बदलला म्हणजे झालें. मी तुमचे उपकार मानतों असें हळूच गोड स्वरानें म्हणायाच्या बदली **बरें, मी तुमचे उपकार मानतों,** असें अंमळशा कठोर व रागीट स्वरानें म्हणायाचें. अशिष्ट व अज्ञलोकांच्या भांडणांत अवाच्य शब्दांचा भडिमार होतो इतकेंच नव्हे; तर ते कधींकधीं हातघाईवरही येतात.

कोणी भेटलें म्हणजे एकमेकांचा उजवा हात धरून हालवितात, आणि त्या वेळीं जो कुशल प्रश्न करावयाचा त्याचें शब्दशः भाषांतर केल्यास "तुम्हीं कसें काय करतां?" असें होतें. ह्याचा अर्थ "तुमची प्रकृति कशी काय आहे?" प्रत्येक वेळां एकमेकांची भेट होतांक्षणीं असा प्रश्न करावयाची चाल असल्यावरून, त्यास उपयुक्त उत्तर "मीं बरा आहें, माझी प्रकृति फार उत्तम आहे" हें होय. हें उत्तर म्हणजे सर्वकाळ खरें असतें असें नाहीं, परंतु भाषारूढि अशी कांहीं विलक्षण आहे कीं, तींत खऱ्याखोट्याची निवड करण्यास थोडीच सवड असते.

कोणाची भेट झाली म्हणजे कांहीं तरी बोललें पाहिजे म्हणून इकडचीं माणसें प्रथम सांप्रतच्या दिनचर्येवर टीका करण्यास आरंभ करतात. दिवस चांगला प्रसन्न व आकाश निरभ्र असलें, तर "अहाहा हा दिवस किती चांगला आहे?" म्हणून स्तुति करावयाची. परंतु असले सर्वांस सं-

तोषविणारे दिवस फार थोडे. तेव्हां सर्वकाळीं सगळ्यांची मर्जी संभाळणें हें दिनचर्येला साधत नाहीं. कोणाला पाऊस आवडत नाहीं, कोणाला थंडी सोसत नाहीं; कोणाला उकाड्याचा मोठा तिटकारा; कोणाला पाऊस कधीं येईल अशी उत्कंठा लागलेली असते, कोणाला तुषारवृष्टि कधीं होईल, नद्या थिजतील केव्हां आणि आम्ही स्केटायला जाऊं कधीं, असें झालेलें असतें. सारांश बिचाऱ्या दिनचर्येला कोणाची मर्जी म्हणून राखवत नाहीं. बहुतेक प्रसंगीं दिनचर्येबद्दल नाकें मुरडण्याची जरी या लोकांस संवयच लागून गेली आहे, तरी स्वाभाविक शोभेची गुणग्राहकता ह्यांस उत्तम साधली आहे. सर्वच लोक म्हणजे ह्या गोष्टीचे मार्मिक आणि रसज्ञ आहेत असें नाहीं, परंतु एकादी चांगली वस्तु पाहून तिची स्तुति करणार नाहींत, अशीं मनुष्यें इकडे फार थोडींच आढळतात.

कोणा विदेशी व नवख्या मनुष्याची भेट झाली म्हणजे त्यास पुष्कळ गोष्टी विचारणें हें स्वाभाविकच आहे. त्या मोठ्या संभावितपणानें विचारतात. इकडील व दुसऱ्या पाश्चात्य बायका आमच्या इकडे आल्या म्हणजे आम्हीं त्यांस पुष्कळ विलक्षण तऱ्हेचे प्रश्न करीत असतों, तसेच आम्ही इकडे आलों म्हणजे इकडच्या बायकाही ते करण्यास चुकत नाहींत.

---

## नखरे.

न खरे म्हणजे खरें नव्हेत ते, असा जर ह्या शब्दाचा मूळचा अर्थ असेल, तर इकडच्या बायकांच्या पोशाकांत आणि शृंगारांत पुष्कळच नखरे असलेले दिसून येतात. इकडच्या स्त्रिया बहुतकरून चांगल्या देखण्या, आणि कित्येक तर जात्या परम सुंदर आहेत. त्यांस स्वाभाविक सौंदर्याची केवढी आवड आहे हें त्यांच्या घरादारांची रचना वगैरे पाहिल्यास सहज

कळून येतें. प्राचीन काळच्या हेल्लेणी लोकांची स्वभावसौंदर्यप्रीति त्यांचें अनुकरण करणाऱ्या रोमकरांनीं घेऊन, ती इंग्रजी आणि इतर यूरोपांतील लोकांस शिकविली. ह्या देशाच्या लोकांनीं तिचेंच सर्वत्र अनुकरण केलें आहे; हें ह्यांच्या शहरांच्या, साधारण घरांच्या, मोठाल्या इमारतींच्या आणि देवळांच्या वगैरे रचनेवरून स्पष्ट दिसून येतें. तरी बायकांच्या पोषाकांत व दुसऱ्या कित्येक गोष्टींत फारसें सौंदर्य नसून त्यांत दरवर्षी पुष्कळ फेर-बदल होत असतात. फ्रान्सदेश राजसत्तेंत असतां, पारिसची महाराणी सर्व यूरोपांतील व अमेरिकेंतील बायकांस निरनिराळ्या तऱ्हेचे पोषाक आणि शृंगार करण्याचा कित्ता घालून देत असे. पारिसच्या महाराणीनें व ते-थील इतर श्रीमंत नखरेबाज बायांनीं जें करावें तें सर्वांस वंद्य असून, सर्वांनीं त्यांचें अनुकरण करावें, अशी चाल होती.

पंचवीस वर्षांपूर्वी माझीं मातापितरें सपरिवार कुमठ्याहून नावेंत बसून मुंबईस जात असतां, त्यांस सदाशिवगडांत दोन तीन दिवस थांबून दुसऱ्या नावेची वाट पाहावी लागली. आम्हीं जेथें उतरलों होतों तें ठिकाण तेथें नवीनच झालेल्या लोखंडी रस्त्याजवळ असून, त्याच्या पलीकडल्या बाजूस आगगाडीचा टप्पा होता. आम्ही तेथें उतरलों त्या दिवशीं दुपारून तिघी इंग्रजी बायका त्या टप्प्यांत एका बांकावर येऊन बसल्या, त्यांचे लहंगे इतके फुगींव होते कीं, त्यांपैकीं एक बाई उभी राहिली किंवा बसली असल्यास तिच्या लहंग्यानें निदान दीड दोन वार व्यासाच्या वर्तुळाएवढी जागा व्यापून टाकली असती. ह्या प्रकारचा विचित्र पोशाक, व तो धारण क-रणाऱ्या ताम्रमुखी बाया, त्यापूर्वीं कधींच माझ्या दृष्टीस पडल्या नव्हत्या. त्यांस पाहून मला आधींच भय वाटूं लागलें होतें, इतक्यांत एका मनुष्यानें कांहीं पदार्थांनें भरलेली एक लहानशी टोपली त्या बायांपाशीं आणिली; तेव्हां त्यांपैकी एक बाई पटकन् उठून ती टोपली घेऊन आपण बसली होती

त्या बांकाखालीं ठेवून, पुनः बांकावर बसली. हें पाहून मला जें काय भय वाटलें, आणि पोटांत कसें धस्स झालें, तें आठवल्यास आतां मला हसूं येतें; पण तेव्हां माझ्या मनाची पक्की खातरी झाली कीं, ह्या बायका कोणी तरी कैकाडिणी, नाहीं तर राक्षशिणी असाव्यात. ह्या लोकांचीं पोरें आणि दुसरे पदार्थ चोरून आपल्या फुगींव लहंग्यामध्यें लपवून घेऊन जात असतील, आणि कदाचित् एकादे दिवशीं मी आईच्या किंवा बाबांच्या डोळ्यां आड झालें तर त्या मला देखील उचलून आपल्या लहंग्याच्या आंतील पिशवींत घालून नेतील, ह्याविषयीं मला अगदीं संशय राहिला नाहीं!

अशा प्रकारें लहानपणीं मला ज्या फुगीर लहंग्यांचें अतोनात भय वाटत असे, ते पारिसच्या महाराणीच्या कल्पनेनें सृष्ट झालेले असून, कांहीं वर्षांपर्यंत सर्व यूरोपांतील लहान, मोठ्या, गरीब, श्रीमंत, विद्वान्, अविद्वान्, बायका ते फार सुरेख आहेत असें समजून नेशीत होत्या. पारिसची सम्राज्ञी गरोदर असतां तिणें आपल्या आकृतींत फेरफार झालेला लोकांच्या पहाण्यांत न यावा, म्हणून फुगीर लहंगे नेसण्यास सुरुवात केली. तें पाहून ही कांहीं तरी नवीन छानदार रीति आहे, म्हणून तिच्या मूळ कारणाचा पुरता शोध न करितां सगळ्या नखरेवाज बायकांनीं स्वतः तशा प्रकारचे लहंगे नेसण्याची सुरुवात केली इतकेंच नव्हे; तर लहान मुलींनासुद्धां तशाच आकृतीचे परकर नेसविले. हें पाहून पारिसची राणी मनांतल्या मनांत किती हंसली असेल! दुसरी एक सुंदरी अमळशी ठेंगणी होती, तिणें आपल्या जोड्यांच्या टांचा दोन तीन बोटांइतक्या उंच करवून आपलें ठेंगणेपण झांकण्याचा प्रयत्न केला. हें पाहून इतर बायकांनीं त्या रीतीचें मूळ कारण न जाणून आपल्याही जोड्यांच्या टांचा उंच करविल्या. ही उंच टांचांचे जोडे घालण्याची चाल अद्यापिही चालू आहे. सोन्यारुप्याचीं किंवा इतर प्रकारचीं भूषणें लेऊन किंवा तऱ्हेवा-

ईक, पोशाक घालून आपलें सौंदर्य वाढवूं पहाणारीं माणसें कधीं कधीं सुरूपाचें कुरूप करून टाकतात, हा नियम आमच्याच देशाला लागू आहे असें नाहीं; तर तो सुधारणेच्या शिखरास जाऊन पोहोंचलेल्या इंग्लंडास आणि अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांसही लागू आहे. चीनच्या बायकांचे पाय बांधून ते लहान करण्याचे प्रयत्न करतांना चीनीबायकांस किती दुःख भोगावें लागतें म्हणून इकडच्या बायकांस त्यांची फारच कींव येते. कोणी म्हणतात ही चीनी लोकांची चाल बायकांच्या दास्याची खूण आहे; कोणाच्या मतें चीनी लोकांवर बौद्ध आणि कनफ्यूशी धर्माचा परिणाम कसा वाईट झाला, ह्याचें हें प्रमाण होय. इतर जातीच्या वाईटसाईट चालींवर टीका करतांना ह्यांच्या मनांत पुष्कळ विलक्षण तर्क येतात. परंतु ईसापाच्या नीतिकथांत सांगितलेल्या पडशीवाल्या मनुष्याप्रमाणें ह्यांस आपल्या पडशीच्या पुढच्या पिशवींतील पदार्थ सगळे उत्तमप्रकारें दिसतात, पाठीकडच्या पिशवींत असलेले पदार्थ न दिसणें हें स्वाभाविकच आहे. इकडच्या बायकांना बारीक कंबर हें मोठे सौंदर्याचें लक्षण आहे असें वाटून, त्या "कोर्सेट्" नांवाच्या देवमाशाचीं हाडें आणि पोलाद यांच्या चापट कांबी घालून केलेल्या विनबाह्यांच्या बंड्यांसारख्या मध्यें बारीक व वरच्या आणि खालच्या बाजूस बऱ्याच पोकळ, अशा कंचुक्या घालून आपली कंबर बारीक करतात. मध्यम उंचीच्या साधारण धष्टपुष्ट बायकोच्या कंबरेचा मोज स्वभावतः एकुणचाळीस किंवा चाळीस बोटें असावा; तो इकडच्या बायका कंबर आंवळून तिसांपासून चोविस बोटांवर आणतात. मुलगी बाराएक वर्षांची झाली म्हणजे तिला कोर्सेट् घालण्याची संवय लावण्यांत येते. ह्या चालीमुळें पुष्कळ बायकांना मोकळेपणें श्वासोच्छ्वास करायाला सांपडत नसल्यानें त्यांचे फुप्फुस बिघडतात; पोटावर "कोर्सेट्"चा दाब बसल्यामुळें प्लीहा व अन्नाशय ओटीपोटांत पडून गर्भाशयावर त्याचा

मनस्वी दाब पडतो. ह्यामुळें त्यांस व्हावें तसें अन्नपचन होत नाहीं, लांब श्वास घेतां येत नाहीं, प्लीहाविकार आणि फुप्फुस विकार होतात; बाळंतपणीं बेतापेक्षां अतिशय अधिक यातना भोगाव्या लागतात; आणि दुसरे किती कष्ट व अडचणी सोसाव्या लागतात हें ईश्वरच जाणे! ह्याशिवाय आकृतीला आणि पोशाखाला सुरेखपण आणण्याची दुसरी एक चीज आहे, तिला "बसल्" म्हणतात. हें "बसल्" जाड तारा विणून केलेलें असतें. ह्याच्या दोन चार आकृति असतात. हें लहंग्याच्या आंतून पाठीकडे कंबरेला बांधून लटकवून त्यावर लहंगा नेसल्यास, तो पाठीकडे कंबरेखालीं फुगीर दिसतो. ह्या "बस्लां"त काय सुरेखपणा आहे, हें सठवाईवांचून दुसऱ्या कोणास ठाऊक नाहीं. ह्याची सृष्टि तरी षष्ठीदेवीनेंच केलेली असावी असें दिसतें; कारण सृष्टिदेवतेला जन्मतांच यूरोपियन् व अमेरिकन् बायकांच्या पाटीस एक स्वाभाविक "बसल्" लावण्याची कल्पना सुचली नाहीं. बस्लाभोंवतीं लहंग्याच्या आंतून दोनतीन जाडे परकर नेसतात त्यांचा व लहंग्याचा व बस्लाचा मिळून साहासात शेरांचा भार पोटावर पडतो ह्याचा परिणाम बरा होत नाहीं, हें सांगायाला नकोच. ह्या थंड देशांत पायाला जोड्याचें रक्षण असणें हें ठीकच आहे; परंतु हौशी बायकांना आपले पाय लहान असावे असें वाटून त्या फारच आंवळ जोडे घालतात. त्यामुळें पायांची आकृति बिघडून बोटांवर थोरलाले घट्टे पडतात; आणि जोड्यांच्या टांचा उंच असल्यामुळें चालतांना शरीराचा भार सर्व पायावर सारखा न पडून, तो पायाच्या पुढच्या भागावर ज्यास्ती पडतो; त्यामुळें आंगठ्याच्या व दुसऱ्या बोटांच्या नखांना इजा होते. लहान गांवांपेक्षां शहरांतून असल्या नखऱ्यांची आवड अधिक असते. श्रीमंतांची छानछुकीची तऱ्हा पाहून गरीब बायका त्यांचें अनुकरण करतात. गरीब आणि श्रीमंत बायका पोशाकाचे पदार्थ विकत घेण्यांत अतोनात पैसा खर्च करतात. हातांत घालायाचे कातड्याचे

हातमोजे इतके घट्ट केलेले असतात कीं, ते हातांत चढविण्यास बराच वेळ लागून, ते हातांत असत तोंपर्यंत बायकांचे हात वाटोळ्या वळकट्यांसारखे दिसतात. त्या कोठें जेवायाला, फिरायाला किंवा कोणास भेटायाला बाहेर जाऊं लागल्या, म्हणजे उन्हाळ्यांत अतिशय उकडत असतें तेव्हां देखील अंग घामाघूम होत असलें तरी हातमोजे हे त्यांच्या हातांत असलेच पाहिजेत.

अलीकडे इकडे एक "ड्रेस् रिफॉर्म्" म्ह० पोशाक सुधारणा सुरू झाली आहे. पुष्कळ जाणत्या आणि शारीरशास्त्रज्ञ बायका आपल्या पोशाकांच्या धाटणीची सुधारणा करीत आहेत. हा सुधारलेल्या तऱ्हेचा पोशाक शास्त्रीयरीत्या तयार केलेला असून, शरीरास सुखदायक व स्वास्थ्यकारक असा आहे इतकेंच नव्हे; तर तो अंगावर घालून पाहिजे तें काम करतां येतें; तो घातल्यानें म्हणजे अमुक एक काम करतां येणार नाहीं, असा अडथळा त्याकडून येत नाहीं. ह्या पोशाकसुधारक बाया स्वदेशांत आणि परदेशांत स्त्रियांनीं वाईट नखरेदार पोशाक घालून शरीराची स्वाभाविक आकृति, आणि प्रकृति बिघडवून घेऊं नये, ह्मणून मनापासून प्रयत्न करीत आहेत. जपानच्या उन्नतिशील रहिवाशांनीं युरोपियनांच्या सद्गुणांबरोबर दुर्गुणांचेंही अनुकरण करण्याचा झपाटा चालविला आहे. तिकडच्या बायकांनीं आपला ओबडधोबड पोशाक टाकून युरोपियन बायकांसारखे कपडे घालण्याचें आरंभिलें आहे. फ्रान्सेस् बाई विलर्ड ह्यांचा निरोप घ्यायाला मी त्यांच्या घरीं गेलें, तेव्हां त्यांनीं मला सांगितलें कीं, "तुम्हीं जेथें जाल तेथें, विशेषेंकरून जपानांत, बायकांना नखरेदार नादान पोशाक घालून प्रकृति बिघडवून घेऊं नका, असा आग्रह करा. हें तुम्हास माझें शेवटचें सांगणें आहे. आम्हीं लोकसमाजास उपयोगीं पडावें असा आमचा उद्देश असल्यास आम्हीं सर्वांनीं आपल्या पोशाकांत सुधारणा केली पाहिजे."

थंडी किंवा कडक ऊन ह्यांपासून डोक्याचा बचाव करून घेणें हा जो

टोप्यांचा उपयोग तो इकडच्या बहुतेक बायका विसरून गेल्या आहेत. टोप्या हें आतां एका प्रकारचें शिरोभूषणच बनून गेलें आहे. रंगीत रेशमी कापड, रेशमी व मखमलीच्या नाड्या, कापडाचीं कृत्रिम फुलें वगैरेंनीं टोप्या शृंगारतात. ह्या शिवाय सुरेख पांखरांचे पंख किंवा मारलेलीं सगळींच पांखरें त्यांच्या शरीरांत पेंढा भरून, तीं टोप्यांवर लावण्याची चाल आहे. थोड्या वर्षांपूर्वी पारिस शहरांतील एक बदनामी बायको लोकांचें लक्ष्य आपल्याकडे वळवून घेण्याकरतां एक सबंध पांखरूं टोपीवर लावून नाटकगृहांत गेली, हें पाहून ही एक नवीच टूम निघाली आहे, असें समजून संभावित बायकांनीं देखील त्याच्या कारणाचा शोध न करतां आपल्या टोप्यांवर सुरेख पांखरें लावण्याची चाल पाडली. ह्या दुष्ट चालीच्या पायीं लक्षावधि कोट्यावधि सुंदर पांखरांचे प्राण बळी पडून दुष्ट पारधी त्या व्यापारानें आपलीं पोटें भरतात; आणि शिष्टबायका आपण काय करीत आहों ह्याचा विचार न करतां ह्या व्यापाराला उत्तेजन देतात. ह्यामुळें बिचाऱ्या पांखरांचा जीव जातो इतकेंच नव्हे; तर त्यांस अतिशय यातना भोगाव्या लागतात. त्यांच्या सुरेख परांचे रंग फिके पडूं नयेत, म्हणून तीं अर्धी मुर्धी जीवंत असतांनाच त्यांच्या आंगचीं कातडीं सोलून काढावीं लागतात. ह्या क्रूरपणाचें व बिचाऱ्या पांखरांच्या यातनेचें वर्णन कोणाच्यानें करवेल? दोन वर्षांपूर्वीं लंडनच्या एका दुकानांतून तीन महिन्यांत ४०४४६४ पश्चिमहिंदी बेटांतल्या व ब्रझीलच्या पांखरांचीं कातडीं आणि ३५६३८९ आमच्या हिंदुस्थानी सुंदर पक्ष्यांचीं प्रेतें विकलीं गेलीं. अशा प्रकारचीं दुकानें यूरोपांत आणि अमेरिकेंत हजारों असून, त्यांत दरवर्षी किती असंख्य कोटि पक्ष्यांच्या शवांचा व्यापार होतो ह्याचा अदमास कोणाच्यानें करवेल! ह्या शिवाय किती असंख्य पांखरांच्या पिल्लांचा निरर्थक नाश झाला असेल तो निराळाच. आईबापें खुराक आणण्यास गेलीं तोंच कोणी दुष्टानें त्यांचे प्राण घेतले;

इकडे घरकुल्यांत दोनचार पिलें भुकेमुळें चोंची वासून चिव चिव करून करुणस्वरानें आईला हांका मारीत आहेत, पण त्यांस उत्तर देण्यास आई जिवंत नाहीं; त्यांस पुरते पंख फुटले नसल्यामुळें स्वतः बाहेर जाऊन खुराक शोधून खातां येत नाहीं. तीं ओरडत ओरडत एक दोन दिवसांनीं भुकेनें मरून जातात! अरेरे! त्यांची ती स्थिति आठवून ज्याच्या डोळ्यांला पाणी येणार नाहीं असा पाषाण जगांत असेल तर तो मनुष्यजातीचा कलंक आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं! पांखरें लावलेल्या टोप्या घालणाऱ्या बहुतेक बायकांना त्या चालीपासून जगाची केवढी हानि होते व पांखरांना किती दुःख भोगावें लागतें हें ठाऊक असतें, तर त्यांनीं खचीतच ती चाल सोडून दिली असती. आलीकडे पाश्चात्य राष्ट्रांमधून "ओडुबोन्"नांवाच्या मंडळ्या स्थापन झाल्या आहेत. पांखरांचें संरक्षण करणें हा ह्या मंडळ्यांचा उद्देश आहे; त्यांच्या उद्योगास आशानुरूप यश येवो अशी आमची ईश्वरापाशीं प्रार्थना आहे.

गालांना आणि नखांना गुलाबी रंग चोळून, पांढरी पूड लावून शोभा आणणें, हेंही नखऱ्याचें एक अंग आहे. म्हातारपणीं किंवा तरुणपणींही कांहीं विकारामुळें डोक्याचे केंस गेल्यास खोट्या केंसांचा टोप आणि बुचडा घालून मस्तकास शोभा आणणें, हें तर सर्वत्र रीतिसिद्ध आहे. केंस कुरळे दिसावे म्हणून रात्रीं निजण्याच्या पूर्वीं शिंगाच्या काड्या, किंवा कागदाच्या वळ्या घेऊन त्यांभोंवतीं केंस गुंडाळून पाणी लावून, चिमटे तापवून त्यांनीं केसांच्या गुंडाळ्या दाबून, केंस कुरळे करतात. कोणी कोणी तेल आणि मयार्क लावून कपाळावर उलट्या तुर्की कमानीसारख्या केंसांच्या पट्ट्या जमवितात.

मध्यवयांत दांत पडूं लागले म्हणजे त्यांच्या जागीं खोटे दांत बांधायाची चाल आमच्या देशांत सुद्धां कोठें कोठें चालू आहे. इकडे कृत्रिम दांत

तोंडांत घालणें म्हणजे "वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोपराणि ।" ह्यासारखें आहे. इकडच्या कुशल कारागिरांनीं कृत्रिम दांतांस हुबेहुब खऱ्या दांतांइतकें उत्तम बनवून टाकलें आहे. कोणी सुंदर तरुणीचे दांत वांकडे तिकडे असल्यास ती दंतवैद्याकडे जाऊन आपले दांत उपटून टाकून, त्यांच्या जागीं सुरेख कृत्रिम दांत घालून मुखाला शोभा आणते. "तुमचे दांत खरे आहेत काहो?" असा प्रश्न मला कांहीं थोड्याथोडक्यांनीं विचारला नाहीं. फिलाडेल्फियाच्या एका वृद्ध बाईला तर माझें तोंड उघडून त्यांतील टाळू आणि इतर भागांची परीक्षा करून पाहाण्यापूर्वी माझे दांत "खरे" आहेत ह्या गोष्टीची खात्रीच येईना. हे लोक अतिशय मांस खातात म्हणून कीं काय कोण जाणे, ह्यांचे दांत जात्या बळकट नसून ते लवकरच पडतात. कृत्रिम दांतांचा ह्यांस फार उपयोग आहे; ते केवळ तोंडाला शोभा आणतात इतकेंच नव्हे, तर घट्ट आणि चिवट पदार्थ चावून खाण्यांत त्यांचा फार उपयोग आहे.

बायकांप्रमाणेंच पुरुषांमध्येंही कांहीं नखरे असलेले पाहाण्यांत येतात. पण, पुरुष वरकांति अगदीं साधे साळेभोळे दिसण्याचा प्रयत्न करीत असतात. नखरे करणारे पुरुष बहुतकरून अगदीं तरुण किंवा श्रीमंतांचे मुलगे हे होत. गरीब मुलगेदेखील श्रीमंत व उधळे लोकांचे नखरे व पोशाकाची तऱ्हा पाहून, मोठ्या डौलानें त्यांचें अनुकरण करतात. दररोज तीनचारदां पोशाक बदलायाचा, निरनिराळ्या तऱ्हेचे पोशाक करायाचे, टोपी डोक्यास घालायाची ती अंमळशी वांकडी असायाची, मिशांवरून हात फिरवीत असायाचें; हातांत बारीकशी छडी, ऐटबाजीचें चालणें, ऐटीनें बोलणें, इत्यादि कित्येक प्रकार पुरुषांच्या नखऱ्यांत मोडतात. पुरुषांचा पोशाक युरोपियन तऱ्हेचा एकरंगी (बहुतकरून काळ्या किंवा भुऱ्या रंगाचा, व त्याच रंगाची टोपी) आणि साधा असतो. तो नेसून काम करण्यास अडचण

मुळींच पडत नाहीं. तो उद्योगी व अष्टौप्रहर सगळ्या प्रकारचें काम करणाऱ्या मनुष्यास फार सोइस्कर असतो. धर्माचार्यांचा पोशाक साधारण लोकांच्या पोशाकाहून थोडासा निराळ्या तऱ्हेचा असतो; म्हणजे त्यांचे अंगरखे गुडघ्यांपर्यंत पोंहोंचतील इतके लांब असतात. मेजवानीला वगैरे जाण्याच्या वेळीं घालायाचे पोशाक उंची कापडाचे असून, कांहीं पाहण्यास सुरेख व कांहीं वाईट तऱ्हेचे असतात.

युनाइटेड् स्टेट्स्च्या पुरुषमंडळींत साधारणतः दोन व्यसनांचा अतिशय प्रसार झालेला आहे; त्यांपैकीं एक दारू पिणें, व दुसरें चिरूट ओढणें. ज्या ऑंग्लोसाक्सिन जातीपासून अमेरिकन लोकांपैकीं बहुतेकांची उत्पत्ति झाली आहे त्यांचे पूर्वज फार प्राचीनकाळापासून 'बीर' नांवाची दारू पीत असत. पुढें नवीं नवीं बहुतप्रकारचीं मद्यें निर्माण होऊं लागलीं, त्याबरोबर त्यांचें मद्यपानाचें व्यसनही अधिक वाढूं लागलें. हें युनाइटेड् स्टेट्स्चें राष्ट्र स्वतंत्र झाल्यापासून आजपर्यंत एथें येऊन वसाहत करण्याकरितां म्हणून युरोपांतील बहुतेक सगळ्या जातींचे लोक एकसारखे या स्वतंत्र राष्ट्राकडे येत आहेत. दरवर्षीस लक्षावधि मनुष्यें वसाहती करण्यास युनाइटेड् स्टेट्स्मध्यें येत आहेत. ह्यांमध्यें, जर्मन, इटालियन आणि आयरिश ह्यांची संख्या फार असते. हे लोक मद्यपानाच्या संबंधानें फार प्रसिद्धीस आले आहेत. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें त्यांचा भरणा फार झाल्यामुळें, त्यांचें पाहून मूळच्या अमेरिकन लोकांच्या आंगचें मद्यपानाचें दुर्व्यसन फारच वाढलें. त्याचप्रमाणें तमाखू पिण्याचेंही व्यसन अतिशय वाढलें आहे. ह्या दोन व्यसनांचें प्राबल्य केवढें आहे, हें खालीं दिलेल्या युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय वार्षिक खर्चाच्या आकारावरून सहज समजून येईल. हे लोक दरवर्षीस खालीं लिहिल्याप्रमाणें खर्च करितातः—

| | रु. कोटि. | लक्ष. | | रु. कोटि. | लक्ष. |
|---|---|---|---|---|---|
| धर्मप्रसारार्थ. | १ | ६५ | जोडे मोजे वगैरे घेण्यांत. | ५९ | १० |
| धर्माचार्यांच्या पगाराकरितां. | ३ | ६० | लोखंड वगैरे धातु घेण्यांत. | ७८ | ८० |
| विद्याप्रसारार्थ. | २८ | ८० | मांस खाण्यांत. | ९० | ९० |
| चाहाकाफी पिण्याकरितां. | ४३ | ५० | भाकरी खाण्यांत. | १६१ | ५० |
| साखरगूळ खाण्याकरितां. | ४६ | ५० | तमाखु खाण्यांत. | १४७ | |
| | | | मद्य पिण्यांत. | २७० | |

मद्यपानापासून लोकांच्या आरोग्याची आणि राष्ट्राची केवढी हानि होत आहे हें पाहून, लक्षावधि अमेरिकन स्त्रिया आणि पुरुष मद्यपानाचा निषेध करीत आहेत. हल्लीं अमेरिकन लोकांमध्यें नानाप्रकारच्या अनीतीचा जो प्रसार झालेला आहे तो बहुतेक वर सांगितलेल्या दोन व्यसनांपासून उद्भवलेला आहे, असें म्हटल्यास चिंता नाहीं.

## जातिभेद आणि जातिमत्सर.

"पळस कोठें गेला तरी त्याला तीनच पानें" असावयाचीं. मनुष्यप्राणी पाहिजे तेथे आणि पाहिजे त्या स्थितींत असो; त्याच्या आंगच्या गुणदोषांत फारसा फेरफार झालेला दिसून येत नाहीं. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें हीं एथील संपत्ति, विद्या, सुधारणा यांविषयीं प्रसिद्ध आहेत, हें योग्यच आहे; परंतु जातिभेद आणि जातिमत्सर हे जे सर्व सुधारणेचे व सौजन्याचे हाडवैरी ते ह्या देशांत अगदीं नाहींत असें नाहीं.

ह्या लोकांचे पूर्वज जेव्हां इंग्लंडांतून इकडे निघून आले, तेव्हां त्यांनीं सगळ्या जुन्यापुराण्या इंग्रजी चाली आपल्याबरोबर आणल्या. ह्यांचा देश स्वतंत्र झाल्यावर "सर्व ईश्वरसृष्ट मनुष्यें समान आहेत," ह्या त्यांच्या स्वातंत्र्यनीतिसूत्रास अनुसरून त्यांना प्राचीन इंग्रजी जातिभेदाच्या चालींत पुष्कळ

फेरफार करावे लागले. तथापि इ. स. १८६२ पर्यंत सदरील नीतिसूत्र सर्वांस लागू नव्हतें. हबशी जातीच्या मनुष्यांस गुरांप्रमाणें विकत घेण्यादेण्याचा जो त्यांचा संप्रदाय होता; त्यामुळें निग्रो जात गोऱ्या जातीच्या मनुष्यांपेक्षां जन्मतः नीच आहे, असा ह्यांचा समज होऊन गेला. निग्रो दास्यांत असतां, त्यांच्याबरोबर एका पंक्तीस बसून जेवणखाण करणें, त्यांच्याशीं लग्नसंबंध करणें वगैरे फार निषिद्ध मानलें जात होतें, तें अद्यापिही तसेंच आहे. निग्रो दास्यमुक्त झाला खरा परंतु त्याच्या जातीविषयीं गोऱ्याच्या मनांत जो तिरस्कार उत्पन्न झाला होता, तो अद्यापि तसाच आहे. मी आजवर शेंकडों ठिकाणीं जेवायाला वगैरे गेलें, परंतु निग्रो गोऱ्याच्या पंक्तीला बसून जेवीत असलेला कोठें माझ्या पाहाण्यांत आला नाहीं इतकेच नव्हे; तर देवाच्या परम पवित्र मंदिरांत उपासनेच्या वेळींही निग्रो गोऱ्याच्या शेजारीं बसलेला फारच विरळा पहाण्यांत आला. निग्रो जातीचीं भजनमंदिरें निराळींच असतात; आणि त्यांचे उपदेशकही बहुतकरून तज्जातीय असून ते गोऱ्यांच्या समाजांत असलेले फारसे कोठें दृष्टीस पडत नाहींत.

निग्रो जातीच्या मनुष्यांना दास्यमुक्त होऊन अजून पुरीं पंचवीस वर्षें झालीं नाहींत, इतक्यांतच त्यांनीं आपल्या उद्योगाच्या बळानें आपल्या जातीची जी उन्नति करून घेतली आहे, ती पाहिली म्हणजे त्यांच्या दीर्घप्रयत्नाची व स्वावलंबनाची शाबास आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. पंचवीस वर्षांखालीं निग्रो जातीच्या मनुष्यांला लिहिण्यावाचण्याची मनाई होती. ते जन्मले तसेच गुरांप्रमाणें वाढायाचे आणि गुरांप्रमाणेंच विकत घेईल त्या माणसाची जिवापाड सेवाचाकरी करून शेवटीं गुरांप्रमाणेंच मरायाचे. कायद्याच्या दृष्टीनें ते मनुष्य नव्हते. मनुष्याचे कोणतेही हक्क त्यांला नव्हते. मनुष्यसमाजामध्यें सामाजिकबंधनाला दृढत्व आणणारा असा सर्वांत पवित्र

जो विवाह, तो देखील कायदेशीर रीतीनें करण्याचा हक्क त्यांला नव्हता. पण धन्य असो विल्यम् लॅाइड ग्यारिसन, इलिजाबेथ हेरीक्, लुक्रेशिया माट, वेंडेल फिलिप्स, ह्यांसारख्या कित्येक सज्जनांची! त्यांनीं नानाप्रकारचे कष्ट, विपत्ति, आणि विरुद्धलोकमत यांपासून उद्भवणारी यातना भोगून युनाइटेड् स्टेट्स्‌चें लोकमत निग्रोजातीस दास्यमुक्त करण्यास अनुकूल करून, सर्व मनुष्यजातीवर जो उपकार केला आहे, तो कधीं फेडवणार नाहीं. इ० स० १८६५ त दास्यमुक्त होऊन अमेरिकन यादवी संपल्यापासून आजपर्यंत सज्जनांच्या मदतीनें आणि स्वपराक्रमानें अमेरिकन निग्रो पशुत्वांतून निघून मनुष्यत्वाप्रत प्राप्त झाला आहे. त्याच्या जातींतील मनुष्यें आतां कोणी शिक्षक, कोणी उपदेशक, कोणी वकील, कोणी वैद्य, कोणी व्यापारी, आणि कोणी युनाइटेड् स्टेट्स्‌च्या राष्ट्रीयसभेंत कारभारी देखील झाले आहेत. आतां युनाइटेड् स्टेट्स्‌च्या गोऱ्या जानपदाला जे जे हक्क आहेत त्यांपैकीं एक देखील हक्क काळ्याला नाहीं असें नाहीं, आणि ह्यापुढें कांहीं काळानें आतां जसा काळ्या गोऱ्या माणसांचा पंक्तिभेद होत आहे, तसा तो होणार नाहीं अशीं सुचिन्हें दिसून येत आहेत.

साधारण अमेरिकन लोक अमेरिकेचे मूळचे रहिवासी तांबडे इन्दियन ह्यांचा देखील फार द्वेष करितात. युनाइटेड् स्टेट्स्‌च्या सरकारानें निरनिराळ्या इन्डियन जातीशीं तह करून त्या तहाप्रमाणें आपलें आचरण ठेविलें नाहीं. त्यांच्याकरितां राखून ठेविलेल्या जमिनी तहांतील प्रतिज्ञा मोडून त्यांच्यापासून हिसकावून घेतल्या, आणि उलट आपण साव बनून इन्डियन लोकांनांच चोर बनविलें. आतां कांहीं सज्जन अमेरिकन ह्या आपल्या तांबड्या देशबंधूंच्या उन्नतीकरितां परिश्रम करून झटत आहेत. लोकलज्जेस्तव युनाइटेड् स्टेट्स्‌च्या सरकारानें आपल्या खजिन्यांत जमा असलेल्या इन्डियन लोकांच्या पैशानें इन्डियन मुलांकरितां दोनचार उद्योगशाळा स्थापिल्या

आहेत. त्यांमध्यें व्हर्जिनिया संस्थानांतील "ह्याम्टन् इन्स्टिटयूट्", पेन्सिल्वेनियांतील "कार्लायल् इन्डियन् स्कूल्" आणि फिलाडेल्फियांतील "लिंकन् इन्स्टिटयूट" ह्या उद्योगशाळा फार चांगल्या चाललेल्या आहेत. इन्डियन लोकांस अमेरिकन जानपदाचे कोणतेच हक्क नाहींत, इतकेंच नव्हे; तर त्यांस युनाइटेड् स्टेट्स्च्या साधारण न्यायगृहांत कोणावर फिर्याद करण्याचा देखील हक्क नाहीं. निरनिराळ्या जातींच्या इन्डियन् लोकांनीं अमुक अमुक ठिकाणीं रहावें म्हणून युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकारानें कांहीं जागा नेमून दिल्या आहेत, त्यांस "इन्डियन् रेझर्व्हेशन्" म्हणतात. त्यांच्या हद्दीच्या बाहेर कोणी इन्डियन आला कीं, तो एक तर अमेरिकन शिकारी मनुष्याच्या बंदुकीच्या तोंडीं प्राणास मुकतो, नाहींतर हुकुमावांचून आपल्या रेझर्वेशनच्या बाहेर आला म्हणून न्यायाधीशाच्या तावडींत सांपडून शिक्षा भोगतो. ह्या रेझर्वेशनांतून युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकाराकडून इन्डियन् लोकांवर देखरेख करण्याकरितां आलेला एकेक गुमास्ता राहात असतो; त्याला 'इंडियन् एजन्ट्' म्हणतात. हा 'एजन्ट' म्हणजे इन्डियन लोकांवर एकच्छत्र राज्य करणारा, सर्वसत्ताधारी मनुष्य असतो. युनाइटेड् स्टेट्स्चें सरकार त्या रेझर्वेशनवरच्या इन्डियन लोकांस खाण्यापिण्याला लागणारे पदार्थ पुरविण्याचें काम त्याच्यावर सोंपून देतें. हा मनुष्य करील ती पूर्वदिशा, आणि म्हणेल तें वेदवाक्य. इन्डियन् एजन्टांमध्यें प्रामाणिक असे फारच थोडे असतात. त्यांच्या हातून बिचारे इंडियनांचे फार हाल होतात. इन्डियन लोक त्यांच्या अज्ञानामुळें किंवा अंगस्वभावामुळें म्हणा, फार सहनशील आहेत. ते सहसा आपली कागाळी सरकाराच्या कानापर्यंत जाऊं देत नाहींत; आणि ती गेली तरी सरकारांत त्यांची दाद लागण्याचा संभव फार थोडा असतो. दयाळू लोकांच्या सांगण्यावरून साधारण लोकमत कधीं कधीं इन्डियनांस अनुकूल असें झालें, म्हणजे लोकलज्जेस्तव सरकार

त्यांची खरी स्थिति जाणण्याकरितां " कमिशनें " नेमीत असतें. ह्या कमि- शनांमध्यें चांगले निष्पक्षपाती स्त्रीपुरुष असतात. त्यांनीं आजपर्यंत इंडि- यन लोकांवर केवढा जुलूम होत आहे तो अमेरिकन जानपदांच्या लक्ष्यांत आणण्यास पुष्कळ परिश्रम केले आहेत, व ते कांहीं अंशीं सफळही झाले आहेत. कित्येक दयाळू स्त्रीपुरुषांनीं मिळून इन्डियन लोकांच्या हितार्थ एक सभा स्थापन केली आहे, तिच्या शाखा युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें पुष्कळ ठिकाणीं आहेत. इन्डियन लोकांचें खरें हित करणाऱ्या लोकांमध्यें हेले- न् हंट् नांवाची बाई श्रेष्ठ होती, असें म्हटलें पाहिजे. तिनें ऐतिहासिक प्रमाणांवरून आणि प्रत्यक्ष अनुभवावरून, इन्डियन लोकांची खरी स्थिति कशी आहे, हें अमेरिकन जानपदांस सांगण्यापूर्वीं तिजविषयीं कोणाला पक्की माहिती नव्हती. हेलेन् हंट् ह्यां बाईला युनाइटेड् स्टेट्स्‌च्या सरकारानें इन्डियन् कमिशनर नेमिलें होतें. तिनें पांच साहा वर्षांपर्यंत घोर अरण्यांत त्या रानटी मनुष्यांच्या सहवासांत राहून, त्यांच्या खऱ्या स्थितीचें वर्णन करून " ए सेंचुरी आफ् डिस्‌आनर् " नांवाचें पुस्तक लिहिलें. तें वाचून युनाइटेड् स्टेट्स्‌च्या लोकांचे डोळे उघडले. हिनें कादंबरीरूपानें इंडियन लोकांच्या वाईट स्थितीचें वर्णन करून " रमोना " नांवाचें एक पुस्तक लिहिलें. तिनें इन्डियन लोकांच्या हिताकरितां जे पुष्कळ श्रम घेतले, ते आतां कांहीं अंशीं सफळ होत चालले आहेत. आलिस् फ्लेचर नांवाची ति- च्याच तोडीची आणखी एक बाई " विनेबेगो " आणि ओमहा " नांवाच्या दोन इंडियन जातींच्या हिताकरितां अश्रांत श्रम करीत आहे. तिच्या आणि तिच्या मित्रांच्या उद्योगास यश येऊन, ह्या दोन जातींस युनाइटेड् स्टेट्स्‌च्या सरकारानें त्यांच्या " रेझर्वेशन " वरची जमीन लागवडीस आणण्याचा हक्क दिला आहे. ते लोक आतां चांगली शेतकी करूं लागले असून दुसरेही धंदे शिकूं लागले आहेत. आणखी कांहीं वर्षांनीं त्यांना लिहिणें वाचणें व

साधारण धंदे येऊं लागून मनुष्यसमाजामध्यें ज्या गोष्टी व नियम अवश्य असले पाहिजेत, ते समजूं लागले म्हणजे त्यांस युनाइटेड् स्टेट्स्च्या जानपदांचे सगळे हक्क मिळावे असा ठराव झालेला आहे. "इंडियन टेरिटोरी" नांवाच्या उपसंस्थानांत "चेरोकी इंडियन्" नांवाची एक जात आहे. तींतील मनुष्यांनीं आपल्या बुद्धीच्या व उद्योगाच्या बळानें आपली जी उन्नति करून घेतली आहे, ती पाहून आश्चर्य वाटतें. त्यांनीं आपल्या "रिझर्वेशन" मध्यें युनाइटेड् स्टेट्स्च्या राज्यशासनपद्धतीच्या धर्तीवर एक शासनपद्धति स्थापून आपलें लहानसें संस्थान युनाइटेड् स्टेट्स्च्या अमेरिकन संस्थानाच्या बरोबरीचें केलें आहे. ह्या इंडियन जातींतल्याच एका मनुष्यानें आपली भाषा लिहिण्याकरितां मूळाक्षरें कल्पून भाषालेखनाची पद्धति सुरू केली होती. ह्या उन्नतशील "चेरोकी" इंडियनलोकांनीं आपल्या जातींतील दास विकत घेण्यादेण्याची चाल अजीबात बंद करून टाकली आहे. त्यांनीं सगळ्या रानटी चाली सोडून दिल्या आहेत; व आपल्या लोकांमध्यें विद्याप्रसार करण्याकडे विशेष लक्ष्य लाविलें आहे. ह्या चेरोकी लोकांप्रमाणेंच इतर जातींच्या इंडियन लोकांनीं आपली उन्नति करून घेण्याचा उद्योग केल्यास त्यांची स्थिति लवकरच सुधरेल.

जपानी लोक आपल्या देशांत येऊन राहिले आणि युनाइटेड् स्टेट्स्चे जानपद बनले तरी कांहीं चिंता नाहीं असें अमेरिकन लोकांस वाटतें; तथापि चीन्यांचा ह्यांना मोठा तिटकारा आहे. चीनी लोक आपल्या देशांत आले म्हणजे जपान्यांसारखे स्वदेशी पोशाक टाकून अमेरिकन तऱ्हेचा पोशाक करीत नाहींत; ते आपली शेंडी कापीत नाहींत, आपले लांकडी तळव्याचे जोडे टाकून अमेरिकन कातड्याचे जोडे घालीत नाहींत, अशाच कांहीं क्षुद्र कारणांवरून अमेरिकन लोक चीन्यांचा द्वेष करितात; हें ह्या सभ्य म्हणविणाऱ्या स्वातंत्र्यप्रिय जातीस मोठें लांछन

आहे. चीनी लोक जात्या मोठे उद्योगी असून ते दूरदूर परदेशीं जाऊन कामधंदे करीत असतात. ते मोठे मिताचारी व मितव्ययी असतात. त्यांना युरोपियनांसारखा अद्वातद्वा खर्च करण्याचें वळण नसून ते एकपट कामास चौपट मजुरी घेत नाहींत. हलक्या मनाच्या पाश्चात्य लोकांना ह्या कारणामुळें त्यांचा मत्सर वाटतो. ते म्हणतात हे चीनी धंद्याचें मोल फार हलकें करतात. हे फार हलक्या स्वभावाचे, मळीण, ह्यांची नीति फार वाईट, हे इकडे येऊन आमची नीति बिघडवितात, इ० इ०. चीनी लोकांत कांहीं सद्गुण नाहींत, ते केवळ दोषांचे ठेवेच असून त्यांचा स्पर्श किंवा सहवास झाल्यानें आपली नीति बिघडेल, असें पुष्कळ पाश्चात्य लोकांस वाटत असतें. ह्यामुळें त्यांपैकीं कित्येक दुष्ट स्वभावाचे जन चीनी मनुष्यांचा मनापासून द्वेष करतात. ते आपल्याकडून होईल तसें करून चीन्यांस गांजतात, कोणी त्यांचीं घरें लुटतात, कोणी त्यांची कत्तल करतात, कोणी त्यांविषयीं देशी लोकांच्या मनांत वाईट समज भरवून देण्याच्या उद्योगांत असतात. दोन वर्षांपूर्वीं कांहीं अदूरदर्शी लोकांनीं उत्तर संस्थानांत राहत असलेल्या चीन्यांची फारच दुरवस्था करून, कित्येकांस तर जिवें मारलें. तरी इकडे समजदार लोक नाहींत असें नाहीं. ते दुर्बळ निरुपद्रवी चीन्यांचा कैवार घेऊन आपल्याकडून होईल तितकें त्यांचें हित करतात. कित्येक शोधक अनुभवी ग्रंथकारांनीं पुस्तकें व निबंध लिहून, चीनी लोक अगदींच वाईट नसून त्यांच्या अंगीं कांहीं गुणही आहेत, असें सिद्ध करून दाखविलें आहे. कोणी चीन्यांच्या हिताकरितां मंडळ्या स्थापन केल्या आहेत.

आयरिश्, जर्मन्, स्कांडिनेवियन्, इटालियन्, रशियन्, इत्यादि जातींचे लोक आपल्या देशच्या राज्यसत्तेला, जुलुमाला किंवा दरिद्राला त्रासून इकडे येतात, त्यांचाही बहुतांस मोठा द्वेष वाटतो; परंतु ते चीनी लो-

कांसारखे अगदींच टाकाऊ आहेत असे समजले जात नाहींत, कारण त्यांच्या कातडीचा रंग आणि मुखाकृति ह्या इंग्रजी ताम्रमुख्याच्या रंगाशीं व आकृतीशीं बहुतेक जुळतात. एकमेकांवर दोषारोप करण्याची संवयही ह्यांस आहे. राज्यांत कांहीं दंगा झाला म्हणजे कोणी म्हणतो ह्याचें मूळकारण हे आयरिश् लोक होत. राज्यांत मद्यादिक मादक पदार्थांचा मोठा कहर झालेला पाहून कोणी म्हणतात, अहो हे जर्मन जातीचे लोक ह्याचें कारण; ते कीं नाहीं जात्या अतिशय पानासक्त आहेत ! अनीतीचा प्रसार झाला म्हणजे बिचाऱ्या चीन्यांच्या डोक्यावर सगळ्या दोषांचें खापर फुटायाचें. वाईट स्वभावाचे अधिकारी निवडले गेल्यास, निग्रो जातीच्या लोकांनीं लांच घेऊन आपलीं मतें दिलीं त्यामुळें असले अधिकारी आमच्या वांट्यास आले म्हणून बोभाटा व्हायाचा. असे एक का दोन, निरनिराळ्या तऱ्हेचे पुष्कळ जातिमत्सर चोहोंकडे असलेले पाहण्यांत येतात. ह्याचें कारण एकमेकांविषयीं अज्ञान व अज्ञानमूलक दुष्ट समजुती ह्यावांचून दुसरें कांहीं नाहीं.

युनाइटेड् स्टेट्स्च्या सर्व साधारण लोकांत असा जातिभेद व जातिमत्सर असलेला दिसून येतो तो ह्या देशांतील एकीला व संपन्नतेला महाघातक आहे असें समजून, पुष्कळ समजदार मनुष्यें तो नाहींसा करण्यास झटत आहेत. पुष्कळ सज्जन निग्रो, इंडियन, चीनी इत्यादि अति तिरस्कृत मनुष्यांस तीं आपल्यासारखींच मनुष्यें आहेत असें समजतात. इतकेंच नव्हे; तर आपल्यासारखी दैवानुकूलता त्यांस असल्यास तीं सर्व गोष्टींत आपली बरोबरी करतील अशीही ह्या सुजनांची खात्री आहे. परंतु एकदा पडून गेलेली चाल एकदम नाहींशी करणें हें सोपें नाहीं. निग्रो वगैरे अगौर जाती कनिष्ठ प्रतीच्या आहेत असा समज जणूं काय सर्वांच्या अंगीं खिळून गेलेला आहे. तरी इकडचा जातिभेद

आणि जातिमत्सर हिंदुस्थानांतील जातिभेदाच्या थराला जाऊन पोंहोंचण्याची मुळींच भीति नाहीं. दिवसेंदिवस जसजशी सुधारणेची वृद्धि होते, आणि लोकांत ज्ञान वाढत जातें, तसतसा त्या अज्ञानमूलक जातिमत्सराचा ऱ्हास होत जात आहे. धर्मनीतीचे आणि विद्येचे देशहितैषी उपदेशक, लहान मुलांना शाळांतून व मोठ्या मनुष्यांना धर्मसमाजांतून वाक्यांनीं आणि करणीनें सदुपदेश देऊन, एकमेकांशीं सौजन्यानें वागून सर्वांस समान जाणण्यांतच आपलें व देशाचें हित आहे, असें त्यांच्या मनांत बिंबवून देत आहेत. ह्या योगानें दिवसेंदिवस जातिभेद आणि जातिमत्सर कमी होत जाऊन लोकांत परस्परांविषयीं प्रीति, सौजन्य आणि सन्मान वाढत जात आहे. दक्षिणसंस्थानांतून जेथें सर्व साधारण लोक निग्रोला गाढवासारखा किंवा त्याहूनही नीचतर पशूसारखा मानीत होते, तेथें देखील कालमानाप्रमाणें चालीरीति आणि समज बदलत चालले आहेत. पंचवीस वर्षांपूर्वीं काळा आणि गोरा मनुष्य एका पंक्तीस जेवायास बसत नव्हता इतकेंच नव्हे; तर निग्रोला गोऱ्याबरोबर एका डब्यांत किंवा एका गाडींत देखील बसून जाण्याची परवानगी नव्हती. आतां निग्रो गोऱ्या माणसांबरोबर घोड्याच्या किंवा आगीच्या गाडींत बसून प्रवास करूं लागला आहे. गाडींत बहुत गर्दी असून तेथें एखादि निग्रोबाई आल्यास, कोणी शिष्ट गोरा मनुष्य आपण उठून तिला बसायाला जागा करून देण्यांत आपला अपमान होतो असें समजत नाहीं. कधीं कधीं आगगाडीच्या स्टेशनामधील भोजनगृहांत लोकांची फारच गर्दी असून दुसरी कोठें जागा रिकामी नसल्यास, एखाद्या काळ्या मनुष्याला देखील गोऱ्याच्या पंक्तीला बसविण्यांत येतें.

## स्वभाव.

साधारणतः अमेरिकन लोकांच्या आंगीं जे गुण असलेले दिसून येतात,

ते एकंदरींत फार चांगले व अनुकरणीय आहेत. हे लोक बहुतकरून खरें बोलणारे व धर्माचा सन्मान राखणारे आहेत, परंतु अति धार्मिक किंवा फार सत्यशील नाहींत. हे आपल्या मुलांवर फार ममता करितात, आणखी आपल्या मातापितरांवर त्यांची फार प्रीति असते. मुलांचीं आईबापें आपल्या आपत्यांचें हित व उन्नति व्हावी म्हणून फार काळजी व मेहनत घेत असतात. मुलांस उपयुक्त विद्याशिक्षण मिळण्याकरितां हे कितीही पैशाचा खर्च आणि परिश्रम करण्यास मागें सरत नाहींत. मुलांवर बेतापेक्षां अधिक सत्ता चालवून त्यांच्या स्वातंत्र्याचें हरण करीत नाहींत. तरी मुलें म्हणजे आईबापांस योग्य सन्मान देण्यांत कमी करतात असें नाहीं. मुलगे आणि विशेषेंकरून मुली आपल्या आईबापांची सेवा करून त्यांचा अनुग्रह संपादण्यास फारच उत्सुक असतात. मीं अशीं पुष्कळ उदाहरणें पाहिलीं आहेत कीं, जेथें मुलींस चांगल्या श्रीमंत व विद्वान आणि योग्य वराचें मागणें आलें असून, त्यांनीं लग्न झाल्यावर आपल्या म्हाताऱ्या आईबापांना सोडून जावें लागेल, व त्या वृद्ध मनुष्यांची सेवा करण्यास कोणी राहणार नाहीं, ह्या भयानें विवाह करण्याचें नाकारिलें. पुष्कळांनीं चांगल्या मोठ्या पगाराच्या जागा आणि मोठाले पगार मिळत असून ते घेण्याचें नाकारिलें, अशीं स्वार्थत्यागाचीं उदाहरणें बायकांतच फार दिसून येतात. पुरुष कामाच्या निमित्तानें आपल्या आईबापांला सोडून दूर जाण्याचे राहत नाहींत; आणि त्यांस जवळ ठेवून घेणें, व आपल्या हिताकरितां मुलाच्या उन्नतीच्या आड येणें हें न्याय्य आहे, असें अमेरिकन आईबापांस वाटत नाहीं. (विलायतेस विद्याभ्यासाकरितां किंवा इतर कामाकरितां दूरदेशीं आपल्या मुलांस जाऊं न देणाऱ्या, हिंदुस्थानांतील आईबापांनीं वरील गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ज्या अति प्रीतीच्या योगानें त्यांस आपलीं मुलें आपल्यापासून दूर जाऊं नयेत असें वाटतें, ती मुलांच्या उन्नती-

च्या आड येणारी प्रीति नव्हे; तर तो आपलपोटेपणाचा एक प्रकार आहे.) अमेरिकन आईबापें मुलांच्या लहानपणीं त्यांचा चांगला सांभाळ करितात, व त्यांस विद्या देऊन कांहीं तरी उद्योगाला लावतात. मुलें उद्योग करण्यासारखीं झालीं म्हणजे मग मात्र त्यांचे फाजील लाड करीत नाहींत. वीस वर्षांच्या पूर्वीं अमेरिकन लोकांमध्यें मुलांस मालमत्ता वांटून देण्याचे प्रकार कांहींसे रानटी लोकांप्रमाणें होते. त्या काळीं मुलींना आईबापांच्या मालमत्तेचा वांटा फारच थोडा मिळत असे. पण आतां दायभागाच्या संबंधानें यु. स्टे. चे कायदे पुष्कळ अंशीं सुधारत चालले आहेत. मुलांस आणि मुलींस आपलें धन सारख्या मानानें वांटून देण्याची चाल वरीच प्रचारांत येऊं लागली आहे. मुलांस चांगलें विद्याशिक्षण देऊन त्यांस कोणत्या तरी एका उद्योगास लावणें येथपर्यंतच बहुतकरून मुलांविषयीं आईबापांची जबाबदारी असते. मुलें मोठीं होऊन आपला उद्योग पाहण्यास समर्थ झालीं म्हणजे आईबापें त्यांविषयीं फारशी चिंता बाळगीत नाहींत. आलीकडे युनाइटेड् स्टेट्स्‌च्या लोकांमध्यें स्त्रियांविषयीं पूज्यबुद्धि वाढत चालली आहे. ह्याचें प्रमाण हेंच कीं, पूर्वीं पुरुष बायकांना अगदीं अज्ञान व अयोग्य समजून मरतेवेळीं आपल्या मालमत्तेचें व लहान मुलांचें संरक्षण चांगल्या रीतीनें व्हावें म्हणून कोणत्या तरी पुरुषास त्यांचे कायदेशीर पाळक आणि ट्रस्टी नेमीत असत. पण आतां मोठाले श्रीमंत आणि मध्यप्रतीचे पुष्कळ लोक आपल्या बायकांना किंवा बहिणींना आपल्या मुलांच्या व मालमत्तेच्या संरक्षक नेमूं लागले आहेत. पुष्कळ अनुभवी आणि माहितगार अमेरिकन लोकांच्या सांगण्यावरून असें कळतें कीं, ह्यांच्यामध्यें पुरुषांपेक्षां बायका अधिक नीतिमान् आहेत. साधारणतः स्त्रिया मर्यादशील, सद्गुणी आणि पतिव्रता असतात. पण बहुत पुरुष पत्नीव्रत पाळावें तसें पाळीत नाहींत असें ऐकिलें. एकंदरींत अमेरिकन लोक

दयावान्, सभ्य, उदार, नीतिमान्, उद्योगी आणि उन्नतिशील आहेत, असा त्यांच्याविषयीं माझा अभिप्राय आहे.

## ऋतुमान.

अमेरिकन लोक आंग्लोसाक्सन जातीच्या चालीप्रमाणें वर्षांत चारच ऋतु आहेत असें मानतात. मार्च, एप्रिल आणि मे, हा वसंत; जून, जुलाइ आणि आगस्ट, हा ग्रीष्म; सप्तंबर, आक्टोबर, आणि नवेंबर, हा हेमंत; आणि डिसेंबर, जानुआरी आणि फेब्रुआरी हा शिशिर्. ह्या चार ऋतूंमध्यें जमीनीच्या स्थितीची व उष्णशीतादि कालगुणांची जशी उलटापालट होते, त्याचप्रमाणें ह्या लोकांच्या पेहरावांचा, उत्सवांचा, घरांतील सामानाचा आणि खाण्यापिण्याच्या पदार्थांचा देखील फेरबदल झालेला दिसून येतो. प्रत्येक ऋतूच्या आरंभीं त्या त्या ऋतूला शोभणाऱ्या व त्यांत अवश्य लागणाऱ्या पदार्थांचा दुकानांतून मोठा भरणा असतो. वर्तमानपत्रें, जुन्या घरांच्या पडीक भिंती, चवाठ्यांचे कोंपरे आणि दुकानांच्या कांहीं खिडक्या, निरनिराळ्या प्रकारच्या जाहिरातींनीं भरलेल्या असतात. आगगाडीचे टप्पे व रस्ते, गाड्यांच्या छता जवळच्या खिडक्यांचे शिरोभाग, नानाप्रकारच्या जाहिरातींनीं गजबजलेले असतात. इकडच्या लोकांना जाहिराती देण्याची शैली आणि लोकांच्या पिशव्यांतून पैसा काढून घेण्याची युक्ति, ह्या उत्तम प्रकारें साधल्या आहेत. एखाद्या पदार्थाकडे लोकांचें लक्ष्य वळविण्यास त्यांच्याविषयीं कविता करून छापतात, उत्तम गोष्टी लिहितात, किंवा मोठाल्या भपकेदार रंगाच्या अक्षरांनीं त्याचें नुस्तें नांवच कागदावर लिहून तो कागद भिंतीवर चिकटवितात. कुंपणांच्या लांकडांवर, खडकांवर, घरांच्या कौलारांवर, आणि झाडांवरून वगैरे त्याचें नांव लिहून ठेवतात. जाहिराती द्यायाला अतो-

नात पैसा खर्चावा लागतो तरी त्यांपासून फायदाही पुष्कळ होतो. मी फिलाडेल्फियास येऊन पोहोंचलें त्या रात्रीं प्रथम इकडच्या जाहिरातीचा मासला माझ्या दृष्टीस पडला. मी सार्वजनिक घोडेगाडींत बसून चाललें असतां, माझ्यापुढें खिडकीच्या शिरोभागीं मोठमोठ्या अक्षरांनीं छापलेलें एक पत्रक चिकटविलेलें होतें. त्यावरचें पहिलें वाक्य वाचून पाहिलें तें येणेंप्रमाणें.—"जे स्वतः आपल्याला मदत करतात त्यांस ईश्वर साहाय्य [१]करतो" हें वाक्य वाचून मीं आपल्या मनांत म्हटलें "अहाहा! ह्या देशचे लोक किती नीतिमान् असावे तरी! रस्त्यांतून जातां येतांना देखील लोकांस चांगल्या गोष्टींची आठवण होऊन नीतीची अभिरुचि लागावी म्हणून हे असलीं नीतिवाक्यें लिहून सर्वत्र लोकांस वाचण्यास मिळावीं ह्या हेतूनें असल्या जागीं ठेवतात वाटतें." परंतु त्या पत्रकावरचें दुसरें वाक्य वाचलें तेव्हां ह्या गोष्टीच्या तथ्यतेविषयीं मला थोडासा संशय उत्पन्न झाला. तें वाक्य असें—"सपोलियो (ह्या नांवाचा सावण) हें आपल्यास मदत करून घेण्याचें उत्तम साधन आहे!" वर्तमानपत्रांच्या आणि मासिकपुस्तकांच्या जाहिरातींमधून सपोलियोसारख्या शेंकडों पदार्थांविषयीं फार चुटकेदार पदें, व प्रेमिकांचे संवाद आणि पुष्कळ मौजेच्या गोष्टी लिहिलेल्या [२]असतात.

---

१. "प्रयत्नीं परमेश्वर" हें सदरील म्हणीचेंच रूपांतर असावें.

२. येथें एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे ती अशी कीं इकडच्या वर्तमानपत्रांतून आणि प्रसिद्ध ठिकाणांतून गचाळ व बीभत्स गोष्टींविषयीं जाहिराती लावण्याची कोणास मोकळीक नाहीं. आमच्या देशांत असा कांहीं बंदोबस्त नाहीं ही गोष्ट मोठी शोचनीय आहे. आमचीं वर्तमानपत्रें पुष्कळ अवाच्य (उ० धातुपौष्टिक गोळ्यांची जाहिरात पाहा) जाहिरातींनीं भरलेलीं असतात ह्याची सर्वांस लाज वाटावी. मोठाल्या प्रसिद्ध वर्तमानपत्रांचे कर्ते

प्रत्येक ऋतूच्या प्रारंभीं नवे पोशाक करण्याची, व घरांतील चीजवस्ता उलटूनपालटून व्यवस्था लावण्याची एकच धूम चाललेली असते. लहान-मोठ्या दुकानांतून सामान विकत घ्यायाला आलेल्या बायकांची एकच गर्दी असते. इकडच्या बायकाच घरांत लागणारें सगळें सामान विकत आणतात. दुकानांतून भाव करण्याची फारशी चाल नाहीं; बहुतेक सर्व पदार्थ ठरींव किमतीस विकले जातात. इकडे भाव करण्याच्या बदलीं दुसरें एक तशाच प्रकारचें अरिष्ट दुकानदारांस भोंवतें, तें कोणतें म्हणाल तर, माल

---

संभावित गृहस्थ आपल्या पत्रांतून अशा वाईट जाहिरातींस जागा देतात हें पाहून सखेदाश्चर्य वाटतें. हीं वर्त्तमानपत्रें कुलीन स्त्रियांच्या आणि कोंवळ्या मनाचे बालकांच्या पाहण्यांत आणि वाचण्यांत येतात. विशुद्ध मनाच्या पुरुषांनाही त्या वाचण्याचा प्रसंग येतो. ह्यामुळें किती सज्जनांचीं मनें खिन्न, व किती बाळकांचीं मनें दूषित होत असतील, ह्याचा अदमास करणें कठिण आहे. आमच्या देशांतले नीतिमान् गृहस्थ ह्या गोष्टीचा बंदोबस्त कां करीत नाहींत ? आमच्या बड्याबड्या नांवाच्या नीतिप्रसारक मंडळ्या काय करीत आहेत ? वर्त्तमानपत्रकर्त्यासारख्या लोकहित करण्याचा बाणा बाळगणाऱ्या गृहस्थांस—तशांतूनही परमधार्मिक व संभावित ह्मणविणाऱ्यांना—असल्या जाहिरातींस आपल्या पत्रांतून जागा देऊन, अल्पज्ञ बालकांच्या मनावर वाईट गोष्टींचा ठसा उमटविणें आणि आमच्या भावी वंशधुरंधरांस अनीतीच्या गोष्टींचें श्रवण, मनन, निदिध्यास करूं लावून त्यांच्या नाशाचा मार्ग खुला करून देणें, हें केवढें लांछनास्पद आहे बरें ! त्यांनीं एखादा सरकारी कायदा होऊन त्यांच्या बोकांडीं येऊन बसण्याच्या पूर्वीं, आपण होऊनच आपल्या पत्रांत वाईट जाहिरातींस व अवाच्य शब्दांस जागा द्यावयाची नाहीं असा निश्चय करून, त्याप्रमाणें आचरून दाखविल्यास सरकारापाशीं प्रत्येक गोष्टीविषयीं कायदा मागण्याविरुद्ध लोकांस उपदेश केल्याचें कांहीं तरी सार्थक होईल.

पसंत करणें हें होय. कोणताही माल चांगली परीक्षा केल्यावांचून घ्यावा असें जरी नाहीं, तरी एखाद्या लहानसहान पदार्थाकरतां माल विकणाराकडून पन्नास फेऱ्या घालविणें, तेरा ठाणांच्या घड्या मोडविणें आणि सतरा निरनिराळ्या दुकानीं जाणें, ह्यांत दोन्ही पक्षांस फायदा नाहीं इतकेंच नव्हे; तर तें कंटाळवाणें असून त्यांत पुष्कळ वेळ व्यर्थ दवडण्यांत येतो. ह्याशिवाय लोकांसही त्यापासून इजा होते. ह्या देशचे दुकानदार आणि त्यांचे गुमास्ते व गुमास्तिणी लोडांशीं किंवा भिंतींशी टेंकून बसून जिनसा विकीत नाहींत. दुकानांत मालाच्या कपाटांच्या व कोनाड्यांच्या पुढील बाजूस उंच ठाणव्या असतात, त्यांच्यामागें उभें राहून मालविक्यांला आपलें काम करावें लागतें. ज्या पुष्कळ बायका दुकानांतून चाकरीस राहातात, त्यांस कधीं कधीं दहा दहा तास बसायाला मिळत नाहीं. अशा ठिकाणीं जाऊन लहानसहान पदार्थाकरितां त्या बायांकडून पन्नास फेऱ्या घालविणें किती वाईट आणि त्रासदायक आहे, हें पुष्कळांच्या ध्यानींमनींही येत नाहीं. सणावारीं आणि जन्मदिवशीं मित्रांस आणि सोयऱ्यांस कांहीं तरी पदार्थ नजर करण्याची चाल आहे. सणावाराच्या दिवसांतून सगळीं दुकानें उत्तम उत्तम वस्तूंनीं भरलेलीं असतात.

## उन्हाळा.

सर्व ऋतूंमध्यें वसंत हा श्रेष्ठ मानलेला आहे. (ह्याचें संक्षिप्त वर्णन पुढें एके ठिकाणीं दिलें आहे.) इ० स० १८८६ च्या मार्च महिन्यांत मी अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत पोहोंचलें, तेव्हां हिंवाळ्याची उतरती कळा असून वसंतास प्रारंभ झाला होता, त्यामुळें येथील थंडीचें खरें रूप माझ्या पाहाण्यांत आलें नाहीं. मार्च महिन्याचा शेवटचा भाग आणि एप्रिल यांच्या दरम्यान पुष्कळदां पाऊस येई, आणि केव्हां केव्हां बर्फाचा वर्षाव होई.

मे महिन्यापासून सप्टंबरपर्यंत इकडे अतिशय उकाडा असतो. कधीं कधीं तर पारा एकशें दहा अंशांपर्यंत चढतो; पण असे दिवस फार थोडे. साधारण उन्हाळ्याच्या दिवसांत सुमारें ऐशीं किंवा पंचायशीं अंशांइतकी उष्णता असते. इकडचीं घरें व त्यांतील सर्व सोई हिंवाळ्याकरितां योजलेल्या असल्यामुळें, आपल्या तिकडल्यापेक्षां इकडील उन्हाळा आपल्यास फार कठिण जातो. ह्याशिंवाय ह्या लोकांच्या चालीरीतीही आपल्यापेक्षां निराळ्या असल्यामुळें आम्हांस बरीच अडचण पडते.

फिलाडेल्फिया शहरांत मी ज्या बाईच्या घरीं बिऱ्हाडास राहिलें होतें, तेथें एक मौजेची गोष्ट घडून आली. मी तिसऱ्या मजल्यावर माझ्या खोलींत असतां कांहीं केलें तरी कोणी त्यास अडथळा आणीत नसे हें खरें; तथापि जेवणाखाणाच्या वेळीं खालीं चारचौघांत जातांना मला फार सावधगिरीनें वागावें लागे. एके दिवशीं जून महिन्यांत अतिशय उष्णता पडली असून वाऱ्याचें कोठें नांवसुद्धां नव्हतें. दोनप्रहरांनंतर घरांत जिकडेतिकडे सामसूम झालेली असल्या कारणानें मी रोजच्यासारखी सावधगिरी न करतां, स्वैंपाकघरांतून पेलाभर पिण्याचें पाणी आणायाला म्हणून अनवाणी पायांनींच खालीं गेलें. कर्मधर्मसंयोगानें जी गोष्ट न घडावी ती त्या वेळीं घडून आली. मी पाणी घेऊन आतां माडीवर जाणार इतक्यांत वृद्ध डाक्तर ब—हे माझ्या समोर येऊन थडकले! मग काय पुसावें! माझे अनवाणी पाय पाहून बिचाऱ्या म्हाताऱ्याच्या मनास काय वाटलें असेल तें असो, त्याचें तोंड अगदीं उतरून जाऊन एकाद्या भयभीत झालेल्या किंवा कांहीं निर्लज्जपणाचें आचरण पाहून सखेदाश्चर्यानें थक्क झालेल्या मनुष्याप्रमाणें त्याची मुखचर्या झालेली दिसून आली. म्हणून मी त्याच्या तोंडाकडे फार वेळ न पाहतां आपल्या खोलीकडे सूं केलें!

दोन तीन घटक नंतर मी कांहीं वाचीत बसलें होतें, वर सांगितलेली

गोष्ट माझ्या ध्यानांतून नाहींशी होत चालली होती, इतक्यांत कोणीसें माझ्या खोलीचें दार ठोठावलें.

"याहो या आंत."

असें म्हणतांक्षणींच एक बारा वर्षांचा मुलगा दार उघडून आंत आला. हा मुलगा आमच्या वृद्ध डा० **व**—चा नातू होता. तो मला एक लहानशी चिठ्ठी देऊन निघून गेला. मीं ती चिठ्ठी उघडून वाचली त्यांत असा मजकूर होता.—

"तुमच्या देशांत सर्वांनीं मोजे किंवा जोडे घातल्यावांचून जिकडे तिकडे अनवाणी पायांनीं जाण्यायेण्याची चाल आहे, हें मला माहीत आहे. तरी आमच्या देशांत तसें करणें मर्यादशीलपणाचें मानलें जात नाहीं. तुम्हाला अनवाणी चालतांना पाहून माझ्या कुटुंबांतील माणसांस सखेदाश्चर्य वाटतें. तुम्ही खालीं येतांना पायांत मोजे आणि जोडे चढवून येण्याची मेहेरबानगी करावी.

तुमची मैत्रिण **मिसेस व.**

ह्यानंतर मी ह्या देशांत असें तांवर कधीं अनवाणी पायांनीं कोणासमोर जाण्याचा गुन्हा करणार नाहीं, असा निश्चय केला.

उन्हाळ्यांत इकडेही आपल्या तिकडल्या सारख्याच माशा, चिलटें, इत्यादिकांच्या सांथी येत असतात. न्यू जर्सी संस्थानांतील डांस आमच्या मिरजापुरी व कलकत्याच्या डांसांपेक्षां कोणत्याही अंशांनीं कमी योग्यतेचे नसतील. शिकागो शहरानजीक मिशिगन सरोवरावर "लेक्ब्लक्" नांवाचा

---

१ आतां इकडे ह्मणजे हिंदुस्थानांत आल्यानंतर **मि**सेस **व**—ह्या बाईकडून एक पत्र आलें. त्यांत त्यांनीं मला आतां तुह्मी जोडे घालतां कीं नाहीं ह्मणून विचारलें आहे.

ग्रीष्मविहार[१] आहे. तेथें मला तीनचार दिवसरात्री काढाव्या लागल्या. दिवसास आणि रात्रीच्या पहिल्या तीन प्रहरांत उकाडा म्हणजे काय मी म्हणत असून, त्या वेळीं कोठें वारा येत नसे. तशांत तेथें डांसांचा तर काय प्रलयच होता. सन १८८२ सालांत असाम प्रांत सोडल्यावर अंधकूप नरकाचें दर्शन मला झालें नव्हतें, तें १८८७ सालीं या मिशिगन सरोवराच्या तीरावर पुनः झालें. श्रीमद्भागवत पंचमस्कंधांत ह्या नरकाचें वर्णन केलेलें आहे तें असें.- "जो कोणी मनुष्य मशकादि कीटकांचा द्रोह करितो, त्याला अंधकूप नरकांत घालतात.-तेथें अंधारांत पडून त्या मनुष्याला कधीं झोंप लागत नाहीं, आणि विश्रांतिहि मिळत नाहीं; डांस, उवा, माशा, ढेकूण इत्यादि ज्या प्राण्यांचा त्यानें द्रोह केला असेल, ते त्याला सतत चावून त्याचा सूड उगवितात." ह्या नरकाचें दर्शन घेण्याची ज्यांस इच्छा असेल त्यांनीं मिर्झापूर, कलकत्ता, आसाम इत्यादि प्रांतांत जावें. आपला महाराष्ट्र देश म्हणजे ह्या गुणांत हिंदुस्थानाच्या इतर प्रांतांपेक्षां कमी आहे असें मुळींच नाहीं. फार दिवसांनंतर अमेरिकेसारख्या परक्या देशांत ह्या आमच्या जुन्या आप्तमित्रांची भेट झाली, तेव्हां मला त्यांची खरी योग्यता कळून आली. "रुधिरादानादधिकं दुनोति कर्णे क्वणन् मशकः।" ह्या कव्युक्तीचा अर्थ मला ह्यापूर्वी कधीं इतका स्पष्ट कळून आला नव्हता. माशा वगैरेंचा ह्या देशांत असा उत्पात आहे, तरी अमेरिकेचे शहाणे लोक त्यांचा संहार करण्याचे उपाय व आणखी पुष्कळ युक्ती योजून, आपला बचाव करून घेतात. उन्हाळा येऊं लागला म्हणजे घराचीं दारें आणि खिडक्या यांस तारेच्या जाळ्यांचीं दारें करून लावतात. त्यामुळें घरांत चिलटांचा प्रवेश होण्यास बराच प्रतिबंध असतो. मे महिन्याच्या सुमारास घरांतील

---

१ उन्हाळ्यांत हवा बदलण्याकरतां किंवा विश्रांति घेण्याकरतां जेथें लोक जातात तें ठिकाण.

व जिन्यांवरील सतरंज्या, चट्या, गालीचे वगैरे काढून धुवून झाडून भिंतीस नवे कागद लावणें इत्यादि गोष्टींची जिकडे तिकडे धामधूम चाललेली असते.

जून, जुलई आणि अगस्ट ह्या महिन्यांत विद्याखात्यांतील सर्व लोकांस सुट्टी मिळत असते. पुष्कळ सरकारी कामदारांस उन्हाळ्यामध्यें कांहीं दिवसांची सुट्टी मिळते. उद्योगी लोकहि ह्या ऋतूंत कांहीं दिवस विश्रांति घेतात. गर्भश्रीमंत निरुद्योगी मनुष्यांस वर्षभर सुटीच असते, तरी त्यांस देखील ह्या दिवसांत सुटी घेऊन घर सोडून कोठें तरी ग्रीष्मविहारास जावेंसें वाटतें. सुटीच्या वेळीं ज्यांच्या हातीं थोडाबहुत पैसा असतो ते लोक आपल्या कुटुंबांसह किंवा एकटेच आसपासच्या किंवा दूरच्या एखाद्या ग्रीष्मविहारास जाऊन चार दिवस तेथील मौज पाहतात. ह्या ग्रीष्मविहारांत जाऊन राहाण्याचा मुख्य हेतु, कांहीं दिवस कामकाज व संसारचिंता एकीकडे गुंडाळून ठेवून, विश्रांति घेणें हा होय. परंतु दुसऱ्या कित्येक चांगल्या हेतूनें पाडलेल्या चालीप्रमाणेंच ही चालहि एकप्रकारें जुलमीच आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. ह्या विहारस्थळांमध्यें विश्रांतीचें नांव सुद्धां कोठें नसतें. ते एका प्रकारचे मेळे आहेत असें म्हटल्यास अधिक शोभेल. सारटोगा, केपमे, नियागरा, शटोका, लेकब्लफ् इत्यादि रमणीय व प्रख्यात स्थळांमधून ह्या उन्हाळ्याच्या तीन महिन्यांत लोकांची फार गर्दी असते. जिकडे तिकडे "बाल" गाणीं, तमासे, गप्पा, मेजवान्या ह्यांची एकच गर्दी उडत असते. प्रत्येक ठिकाणीं उतारूंच्या सोईकरतां लहानमोठ्या खाणावळी आहेत.

अमेरिकेंतील खाणावळींचा थाट पाहून कोणाला अचंबा वाटल्यावांचून राहाणार नाहीं. शिकागो, न्यूयार्क्, फिलाडेल्फिया, बोस्टन् इत्यादि शहरांतील खाणावळी म्हणजे केवळ इंद्रभुवनासारख्या असतात. शिकागोंतील "पामर् हौस्" नामक एका प्रसिद्ध खाणावळीची इमारत, व त्यांतील सोन्यारुप्याचें व आरासीचें सामान यांची किंमत साठ लक्ष रुपयांहून अ-

धिक आहे. तेथें पंधरासोळाशें मनुष्यें बिऱ्हाड करून राहातात आणि त्यांची सेवाचाकरी करण्यास पांच सहाशें बायकापुरुष चाकरीला आहेत ते निराळेच. ह्या खाणावळीला लागून एक गाडीखाना आहे. त्यांत चारपांचशें घोडे, दोनअडीचशें गाड्या आणि बग्या, गाडीवान, सईस, शिपाई किती आहेत त्यांची संख्या व त्यांच्या पगारांची वगैरे मोजणी केल्यास, आश्चर्यानें थक्क व्हावें लागतें. अशा प्रकारच्या खाणावळी ह्या देशांत पुष्कळ आहेत. श्रीमंत आणि पुष्कळ मधल्या प्रतीचे लोकसुद्धां ह्या खाणावळींतून बिऱ्हाड करून राहातात. तेथें सतत राहिल्यानें कोणाला सुख किंवा विश्रांति मिळते, असें मुळींच नाहीं. परंतु कसेंतरी करून आपलें नांव एकदांचें वर्त्तमानपत्रांत प्रसिद्ध व्हावें, एवढ्या करतांच पुष्कळ लोक आपल्या ऐपतीबाहेर खर्च करून निदान एक आठवडा तरी एखाद्या प्रसिद्ध खाणावळींत जाऊन राहातात. धन्य मनुष्याच्या महत्त्वाकांक्षेची! वर सांगितलेल्या प्रकारच्या सरायांत राहाण्यास दररोज एका मनुष्यास कमींत कमी म्हटला तरी तीन चार डालर खर्च लागतो. मध्यम प्रतीच्या खोलीचें भाडें पांच किंवा सहा डालर असून उत्तम दर दहा डालरांवर असतो. ह्याशिवाय कपडे धुण्याचा, गाड्यांचा वगैरे खर्च लागतो तो निराळाच.

शिकागो शहरांत रहाणाऱ्या एका माझ्या मैत्रिणीनें मला सारटोगा येथें येऊन आठवडाभर आपल्याबरोबर राहाण्याचा आग्रह केला; त्याप्रमाणें १८८७ तील आगष्टमहिन्यांत मी तिच्याबरोबर त्या ठिकाणीं गेलें. सारटोगा हें ठिकाण खरोखरच फार रमणीय व त्याच्या आसपासचा देखावा अति सुंदर आहे. तेथें पुष्कळ श्रीमंत लोकांचे वाडे आणि रम्य उपवनें आहेत. तेथें येऊन राहिलेल्या लोकांच्या मनोरंजनाकरतां दर रोज दुपारून बागांमध्यें मधुर बाजे वाजवितात. हजारो बायका, पुरुष आणि गोजिरवाणीं मुलें उत्तम शृंगार करून हवा खायाला व मौज पाहा-

ण्याला बाहेर जातात. सारटोगा येथें पाण्याचे कित्येक चमत्कारिक झरे आहेत. त्यांच्या नाना धातुमिश्रित पाण्याची रुचि सोडावाटरासारखी विलक्षण आहे. त्या झऱ्यांतील पाणी मोठें गुणाकारी असतें असें म्हणतात. अजीर्ण, क्षय, दमा इत्यादि कोणतेही रोग ह्या झऱ्यांच्या पाण्यानें बरे झाले नाहींत असें नाहींच! आमच्या तिकडील एका श्रीमंत मनुष्यानें म्हणे दररोज गंगेच्या पाण्यावांचून दुसरें पाणी प्यायचें नाहीं असा नेम केला होता. तो आपल्या तैनातींत पुष्कळ ब्राह्मण चाकर ठेवून आपल्याला लागणारें गंगेचें पाणी शेंकडों कोसांवरून आणवून घेत असे, असें ऐकिवांत आहे. अमेरिकेंतील श्रीमंत आणि नखरेबाज मनुष्यें सारटोगा वगैरे झऱ्यांचे पाणी शेंकडो कोसांवर आणवून त्याचा उपयोग करतात. पण जसा गंगातीरीं राहाणारा मनुष्य त्या नदीला हलकी समजून, दुसऱ्या एकाद्या पुण्यनदीचें स्नान घडावें म्हणून दूर यात्रेस जातो, त्याचप्रमाणें सारटोगाजवळ राहणाऱ्या नखरेबाज लोकांस तेथील झऱ्याच्या पाण्याचें माहात्म्य मोटेंसें न वाटून, ते जर्मनी इत्यादि दूर देशांचें नावाजलेलें पाणी आणवून पितात. सारटोगाचें पाणी पिणाऱ्या मनुष्यास म्हणजे अजीर्ण, क्षयरोग किंवा रक्तविकार होत नाहीं, असें मुळींच नाहीं; परंतु एकाद्या गोष्टीचें कोणी थोडेंसें माहात्म्य वाढविलें, कीं हजारो मनुष्यें त्याच्या मागून तुणतुणें वाजवून, तें माहात्म्य गाऊं लागतात. सारांश गतानुगतिकता ही सर्वत्र आहे.

सारटोगांत असतां एकेदिवशी सकाळीं फराळ करण्याच्या पूर्वींच माझी शिकागोकरीण मैत्रिण मला बागेंत हवा खायाला म्हणून घेऊन गेली. तो दिवस फार शांत व प्रसन्न असून सकाळीं थोडासा गारवा होता त्यामुळें बागेंत चोहोंकडे आनंदी आनंद होता. बागेंत फिरतां फिरतां आम्ही एका झऱ्याच्या कांठावर आलों. त्याच्या भोंवतीं दीड हात उंच विटांची भिंत घातलेली असून फाटकाशीं एक पोर बसला होता. त्यानें प्रत्येकीं तीन

आणे भाडें घेऊन आम्हास त्या भिंतीच्या आंत सोडलें. तेथें पुष्कळ बायका, पुरुष आणि मुलें दर पंचपात्रीस दोन दोन आणे देऊन मोठ्या उत्सुकतेनें झऱ्याचें पाणी पिऊन ढेकरा देत होतीं. माझ्या मैत्रिणीनें दोन पंचपात्र्या पाणी पिऊन मलाही तें पिण्यास सांगितलें. परंतु मी तसें करण्याचें नाकारलें, तेव्हां ती आश्चर्य चकित होऊन म्हणाली:—"काय तुम्ही हें गुणाकारी पाणी पीत नाहीं का? हें प्याल्यानें तुमची रक्तशुद्धि होवून मोडशीबिडशी चट सारी नाहींशी होईल." मी म्हटलें "हो बाई, तें खरें, पण ह्या शेंकडो माणसांनीं अर्ध्या तोंडांत घालून आपल्या लाळेनें पवित्र केलेल्या ह्या पंचपात्र्या, त्या स्वच्छ धुतल्यावांचूनच त्यांतून लोकें पाणी पीत आहेत, आणि अशाच प्रकारचें पवित्र पाणी माझ्या वांट्यास येणार, हें नुस्तें मनांत आल्याबरोबरच माझी मोडशी जिरली. आतां हें तीर्थ प्राशन करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं."

## हेमंत.

युनाइटेड् स्टेट्स् हा देश इतका सुंदर आहे कीं, कोणत्याही ऋतूंत त्याची शोभा कमी होत नाहीं. प्रत्येक ऋतु आपल्या स्वाभाविक गुणांनीं सृष्टीला कोणत्या तरी एकाद्या विशेष भूषणानें भूषित करितो. परंतु ज्याच्यामध्यें शिशिर ऋतूचा प्रचंड शीतगुण आणि ग्रीष्म ऋतूच्या आंगीं असलेली अत्यंत उष्णता नसून जो सर्व मनुष्यजातीस सुखावह तो हेमंतऋतु येतो, तेव्हां युनाइटेड् स्टेट्स्च्या सुवर्णभूमीचें सौंदर्य फारच मनोहर आणि अपार्थिव शोभेनें भरलेलें असतें. जिकडे तिकडे झाडांच्या पानांचे रंग बदलतात. शिशिर ऋतूच्या आरंभीं झाडांचीं सगळीं पानें पडून जातात. त्यापूर्वी हेमंत ऋतूच्या शेवटल्या भागांत जर कोणी सृष्टिसौंदर्याचा भोक्ता युनाइटेड् स्टेट्स्च्या रानांवनांतून फिरेल, तर त्याला माझ्या म्हणण्याची प्र-

तीति येईल. इकडे मेपल् नांवाच्या झाडाच्या पुष्कळ जाती आहेत, त्यांत सिल्वर् मेपल् म्हणून एक जात आहे त्याचीं पानें हेमंत ऋतूंत तांबडीं जरद होतात. त्याचप्रमाणें दुसरींही पुष्कळ झाडें आहेत. त्यांचीं नांवें मला ठाऊक नाहींत. ओक नांवाच्या झाडाच्याही पुष्कळ जाती आहेत. त्याच्या पानांला निरनिराळे पुष्कळ चांगले सुरेख रंग येतात. न्यूयार्क संस्थानांतील आडिरोंडाक पर्वत व पेन्सिल्वनियांतील अलिघेनी पर्वतांची रांग, यांवरील अरण्यांस हेमंत ऋतूमध्यें जी शोभा येते ती अवर्णनीय आहे. पुष्कळ हौशी लोक हेमंतशोभा पहाण्याकरितां म्हणूनच मुद्दाम या पर्वतांवरून प्रवास करितात. मलाही कांहीं कामाच्या निमित्तानें त्या सुंदर प्रदेशांतून आगगाडींत बसून जाण्याचा प्रसंग आला होता. अलिघेनी पर्वतांतून सस्केहाना नांवाची नदी वहात आहे. या नदीचा मार्ग सर्पगतीसारखा असून, हिच्या दोन्हीं तीरांवर मेपल् सारखे वृक्ष पुष्कळ आहेत. तेथें मनांकचंकापासून[१] तों वाटरग्यापपर्यंत आणि त्याच्या पुढें कांहीं कोस वनशोभेची परमावधि झालेली असते. फोटोग्राफाच्या युक्तीनें मनुष्याची आकृति हुबेहुब उठवितां येते, त्याचप्रमाणें आकाशाचे व वनाचे रंग उठविणारी अशी एकादी युक्ति असती, तर त्या भागाची हैमंतिक शोभा कशी असते तिची कल्पना, जे तेथें गेले नाहींत अशांच्या मनांत आणून देणें कांहीं अंशीं तरी शक्य झालें असतें. अशी कल्पना करा कीं, आपण एका राजवाड्या सारख्या गाडींत सुंदर मखमलीच्या गाद्यांनीं मढविलेल्या खुर्च्यांवर बसून, ह्या भागांतून हळू हळू जात आहों, दिवस चांगला प्रसन्न आहे, आकाश निरभ्र आहे, तरी मधून मधून एक दोन ढगें आकाशाच्या भोंतीं फिरत असलेलीं दिसत आहेत, समोर, आजूबाजूला आणि मागें जिकडे पहावें तिकडे उंच उंच पर्वतशिखरें आकाशाला डोकीं भिडवून उभीं आहेत, त्यांव-

१ मनांकचंक व वाटरग्याप् हीं दोन आगगाडीचीं स्टेशनें आहेत.

रील नाना जातींचे देवदारुवृक्ष इंद्रनीलमण्यांसारख्या आपल्या पालवीच्या रंगानें पर्वताला जसे काय नील मेघांचें आवरण घालून झांकीत आहेत; त्यांच्यामध्यें जिकडे तिकडे विखरलेल्या नाना रत्नांसारखे भूर्ज, मेपल, ओक आणि दुसरीं पुष्कळ झाडें, नाना प्रकारच्या वेली, लहान झुडपें आपल्या पानांच्या तांबड्या, पिंवळ्या, हिरव्या, जांभळ्या आणि पिंगट अशा नानाप्रकारच्या रंगांनीं त्या वनभूमीला चित्र विचित्र करीत आहेत. बाजूनें पर्वतश्रेणींमधून डोंगरांच्या पायथ्यांजवळून स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्याची नदी खळ खळ वाहत आहे, तींत सूर्यप्रकाश प्रतिबिंबून त्या पाण्याला कोठें कोठें वितळलेल्या रुप्याचें सादृश्य येत आहे. असा हा देखावा पाहात असतांना, आपण पुराणांतरीं वर्णिलेल्या मेरुपर्वतावर असलेल्या नंदन किंवा चैत्ररथ वनांत आलों आहोंत, अशी कल्पना सहजींच मनांत येते. युनाइटेड् स्टेट्स्चे आबालवृद्ध रहिवासी अशी ऋतुशोभा पहाण्याकरितां फारच उत्सुक असतात. या ऋतूमध्यें वनांची शोभा खेरीज करून आणखी एक गोष्ट लोकांच्या आनंदास भर घालते. ती शेतांची कापणी आणि फळांची लाणी ही होय. याप्रसंगीं शेतकऱ्यांच्या घरांतून चोहोंकडे आनंदीआनंद असतो. आपूल् नांवाच्या व दुसऱ्या पुष्कळ जातींच्या फळांच्या राशींच्या राशी चोहोंकडे पडूं लागल्या, म्हणजे मुलांचा उल्हास त्रिभुवनांत मावेनासा होतो. नवेंबर महिन्याच्या शेवटीं "थ्यांक्स्गिव्हिंग्" म्हणजे आभार मानण्याचा सण करितात. त्या दिवशीं नवीन कापून आणलेल्या शस्यांच्या कणसांनीं, भाजीपाल्यांनीं आणि पुष्पफलांनीं भजनमंदिराचे सगळे भाग शृंगारितात आणि मधुर स्वरानें गीतें गाऊन लहान मोठीं माणसें परमेश्वराची स्तुति करितात व आपल्याला शस्यसमृद्धि त्यानें दिली, म्हणून भक्तिपूर्वक त्याचे आभार मानतात. तेव्हां तो देखावा फारच मनोरंजक व पाहाण्यासारखा असतो. हेमंताचा शेवटला म्हणजे नवंबर आणि शिशिराचा प-

हिला म्हणजे डिसेंबर या दोन महिन्यांत युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें पुष्कळ पाऊस पडतो. हाच तेथील पावसाळा म्हटला तरी चालेल. ह्या शिवाय हिंवाळ्यांत, वसंत ऋतूंत आणि उन्हाळ्यामध्यें देखील मधून मधून पावसाच्या सरी येतच असतात.

## हिंवाळा.

हह ह! हु हु! उ हु हु!! हातपाय कांकडून गेले, दांतखिळी वाजूं लागली व बोलतांना बोबडी वळूं लागली. नद्यांच्या पाण्यावर माणसें खुशाल चालूं लागलीं, उत्तम धारदार चाकूनें लोणी कापण्याला बरेंच बळ खर्चावें लागूं लागलें; दूध पिण्याचें सोडून कधीं कधीं त्याचे खडे चावून खाण्याचें भाग पडूं लागलें! हा सगळा थंडीचा प्रभाव. युनाइटेड् स्टेट्स्‌सारख्या मोठ्या देशांत सगळेंच मोठें. उन्हाळ्याच्या दिवसांत आतां काय उकाड्यानें जीव कासावीस होतो, आतां अंगाचा तिळपापड होतो, केव्हां केव्हां शरीरांतून इतका कांहीं घाम वहातो कीं, आतां आपलें सर्वांग वितळून जातें कीं काय असें वाटूं लागतें. पण एकदां हिंवाळा येऊंद्या, म्हणजे इकडे कोणाला उन्हाळा कसा आहे तो मुळींच माहित नसावा असें दिसतें. पांढऱ्या साध्या झिरझिरीत कापडाचे पोषाक जसे काय स्वप्नांतील असत्य कल्पनेसारखे कोठल्याकोठें नाहींसे होऊन त्यांच्या जागीं जाड लोंकरींचे डगले व बंड्या, कांबळीं, दुहेरी अस्तर घातलेले जाडे जाडे जोडे, कातड्याचे सदरे, लवीसकट कातड्याचें अस्तर घालून केलेले चोगे, कानटोप्या, पायमोजे, हातमोजे इत्यादि शीतप्रावरणें सर्वत्र दिसूं लागतात. ज्यानें या देशांत येऊन, उत्तरप्रदेशांत राहून हिंवाळ्याचा प्रभाव पाहिला नाहीं, त्याला इकडच्या थंडीची कल्पनासुद्धां करतां येणार नाहीं. थंडीच्या दिवसांत कधीं कधीं उष्णतामापक यंत्रांतील पारा शून्याखालीं दहा किंवा वीस

अंशांइतका खचून जातो; नद्या, झरे, तळीं, एकंदर थिजून त्यांतील पाणी दगडासारखें घट्ट होतें.

इकडील शहरवासी आणि कित्येक खेड्यांतील लोकसुद्धां पिण्याच्या पाण्याचे ऐवजीं बर्फाचा किती उपयोग करतात, ह्याचा सुमार करणें कठीण आहे. हिंवाळ्यांत नद्या आणि तळीं थिजलीं म्हणजे उन्हाळ्यांत लोकांच्या उपयोगाकरितां बर्फ सांठवून ठेवतात. प्रत्येक मोठाल्या नद्यांच्या व तळ्यांच्या तीरांवर जेथें माणसांची फारशी वरदळ नसते अशा जागीं बर्फाचीं कोठारें बांधलेलीं असतात. ह्या कोठारांची आकृति चौकोनी बंगल्यासारखी असून त्यांना दारेंबिरें नसतात. मात्र त्यांच्या लांकडी भिंतींच्या वरील बाजूंस छताजवळ दोनचार लहान लहान खिडक्या असून त्या खिडक्यांशीं, शिड्या लावून ठेवलेल्या असतात. मग योग्य वेळीं नदीच्या थिजलेल्या पात्रांतून सुमारें गजभर औरसचौरस व हात दीड हात जाडे असे बर्फाचे तक्ते कापून युक्तीनें त्या कोठारांत नेऊन सांठवितात. उन्हाच्या तापानें बर्फ वितळून जाऊं नये म्हणून ते तक्ते उत्तम रीतीनें लांकडाच्या भुसांत पुरून त्यांस उन्हाचा ताप आणि वारा न लागेल अशी तजवीज करतात. मग उन्हाळ्यांत ह्या कोठारांतून बर्फ काढून शेंकडों हजारों गाडे भरून शहरांतील लोकांस विकत देतात. दररोज सकाळीं बर्फाचे व्यापारी आपला गाडा घेऊन घरोघर बर्फाचा रतीब घालून येतात. कोणाच्या घरीं एक वडी, कोणाला दोन किंवा अधिक वड्या, कोणाला अर्धी, कोणाला चतकोर किंवा नितकोरच वडी घ्यावी लागते. प्रत्येक घरांत एक पिण्याच्या पाण्याचा हांडा असतो, त्यांत नळाचें स्वच्छ पाणी अर्धवट भरून, त्यांत बर्फाचे मोटमोठाले तुकडे घालून ठेवतात; ह्यायोगें सर्वांस उन्हाळांत थंडगार पाणी पिण्यास मिळतें. हें पाणी जरी तोंडाला फार गोड लागतें तरी बेतानें व सावधगिरीनें न प्याल्यास अत्यंत अपायकारक होतें. उन्हांतून तापून आलेलों

मनुष्यें तान्हेच्या भरांत हें पाणी गटागट पितात व त्यानें पोट गार होतें व तहान भागते खरी, तरी तापलेल्या आंतड्यांवर ह्या अत्यंत गार बर्फाच्या द्रवाचा परिणाम फार वाईट होतो. ह्यास्तव होईल तसें करून बर्फाचें पाणी न प्यावें हेंच उत्तम; आणि तसें करण्याचें कठिण गेल्यास निदान ह्या पाण्याचा घोंट घेऊन तो कांहीं वेळ तोंडांत राहून त्याचा गारवा अंमळसा नाहींसा झाल्यावर मग गिळावा. अशानें त्यापासून अपाय होण्याचें फारसें भय नाहीं.

जानुअरी आणि फेब्रूअरी ह्या दोन महिन्यांत रस्त्यांवरून चालण्याची मोटी पंचाईत पडते. ज्याला ह्या गोष्टीची माहिती नाहीं, असें एखादें मनुष्य घरांतून बाहेर पडतांना, रस्त्याचे बाजूच्या पायवाटा किती चकचकीत आणि स्वच्छ आहेत, म्हणून मनांत आनंद मानीत एक दोन पाउलें पुढें टाकतें आहे तोंच स्वारी एकाएकीं घस्स करून खालीं येते! ह्यावेळीं जवळ कोणी असलें तर मोठ्या कळवळ्यानें "अरेरे, तुम्हीं चुकून खालीं आलां, कांहीं दुखापतविखापत झाली कीं काय?" म्हणून विचारतेंच. परंतु फरसावर आपटून आंग चेंचून बरेंच दुखत असलें, तरी ही स्वारी थोडीशी गोंधळून—जणूं काय कांहींच झालें नाहीं अशा चर्येनें—"छे छे अगदीं नाहीं" म्हणून म्हणायाची! थंडीच्या दिवसांतून रस्त्यांमध्यें अशा प्रकारचे पुष्कळ चमत्कार दिसून येतात. कित्येक लोकांची संवय अशी विलक्षण असते कीं, त्यांना घसरून पडल्याची मोठी लाज वाटते,—त्यांत लाज वाटण्या सारखें कांहीं नाहीं, परंतु अंगस्वभाव मोठा बळकट असतो. ते खालीं पडतांक्षणीं तटकन उठून कोणीतरी आपल्याकडे बघून हसत असेल, म्हणून इकडे तिकडे न पाहातां, घाई घाईनें तेथून निघून जातात; तेव्हां त्यांची मुखचर्या फार विलक्षण झालेली दिसून येते.

चालू वर्षाच्या (इ. स. १८८८ च्या) मार्च महिन्यांत मी फिलाडेल्फि-

याहून न्यूयार्क शहरास गेलें; त्या वेळीं आकाश निरभ्र असून स्वच्छ ऊन पडलें होतें व उकाडा बराच भासत होता. आदल्या दिवशीं हवा एकमळशी बदलून थोडा पाऊस पडूं लागला. रेवरेंड् डाक्टर हीवर-न्यूटन यांणीं बोलावल्या वरून, त्या दिवशीं दुपारून मी त्यांच्या थोरल्या मंदिरांत भाषण केलें. तेथें स्त्रीपुरुषांची मनस्वी गर्दी झाली होती. ह्याच शहरांत आणखी दोन ठिकाणीं भाषणें करून ( मी आरंभिलेल्या कृत्याच्या साहाय्यार्थ ) दोन मंडळ्या स्थापून, बुधवारीं सकाळीं कांहीं जरूरीच्या कामाकरितां बोस्टन शहरीं जाण्याचा माझा बेत होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी झोपेंतून जागी होऊन पाहातें, तों माझ्या खोलीच्या खिडक्यांचीं भिंगें विलक्षणच दिसत होतीं. त्यांवर कांहीं पांढरवट पदार्थाचा जाड लेप लागलेला असून, त्या लेपांत कोणी अति सुंदर वेलबुट्टीदार चित्रविचित्र नक्षी काढली असल्या सारखें दिसून आलें. हा चमत्कार काय आहे म्हणून मी पुढें जाऊन पाहातें तों रस्ता, घरांचीं छतें, खिडक्या, दारें वगैरे चांदण्यांपेक्षां पांढऱ्या स्वच्छ तुषारानें आच्छादित झालेलीं दिसून आलीं. काल जें न्यूयार्क माझ्या दृष्टीस पडलें होतें, तें आज अगदीं बदलून गेलें; हीं दोन शहरें एकच आहेत हें सहसा खरें वाटलें नाहीं. म्याडिसन् अवेन्यू, फिफ्थ् अवेन्यू वगैरे सुंदर व रुंद रस्ते तुषारानें भरून अगदीं अरुंद झाल्या सारखे दिसून आले. ह्या तुषार वृष्टीचा वेग वाढवावा म्हणूनच कीं काय कोण जाणे, त्या दिवशीं प्रचंड वारा वहात होता व उष्णतामापक यंत्रांतील पारा चार अंशांवर आला होता. थंडी तर काय मी म्हणत होती, नळांतलें पाणी थिजून जाण्याच्या बेतांत आलें होतें. सकाळीं न्यहारीच्यावेळीं स्वैंपाकिणीनें मला रोजच्या प्रमाणें प्यायाला पेलाभर दूध आणून दिलें, तें तोंडांत घेऊन गिळण्यापूर्वीं खडीसाखरेच्या खड्या प्रमाणें चावून खावें लागलें ! थंडीमुळें विस्तवाची उष्णता देखील नाहींशी झाल्या सारखी झाली.

तुषारवर्षावामुळें रस्त्यांत लोकांचें जाणें येणें बंद झालें. गांवांत कोठें दुकानें उघडलेलीं नव्हतीं. कोणी हतभागी मनुष्य किंवा पशु ह्या भयंकर वृष्टींत सांपडला तर तो जिवंत घरीं पोहोंचेल कीं नाहीं याचा संशयच वाटूं लागला. रस्त्यांत हमेशा जाणाऱ्या ट्रामगाड्या, बग्या, अधांत्रांतील आगगाड्या सर्व कांहीं बंद झाल्या! तुषार पडतांना शब्द मुळींच होत नाहीं. कोणी उभें राहून बारीक सपीठ चाळीत असतां तें जसें हलकेंच जमीनीवर पडतें व तें खालीं पडल्याचा शब्द कोणाला ऐकूं येत नाहीं, त्याप्रमाणेंच तुषारही कोणाला नकळत पडतो. त्याचे कण आकाशांतून खालीं येतात, तेव्हां ते पांढऱ्या जाईचे फुलांच्या नाजूक पांकळ्यां सारखे नाचत बागडत, उडत पडत, गोंधळत मोठ्या घाईनें धांवत येत असलेल्या अणुरेणू एवढाल्या आनंदी पऱ्यांप्रमाणें सुरेख दिसतात. काळ्या किंवा काळसर रंगाच्या कापडावर कांहीं तुषारकण धरून पाहिले असतां, त्यांच्या आकृती बहुत सुंदर व विचित्र असलेल्या दिसून येतात. अशा त्या पांढऱ्या फटफटीत तुषारानें आच्छादून गेलेली जमीन, झाडेंझुडपें, मैदानें, रस्ते व घरांचीं छतें किती सुरेख आणि चमत्कारिक दिसतात, हें ज्यानें पाहिलें नाहीं, त्याला सांगून कळावयाचें नाहीं. त्या सुंदर देखाव्याचें वर्णन करायाला एखादा कालिदास, शेक्सपियर किंवा साक्षात् सरस्वतीदेवीच असती तर तें तीस साधलें असतें. माझ्या सारख्या अल्पमति मनुष्यानें त्याचें वर्णन करूं लागणें म्हणजे केवळ मूर्खपण आहे.

हा तुषार जरी इतका पांढरा सुंदर आणि अतिशय लाजाळू स्त्रीप्रमाणें कांहीं गडबड किंवा शब्द केल्यावांचून लोकांस नकळत पृथ्वीवर येतो तरी ह्याचा पराक्रम केवढा भयंकर आहे तो ज्यानें पाहिला त्याला त्याचा कधीं विसर पडणार नाहीं. तुषाराचा एक कण जर हातावर पडला तर तो अगदीं लहानशा मसूराच्या दाळीपेक्षां मोठा नसून, मोहोरीच्या फुलाच्या पातळ पाक-

ळीच्या चतुर्थांशाएवढी देखील त्याची जाडी नसते. हा कण हातावर पडल्याबरोबर अंगांतील उष्णतेमुळें वितळून तेव्हांच नाहींसा होतो त्याचा चूरमार करण्यास बोट हालविण्याचीसुद्धां गरज नाहीं. हा पदार्थ किती हलका व नाजूक आहे बरें? पण ह्याच अणुप्रमाण कणांची वृष्टि पडूं द्या ह्मणजे यःकश्चित् लहानसहान पुष्कळ कण मिळून काय करतात तें कळून यायाला उशीर लागणार नाहीं. यांनीं न्यूयार्कशहरांत आणि त्याच्या आसपास महाप्रलय करून सोडला. यांनीं रस्त्यांत जिकडेतिकडे पडून वाळवंटांतील वालुकापर्वतासारखे ढीग करून टाकले. यांणीं अग्नि, वरुण, अशनि, वायु इत्यादिकांकडून चाकरी करवून घेणाऱ्या अमेरिकन माणसांची बुद्धि गुंग करून टाकली. आगगाड्यांचे ते महावेगशाली अग्निमय घोडे रस्त्यावर खुंटविले; रस्त्यांत जाणाऱ्या येणाऱ्या माणसांवर आणि घोड्यांबैलांवर पडून त्यांस खालीं दडपून गुदमरून मारलें. आगगाड्यांचा आणि पुलांचा विध्वंस केला. आणखी किती काय केलें याचा सुमारच करवत नाहीं. शहरांत इतका कांहीं तुषाराचा प्रलय झाला कीं, त्यामुळें दूध, कोळसे वगैरे अत्यावश्यकीय पदार्थसुद्धां कोठें मिळण्याची सोय राहिली नाहीं. बोस्टन व न्यूयार्क यांमधील आगगाडीचा रस्ता बंद पडला. तारायंत्राचे खांबे पडून, तारा तुटून ह्या दोन शहरांत काय वर्त्तमान घडत आहे हें कोणाला कळेना. सोमवारीं न्यूयार्कांत अशा प्रकारची तुषारवृष्टि झाली हें वर्त्तमान समुद्रांतील तारायंत्राच्या द्वारें इंग्लंडास जाऊन, तेथून द्राविडी प्राणायाम करून परत तारेनें बोस्टन शहरास येऊन पोहोंचलें! बोस्टन आणि न्यूयार्क यांमधून जातयेत असलेल्या पन्नास आगगाड्या दोनतीन दिवसांपर्यंत मार्गांत खुंटून राहिल्या. कारण लोखंडी रस्त्यांवरील तुषाराच्या ढिगांवरून इंजिनांच्यानें पुढें सरकवेना. त्यांपैकीं कित्येक गाड्या रस्त्याखालीं पडून फुटून पुष्कळ मनुष्यें मेलीं. पेनसिल्वेनिया

नांवाच्या आगगाडीच्या टप्यावरून न्यूयार्क शहराच्या मध्यभागीं येण्यास कित्येक लोकांनीं दर गाडीस पन्नास डालर ( सरासरी १५० रुपये ) भाडें दिलें. बुधवारीं मला एका सभेस जावयाचें होतें. माझ्या बिन्हाडापासून तें ठिकाण सुमारें पावकोसावर असेल; तेथें जायाला मला दहा डालर ( सरासरी ३० रुपये ) गाडीभाडें द्यावें लागलें. बृहस्पतवारीं " ग्रांडसेंट्रल " नांवाचे आगगाडीच्या टप्यावर जाऊन विचारपूस केली, तों बोस्टनचा रस्ता अद्याप खुला झाला नाहीं असें कळून आलें. या दिवशीं मला एका फार जरूरीच्या कामाकरितां आमच्या मंडळीचे व्यवस्थापकांस भेटायाला जायाचें होतें. गाडीनें जाण्याची सोय नाहीं असें पाहून, समुद्रांत जहाजें चालू आहेत कीं नाहीं, याचा शोध केला; परंतु, तोही मार्ग बंद असल्यावरून परत फिलाडेल्फियास जाण्याचा निश्चय केला.

न्यूयार्क आणि फिलाडेल्फिया यांत शंभर मैलांचें अंतर असून जलदीच्या गाडीनें तेथें पोहोंचायाला सव्वा दोन तास लागतात. परंतु सोमवार पासून बृहस्पतवारीं सकाळपावेतों तुषारवर्षामुळें तोही रस्ता बंद असून, त्यावर पुष्कळ अपघात झाले होते. आमची गाडी सकाळीं अकरावाजतां न्यूयार्कहून निघाली, ती रात्रीं आठ वाजेतोंपर्यंत फिलाडेल्फियास येऊन पोहोंचली नाहीं. आमच्यापुढें सर्व रस्ता व आजूबाजूचा प्रदेश तुषाराच्छादित असून, त्यावर सूर्यप्रकाश पडल्यानें गाडींतील सगळ्या माणसांचे डोळे दिपत होते. गाडी पुढें चालण्याला फारच अडथळे होते. हजारों मनुष्य रस्त्यावरून खोऱ्यांनीं तुषार खणून पलीकडे टाकण्यांत गुंतले होते. आमच्या गाडीला दोन मोठमोठालीं इंजिनें लावलीं असून, आमच्या समोरून कांहीं नाहीं तरी अडकून राहिलेल्या तीस आगगाड्या न्यूयार्कांकडे गेल्या; त्यांपैकीं प्रत्येकीस दोन किंवा तीन इंजिनें लावलीं होतीं, तरी त्या महा वाळवंटासारख्या तुषारांतून गाडी ओढण्याचें सोपें नव्हतें. र-

रस्त्याच्या दोहों बाजूंस तुषाराचे उंच ढीग पडले होते. लोखंडी मार्गावरून पडलेला तुषार पलीकडे सारून जात असतां केव्हां केव्हां आमची गाडी अर्धी एक तुषाराच्या ढिगांमध्यें अदृश्य होत असे. कोठें कोठें जेथें वारा फार जोराचा वहात होता त्याच्या आसपासचे प्रदेशांत दहा दहा फुटी उंच तुषाराचे ढीग पडून त्या खालीं घरें, शेतें, मळे, वगैरे झांकून गेले होते.

ह्या गोष्टीस दोन चार दिवस झाल्यानंतर मी फिलाडेल्फियास येऊन पोहोंचल्यावर माझ्या एका मैत्रिणीचें पत्र आलें. त्यांत तिणें लिहिलें होतें कीं, पूर्वप्रदेशांत जरी अशा प्रकारचें तुफान फार विरळा आहे, तरी पश्चिमेस आणि उत्तरेस जीं तुषाराचीं वादळें येतात त्यांच्या मानानें हें तुफान कांहींच नाहीं! तिकडे उष्णतामापकयंत्रांतील पारा शून्याखालीं साठ अंशांपर्यंत उतरतो, आणि तुषाराचे ढीग पंचवीस तीस फुटां इतके उंच असतात. अशा उत्पाताच्या वेळीं कोठें आश्रय घेण्यास जागा नसल्यामुळें, पश्चिमेस उघड्या मैदानांत असलेलीं कोट्यावधि गुरें भयंकर थंडीच्या तावडींत सांपडून मरून जातात. गेल्या आणि त्याच्या मागल्या वर्षीं ऐंशीं लक्षांवर गुरें अशा प्रकारें थंडींत कुडकुडून मरण पावलीं. त्या गरीब प्राण्यांना ज्या यातना सोसाव्या लागल्या असतील, त्यांचें नुस्तें अनुमान केलें तरी अंगावर शहारे उठतात. ह्या शिवाय दरवर्षीं तिकडे किती हजारों मनुष्यें व इतर पशुपक्षी थंडीनें मरत असतील, हें कोणाच्यानें सांगवणार नाहीं.

ह्याप्रमाणें इकडचा हिंवाळा जरी अति भयंकर आहे, तरी त्यापासून लोकांस फायदा करून घेतां येतो. नद्या थिजून गेल्या म्हणजे, कांहीं लोक बर्फ सांठवून ठेवून त्याचा व्यापार करितात. तसेच लक्षावधि स्त्रीपुरुषांस "स्केट"[१]

१ "स्केट्" म्हणजे स्केट् नांवाच्या खडावा पायांत चढवून थिजलेल्या नदीचे किंवा तळ्याचे पात्रावर घसरत नानाप्रकारच्या गति धरून खेळणें. स्केट् खडावांच्या तळव्यांस खालून मधोमध टांचेपासून मधल्या बोटापर्यंत

वे "टोवागन[1]" नांवाचे खेळ खेळण्यास सांपडतात. कित्येक अतिशय थंड प्रदेशांत, मुख्यत्वेंकरून कानड्यांत, आनंदी लोक बर्फाचे मोठमोठाले तक्ते आणि विटा कापून त्यांचे थोरलाले किल्ले बांधतात. एकाद्या नदीच्या नाहींतर सरोवराच्या तीरीं चांगल्या जागेंत बर्फाच्या विटा रचून भिंती घालतांना, कमावलेल्या चुन्याच्या ठिकाणीं पाण्याचा उपयोग करतात. ह्मणजे भिंती घालण्याच्या समयीं एकावरएक बर्फाच्या विटा रचून त्यांवर पाणी ओतलें ह्मणजे तें थंडीनें घट्ट थिजून जातें, त्यामुळें बर्फाच्या विटांची भिंत फार मजबूत होते. ह्या प्रकारचे मोठाले बर्फाचे किल्ले करून त्यांत उत्तम रोषनाई करण्यांत येते. मग कांहीं लोक दोन विरुद्ध पक्षांकडील शिपायांचीं सोंगे घेऊन लटकी लढाई करतात. ह्या लढाईत दारू गोळ्यांच्या बदलीं उत्तम व चमत्कारिक दारूकामाचा उपयोग करण्यांत येतो. रात्रीचे समयीं ह्या हिमप्रासादांत रोषनाई करून त्यावर दारूकाम सोडतांना त्याची शोभा अति मनोहर आणि अवर्णनीय अशी दिसते. ही मौज पहाण्याकरतां लांबलांबचे हजारों स्त्रीपुरुष आणि मुलें त्या ठिकाणीं येऊन जमतात. सेन्टपाल् व मान्टरिओल ही शहरें हिमप्रासादांच्या संबंधानें प्रसिद्ध आहेत.

इ. स. १८८८ तील ज्यानुअरीच्या शेवटल्या भागांत मी फिलाडेल्फियाहून इंडियाना संस्थानची राजधानी इंडियनापोलिस येथें गेलें. तें शहर फिलाडे-

---

चापट धारदार लोखंडाच्या पट्या असतात. स्केटखडावा पायांत चढवून एके ठिकाणीं उभें रहावत नाहीं.

१ टोवागन—हा खेळ मूळचा इकडील इंडियन लोकांचा आहे. पुष्कळ तुषार पडला ह्मणजे एकाद्या उंच जाग्यावरून सपाट उतरणीवरून खालीं घसरत येणें हें फार मौजेचें आहे. ह्या प्रकारच्या खेळास टोवागनची घसरण असें ह्मणतात. टोवागन हें वाहन लांकडाचें केलेलें असतें. त्याला चाकें नसतात. तें सपाट बुडाच्या नावेसारखें असतें.

ल्फियाहून सुमारें बारा तेराशें मैलांवर पश्चिमेस आहे. तिकडे जाण्याचा मार्ग फारच रमणीय आहे. फिलाडेल्फियाहून निघाल्यावर शेंकडों कोस अलिगेनी नांवाचे पर्वतश्रेणीमधून जावें लागतें. हा अलिगेनी पर्वत हिमालयाच्या पादपर्वतांसारखा परम सुंदर आणि फार भव्य आहे. ह्यावर उंच देवदारु, ओक, भूर्ज आणि दुसरे पुष्कळ वृक्ष आहेत. जिकडेतिकडे रानेंवनें आपल्या स्वाभाविक शोभेच्या तारुण्यभरांत असलेलीं दिसून येतात. सस्के-हाना नांवाची महानदी नागमोडी चालीनें ह्या पर्वतामधून वहात आहे. आगगाडीचा रस्ता बहुतेक नदीच्याच तीरावरून गेलेला आहे, त्यामुळें ह्या मार्गानें प्रवास करणाऱ्यास पृथ्वीची संपूर्ण शोभा पहायाला मिळते. मी दोनतीनदां ह्या मार्गानें पर्यटन केलें. पैकीं एक वेळ हिंवाळा असल्यामुळें चोहोंकडे तुषार पडून अलिगेनी पर्वताचीं शिखरें आणि पायथ्याजवळ-चा प्रदेश पांढरा फटफटीत झालेला दिसून येत होता. हा चांदण्यापेक्षां पांढरा व सूर्यप्रकाशानें चकचकत असलेल्या हिमाच्छादित पर्वताचा मनो-रम देखावा ज्यानें पाहिला, त्याला आपल्या डोळ्यांचें सार्थक्य झालें असें वाटल्यावांचून राहावयाचें नाहीं.

फेब्रुअरी महिन्याच्या प्रारंभीं कनेक्टिकट् संस्थानांतील हार्टफर्ड नांवाचे शहरा नजीक फार्मिंग्टन म्हणून एक खेडें आहे, तेथें मी एक मुलींची शाळा पाहण्यास गेलें होतें. हें गांव आगगाडीच्या रस्त्यापासून बरेंच दूर आहे. तेथें जायाला त्या वेळीं चार चाकांची गाडी नसून, स्ले नांवाचें एक बिनचाकी वाहन होतें. त्यांत बसून मी एका मैत्रिणीबरोबर फार्मिंग्टनचा रस्ता धरला. जमिनीवर तुषार पडलेला असतां, तो कांहींसा वाळवंटासारखा असून, त्या-वरून चाकाच्या गाड्या ओढण्यास घोड्यांना फार कठीण जातें; परंतु बिन-चाकी स्ले ओढणें बरेंच सोपें पडतें. ह्या स्लेवर बसून जाणें फार मौजेचें आहे. इकडील आबालवृद्ध मनुष्यें स्लेवाहनाच्या उपभोगाचीं फार भुकेलीं

असतात. फार्मिंग्टनच्या रस्त्यानें जातांना आसपास सर्व जागा तुषारमय झालेली आमच्या दृष्टीस पडली. सभोंवतींचे पर्वत, झाडेंझुडपें, घरांचीं छतें, एकंदर जणूं काय शीतनिवारणार्थच पांढरें तुषाराचें आवरण घेऊन गुरगटून निजलीं आहेत, असें वाटत होतें.

एकंदरींत इकडील शीतकाळ सशक्त मनुष्याला फार सुखावह असा असतो.

## राष्ट्रीय सण.

वर्षप्रतिपदा, वाशिंग्टनचा वाढदिवस, खिस्ताची पुण्यतिथि; "डेकोरेशन् डे," "इंडिपेन्डेन्स डे" थ्यांक्स गिविंग् डे, आणि खिस्तजयंती हे युनाइटेड् स्टेट्स्‌चे राष्ट्रीय सण मानले जातात. ह्या सणांच्या दिवशीं सगळीं दुकानें, कचेऱ्या, कारखाने, पाठशाळा इत्यादि बंद असून सर्वांस सुट्टी मिळते. वर्षप्रतिपदा म्हणजे जानुआरीची पहिली तारीख. हा सामाजिक सण फार जुना व ह्या लोकांनीं आपल्या पूर्वजांपासून घेतलेला आहे. खिस्ताची पुण्यतिथि म्हणजे ईस्टर आणि खिस्तजयंती हे दिवस खिस्तीधर्मस्थापकाच्या सन्मानार्थ पवित्र मानले जातात. फेब्रुअरीची बाविसावी तारीख हा जोर्ज वाशिंग्टन्‌चा वाढदिवस होय. मागल्या शतकांत अमेरिकन लोकांनीं आपण स्वतंत्र राष्ट्र आहों असें सर्वत्रांस सांगून, इंग्लंडाशीं आपला संबंध तोडला. तेव्हां अर्थातच ह्यांची व इंग्रजांची लढाई झाली. तींत वाशिंग्टननें इंग्रजांचें पारिपत्य करून, आपल्या राष्ट्राला जय मिळवून दिला, ह्याबद्दल अमेरिकन लोकांनीं खुष होऊन त्याला आपल्या राष्ट्राचा अध्यक्ष केलें, आणि तो ह्या राष्ट्राचा पिता आहे असें सर्व मानूं लागले. त्याच्या सन्मानार्थ त्याच्या जन्मदिवशीं सर्व लोक आपापल्या मनास वाटेल त्याप्रमाणें उत्सव करतात; व सभांमधून वाशिंग्टनच्या स्तुतीचीं भाषणं होतात.

डेकोरेशन् डे, म्हणजे थडगीं शृंगारण्याचा दिवस, ह्या सणाचें वर्णन पुढें एका ठिकाणीं केलें आहे.

"इंडिपेन्डन्स् डे" म्हणजे स्वातंत्र्याचा दिवस, जुलई महिन्याच्या चौथ्या तारखेस येतो. इ० स० १७७६ सालांतील जुलई महिन्याच्या चौथ्या तारखेस अमेरिकेंतील तेरा जुन्या वसाहतींनीं तेरा स्वतंत्र संस्थानें बनून, इंग्रजी राज्याशीं आपला संबंध नाहीं असें म्हणून दाखविलें. आणि ह्या दिवसापासून आमचें राष्ट्र स्वतंत्र आहे, असें नुस्तें लोकांस सांगितलें इतकेंच नव्हे; तर इंग्लंडासारख्या बलाढ्य राष्ट्राशीं झुंजून त्याला पराजित करून आपलें स्वातंत्र्य मिळविलें. हा राष्ट्रीय सणाचा दिवस फार महत्वाचा आहे. ह्या देशांतील प्रत्येक शहरांत गांवांतून आणि खेड्यांमधून सर्व लोक मोठ्या अभिमानानें हा सण पाळितात. सार्वजनिक सभागृहांतून ह्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें माहात्म्य व देशाचें यश गाइलें जातें, आणि देशाभिमानपर भाषणें होतात. जिकडे तिकडे युनाइटेड् स्टेट्स्ची नक्षत्रांक पताका उभारलेली पाहाण्यांत येते. प्रसिद्ध ठिकाणीं बाजारांतून वगैरे रोशनाई करण्यांत व आतसबाजी उडविण्यांत येते. मुलांना खाऊची आणि फटाकडे उडविण्याची चंगळ असते. जुलैची चौथी तारीख ही ह्या देशची दिवाळी आहे म्हटल्यास चालेल. आमच्या देशच्या दिवाळीचा खरा अर्थ सर्वांस विसरून गेल्यासारखा झाला आहे. कृष्णानें कार्त्तिक वद्य चतुर्दशीस नरकासुराचा वध करून, प्राग्ज्योतिषपुराचें राज्य जिंकून पादाक्रांत केलें, म्हणून तो एक राजकारणी सण मानला गेला होता. आतां दिवाळी धर्मसंबंधी सणांत मोडते. दिवाळी हा जरी राजकारणी सण असें गृहीत केलें, तरी त्यांत आणि जुलैच्या चौथ्या तारखेंत जमीनअस्मानाचें अंतर आहे. दिवाळीच्या दिवशीं एका स्वतंत्र राजाचा वध करून त्याच्या मुलाला करद राजांच्या मालिकेंत गोवून, त्याचे स्वातं-

त्याचें हरण केलें होतें. जुलैच्या चौथ्या तारखेस एका जुलमी, लोभी राष्ट्राचें दास करावयाचें नाहीं असा निश्चय करून, एका लहानशा राष्ट्रानें आपलें स्वातंत्र्य मिळवून घेतलें; व ह्या राष्ट्रांत जो कोणी राहायाला येईल त्याला—(निदान शब्दांनीं तरी)–तें स्वातंत्र्य देण्याची प्रतिज्ञा केली.

मी फिलाडेल्फिया मुकामीं असतांना, तेथें ह्या सणाची धामधूम माझ्या पाहाण्यांत आली. तेथील इंडिपेंडेन्स हॉल म्हणजे स्वातंत्र्य देवीचें जन्मगृह यांत पुष्कळ चांगल्या वक्त्यांनीं, उत्तम देशभक्तिपर व्याख्यानें दिलीं. शहरांत सर्वत्र नक्षत्रांक पताका उडत होत्या. मोठाल्या दुकानांचीं दारें व बड्या बाजारांतील इमारतींच्या देवड्या तांबड्या, निळ्या आणि पांढऱ्या अशा मिश्र रंगांचीं पताकांसारखीं कापडें, तोरणें वगैरे लावून शृंगारल्या होत्या. रात्रीं चोहोंकडे रोषनाई केली असून, स्कुइल्किल् नदीच्या पुलावर नदीमध्यें विचित्र व उत्तम प्रकारची आतसबाजी उडविण्यांत आली. फेअर् माउंट् पार्क् नांवाच्या सार्वजनिक उद्यानांत दूरदुरून बायकापुरुष मुलांना बरोबर घेऊन मौज पाहाण्यास आले होते. त्या हजारों मनुष्यांच्या गर्दींत सर्वत्र आनंद, उत्सुकता आणि प्रसन्नता असलेली दिसण्यांत येत होती.

नवेंबरच्या महिन्यांत "थ्यांक्स गिविंग् डे" म्हणजे आभार मानण्याचा सण येतो. ह्या महिन्यांत सर्व शस्यांची कापणी होऊन, जिकडे तिकडे फळभाज्या आणि धान्यें ह्यांची भरभराट असते. ह्या देशाचा अध्यक्ष नवेंबर महिन्यांतील एकादा सोइस्कर दिवस नेमून आपल्या देशी जानपदांना "तुह्मी अमुक दिवशीं आभार मानण्याचा सण करा आणि माझ्या संगतीं देवाची प्रार्थना करून, त्यानें ह्या वर्षांत आमच्या देशावर जे उपकार केले व आम्हांस जी विपुल शस्यसंपत्ति दिली त्याबद्दल परम नम्रतेनें परमेश्वराचे आभार माना," असा "निरोप" (हुकुम नव्हे!)–लिहून प्रसिद्ध करतो. मग देशाध्यक्षानें नेमलेल्या दिवशीं सर्व दुकानें, कचेऱ्या वगैरे बंद करण्यांत येतात. प्रत्येक देव-

ळांत आणि उपासनामंदिरांत आबालवृद्ध स्त्रीपुरुष परमेश्वराची आराधना करायाला जातात. त्या दिवशीं गरीबगुरीबांना पुष्कळ दानधर्म करण्यांत येतो. ह्या सगळ्या सणावाराच्या दिवसांतून कोणीं फारसें लोकांस जेवायाखायाला बोलावीत नाहींत. कधीं कधीं आपल्या सोयऱ्यांस किंवा मित्रांस जेवायाचें आमंत्रण देतात. प्रत्येक कुटुंबाच्या माणसांनीं आपल्या घरांत गोड गोंड करून खायाचें, बाहेर तमाशा पाहायाला जायाचें आणि तो दिवस आनंदांत घालवायाचा, हा सण करण्याचा प्रकार आहे.

ह्या सार्वजनिक सणांशिवाय आणखी पुष्कळ सण आहेत. निरनिराळ्या मताचे लोक आपापल्या समजाप्रमाणें आपले सण पाळतात. रोमन् क्याथलिक् पंथाच्या लोकांत पुष्कळ साधुसंतांच्या पुण्यतिथी आणि जयंत्या पवित्र मानलेल्या आहेत. लक्षावधि आयरिश् लोक इंग्रजांच्या गांजणुकीला त्रासून देशत्याग करून, ह्या स्वतंत्र देशांत आले आहेत; ते स्वजातीच्या व आपल्या पंथाच्या सणावारीं मोठा उत्सव करतात. त्यांचा कुलदेव संत प्याट्रिक् ह्याच्या जन्मदिवशीं ते आपल्या देशाच्या हिरव्या पताका घरांवर उभारतात. जर्मन, स्कांडिनेवियन्, इटालियन्, फ्रेंच्, रशियन् इत्यादि ज्या युरोपांतील अठरापगड जाती इकडे येऊन वसाहत करून राहिल्या आहेत, त्या याचप्रमाणें आपापले सण करतात.

सणाच्या दिवसांतून आमच्या तिकडे जशीं लाडू, जिलब्या वगैरे पक्वान्नें करतात, तशीं इकडेही ह्यांच्या चालीचीं पक्वान्नें करण्याची गर्दी असते. पण ह्यांच्या सणावारांच्या दिवशीं अतिशय जीवहिंसा होत असते. आम्ही जशा बागांतून, मळ्यांतून वगैरे भाज्या लावून विशेष दिवसांकरतां राखून ठेवतों, तसे इकडले लोक तुर्की कोंबड्यांची व साध्या कोंबड्यांची वगैरे "लागवड" करतात. तुर्की कोंबड्यांचें मांस फारच उत्तम आहे, असा ह्यांचा समज आहे. कोणी पाहुणा घरीं आल्यास त्यादिवशीं एकदोन सबंध तुर्की कोंबडीं शिजवून

त्याला उत्तम मेजवानी देतात.[1] इकडे सर्वत्रांनीं मांस खाण्याची चाल असल्यामुळें अतोनात जीवहिंसा होते. मध्यदेशांत, म्हणजे इलिनोइस्, ओहायो आणि मिसूरी या संस्थानांच्या पश्चिमेस मोठालीं मैदानें असून तेथें फारशी लोकवस्ति नाहीं. तेथें कांहीं होतकरू व्यापारी गुरांचे आणि डुकरांचे थोरलाले "मळे" आणि "शेतें" करून हजारों कोसांवरील शहरांना ह्या हालत्या चालत्या भाज्यांचा पुरवठा करतात. हे निर्दय कसाई आपल्या पिशव्या भरण्याच्या गडबडींत गुरांच्या सुखदुःखाकडे मुळींच लक्ष्य देत नाहींत. मध्यदेशाच्या मैदानांतून लक्षावधि गुरें, उन्हांत तळमळत, पावसांत भिजत आणि वर्फांत थिजत अतिशय दुःख भोगून मरून जातात. त्यांना कोठें निवाऱ्यांत बसण्याची किंवा उभें राहण्याचीसुद्धां सोय केलेली नसते. न्यूयार्क् आणि मासचुसेट्स् संस्थानांत "भूतदयेच्या" ज्या मुख्य मंडळ्या आहेत त्या आपापल्यापरी ह्या प्राण्यांवर होणारा जुलुम कमी व्हावा, म्हणून पुष्कळ प्रयत्न करीत आहेत. त्यांनीं दिलेल्या प्रमाणसिद्ध माहितीवरून असें

---

१ सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं आमच्या देशांत ब्राह्मणसुद्धां मांसभक्षण करीत होते. श्रोत्रिय ब्राह्मण, जांवई किंवा राजा घरीं पाहुणा आल्यास त्याच्या मेजवानीकरितां लठ्ठ, नीरोग आणि कोंवळ्या वयाची गाय, पाडी, किंवा पाडा मारण्याची चाल होती. श्राद्धाच्या दिवशीं मासे आणि इतर प्रकारचें मांस ब्राह्मणांना खाऊं घातल्यास अमुक इतकीं वर्षें पितरांची तृप्ति होते, अशीं स्मृतिवचनें आहेत. उत्तर हिंदुस्थानांत पंचगौड जातीचे बहुतेक ब्राह्मण शेळी किंवा बकरा मारून आपल्या पाहुण्यांचा सत्कार करितात. बंगाली ब्राह्मण मासे, बकरीं व इतर अनिषिद्ध मांसें खातात. बुद्धाच्या उपदेशानें आमच्या देशांत जीवहिंसा बऱ्याच अंशीं बंद झाली, तरी अद्यापि पुष्कळ लोक मिळाल्यास मांस खाण्याला मागें सरत नाहींत.

समजून येतें कीं, गेल्या दोन वर्षांत ऐशीं लक्षांवर गुरें पश्चिमेंतील मैदानांतून उघड्या जाग्यांत असल्यामुळें, थंडीच्या दिवसांत बर्फांत कुडकुडत हाल-हाल होऊन मेलीं. आयवा आणि नित्रास्का या संस्थानांतून पर्यटन करीत असतां मी उन्हाळ्याच्या दिवसांत जे गुरांचे हाल पाहिले, ते नुस्ते आठवले तरी अंगावर शहारे येतात. मैदानांतून कोठें एकादें झाड देखील नाहीं, अशा ठिकाणीं शेंकडों गुरें चरत आहेत, दोन प्रहरीं प्रचंड ऊन पडलें आहे, आणि बिचाऱ्या गुरांना कोठें छायेंत बसण्याची सोय नाहीं. एकाद्या ठिकाणीं कोठें लहानसें डबकें पावसाच्या पाण्यानें भरलेलें असल्यास, कित्येक गुरें त्यांत जाऊन उभीं राहिलीं आहेत. लहान लहान कोंवळीं वासरें उन्हाचा ताप सोसवेनासा झाल्यामुळें कोठें वईपाशीं जाऊन, तिच्या चार चार बोटें रुंद आडव्या पट्ट्यांच्या तुटक्या व अगदीं अपुऱ्या सावलींत डोकीं खुपसून बसलीं आहेत. कोठें एका लहानशा झुडपाभोंवतीं दहावीस गुरें त्या झुडपाच्या थोड्याशा छायेंत आपलीं डोकीं खुपसून उभीं आहेत. कोठें वई, झाडझुडूप, किंवा पाण्याचें डबकें नसल्यामुळें, निरुपायास्तव बिचारीं गुरें उन्हाच्या तापानें गवतावरच तळमळत पडलीं आहेत. परंतु पुढें त्यांची जी दुर्दशा होणार ती मनांत आली, म्हणजे हा त्यांचा वनवास केवल स्वर्गसुख आहे असें वाटल्यावांचून राहात नाहीं. हीं शेंकडों, हजारों, लक्षावधि गुरें गायरानांत चरत आहेत तीं केवळ मनुष्याच्या पोटाचा जाळ शमविण्याकरतां! हीं गायरानें, हे अमेरिकन लोकांच्या भाजीपाल्याचे मळे होत. येथें गुरांची, मेंढ्यांची आणि डुकरांची वंशवृद्धि होते आणि नेमलेल्या वेळेस येथून हीं जिवंत हालती चालती भाजी आगगाड्यांच्या डब्यांतून भरून हजारों कोसांवर पाठविण्यांत येते. कधीं कधीं पांच साहा दिवसांपर्यंत ह्या बंदींत घातलेल्या प्राण्यांना खायाला प्यायाला मिळत नाहीं. मग गाडीवरून उतरल्यावर थोडेंसें खायाला घालून त्यांस

कसायाच्या स्वाधीन करतात. हीं त्यांचीं वधस्थानें मीं कधीं पाहिलीं नाहींत व मला तीं पाहाण्याची इच्छाही नाहीं. परंतु म्यां जें त्यांचें वर्णन वाचलें आहे, त्यावरून ते प्रत्यक्ष नरक व तेथले कसाई आणि हा क्रूर व्यापार करून पोटें भरणारे लोक मानुषराक्षसांहून निराळ्या, म्हणजे 'के ते न जानीमहे'[१] ह्या वर्गांतील असावे असें वाटतें.

ह्या देशचे लोक एकंदरीनें पाहूं गेलें असतां मोठे ममताळू व दयाळू आहेत; परंतु ह्या मांसभक्षणाच्या संवयीमुळें म्हणा किंवा कोणत्याही कारणानें म्हणा, त्यांस मनुष्येतर प्राण्यांच्या सुखदु:खाची फारशी काळजी नाहींसें दिसतें. एकदोन वर्षांपूर्वीं मीं "बालबोध मेवा" नांवाच्या मुंबईतील अमेरिकन मिशन मंडळीनें चालविलेल्या मासिकपत्रांत, एक सुंदर निबंध वाचलेला मला आठवतो. त्या निबंधाला जोडलेलें एक चित्र होतें. त्या चित्रांत एक बाई व तिचीं मुलें गाईला कुरवाळीत असून मुठभर चारा देत आहेत, असें दाखविलें होतें. त्या निबंधांत तो लिहिणारानें एक वाक्य मोठ्या अभिमानानें लिहिलें होतें. त्याचा गोषवारा असा कीं, हिंदुस्थानांत गुरांना व इतर जनावरांना लोक फारच गांजतात; पण अमेरिकेंत त्यांस फार ममतेनें वागवितात. ह्यांत थोडासा तथ्यांश आहे, पण ह्याचा खरेपणा सर्वत्र सिद्ध होणार नाहीं; आमच्या देशांत गरीब बैलांना व घोड्यांना फारच दु:ख भोगावें लागतें हें खरें; पण त्यांवर कोणी ममता करीत नाहीं असें नाहीं. खेडेगांवांत आणि कोठें कोठें शहरांमधून देखील ज्या कुटुंबवत्सल लोकांच्या घरांत दुभत्याला गायी असतात, तेथें बायका आणि मुलेंबाळें त्या गुरांवर आणि वासरांवर आपल्या कुटुंबांतील माणसांप्रमाणें ममता करतात. व्यापारी, गौळी आणि कसाई गुरांवर जुलूम करतात हें फार वाईट आहे म्हणून तो नाहींसा करण्यास सर्वांनीं झटलें पाहिजे.

---

१ ते कोण हें आम्हास माहित नाहीं.

परंतु तशाप्रकारचा जुलुम अमेरिकेंत नाहीं असें कोणी म्हणेल, तर तें खोटें आहे. इकडील शहरांतील बाजारांतून आणि कारखान्यांच्या गांवांतून ज्यानें क्रूर गाडीवाल्यांच्या घोड्यांची दशा पाहिली असेल, त्याला तरी निदान इकडे पशूंवर जुलूम करण्याची चाल नाहीं असें वाटणार नाहीं.

पंचवीस वर्षांपूर्वी न्यूयार्क शहरांत हेन्री बर्ग नांवाचा दयाळू गृहस्थ ह्या मुक्या जनावरांचा कैवार घेऊन लोकांशीं बोलूं लागला. त्या काळीं मुक्या जनावरांची लोक जी छळणा करीत, तिचें वर्णन करणें हें कोणाला साधणार नाहीं. हेन्री बर्ग जनावरांचा पक्ष घेऊन बोलूं लागला, तेव्हां बहुतेक सर्वलोक त्याची थट्टा करूं लागले. कोणी म्हणाले त्याला वेड लागलें आहे. कांहीं धार्मिक लोक म्हणाले, हा पाखंडी धर्मशास्त्राविरुद्ध बोलत आहे. आमच्या धर्मशास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, परमेश्वरानें मनुष्याला सर्व जनावरांवर आधिपत्य दिलें, तेव्हां तीं मनुष्याच्या उपयोगार्थच सृष्ट केलेलीं आहेत. असें धर्मशास्त्रप्रमाण मिळालें तेव्हां मग काय पुसतां, सगळ्या लोकांनीं पशूंचा कैवार घेणाऱ्या हेन्रीचा छळ मांडला! तो न्यूयार्कच्या रस्त्यांतून जात येत असतां शेंकडों वेळ लोकांनीं त्याला दगडमार केला, त्याच्या अंगावर केरकचरा, चिखल वगैरे टाकून, आपल्या मताचें समर्थन केलें. पण हेन्री बर्ग मोठा सचोटीचा आणि दृढनिश्चयी मनुष्य होता. त्यानें हजारो विघ्नें आलीं, तरी हातीं घेतलेलें हें मनुष्यपणाचें काम सोडलें नाहीं. कांहीं वर्षांनीं त्यानें प्रयत्न करून पशूंवर जुलूम होऊं नये ह्या अर्थाचा कायदा करून घेतला. एके दिवशीं संध्याकाळीं न्यूयार्क शहर जणूं काय झोंपेंतून जागें झाल्यासारखें झालें. न्यूयार्कच्या रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या पांचशें गाड्या कोणीशा अटकावून धरल्या आणि त्यांस जुंपलेल्या घोड्यांची परीक्षा केली. त्यांपैकीं जे घोडे दुखणाईत, लंगडे किंवा अतिशय अशक्त आहेत असें कळून आलें, ते त्यांच्या मालकांला विचारल्यावांचूनच सो-

ढून नेले. ह्यानंतर हेन्‍री बर्ग कोण आहे आणि मुक्या जनावरांस पाहिजे त्या रीतीनें गांजण्याचा मालकाला अधिकार नाहीं, हें सर्वांस कळून आलें. हेन्‍री बर्गच्या श्रमाचें सार्थक्य झालें. आलीकडे लोकमत पशूंस अनुकूल असें झालें आहे. मासचूसेटसची "भूतदयाप्रसारक" मंडळी ह्या कामांत पुष्कळ श्रम करीत आहे. ह्या मंडळीचे अध्यक्ष जोर्ज टी. एंजल् हे बरेच वृद्ध आहेत, तरी केवळ धर्मार्थ मुक्या जनावरांच्या हिताकरतां रांत्रंदिवस खपत आहेत. त्यांच्या व दुसऱ्या कित्येक सज्जन स्त्रीपुरुषांच्या उद्योगानें ह्या देशांतील मुख्यमुख्य शहरांमधून "भूतदयाप्रसारक" मंडळ्या स्थापन झाल्या आहेत. पशूंवर आणि पक्ष्यांवर जुलुम होवूं नये, म्हणून पुष्कळ कायदे झाले आहेत. मुलांमध्यें भूतदयेचा प्रसार व्हावा म्हणून "ब्यांड्स् आफ् मर्सी" म्हणजे दयेच्या जुटी स्थापन झाल्या आहेत. आजतागाईत सहा हजारांवर दयेच्या जुटी अस्तित्वांत आल्या आहेत, आणि त्यांच्या हातून भूतदयाप्रसाराचें काम जारीनें चाललें आहे. आमच्या देशांत अशा मंडळ्या असण्याची मोटी जरूरी आहे. मुलांस लहानपणापासून परोपकार, भूतदया आणि सगळ्या वस्तूंचा सदुपयोग कसा करावा, हें शिकविणें अवश्य आहे.

ह्याप्रमाणें मुक्या जनावरांच्या हितार्थ सज्जनांचा प्रयत्न सर्वत्र चालला आहे, तरी मनुष्येतर प्राण्यांवर अद्यापि पुष्कळ जुलुम होत आहेत. नखरेबाज बायका आपल्या टोप्या शृंगारण्याकरतां वर्षांतून असंख्यात सुरेख पांखरांचे बळी देतात. "अहो, पशुपक्षी तर मनुष्याच्या उपयोगार्थ सृष्ट झालेले आहेत, मग आम्हीं पाहिजे तसा त्यांचा उपयोग कां न करावा?" म्हणून धर्मशास्त्राचें प्रमाण दाखविणारे पुष्कळ लोक ह्या देशांत सांपडतात. जीवंत कोंबडीं विकत घेऊन घरीं भाजी करायाला नेतांना त्यांचे पाय दोरीनें बांधून त्यांचीं डोकीं खालीं व पाय वरती करून लोंबकाळीत नेत अस-

तांना, ह्या प्राण्यांस कशा यातना होतात हें माणसांना मुळींच समजत नाहीं, असें दिसतें. एके दिवशीं मी फिलाडेल्फियाच्या रस्त्यांत उभी राहून गाडीची वाट पाहात असतां, एक तेरा चवदा वर्षांचा मुलगा जीवंत कोंबड्याचे पाय हातांत धरून त्याचें डोकें खालीं करून लोंबकाळीत कांहीं अंतरावर उभा राहिला होता तो मी पाहिला. मी त्याजपाशीं जाऊन म्हटलें 'भाऊ, तूं ह्या कोंबड्याचें डोकें वर करून कां धरीत नाहींस? तो किंचित् हंसून म्हणाला, "त्यांचे पाय धरून नेणेंच सोईस्कर आहे." "हं असें काय? मला वाटतें कीं, कोणी तुमचे पाय वर करून तुम्हांला उलटें टांगून धरून नेलें, तर तें तुम्हांस बरें वाटणार नाहीं. कां हें माझें अनुमान खरें कीं खोटें?" हें एकून तो मुलगा हंसला, आणि माझ्या मुरवतीकरतां त्यानें एक पळभर कोंबडीचें डोकें वर करून धरलें. त्या दिवशीं संध्याकाळीं मी बिऱ्हाडीं जाऊन ही गोष्ट सांगितली, तेव्हां एक तरुण शिक्षकीण बाईनें म्हटलें:—"कोंबड्यांस उलटें टांगून ठेवण्याची रीतच आहे, आणि तीच बरोबर आहे." पण मला ह्या गोष्टीचा थोडा संशय आला; कारण त्यांस उलटें टांगून ठेवणें बरें किंवा वाईट, ह्या विषयीं कोंबड्यांचें मत काय आहे, हें आम्हीं त्यांस विचारून पाहिलें नाहीं. (आमच्या देशांत देखील कोंबड्यांना वगैरे उलटें टांगण्याची क्रूर चाल आहे, हें सांगायाला नको.) जेवणाच्या खोलींत कधीं कधीं भिंतींवरून चित्रांच्याबदलीं मेलेल्या मोरांचीं किंवा खबुत्रांचीं प्रेतें पेंढा भरून उलटीं टांगून ठेवलेलीं असतात. आणि नुक्त्याच धरून खुंटीला टांगून ठेवलेल्या रक्तबंबाळ माश्यांचीं आणि शिकारींत मारून आणलेल्या ससांचीं वगैरे चित्रें काढून, भिंतींवर टांगण्याचीही चाल आहे. ही चाल बरी नाहीं हें सांगायाला नकोच. अशीं क्रूरपणाचीं चित्रें पाहिल्यानें मुलांचीं मनें क्रूर होतात. कधीं कधीं मुलांचें व मोठ्या माणसांचे खेळही मोठ्या क्रूरपणाचे असतात. सुंदर तरुण स्त्रिया, कोंवळीं मुलें, तरुण

पुरुष, मध्यवयाचे विद्वान् गृहस्थ देखील मनोरंजनार्थ मासे धरायाला जातात. एका बारीक लांब काठीला लांब सुतळी बांधून तिच्या शेवटाला जी लोखंडाची आंकडी असते, तिला मासाचे तुकडे टोंचून पाण्यांत घालतात. मग बिचारे भुकेले मासे तें मास खाण्याच्या आशेनें तेथें येऊन, आंकडीसकट मासाचा तुकडा गिळीत असतां, त्यांच्या घशांत ती आंकडी रुतून त्यांच्या प्राणाचा अंत होतो. आणि मग "अहाहा माझ्या आंकडीला मासा लागला!" म्हणून तीं क्रूर माणसें माशाला पाण्यांतून काढून त्याच्या मरणयातना पाहून, आपल्या डोळ्यांचीं पारणीं फेडतात! ह्या त्यांच्या चाली पाहिल्या, म्हणजे इकडे एकाद्या दयाळू बुद्धदेवाचे मिशनरी येऊन त्यांचें मनःपरिवर्त्तन करतील तर बरें होईल, असें वाटल्यावांचून राहणार नाहीं.

---

हिंदुस्थान आणि अमेरिका, ह्या पृथ्वीच्या दोहोंबाजूंस एकमेकांच्या उलट दिशेस आहेत; तेव्हां अमेरिकन लोकांस आह्मीं उलटे ह्मणजे खालीं डोकें व वरतीं पाय करून चालतोंसें वाटणें, आणि त्याचप्रमाणें अमेरिकन लोक उलटे चालतात असें आह्मांस वाटणें, हें स्वाभाविक आहे. आमच्या देशांत भूतदयेचा प्रकार अमेरिकन लोकांच्या उलट आहे. ते मनुष्येतर प्राण्यांना यातना देतात. आह्मीं त्यांच्याकरतां पांजरपोळ घालतों; गोशाला स्थापन करतों; ढेंकूण, उवा, चिलटें, मुंग्या यांस मोठ्या दयेनें मनुष्याचें रक्त देऊन त्यांचें पोषण करतों; सापाला दूध पाजून त्याची पूजा करतों; पण मनुष्यांच्या जीवाचें आह्मांला कांहीं वाटत नाहीं. शेजारच्या घरीं कोणी मेलें तर आह्मीं घराचीं दारें लावून बसतों. कोठें महामारी वगैरे रोग उद्भवून शेजारी विपत्तींत पडले, ह्मणजे त्यांचा समाचार घेणें आह्मांस कठिण जातें. आमच्या बायका नानाप्रकारचे रोग होऊन मरतात, पण इंग्रजांनीं तजवीज दिल्यावांचून आह्मीं बायकांकरतां दवाखाने घालीत नाहीं. आह्मी गाईला मातेसमान समजून तिच्या पायां पडतों, पण आमच्या बायकांना, आमच्या मुलांच्या आयांना आह्मीं

अमेरिकन लोकांमध्यें मनोरंजनाचे पुष्कळ प्रकार आहेत. हे लोक बहुतकरून मोठे उद्योगी व मेहेनती आहेत; तेव्हां काम करून झाल्यावर थोडेंसें मनोरंजन करून घेणें ठीकच आहे. लान् टेनिस् नांवाचा खेळ एतद्देशीय स्त्रीपुरुषांस मोठा प्रिय आहे. थंडीच्या व वसंताच्या दिवसांत ह्या खेळापासून लोकांस चांगला व्यायाम मिळतो. पुरुष बेज् बाल् नांवाचा खेळ खेळतात; कुस्त्या करतात आणि होड्या वल्हवितात. बायकाही कधीं कधीं उन्हाळ्यांत होड्या वल्हवितात. थंडीच्या दिवसांत थिजलेल्या नद्यांच्या पात्रांवरून आणि तळ्यांवरून स्केट नांवाचा खेळ खेळण्याची चाल आहे. ह्याशिवाय उत्सवाच्या व इतर सुट्टीच्या समयीं बायकापुरुष मिळून नाचण्याची, गाण्याची वगैरे चाल आहे. बायकापुरुषांनीं आपल्या गायनकलारूपी परमेश्वराच्या अमोलिक देणगीचा उत्तम उपयोग करून, आनंद पावणें हें फार उत्तम आहे; परंतु त्यांची नाचण्याची तऱ्हा चांगली नाहीं. शहरांतून आणि लहानसहान गांवांतून सुद्धां सर्वत्र नाटकगृहें असतात. ह्या लोकांना नाटकें पाहाण्याची मोठी हौस आहे. कधीं कधीं गायनगृहांतून गायनसमारंभ होतात. तेथें फार चांगली व्यवस्था असून, बहुत संभावित स्त्रीपुरुष तेथें जाऊन गायन आणि वाद्यें ऐकतात. संध्याकाळच्या वेळीं किंवा फावेल तेव्हां आबालवृद्ध स्त्रीपुरुष सार्वजनिक उद्यानांत जाऊन, स्वच्छ वायूचें सेवन करतात. अमेरिकन लोक नाटकें व दुसरे खेळ पाहाण्यास फार उत्सुक असतात

---

मरे मरेतोंपर्यंत मारतों. आमचे राजेलोक इंग्रजांच्या खाऊन पिऊन सुखी असलेल्या मुलांस व इंग्रजी अधिकाऱ्यांस मेजवान्या देण्यांत लक्षावधि रुपये खर्च करतात; पण गरीब अनाथ बाळकांकरितां अनाथगृहें व देशांतील गरीब लोकांच्या मदती करतां उद्योगशाळा वगैरे स्थापण्याच्या कल्पनाच त्यांच्या मनांत येत नाहींत! अमेरिकन लोकांपेक्षां आमच्यांत अधिक भूतदया आहे खरी!

खरे; तरी ते आमच्या तिकडल्या कित्येक निरुद्योगी मनुष्यांप्रमाणें केवळ नाटकेंच पाहाण्यांत आपला पैसा व आयुष्य खर्ची घालीत नाहींत; त्यांचे उद्योगधंदे करून झाल्यावर विश्रांतीच्या वेळीं करमणुकीकरतां खेळ खेळ- तात, आणि कामाच्या वेळीं आंग मोडून काम करितात.

---

## विद्याव्यासंग.

चीन देशाचें स्वराज्य एशिआ, यूरोप, आफ्रिका, अमेरिका आणि अ- स्ट्रेलिया ह्या पांचही भूखंडांतील सगळ्या राज्यांपेक्षां प्राचीन असून, तें आज चार हजार वर्षांपर्यंत टिकलें आहे. मिश्री, हेल्लेणी, रोमन, हिंदुस्थानी इत्यादि प्राचीन राज्यें लयास गेलीं. त्यांपैकीं कांहीं परदेशी शत्रूंच्या पायां- खालीं चुरडत आहेत; कांहीं बलिष्ट परराज्यांच्या अर्ध्या वचनांत वागत आहेत; आणि कांहींकांचें नांवावांचून दुसरें कांहीं चिन्ह राहिलें नाहीं; पण चीन देश अद्यापि स्वतंत्र आहे, त्यांत स्वराज्य आहे. एकादे वेळीं प्रबल पाश्चात्य शत्रूपुढें जरी त्या राष्ट्राला मान झुकवावी लागते, तरी त्याला आपल्या प्रजांची व देशाची उन्नति करून पाश्चात्य राष्ट्रांशीं टक्कर मारण्याचें सामर्थ्य अंगीं आणण्याची शक्ति आहे; त्याप्रमाणें तें आपली सुधारणा करून घेतही आहे. अमेरिकन, इंग्रज आणि दुसरे युरोपियन लोक चीन्यांचा पाहिजे तितका अनादर करोत, थट्टा करोत किंवा निंदा करोत, तरी ते चीन्यांस भिऊनच वागतात. आज मितीस चीनाला परचक्रा- पासून भय बाळगण्याचें कारण नाहीं. आतां नव्या कालमानाप्रमाणें नव्या मनुष्यस्थितीला उपयोगीं पडणारे असे कांहीं फेरबदल करून, चीन जर आपल्या राष्ट्राला आंतून बळकटी आणील, तर बाहेरून येणाऱ्या अनि- ष्टांनीं त्याचें कांहीं अहित होणार नाहीं, असें खास दिसतें. त्या राष्ट्रास

इतकी बळकटी, इतका स्थायिकपणा व इतकें महत्त्व येण्याचें कारण काय? "विद्या असल्यास जातिभेद राहाणार नाहीं," असें चीनी लोकांचा गुरु **कङ्फुट्झ** ह्याचें म्हणणें होतें. त्याच्या उपदेशाप्रमाणें चीनी लोकांनीं अमुक एक जात श्रेष्ठ आहे असें न मानतां, मनुष्याची विद्या व सुनीति हींच त्याच्या श्रेष्ठतेचीं खरीं कारणें होत असें समजून, अमीरउमरावांच्या आणि विशेष जातींच्या हातीं राज्यकारभार न देतां; ज्याची जशी विद्या आणि वर्तणुक असेल, त्याला तशा योग्यतेचा अधिकार देण्याची चाल पाडली. ह्यामुळें चीनांतील गरीब अप्रसिद्ध व नीच कुळांत जन्मलेल्या मनुष्याला सुद्धां विद्या व नीतिमत्ता यांच्या योगानें मोठ्या योग्यतेला चढण्याची आशा असते. चीनांतील पुरुषजातींत विद्येचें प्राधान्य आहे. तेथील साधारण मजूर मोलकऱ्यांस देखील लिहितां वाचतां येतें. ज्याला लिहितां किंवा वाचतां येणार नाहीं, असा पुरुष फार विरळा. ह्याप्रमाणें विद्येवर ज्या देशाचा राज्यकारभार स्थापला आहे, तो बळकट कां असणार नाहीं? ज्याचे रहिवासी सतत उद्योगधंदा करण्यांत तत्पर आहेत व जे कधीं आळशी भिकाऱ्यांचे लाड करीत नाहींत, जे विद्येची चाहा करतात, त्यांच्या देशांत स्वराज्य असल्यास नवल नाहीं; तें नसणें हीच मोठी आश्चर्याची गोष्ट होय. प्लुतार्क नांवाच्या विद्वानानें म्हटलें आहे कीं, "नुमानें बांधलेली न्यायरूपी सुरेख इमारत पडून गेली, कारण ती विद्यारूपी पायावर बांधलेली नव्हती." ज्यांत इतर सगळ्या गोष्टी चांगल्या आहेत, अशा राज्याची अवनति होण्याचें कारण दुसरें काय? त्याच्या राजनीतीला विद्येचा दृढ पाया आधारभूत नव्हता, ह्यापेक्षां त्याच्या पतनाचें बलवत्तर कारण दुसरें कोणतें असावें? ज्या राष्ट्रांत थोडेसे लोक विद्या शिकतात—आणि तेही एक दोन निवडक जातींचे असावयाचे—व जेथें बाकी लक्षावधि, कोट्यवधि रहिवासी अज्ञानांधकारांत गढलेले असून, त्यांस वरिष्ठ पद मिळण्याची नुस्ती आशा

बाळगण्यास देखील जागा नाहीं, अशा राष्ट्राचा मोड झाला नाहीं तरच मोठें नवल म्हणावयाचें.

चीनाप्रमाणेंच युनाइटेड् स्टेट्स्‌च्या राजकार्यधुरंधरांस व नीत्युपदेशकांस विद्येची योग्यता कळून आली आहे. राष्ट्रांतील सगळ्या रहिवाशांस निदान लिहितां वाचतां तरी यावें, त्यावांचून आपलें स्वराज्य टिकणार नाहीं; असें त्यांस चांगलें माहीत आहे. आणि आलीकडे तर त्यांना स्त्रियांसही पुरुषांप्रमाणेंच विद्या मिळविण्याचे मार्ग मोकळे करून देणें, अत्यावश्यक आहेसें वाटूं लागलें आहे. ह्या गोष्टींत ह्यांची चीनावर तोड आहे. स्त्रीशिक्षणाचें महत्त्व केवढें आहे, हें हळूहळू चीनादिक सर्व राष्ट्रांस कळून येईल. युनाइटेड् स्टेट्स्‌चें राष्ट्रीय बळ खड्या फौजेंत, तोफांत आणि तरवारींत नाहीं; तें ह्या राष्ट्राच्या रहिवाशांच्या विद्यावत्तेंत आणि उद्योगप्रियतेंत आहे.

पियोरिटन् पंथाचे लोक, आपल्या देशांत स्वतंत्र विचारानें धर्माचरण करायाला मिळत नाहीं असें पाहून, अत्लांतिक समुद्र उतरून अमेरिकेंत वसाहत करायाला गेले; तेव्हांपासूनच त्यांनीं आपल्या मुलांस विद्याशिक्षण अवश्य मिळालें पाहिजे असें समजून, शाळा स्थापल्या. चारशें वर्षांपूर्वी मार्टिन ल्रूथरनें ख्रिस्ती लोकांस रोमन् क्याथलिक् भटांच्या दास्यांतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला; तेव्हांपासून यूरोपांत सर्व साधारण मनुष्यांस थोडीबहुत विद्या असणें अवश्य आहे, ही गोष्ट मान्य होऊं लागली. कपटी भटांनीं कोट्यवधि भोळ्या बापड्या मनुष्यांस फसवून, पाखंडाच्या शृंखलेनें जखडून ठेविलें, याचें कारण अज्ञान होय; असें समजून ल्रूथरनें सगळ्यांस समजणाऱ्या भाषेंत बाइबलाचें भाषांतर करून, तें सर्वांनीं वाचावें व स्वतंत्रपणें विचारपूर्वक धर्माचरण करावें, म्हणून उपदेश केला. धर्मोपदेशकांपेक्षां शिक्षकांचें पद अधिक महत्त्वाचें आहे असें समजून, ल्रूथरनें म्हटलें होतें कीं, "मी जर उपदेशक नसतों तर खचीत शिक्षक झालों असतों." स्वतंत्र

विचारानें धर्माचरण करण्यास लोकांना धर्मपुस्तक वाचण्याची शक्ति असली पाहिजे; आणि कायदेशीर वर्तणुक ठेवण्यास देशाचे कायदे काय आणि कसे आहेत, ते वाचून समजून घेण्याची शक्ति असली पाहिजे.

पियोरिटन्‌पंथी लोकांनीं अमेरिकेंत वसाहत केल्यानंतर थोड्या वर्षांनीं आपल्या वसाहतींत ज्या ज्या गांवांत म्हणून पन्नास किंवा अधिक कुटुंबें असतील, तेथें दर पन्नास कुटुंबांना एक शिक्षक असावा, असा नियम केला. त्या शिक्षकानें त्या कुटुंबांतील मुलांस आणि चाकरमाणसांस लिहायाला व वाचायाला शिकवावें, आणि गांवकऱ्यांनीं त्याचा चरितार्थ चालवावा, असा कायदा केला. त्यानंतर दुसऱ्या वसाहतदारांनीं, मासचूसेट्‌सकरांनीं घालून दिलेला कित्ता वळवून, आपापल्या वसाहतींतून असेच कायदे केले. इ. स. १६६५ त मासचूसेट्‌सकरांनीं आपल्या संस्थानांत सर्वत्र फुकटच्या शाळा स्थापून, तेथील सर्व रहिवाशांनीं आपल्या मुलांस व पोष्यवर्गास शाळांतून शिकायाला धाडलेंच पाहिजे, असा निर्बंध केला. त्यानंतर इतर न्यू इंग्लंडच्या वसाहतींतून असेच कायदे झाले. परंतु दक्षिणेंतील व्हर्जिनिया संस्थानाची स्थिति त्यांहून फार निराळी होती. तेथें फुकटच्या शाळा नव्हत्या आणि छापखानेही नव्हते. सर्व लोकांत विद्याहीनतेचा परिणाम त्या आणि तशाच दुसऱ्या दक्षिणात्य संस्थानांतून फार वाईट झाला, हें इतिहासप्रसिद्ध आहे.

युनाइटेड् स्टेट्‌स्‌चें सार्वजनिक विद्याखातें जरी सरकारी आहे, तरी राष्ट्रीय सरकाराशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं. प्रत्येक संस्थानिक सरकार आपापल्या जानपदांस व त्यांच्या मुलांस विद्या देण्याची जबाबदारी घेतें, आणि आपापल्या सोईस पडेल त्याप्रमाणें शाळा, वरिष्ठ विद्यालयें वगैरे स्थापून, त्यांचा खर्च चालवितें. ह्याप्रमाणें सगळ्या संस्थानांतून आणि उपसंस्थानांतून निरनिराळीं विद्याखातीं आहेत. अडतीस संस्थानांपैकीं अठ्ठावीस संस्थानांत शि-

क्षक तयार करण्याकरतां मोठालीं अध्यापणव विद्यालयें आहेत. तेथें शिकून तयार झालेले शिक्षक आणि शिक्षकिणी राष्ट्रांतील सगळ्या सरकारी किंवा स्वतंत्र शाळांतून मुलांस विद्या शिकवितात. आपल्या जानपदांस व त्यांच्या मुलांस विद्या मिळणें अवश्य असून, विद्याखात्याचा खर्च भागविणें हें सरकारांचें काम आहे असें जाणून, हें लोकसत्ताक राष्ट्र स्थापन होतांच, युनाइटेड् स्टेट्स्‌च्या सरकारानें विद्येस उत्तेजन देण्याचे नियम केले. इ. स. १७८५ त, म्हणजे स्वातंत्र्य मिळविण्याकरतां ह्या राष्ट्राचें इंग्रजांशीं चाललेलें युद्ध संपतांच, युनाइटेड् स्टेट्स्‌च्या राष्ट्रीय शासकसभेनें प्रत्येक संस्थानांतील सार्वजनिक जमीनीचा सोळावा भाग विद्याखात्याचा खर्च पुरविण्याकरतां राखून टेवायाचा असा निर्बंध केला. इ. स. १८४८ त राष्ट्रीय सभेनें नवा कायदा करून, विद्येला अधिक उत्तेजन देण्याकरतां आणखी सहा कोटि ऐशीं लक्ष एकर (६,८०,००,०००) जमीन सत्तावीस संस्थानांस वांटून दिली. ह्याशिवाय पुष्कळ संस्थानिक विश्वविद्यालयें स्थापण्याकरतां सरकारानें अतोनात जमीन दिली आहे, ती निराळीच. इ. स. १८६२ त सगळ्या संस्थानांतून शेतकी व उद्योगधंदे शिकविण्याच्या शाळा स्थापण्याकरतां आणखी पुष्कळ जमीन देण्यांत आली. इ. स. १८८६ पर्यंत राष्ट्रीय सरकारानें संस्थानांतून व उपसंस्थानांतून शाळाखात्याच्या उपयोगाकरतां दिलेली जमीन सातकोटि ऐशीं लक्ष (७,८०,००,०००) एकर, म्हणजे इंग्लंड, स्काट्लंड आणि ऐर्लंड हे तीन देश मिळून झालेल्या भूभागापेक्षांही अधिक होती. लोकांस विद्या देण्याच्या कामीं जर्मनी यूरोपांतील सर्व राष्ट्रांत प्रमुख आहे. तेथें दरवर्षी दहा कोटि पस्तीस लक्ष (१०,३५,००,०००) रुपये विद्यादानांत खर्ची पडतात. ग्रिटनच्या संयुक्तराज्याची योग्यता जर्मनीच्या खालोखाल आहे. तेथें वर्षाकांठीं दहाकोटि दोनलक्ष पंचाहत्तर हजार रुपये (१०,०२,७५,०००) विद्येकरतां खर्चिले जातात. युनाइटेड् स्टेट्स्‌चें सरकार दरसाल सत्तावीस कोटि नव्वद लक्षां-

पासून अठ्ठावीस कोटि ऐशीं लक्ष (२८,८०,००,०००) रुपयांपर्यंत द्रव्य खर्च करून, आपल्या जानपदांस विद्यादान करतें. ह्याच सरकाराच्या सेनाखात्याचा वार्षिक खर्च सरासरी चौदा कोटि दहा लक्ष (१४,१०,००,०००) रुपये आहे. ब्रिटनच्या संयुक्त राज्याच्या सेनाखात्याला दरवर्षी त्रेचाळीस कोटि पस्तीस लक्ष (४३,३५,००,०००) रुपये खर्च लागतो म्हणतात. ह्यावरून ब्रिटिश् सरकार नुस्त्या संयुक्तराज्याच्या सेनेकरतां, युनाइटेड् स्टेट्स् सरकाराला त्याच कामीं लागणाऱ्या द्रव्याच्या तिपटीहून अधिक पैसे खर्च करतें; आणि युनाइटेड् स्टेट्स्चें सरकार ग्रेटब्रिटन्च्या सरकारास विद्याखात्यांत लागणाऱ्या द्रव्याच्या अडीच किंवा पावणेतीनपट पैसा खर्चून लोकांस विद्या शिकवितें, असें दिसून येईल. यूरोपांतील राजसत्तांचा जीव सेनेंत आहे, आणि युनाइटेड् स्टेट्स्च्या लोकसत्तेचें बळ आणि प्राण विद्येंत आहे, एवढेंच ह्या आकाशपाताळ अंतराचें कारण होय. जेथें सेनाखात्याच्या खर्चापेक्षां विद्याखात्याचा खर्च अधिक, असें एकच राष्ट्र सगळ्या पृथ्वींत आहे, तें हें लोकसत्ताक राष्ट्र होय.

सार्वजनिक सरकारी विद्याशाळांतून धर्मशिक्षणाची म्हणजे निरनिराळ्या पंथांचीं विशेष मतें शिकविण्याची मनाई आहे. दररोज सकाळीं शाळेच्या कामास आरंभ होण्यापूर्वी शाळेंतील मुख्य शिक्षक किंवा शिक्षकीण बाइबलाचा थोडासा भाग वाचते, पण त्यावर टीका टिप्पण करीत नाहीं. ही चाल सर्वांस पसंत आहे. कडव्या रोमन् क्याथलिक् पंथाच्या लोकांवांचून इतर सर्व लोक आपल्या मुलांस आणि साधारण लोकांस विद्या मिळावी, असें इच्छितात. रोमन् क्याथलिक् पंथाचे आचार्य पूर्वीपासूनच विद्येला भीत आले आहेत. कारण विद्यावान् लोक आंधळ्यासारखें आपल्या उपदेशाचें ग्रहण करणार नाहींत, असें त्यांस पक्कें ठाऊक होतें. पण युनाइटेड् स्टेट्स्च्या साधारण रोमन् क्याथलिक्पंथी लोकांस देखील आलीकडे विद्या आवडूं लागली आहे. तेही आपलीं मुलें सरकारी शाळांत पाठवितात. तेथें कोणी त्यांचें

मत काय आहे म्हणून विचारीत नाहीं. ह्या योगानें रोमन् क्याथलिक् पोपानें आपल्या शिष्यमंडळीस ह्या धर्मबाह्य सार्वजनिक शिक्षणाचें ग्रहण करूं नका, म्हणून आज्ञापत्रें पाठविलीं तरी, तीं निष्फळ होत चाललीं आहेत. विषेसाखरेचें अमृतमय पंचपक्वान्नांनीं भरलेलें ताट भुकेल्या मनुष्यापुढें मांडून ठेवलें असतां, "तूं ह्यांतील एकही पदार्थ खाऊं नको," असें त्याला जर कोणी सांगेल, तर त्याचें सांगणें भुकेल्या माणसास कसें मान्य होईल ?

युनाइटेड् स्टेट्स्चें सरकार आपल्या पदरचा पैसा खर्च करून लोकांस विद्या देतें असें वर सांगितलें आहे, पण इकडील सरकार म्हणजे लोकनियुक्त शासक मंडळी, आणि त्यानें पदरचा खर्च द्यावयाचा म्हणजे जानपदांकडून मिळालेला कर ह्या कामीं लावायाचा. आमच्या इंग्रजराजशासित राष्ट्रांतही प्रजा विद्याखात्याचा खर्च चालविण्याकरतां कर देतात. पण त्यांचा तो पैसा खर्च करण्याविषयीं सरकार प्रजाचें मत घेत नाहीं इतकेंच नव्हे; तर प्रजांपासून कर घ्यायाचा तो घेऊन आणखी त्यांच्यापासून मुलांस विद्या शिकविल्याबद्दल दरमहा गुरुदक्षिणा ( फी ) ही घेतें. इ. स. १८८० त युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकारी विद्याखात्याचा जो खर्च झाला, त्यापैकीं चारपंचमांश खर्च कराच्या पैशानें भागला, आणि उरलेला एक पंचमांश शाळासंबंधीं जमीन विकून किंवा भाड्याला देऊन मिळाला होता. ह्या देशाचे जानपद विद्याखात्याच्या खर्चाकरतां कर द्यावयाचा तो मोठ्या संतोषानें देतात. ह्यावरून त्यांची विद्याभिरुचि केवढी आहे ती चांगली दिसून येते.

सार्वजनिक शाळांहून वेगळ्या आणखी हजारों वरिष्ठ शाळा आहेत, त्या बहुतकरून स्वतंत्र लोकस्थापित आहेत. त्यांचा खर्च शिष्यांनीं दिलेल्या दक्षिणेवर आणि उदार लोकांच्या देणग्यांवर चालतो. कित्येकांस सरकाराकडून कांहीं मदत मिळते. बहुतेक वरिष्ठ शाळांस सरकाराकडून अधिकार मिळालेला असल्यामुळें, त्यांच्या व्यवस्थापक मंडळ्या आपापल्या वि-

द्यार्थ्यांस योग्य पदव्या देतात. ह्या वरिष्ठ विद्यालयांच्या योग्यतेंत पुष्कळ तारतम्य आहे. एका ठिकाणीं ज्या विद्यालयास विश्वविद्यालय असें नांव दिलेलें आहे, त्याच प्रकारचें विद्यालय दुसऱ्या ठिकाणीं वरिष्ठ शाळांत मोडतें. हार्वर्ड, कलंबिया, कोर्णेल, प्रिन्स्टन्, मिशिगन्, ओबर्लिन् अशीं कित्येक विद्यालयें वरिष्ठ प्रतीचीं विश्वविद्यालयें म्हणवितात. इतर विश्वविद्यालयांची योग्यता ह्यांच्या इतकी नाहीं. ह्या देशांत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वजनिक शाळांहून वरिष्ठ प्रतीच्या शाळा, विद्यालयें आणि विश्वविद्यालयें मिळून तीन हजार पांचशें पन्नास असून, त्यांत सुमारें पांच लक्ष विद्यार्थी शिकत असतात. ह्यांपैकीं तीनशें चौसष्ट वरिष्ठ विद्यालयें व युनिवर्सिट्या आहेत, त्यांतून शिकणाऱ्या स्त्रीपुरुषांची संख्या एकुणसाठ हजार पांचशें चौऱ्याण्णव आहे.

मागच्या खानेसुमारीवरून असें कळतें कीं इ.स. १८८०–८१ त सरकारी आणि स्वतंत्र विद्याशाळा मिळून युनाइटेड् स्टेट्समध्यें एक लक्ष ऐशीं हजार सातशें पन्नास (१,८०,७५०) शाळा असून, त्यांतून विद्याशिक्षण देणाऱ्या शिक्षकांची संख्या दोन लक्ष त्र्याहत्तर हजारांइतकी होती. ह्यांपैकीं एक लक्ष चौपन्न हजार तीनशें पंचाहत्तर (१,५४,३७५) स्त्रिया होत्या! ("स्त्रियांची स्थिति" ह्या अध्यायांत एतद्देशीय स्त्रियांच्या विद्यावत्तेविषयीं वगैरे माहिती विस्तारानें दिली आहे.) युनाइटेड् स्टेट्स्ची लढाऊ सेना पंचवीस किंवा तीस हजारांहून अधिक नाहीं; पण ही अज्ञानाशीं युद्ध करून त्याचा पाडाव करण्याच्या कामीं रात्रंदिवस खपणारी शिक्षकसेना सुमारें पावणेतीन लक्षांइतकी आहे; तेव्हां ह्या देशाचें भाग्य सदोदित ऊर्जित असणार नाहीं कसें? ही भव्य सेना ज्या देशांचें वैभव आणि ज्या जातीचें स्वातंत्र्य रक्षण करण्यास कंबर बांधून तयार आहे, तो देश आणि ती जात पृथ्वींतील सर्व देशांच्या मालिकेंत सर्वोत्तम रत्नांसारखीं चमकतील ह्यांत नवल नाहीं. मी इ.स. १८८६

सालाच्या आरंभीं फिलाडेल्फिया शहरीं पोहोंचलें, तेव्हां सारे दोन तीन महिने अमेरिकेंत राहाण्याचा माझा बेत होता. परंतु प्रसंगवशात् त्या शहरांतील सार्वजनिक शाळा पाहायाला गेलें, तेव्हां तेथील व्यवस्था, शिक्षणाची शैली, शिक्षकांची योग्यता वगैरे पाहून मला इतका कांहीं संतोष वाटला कीं, ह्या देशांत कांहीं काळपर्यंत राहून येथील विद्याखात्याची व शिक्षणसरणीची माहिती करून घ्यावी असा निश्चय करून, पुढें मी येथेंच राहिलें. ह्या प्रकारें गेल्या पावणेतीन वर्षांत म्यां जेथें म्हणून जावें तेथील बहुतेक प्राथमिक आणि वरिष्ठ शाळा पाहून, शिक्षणसरणीची माहिती करून घेण्याचा क्रम चालू ठेवला. यूरोपांतील जर्मनी, इंग्लंड वगैरे थोरलाल्या राष्ट्रांत वरिष्ठ शिक्षणाची पद्धत फार उत्तम असेल, परंतु सार्वजनिक साधारण-शिक्षणाच्या कामीं युनाइटेड् स्टेट्स्ची योग्यता सर्वांहून अधिक आहे, असें म्हटल्यास चालेल. अमेरिकन शिक्षकमंडळी एकंदरींत फार उत्तम आहे, असें मला वाटतें. एथील शिक्षकिणी बहुतकरून मर्यादशील, निरहंकार, आत्मसंयमी उद्योगी, निग्रही पण ममताळू, आणि शाळांत उत्तम बंदोबस्त ठेवणाऱ्या अशा आहेत. त्यांना आपल्या पदवीचा आणि आपल्या शाळेचा अभिमान वाटतो; त्या आपल्या शाळेची योग्यता वाढविण्यास रात्रंदिवस झटत असतात. आपल्या शिष्यमंडळीस भय दाखवून तिजकडून जुलमाचा रामराम करून घेण्यापेक्षां मुलांची प्रीति संपादून त्यांस उत्तम शिक्षण देऊन, त्यांच्या आईबापांकडून सन्मान मिळविण्यांतच अधिक प्रतिष्ठा आहे, असें समजतात. बायकांच्या हातीं शिक्षणाचें काम आल्यापासून इकडच्या बहुतेक शाळांतून मुलांस कडक शिक्षा देण्याचें बंद झालें. शिक्षित बायकांना मुलांस मार दिल्यावांचूनच त्यांच्याकडून उत्तम काम करवितां आणि आज्ञा पाळवितां येते. घोडीवर देणें, कोलदांडी, छड्यांचा मार, ऊठवशा, चिमटे घेणें, कान पिळणें, चापट्या मारणें, "खुरची," अशा क्रूर

शिक्षा ह्या देशच्या शिक्षकिणींस मुळींच माहित नाहींत. कोठें कोठें शाळा पाहायाला गेलें असतां, तेथील एकाद दुसरें हट्टी मूल शिक्षा भोगीत असलेलें माझ्या दृष्टीस पडलें. त्याची शिक्षा म्हणजे, बहुतकरून एकाद्या उंच खुर्चीवर पाव किंवा अर्धातास मुकाट्यानें बसून राहाणें ही असे. मोठ्यांत मोठा शरीरदंड म्हणजे, मुलाला कांहीं वेळपर्यंत एका कोपऱ्यांत उभा करून ठेवणें, हा होय. शिक्षकांची धडे शिकविण्याची शैली अशी कांहीं उत्कृष्ट आणि मनोरंजक आहे कीं, मुलें शिकण्यास फार उत्सुक असतात. सुट्टी संपून शाळा केव्हां सुरू होईल, असे उद्गार पुष्कळ मुलांच्या तोंडून निघालेले माझ्या ऐकण्यांत आले. शिक्षकांचें शिक्षण विद्यार्थ्यांस इतकें आवडण्यासारखें असतें, म्हणून मुलांस धडे शिकण्याचें सोडून एकाद्या उंच ठिकाणीं हात पाय जोडून उगीच बसून राहाणें म्हणजे मोठी जबर शिक्षा आहे असें वाटावें, ह्यांत नवल नाहीं. एकादा धडा शिकण्याचें सोडून उगाच बसावें लागेल, मग शाळेंतील सगळीं मुलें आपल्याकडे बोटें दाखवून मनांतल्या मनांत हंसतील, ह्या भयानेंच बहुतेक सर्व खोडकर मुलें वठणीस येतात. पण अमेरिकेंत देखील कांहीं तुसड स्वभावाचे शिक्षक आणि कांहीं कोडगीं मुलें आहेतच, ही गोष्ट विसरतां कामा नये!

साधारण प्राथमिक शिक्षणाच्या शाळांत, लेखन, वाचन, इंग्रजी व्याकरण, युनाइटेड् स्टेट्स्चा इतिहास, अंकगणित, भूगोल, नकाशे व चित्रें काढणें, शिवणकाम, व्यायाम, आरोग्यरक्षणविद्या इतके विषय शिकविण्यांत येतात. कोठें कोठें शिक्षकांच्या मर्जीप्रमाणें कांहीं शास्त्रीय विषयही शिकवितात. वरिष्ठ शाळांतील अध्ययनाचे विषय आमच्या तिकडील इंग्रजी हायस्कूल, कालेजें वगैरेंतील विषयांसारखेच आहेत. मात्र तिकडच्या सारखी घोकपट्टी इकडे नाहीं! स्त्रियांच्या शाळांतून साधारण इतर विषयांखेरीज गायन, वाद्यवादन, शिवणें, चित्रलेखन व इतर उपयोगी कामें शिकवितात. सार्व-

जनिक प्राथमिक शाळांत मुली आणि मुलें एकेच ठिकाणीं शिकतात. वरिष्ठ शाळांतही बहुतकरून असाच नियम आहे; पण कोठें कोठें मुलांच्या आणि मुलींच्या शाळा निरनिराळ्या आहेत. उत्तम प्रतीच्या विश्वविद्यालयांतूनही स्त्रियांस आणि पुरुषांस एकत्र व एकाच प्रकारचें शिक्षण देण्याची चाल पडत चालली आहे. ओबर्लिन्, मिशिगन्, कोर्नेल् आणि इतर पुष्कळ विश्वविद्यालयांतून स्त्रिया पुरुषांच्याबरोबरीनें विद्या शिकतात; त्यामुळें विद्यार्थ्यांचें पुष्कळ हित होत असून, समाजांत नीतिमत्तेचा प्रसार होत आहे. पूर्वीं ज्या विद्यालयांतून केवल पुरुषांसच शिक्षण मिळत असे, त्या ठिकाणीं बायकांचा प्रवेश झाल्यापासून विद्यार्थिवर्गात मर्यादशीलपणा वाढून, अशिष्ट व्यवहार नाहींसे झाले आणि होत आहेत. एतद्देशीय शिक्षकाग्रणी विद्वत्शिरोमणि मोठाल्या विद्यालयांचे अध्यक्ष यांनीं, वर्षान्‌गणती ह्या गोष्टीचा अनुभव घेऊन, आतां आपलें मत स्त्रियांस अनुकूल असें दिलें आहे. मिशिगन्, कोर्नेल्, ओबर्लिन् वगैरे विद्यालयांचे अध्यक्ष आणि अध्यापक ह्या गोष्टीचे पुरस्कर्ते आहेत. इ. स. १८८४ सालांत हवाई द्वीपांचा ऐतिहासिक वृत्तांत लिहितांना, ह्याम्टन्च्या उत्कृष्ट उद्योगशाळेचे प्रसिद्ध अध्यक्ष जनरल् आर्म्स्ट्रांग असें म्हणाले कीं:—

"नीतिमत्तेंत दुर्बळांच्या अंगीं बळ आणण्याचा मार्ग हा कीं, अनुकूळ अशा स्थितींत एकादी वस्तु पडताळून पाहिल्याप्रमाणें, सतत त्यांची परीक्षा करीत असावें. दोन जातींच्या परस्परांशीं संबंधाविषयीं त्यांच्या मनांतले वाईट ग्रह घालवून, त्यांच्या ठिकाणीं उत्तम समज भरवून देऊन, त्यांस चांगलें वळण लावणें अवश्य आहे. तें केवळ काल्पनिक गोष्टी सांगून तोंडचा उपदेश करून नव्हे, तर प्रत्यक्ष दृष्टांत दाखवून शिक्षण दिलें, तरच त्याचा उपयोग होतो. दोन जातींस (स्त्रीपुरुषांस) दूर दूर ठेवल्यानें त्यांस पुढें आपसांत दळणवळण ठेवण्याचा प्रसंग आल्यास, त्यांच्या अंगीं फारशी अ-

कल असत नाहीं. तसें करणें म्हणजे एकाद्या मुलाला पाण्यापासून दूर ठेवून पोहायाला शिकविण्यासारखें आहे. शाळांतून चांगली व्यवस्था ठेवूनही एकाद्या जातीच्या मुलांस आणि मुलींस एकत्र शिक्षण देणें हें नीतिदृष्ट्या बरें नाहीं, असें जर कोणाच्या **अनुभवास** आलें, तर त्यांनीं त्या जातीच्या उन्नतीची आशा सोडून द्यावी, हेंच बरें. ती जात अनीतिमान् होणार व नाश पावणार; हेंच तिच्या अदृष्टांत लिहिलें आहे असें समजावें. स्त्रीपुरुषांस एकत्र विद्या शिकविण्यास निग्रही, नीतिमान्, उत्तम शिक्षक आणि बहुमोली शाळागृहें असणें अवश्य आहे हें खरें; परंतु एखादी मनुष्यजात शरीर, मन आणि नीतिमत्ता ह्या गोष्टींत बळकट होऊन अस्तित्वांत राहावी असा जर आपला उद्देश असेल, तर सभ्यपणा, धार्मिक आचरण आणि कुटुंबांतील मनुष्यांचें परस्परांशीं दळणवळण हीं एकत्र केल्यानेंच तो उद्देश सफळ होण्याचा संभव आहे, एरवीं नाहीं. ज्या ठिकाणीं स्त्रियांस आणि पुरुषांस सारखे हक्क व आपापली योग्यता दाखविण्याचे सारखे प्रसंग मिळतील, असें ठिकाण म्हणजे मिश्रशाळा हें आहे, आणि त्याठिकाणीं परस्परांची ओळख करून घेऊन परस्परांची योग्यता समजून घेण्याचें चांगलें साधन असतें. ह्याम्टन् येथील आमचा अनुभव भावी तरुण स्त्रीपुरुषांच्या परस्परांशीं होणाऱ्या नानातऱ्हेच्या संबंधांविषयीं खोल विचार करण्यास कारण होत असून, नीतिसंपन्न घराण्यांत असल्याप्रमाणें एकमेकांशीं दळणवळण ठेवून स्त्रीपुरुषांनीं एकाच ठिकाणीं विद्याभ्यास करावा, ही गोष्ट आम्हांला दिवसेंदिवस अधिक उत्तम वाटत आहे. ”

कांहीं वर्षांपूर्वी सार्वजनिक आणि स्वतंत्र शाळांची व्यवस्था पहाणाऱ्या मंडळ्यांत सगळे पुरुषच असत, परंतु मुलांस शिक्षण देण्याच्या कामीं बायकांचा फार उपयोग आहे आणि आपल्या मुलांस नीतीचें वगैरे शिक्षण कसें

काय मिळतें, तें असावें तसें आहे कीं नाहीं, शिक्षक नीतिमान् आहेत कीं नाहींत इत्यादि गोष्टींची काळजी मुलांच्या आयांस अधिक असणार, असें समजून समजदार दीर्घदर्शी स्त्रीपुरुषांनीं कांहीं संस्थानांतून विद्वान् बायकांस शाळांच्या व्यवस्थापक आणि परिदर्शक केल्या आहेत; आणि ह्या व्यवस्थापक बाया विद्याखात्याची फार सुधारणा करीत आहेत. स्त्रियांस विद्याखात्यांत आणि इतर सर्व खात्यांतून पुरुषांच्या बरोबरीनें काम करायाला, व त्यांची व्यवस्था कशी असावी ह्याबद्दल आपलें मत द्यायाला मिळाल्यास, त्या त्या खात्याच्या व्यवस्थेंत सुधारणा होऊन सर्व देशाचें हित होईल, असा समज साधारण सर्वत्र बळकट होत चालला असून, त्याप्रमाणें लवकरच कार्यें होऊं लागतील, असा रंग दिसत आहे. ईश्वर करो आणि तो प्रचारांत येवो. कारण देशाचें कल्याण व्हायाचें तें समाजगाड्याचें एक चाक एकीकडे आणि दुसरें चाक भलतीकडे चालल्यानें होत नसून, दोन्हीं चाकें बरोबर आणि एकाच मार्गानें चालल्यासच होणार, हें उघड आहे. पुरुष तितके ज्ञानी आणि त्यांनाच सगळ्या गोष्टींचें उत्तम ज्ञान आहे, असें समजणें बरोबर नाहीं. कांहीं वर्षांमागें अमेरिकेंतील मूळ रहिवाशांपैकीं एका कोनेस्टोगा नांवाच्या जातीचे ( म्हणजे ज्यांच्याशीं महात्मा विलियम् पेन्‌नें आचंद्रार्क स्थिर राहणारा मैत्रीचा तह केला, ते ) लोक आपल्या मोहोरप्या होऊन दरबारांतून बोलण्याकरतां बायकांचीही योजना करीत असत. ही चाल त्या वेळच्या इंग्रजी पुरुषांस मोठी चमत्कारिक आहेशी वाटली. "तुम्ही बायकांस सभांतून बोलूं कां देतां," म्हणून त्यांनीं कोनेस्टोगांस विचारलें, तेव्हां त्यांणीं उत्तर केलें कीं; "कांहीं बायका कांहीं पुरुषांपेक्षां अधिक ज्ञानी असतात." दोन तीनशें वर्षांपूर्वी एका रानटी जातीला जें सत्य करतलामलकवत् माहीत होतें, तें अमेरिकनांसारख्या सभ्यशिरोमणि जातीला नुक्तें कोठें कळूं लागलें आहे. परंतु त्याचें महत्त्व अमेरिकन

लोकांच्या लक्ष्यांत अद्यापि पूर्णपणें आलें नाहीं. इकडच्या विद्याखात्यांत आणि दुसऱ्या अनेक गोष्टींत दिवसेंदिवस अधिक सुधारणा होत जाऊन त्यांस उत्तमत्व प्राप्त होत आहे, ह्याचें कारण मुख्यत्वेंकरून त्या त्या गोष्टींची सुधारणा करण्यास शिक्षित, शिष्ट स्त्रिया रात्रंदिवस मेहेनत करून मनापासून त्यांची कळवळ वाळगीत आहेत, हें होय. इकडचे निष्पक्षपाती दूरदर्शी पुरुष ह्या मताचे पोषक आहेत.

ह्या देशाच्या सगळ्या गोऱ्या रहिवाशांत ज्यांस साधारण लिहितां वाचतां येत नाहीं, अशा लोकांची संख्या फारच थोडी. शेंकडा त्र्याण्णव पुरुषांस व शेंकडा एकुणनव्वद बायकांस लिहितां वाचतां येतें. लिहितां वाचतां येत असलेल्या बायकांची संख्या पुरुषांपेक्षां थोडीशी उणी आहे ह्याचें कारण बायकांच्या बुद्धीचा किंवा मेंदूचा कमीपणा हें नव्हे, तर त्यांस साधारण विद्याशिक्षणाचे मार्ग खुले होऊन अद्यापि साठ वर्षें झालीं नाहींत आणि वरिष्ठ शिक्षण मिळूं लागून तर अद्यापि तीन तपेंदेखील झालीं नाहींत हें होय. आणि पुरुषांस विद्याशिक्षण मिळण्याचे मार्ग तर हें राष्ट्र स्थापन होण्याच्या पूर्वीं शेंकडों वर्षांपासून खुले होते. इतक्या थोड्या (म्हणजे पन्नास-साठ वर्षांइतक्या) काळांत बायकांनीं नानाप्रकारच्या विपत्ति भोगून, लोकापवाद आणि हजारों विघ्नें यांशीं झुंजून विद्येंत पुरुषांची बरोबरी करण्यापर्यंत टप्पा आणून पोहोंचविला, ह्यावरून त्यांच्या बुद्धीचें तीव्रत्व, दीर्घोद्योगीपणा आणि अचलधैर्य हे गुण किती चोख आहेत हें चांगलें दिसून येतें. इ. स. १८७० सालीं स्त्रियांस मध्यम आणि वरिष्ठ शिक्षण मिळण्याकरतां म्हणून स्थापलेल्या शाळांची संख्या एकशें पंचाहत्तरांइतकी होती, ती इ. स. १८८० त दोनशें सत्तावीसांवर वाढली; आणि गेल्या आठ वर्षांत आणखी शेंकडों वरिष्ठ विद्यालयें स्त्रियांकरतांच स्थापण्यांत आलीं आहेत. ह्यावरून प्रसंग मिळाल्यास विद्या शिकण्याकरतां बायका किती उत्सुक असतात, हें सम-

जून थेईल. ह्या उत्तम स्त्रीशिक्षणाच्या वाढीनें युनाइटेड् स्टेट्स्च्या लोकसत्ताक राष्ट्राला केवढें तेज आणि किती दृढता आली व येईल, ह्याचा नुस्ता सुमार तरी कोणाच्यानें करवेल ? इ. स. १८८० सालांत शाळांतून विद्येच्या निरनिराळ्या शाखा शिकणाऱ्या मनुष्यांचा तपशील येणेंप्रमाणें:-

देशांतील समग्र रहिवाशांपैकीं दर पांच मनुष्यांत एक शाळेंत जाऊन प्राथमिक किंवा साधारण विद्याशिक्षण पावत आहे; दर चारशें पंचावन्न मनुष्यांत एकाला दुसऱ्या प्रतीचें शिक्षण मिळत आहे; दर आठशें बेचाळीस मनुष्यांत एकाला कॉलेज आणि युनिव्हर्सिटी, यांतील वरिष्ठ शिक्षण मिळत आहे; दर एक हजार आठशें अठ्ठेचाळीस मनुष्यांत एकाला व्यापारधंद्याविषयीं शिक्षण देण्यांत येत आहे; दर चार हजार तीनशें एकविसांत एकाला शास्त्रीय शिक्षण मिळत आहे; दर नऊ हजार पांचशें अडुसष्ट मनुष्यांत एकाला धर्मविद्या शिकविण्यांत येत आहे. दर सोळाहजार एक मनुष्यांत एकाला कायदेकानू पढविण्यांत येत आहेत. ह्यावरून अमेरिकन् लोकांस विद्येची किती गोडी आहे आणि विद्येच्या मानाप्रमाणेंच आपल्या देशाची उन्नति किंवा अवनति होणार हा समज ह्यांच्या मनांत कसा दृढ झालेला आहे, हें चांगलें कळून येतें.

कांहीं वर्षांपासून कित्येक दीर्घदर्शी स्त्रीपुरुषांनीं, मुलांस साक्षर केल्यानेंच केवळ विद्या दिल्यासारखी होत नाहीं; तर विद्येचें सुफळ उत्पन्न होण्यास विद्यार्थ्यांना पुस्तकी विद्येबरोबर उद्योग धंद्यांचेंही शिक्षण दिलें पाहिजे, तरच विद्यालयांत खर्चीं पडणाऱ्या कोट्यवधि रुपयांचें व लक्षावधि मनुष्यांच्या श्रमानें सार्थक्य होईल असें समजून, साधारण शाळांतून उद्योगशिक्षण देण्याची सुरुवात केली आहे. जर्मनींतील मोठाले तत्त्ववेत्ते अध्यापक यांचें असेंच मत होतें. फ्रोय्बल् नांवाचा प्रसिद्ध शिक्षक व "किंडर् गार्टन्" शिक्षणपद्धतीचा उत्पादक ह्याचें म्हणणें असें आहे कीं, मनुष्यास बाळपणापासूनच शिक्षण मिळावें, तें असें

असावें कीं, त्याच्या योगानें मनुष्याचे हात, पाय, बुद्धि, दृष्टि, कान आणि वाचा, किंबहुना सर्वांग आणि मन हीं सारखीं उपयोगांत येऊन, तीं सारख्या परिमाणानें सबळ व्हावीं. तान्हें बाळ वस्तू पाहून ओळखायाला लागलें, म्हणजे त्याच्याशीं बोलतांना, खेळतांना वगैरे त्याला उत्तम वळण लावण्याकडे व शारीरिक आणि मानसिक शिक्षण देण्याकडे आईबापांचें लक्ष्य असावें. आणि बाळपणापासून असें सर्वांगसुंदर शिक्षण मिळाल्यासच मनुष्याची खरी उन्नति होणार आहे, म्हणून फ्रोयबल् म्हणे कीं, मुलांचें शिक्षण सर्वस्वीं त्यांच्या आयांवर अवलंबून आहे. आयांस विद्याशिक्षण आणि नीतिज्ञान जोंपर्यंत मिळणार नाहीं, तोंपर्यंत त्यांच्या मुलांची सर्व साधारण समतोल, सुरेख उन्नति होईल, अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे.

मासचूसेट्स् संस्थानांतील प्रसिद्ध मिस् इलिझबेथ् पीबडी ह्या महामान्य वृद्ध बाईस एतद्देशीय लोक "बालशिक्षणाची आई" असें म्हणतात. ह्या सज्जन बाईनें नानाप्रकारच्या विपत्ति भोगून आणि विघ्नें व प्रतिकूल लोकमत यांशीं झुंजून, बहुत वर्षें दीर्घप्रयत्न करून, ह्या देशांत फ्रोयबल्च्या "किंडर् गार्टन्" शिक्षणपद्धतीचा प्रसार केला. सुमारें दोन वर्षांपूर्वी मला ह्या बाईची भेट झाली होती. तिचें वय हल्लीं शायशीं वर्षां जवळजवळ असून, शरीर प्रकृति अगदीं अशक्त आहे. जरी तिचें शरीर जरेनें शिथिल करून टाकलें आहे, तरी तिचें मन आणि बुद्धि तरुण आहेत. विद्याशिक्षणाविषयीं बोलत असतां तिचें मुख प्रसन्न होतें. तिणें मला आपल्या लहानपणचा अनुभव सांगितला. तिची आई मोठी सुशील, विचारी आणि प्रेमळ बायको होती. तिनें आपल्या मुलीला घरांतच बहुतेक शिक्षण दिलें. त्या प्रेमळ माउलीच्या अनुग्रहानेंच इलिझबेथ् आज मोठ्या योग्यतेला चढून, ह्या देशांतील विद्यारूपी इमारत बांधणारांपैकीं मुख्य मनुष्यांत तिची गणना होत आहे. आपल्या आईविषयीं बोलत असतां वृद्ध पीबडीबाईचें तोंड आनंदानें प्रफुल्लित झालें, आणि

ती क्षणभर आपलें वार्धक्य विसरून बाळपणांत गेल्याप्रमाणें सुरेख दिसूं लागली. इलिझबेथ् पंधरासोळा वर्षांची असतां आपला चरितार्थ चालवून घेण्याचें काम तिच्या वांट्यास आलें, तेव्हांपासून ती मुलांस विद्याशिक्षण देऊं लागली. पुढें कांहीं वर्षांनीं हातीं थोडासा पैसा सांचल्यावर तिणें उत्तम विद्याभ्यास केला, आणि यूरोपांत जाऊन तिकडच्या उत्तम शिक्षणपद्धतींची माहिती मिळविली. जर्मनींत जाऊन तिणें फ्रोयबल्‌च्या पद्धतीचें अध्ययन केलें, तेव्हां तिची खात्री झाली कीं, ह्या पद्धतीनें मुलांस बाळपणापासून उत्तम वळण लावून, त्यांची नीति, विद्याशिक्षण व त्यांपासून होणारी त्यांची उन्नति ह्यांचा पाया दृढ करावा, हेंच उचित आहे. ह्या शिवाय पोकळ पुस्तकी विद्येपासून कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. मग तिणें स्वदेशीं येऊन, शेंकडों ठिकाणीं ह्या विषयावर भाषणें केलीं. हजारों बायकांस "किंडर् गार्टन्" पद्धतीचें शिक्षण दिलें; व आपणही मुलांस विद्या शिकविली. आतां तिच्या श्रमाचें सार्थक्य होऊं लागलें असून, ती जीवंत असतांच आपल्या उद्योगाचें अमृतफळ स्वदेशी लोकांस खायाला मिळत आहे, हें पाहून तिला समाधान होत आहे; ह्याचा आम्हांस मोठा आनंद वाटतो. आपल्या श्रमाचें सार्थक्य झालेलें ज्यांस पाहायाला मिळतें, अशीं महद्भाग्यशाली मनुष्यें जगांत फार थोडीं आहेत. सेंट् लूइस्, फिलाडेल्फिया, बोस्टन वगैरे प्रख्यात विद्यापीठांतून सार्वजनिक विद्याखात्यांत, "किंडर् गार्टन्" शिक्षणपद्धति चालू झाली आहे. इतर शहरांतूनही ती लवकरच चालू होईल असा रंग दिसत आहे. सेंट् लूइस् मध्यें आज बारा वर्षें ही पद्धत सार्वजनिक विद्याखात्यांत घेतली असल्यानें, तेथील सार्वजनिक शाळा ह्या देशांतील सगळ्या सार्वजनिक शाळांपेक्षां वरिष्ठ प्रतीच्या झाल्या आहेत. इ० स० १८८७ त शिकागो शहरांत, आणि ह्या सालीं (म्हणजे १८८८ त) सान् फ्रान्सिस्को शहरांत भरलेल्या राष्ट्रीय शिक्षकसभेकडून शाळांतील खरडे, चित्रें, नकाशे वगैरे

शाळांतून मुलांनीं केलेल्या वस्तूंचें प्रदर्शन झालें; त्यांत सेंट् लुइस्च्या शाळांस पहिलें पद व बक्षीस मिळालें. ह्यावरून फ्रोय्बल्ची पद्धत फार उत्तम आहे आणि ती सगळ्या विद्यांच्या पायाच्या जागीं आहे, हें सर्वांस समजून आलें. लोकांच्या स्वतंत्र शाळांत ह्या पद्धतीचा जसा प्रसार झाला आहे, तसा तो सरकारी शाळांतून झाला नाहीं, पण लवकरच होईल असें अनुमान आहे. मिस् पीबडीच्या मागून प्रोफेसर् आड्लर् आणि कर्नल् पार्कर् वगैरे शिक्षक, पुस्तकीविद्येबरोबर उद्योगशिक्षण देणें अवश्य आहे, हें तत्व प्रमाणसिद्ध करून दाखवूं लागले. न्यूयार्क् शहरांत डाक्तर् आड्लर् यांणीं एक उत्तम शाळा स्थापिली आहे; तींत मुलांस दोन्ही प्रकारचें शिक्षण मिळत असून, तें त्यांस फार आवडतें. कर्नल् पार्कर् हे शिकागो शहराजवळील 'कुक् काउंटी नार्मल् स्कूल्' चे वरिष्ठाध्यापक आहेत; ते हजारों स्त्रीपुरुष शिक्षकांना, मुलांस उद्योगशिक्षण कसें द्यावें, हें शिकवीत असतात. त्यांची पद्धति फार प्रशंसनीय आहे.

येथें उद्योगशिक्षण म्हटलें आहे ह्याचा अर्थ, सुतारकी, लोहारकी वगैरे धंद्यांचें शिक्षण असा समजूं नये. ह्याप्रकारचे धंदे शिकविण्याला पुष्कळ स्वतंत्र आणि सरकारी शाळा स्थापिलेल्या आहेत. मुलांना लिहिणें वाचणें शिकवितांनाच त्यांस हातांनीं काम करण्यास, डोळ्यांनीं आकृति वगैरे पाहून तिचें चित्र काढण्यास, किंवा मातीची प्रतिकृति करण्यास, हत्यारांचा उपयोग करण्यास वगैरे शिकवून, त्यांच्या मेंदूबरोबरच हातापायांच्या वगैरे स्नायूंस बळकटी आणणें, हाच ह्या उद्योगशिक्षणाचा अर्थ होय. ह्या योगानें केवळ स्नायूंसच बळकटी येते असें नाहीं, तर मुलांचें मनोरंजन होतें, आणि त्यासरशीं त्यांस कोणत्या प्रकारच्या शिक्षणाची गोडी अधिक आहे हें समजल्यानें, त्यांस योग्य ठिकाणीं पाठवून, त्यांना हव्यातशा विद्येचें किंवा धंद्याचें शिक्षण देण्यास सोईचें पडतें. ज्या मुलाला गणितांत गति नाहीं त्याला

कदाचित् चित्रकला किंवा कारागिरी उत्तम प्रकारें शिकतां येईल; आणि ज्यास चित्र काढतां येत नाहीं, त्याला कदाचित् उत्तम पुस्तकें वाचतां येतील वगैरे गोष्टी समजून येण्यास, असलें शिक्षण फार उपयोगी आहे. बोस्टन्, फिलाडेल्फिया, न्यूयार्क्, शिकागो, सेंट्लुइस् इत्यादि शहरांतून असल्या प्रकारचें शिक्षण देण्याकरतां स्वतंत्र शाळा स्थापिलेल्या आहेत. मासचूसेट्स् संस्थानांतील "किन्सी" नांवाच्या गांवीं एक थोरली शाळा आहे. तींतील शिक्षणपद्धति अशी कांहीं उत्तम आहे कीं, तिच्या योगानें लहान मोठ्या मुलांस पुस्तकीविद्येबरोबर व्यावहारिक ज्ञान होऊन, उद्योगाची अभिरुचि लागते. त्या पद्धतीस "किन्सी मेथड्" असें नांव पडलें आहे. व्हर्जिनिया संस्थानांतील ह्याम्टन् ह्या गांवीं जनरल् आर्म्स्ट्रॉंग् ह्यांच्या प्रयत्नानें एक शेतकीची शाळा स्थापन झाली आहे. तींत रानटी इंडियन् व दास्यस्थितींतून नुकतेच मुक्त झालेले अर्धवट रानटी निग्रो, ह्या दोन जातींच्या मुलांस आणि मुलींस पुस्तकीविद्येबरोबर उद्योगशिक्षण मिळतें. ह्याम्टन्‌ची शाळा "शेतकी" ची शाळा आहे खरी, पण तींत दुसरेही उपयुक्त धंदे शिकविले जातात. तेथें शिकून तयार झालेलीं मुलें रानटी स्थितींतून निघून, पुनर्जन्माला आल्याप्रमाणें शिष्टाचारसंपन्न व उद्योगप्रिय होतात, आणि तीं कोणत्याही सभ्य समाजांत जाऊन राहण्यास योग्य असतात. ह्यावरून पुस्तकीविद्येबरोबर उद्योगशिक्षण असल्यास त्या दोन संयुक्त शक्तींचा प्रताप केवढा आहे, हें चांगलें दिसून येतें.

मुलें कांहीं वर्षांपर्यंत नुस्तीं शाळेंत जाऊन आल्यानेंच तीं संसाराच्या कामी तरबेत होतात असें नाहीं. शाळेंतील विद्या ही पुढील कर्तव्यांचें दिग्दर्शन करून देते. पुढें तत्वज्ञान शिकणाराला धुळाक्षरांचे धडे जशी अक्षरओळख करून देऊन, ज्ञानभांडाराचा दरवाजा उघडून देतात, तशीच ती शाळेंतील विद्या व्यावहारिक आणि शास्त्रीय ज्ञानाचा दरवाजा उघडते. त्या उघड-

लेल्या दरवाज्यांत शिरून ज्ञानरत्नें शोधून घ्यायाला मनुष्यानें सतत उद्युक्त असलें पाहिजे; तीं रत्नें मिळवून देणारीं साधनें निराळींच आहेत. ह्या साधनांत मुख्य म्हटलीं म्हणजे दोन आहेत, तीं वर्त्तमानपत्रांचें वाचन व प्राचीन आणि अर्वाचीन ग्रंथांचें परिशिलन, हीं होत. इकडच्या लोकांस शाळांतून विद्या मिळण्याची जशी सोय आहे, तशीच शाळेंतून निघाल्यावर पुस्तकादि वाचनद्वारा बहुविध उपयुक्तज्ञान संपादण्याचींही साधनें पुष्कळ आहेत. पियोरिटन् लोकांनीं इकडे वसाहत केल्यावरोबर वर्त्तमानपत्रें वाचण्याचा प्रघात पाडला. ते स्वभावतः राजकारस्थानी होते, आणि राज्यांत होत असलेल्या उलाढाली व नव्या गोष्टी समजून घेण्याची त्यांस उत्कट इच्छा असे. पुढें इकडे राज्यांतर होण्याची वेळ आली, तेव्हां न्यूइंग्लंड् प्रांतांतील स्त्रीपुरुष आणि मुलेंदेखील आपल्या देशांत कोणकोणत्या गोष्टी घडून येत आहेत, व लढाईंत कोणाचा जय किंवा पराजय झाला, फिलाडेल्फियाच्या राष्ट्रीय सभेंत कोणाचीं कशीं भाषणें झालीं, इत्यादि गोष्टी समजण्याची मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहात असत. ह्या देशांत प्रथमतः लेखी वर्त्तमानपत्रें निघूं लागलीं, त्यानंतर छापील पत्रकें निघण्यास सुरुवात झाली. लोकसत्ताक राष्ट्रांत—जेथें प्रत्येक मनुष्याला **हें राष्ट्र आपलें आहे,** ह्याच्या हिताहितार्शी आपला फार निकट संबंध आहे, व ह्यांत चालू असलेले कायदे कानू करण्यांत आणि ह्याची उन्नति जेणेंकरून होईल अशा नव्या गोष्टी करण्यांत आपला हात आहे, असें पक्कें ठाऊक असतें—लोकांला राष्ट्रांत घडत असलेल्या गोष्टी समजून घेऊन पुढें आपलें काय कर्त्तव्य आहे याचा निश्चय करण्याची उत्कट इच्छा असावी, हें ठीकच आहे. त्यांला त्या आवश्यकीय गोष्टी कळवून देण्यास वर्त्तमानपत्रांसारखें उत्तम साधन दुसरें नाहीं.

ह्या देशांत—रशियाचे झाराच्या किंवा हिंदुस्थानांतील लिटन्सारख्या साहेबांच्या राज्यांत असणारा—"प्रेस् आक्ट्," म्हणजे वर्त्तमानपत्रांतून लोकांस

आपलें मत काय तें स्पष्ट बोलून दाखविण्याची बंदी, ही कधीं नव्हती. आणि जोंपर्यंत येथें लोकसत्ता असेल, तोंपर्यंत तशी बंदी कधींही होणार नाहीं. सर्व लोकांच्या सुखदुःखाचा ज्या गोष्टींशीं अत्यंत निकट संबंध आहे, अशांविषयीं जर लोकांनींच स्पष्ट बोलून आपलें मत न द्यावें, तर तें द्यावें तरी कोणीं ? ज्यांना लोकांकडून जुलमाचा रामराम करून घ्यावयाचा आहे, ज्यांना प्रजांच्या पोटावर पाय देऊन आपली तुंबडी भरावयाची आहे, अशांसच "प्रेस् आक्ट्" सारख्या कुत्सित कायद्यांची आवश्यकता वाटते. ह्या देशांत जो तो आपापलें मत उघड करून सांगतो. प्रेसिडेंट् क्लीव्‌लंड् यांस आयात मालावरचा कर काढून टाकावा असें वाटलें, पण तें जर एखाद्या रस्ता झाडणाराला किंवा मोचाला रुचलें नाहीं, तर तो वेधडक प्रेसिडेंट् साहेबांची चुकी दुरुस्त करतो, आणि मि. क्लीव्‌लंड् प्रेसिडेंट् आहे, म्हणून त्याचे दोष काढून दाखविण्याला मागें सरत नाहीं. घरोघर, रस्त्यांत, दुकानांतून, गल्ल्याकुच्यांतून, श्रीमंतांच्या वाड्यांत आणि गरीबांच्या खोपटांत, जेथें बघावें तेथें लहानमोठीं, दररोज निघणारीं, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक पत्रें लोकांच्या हातांत असलेलीं दृष्टीस पडतात. गाडीवाल्याला कोठें गाडी उभी ठेवून कोणाची वाट पाहात बसावयाची झाली, म्हणजे तो लागलीच खिशांतून वर्त्तमानपत्र काढून वाचूं लागतो. स्वैंपाकिणी, मजूरणी, धोबी, शिंपी, झाडूवाले, कोळसेविक्ये, धुराडीं झाडणारे, वगैरे सगळे लोक मिळाल्या वेळांत वर्त्तमानपत्रें वाचतात. सकाळ संध्याकाळ मंडळी घरांत जेवायाला किंवा न्याहारी करायाला आली कीं, एका हातांत वर्त्तमानपत्र घेऊन वाचीत वाचीत जेवतात. जी गोष्ट सकाळीं किंवा संध्याकळीं तीन हजार कोसांवर घडून आली, ती तारेच्या द्वारें ह्या महादेशाच्या एका कांठावरून दुसऱ्या कांठावर जाऊन पोहोंचून, लागलीच वर्त्तमानपत्रांतून छापून, बारा किंवा पंधरा तासांच्याआंत सर्व लोकांस वाचायाला मिळते. जेथें

एखादें तरी स्थानिक वर्त्तमानपत्र नाहीं, असें गांव आणि खेडें इकडे अस-लेलें सहसा सांपडत नाहीं. ह्या वर्त्तमानपत्रांची किंमतही माफकच म्हणजे एक पैशापासून दोन आण्यांपर्यंत असते. इ. स. १८८० त ह्या देशीं वर्त्त-मानपत्रें व मासिकपुस्तकें वगैरे मिळून अकरा हजार तीनशें चौदा होतीं; पैकीं चारपंचमांश पत्रें राजकारणी, सामाजिक व व्यावहारिक गोष्टी प्रसिद्ध करीत असून, एकपंचमांश उद्योगधंदे, व शास्त्रीय विषय यांच्या संबंधानें निघणारीं मासिक किंवा साप्ताहिक पत्रें होतीं, असें समजतें. त्यापुढें आठ वर्षांत आणखी शेंकडों वर्त्तमानपत्रें आणि पुस्तकें निघालीं असतील.

सदरील अकरा हजारांवर पत्रांपैकीं दहा हजार पांचशें पंधरा पत्रें आणि पुस्तकें इंग्रजी भाषेंत निघतात, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. देशांत एकी राहून एका भागांतील मनुष्यांस दुसऱ्या भागांतील लोकांचे विचार समजायाला भाषेचें ऐक्य असणें अवश्य आहे. फ्रेंच्, स्क्यांडिने-वियन्, स्पेनी, डच्, इटालियन्, वेल्श्, बोहीमियन्, पोल्, पोर्तुगी इत्यादि बहु-तेक सर्व युरोपियन् जातींचे लोक ह्या देशांत येऊन राहातात, ते आपापल्या कुटुंबांत स्वदेश भाषा बोलतात, आणि सगळे मिळून हजारएक पत्रें आ-पल्या भाषांत काढतात. परंतु त्यांस बहुतकरून सर्वत्र इंग्रजी भाषा बोल-णाऱ्या लोकांशीं दळणवळण ठेवावें लागतें. सार्वजनिक शाळांतून इंग्रजीच शिकवितात, राज्य कारभार इंग्रजींत चालतो, व्यापारधंद्याचें काम, हि-शोबठिशोब वगैरे साऱ्या गोष्टी इंग्रजी भाषेच्या मदतीनें कराव्या लागतात; तेव्हां त्यांस इंग्रजी भाषा शिकल्यावांचून निर्वाहच नाहीं. आणि जेथें चोहोंकडे हीच भाषा ऐकूं येते, तेथें ती शिकण्यास फार प्रयास करावे लागत नाहींत. पृथ्वीवर सर्वत्र जाऊन वसाहत करणारे एकंदर दहा-कोटीं जवळजवळ लोक इंग्रजी कुलांतून जन्मले असून, इंग्रजी भाषा बोलतात. हें प्रमाण घेऊन त्या भाषेचे अभिमानी लोक म्हणूं लागले आ-

हेत कीं, इंग्रजी भाषाच पृथ्वीवरील सगळ्या लोकांची भाषा होणार. ही गोष्ट कितपत खरी होईल हें सांगवत नाहीं; परंतु ह्या भाषेची वाढ कांहीं विलक्षण आहे एवढें मात्र खरें. आतां आमच्या लोकांनीं या गोष्टीचा थोडासा विचार कां करूं नये? आमची राष्ट्रीय सभा कलकत्त्यांत, मद्रासेंत, मुंबईत किंवा पंजाबांत भरली, म्हणजे हिंदुस्थानच्या एका भागांतून गेलेल्या वक्तयांची बोली दुसऱ्या भागांतील लोकांस समजत नाहीं. मग ते इंग्रजी भाषेंत थोरलालीं व्याख्यानें झोडतात. त्यांचा सर्व साधारण लोकांस काय उपयोग? आमच्या देशांत असलेल्या सर्व भाषा नाहींशा करून त्यांच्या जागीं इंग्रजी भाषा स्थापणें, म्हणजे हिंदुस्थानाला समुद्रांत बुडवून त्याच्या ठिकाणीं ब्रिटिश् बेटें आणून ठेवण्यासारखें आहे. आमचे विद्वान् बुद्धिमान् विचारी लोक, स्वदेशाची व स्वजातीची उन्नति करूं पाहातात तर, आपल्या देशांत सगळ्यांस समजण्यासारखी एक भाषा, व ती स्वदेशी भाषाच असणें अवश्य आहे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत कशी येत नाहीं? इंग्रजी भाषा जशी आतां दहाकोटि मनुष्यांची भाषा झाली आहे, तशी आपल्याही देशांत एक भाषा आहे. हिंदी भाषा हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व लोकांस समजते. व्रज किंवा माथुरी, अवध, पंजाबी, मध्यदेशी, ह्या सगळ्या हिंदी भाषेच्या शाखा असून, त्यांत जो थोडासा फरक आहे, तो आमच्या पुण्यांतील मराठींत व कोंकणांतील आणि देशावरच्या मराठींत असलेल्या फरकाहून अधिक नाहीं. सदरीं सांगितलेल्या सगळ्या शाखा मिळून हिंदी भाषा आज मितीस हिंदुस्थानच्या दहाबारा कोटि मनुष्यांची स्वभाषा आहे. आमचे शेजारी गुर्जर, ह्यांची भाषा तरी अर्धी हिंदी आणि अर्धी मराठी आहे. मग हिंदी सारख्या महान् भाषेला राष्ट्रीय भाषेचें रूप देण्यास काय बाध आहे? मुसलमानांचें राज्य होतें तेव्हां त्यांनीं ऊर्दू भाषेंत सर्व लोकांशीं बोलाचाल ठेवली होती. ऊर्दू भाषा म्हणजे एक निराळी भाषा नसून, तींत अर्धी

हिंदी व कांहीं आरबी, फारशी, मराठी, कानडी वगैरे भाषांतील शब्दांचें मिश्रण आहे. हिंदी भाषा शिकण्यासही फारसे श्रम घ्यावे लागत नाहींत. इंग्रजी प्रमाणेंच हिंदींत पृथ्वींतील सगळ्या भाषांचा समावेश होऊं शकतो, म्हणून तिची वाढ होण्याला कांहीं अडचण नाहीं. हिंदी भाषेचें व्याकरणही फार सोपें आहे. तींत आरबी, फारशी, संस्कृत, इंग्रजी, आणि राक्षसी भाषेचे देखील शब्द घेऊन, त्यांस हिंदीचें रूप देतां येईल. असली अमोलिक, सुरेख भाषा आपल्यास लभ्य असतां, आणि ती राष्ट्रीय भाषा करण्याचें इतकें सुलभ असतां, आमचे विद्वान् बंधु हिंदुस्थानांतील सार्वजनिक गोष्टींची वाटाघाट करण्याची ती सातांसमुद्रांपलीकडून आलेल्या, प्राचीन मिश्री चित्रलिपीप्रमाणें साधारण लोकांस न कळणाऱ्या इंग्रजी भाषेंत काय म्हणून करतात, ह्याचा उलगडा ते करून देतील काय? आमच्या राष्ट्रीय आणि सार्वजनिक सभांनीं जर ही गोष्ट मनावर घेतली तर कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत, आणि सिंधुसमुद्रसंगमापासून मणिपूराच्या सरहद्दीपर्यंत, सगळे दीर्घदर्शी देशहितचिंतक आपापल्यापरी हिंदी भाषेचा प्रसार करण्यास झटतील. वर्तमानपत्रकारांस आणि ग्रंथकर्त्यांस उत्तेजन येईल. मद्रासी बांधवांशीं पंजाबी बंधूंची गांठ पडली म्हणजे त्यांस परस्परांशीं बोलण्याचें कठिण पडणार नाहीं. आणि आमच्या देवनागरी उर्फ बालबोध अक्षरांनीं लिहितां येणार नाहीं, अशा भाषा जगांत किती असतील? आपल्या राष्ट्रांतील सगळ्या भाषांस लागणारीं उच्चारणें ह्या वर्णमालिकेंत आहेत. तेव्हां आम्हीं जर त्या सगळ्या भाषांतील शब्द घेऊन, हिंदी भाषेचें एक अठरा धान्यांचें कोडबोळें केलें, तरी ती देवनागरी वर्णांनीं लिहितां येईल. पुढील बैठकींत राष्ट्रीय सभेनें ह्या गोष्टीचा विचार अवश्य करावा, अशी तीस विनयपूर्वक सूचना आहे.

युनाइटेड् स्टेट्स्चीं सगळींच वर्तमानपत्रें चांगलीं आणि त्यांत येणारे

सगळेच विषय उत्तम आहेत असें नाहीं. जेथें सर्वांना आपापलें म्हणणें लोकांस कळविण्याची मोकळिक आहे, तेथें चांगल्या वाईट गोष्टींचें मिश्रण असावयाचेंच. परंतु कोणी जर विचारपूर्वक ह्या गोष्टीचा तपास करील, तर त्यास चांगल्याचाच जय झालेला दिसून येईल. सर्व साधारण लोकांस धर्मसंबंधी, व्यावहारिक आणि शास्त्रीय विषयांचें ज्ञान सोप्या रीतीनें थोड्या खर्चांत करून द्यावयाचें हा जो वर्त्तमानपत्रकारांच्या अस्तित्वाचा उद्देश तो इकडे फलद्रूप झालेला आहे. मोठाले वजनदार वर्त्तमानपत्रकार आपल्याच देशांतील गोष्टी सांगून आपली तृप्ति करून घेत नाहींत. न्यूयार्क् हेरल्ड् नांवाच्या पत्राचे मालकानें, आफ्रिकाखंडांतील नाना प्रदेशांचा शोध करून अजरामर कीर्ति मिळवून आलेला प्रसिद्ध हेन्री स्टान्ले यास, त्या दूरच्या अज्ञात भूखंडांत प्रवास करण्यापुरता पैसा व इतर साहाय्य दिलें. तेव्हांपासून दुसऱ्याही पुष्कळ वर्त्तमानपत्रकारांनीं आपले बातमीदारांस पुष्कळ दूरदूरच्या देशीं पाठवून त्यांकडून नव्यानव्या गोष्टींचे शोध लावबून, जगावर अतोनात उपकार केले आहेत. 'सेंचुरी' "हार्पर्स् म्यागर्जीन्" वगैरे अमेरिकन मासिकपुस्तकांची, विषयबाहुल्य, गहनता, चित्रकला व छापण्याची उत्तम शैली ह्या गोष्टींत, सगळ्या यूरोपाच्या मासिकपुस्तकांवर तोड आहे. यूरोपांतल्या आस्त्रिया देशांत छापण्याची कला सर्वोत्कृष्ट आहे असें म्हणतात; परंतु आस्त्रियाच्या उत्कृष्ट छापखान्यांचे मालकांनीं सेंचुरी नांवाच्या अमेरिकन मासिकपुस्तकाच्या मालकास, त्याच्या छापील कामाच्या व चित्रकलेच्या उत्तमतेबद्दल शाबासकी देऊन, आपल्यास तशी छापण्याची कला साधण्याची युक्ति सांगून द्या, म्हणून विनंति केली होती. सेंचुरी वगैरे मासिकपुस्तकांतून येणारे निबंध फारच उत्तम असतात. ते लिहिणारांस त्या पुस्तकांचे मालक प्रत्येकीं शंभर दोनशांवर डालर म्हणजे तीन तीन सहा सहाशें रुपये देतात. त्यांत पसिद्ध करण्याकरतां तयार केलेल्या सुरेख उ-

त्कृष्ट चित्रांच्या कोरींव कामास प्रत्येकीं शेंकडों रुपये लागतात. तेव्हां असलीं मासिकपुस्तकें व साप्ताहिक पत्रें चालवायाला लक्षावधि रुपयांचें भांडवल असलें पाहिजे, हें उघड आहे. पण हा अवाढव्य खर्च भागून त्यांच्या मालकांना अतोनात नफा होतो; ह्याचें कारण काय म्हणाल तर लोकाश्रय होय. सेंचुरीसारख्या मासिकपुस्तकाचे ग्राहक एक किंवा सवालक्षापेक्षां उणे नाहींत. छापण्याचें काम वाफेच्या जोरानें चालतें. दर महिन्याच्या आरंभीं युनाइटेड् स्टेट्स्च्या प्रत्येक शहरांत व युरोपांतील मोठाल्या शहरांतून हीं पुस्तकें विक्रीस तयार असतात. आगगाडींतून जातांना आणि रस्त्यांतील सार्वजनिक गाड्यांत वगैरे बसल्याठिकाणीं पत्रें विकणारीं मुलें, हीं पुस्तकें व स्थानिक वर्त्तमानपत्रें घेऊन येतात. न्यूयार्कसारख्या शहरांत दररोज निघणाऱ्या वर्त्तमानपत्रांचे

---

१ सेंचुरीसारखीं पुस्तकें मोठ्या माणसांकरतां आहेत; पण इकडचे लोक लहान मुलांच्या उन्नतीची फार काळजी घेतात. "सेंट् निकलस्" नांवाचें प्रसिद्ध मासिकपत्रक लहान मुलांकरतांच प्रसिद्ध केलें जातें. त्याची कर्त्री मिसेस् मेरी मेप्स् डाज् ही बाई उत्कृष्ट विदुषी असून, आपल्या कर्त्तबगारीनें ह्या देशच्या अत्युत्तम व थोरल्या योग्यतेचे विद्वान् पत्रकारांची बरोबरी करीत आहे. सेंट् निकलस् सारखें भव्य, सचित्र, मनोरंजक, गूढ शास्त्रीयविषय सोपे करून मुलांस बोध देणारें, उत्कृष्ट पत्रक इंग्लंडांतसुद्धां नाहीं ह्मणतात. ह्याशिवाय "हार्पर्स् यंग् पीप्ल्," "यूथ्स् कम्पेनियन्" इत्यादि पुष्कळ लोकप्रिय पत्रकें मुलांकरतां प्रसिद्ध होत असतात. त्यांचेही वर्गणीदार एकेक लक्षावर आहेत. इकडचे वर्गणीदारही वेळच्यावेळीं वर्तमानपत्रांस आपली वर्गणी पाठवितात. इकडे दरवर्षीं वर्त्तमानपत्रें आणि पुस्तकें छापायाला लागणाऱ्या कागदांचें वजन सुमारें एकलक्ष सातहजार टन् ह्मणजे एकोणतीस लक्ष शाण्णव हजार पक्के मण आहे, असा एका उद्योगी मनुष्यानें हिशोब करून दाखविला आहे. ब्रिटन्च्या संयुक्त राज्यांत ह्याच कामाला चौऱ्याण्णव हजार टन् कागद लागतात.

ग्राहक लक्षावधि असतात, असा येथें लोकाश्रय मिळतो. भाषैक्य असून बहुत करून सर्वांस लिहितां वाचतां येतें व सगळ्यांसच आपल्या देशाची कळकळ आहे, हींच ह्या लोकाश्रयाच्या विपुलतेचीं कारणें होत. येथें ग्रंथकारांस आणि पत्रकारांस मोठें उत्तेजन येऊन ते आपलीं कर्त्तव्यें आस्थापूर्वक करतात, ह्यांत नवल नाहीं. आणि त्यांचें चोख काम सर्वांस आवडून लोक त्यांस उदार आश्रय देतात ह्यांतही नवल नाहीं. पण ह्या सगळ्या गोष्टी घडून यायला लोकांस मतस्वातंत्र्य व तीं मतें उघड रीतीनें बोलून दाखविण्याचें धैर्य असून, त्यांच्या हृदयांत स्वदेशाभिमान जागरूक असणें अवश्य आहे.

वर्त्तमानपत्रांप्रमाणेंच इकडे नित्य नवे ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत. जुने इंग्रजी ग्रंथ व अर्वाचीन लोकांनीं रचलेलीं पुस्तकें, विदेशी भाषांतून असलेल्या उत्कृष्ट पुस्तकांचीं भाषांतरें वगैरे ग्रंथांच्या निरनिराळ्या आवृत्ति निघत आहेत. त्यांची किंमत लोकांच्या शक्तीबाहेर नाहीं. एकाच ग्रंथाच्या पुष्कळ आवृत्ति निघतात; पैकीं कांहीं बहुमोल व कांहीं अगदीं स्वस्त्या, कांहीं मोठ्या, कांहीं लहान व कांहीं मध्यम सांचाच्या असतात. ह्यामुळें गरीब गुरीबांपासून तों कोट्याधीशांपर्यंत सर्व प्रकारच्या लोकांस तीं पुस्तकें वाचायाला मिळतात. लहान ग्रंथांप्रमाणेंच "एन्सायक्लपीडिया ब्रिटानिका"सारखे प्रचंड ग्रंथसुद्धां त्यांच्या विस्ताराच्या मानानें माफक किंमतीनें छापून विकण्यांत येतात. "ब्रिटानिका" हा बृहत्कोश पृथ्वींतील सगळ्या बृहत्कोशांत मोठा आहे. ह्याची किंमत इंग्लंडांत फारच आहे, पण तो अमेरिकेंत दोन सवादोनशें रुपयांला विकत मिळतो. ह्यामुळें इकडे आजपर्यंत त्याच्या पुष्कळ आवृत्ति निघून त्याच्या पन्नास साठ हजार प्रती विकून गेल्या आहेत. एका माहितगार गृहस्थाचें असें म्हणणें आहे कीं, इंग्लंडापेक्षां अमेरिकेंत "ब्रिटानिका"च्या प्रती चारपट अधिक खपल्या. आपल्टन् नांवाच्या पुस्तकविक्यांनीं "अमेरिकन् एन्सायक्लपीडिया" नांवाचा बृहत्कोश तयार करवून, प्रसिद्ध केला आहे. त्याचीही किंमत दोनशें रुपयांवर आहे. त्याच्या सुमारें एक लक्ष प्रती विकून गेल्या आहेत.

इंग्लंडांत रचून प्रथम प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें अमेरिकेंत आणि एथील पुस्तकें इंग्लंडांत अधिक स्वस्त्या दरानें मिळतात. ह्याचें कारण ह्यांपैकीं एका देशांतील सरकारांत नोंदलेलीं पुस्तकें दुसऱ्या देशांत रस्त्यांवर टाकलेल्या मालासारखीं आहेत. त्या दोन्ही सरकारांनीं अद्यापि आपापल्या देशांतील ग्रंथकारांस दुसऱ्या देशांत आपला आश्रय देण्याचा व त्यांच्या मालाचें चोरांच्या हातून संरक्षण करण्याबद्दलचा तह केला नाहीं. ह्यामुळें इंग्लंडांतील व युनाइटेड् स्टेट्स्मधील पुस्तकविक्ये खुशाल भरदिवसा आपल्या शेजाऱ्याच्या ह्या ग्रंथरूपी मालाची चोरी करून, आपली तुंबडी भरीत आहेत. ह्या दोन्ही देशांतील नीतिमान् मनुष्यें अशा राजरोस लुटारूपणाच्या विरुद्ध पुष्कळ वाटाघाट करीत आहेत, परंतु ह्याविषयीं कांहीं काकायदेशीर बंदोबस्त व्हावा, अशी दोन्ही देशांतील पुस्तकविक्यांची मर्जी नाहीं.

इकडचे ग्रंथकार आपल्या ग्रंथांचें चीज व्हायाला राजाश्रयावर अवलंबून राहात नसतात. इकडचा लोकाश्रय हजार राजाश्रयांहूनही अधिक आहे. ग्रंथकारांची जशी योग्यता असेल त्याप्रमाणें त्यांच्या ग्रंथांचें चीज होतें. हे लोक ग्रंथवाचनाचे फार भुकेले आहेत. येथें दरवर्षी नऊ कोट (९००००००००) डालर, म्हणजे हल्लींच्या चांदीच्या भावानें सुमारें सत्तावीस कोटि रुपये, केवळ पुस्तकें आणि पत्रकें विकत घेण्यांत खर्च होतात. प्रत्येक लहानमोठ्या कुटुंबांत त्याच्या ऐपतीप्रमाणें थोडीं किंवा पुष्कळ पुस्तकें असतात. साधारण गाडीवान, शेतकरी, मजूर मोलकरीसुद्धां आपल्या घरांत पुस्तकांचा संग्रह करतात. मध्यम प्रतीच्या आणि श्रीमंत लोकांच्या घरांतून तर एकेक छोटेखानी पुस्तकालयच असतें. ह्याच प्रमाणें सार्वजनिक वाचनगृहांची आणि पुस्तकालयांची जिकडे तिकडे समृद्धि आहे. जेथें एकादें तरी लहानसें सार्वजनिक पुस्तकालय नाहीं, असें

खेडें धुंडाळून पाहिलें तर औषधापुरतें कोठें सांपडलें तर सांपडेल. मोठाल्या शहरांतून तर पुष्कळ थोरलालीं पुस्तकालयें असतात. प्रत्येक गांवांतील विद्येची चाहा असणाऱ्या स्त्रिया आणि पुरुष मोठ्या आवेशानें व आस्थापूर्वक आपापल्या गांवांतील पुस्तकालयांची वगैरे उन्नति करायाला झटत असतात. आपलें गांव म्हणजे आपल्या देशाप्रमाणेंच पृथ्वींतील सर्वोत्तम ठिकाण आहे, असा त्यांस मोठा अभिमान असतो. युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें आज मितीस तेवीस हजार पुस्तकालयें नुस्तीं शाळांमधूनच असून, त्यांत साडेचार कोट (४५००००००) पुस्तकांच्या प्रती आहेत असें समजतें. ह्या शिवाय वरिष्ठ विद्यालयांतून आणखी पस्तीस लक्ष (३५०००००) पुस्तकें आहेत. "फिलाडेल्फिया," "बोस्टन् सिटी," "आस्टोर्," "कंग्रेशनल्" इत्यादि प्रचंड पुस्तकालयांतून मिळून आणखी कोट्यावधि पुस्तकें आहेत तीं निराळींच; त्यांतील पुस्तकांचीं संख्या पांच कोटींवर आहे, असें म्हणतात. ह्या पुस्तकालयांतून पुस्तकें उसनीं घेऊन वाचायाला नेणाऱ्या स्त्रीपुरुषांची संख्याही फार मोटी आहे, हें सांगायाला नको. परंतु चांगलीं आणि गहन विषयांवर लिहिलेलीं पुस्तकें सर्वच वाचतात असें नाहीं. विद्येच्या आणि स्वाभाविक अभिरुचीच्या मानानें मनुष्यें चांगलीं किंवा वाईट पुस्तकें वाचतात. ज्यांस दिवसभर काबाड कष्ट करून किंवा कांहीं न करतां आळसानें जांभया देत कालक्षेप करावा लागतो, असल्या लोकांस कादंबऱ्या वाचायाचा मनस्वी नाद आहे. त्याला कधीं कधीं दुर्व्यसनाचेंसुद्धां रूप येतें. कांहीं लोक उत्तम किंवा मध्यम प्रतीचीं पुस्तकें वाचून आपली बुद्धि ज्ञानभांडारांतील रत्नांनीं भूषित करतात. वाईट, बीभत्स ग्रंथ किंवा मजकूर प्रसिद्ध होऊं न देण्याविषयीं इकडे पुष्कळ लोक फार मेहेनत घेतात; आणि त्यांचे प्रयत्न पुष्कळ अंशीं सफलही होत आहेत.

एकंदरींत अमेरिकन लोकांस विद्येची फार चाहा आहे, आणि जोंपर्यंत

युनाइटेड् स्टेट्स्मध्ये ज्ञानसूर्य (मधून मधून अज्ञान किंवा अरिष्टज्ञान यांच्या ढगांमागें झांकूनही पुनः दृश्य होऊन) आपल्या तेजोमय किरणांचा चोहोंकडे वर्षाव करीत, अज्ञानांधकाराच्या नाशाला सतत उद्युक्त राहील, तोंपर्यंत लोकांच्या मनांवर आणि शरीरांवर दासाचा अंमल वसेल, असें भय वाळगायाला नको.

---

## धर्ममतें आणि दानधर्म.

इंग्लंड् देशांत "चर्च् आफ् इंग्लंड्" नांवाचें मत आणि राजाची सत्ता हीं एकवट झालेलीं आहेत. इंग्लंडचा राजा किंवा राणी हीं सदरील मताचीं असलीं पाहिजेत आणि त्या देशाच्या सर्व प्रजांनीं त्या मताचे महंतांचा वगैरे खर्च चालविलाच पाहिजे. मग त्यांचें मत सदरील मतास मिळत असो किंवा नसो; सरकार त्यांकडून चोपून कर घेतें आणि "दि चर्चा" चे महंतांची व चेल्यांची धण करतें. इंग्लंडासारख्या सुधारलेल्या देशांत लोकांकडून जबरदस्तीनें रामराम करविण्याचा हा प्रकार फार विलक्षण आहे. सरकारची पुरोहितकी करायाला आमच्या देशांत गेलेल्या विशपादि इंग्लिश् चर्चाच्या उपाध्यायांनादेखील हिंदुस्थानच्या तिजोरींतून मोठमोठाले पगार मिळतात म्हणें, मग खरें काय आहे तें मला ठाऊक नाहीं. खरें असल्यास हाही एक चमत्कारच आहे.

युनाइटेड् स्टेट्स्मध्यें धर्ममताचें व लोकसत्तेचें ऐक्य नसल्यामुळें येथें सर्व लोक आपापल्या विचारांस योग्य दिसेल, त्याप्रमाणें कोणत्या तरी मताचें ग्रहण करून, त्या मताच्या आचार्यांना, देउळांचा वगैरे खर्च चालविण्यास पैसा देतात, तो स्वसंतोषानें देतात. सरकार त्यांकडून धर्मखात्याबद्दल म्हणून एक निराळाच कर घेत नाहीं. तरी इकडे धर्माचें प्राबल्य इंग्लंडाहून

कोणत्याही अंशीं कमी नाहीं. इंग्लंडांत फक्त "इंग्लिश् चर्च्" मतालाच मोठा मान मिळतो; कारण तें राजमत पडलें. त्या मताचे लोक इतर मतांच्या लोकांना "डिसेंटर्स्" ( म्ह० विरुद्ध मताचे ), म्हणून नाकें मुरडतात. अमेरिकेच्या स्वतंत्र संस्थानांत लौकिकरीत्या कोणी एका मताला ज्यास्ती व दुसऱ्या मताला कमी मान देत नाहींत; कारण इकडे कोणतेंच मत विशेषेकरून राजानुग्रहास पात्र असलेलें कोणाच्या ऐकिवांत नाहीं.

इंग्लंडांतील कित्येक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, जर सरकारानें धर्माचा बंदोबस्त केला नाहीं तर सर्व लोक अधर्मी होतील. परंतु इंग्लंडीयांचें हें म्हणणें अगदीं खोटें आहे. कारण इंग्लंडामध्यें दर एक लक्ष मनुष्यांस एकशें चोवेचाळीस देवळें असून, युनायटेड् स्टेट्स्मध्यें तितक्याच लोकसंख्येला १८१ देवळें आहेत. यावरून जेथें धर्मास सरकाराचें पाठबळ नाहीं, अशा युनाइटेड् स्टेट्स् देशांत धर्मबुद्धि कमी आहे, हें म्हणणें खरें ठरत नाहीं.

इ. स १८८० त युनाइटेड् स्टेट्स्मध्यें ९२,००० धर्ममंदिरें होतीं. पैकीं ८० हजारांहून कांहीं अधिक मंदिरें प्रोटेस्टंट् मताच्या अनुयायांनीं बांधलेलीं असून, बाकीचीं रोमन्क्याथोलिक् पंथाच्या लोकांचीं होतीं. ह्या सगळ्या मंदिरांची स्थावरजंगम मालमत्ता मिळून पस्तीस कोटि डालर, म्हणजे सुमारें एक अब्ज रुपयांहून अधिक संपत्ति आहे. निरनिराळ्या मतांचे उपाध्याय एकंदर ७७,००० आहेत. शेंदीडशें वर्षांपूर्वी ह्या देशांत मनस्वी मतभेद होता. मासचूसेट्स्चे पियोरिटन् पंथी लोक इतर मतांच्या अनुयायांचा फार द्वेष करीत असत. त्यांनीं पुष्कळ केकर् मताच्या लोकांचा फार छळ केला. पुष्कळ भिन्न मतांच्या बायकांवर चेटकिणींचा आरोप आणून त्यांस जिवंत जाळून टाकल्या; कोणाला फांशीं दिलें, कोणाला तुरुंगांत घातलें, कोणाला भररस्त्यांत गुरांप्रमाणें चा-

वकांचा मार दिला, व कोणाला त्यांची मालमत्ता हिसकावून घेऊन हद्दपार करून दिलें. इ. स. १७०५ त वर्जिनिया संस्थानाच्या शासकांनीं असा ठराव केला कीं, जो कोणी एका परमेश्वरांत तीन व्यक्ती असून त्यांचें ऐक्य आहे, व बायबल हा ईश्वरप्रणीत ग्रंथ आहे, ह्या गोष्टी कबूल करणार नाहीं, त्याला तीन वर्षें कैदेची शिक्षा मिळेल. आणि त्याच इसमानें फिरून त्या गोष्टी नाकारल्यास, त्याला सरकारी कामें वगैरे मिळण्यास पुष्कळ अडथळे असावे.

अठराव्या शतकाच्या शेवटल्या भागांत इंग्लंडाशीं आपला राज्यकारणी संबंध तोडून टाकून स्वतंत्र होण्याच्या उद्योगांत असतां, अमेरिकन् लोकांनीं आपसांतील मतविरोधाला एकीकडे गुंडाळून ठेवून एकी स्थापिली. आपण ह्या वेळीं एकविचारानें वागलों नाहीं, तर ह्या देशांत इंग्लिश् राज्यसत्तेचा व "दी चर्च्" मताचा शिक्का बसून राहील, अशा भीतीनें अमेरिकन् लोक मतविरोधाला मागें टाकून, सगळे मिळून इंग्लंडाशीं टक्कर मारून स्वतंत्र झाले. याच कारणानें आतांही हे लोक मतविरोध विसरून एकीने वागत आहेत आणि पुढेंही वागतील. या देशामध्यें मतसंबंधी दुराग्रह नाहीं, असें नाहीं. तरी येथें सर्वांस धर्मसंबंधी विचारामध्यें सारखें स्वातंत्र्य असल्यामुळें, कोणी एकमेकांच्या मतांविषयीं फारसा शोध व वादविवाद न करितां, परस्परांशीं बरेंच दळणवळण ठेवितात. ह्यामुळें धर्ममतांत विरोध असून व्यवहारांत ज्यांची मैत्री आहे, अशीं उदाहरणें ह्या देशांत जितकीं मिळतील, तितकीं तीं इंग्लंडांत मिळणार नाहींत. कोठें एकादी धर्मविचाराकरितां स्थापलेली सभा भरणार असली, म्हणजे त्यांतील सदस्य वर्ग आपल्या मताचा विरोध करणाऱ्या मित्रमंडळीसही बोलावितात. तेव्हां मैत्रीच्या अनुरोधानें त्यांना तें बोलावणें नाकारवत नाहीं. अशा रीतीनें परस्पर विरुद्ध मतांच्या लोकांचा समागम् होऊन, एकमेकांचीं मतें समजून घेण्याचा प्रसंग सहज येतो, आणि विरुद्ध मताच्या लोकांविषयीं जो केवळ अज्ञानमूलक द्वेष अ-

सतो, तो बऱ्याच अंशीं नाहींसा होतो. ही मोठ्या महत्त्वाची गोष्ट सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. परस्परांविषयीं अज्ञान, हें दोन मनुष्यांत विरोध आणि भांडण उपस्थित करणाऱ्या कारणांपैकीं एक मुख्य कारण आहे. दुसरें एक कारण दोषदर्शीपणा हें होय. इकडचे लोक स्वदेशांतील आणि स्वधर्मांतील निरनिराळ्या लोकांच्या मतांचे दोष शोधण्याचें, बऱ्याच अंशीं सोडून देऊं लागले आहेत. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें बहुतेक सर्व लोक ख्रिस्ती असून, त्यांत रोमन् क्याथलिक् व प्राटेस्टंट् अशीं दोन मुख्य मतें, आणि शिवाय त्यांत पोटभेद पुष्कळ आहेत. त्यांच्यामध्यें मतभेद असला, तरी धर्मभेद नाहीं. तो मतभेद देशहिताच्या कोणत्याही कामीं आड येत नाहीं. एका कुटुंबामध्यें नवराबायको किंवा मुलें आणि त्यांचीं आईबापें हीं निरनि-

१ आमच्या देशांतील लोकांनीं ह्या गोष्टीचा विचार अवश्य करावा. आह्मां लोकांचीं मतें आणि धर्म निरनिराळे असले, तरी देशहिताच्या आणि लोकहिताच्या कामीं आह्मांस एक होतां येईल, आणि होणें अवश्य आहे. कोणत्यातरी धर्माच्या किंवा मताच्या अवलंबनानें परलोकांत आह्मी एका विशेष उत्तम ठिकाणीं जाऊं, आणि आमच्या उलट मताचे व अन्यधर्मी शेजारी निराळ्याच ठिकाणीं जातील, असा आमचा समज असला, तरी तो परलोकापुरताच असावा. ह्या लोकीं तरी निदान आह्मांस एका देशांत व एकाच पृथ्वीवर राहावयाचें आहे. सूर्यप्रकाश, पर्जन्य, वारा, पृथ्वी इत्यादि उत्तम ईश्वरी देणग्या आह्मांलाच तेवढ्या मिळतात आणि अन्य मताच्या लोकांस मिळत नाहींत, असें निदान ह्या लोकीं तरी आपल्या अनुभवास येत नाहीं. तर ज्या आमच्या अन्य धर्मी व अन्य मतावलंबी बंधुभगिनींवर, ईश्वराची दया आमच्यावर असते तिच्याहून कोणत्याही अंशीं कमी नाहीं असें आह्मांस दिसून येतें, त्यांच्याशीं आह्मीं सलगीनें सभ्यतेनें आणि प्रीतीनें कां वागूं नये? देशहिताच्या आणि लोकहिताच्या कामांत आह्मीं सर्वांनीं एक कां होऊं नये?

राळ्या मतांचीं असलेलीं आढळून येतात; तरी त्यांच्यांत परस्परांविषयीं असलेल्या स्वाभाविक प्रेमांत कांहीं अंतर असत नाहीं.

युनाइटेड् स्टेट्स्‌चें राष्ट्र स्थापन झाल्यापासून आजपर्यंत कोणत्याही धर्ममताला राष्ट्रीय सरकाराकडून विशेष आश्रय देण्यांत आला नाहीं, व यापुढेंही तो दिला जाणार नाहीं. वैद्यकी, शेतकी किंवा साधारण व्यापारधंदा ह्यांबरोबर सरकारचा जितका संबंध आहे, तितकाच तो धर्ममतांबरोबर आहे; त्याहून अधिक नाहीं. एकाद्या मनुष्याच्या किंवा समाजाच्या धर्ममतामध्यें दुसरे लोक हात घालून ढवळाढवळ करूं लागल्यास, त्या मनुष्याला किंवा समाजाला कांहीं त्रास किंवा नुकसान सोसावें लागल्यास मात्र, तें न होऊं देण्याबद्दल सरकार धर्मसंबंधी गोष्टींत हात घालील. याचप्रमाणें एकाद्या धर्मीचीं मतें राष्ट्रीय कायद्यांच्या विरुद्ध असल्यास, सरकार लोकांना त्या मतांप्रमाणें आचरण करूं देणार् नाहीं. उदाहरणार्थ, मोर्मन् पंथाचें एक मत असें आहे कीं, एका पुरुषानें एककाळीं पुष्कळ बायकांशीं लग्नें करावीं. हें युनाइटेड् स्टेट्स्‌च्या राष्ट्रीय कायद्याविरुद्ध आहे; म्हणून हें आणि याच्याच सारखीं एकदोन मतें चालवूं नयेत, असा राष्ट्रीय सरकाराचा ठराव झाला आहे.

इंग्लंडांतील इंग्लिश्‌मंडळी ह्या नांवाच्या मतांत अशी एक चाल आहे कीं, उपाध्यायानें धर्माधिकाराचा व्यापार करावा. तिकडले लोक सेनाखात्यांतील व दुसरेही कित्येक अधिकार ह्याच रीतीनें विकतात, असें ऐकिवांत आहे. हा धर्माधिकाराचा लिलांव देशास व लोकांच्या धर्मबुद्धीस फार अ-

हिंदु, मुसल्मान, खिस्ती, शैव, वैष्णव, गाणपत्य, शिया, सुन्नी, एपिस्कपल् प्रेस्बिटीरियन्, मेथडिस्ट, एकेश्वरवादी, त्र्येकेश्वरवादी आणि तेहेतीसकोटिदेववादी ह्या सर्वांनीं मतद्वेष एकीकडे गुंडाळून ठेवून, आपसांत एकी करून देशसेवा केली पाहिजे.

पायकारक आहे. जो जास्त किंमत देईल, त्यास तो अधिकार मिळतो. मग तो लिलांव घेणारा कोणत्या कां योग्यतेचा मनुष्य असेना? एखादा श्रीमंत मनुष्य कोणती तरी मोठीशी उपाध्यायकी विकायास काढलेली असली म्हणजे ती विकत घेऊन, आपल्या हाताखालीं एकदोन उपाध्ये चाकरीला ठेवून, आपण सुखानें काळ घालवितो. हा प्रकार कांहींसा आमच्या तिकडल्या देऊळांच्या व मठांच्या महंतपणासारखा आहे, असें म्हटल्यास चालेल. ह्यामुळें इंग्लंडीय मंडळींत अयोग्य पुरोहित बरेच असतात; यावरून तेथील सर्वच उपाध्याय असे असतात, असें मी म्हणत नाहीं; तर तेथें पुरोहितत्व लिलांवानें विकत घेऊन चालविणारे लोक आहेत, एवढाच माझ्या सांगण्याचा आशय आहे. खेडेगांवांत जर धर्मोपदेशक चांगला मिळाला, तर तेथील लोकांचें महद्‌भाग्य समजलें पाहिजे!

अमेरिकेंत असें उपाध्यायत्व विकलें जात नाहीं. येथें उपाध्याय लोकमतानें निवडले जातात. ह्यामुळें येथील धर्माधिकारी बहुधा विद्वान्, सदाचरणी, कर्तव्यदक्ष, असेच पाहून निवडले जातात. ह्यावरून एथील सर्वच धर्माधिकारी गुणांच्या खाणी असतात, असें समजूं नये. उपाध्याय वाईट आहे असें वाटल्यास, त्याला लोक काढून टाकतात. येथील धर्माधिकारी विद्वान् आणि सज्जन असल्यामुळें लोकांस धर्माभिरुचि विशेष आहे. येथें देवळांची वगैरे व्यवस्था राष्ट्रांतील इतर व्यवस्थेप्रमाणेंच सरळ रीतीनें चालली आहे. प्रत्येक भजनालयाची व्यवस्थापक मंडळी असते. ती देवळाचा सगळा कारभार चालविते. युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें कोठें जा व कसलेंही काम पहा, तेथें लोकांची व्यवस्था लोकमतानें होते. त्याप्रमाणें धर्मसंबंधाचीही व्यवस्था अशीच होते. इंग्लंडांत दुसरा असा अनर्थ आहे कीं, तेथें प्रत्येक चर्चाची स्थावर मिळकत फार आहे; म्हणजे देवळाचे नांवानें जमीन तोडून दिलेली आहे. ती जमीन लोकांकडे उत्पन्नासाठीं दिलेली असते.

मग तो जमीन घेणारा त्या पवित्र जमिनींत काय पाहिजे तें पापकर्म करो. देवळाचे पैसे उत्पन्न झाले म्हणजे झालें. ह्या जमिनींत दारूचे कारखाने व पिठे पुष्कळ आहेत. जो पैसा लोकांच्या तारणासाठीं म्हणून लावावयाचा, तो लोकमारणापासून मिळवावा, हें केवढें आश्चर्य आहे! येथें देवळांस लागून असलेली जमीन फार थोडी आहे. कांहीं वर्षांपूर्वीं ह्या देशांत देखील इंग्लंडाप्रमाणेंच देवळाची जागा पाहिजे त्याला भाड्यानें द्यायाची चाल होती. एका मेथडिस्ट् मंदिरामध्यें वरच्या बाजूला लोक देवाचें भजन करीत असत, त्याच देवळाचे तळघरामध्यें दारू सांठवून ठेवण्याला जागा भाड्यानें दिली होती. आणखी एक चमत्कारिक गोष्ट अशी कीं, ह्या देशांत आफ्रिकन्‌दासांचा व्यापार चालू असतां, या दासांना विकून मिळालेला पैसा घेऊन, देवळाचा खर्च आणि धर्मप्रसार इत्यादि सत्कृत्यें करायाला ह्यांस लाज वाटत नव्हती. ह्यांचा असा पक्का समज होता कीं, आफ्रिकेंतील काळे लोक हे देवानें गुरांढोरांप्रमाणेंच आमच्या मनसोक्त उपयोगासाठीं उत्पन्न केले आहेत. तेव्हां त्यांच्या विक्रीनें उत्पन्न झालेला पैसा धर्मकृत्यांत लावला म्हणून काय झालें? आमच्या देशांतील ब्राह्मणादि तीन वर्णांचाही असा समज होता कीं, शूद्रजातीचीं मनुष्यें आमच्या सेवेकरितांच ईश्वरानें निर्माण केलीं आहेत, आणि आमची सेवा करणें हेंच त्यांचें मुक्तिसाधन आहे. मनुष्यें रानटी स्थितींत असतांना, त्यांचे असेच वाईट समज असतात. लोकांकडून मरेमरेतोंपर्यंत आपली चाकरी करून घेऊन, त्यांच्या मेहनतीबद्दल त्यांस कांहीं द्यावयाचें नाहीं इतकेंच नव्हे; तर त्यांना आपण आपली चाकरी करूं देतों आणि तेणेंकरून त्यांस मुक्तिमार्ग खुला करून देतों, हा आपला त्यांवर मोठा उपकार आहे असें समजणें, हा रानटीपणा नव्हे तर काय? त्याचप्रमाणें मनुष्यरक्ताचा विक्रय करून, त्यापासून उत्पन्न झालेल्या पैशाचा उपयोग इ-

तर लोकांच्या तारणार्थ, स्वधर्मोपदेश करण्याच्या कामीं खर्च करावयाचा, ही घोर राक्षसीपणाची चाल तरी, रानटीच आहे. युनाइटेड् स्टेट्समध्यें आतांशा ह्या चाली बंद झाल्या आहेत, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

एथें देवळांच्या खर्चाप्रमाणेंच उपाध्यांचा खर्चेही लोकांच्या दानधर्मावर चालतो. पांचशें लोक जेथें उपासनेकरितां येतात, अशा देवळांतील उपदेशकांस दरमहा सरासरी दोनशें डालर पगार मिळतो. याशिवाय देवळाची देखरेख ठेवण्याकरितां जीं मनुष्यें नेमलेलीं असतात, त्यांनाही बराच पगार द्यावा लागतो. देवळांमध्यें खुर्च्या, बांका, दिवे, चटया, गालीचे वगैरे घालण्यालाही पुष्कळ खर्च लागतो. (इकडचीं भजनमंदिरें फार चांगली सुशोभित केलेलीं असतात.) हा सगळा खर्च चालायाला देवळांत येणारे लोक कांहीं वर्गणी देतात. दर रविवारीं सकाळ संध्याकाळ उपासना संपल्यानंतर, देवळाच्या व्यवस्थापक मंडळीनें नेमलेले मनुष्य हातांत तबकड्या घेऊन, देवळांत आलेल्या लोकांच्या समोर नेतात; तेव्हां ज्याला जितकी शक्ति असेल, तितकें द्रव्य त्यानें धर्मकृत्याकडे लावण्याकरितां त्या तबकड्यांत घालावें, अशी चाल आहे. पैसा उत्पन्न करण्याचा दुसरा एक उपाय आहे, तो जरी मला पसंत नाहीं तरी सांगितला पाहिजे. देवळांत जीं बांकें किंवा खुर्च्या पुढें असतात, त्यांस भाडें असतें. तें जो देईल त्यांच्यासाठीं त्या राखून ठेविलेल्या असतात. ईश्वरप्रार्थनामंदिरांत असा व्यापार व्हावा, आणि श्रीमंतांसच उपदेश अधिक सोईनें ऐकितां यावा, हें बरोबर नाहीं. अशा रीतीनें बरेंच उत्पन्न होतें. गयादि क्षेत्रांमधून पुरोहितास जो अधिक पैसे देईल, त्याचेच पितर अधिक उच्च पदास जातात, अशी वेडी समजूत आहे; तशांतलाच हाही एक प्रकार आहे, असें म्हटलें तरी चालेल. हे जागा विकत घेऊन पुढें बसणारे लोक सर्वच धार्मिक असतात, असें बिलकूल समजूं नये. द्रव्य खर्चून पुढें बसणारांतही पुष्कळ

ढोंगी असतात. दर आदित्यवारीं आपलीं मुलेंमाणसें घेऊन देवळांत जाणें, हें गृहस्थपणाचें अर्थात सभ्यतेचें लक्षण आहे, असें समजतात. म्हणून मनांत भक्ति नसतांही, देवळांत जाणारे लोक बरेच आहेत. येथें केवळ लौकिका-करितां दानधर्म करणारे, असे लोकही पुष्कळ आहेत. त्यांना जरी आमच्या तिकडल्याप्रमाणें सरकाराच्या मार्फत मोठा दानधर्म केल्यानें बारोनेट्, जी. सी. एस्. आय्., सी. एस्. आय्., सी. आय्. इ. इत्यादि लांबलचक पदव्या सरकारांतून मिळत नाहींत, तरी वर्तमानपत्रांतून त्यांची फार प्रसिद्धि होते. इतक्या उपायांनींही देवळाचा सगळा खर्च भागण्यासारखा नसतो. म्हणून इकडच्या बायका नानाप्रकारचे उपाय योजून, धर्मखर्चाकरितां पुष्कळ पैसा गोळा करितात. देवळांत येणाऱ्या लोकांपैकीं दोन तृतीयांश बायका अ-सतात. देवळाच्या खर्चाला लागणारा अर्धा अधिक पैसा ह्या बायकांकडून मिळतो. मला वाटतें कीं, बायका नसत्या तर ह्या धर्ममंडळ्या चालत्या कीं नाहीं याचा संशयच आहे. पुराणिकांच्या पोटाची काळजी बायकांस असते, तितकी ती पुरुषांस नसते. आमच्या देशांतील बायका पुराणास आणि देवदर्शनास वगैरे जातात, तेव्हां त्या कधीं रिक्तहस्त असत नाहींत. पैसा, सुपारी, फूल, फळ, नाहींतर निदान एक मूठभर तांदूळ तरी पुराणिकापुढें नेऊन ठेवितील. (पुरुष मंडळी देवळांत जातात तेव्हां बहुतकरून रिकाम्या हातांनीं घंटा वाजवूनच, आपलें समाधान करून घेतात.) याप्रमाणें बहु-तेक सगळ्या भटांचा आणि पुराणिकांचा चरितार्थ बायकांच्या दानधर्मावर चालत असूनही, वेदांती, धार्मिक पुराणिक लोकांस सांगत असतात कीं, 'बायका स्वभावतः फार वाईट आहेत. सृष्टीमध्यें वाईट म्हणून जितकें कांहीं आहे, तितकें सर्व घालून सृष्टिकर्त्यानें त्यांस निर्माण केलें आहे. ह्या पुरुषांच्या पायांतील बिड्या आहेत, ह्या धर्मनाशाचें कारण आहेत, मुक्ति प्राप्त करून घेऊं इच्छिणारानें यांचें तोंड पाहूं नये, यांना शास्त्राध्ययनाचा

अधिकार नसावा, यांनीं वेद वाचूं नयेत, उपदेश करूं नयेत, या जगामध्यें पुरुषाच्या नाशाचें कारण जर कांहीं असेल, तर तें बायकाच.' ह्या पुराणिकांच्या आचरणांत आणि उपदेशांत कृतज्ञतेची कमाल आहे म्हणावयाची! पूर्वीं या देशांत देखील बायकांच्या संबंधानें पुरुषांचे समज असेच वाईट आणि विलक्षण होते. ते म्हणत असत कीं, बायकांनीं कधीं उपदेश करूं नये. कित्येक लोकांची समजूत तर एथवर गेली होती कीं, बायकांनीं प्रार्थनासंगीतेंही गाऊं नयेत. ही समजूत अद्यापि अगदीं नाहींशी झाली नाहीं, तरी ती बहुतांशीं जात चालली आहे. युनाइटेड् स्टेट्स्मधील एकंदर ७७,००० धर्मोपदेशकांपैकीं १६५ बायका आहेत. वीस वर्षांपूर्वीं ४।५ देखील नव्हत्या. त्या काळीं, बायकांनीं उपदेश करणें हा मोठा अनर्थ आहे, असें समजत असत.

इतर सगळ्या देशांतील ख्रिस्तीलोकांप्रमाणें हे लोकही आदित्यवार हा पवित्र दिवस आहे असें समजतात. आदित्यवारी बहुतेक सर्व ठिकाणांतून व्यापारउदीम करण्याचें बंद असतें. ज्या संस्थानांतून आदित्यवारीं व्यापार बंद पडत नाहीं तेथें तो बंद व्हावा, म्हणून पुष्कळ धार्मिक लोक खटपट करीत आहेत. आदित्यवारीं सर्व सरकारी कचेऱ्या व सार्वजनिक आणि स्वतंत्र शाळा, आणि कारखाने बंद असतात. त्या पवित्र दिवशीं धार्मिक स्त्रीपुरुष देवळांतून जाऊन, परमेश्वराची आराधना करतात आणि उपदेश ऐकतात. धर्मप्रसार करणें हें आपल्या धर्माचें अंग आहे, असें मानितात. आपल्या देवळांत हे लोक सर्वांस बोलावितात. शाळांत जरी धर्मशिक्षण नाहीं, तरी बहुतेक लोक आपल्या घरींच मुलांस दररोज धर्मसंबंधीं शिक्षण देतात. मुलांस देवळांत जमवून, बायबलांतील कांही वाक्यें वाचून धर्मोपदेश करितात. मुलांस आणि मोठ्या माणसांस धर्मोपदेश करण्याकरितां, दर रविवारीं देवळांतून वगैरे ज्या शाळा भरत असतात, त्यांस "सन्डे स्कूल्स्"

म्हणजे आदित्यवारच्या शाळा, असें म्हणतात. ह्या देशांत वसाहत करायास आलेल्या लोकांसही धर्मोपदेश करून, त्यांस सन्मार्गी लावण्याकडे इकडील धार्मिक लोकांचें फार लक्ष्य आहे. ज्या मंडळ्या ह्याप्रकारें धर्मप्रसार करितात, त्यांस "होम् मिशन्स्" म्हणतात. ह्या कामीं रात्रंदिवस खपून, मन:पूर्वक धर्मप्रसार करणाऱ्या स्त्रीपुरुषांची संख्या बरीच मोठी आहे. ख्रिस्तीधर्माशिवाय मनुष्यास सद्गति प्राप्त होत नाहीं, असा ह्यांचा समज आहे. म्हणून हे लोक परदेशांतून स्वधर्माचा प्रसार करण्याकरितां, पुष्कळ पैसा खर्च करितात. ह्या देशांतले शेंकडों स्त्रीपुरुष आपलीं घरेंदारें, सुखसोई इत्यादि सोडून केवळ धर्माकरितां परदेशांतील लोकांचें हित करायाला दूर दूर गेले आहेत. सुमारें १०० वर्षांपूर्वीं अमेरिकेंतील कांहीं मिशनरी आमच्या देशांत गेले. त्या वेळीं कंपनीसरकार त्यांना आपल्या राज्यांत धर्मोपदेश करूं देईना. बंगाल्यांत आणि मद्रासेंत त्यांची दाद लागली नाहीं. त्यांपैकीं कित्येकांच्या बायका मेल्या, आणि त्यांचे फारच हाल झाले. मग ते मुंबईस आले. येथें देखील त्यांनीं राहावें असें सरकाराच्या मनांतून नव्हतें. तरी आपल्या धर्माचा प्रसार करावयास आलेल्या निरुपद्रवी लोकांना आपल्या राज्यांतून घालवून दिलें तर, लोक आपणास काय म्हणतील, या लाजेनें शेवटीं इंग्रज सरकारानें त्यांस मुंबईत राहूं दिलें. मुंबईची हवा त्यांस मानवत नव्हती; सरकारही त्यांस फार अनुकूल नव्हतें; आणि तेथील लोक तर त्यांचा द्वेष आणि छळ करीत होते. त्या विदेशांत त्यांचा वाली कोणी नव्हता. आणि त्यांचा स्वदेश तर फार दूर पडला. स्वदेशीं जाण्यायेण्याचीं साधनेंही आतां सारखीं विपुल आणि सुलभ नव्हतीं. इतक्या अडचणी असतांही त्यांनीं आपलें काम चालविलें. सध्यां हिंदुस्थानांत त्यांच्या ३०१३५ मंडळ्या आहेत. "पृथ्वीवरील सर्व प्राण्यांस तुम्ही माझें शुभवर्तमान सांगा." असें ख्रिस्ताचें सांगणें आहे. त्यास अ-

नुसरून हे त्यांचे उद्योग आहेत. अशा धर्मप्रसाराच्या कामीं द्रव्यसाहाय्य करणारे सर्व श्रीमानच आहेत, अशी कोणाची समजूत असेल, तर ती निव्वळ चुकीची आहे. ह्या कामीं गरीबांचीच फार मदत आहे. इकडे श्रीमानांस धर्माची आस्था विशेष नाहीं. त्यांमध्यें आस्थेवाईकही आहेत; परंतु थोडे. न्यूयार्क्‌मध्यें "इटालियन् आपरा हाऊस्" नांवाचें एक टोलेजंग नाटकगृह आहे, तें तेथील ७० श्रीमानांनीं बांधलें. त्यास एकंदर ९८ लक्ष डालर खर्च लागला असून, त्यास त्या सत्तर जणांपैकीं प्रत्येकानें १,४०,००० डालर दिले! ते चैनीसाठीं खर्च करितात. धर्मप्रसारार्थ साहाय्य होतें तें गरीबांकडून.

जे लोक ख्रिस्ती नाहींत ते अनंतकाळच्या नरकांत जाणार अशी ह्या लोकांची दृढ समजूत असूनही ह्या कामाकरितां अवघे ५५ लक्ष डालर खर्च करतात. युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें आज कांहीं नाहीं तरी एक कोट मनुष्यें भजनमंदिरांतून धर्मोपदेश ऐकत असून, ते सगळे कोणत्याना कोणत्यातरी ख्रिस्तीसंप्रदायांचे अनुयायी आहेत. त्यांची संपत्ति दर वर्षास सुमारें एकतीस कोटि डालर वाढत जात असून, ह्या राष्ट्रांतील सगळ्या धनाचा एक पंचमांश म्ह० ८,७२८,४००,००० डालरां (म्हणजे २६,१८,५२,००,००० रुपयां) इतकी संपत्ति त्यांच्या हातांत आहे. असे धनाढ्य लोक दरवर्षी अवघे १,६५,००,००० रुपये धर्मप्रसाराच्या कामीं खर्च करतात. हा धर्मखर्च त्यांच्या संपत्तीचा सुमारें एकशें एकुणसाठावा (१५९) अंश आहे. हा ह्या देशांतील लोकांच्या विलक्षण संपत्तीच्या मानानें फारच कमी आहे, आणि ह्यांत श्रीमान् लोकांपेक्षां गरीबांचा, त्यांतही गरीब स्त्रियांचा अंश अधिक आहे. ही रकम जमविण्याकरितां एथील स्त्रिया फारच मेहेनत घेतात. ह्या देशांतलीं एक कोट मनुष्यें दरवर्षी ९० कोट डालर म्ह० २७० कोट रुपयांची दारू पितात आणि १४७ कोटि रुपयांची तंबाखू ओढतात. ह्यावरून धर्मापेक्षां

तंबाखूचें आणि दारूचें माहात्म्य ह्या देशांत फारच आहे, असें दिसून येतें. ही गोष्ट फारच वाईट व शोचनीय आहे. इकडच्या मद्यनिषेधक आणि नीतिप्रसारक मंडळ्या, सदरील दोन्हीं व्यसनें ह्या राष्ट्रांतून नाहींतशीं व्हावीं, म्हणून फार परिश्रम करीत आहेत. ईश्वर त्यांस यश देऊन सुरापिशाची, तंबाखूराक्षसी आणि अनीति यांच्या तावडींतून ह्या सुंदर राष्ट्रास सोडवो, अशी देवापाशीं माझी प्रार्थना आहे.

आमच्या देशांतील धार्मिक मनुष्यें जो मागेल त्याला देतात. अनाथाला देणें चांगलें, पण पात्रापात्र पाहिलें पाहिजे, तसें आमच्या देशीं होत नाहीं; म्हणून जिकडे तिकडे फार भिकार माजलें आहे. "अपात्रीं केलेलें दान व्यर्थ होय, अशानें पाप लागतें;" असें आमच्या नीतिमान् पूर्वजांचें सांगणें आहेच. परंतु विचार करतो कोण? समजा एक लठ्ठ निरंजन बैरागी आहे, त्याला कोणी पैसे दिले, तो तर जाऊन त्यांचा गांजा ओढणार. गांजाच्या व्यसनानें त्याचा स्वतःचा तर बिघाड झालाच आहे, परंतु त्यापासून मुलांस व दुसऱ्या मंडळीसही तें व्यसन जडतें. कारण अशा साधुसंतांचा कित्ता गिरविणारे फार! तेव्हां अशा तऱ्हेनें अपात्रीं झालेल्या दानधर्मापासून देशांत आळस व दुर्व्यसनें माजून, देश निकृष्टावस्थेप्रत पोंचतो. मी स्वतः अनेक क्षेत्रें पाहिलीं आहेत, व तेथील दानधर्माचा प्रकारही पाहिला आहे. तेथील पंड्यांना वगैरे केलेला धर्म अपात्रीं होतो. ते आपल्या यजमानांस भिकारी करून सोडतात. जो धर्माचें वगैरे भय दाखवून आपल्या यजमानापासून अधिक हरण करील, तो तीर्थोपाध्याय विद्वान्, त्याला मोठा "चलाक" व शहाणा म्हणतात. इकडच्या लोकांची दानधर्म करण्याची रीति आमच्या तिकडल्यापेक्षां फार निराळी आहे. इकडे कोणी रस्त्यांतून भीक मागत फिरत नाहीं. लोकमत आणि राष्ट्राचे कायदे प्रसिद्धपणें भीक मागण्याच्या विरुद्ध आहेत. कोणी दारावर भिक्षा मागायाला आल्यास, त्याला

भीक घालीत नाहींत. आंधळीं-पांगळीं अशक्त म्हातारीं-कोतारीं माणसें कधीं कधीं आगपेट्या, सुतळ्या, आरशा वगैरे लहानसहान जिन्नस घेऊन रस्त्यावर बसलेलीं दिसतात. कोणी धर्मात्मा त्यांपासून एकाददुसरा पदार्थ घेऊन, दोनचार पैसे अधिक देतो. जो मागेल त्याला देत नाहींत, एवढ्यावरून हे लोक दयावान् नाहींत असें समजूं नये. हे लोक पात्र पाहून दान करण्यास फार जपतात. खेडेगांवांतील व मोठमोठ्या शहरांतील लोक आपापल्या गांवच्या अनाथ, व्यंग व काम करण्यास अशक्त अशा मनुष्यांचें प्रतिपालन करण्यास, लागणारा पैसा वर्गणी करून जमवितात; ह्याशिवाय दानधर्माकरितां गांवच्या रहिवाशांस थोडासा करही द्यावा लागतो, तो ते स्वसंतोषानें देतात. हा पैसा त्या त्या ठिकाणच्या दानधर्मव्यवस्थापक मंडळीच्या हवालीं केला जातो. ह्या मंडळ्यांस "बोर्ड्स् ऑफ् च्यारिटीज्" असें नांव आहे. ह्या मंडळ्यांचे व्यवस्थापक स्त्रीपुरुष लोकमतानें निवडले जातात; ते फार संभावित, प्रामाणिक आणि धार्मिक असून, आपलें काम लक्ष्यपूर्वक आणि मोठ्या आस्थेनें करणारे असतात. इतर सभांची व्यवस्था जशी असते, तशीच या दानसभांची असते. राष्ट्रांत जो धर्म होतो त्यांतील अर्धा पैसा लोकांकडून मिळालेला असून, अर्धा सरकाराकडून मिळतो. जे खरोखर व्यंग असून, आपलें पोट भरण्यास असमर्थ असतात, त्यांच्याचकरितां हा सर्व पैसा खर्च होतो.

आमच्या देशांत पुष्कळ लोक असे आहेत कीं, ते आपलें घर सोडून कधींच जायाचे नाहींत. इकडच्या लोकांचा प्रकार ह्याहून फारच निराळा आहे. हे लोक व्यापाराच्या व उद्योगाच्या शोधांत पुष्कळ प्रसंगीं गांवोगांव हिंडत असतात. दुसऱ्या गांवांत किंवा प्रांतामध्यें गेल्यानंतर, त्यांस कदाचित् दरिद्र येतें. ह्याशिवाय यूरोपांतून इकडे वसाहत करण्याला आलेल्या लोकांमध्येंही पुष्कळ दरिद्र असतें. त्यांस एकदम उद्योग धंदे मिळत नाहींत.

अशा प्रकारचे पुष्कळ लोक दारिद्र्यसंकटांत पडून देशभर प्रवास करीत असतात. भिकारीही नानाप्रकारचे आहेत. हे लोक कोठें राहातात, काय करितात, त्यांची स्थिति कशी आहे, वगैरेंचा शोध करणारे पुष्कळ धार्मिक जन इकडे आहेत, त्यांतही स्त्रिया अधिक आहेत. ते सज्जन हें काम केवळ निरपेक्ष बुद्धीनें फुकट करितात; असें असूनही कधीं कधीं ह्या कामीं अव्यवस्था होते. ह्यास उपाय नाहीं. कोणतेंही काम हातीं घ्या, त्यांत प्रारंभीं किंवा मागून थोड्याबहुत चुक्या व्हावयाच्याच. भ्रम होणें हा मनुष्य धर्मच आहे. जो काम करील तो चुकेल. आमच्या देशांतील बहुतेक लोक आपण कांहीं करावयाचे नाहींत, कोणीं एखादें काम आरंभलें तर त्याच्या चुक्या पाहायाला कसे डोळ्यांत तेल घालून तयार. अमेरिकन् लोक असे दोष काढून उगीच राहत नाहींत; कोठें कांहीं अव्यवस्था झाली असल्यास ती नाहींशी करण्याचे उपाय योजून, लोकोपयोगी कृत्यें करणाऱ्या व्यक्तींस फार उत्तेजन देतात. ह्या देशांत दरिद्र्यांस आश्रय देण्याचे दोन प्रकार आहेत; पैकीं पहिला—निराश्रिताला आश्रय देणें—म्हणजे ज्यांस वस्त्रान्न वगैरे नसेल त्यांस तें देणें. दुसरा—काम करूनही ज्यांस पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळत नाहीं, अशांच्या स्थितीचा शोध करून, त्यांची व्यवस्था लावणें. ह्मणजे ह्यांच्यावर जुलूम कोणाचा होत आहे, ह्यांचे हक्क काय आहेत, वगैरेंची चौकशी करून जुलमी लोकांपासून त्यांचें संरक्षण करणें.

गांजा, तंबाकूच्या वगैरे व्यसनांत अगदीं आसक्त होऊन आळशी बनलेले बैरागी, व अशांसारखे शक्ति असून अनुद्योगी असे असणारे अनेक लोक ह्यांस अविचारानें धर्म करण्यानें, आमच्या देशांत भिकार फार वाढलें आहे. तर अशांना धर्म करून ह्मणजे दुर्व्यसनास हस्तावलंब देऊन, पापप्राप्ति करून घेऊं नये. ज्याला म्हणून काम करण्याची थोडी अधिक शक्ति आहे, त्याला युनाइटेड् स्टेट्स्मध्यें धर्माचें कांहीं एक मिळावयाचें नाहीं. ह्यांच्या धर्मा-

तील एक मूलवाक्य " ज्याला खावयाचें आहे, त्यानें काम केलें पाहिजे," असें आहे. आमच्या तिकडे आळस तर विचारूं नका, ज्याला त्याला फुकट बसून खायाला मिळतें. अंगाला भस्म लावलें, जटा वाढविल्या, माळा गळ्यांत घातल्या किंवा भगवें नेसलें, म्हणजे झालें. तो साधुसंत म्हणून, लोकें त्याला फुकट खायाला घालतात. भीक मागणें व मागेल त्याला ती घालणें, हें आमचे लोक धर्मांग समजतात. एकादा मनुष्य मोठा रोजगारी झाला कीं, त्याच्या घरीं नातें उकरून काढून खायाला, पुष्कळ माणसें मिळतील. परंतु त्याच्या उलट काळ आला कीं पुरे, त्याच्यावर उलटून पडावयाला तेच लोक कमी करणार नाहींत ! इकडे तसें नाहीं, सर्व लोक यथाशक्ति उद्योग करितात. गरीब, लहान लहान मुलें देखील वर्तमानपत्रें घेऊन, त्यांत आज अमुक बातमी आहे म्हणून पुकारीत विकतात. कोणी थंडीचे दिवसांत रस्त्यावरील बर्फ काढतात. निराश्रित विधवाही काम करून पोटाला मिळवितात. त्यांचीं लहान मुलें अनेक कामें करून आपल्या आयांना मदत करतात. इकडे भिकेला देखील उद्योगाचें रूप देतात. जिप्सी म्हणून लोक आहेत, ते आमच्या देशांतील कैकाड्यांसारखे भीक मागणारे आहेत. पण ते वाद्यें वाजवून वगैरे लोकांस खुष करतात. कित्येक भिकारी वानरें व कित्येक अस्वलें नाचवून जनमनोरंजन करतात. इकडे धर्मशाळा आहेत. त्यांत अनाथ वृद्ध मनुष्यांस व मुलांस आश्रय देतात. त्यांत देखील योग्य काम आहेच. इकडे क्षयरोगी फार आहेत. मद्यपान व तंबाकूचें सेवन, हीं ह्या रोगाच्या मूळ कारणांपैकीं आहेत; असें असूनही इकडील लोक ह्या व्यसनद्वयांतून आपली सुटका करून घेत नाहींत! आमचे लोकही ह्या दोन व्यसनांचें झपाट्यानें अनुकरण करीत असून, अगदीं क्षीणशक्ति होत आहेत. आमचे रावसाहेब नाजुक होण्याचें व ह्या वेळीं रावसाहेब भेटावयाचे नाहींत, त्यांचें कपाळ दुखतें आहे म्हणून सांगण्याचें कारण, ही दारू होय! ह्या व्यसनानें घरांत अतिशय गोंधळ, बाहेर अप-

तिष्ठा आणि पैशाची खाक होते, आणि यमाजी भास्कराकडे लौकरच जावें लागतें. असें असूनही आमचे लोक ह्या दुर्व्यसनांत मग्न होत आहेत! धन्य आमची अनुकरणेच्छा! इकडे ह्या व्यसनद्वयानें अनेक लोक रोगी झाले आहेत. कोणी म्हणतात, आमची प्लीहा बिघडली आहे! कोणी म्हणतात, आम्हांस अन्नपचन होत नाहीं! कोणी म्हणतात, शक्ति नाहीं. अशा मद्य व तमाखु व्यसननिमग्न झालेल्या अनेक लोकांचीं शरीरें, पुष्कळ रोगांचीं, विशेषत: राजयक्ष्म्यांचीं निवासमंदिरें झालीं आहेत. अशा रोग्यांना धर्मशाळांत पाठवितात. येथें धर्मशाळेंत जाणें म्हणजे अत्यंत शरमेची गोष्ट समजतात. "मी मरेन (पण धर्मशाळेंत जाणार नाहीं," असे उद्गार काढणारे व त्याप्रमाणें करणारे लोक ह्या देशांत फार आहेत. पिस्तूल मारून घेतील, पण ह्या अनाथगृहांत राहणार नाहींत; असे येथें कांहीं लोक मिळतात. अशा रोग्यांपासूनही त्या ठिकाणीं हलकेंसलकें, (कुंड्यांतील फुलझाडांस पाणी घालण्यासारखें) काम करून घेतात. इकडे सर्वत्र आत्मसम्मान नांदत आहे. लोकांनीं मिळविलेलें आपण खाऊं नये असें ह्यांस मनापासून वाटतें. इकडे उगाच कोणी कोणाला पैसा देणार नाहीं व कोणी घ्यावयाचाही नाहीं. आमच्या तिकडे आत्मसम्मान, व स्वाभिमान म्हणजे काय पदार्थ आहेत, हें बहुतांस ठाऊक सुद्धां नाहीं. कोणी कांहीं फुकट दिल्यास खुशाल घेतील व म्हणतील कीं, एवढ्यावर चार महिने गेले तेवढेच पदरीं पडले! ते कर्ज काढतील. कर्ज न फिटलें तर पुढील जन्मीं फेडूं म्हणतील; परंतु कर्ज फेडण्यास पुनर्जन्म घ्यावा लागतो आहे, ह्यांची त्यास बिलकूल पर्वा नाहीं!

युनाइटेड् स्टेट्स्मध्यें बाह्यदेशांतून भिकार येतें तें फार आहे; येथील रहिवाशांपैकीं १/६ विदेशी लोक असून, त्यांतील गुन्हेगारांत शेंकडा ३० विदेशी लोक आहेत. ह्यास जीं कारणें आहेत, त्यांतील मुख्य हें होय कीं, परकीय लोकांना लौकर उद्योगधंदा न मिळाल्यानें, त्यांच्या हातून बिनभा-

ह्याच्या घरांत जाण्याचे उद्योग होतात. ज्यांस सर्वसाधारण लोकांनीं आश्रय दिलाच पाहिजे, असलीं विकलांग मनुष्यें इकडे फार नाहींत. कारण, परदेशांत वसाहत करायास येणारे सशक्त असतील, तरच आपला देश सोडून इकडे येतात. ग्रेट्ब्रिटन् व ऐर्लंड्, या संयुक्त राज्यांत दरहजारीं ३३ जणांस लोकाश्रय द्यावा लागतो. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें तेवढ्याच संख्येंत ५ असामींस म्हणजे दर २०० मनुष्यांत एकास; किंवा शेंकडा अर्ध्या मनुष्याला लोकाश्रय द्यावा लागत आहे. यावरून इकडे भिकार किती कमी व उद्योग कसा आहे, ह्याचें अनुमान तेव्हांच होतें. मला वाटतें आमच्या तिकडे तर भिकाऱ्यांचें मान शेंकडा दीडशें असेल! युनाइटेड् स्टेट्स्मध्यें आतां पुष्कळ लोक बाहेरचे आहेत. म्हणजे येथें खरोखरच अठरापगड जाती आहेत. येथें गुलाम म्हणून ज्यांना विकीत असत; त्या निग्रो लोकांची वस्तीही बरीच आहे. ज्यांना लोकाश्रय द्यावा लागतो, असे लोक किंवा भिकारी त्या निग्रोंमध्यें फारच थोडे आहेत. स्वातंत्र्य नसलेल्या लोकांस तें मिळाल्यावर, ते लोक कसे उद्योगी होतात, ह्याचें हें चांगलें उदाहरण आहे. निग्रो जातींत अनेक उद्योगी आहेत; कोणी वकील, कोणी बारिस्टर्, कोणी व्यापारी, कोणी कांहीं, कोणी कांहीं, असे सर्व उद्योगप्रिय आहेत. गुलामांची मुक्तता होऊन अजून पुरीं २५ वर्षेंही झालीं नाहींत, तों त्यांनीं प्रत्येक कामांत इतर लोकांशीं बरोबरी करून सोडिली आहे. लोकांस स्वातंत्र्य दिल्यानें काय काय फायदे होतात, ह्याचें हें मूर्तिमंत उदाहरण आहे. निग्रोंस दास्यविमुक्त केलें असतां देशांत महान् अनर्थ होतील, ते देशाचा सत्यनाश उडवितील, भिकार माजेल, चोऱ्या फार होतील, शांतता कमी होईल, असें गुलामांच्या व्यापारास अनुकूल असणारे लोक प्रतिपादन करीत; परंतु त्यांच्या म्हणण्याप्रमाणें इकडे कांहींएक घडून आलें नाहीं, हें पाहून फार आनंद होतो. सशक्त असून काम करतां येत नाहीं; अशांस

काम करावयास लावणें हें आपलें काम आहे असें समजून, येथील धर्ममंडळ्या त्यांस कांहीं तरी शिक्षण देतात. इंग्लंडांत जो भिकाऱ्यांच्या संबंधानें खर्च होतो, त्याचा एक तृतीयांश म्हणजे १ कोटि ८० लक्ष डालर्, यु० स्टे० मध्यें भिकाऱ्यांबद्दल खर्च होतो. येथें भिकार फार कमी आहे, हें सांगणारी ही रक्कम आहे. यु० स्टे० मध्यें भिकार कमी आहे ह्याचीं कांहीं कारणें आहेत; तीं अशीं कीं,—नवीन देशांत उद्योग करणारे तेच लोक वसाहतीला येतात. येथें नवीन जमीन लागवडीस आणण्यासारखी हवी तितकी आहे; त्यामुळें उद्योग फार असून, उद्योगी कोठेंही व कधींही उपाशीं मरावयाचा नाहीं. एथें आळशाची प्रतिष्ठा नाहीं. "असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी." असें म्हणून संतपणाचा आळस घेणाऱ्या मनुष्यास येथें खायाला मिळावयाचें नाहीं.

पूर्वीं आस्ट्रिया, जर्मनी व इंग्लंड् ह्या देशांतील अपराध्यांस गलबतांत घालून, युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें पाठवीत असत, परंतु आतां भिकाऱ्यांच्या व वसाहत करायाला येणाऱ्यांच्या संबंधानें येथील राष्ट्रीय सरकारानें बरेच कडक कायदे केलेले आहेत. त्यांत अशा प्रकारच्या अपराधी, आळशी, निरुद्योगी, भिकारी लोकांस देशांत येऊं देऊं नये, असा निर्बंध आहे. परकीय लोक इकडे वसाहती करायास येतात, त्यांच्या संबंधानें काय काय कायदे आहेत ह्याची चौकशी करीत असतां, इकडील लोक मला म्हणाले कीं, त्या संबंधाची माहिती काढून तुम्हांला काय करावयाचें आहे? तुमच्या देशांतील भिकारी निरुद्योगी लोकांनीं इकडे येणें आम्हांला इष्ट नाहीं. ह्यावरून आमच्या दारिद्र्याचा व आळशीपणाचा डंका येथवर पोंहचला आहे, असें दिसून येतें! हे म्हणतात तुमच्या तिकडलीं उद्योगी माणसें इकडे आल्यास चिंता नाहीं. मीही त्यांस आश्वासन दिलें कीं, तुम्हीं म्हणतां तसेंच होईल. आळशी येतील कमे? कोणी आळशी मनुष्य परदेशांतून इकडे आला असून त्याला स्वतः

काम करून आपला निर्वाह चालविण्याची शक्ति नाहीं व तो काम करूं इच्छित नाहीं, असें समजल्यास, हे लोक त्याला लवकरच आपला गाशा गुंडाळून स्वदेशीं जायास लावतात.

इकडे विकलांग मनुष्यें, म्हणजे आंधळे, मुके, लंगडे, लुले, इ० फार कमी आहेत; म्हणून वर सांगितलें आहे. दर २,७२० मनुष्यांत एक अंध, व दर २,०९४ त एक मुकें मनुष्य असलेलें सांपडतें. आंधळ्यांस भिक्षा घालणें हें ठीकच आहे, परंतु त्यांस कांहीं शिक्षण मिळून ते यथाशक्ति उद्योग करूं लागल्यास, देशाचें हित होऊन दारिद्र्य कमी होतें. इकडे आंधळ्यांकरितां अनेक शाळा आहेत. प्रत्येक संस्थानांत निदान २।३ तरी अंधशाळा आहेत, त्यांचा खर्च संस्थानिक सरकार चालवितें. त्या शाळांमधून अंधळ्यांस स्पर्शेंद्रियाच्या द्वारानें विद्या शिकवितात. अंधळ्याचें श्रोत्रेंद्रिय व स्पर्शेंद्रिय हीं मोठीं तीक्ष्ण असतात, त्याचें सर्व ज्ञान ह्या इंद्रियांत आलेलें असतें. त्याची बुद्धि फार ग्राहक असते. अंधळे विणतात व दुसरीं पुष्कळ कामें करितात. त्यांनीं केलेल्या वस्तु मीं कांहीं आणिल्या आहेत. त्यांस भूगोल शिकवितात. त्यांस स्पर्शावरून भूगोलाचें ज्ञान होईल असे गोल आणि नकाशे केलेले असतात. त्यांना गणित शिकवितात. किंडर् गार्टन्‌च्या शिक्षण-पद्धतीनें तर अंधशिक्षणांत कमाल करून सोडिली आहे! अंधळ्यांमध्यें पुष्कळ गवय्ये आहेत आणि वाद्यें वाजविणारेही अनेक आहेत. मीं एका भजनालयांत अंधळ्यानें वाद्य वाजविलेलें ऐकिलें, तें फारच मधुर लागलें. इकडे आईबापें मुलांच्या डोळ्यांची वगैरे फार खबरदारी ठेवितात. आमच्या तिकडच्या आया मुलांच्या डोळ्यांत तेल सोडीत असतात, व काजळ फांशीत असतात, तसें इकडे करीत नाहींत. बहिऱ्या मुक्यांच्याही शाळा एथें बहुत आहेत. त्यांना शिक्षण देण्याच्या कामांतही एथील कल्पक लोकांनीं पराकाष्ठा करून सोडिली आहे! न्यूयार्क्‌मध्यें ह्यांची एक शाळा

आहे, तींत ५०० विद्यार्थी आहेत. त्यांचें शिक्षण पाहून मला फारच चमत्कार वाटला. त्या शाळेंत एक बहिरा-मुका असून, अंधळा असा मुलगा होता. त्या विकलांग मुलास शाळा दाखविणारानें मला दाखविलें. त्याच्या हाताला बोटांनीं स्पर्श करून, ही कोणी एक हिंदुस्थानांतील बाई तुला पहावयास आली आहे, तेव्हां हिच्याशीं कांहीं बोलावयाचें असेल तर बोल, असें सांगतांच त्यानें क्षणांत "टाइप् रायटर्" नामक यंत्रद्वारें मजसंबंधानें दोन चार वाक्यें कागदावर लिहून आणलीं. तो कागद त्या दर्शकानें मला दिला, तो मी जपून ठेविला आहे. त्यांत त्या मुलानें माझें व माझ्या देशाचें नांव आणि माझा ह्या देशांत येण्याचा उद्देश हें सर्व थोडक्यांत लिहून, मी एथें आल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला होता. हें पाहून मी आश्चर्यानें थक्क झाल्यें व जगांत जर कांहीं अद्भुत चमत्कार असेल, तर हा आहे असें तत्क्षणीं मला वाटलें! ह्याशिवाय येथें अनाथ-बालकगृहें आणि उद्योगशाळा पुष्कळ आहेत. वेडसर मुलांकरितांही शाळा आहेत. अशक्त, अनाथ वगैरे लोकांकरितां निरनिराळ्या प्रकारचीं गृहें व शिक्षणालयें मिळून ४३० आहेत. अंधळे व मुके ह्यांच्या शाळा ५६ असून, वेडसर मुलांच्या शाळा ३० आहेत. एकंदर शाळेंतील शिक्षक फारच काळजीनें, व अक्कल खर्चून आपल्या शिष्यवर्गास शिकवितात.

तुरुंगाची व्यवस्था नीट असण्याविषयीं झटणें, तेथील लोकांचा समाचार घेणें, त्यांस उपदेश करणें वगैरे कामें धर्मसंबंधींच होत, अशी येथील लोकांची समजूत आहे. आमच्या देशांत तुरुंगांतील मनुष्यांचा व आपला कांहींएक संबंध नाहीं असें समजतात एवढेंच नाहीं तर, तसा संबंध ठेविला असतां त्यांत आपला हलकटपणा आहे अशीही लोकांची समजूत असावी असें वाटतें. म्हणून त्यांचा समाचार घेण्याच्या बुद्धीनें कधीं कोणी कारागृहांत जात नाहींत. तुरुंगांत जाणारे सर्वच लोक अगदीं अपराधी

असतील असें म्हणवत नाहीं. (आणि असले म्हणून काय झालें? आम्हीं तुरुंगांत जाऊन त्यांचा समाचार कां घेऊं नये?) निरपराधी मनुष्यासही तिकडे जाण्याचा प्रसंग येतो. आपल्यास तरी तुरुंगांत जावें लागणार नाहीं, हें निश्चयानें कोण सांगणार आहे? मी अद्यापि हिंदुस्थानांतील तुरुंग पाहिला नाहीं. मला तेथील तुरुंगाची पूर्वी कांहींच कल्पना नव्हती, ती कोल्हापूर प्रकरण झाल्यानंतर रा० आगरकरांच्या "डोंगरीच्या तुरुंगांत १०१ दिवसां" वरून आली. ५० वर्षांपूर्वी यु० स्टे० मध्यें कैद्यांची फार अव्यवस्था होती. बहुतेक ठिकाणीं भुयारांत किंवा खाणींत त्यांस कोंडून ठेवीत असत. गळ्यांना सांखळ्या, व हातापायांत बिड्या घालून मुलांना सुद्धां नानाप्रकारें त्रास देत असत. सारांश तेथें सर्वत्र अव्यवस्था व यातना फार असत. पण आतां धार्मिक व सज्जन स्त्रीपुरुष तेथें जाऊं लागल्यापासून ते तुरुंग आमच्या तिकडील "जनानखान्या" सारखे झाले आहेत. मी येथील तुरुंग पाहिले आहेत. ते फार स्वच्छ असतात, तेथें आगीचें भय नाहीं असें केलें आहे. कैद्यांस सदुपदेश करतात. तुरुंगांतून बाहेर आल्यावर नीटपणें वागण्याविषयीं सांगतात. तेथें त्यांच्याकरितां पुस्तकालयें आहेत. तेथें फुलझाडांच्या कुंड्या वगैरे असतात. दर रविवारीं सुटी असून ते प्रार्थना करितात. आईबापांचें शिक्षण नसल्यामुळें त्यांवर असा तुरुंगांत जाण्याचा प्रसंग आला आहे, असें समजून सज्जन लोक त्यांच्यावर दया करितात. अशा लोकांच्या पुष्कळ मंडळ्या आहेत. मुलांकरितां पुष्कळ सुधारणागृहें आहेत. अशा प्रकारचें पहिलें गृह इ०स०१८२४त स्थापलें. १८७४ त अशीं ३४ गृहें असून त्यांकरितां ८० लक्ष डालर खर्च होत असत. ह्या ५० वर्षांत एकंदर ९१,४०२ मुलांची सुधारणा होऊन सुमारें ७०,००० मुलें उद्योगी व संभावित निघालीं. ह्या गृहांत त्यांस नीतिशिक्षण देतात. एकमेकांचे दुर्गुण न लागावे म्हणून फार जपतात. इकडे कैद्यांना

देहदंड फारसा नाहीं, बिर्डी मात्र असते. फांशी देण्याच्या बदलीं कित्येक संस्थानांत बिजेच्या योगानें प्राण घेतात. शिक्षेची मुदत संपून कैदी तुरुंगाबाहेर आला, म्हणजे जानपदाचे सर्व हक्क त्याला प्राप्त होतात.

येथें निरनिराळ्या प्रकारच्या रोग्यांकरितां निरनिराळे असे पुष्कळ दवाखाने असून, सामान्य रोग्यांसाठींही बरेच आहेत. ह्यांचा खर्च सरकार चालवितें व लोकांच्या खर्चानें चालणारेही पुष्कळ दवाखाने आहेत. धार्मिक लोक तेथें असलेल्या रोग्यांचा नानाप्रकारें समाचार घेतात. कोणीं बायका रोगिभवनांत रोग्यांस मधुर गाणीं व धर्मसंगीतें गाऊन आणि धर्मपुस्तक वाचून ऐकवितात. कोणीं गोष्टी व खबर सांगतात, कोणी वृत्तपत्रें वाचितात, कोणी मधुर वाद्यें ऐकवितात, कोणी मिठाई देतात, कोणी सुवासिक फुलें देतात. इकडे फुलें देण्याचा प्रघात फार पडला आहे. ह्या फुलें देणाऱ्या मंडळीस "फ्लावर् मिशन्" म्हणतात. फुलें देण्याची कल्पना ज्या धार्मिक बाईनें प्रथमतः काढिली तिला मीं पाहिली आहे. ती आठ दहा वर्षें अर्धांग होऊन बिछान्यावर पडली आहे. तरी ती अशाप्रकारचीं पुष्कळ धर्मकृत्यें करीत असते. इकडे खरी दया आहे. आमच्या देशांत ही खरी दया अजून कोणाला ठाऊक नाहीं. तेथें रोगी पुष्कळ आहेत, व त्यांकरितां रोगिभवनेंही होत आहेत. ह्यांतील रोग्यांजवळ जाऊन त्यांच्याशीं गोड बोलण्याचें, त्यांचा समाचार घेण्याचें, त्यांला फुलें देण्याचें, वगैरे जर कोणी करील तर फार चांगलें होईल. दारू पिण्यांत, तंबाखू ओढण्यांत, नास्तिकपणाचीं बोलणीं बोलण्यांत वगैरे आम्हीं अमेरिकन व इतर पाश्चात्य लोकांचें अनुकरण फार आस्थेनें करितों. त्याच्या ऐवजीं जर आम्हीं त्यांच्या चांगल्या गुणांचें व चालींचें आस्थापूर्वक अनुकरण केलें, तर आमचें व देशाचें किती बरें हित होणार आहे?

# स्त्रियांची स्थिति.

मी लहान असतांना, इतर मुलांप्रमाणेंच मलाही अद्भुत गोष्टी ऐकण्याची फार आवड होती. आमच्या देशांत प्रचलित असलेल्या दंतकथा, भारत, भागवत, रामायण, अद्भुत रामायण, जैमिनी अश्वमेध इत्यादि पुराणकाव्यांतील चमत्कारिक गोष्टी ऐकण्याची हौस कोणाला नाहीं? ह्या गोष्टी ऐकून कोणाच्या अंगांत स्फुरण आलें नसेल? आणि आपल्यासही अशा प्रकारचीं महत्कृत्यें करण्याची शक्ति असावी असें कोणास वाटलें नसेल? परंतु आपला दुर्बळपणा, सर्व गोष्टींविषयीं अज्ञान, उपायहीनता इत्यादि गोष्टी मनांत येऊन, अशीं महत्कृत्यें आपल्या हातून कधीं घडून येणार नाहींत व ह्या गोष्टी केवळ कल्पित कादंबऱ्या आहेत, असें समजून ज्यांची निराशा झाली नसेल, अशीं मुलें व मोठीं मनुष्यें फारच थोडीं सांपडतील. कल्पित कादंबऱ्या आणि अद्भुत गोष्टी वाचायाची जर आम्हाला इतकी आवड आणि उत्सुकता आहे तर खरोखर घडून आलेला वृत्तांत वाचण्याची उत्सुकता कां नसावी? हैहयार्जुनतुल्य महानदीप्रवाहाचा रोध करणारें बल, व तें ज्यांच्यांत आहे अशा, शतमुख, सहस्रमुख रावणांसारख्या अजय्य राक्षसांचा वध करणाऱ्या सीतादेवी खरोखरच माझ्या दृष्टीस पडतील, ही गोष्ट सात वर्षांपूर्वी माझ्या ध्यानीं मनींही आली नव्हती. परंतु कालक्रमेंकरून ह्या अद्भुत गोष्टी माझ्या पाहण्यांत आल्या, आणि त्यांचा वृत्तांत थोडक्यांत तरी लिहून देशबंधुभगिनींस सादर करण्याची ही संधि प्रथम माझ्या वांट्यास आली ह्याचा मला मोठा आनंद वाटतो.

प्रसिद्ध इंग्रजी विदुषी ह्यारिएट् मार्टिनो हिनें "अमेरिकन् समाज" ह्या विषयावर रचलेलें पुस्तक कांहीं महिन्यांपूर्वी माझ्या पाहण्यांत आलें. ह्यारिएट् मार्टिनो १८४० त अमेरिकेस येऊन इकडच्या समाजाची स्थिति

पाहून स्वदेशीं परत गेल्यावर, तिनें हें पुस्तक रचिलें. त्यांत ह्या इंग्रजी बाईनें एतद्देशीय स्त्रियांची स्थिति सांगतांना असें म्हटलें आहे कीं, 'त्यांस (ह्या देशांतील स्त्रियांस) वरिष्ठ शिक्षण मुळींच मिळत नसून, तें मिळण्याचे मार्गही बंद आहेत. थोडेंसें गाणें, वाद्यें वाजविणें, कामापुरतें लिहिणें वाचणें, आणि शिवणकाम हीच काय ती त्यांच्या विद्वत्तेची परमावधि आहे. त्यांस कोणत्याही प्रकारचें सामाजिक किंवा राज्यकारणी स्वातंत्र्य नाहीं. त्यांस दैवयोगानें वैधव्य किंवा दारिद्र्य प्राप्त झालें, तर उदरनिर्वाह चालविण्यास शिवणकाम; स्वैपाकीणपणा; हलक्या प्रतीची (गृहस्थांच्या घरांतून) चाकरी, आणि असेंच कांहीं तरी इतर काम किंवा पुनर्विवाह, व स्वेच्छेविरुद्ध विवाह करणें, यांवांचून गत्यंतर नाहीं. ह्या देशच्या कायद्यांत स्त्रियांचें अस्तित्व मुळींच ओळखलें जात नाहीं. **त्या केवळ इतर विकत घेतलेल्या दासांप्रमाणें, पुरुषांच्या बंद्या आहेत.** राज्यकारणीं गोष्टींत आणि कायद्याच्या नजरेंत ह्या गोष्टीस अपवाद नाहीं. समाजांत एकाद दुसरा अपवाद सांपडेल, पण तोही फार विरळा.' ह्यारिएट् मार्टिनोनें अशा पुष्कळ गोष्टी आपल्या पुस्तकांत लिहून ठेविल्या आहेत, त्या सर्व फार महत्त्वाच्या असूनही, स्थल आणि समय ह्यांच्या अभावामुळें येथें उतरून घेतां येत नाहींत. "त्या केवळ विकत घेतलेल्या दासांप्रमाणें पुरुषांच्या बंद्या आहेत," ह्या एका वाक्यांत पन्नास साठ वर्षांखालीं एतद्देशीय स्त्रियांची स्थिति किती शोचनीय आणि भयंकर होती हें चांगलें बिंबलें आहे. अशा स्थितींतून ज्यांनीं आपला उद्धार करून घेण्याचा प्रयत्न केला त्यांचें धैर्य, श्रमसहिष्णुता, आणि दीर्घोद्योग ह्यांचें वर्णन करायाला एकादी सरस्वतीच पृथ्वीवर अवतरली पाहिजे; माझ्यासारख्या अल्पमति मनुष्याच्यानें त्याचें यथार्थ वर्णन करवणार नाहीं. आजपर्यंत परोपकारी दयाळू लोकांनीं मोठालीं संकटें सोसून, जीं (दासांचें दासमोचन, मद्य-

पाननिषेधकमताचा प्रसार इत्यादि ) मोठालीं कृत्यें केलीं, त्या सर्वांपेक्षां हें स्त्रियांच्या उद्धाराचें कृत्य फारच कठिण होतें. कारण, दासांस गुरांप्रमाणें विकत घेऊन, मजुरी दिल्यावांचून त्यांकडून काम करविणें व त्यांच्या ऐहिक पारलौकिक उन्नतीस विघ्न आणणें, हें फार निंद्य आणि क्रूर कर्म आहे, ही गोष्ट उघड आहे. मद्यपानादिक व्यसनांनीं मनुष्याच्या शारीरिक व मानसिक-स्वास्थ्याची हानि होते, हेंही सर्वांस कळतें. ह्या गोष्टींपासून होणारीं अनिष्टें सर्वांस प्रत्यक्ष दिसण्याजोगीं आहेत; परंतु स्त्रियांच्या दास्यापासून उद्भवणारीं अनिष्टें सहसा ध्यानांत येत नाहीत. तीं अंतर्गूढ हृद्रोगांप्रमाणें वर न दिसतां, आंतल्या आंत मनुष्यजातीचें काळीज जाळून टाकीत आहेत. स्त्रिया दास्यांत नसून, त्यांची स्थिति जशी असावी तशीच आहे, असें बहुतकरून सर्वांस वाटतें. स्त्रियांवर कांहीं जुलूम होत नाहींत व त्यांची स्थिति आतां आहे, ह्याहून निराळी असूं नये, हा समज सर्वांच्या मनांत इतका दृढ होऊन गेला आहे कीं, याच्या वाईटपणाबद्दल नुसती कल्पना देखील कोणाला सुचणें असंभवनीय वाटतें. फार तर कशाला, पण स्वतः स्त्रिया देखील आपली स्थिति असावी तशीच आहे, असें समजतात. मागें अमेरिकेमध्यें आफ्रिकेंतील सिद्दी लोक दास्यांत होते, तेव्हां त्यांपैकीं पुष्कळांच्या मनाची स्थिति अशीच होती. आपण दास्यांत आहों, तरी ह्यांतच आपणांला सुख आहे; आपण सर्वांशीं हीनदीन आहों व आपण ज्याच्या आश्रयांत असूं तो आपल्यास मारो किंवा तारो, तरी त्याच्यावांचून आपल्यास गत्यंतर नाहीं. असा समज होऊन, त्यानें किती जरी आपला अपमान केला, तरी तो निमुटपणें सोसून घ्यावयाचा. ह्या प्रकारची स्थिति मनुष्यास प्राप्त होणें, म्हणजे त्याच्या दास्याची परमावधि झाली म्हणावयाची. ज्याच्या योगानें योग्य स्वाभिमान आणि स्वातंत्र्येच्छा ह्या परमेश्वरानें मनुष्य-

जातीला दिलेल्या दोन अमोलिक देणग्यांचा असा नाश होतो, तें दास्य किती वाईट आहे, ह्याचें नुसतें अनुमान देखील करवत नाहीं !

"कोणत्याही जातींतील किंवा धर्मांतील स्त्रियांच्या स्थितीवरून त्या जातीच्या महत्त्वाची व त्या धर्माच्या योग्यतेची परीक्षा करावी," असें पुष्कळ पाश्चात्य ज्ञानी विद्वानांचें मत आहे तें खरें आहे. स्त्रिया ह्या जात्या पुरुषांपेक्षां दुर्बल असून, स्वभावतः सहनशील असतात; त्यामुळें त्यांचे नैसर्गिक हक्क बळकावून त्यांस आपल्याला पाहिजे तशा स्थितींत ठेवणें, पुरुषांस अति सुलभ जातें, परंतु नीतिदृष्ट्या पाहिलें असतां अंगबळ हें खरें बळ नसून, आपला शेजारी दुर्बळ आहे म्हणूनच त्याचे हक्क बळकावणें, हेंही थोर स्वभावाचें लक्षण नव्हे. प्राचीन व अर्वाचीन काळच्या अर्धवट रानटी किंवा पुरत्या रानटी मनुष्यांतून बहुशः अंगबळाचेंच प्राधान्य असलेलें दिसून येतें. "बळी तो कान पिळी" हीच त्यांची नीति; आणि न्यायान्यायाचा विचार न करितां तिला अनुसरून ज्याच्या मणगटांत जोर असेल त्यानें एकाद्याचें राज्य बळकावलें, म्हणजे तोच राजा बनतो. प्राचीन काळीं शूर योद्ध्यांस देववत् मान देण्याची जी चाल होती आणि अजूनही आहे, तिचा उद्भव तरी ह्याच नीतींत झालेला आहे. ह्याच नीतीच्या उपासकांस शांतीपेक्षां युद्धाची गोडी ज्यास्ती असते. शस्त्राच्या व बाहुबलाच्या मदतीनें जो सिद्ध झाला, तोच सिद्धांत आणि तोच न्याय असें ते मानितात; परंतु कोणत्याही देशांत ज्ञानाची व सौजन्याची जसजशी उन्नति होते, तसतशी पाशवबळाची थोरवी कमी होत जाऊन, लोक मणगटाच्या जोरापेक्षां बुद्धिबळ श्रेष्ठ असें मानूं लागतात, व अरण्यपंडितांच्या लठ्ठ शास्त्रीन्यायापेक्षां शिष्टाचारसंमत, युक्तियुक्त गोष्टींस वरिष्ठ पद देतात. असे लोक, कोणी आपल्यापेक्षां कमकुवत आहेत म्हणूनच त्यांची मालमत्ता व हक्क बळकावून घेणें, यास न्याय म्हणत नाहींत. दुर्बलांचें रक्षण करणें, कोणी

आपला अपराध केल्यास त्याचें वाईट न करितां त्यास क्षमा करणें, अंगांत पुष्कळ बळ असलें तरी उद्धटपणानें न चालतां नम्रतेनें वागणें; ह्यास न्याय म्हणूं लागतात. ह्यावरून जसजसें ज्ञान वाढतें व लोकांची उन्नति होत जाते; तसतसें त्यांच्या अंगीं सौजन्य व सुनीति वाढत जाते, हें स्वाभाविक आहे. ह्याच कारणानें स्त्रिया जात्या दुर्बल म्हणून त्यांवर पाहिजे तसा अधिकार चालवावा, असा जो सांप्रदाय आहे तो रानटी असून, मनुष्य जसजसें सज्ञान होऊन सुधारत जातात, तसतसे ते स्त्रियांच्या शारीरिक दुर्बलतेकडे न पाहतां त्यांच्या गुणांस अधिकाधिक मान देऊन, त्यांस उच्च पदास चढवितात. इतर गोष्टींप्रमाणेंच स्त्रियांविषयींही त्यांचें निकृष्टमत बदलून, त्यांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते. ह्यास्तव एकाद्या देशांतील स्त्रियांच्या स्थितीवरून त्याच्या उन्नतीची परीक्षा सहज करितां येते.

इंग्लंडची आणि त्याच देशांतून इकडे आलेल्या अमेरिकन् लोकांची सामाजिक स्थिति सर्वोत्तम आहे; कारण त्यांच्या स्त्रियांस सर्वत्र बहुमान मिळतो व त्यांच्यांत स्त्रियांस व पुरुषांस समान जाणतात, असें एतद्देशीय लोकांचें म्हणणें आहे. आणि जे ख्रिस्तीधर्माचे अभिमानी आहेत, ते म्हणतात कीं, स्त्रियांस उत्तमत्व प्राप्त झालें हें ख्रिस्तीधर्मामुळें; कारण, इतर धर्मी लोकांमध्यें स्त्रियांस अगदींच मान मिळत नाहीं. एकाद्या जातीनें ख्रिस्ती धर्माचें ग्रहण केलें म्हणजे लागलीच त्यांतील स्त्रियांची उन्नति होते. ह्या दोन्हीं गोष्टींत बराच तथ्यांश आहे, तरी असत्याचा अंशही बराच आहे, असें विचाराअंतीं कळून येईल. ख्रिस्ती म्हणविणाऱ्या सगळ्या जातींच्या लोकांमध्यें स्त्रियांची स्थिति एकाच प्रकारची आहे असें नाहीं; रशियन्, इटालियन, ग्रीक्, फ्रेंच्, स्विस्, फिनिश्, इंग्लिश्, अमेरिकन् इत्यादि सर्व लोक ख्रिस्ती आहेत; परंतु त्या जातींच्या नायकांच्या स्थितींत

पुष्कळ अंतर आहे. आपण एकाद्या धर्माचे अनुयायी म्हणवून घेणें आणि त्या धर्माचें आचरण करणें ह्या दोन्ही गोष्टी अगदीं निराळ्या आहेत. ह्या देशांतील बहुतेक सर्व लोक आपल्यास ख्रिस्ती म्हणवून घेतात, परंतु ते सगळे ख्रिस्ताच्या उपदेशाप्रमाणें आचरण करीत नाहींत. ख्रिस्तानें ज्या धर्माचा उपदेश व ज्या चालींचा प्रसार केला, त्यांत त्यानें बायकांस एक व पुरुषांस दुसरा असा भेद मुळींच केला नाहीं; परंतु तो समदर्शीपणा इकडील सर्व लोकांस ग्राह्य नाहीं. स्त्रियांची योग्यता जाणण्यांत व त्यांस वागविण्यांत कोणी ख्रिस्ताचें, कोणी पौलसाचें, कोणी मोशेचें, आणि कोणी सैतानाचें मत आपल्यास ग्राह्य आहे, असें आचरून दाखवितात; परंतु ते सगळेच आपल्यास ख्रिस्तीमत ग्राह्य आहे असें म्हणून दाखवितात. स्वतः ख्रिस्ताचा, व त्यास अनुसरून चालणाऱ्या पौलसाचा ख्रिस्ती धर्म म्हणतो कीं, ख्रिस्तांत पुरुष आणि बायको असा भेद नाहीं, तर सर्व लोक परमेश्वराचीं लेंकरें आहेत; परंतु हल्लीं ह्या देशीं चालू असलेल्या बहुतेक मतांत, बायका पुरुषांपेक्षां अवर मानिल्या जातात. त्यांस धर्मासनावर चढून पुरुषांप्रमाणें उपदेश करण्याचा अधिकार व संस्कारादि धर्मकृत्यें करविण्याचा अधिकार नाहीं; त्यांचा विवाह होतांना "मी आपल्या भ्रताराची आज्ञा पालन करीन," अशी शपथ घ्यावी लागते; नवरा बायकोच्या शिरःस्थानीं आहे, असें धर्मोपदेशकां (पुरुषां) चें सांगणें आहे. ह्यास्तव आतां इंग्लंडांत आणि ह्या देशांत स्त्रियांस जें स्वातंत्र्य, जें उच्चपद आणि जी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे ती आमच्या धर्माच्या योगानें असें सर्वच ख्रिस्ती ह्मणविणाऱ्या लोकांचें म्हणणें आहे, तें खोटें आहे. ज्या धर्माच्या योगानें स्त्रियांस हें श्रेष्ठ पद मिळालें, त्याला ह्या निरनिराळ्या मताच्या लोकांनीं "आमचा" असें विशेषण न देतां "सद्धर्म" किंवा "ख्रिस्ताचा धर्म" (चालू असलेला ख्रिस्ती धर्म नव्हे) असें म्हटल्यास, अधिक शोभेल. चालू अ-

सलेला ख्रिस्ती धर्म हा वेळोवेळीं लोकमताच्या कलाप्रमाणें बदलत जातो. त्याला एकाद्या मेणाच्या गोळ्याप्रमाणें चापूनचोपून आणि मळून, लोकमताला आणि आपल्याला पसंत पडेल तशी त्याची आकृति करण्याची निरनिराळ्या मतांच्या धर्माचार्यांची पूर्वीपार चाल चालत आली आहे. ह्या भटांनीं ख्रिस्ती धर्माच्या किती निरनिराळ्या आकृति केल्या आणि त्याचे अर्थ कसकसे बदलले, हें एतद्देशीय दासांच्या आणि स्त्रियांच्या इतिहासांत चांगलें दिसून येतें.

सुमारें दोनशें वर्षांपूर्वी जो एक क्केकर् नांवाचा सांप्रदाय निघाला, त्यांतील लोकांमध्यें निदान धर्माच्या गोष्टींत तरी असा भेद केलेला नाहीं. त्यांच्या मतें बायका आणि पुरुष यांवर परमेश्वराची सारखीच ममता आहे. बायका असोत किंवा पुरुष असोत, ज्यांची जशी योग्यता असेल, त्या मानानें परमेश्वर त्यांच्या हृदयांत प्रेरणा करतो. म्हणूनच ज्यास ईश्वरी प्रेरणा झाली, त्यानें किंवा तिनें उपदेश करावा असें त्यांचें मत आहे; परंतु इतर गोष्टींत क्केकर् सुद्धां स्त्रिया पुरुषांपेक्षां कमी योग्यतेच्या आहेत, असें मानीत होते. इ० स० १८४० त लंडन शहरामध्यें "पृथ्वीची दास्यनिषेधक सभा" जमली, तेथें अमेरिकेहून लुक्रेशिया माट् आणि दुसऱ्या कित्येक प्रमुख स्त्रिया "अमेरिकन् दास्यनिषेधक सभेच्या" प्रतिनिधि होऊन गेल्या होत्या. त्या सभेंत पुष्कळ क्केकर मताचे लोक असून, कोणी जोसेफ् स्टर्ज् नांवाचा प्रसिद्ध क्केकर गृहस्थ अध्यक्षस्थानीं होता. तरी त्यानें अशा परोपकारी कृत्याच्या विचारार्थ जमलेल्या सभेंत, ज्या स्त्रियांनीं दास्य निषेधक सभेच्या चाकरींत तनमनधन समर्पून आपले प्राणसुद्धां धोक्यांत घातले, त्यांस प्रतिनिधि पद देण्याचें नाकारलें. ह्यास कारण काय, तर "ब्रिटिशांची चाल" म्हणून उत्तर मिळालें. परवां (मे. इ० स० १८८८त) न्यूयार्क शहरांत मेथडिस्ट् सांप्रदायाच्या आचार्यांची आणि गृहस्थांची सभा भरली होती.

पुष्कळ ठिकाणच्या मेथडिस्ट् मंडळ्यांनीं आपापले प्रतिनिधि ह्या महासभेस पाठविले होते; त्यांत पांच प्रसिद्ध स्त्रिया प्रतिनिधि होऊन आल्या होत्या. परंतु त्यांस ह्या सभेंत योग्य स्थळ मिळालें नाहीं. ह्याचें कारण त्या **बायका**, ह्यावांचून दुसरें कांहीं नाहीं. एथें एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे, ती अशी कीं, मेथडिस्ट् सांप्रदायी लोकांत दोन तृतीयांश बायका असून, त्यांच्याच जिवावर ह्या मंडळींतील बहुतेक सर्व आचार्यांचा चरितार्थ आणि मंडळीचीं धर्मकृत्यें चालत असतात. इतर सांप्रदायांच्या मंडळ्यांसही हीच गोष्ट लागू आहे. धर्म आणि परोपकाराचीं कृत्यें करावयाचीं झालीं, म्हणजे त्यांकरतां पैसा गोळा करण्याचें काम बहुतकरून बायकांच्याच अंगावर पडतें. त्या आपलें घरचें किंवा चरितार्थ चालविण्याकरितां धरलेलें इतर काम करून, मिळेल त्या वेळांत कापडें शिवून, कशीदा काढून, चमत्कारिक सुंदर वस्तु निर्माण करून, घरोघर जाऊन लोकांच्या मनधरण्या करून, असे करवतील तितके उपाय करून, दानधर्माकरितां आणि परोपकारार्थ पैसा आणि वस्तू यांचा संग्रह करून, कोट्यावधि रुपये जमा करतात. मग त्या पैशाचा विनियोग कसा व्हावा ह्याबद्दल मत द्यायाचें तें मात्र पुरुषानीं, आणि त्या धर्मकृत्यांच्या व्यवस्थेकरतां योजिलेल्या मंडळ्यांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष वगैरे सगळे पुरुष. चिटणीशी आणि दुसरीं चेंगट कंटाळवाणीं कामें करणाऱ्या सगळ्या बायका असायाच्या. मेथडिस्ट् मंडळीचा हा न्याय, ह्या एकुणिसाव्या शतकांतील सुधारणेच्या स्वच्छ सूर्यप्रकाशांत, किती सुरेख दिसतो पण! कंग्रिगेशनल् क्वेकर्, युनिटेरियन्, युनिवर्सलिस्ट्, आणि मेथडिस्ट् संप्रदायाची एक उन्नतिशील शाखा अशा कित्येक संप्रदायांवांचून इतर संप्रदायांच्या ख्रिस्ती मंडळ्यांतून बायकांना देवळांत उपदेश करण्याची मोकळीक नाहीं; कारण काय म्हणाल तर त्या **बायका**! पौलसानें करिंथकरांस लिहिलेल्या पत्रांत, एके ठिकाणीं "तुमच्या बायका मंडळींत मौन राखोत," असें लिहिलें आहे; म्हणून बायकांस—मग त्या

पाहिजे तशा शुद्ध असोत, विद्वान् असोत, वक्तृत्वसंपन्न आणि गुणवती असोत, पुरुष उपदेशकांपेक्षां शंभर पट उत्तम असोत, पण त्या बायका एवढाच त्यांचा दोष; ह्यामुळें त्यांना धर्मोपदेश करण्याची ईश्वरी प्रेरणा झाली, तरी—तुम्हीं तोंड झांकून चुप बसा, म्हणून पुरुष आज्ञा करितात.

एतद्देशीय स्त्रियांच्या सुदशेचा उदय होऊं लागून अद्यापि साठ वर्षें झालीं, नाहींत, पण इतक्या थोड्या अवकाशांत त्यांच्या उद्योगाचीं व दीर्घप्रयत्नाचीं पुष्कळ उत्कृष्ट फळें त्यांस मिळूं लागलीं आहेत. ह्यारिएट् मार्टिनोनें ज्या काळीं इकडील बायकांविषयीं असें लिहिलें कीं, "त्या केवळ इतर विकत घेतलेल्या दासांप्रमाणें पुरुषांच्या बंद्या आहेत. राजकारणी गोष्टींत आणि कायद्याच्या नजरेंत ह्या सिद्धांतास अपवाद नाहीं." तेव्हां सुद्धां एकाद दुसऱ्या बायकोनें आपल्या जातीचा अपमान झालेला पाहून, हा अन्याय आहे, असें अमेरिकन् समाजास कळविण्याचा प्रयत्न केला होता. शंभर वर्षांपूर्वी प्रसिद्ध राबर्ट् ली ह्यांच्या बहिणीनें वर्जिनिया संस्थानांत, आणि जान् आडम्स् ह्यांच्या पत्नीनें मासच्यूसेट्स् संस्थानांत सरकारी कामदारांस असें स्पष्ट सांगितलें कीं, स्त्रियांना राजकारणी गोष्टींत आपलें मत देण्याचा अधिकार नाहीं; तेव्हां आपण कर देणार नाहीं. परंतु तेव्हां त्या गोष्टींकडे फारसें कोणीं लक्ष्य दिलें नाहीं. पुढें १८३० त ह्या देशांत दासविरोधी मताचा प्रादुर्भाव होऊं लागला, तेव्हांपासून स्त्रियांच्या स्थितीची सुधारणा ह्या गोष्टीस चांगलें रूप येऊं लागलें. इ० स० १८३२त विलियम् लोइड् ग्यारिसन् ह्यानें प्रथम दास्य विरोधी मंडळी स्थापिली. त्यानें व वेंडेल् फिलिपस् व दुसऱ्या कित्येक मोठ्या प्रसिद्ध वक्त्यांनीं हबशी जातीच्या बायकापुरुषांस गुलाम करणें उचित नाहीं, ह्या विषयावर शेंकडों हजारों सभांमधून भाषणें केलीं. त्यांत त्यांनीं अफ्रिकन् लोकांच्या दास्यास विरुद्ध अशीं जीं प्रमाणें सांगितलीं, तींच स्त्रियांच्या दासस्थितीसही त-

र्शीच लागू होतीं. हें जाणून कांहीं शूर साहसी स्त्रियांनीं हवशी दासांबरोबर आपल्या जातीचाही कैवार घेऊन सभांतून भाषणें करायाचा क्रम चालविला.

इ०स० १८३२ हें वर्ष सोन्याचें वर्ष म्हटलें पाहिजे. त्यांत दासांच्या दास्यशृंखलेला मोठा धक्का बसून, ती तुटण्यास आरंभ झाला. त्याच प्रमाणें स्त्रियांच्या दास्याचें व नीच स्थितीचें आदिकारण जें अज्ञान, त्यालाही क्षयरोग लागला. त्याच सुवर्षांत ओहायो संस्थानांतील ओबर्लिन् गांवीं " ओबर्लिन् कॉलेज् " म्हणून एका मोठ्या विख्यात विद्यालयाची स्थापना झाली. त्या विद्यालयाच्या स्थापकांनीं काळा, गोरा, पिंवळा, इत्यादि कातडीचे रंग आणि स्त्रीपुरुष जाती ह्यांवरून वरिष्ठविद्याध्ययनाविषयीं मनुष्याची योग्यायोग्यता ठरवून तारतम्य न करतां, ज्या कोणास विद्या शिकण्याची हौस असेल, त्याला किंवा तिला ती उदारपणें शिकवावी असा नियम केला. एतद्देशीय स्त्रियांच्या सुदशेचा उदय होऊं लागून अद्याप फार वर्षे झालीं नाहींत, पण आतां दिवसेंदिवस त्यांच्या भाग्यसूर्यास अधिकाधिक तेज येऊं लागलें आहे. ह्यापुढें थोडक्याच वर्षांनीं त्यांस पुरुषांप्रमाणेंच सर्व हक्क मिळून, हें युनाइटेड् स्टेट्स्चें राष्ट्र पूर्ण लोकसत्ताक साम्राज्य होईल, अशीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. सामाजिक व राजकारणी गोष्टींत दिवसेंदिवस स्त्रियांचें पाऊल पुढें पुढें पडत चाललें आहे. गेल्या पन्नास साठ वर्षांत कोणकोणत्या गोष्टींत त्यांचें पाऊल पुढें पडलें व त्यापासून समाजास कसकसे फायदे झाले, आणि हल्लींची त्यांची स्थिति कशी आहे ह्याची माहिती, हा ह्या अध्यायाचा प्रतिपाद्य विषय आहे.

## विद्या.

उन्नतीचें आदिकारण विद्या. ही विद्या एतद्देशीय स्त्रियांस थोडी बहुत मिळूं लागून साठ वर्षें झालीं. मेरी वुल्सटन्क्राफ्ट ह्या इंग्लिश स्त्रीनें इं-

ग्लंडांतील स्त्रियांस विद्या मिळावी, असें प्रसिद्धपणें म्हणून दाखविल्यास नुक्तीं शंभर वर्षें होत आलीं आहेत. इ०स० १७८९ त ह्या बाईनें असें उघड म्हणून दाखविलें कीं, ह्या काळीं इंग्लंडांतील स्त्रियांच्या उन्नतीस जो मोठा अडथळा आहे, तो विद्याभाव होय. त्यांस विद्याध्ययन करण्याचा प्रतिबंध असणें उचित नाहीं. इ०स० १७९९ त ह्याना मोर् ह्या बाईनें बरेच ग्रंथ लिहून, स्त्रियांस विद्या मिळणें उचित आहे, असें आपलें मत प्रसिद्ध केलें. इ०स० १८०९ त सिडनी स्मिथ् ह्या गृहस्थानें स्त्रीशिक्षणास अनुकूल असें आपलें मत ग्रंथरूपानें लोकसमाजापुढें आणिलें. इ० स० १७८९ पासून १८०९ पर्यंत ही विशी पाश्चात्य स्त्रीशिक्षणाच्या इतिहासाची प्रस्तावना, म्हटल्यास चालेल. ह्या वीस वर्षांत कित्येक स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या हृदयांत स्त्रीशिक्षण चोहोंकडे चालू व्हावें, ह्या इच्छेचा अंकुर फुटून, त्याला दिवसेंदिवस बळकटी येऊं लागली.

इ०स० १८१९ ह्या सालांत एमा विलर्ड् ह्या अमेरिकन् बाईनें प्रथम आपल्या देशभगिनींस विद्याशिक्षण मिळवून देण्याचा प्रयत्न केला. ह्या वर्षी तिनें न्यूयार्क संस्थानाच्या कायदे कानू करणाऱ्या मंडळीस अर्ज धाडून, सदरील मंडळीनें स्त्रियांकरतां शाळा स्थापावी, म्हणून विनंति केली, ह्या मितीपासून अमेरिकन् स्त्रियांच्या वरिष्ठ शिक्षणाच्या इतिहासास आरंभ झाला, असें म्हणतां येईल. पण ह्या काळापासून स्त्रियांस वरिष्ठ शिक्षण मिळूं लागले नव्हतें. इ०स० १८३१ पर्यंत बहुतेक सर्व स्त्रीशिक्षणाचे पक्षपाती. 'स्त्रियांस साधारण शिक्षण मिळावें; वरिष्ठ शिक्षणापासून त्यांस फायदा होणार नाहीं इतकेंच नव्हे; तर त्याच्या योगानें स्त्रियांची स्वाभाविक नम्रता व सौंदर्य आणि समाजामध्यें त्यांची उपयोगिता जाऊन, त्या उद्धट, निष्काळजी आणि विचारशून्य होतील,' असेंच म्हणणारे होते. इ०स० १८३२ त ओहायो संस्थानच्या ओबर्लिन् विद्यालयांत स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीनें वरिष्ठ शि-

क्षण मिळण्याची सोय झाली. ओबर्लिन् विद्यालयाच्या स्थापकांनीं स्त्रियांच्या कमीं योग्यतेविषयींचे प्रचारांत असलेले रानटी समज झुगारून देऊन, जगास उत्तम कित्ता घालून दिला. मासचूसेट्स संस्थानची राजधानी बोस्टन् ही नगरी युनाइटेड् स्टेट्सचें प्राचीन विद्यापीठ, अशी तिची आख्या आहे. बोस्टन्चे विद्वान् म्हणजे सगळ्यांत उत्तम, उन्नतीच्या, लोकहिताच्या वगैरे कामीं त्यांचें पाऊल सगळ्यांपुढें असावयाचें, असा लोकांचा समज आहे. पण बोस्टन् शहरांत इ. स. १८७८ पर्यंत मुलींकरतां एक देखील वरिष्ठ शाळा स्थापिली नव्हती. अमेरिकेंतील सर्वोत्कृष्ट विश्वविद्यालयाचें मुकुटरत्न म्हणविणारें हार्वर्ड् विद्यालय ( केंब्रिज् मासचूसेटस् येथें ) पुरुषांकरितां स्थापित व उत्तम दशेस प्राप्त होऊन सवाशें वर्षें झाल्यावर, मासचूसेट्सच्या मुलींना सगळ्यांत निकृष्ट अशा शाळागृहांत प्रवेश करण्याची परवानगी मिळाली. ही गोष्ट ध्यानांत ठेवून एतद्देशीय स्त्रीशिक्षणाच्या ( अगदीं अर्वाचीन कालीं प्रारंभ झालेल्या ) इतिहासाचें विवेचन केलें, म्हणजे स्त्रियांनीं इतक्या थोडक्या काळांत विद्यागणांमध्यें केवढाले पराक्रम केले हें पाहून मन आश्चर्यानें थक्क होतें. आतां युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रीशिक्षणांत जी एवढी उन्नति झालेली आपल्या दृष्टीस पडते, ती म्हणजे अगदीं निर्विघ्नपणें झाली असें कोणी समजूं नये. स्त्रियांनीं एखादें नवीन पुस्तक वाचण्यास घेतलें, किंवा एखादी नवी विद्येची शाखा शिकण्याचा आपला मानस लोकांस कळविला कीं, लागलींच चोहोंकडे वर्त्तमानपत्रांतून, उपदेशकांच्या वेदींतून, व्याख्यानकर्त्यांच्या मुखश्रींतून, धर्मसभांच्या जाहीरनाम्यांतून, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या नाकाडोळ्यांतून आणि जिह्वाग्रावरून, शिव्यागाळी, निंदा, टीका, नाक मुरडणें, कटाक्षविक्षेप, इत्यादिकांचा भडिमार होत असे; आणि अद्यापि होत आहे. जिच्या अंगीं स्वाभाविक शुद्धता असून जिला सनातन सत्याचें पाठबळ आहे; अशाच गोष्टीला केवळ वर सांगितलेल्या वज्राश्मवृष्टीचा भ-

डिमार साहून, आजपर्यंत वांचून राहण्याची आशा होती. ह्या पन्नास वर्षांत सगळ्या प्रकारच्या लहान थोर धर्माचार्यांनीं, वैद्यांनीं, शास्त्रवेत्त्यांनीं, तत्त्वज्ञान्यांनीं, पुरुषशिक्षकांनीं, विद्यालयाध्यक्षांनीं वर्तमानकर्त्यांनीं व लोकमतप्रवर्तकांनीं, स्त्रीशिक्षण हें धर्मशास्त्र, शारीर, तत्त्वज्ञान, लोकरीति अर्थशास्त्र इत्यादिकांस अनुसरून आहे किंवा नाहीं; तें चालू झाल्यास राष्ट्राचें हित होईल किंवा अहित होईल; ह्या गोष्टींचा निरनिराळ्या तऱ्हेनें विचार करून, त्यास कसोटीस लावून पाहिलें. आतां त्यांस खऱ्याशीं टक्कर देणें कठिण वाटूं लागलें, म्हणून मोठ्या नाखुशीनें स्त्रियांस थोडें बहुत विद्याशिक्षण मिळाल्यास चिंता नाहीं, असें म्हणून टाकलें.

युनाइटेड् स्टेट्सच्या पश्चिम भागांत कालराडो नांवाचें संस्थान आहे; त्यांत ‘ राकी ’ नांवाच्या भरींव, शुद्ध दगडी, अचल पर्वतांच्या उंच रांगा अनंतकाळापासून अमेरिका भूमीवर पडून राहिल्या आहेत. ह्या पर्वतांच्या रांगा फोडून आरपार वाट खणून त्यांमधून जाणें, हें असंभवनीय दिसतें. एकाद्या लहानशा ओढ्यासारख्या नदीस पर्वत फोडण्याची शक्ति कोठून असणार! पण पाहा हें केवढें आश्चर्य आहे तें ? आर्क्यान्सस् नदी मुकाट्यानें राकी पर्वतांतून वाट काढून, जाण्यास निघाली. तिचा अचाट निश्चय पाहून, समुद्रास, सरोवरांस आणि सपाट भूमींतून वाहणाऱ्या नदनद्यांस सखेदाश्चर्य वाटलें असेल, आणि त्या गगनचुंबी राकी पाषाणराशीस तिची कींव आली असेल. लहानसहान पर्वतांनीं तिचें दुस्साहस पाहून, तिची निंदा व निर्भर्त्सना केली असेल. पण आर्क्यान्सस् नदीनें कोणाच्या बोलण्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. ती लहान बारीक दुर्बळ नदी होती, पण तिचा निश्चय पर्वतांससुद्धां आपल्या पुढून उचलून पलीकडे झुगारून देण्यास समर्थ होता. तिनें आपल्या दीर्घ प्रयत्नानें व निश्चयबळानें राकी पर्वतास सुद्धां हरविलें. त्या अभेद्य अखंड पाषाणराशीशीं टक्कर मारून चिमुकल्या

आक्यौन्सस्नें राकी पर्वतांची रांग आरपार फोडून आपल्यास पाहिजे तशी वाट करून घेतली! शाबास आक्यौन्सस्ची. आणि शाबास अमेरिकन् स्त्रियांची. त्यांनीं ह्या लहानशा नदीप्रमाणें आपण दुर्बल असून, शस्त्रास्त्रांचें, पैशाचें, लोकमताचें, किंवा धर्मसंप्रदायांचें पाठबळ आपल्यास नसतांही, केवळ दीर्घप्रयत्नाच्या व निश्चयाच्या बळानें, राकी पर्वतांहून शंभरपट थोरलाल्या कठिण, अलंघ्य, अभेद्य अशा हजारों विघ्नांशीं टक्कर मारून, त्यांच्या आरपार बोगदे पाडून, आपल्यास पाहिजे तशी वाट काढून घेतली; मी आणखी एकवार म्हणतें, शाबास अमेरिकन स्त्रियांची!

पंचवीस तर काय, पण दहा वर्षांमागें सर्वतोमुखीं ऐकूं येणाऱ्या व त्या काळीं सर्वसंमत असलेल्या स्त्रीशिक्षणविरोधी वादांस, आतां बरीच उतरती कळा येऊं लागली आहे. विद्याशिक्षण मिळाल्यावर स्त्रिया उद्धट होतील; गृहकृत्याची व मुलांबाळांची व्यवस्था करण्यांत हयगय करतील; मग त्यांस स्वैंपाक करितां येणार नाहीं; उत्तम विद्या शिकून विद्यालयांच्या परीक्षा उतरून, आरोग्य घेऊन अध्ययनसमुद्रांतून पार पडण्यास पुरेल इतकें शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक बळ त्यांच्या अंगीं नाहीं; त्या विद्यासंपन्न होऊन रोजगार धंदे करूं लागल्यास, पुरुषांस घरांत बसून राहावें लागेल; पुरुषांचे रोजगारधंदे बुडतील; जगांत सर्वत्र महाप्रलय होईल; इत्यादि आक्षेप आतां मरूं लागून, त्यांचीं प्रेतें खोल थडग्यांत पुरलीं जात आहेत. सदरील आक्षेपांपैकीं एखाददुसऱ्याचें भूत मधून मधून लोकसमाजापुढें येऊन, भितऱ्या माणसांस भेदरून टाकतें; पण त्याच्या अंगीं अस्थि, मज्जा, मेंदु आणि जीवित यांचा अत्यंताभाव असल्यामुळें, तें लवकरच शून्यांत मिसळून अदृश्य होतें!

हल्लीं ( १८८८ त ) युनाइटेड् स्टेट्स्मध्यें स्त्रियांस वरिष्ठ व साधारण शिक्षण मिळण्याच्या ज्या सोई आहेत, त्यांत विद्यालयें ही मुख्य व उत्तम

प्रतीची सोय असून, ज्ञानवर्धक सभा, नियमित व्याख्यानें, पत्रव्यवहाराच्या द्वारें शिक्षण देणाऱ्या मंडळ्या, आणि कांहींक विश्वविद्यालयांतून नेमलेल्या परीक्षा, ह्या चार दुय्यम प्रतीच्या सोई आहेत. इ० स० १८८६ त ज्या विद्यालयांतून स्त्रियांस वरिष्ठ व उपयोगी शिक्षण मिळत होतें त्यांचा तपशील येणेंप्रमाणें:—

| | |
|---|---|
| केवळ स्त्रियांकरतांच स्थापलेलीं वरिष्ठ विद्यालयें (कालेजें) | २६६ |
| स्त्रियांस आणि पुरुषांस बरोबरीनें जेथें एकाच प्रकारचें वरिष्ठ शिक्षण मिळतें, असलीं वरिष्ठ विद्यालयें. ... ... ... ... | २०७ |
| पुरुषांकरतां स्थापलेलीं पण जेथें स्त्रियांस अध्ययन करतां येतें, अशीं यंत्रशास्त्रीय आणि कृषिविद्यालयें. ... ... ... ... | १७ |
| शास्त्रीय विद्यालयें. ... ... ... ... ... ... | ३ |
| वैद्यविद्यालयें. ... ... ... ... ... ... ... | ३६ |
| एकंदर विद्यालयें. ... ... ... ... ... ... | ५२९ |
| पैकीं केवळ स्त्रियांकरतां स्थापिलेल्या विद्यालयांतून शिकत असलेल्या विद्यार्थिणी. ... ... ... ... ... ... | २७१४३ |
| पुरुषांबरोबर शिकत असलेल्या विद्यार्थिणी. ... ... | ८८३३ |
| या दोन्ही मिळून वरिष्ठ विद्या आणि शास्त्रीयज्ञान संपादित असलेल्या विद्यार्थिणी.... ... ... ... ... ... | ३५९७६ |

ह्याशिवाय मध्यम प्रतीचें शिक्षण जेथें मिळतें, अशा बहुतेक राष्ट्रीय पाठशाळांतून मुलींस विद्या शिकतां येते. ह्यांपैकीं, राष्ट्रीय शिक्षक-

| | |
|---|---|
| विद्यालयें. ... ... ... ... ... ... ... | ११७ |
| स्वतंत्र (लोक स्थापित) शिक्षकविद्यालयें. ... ... ... | ३६ |

ह्यांतून शिकणाऱ्या विद्यार्थिणी, एकंदर २७,१८५ आहेत.

प्राथमिक आणि साधारण प्रतीच्या सार्वजनिक शाळा आणि बहुतेक

सगळीं राष्ट्रीयहाइस्कुलें, यांतून मुलांस आणि मुलींस बरोबरीनें आणि एकाच प्रकारचें शिक्षण मिळतें. सत्तर वर्षांपूर्वी मुलींकरितां प्राथमिक शि-

१ इ. स. १८१८ ह्या सालांत युनाइटेड् स्टेट्स्मध्यें मुलांप्रमाणेंच मुलींकरतां प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापन झाल्या. तेव्हांपासून आज सुमारें सत्तर वर्षांमध्यें एतद्देशीय स्त्रियांचें पाउल शिक्षणांत पुढें पडत जाऊन, आतां सहस्रावधि उत्तम विद्याबुद्धिसंपन्न स्त्रिया ह्या देशांत रत्नाप्रमाणें आपल्या गुणांनीं चकाकत आहेत; परंतु एवढ्यानें इकडे सर्वच स्त्रियांस ( सर्व ) पुरुषांप्रमाणें विद्याशिकण्याच्या सोई आहेत, आणि पुरुषांकरितां निर्मिलेल्या विद्यागृहांस वगैरे जितका उदार लोकाश्रय मिळतो, तितका तो स्त्रियांच्या विद्यालयांसही मिळतो, असें कोणी समजूं नये.

इ. स. १८८६ मध्यें अस्तित्वांत असलेल्या पुरुषांच्या वरिष्ठ विद्यालयांचा तपशील येणेंप्रमाणें.

| | |
|---|---|
| विश्वविद्यालयें आणि वरिष्ठ विद्यालयें मिळून— ... ... | ३४६ |
| शास्त्रीय विद्यालयें. ... ... ... ... ... ... | ९० |
| धर्मशास्त्रीय विद्यालयें ( ब्रह्मविद्यागृहें )— ... ... ... | १४२ |
| कायद्याच्या शाळा. ... ... ... ... ... ... | ४९ |
| वैद्यक, दंतवैद्यक, औषधक्रिया इ. शिकविण्याचीं विद्यालयें— ... | १७५ |
| एकंदर. ... ... ... ... ... ... ... | ८०२ |
| ह्यांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या. | ७८१८५ |

पुरुषांचीं शाळागृहें, त्यांची जमीन, शाळांतून लागणारें साहित्य इत्यादिकांची किंमत— ६,२३,५६,६३८ डालर, ह्मणजे १८,७०,६९,९१४ रुपये. असून, ह्या विद्यालयांच्या निर्वाहाकरितां. व्याजीं वगैरे लावलेला पैसा ५,७,७८२,३०३ डालर ह्म० १७,३३,४६,९०९ रुपयांइतका आहे.

वार्षिक उत्पन्न ३,२७१,९९१ डालर ह्म० ९,८१५,९७३ रुपये.

क्षणाच्या शाळा स्थापिल्या नव्हत्या, पण पुरुषांस तर विद्येचीं चाऱ्ही द्वारें मोकळीं होतीं. पुरुषांस प्राथमिक शाळाच केवळ नव्हत, पण वरिष्ठविद्यालयें, विश्वविद्यालयें, आणि शास्त्रीयपाठशाळा, इत्यादिकांमधून उत्तम विद्या आणि उद्योगधंदे शिकण्याची सोय होती. स्त्रीशिक्षणास लोकमताचा विरोध व दुसरे पुष्कळ अडथळे असूनही आजमितीस युनाइटेड् स्टेट्स्‌च्या स्त्रिया शिक्षणांत पुरुषांची बरोबरी करूं पाहत आहेत. ही कांहीं थोड्याथोडक्या आश्चर्याची गोष्ट नव्हे. इ० स० १८८० च्या खानेसुमारीवरून असें कळतें कीं, त्या सालीं युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें निग्रोजात शिवाय करून सर्व गोऱ्या अमेरिकन् पुरुषांत शेंकडा आठजण निरक्षर होते; आणि गोऱ्या वर्णाच्या बायकांपैकीं दर शेंकडा अकराजणींस लिहितां वाचतां येत नव्हतें. ह्यावरून साधारण शिक्षणांत स्त्रिया पुरुषांपेक्षां फारशा मागें नाहींत, असें सिद्ध होतें.

---

ह्या अंकाशीं स्त्रियांच्या शिक्षणाकरितां खर्ची घातलेल्या पैशाची तुलना करून पाहिली, ह्मणजे ह्या दोहोंमध्यें केवढें अंतर आहे, तें दिसून येईल.

ज्यांमध्यें स्त्रियांस वरिष्ठ विद्याशिक्षण मिळतें अशीं विद्यालयें एकंदर ५२९ आहेत. त्यांच्या इमारती, जमीनी, शाळोपयोगी साहित्यें वगैरेची किंमत ९६,३५,२८२ डालर (२,८९,०५,८४६ रुपये असून) त्या विद्यालयांचा खर्च चालविण्यास व्याजीं लावलेला पैसा व स्थावर संपत्तीची वगैरेची किंमत मिळून २३,७६,६१९ डालर ह्म० ७१,२९,८५७ रुपयांइतकें आहे. आणि १,३६,८०१ डालर ह्म० ४,१०,४०३ रुपये वार्षिक उत्पन्न आहे.

इ. स. १८८६त युनाइटेड् स्टेटस्‌च्या स्थानीय, संस्थानीय आणि राष्ट्रीय सरकारानें पुरुषांच्या वरिष्ठ शिक्षणास मदत देण्याकरतां १६,९०,२७५ डालर ह्मणजे ५०,७०,८२५ रुपये दिले; पण बायकांच्या वरिष्ठ शिक्षणाच्या उत्तेजनार्थ एक फुटकी कौडी सुद्धां दिली नाहीं!

इ० स० १८२१ त स्थापलेल्या ट्रोय् सेमिनेरी नांवाच्या मध्यमप्रतीच्या स्त्रीविद्यालयाच्या मदतीकरतां, थोडाबहुत पैसा द्यावा, म्हणून मिसेस् एमा विलर्ड् नांवाच्या थोर मनाच्या बाईनें न्यूयार्कच्या संस्थानिक सरकारापाशीं मागणी केली; परंतु त्या सरकारानें त्या सत्कृत्याकरतां पैसा देण्याचें नाकारलें. तेव्हां विलर्ड बाईनें एक खेदसूचक निबंध लिहिला, त्यांत एके ठिकाणीं तिणें म्हटलें आहे कीं, "ह्या ( स्त्रीशिक्षणाच्या ) कार्यासाठीं मला ( अग्निकुंडांत पडून ) मरण्याचा सुप्रसंग आला असता, तर मी त्या चितेस आशीर्वाद दिला असता; आणि त्या जळत्या काष्ठांस आनंदानें आलिंगिलें असतें." ह्या विलर्ड् बाईसारख्या शेंकडों थोर मनाच्या, विद्योत्साही बायकांनीं, सरकार आणि लोकमत आपल्यास आश्रय देत नाहीं असें पाहून, 'ह्या कार्यांत आपण मेलों तरी बेहेत्तर, असल्या कृत्यांत मरणें हें अमरत्व आहे,' असें म्हणून, स्वजातीच्या उन्नतीच्या कामीं तनमनधन खर्च केलें. त्यांच्या दृढनिश्चयरूपी आर्क्यान्सस्नदीच्या प्रवाहानें राकी पर्वतासारखे अभेद्य आणि अलंघ्य महाविघ्नपाषाणराशी भेदून स्त्रीशिक्षणाचा मार्ग खुला आणि निरापद करून टाकला. हल्लीं ओबर्लिन् कालेज,* व्यासर् कालेज, मिशिगन् युनिवर्सिटी, * स्मिथ् कालेज्, वेल्स्ले कालेज, हार्वर्ड् अनेक्स्, इंग्हम् युनिवर्सिटी, ब्रिन्मार् कालेज आणि कोर्नेल् युनिवर्सिटी * वगैरे पुष्कळ विद्यालयांतून स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीचें अत्युत्तम विद्याशिक्षण मिळत आहे. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें स्त्रियांच्या शिक्षणाची एवढी उन्नति झाली आहे, ती कांहीं गोष्टीश्राद्ध, फुकट मनोरथ आणि कोरडे वाद करून, किंवा मऊ गाद्यांवर परांच्या तक्यांशीं टेंकून बसल्यानें झाली नाहीं. येथील विद्योत्साही स्त्रियांनीं व कांहीं उदार

---

ज्यांच्या नांवापुढें * अशी फुली आहे, त्या विद्यालयांतून स्त्रीपुरुषांस एकत्र शिक्षण मिळतें.

मनाच्या पुरुषांनीं, नाहीं नाहीं ते लोकापवाद ऐकून घेऊन, अपरंपार कष्ट सोसून आणि सतत परिश्रम करून, एतद्देशीय स्त्रियांस हा सोन्यासारखा काळ आणून दिला आहे.

मागें स्त्रियांना पुरुषांप्रमाणें विद्याभ्यास करतां येईल किंवा नाहीं, म्हणून पुष्कळांस फार काळजी पडली होती. इ० स० १८५८ त माथ्यू व्यासर् ह्या अमेरिकन् गृहस्थानें स्त्रियांकरतां "व्यासर् कालेज्" स्थापण्याचें मनांत आणून, स्काट्लंड् देशांतील एडिम्बरो येथील प्रसिद्ध लोकहितकर्त्ते विद्वान्, विलियम् चेंबर्स् यांजपाशीं सदरील विद्यालय स्थापण्याच्या कामीं सल्लामसलत मागितली. तेव्हां मिस्तर् चेम्बर्स्नीं मिस्तर् व्यासर् यांच्या मनोदयाबद्दल सखेदाश्चर्य मानून, अशी उत्तम सल्ला दिली कीं, 'आपण मुलींकरतां वरिष्ठविद्यालय स्थापण्याच्या भरीस पडूं नका. तसें कराल, तर तुम्हास खचीत लाजेनें मान खालीं घालावी लागून, तुमची फसगत होईल. स्त्रियांकरतां वरिष्ठविद्यालय स्थापण्याच्या बदली, तुम्ही अंधळ्या, बहिऱ्या, मुक्या लोकांकरतां शाळा, किंवा विक्षिप्त व वेड्या मनुष्यांकरतां एकाददुसरी धर्मशाळा स्थापाल, तर फार बरें होईल. आलीकडे मिस्तर् चेंवर्स्सारख्या संशयी विद्वानांची संख्या बरीच कमी होत चालली आहे. मिशिगन् युनिवर्सिटींत स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीनें फार कडक व अत्युत्तम प्रतीचें विद्याशिक्षण मिळतें, ही वार्त्ता ऐकून ह्या योजनेनें नुकसान होतें किंवा फायदा होतो, पुरुषांबरोबर त्यांच्या बरोबरीचें शिक्षण घेणें बायकांच्या प्रकृतीस मानवतें किंवा नाहीं, आणि पुरुषांइतकें गहन शिक्षण बायकांच्या बुद्धीस गम्य आहे कीं नाहीं, ह्या गोष्टींची स्वतः परीक्षा करून खोल तपास करून पाहाण्याकरतां, यूरोपाच्या निरनिराळ्या भागांतून आणि दक्षिण अमेरिकेंतून पुष्कळ मंडळ्यांनीं आपले दूत युनाइटेड् स्टेट्स्मध्यें पाठवून, ह्याविषयीं आपली खात्री करून घेतली. आतां

ज्यांनीं ह्या गोष्टीचा खोल विचार करून पाहिला आहे, अशा बहुदर्शी स्त्री-पुरुषांच्या मनांत स्त्रीशिक्षणाच्या आणि स्त्रियांच्या वरिष्ठविद्याभ्यासाच्या हितावहतेविषयीं अगदीं संशय राहिलेला नाहीं, स्त्रीशिक्षणापासून युनाइटेड् स्टेट्सला काय काय फायदे होत आहेत, व समाजाची केवढी उन्नति होत आहे ह्याचा विचार पुढें केलेला आहे. हा भाग पुरा करण्यापूर्वी चाळीस वर्षांमागें स्त्रियांच्या विद्याशिक्षणाविषयीं लोकमत काय होतें आणि हल्लीं त्यांत केवढा फरक पडला आहे हें दाखविण्यास एथें दोन वाक्यें उतरून घेतें. इ. स. १८५० त लोकमतप्रवर्त्तक पुढारी पुरुष म्हणाले कीं:—

“ स्त्रीशिक्षणाला कधीं वरिष्ठविद्यावत्तेचें रूप येतां कामा नये. केवळ दांडग्या अस्वाभाविक प्रकृतीच्या बायकाच विद्वत्ता मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेला आपल्या हृदयांत जागा देतील. परंतु त्यांणीं पाहिजे तितके प्रयत्न केले तरी त्यांपासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं; कारण स्त्रियांस पुरुषांइतकी मानसिक शक्ति ( बुद्धि ) नाहीं, हें सर्वांस माहित आहेच.”

इ. स. १८८० तील लोकमतप्रवर्तक म्हणतात:— “ ह्यापूर्वी ज्या विद्यालयांतून केवळ पुरुषांसच शिक्षण मिळत असे, तेथें आतां स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीनें विद्या शिकण्याची सोय होत आहे, ह्यावरून आमच्या समाजाच्या भावि स्थितीचें दिग्दर्शन होतें. स्त्रिया ह्या केवळ बाहुल्यांसारख्या अचेतन व पुरुष नाचवितील तशा नाचणाऱ्या नसून, त्यांस आपलें हिताहित कशानें होईल हें समजण्याची शक्ति आहे. आपल्याला काय पाहिजे हें त्यांचें त्यांनींच सांगण्याची मोकळिक स्त्रियांस असावी, हें आमच्या चालीस अनुसरूनच आहे.”

पन्नास वर्षांपूर्वी युनाइटेड् स्टेट्समध्ये स्त्रियांकरितां स्थापन केलेल्या अशा चार पांचसुद्धां वरिष्ठ पाठशाळा अस्तित्वांत आल्या नव्हत्या. हल्लीं जेथें पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांस विद्याध्ययन करण्याची परवानगी नाहीं,

अशीं उत्कृष्ट वरिष्ठविद्यालयें आणि विश्वविद्यालयें सगळ्या देशांत चार पांच तरी असतील किंवा नसतील, ह्याचा संशयच आहे. 'स्त्रीशिक्षण हें फार भयंकर व अनर्थावह आहे; त्यापासून समाजाची हानि होईल; स्त्रिया अस्वाभाविक व उद्धट होतील; मग गृहसुख पृथ्वींतून नाहींसें होईल;' अशा वेड्या समजुतीनें ज्या काळीं सर्वांच्या मनावर एकाधिपत्य स्थापिलें होतें, तेव्हां कांहीं दीर्घदर्शी निष्पक्षपाती सुज्ञ स्त्रीपुरुषांनीं लोकमताच्या महानदीप्रवाहांत स्वमताची लहानशी होडी टाकून, ती त्या प्रवाहाच्या उलट दिशेस चालविण्याचें महासाहस करून म्हटलें कीं,— " मिसेस् ( मेरी ) समर्विल् आणि मिसेस् ( इलिजबेथ् ब्यारट् ) ब्राउनिंग् ज्या काळांत उत्पन्न झाल्या आहेत, त्या काळीं अस्तित्वांत आलेल्या मनुष्यसमाजांतील लोकांना स्त्रियांस उत्कृष्ट विद्या संपादण्याची शक्ति नाहीं, असें म्हणणें बरेंच कठिण जाईल. आमच्या वरिष्ठविद्यालयांतून तरुण पुरुषांना जसें उदार, उत्तेजक आणि चोख शिक्षण मिळतें, तसें तें स्त्रियांसही मिळण्याची सोय झाल्यास त्यापासून लोकसमाजाला मोठाच फायदा होईल."

आलीकडे स्त्रियांस उत्कृष्ट विद्या संपादन करण्याचे पुष्कळ मार्ग खुले झाल्यापासून, सदरील भाकिताचा खरेपणा लोकांच्या प्रत्ययास येत आहे. स्त्रियांची बुद्धिशक्ति पुरुषांच्या बरोबरीची नाहीं, असें म्हणण्याचें धाष्टर्य अर्धपढिक किंवा अनुभवशून्य मनुष्यांवांचून दुसऱ्या कोणाच्यानें करवत नाहीं. अमेरिकेंतील सर्वोत्तम विश्वविद्यालयांपैकीं कलंबिया व जान्स् हाप्किन्स् ह्या दोन विश्वविद्यालयांनीं, जुन्या चालीच्या सीमा वलांडून, स्त्रियांस आपल्या दाराचा उंबरठा चढून आंत येऊं दिल्या. त्या विश्वविद्या-

१ मिशिगन् विश्वविद्यालयाचे प्रसिद्ध विद्वान् अध्यक्ष प्रेसिडेंट् जेम्स्, बी. एंजल् यांणीं पुष्कळ वर्षांमागें वर सांगितल्याप्रमाणें आपलें मत लोकसमाजापुढें आणलें होतें.

लयांनीं उदारपणें म्हणा किंवा निरुपायास्तव म्हणा—दोन उत्तम परीक्षोत्तीर्ण विदुषींस आपल्या भांडारांतलि सर्वोत्तम पदव्या देऊन, कधीं 'न भूतो न भविष्यति,' असला अद्भुत चमत्कार करून दाखविला. जुन्या केंब्रिज्‌नें घालून दिलेला कित्ता वळविणाऱ्या मास्चूसेट्स संस्थानांतील नव्या केंब्रिज्च्या हार्वर्ड् युनिव्हर्सिटीनें आपल्या घरीं सरस्वतीदेवीच्या अक्षय्य स्थालींतून काढून पुरुषांपुढें नित्य ठेवण्यांत येणारीं, ज्ञानामृतफळें स्त्रियांस देण्याचें नाकारलें; तेव्हां कांहीं उद्योगी बायकांनीं स्वतंत्र शाळा स्थापून हार्वर्ड्च्या आंत नाहीं तर तिच्या दाराबाहेर बसूनच, पण त्याच अक्षय्य स्थालींतील अमृतफळें मिळविण्याचा प्रयत्न करून, तो सिद्धीसही नेला.

पूर्वेकडे मिशिगन् आणि कोर्नेल् ह्यांसारख्या सर्वोत्तम विद्यालयांत स्त्रियांचा प्रवेश झाला आहे; व वेल्स्ले, स्मिथ्, व्यासर्, ब्रिन्मार् ह्यासारखीं सदरील विश्वविद्यालयांशीं प्रतिस्पर्धा करणारीं स्त्रियांचीं विद्यालयें स्थापित झालीं व होत आहेत. पश्चिम संस्थानांतून बहुतेक सर्वच वरिष्ठशाळांत व विश्वविद्यालयांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबर अध्ययन करण्याची सोय

---

१ कांहीं वर्षांपूर्वी इंग्लंड्च्या केंब्रिज् युनिव्हर्सिटींत स्त्रियांना शिक्षण मिळण्याची मुळींच सोय नव्हती. आतां केंब्रिज् येथें स्त्रियांकरतां 'न्यूनूहम्' आणि 'गर्टन्' अशीं दोन विद्यालयें स्थापन झालेलीं आहेत; त्यांतून त्यांस उत्तम शिक्षण मिळतें. आतां स्त्रियांस केंब्रिज् युनिव्हर्सिटींत पुरुषांच्या बरोबरीनें अध्ययन करून परीक्षा देण्याची मात्र परवानगी आहे. त्या युनिव्हर्सिटीच्या चालकांचे अंगीं अद्यापि त्यांच्या पूर्वजांच्या रानटी स्वभावाचा थोडासा शेष उरला आहे. ते स्त्रियांस अध्ययन करून परीक्षा देण्याची परवानगी देतात, पण परीक्षोत्तीर्ण स्त्रियांना त्यांनीं वर्षानुगणति कष्ट करून मिळविलेल्या हक्काच्या पदव्या देण्याचें नाकारतात! सुधारलेल्या इंग्लिश्, 'तत्रापि केंब्रिज्च्या' विद्वानांचें औदार्य व शिष्टपण अप्रतिम आहे खरें!

आहे; म्हणून निराळीं विद्यालयें स्थापण्याची गरजच राहिली नाहीं. वरिष्ठ विद्याशिक्षणानें स्त्रियांच्या शरीरसंपत्तीची किंवा सौंदर्याची हानि झालेली कोठें दिसून येत नाहीं. लहान व मध्यम प्रतीच्या विद्यालयांची गोष्ट सांगायाला नकोच; पण कोर्नेल्, व्यासर्, वेल्सले, स्मिथ्, त्रिन्मार इत्यादि विद्यालयांतून हजारों तरुण स्त्रिया वरिष्ठविद्येचें अध्ययन करीत आहेत. तेथें जाऊन प्रत्येक ठिकाणीं कांहीं दिवस राहून, मी ह्या व इतर गोष्टींचा तपास केला; त्यावरून मला खात्रीपूर्वक समजलें कीं, वरिष्ठविद्याशिक्षण स्त्रियांस चांगलें मानवतें. त्यापासून त्यांच्या रूपलावण्याची हानि होत नाहीं. त्यांचा कोमल मर्यादशील स्वभाव बदलून, त्या अस्वाभाविक होत नाहींत. ह्या विद्यालयांतून पदव्या मिळवून गेलेल्या पुष्कळ स्त्रिया विवाहित होऊन, उत्तम रीतीनें संसार चालवीत आहेत. त्या शिक्षित झाल्या म्हणून मुलाबाळांचा, गृहकृत्याचा वगैरे अव्हेर करीत नाहींत. बायका शिक्षित असल्या कारणानें त्यांच्या नवऱ्यांस दुःखें भोगून वैताग घेण्याचा प्रसंग आला नसून, त्यांच्या संसाराची वाताहातही झाली नाहीं! सदरील विद्यालयांतून शिकून आलेल्या पुष्कळ स्त्रियांच्या घरीं जाऊन मी त्यांच्या घरादारांची व्यवस्था पाहिली, व त्यांच्या नवऱ्यांचा समाचार पुसून घेतला. तेव्हां त्यांच्या नवऱ्यांनीं स्त्रियांस उत्तम शिक्षण असावें असें वारंवार बोलून दाखविलें, हें पाहून मला समाधान वाटलें. दोन वर्षांपूर्वी मिस् आलिस् फ्रीमन् ही बाई वेल्स्ले कालेजाची अध्यक्ष होती. ती त्या पदावर काम करूं लागण्यापूर्वी वरिष्ठविद्यालयाच्या तर नाहींच, पण लहानशा शाळेच्या देखील अध्यक्ष बनून तेथें चांगली व्यवस्था ठेवणें, हें बायकांला कधींच साधावयाचें नाहीं, असा जगाचा समज होता. पण आलिस् फ्रीमन्‌नें सहाशें तरुण होतकरू विद्यार्थिणी ज्यांत वरिष्ठ विद्या शिकत होत्या, असल्या जंगी विद्यालयाचें अध्यक्षपद घेऊन आपलें काम फार

उत्तम रीतीनें चालवून जगास आश्चर्यचकित केलें. तिच्या विद्वत्तेला योग्य मान देऊन कलंबिया विश्वविद्यालयाच्या चालकांनीं ( तिची परीक्षा घेऊन ) आलिस् फ्रीमन्ला PH.D. ची पदवी दिली. (ही पदवी विश्वविद्यालयांच्या सगळ्या पदव्यांत श्रेष्ठ आहे. ) तिजविषयीं कोणा संशयात्म्यास अशी काळजी पडली होती कीं, " ह्या जंगी विद्यालयाच्या अध्यक्षिणीला विद्याध्ययनांत जन्म (तीस वर्षें ) घालवावा लागल्यामुळें, गृहकृत्य कसें करावें ह्याचें ज्ञान मुळींच नसेल; तिला कोठें नवरा मिळेल कीं नाहीं, याचा संशयच आहे. तिला एकाद्या विद्यालयाची व जंगी सभांची उत्तम व्यवस्था ठेवतां येते, विद्या शिकवितां येते, शास्त्रीयविषय घेऊन वादांत मोठ्या गजपंडितांशीं टक्कर मारतां येते, तें सगळें खरें; पण त्याचा उपयोग काय? ती बायको झाली तशी तिला नवऱ्याचा संसार चालवितां आला नाहीं, तर विद्याध्ययनाचें फळ काय झालें ? " पण बाबांनो, अंमळ दमाखालीं घ्या. आलिस्फ्रीमन्सारख्या विदुषीलासुद्धां नवरा मिळेल आणि मिळाला, तोही सामान्य विद्वान आहे असें नाहीं. आलिस्फ्रीमन् ही जंगी PH.D. आतां उत्तम रीतीनें संसार चालवीत आहे. तिला थोरल्या विद्यालयासंबंधी गोष्टींप्रमाणेंच लहानशा घरगुती प्रकरणांचीही माहिती आहे. तिला साहाशें विद्यार्थिणींच्या विद्यालयाप्रमांणेंच आपल्या घराचाही सांभाळ करतां येतो, ह्या गोष्टींत आतां तिळमात्र संशय नाहीं ! असो. आतां आमच्या पुरोभागी ( दोष शोधून काढणारा ) मित्राचा शेवट काय झाला म्हणून विचाराल तर, " संशयात्मा विनश्यति । नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ।।" इतकें म्हणून हा भाग पुरा करितें.

## रोजगार.

इ० स० १८२८ पासून १८८८ पर्यंत घडून आलेला अर्द्धशतकाचा

स्त्रीशिक्षणसंबंधी इतिहास फार चमत्कारिक, चित्तवेधक आणि बोधकारक, असा आहे. सुमारें साठ वर्षांखालीं मिसेस् एमा विलर्ड्नें स्त्रियांच्या शाळांस सरकाराकडून मदत मिळावी अशी विनंति करून, न्युयार्क् संस्थानाच्या कायदे करणाऱ्या मंडळीकडे एक अर्ज पाठविला होता, असें वर सांगितलें आहे. त्यांत विलर्ड् बाईनीं त्या काळच्या लोकांच्या समजाप्रमाणें, स्त्रियांस वरिष्ठशिक्षण देण्याची जरूर नाहीं, साधारण शिक्षण मात्र अवश्य असलें पाहिजे; असें स्पष्ट करून सांगितलें होतें. ही त्या बाईची बेतावाताची मागणी सुद्धां न्यूयार्कच्या विद्वान् कायदे करणारांस पसंत पडली नाहीं. त्यांणीं साधारण स्त्रीशिक्षणास देखील थोडेंसें उत्तेजन देण्याचें नाकारलें. एका महाविद्वान् राज्यकार्यधुरंधरानें तर पुढें उतरून घेतलेलीं "वाक्सें मुक्सांतून" काढून, आपली कीर्त्ति अजरामर करून ठेवली. ते गोमाजी म्हणाले:—"स्त्रियांस विद्या असणें हें फार भयंकर आहे. विद्या शिकल्याबरोबर त्या गृहकृत्यांचा अव्हेर करूं लागतील; म्हणून स्त्रीशिक्षण हें समाजास आणि राष्ट्रास मोठें अपायकारक आहे."

कांहींकांचें मत असें होतें कीं गणित विद्या आणि न्यायशास्त्राच्या अध्ययनानें स्त्रियांचे मेंदू बिघडून, त्या रोगी होतील. शास्त्रीय विषयांच्या अभ्यासानें धर्मावरून त्यांचा विश्वास उडून जाईल. ग्रीक् भाषा शिकल्या तर त्यांचें स्त्रीत्व नाहींसें होऊन, त्या पुरुषासारख्या दांडग्या होतील. कोणी म्हणाले,—'इतर सगळ्या गोष्टी कशाही असोत; पण स्त्रिया विद्वान् झाल्या म्हणजे पुरुषांचे सगळे रोजगार बुडतील. त्यांना घरांत बसून, तान्ह्या बाळांना मांडीवर घेऊन, "अंगाई" म्हणून डोलवीत किंवा स्वैंपाकपाणी करीत घरांत बसून राहावें लागेल. कारण कीं, शिक्षित बायकापुरुषांचे रोजगार धंदे बळकावून बसतील.' कोणी विचारी गृहस्थ म्हणाले—'छे हो! त्या आपले रोजगार बळकावतील, अशी भीति बाळगायाला नकोच. वि-

द्या शिकून शास्त्रीयज्ञान संपादून, तें उपयोगांत आणायाला लागणारी अक्कलच मुळीं स्त्रियांना नाहीं. डोकें असलें तर डोकेंदुखीची भीति. उत्तम विद्या शिकण्याला पुरेलसा मेंदू बायकांच्या मस्तकांत असेल तर त्या विद्वान् बनण्याचें भय बाळगायाचें. पण आधीं त्यांच्या डोक्यांत मेंदू यावा कोठून ! इतर बुद्धिवान् अनुभवी गृहस्थ म्हणाले;—'अहो बायकांना विद्या शिकण्याला वेळ तरी कोठून मिळेल ? आणि बरें, तो मिळेल असें घटकाभर धरून चाललें, तरी विद्या शिकल्यावर बायका तिचा काय उपयोग करणार ?'

ह्या सगळ्या शंका कितपत खऱ्या किंवा काल्पनिक होत्या, हें सांगत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. शंभर वर्षांपूर्वी युनाइटेड् स्टेट्स्मध्यें स्त्रियांना सरकारी शाळांतून शिक्षकिणींचें काम करतां येत नव्हतें; कारण शाळेंत दांडग्या मुलांना आज्ञेंत ठेऊन चांगलें वळण लावून देण्यापुरतें बळ स्त्रियांच्या अंगीं नाहीं, असें पुरुषांस वाटत होतें. पण इ० स० १७८९ त मासच्यूसेट्स्च्या कायदे करणाऱ्या पुरुषमंडळीनें–स्त्रियांस शाळांतून शिकवितां येतें कीं नाहीं ह्याची उगीच परीक्षा पाहण्याकरतां म्हणा किंवा कमी पगार देऊन काम उरकून नेण्याकरतां म्हणा, कसेंही असो,–एक न-

---

१ हल्लींचें युनाइटेड् स्टेट्स्चें स्त्रीशिक्षण पन्नास वर्षांपूर्वी कोणाच्या ध्यानीं मनींही आलें नसेल. गणित, न्याय, शास्त्रीयतत्वें, ग्रीक् इत्यादि शिकल्यानें बायका रोगी, खुळ्या किंवा दांडग्या होऊन, त्यांच्या स्त्रीस्वभावांत पालट पडून शिक्षित स्त्रियांमध्यें गृहप्रीतीचा आणि अपत्यप्रेमाचा वगैरे असंताभाव झालेला कोठें पाहाण्यांत किंवा ऐकण्यांत येत नाहीं, हें मागच्या भागांत सांगितलेंच आहे. स्त्रिया शिक्षित झाल्यानें आतां त्या शेंकडों रोजगार धंदे करूं लागल्या आहेत हें खरें, पण त्यामुळं पुरुषांचे रोजगार बुडाले नाहींत; उलट गेल्या पन्नास वर्षांत युनाइटेड् स्टेट्स्चे उद्योगधंदे शतपट अधिक वाढून भरभराटीस आले आहेत, हें " उद्योगधंदे " ह्या नांवाच्या अध्यायांत दर्शविलें आहे.

वीन कायदा करून बायकांना संस्थानिक सरकाराच्या सार्वजनिक शाळां-तून साधारण शिक्षण देतां यावें, असा नियम केला. त्या काळीं स्त्रियांना "क, ख, ग" आणि "एक, एक, एक," ह्या शिवाय दुसरें कांहीं शिकवितां येत नसे. कारण विद्वान्, विचारी, कनवाळू पुरुषांना, बायका फार शिकल्यानें त्यांची प्रकृतिविकृति बिघडेल, असें भय वाटून, त्यांनीं मोठ्या सावधगिरीनें एक "स्त्रियांचा अभ्यासक्रम" तयार केला होता. ह्या पठणक्रमाचा ज्यांनीं अभ्यास केला, त्यांस व्याकरणशुद्ध भाषेंत लहानसें पत्रसुद्धां लिहितां येत असेल किंवा नसेल, हें निश्चयें करून सांगतां येत नाहीं. मग त्यांनीं मुलांना वरिष्ठविद्या शिकण्यास तयार करणें, किंवा स्वतः वरिष्ठ शिक्षण देणें, हें तर लांबच राहिलें. पुढें कालक्रमेंकरून स्त्रियांनीं पर्वतप्रायविघ्नें व विरुद्ध-लोकमतरूपी उंच चीनी कोट आपल्या आड आला असतांही, त्याच्या भीतीनें हायहूय करून हातपाय गुंडाळून न बसतां, घरीं राहूनच आपलें ज्ञान वाढवून घेतलें. शिक्षकिणींची योग्यता, वजन आणि साधारण शिक्षण देण्यांत त्यांचा केवढा उपयोग आहे, हें लोकांस कळून येऊं लागलें तेव्हां, ह्या शिक्षकिणींस आपलें काम उत्तम रीतीनें करतां यावें, म्हणून त्यांस "स्त्रियांच्या पठणक्रमा"पेक्षां कांहींशी उंची प्रतीची विद्या मिळावी, असें सुज्ञजनांस वाटूं लागलें. पुढें स्त्रियांना वरिष्ठशिक्षण मिळूं लागल्यावरही, त्यांस सर्वत्र सर्वप्रकारच्या वरिष्ठविद्यालयांतील अध्यापकांच्या पदावर आरूढ होण्याचा मार्ग खुला झाला नव्हता पण मिशिगन् युनिवर्सिटीनें आपल्या सरस्वतीमंदिराचें सुवर्णद्वार उघडून, स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीनें सरस्वतीदेवीच्या सिंहासनाशीं बसून तिची आराधना करण्यास बोलावलें. तेव्हांपासून बायकांना आपल्या योग्यतेनुरूप शिक्षक, अध्यापक, विद्यालयाध्यक्ष, इत्यादि (पूर्वीं केवळ पुरुषांकरतां राखून ठेवलेल्या) पदांवर आरूढ होऊन, उत्तम रीतीनें काम करून, आपली कर्तृत्वशक्ति व बुद्धि-

शक्ति केवढी आहे, हें सप्रमाण सिद्ध करून देण्याची संधि सांपडूं लागली. आतां बायकांस शाळेची व्यवस्था ठेवतां आणि मुलांस चांगलें वळण लावून देतां येईल किंवा नाहीं, असा संशय कोणाच्या मनांत येत नाहीं. युनाइटेड् स्टेट्स्च्या स्थानिक, संस्थानिक आणि राष्ट्रीय ह्या सरकारत्रिकुटास स्त्रियांचें काम इतकें कांहीं पसंतीस आलें आहे कीं, त्यांणीं बहुतेक सगळ्या मुलांचें प्राथमिक व मध्यम शिक्षण स्त्रियांच्या हातीं सोंपून दिलें आहे. आतां शिक्षकिणी वरिष्ठशिक्षणही आपल्या हातीं घेऊं लागल्या आहेत. राष्ट्राच्या सार्वजनिक (म्ह० वरिष्ठ, मध्यम व खालच्या वर्गांतील शाळा आणि विश्वविद्यालयें ह्या ) विद्याशाळांतून एकंदर दोन लक्ष त्र्याहत्तर हजार शिक्षक विद्यादान करीत आहेत; ह्या शिक्षकांपैकीं एक लक्ष चौपन्न हजार तीनशें पंचाहत्तरजणी बायका आहेत. ह्याशिवाय पुष्कळ वरिष्ठ प्रतीच्या स्वतंत्र व सार्वजनिक शाळांतून स्त्रिया गणित, रसायन, वनस्पति, ज्योतिष, शारीर, दर्शनानुशासन, सिद्धपदार्थविज्ञान, इत्यादि गहन शास्त्रीय आणि तत्त्वज्ञानसंबंधी विषयांच्या अध्यापिका झाल्या असून, उत्तम रीतीनें आपलें काम करीत आहेत. कोणी विद्यालयांच्या अध्यक्ष, कोणी उपाध्यक्ष, कोणी सगळ्या शहरांतील शाळांच्या वरिष्ठ, कोणी वरिष्ठ-शिक्षकिणी, कोणी "डीन्" आणि कोणी नीत्युपदेशक झाल्या आहेत. कोणी राजनीति, तत्त्वज्ञान, इतिहास, व्यवहार, शास्त्रीय, इत्यादि गहन विषयांवर सुबोध्य ग्रंथ लिहीत आहेत. कोणी विदुषी केवल युनाइटेड् स्टेट्स् मध्येंच नव्हे, तर युरोपाच्या प्राचीन विद्यापीठांतूनही अध्ययन करून, तेथील विद्यादिग्गजांची शाबासकी मिळवीत आहेत. व्यासर् कालेजची ज्योतिषशास्त्राध्यापिका प्रोफेसर् मेरिया मिचेल् ह्या बाईनें क्यारलाइन् हर्शेल् ह्या विदुषीप्रमाणें ज्योतिषशास्त्रांत उत्तम प्रवीणता संपादून, नव्या नक्षत्रग्रहांचा शोध लावून, रशिया सरकारची शाबासकी व

१६

त्याजकडून उत्तम बक्षीस मिळविलें; आणि पाश्चात्य ज्योतिःशास्त्रज्ञ मंडळांत आपलें नांव अजरामर करून ठेवलें. प्रोफेसर् जेन्. एम्. ब्यांक्राफ्ट् हिणें "पार्लेमेंट्स् ऑफ् प्यारिस्" नामें फ्रान्स्च्या राजनीतीच्या वर्णनाचा ग्रंथ लिहिला आहे. तो ग्रंथ आज जान्स् हाप्किन्स्, कोर्नेल् इत्यादि विश्वविद्यालयांतील महापंडितांच्या मतें राजनीतिविषयक अत्युत्तम ग्रंथ ठरला आहे. मिशिगन् युनिवर्सिटीची प्रोफेसर् लुईजा रीड् स्टोवेल् ह्या प्रख्यात बाईनें सूक्ष्मदर्शनविद्येंत इतकी कांहीं प्रवीणता संपादिली आहे कीं, लंडन्च्या "रायल् माइक्रस्कोपिकल् सोसाइटी" नांवाच्या महासभेच्या सदस्यांनीं तिला आपल्या सभेची सदस्या केली. हल्लीं अमेरिकेंत जितक्या म्हणून प्रसिद्ध वजनदार शास्त्र्यांच्या सभा आहेत, त्यांतून विदुषी स्त्रियांस पुरुषविद्वानांच्या बरोबरीनें सदस्यपद मिळत आहे. साठ वर्षांखालीं न्यूयार्कच्या विद्वान्—पण कांहींशा अधू दृष्टीच्या—कायदे करणाऱ्या मंडळीस 'पुढील अर्ध्या शतकांत स्त्रिया विद्यांगणामध्यें येऊन एवढाले पराक्रम करतील; युनाइटेड् स्टेट्स्च्या लक्षावधि पुत्रांचें शिक्षण व त्यांस नीत्युपदेश देण्याचें काम अर्धें अधिक स्त्रियांच्या हातीं सोंपवून देण्यांत येईल;' इत्यादि गोष्टींचें भाकित करून सांगितलें असतें तर, तें केवल न्यूयार्कच्या राज्यकार्यधुरंधरांसच नव्हे; तर सर्व जगास केवळ शशविषाणवत् असंभवनीय आहे, असें वाटलें असतें. शिक्षित स्त्रियांनीं विद्याखात्यांत आल्यापासून युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय शिक्षणाला किती उन्नत दशेस आणलें, ह्याचें वर्णन आणि प्रशंसा केली तितकी थोडी होणार आहे. आज ज्या किंडर् गार्टन् ऊर्फ बालोद्यानशिक्षणपद्धतीच्या योगानें हजारों किंबहुना लक्षावधि मुलांचें हित होत आहे, व ज्याच्या योगानें कोंवळ्या लेंकरांच्या पाठींवर, हातांवर आणि तोंडांवर मार बसण्याचें नाहींसें झालें, तें युनाइटेड् स्टेट्स्मध्यें महत्प्रयासानें चालू करण्याचें यश स्त्रियांनींच घेतलें. इलिझबेथ् पीबडीनें

व तिच्या शिष्यांनीं किंडर् गार्टन् पद्धति हजारों स्त्रियांना शिकविली, आणि मिसेस् षो, व मिसेस् टाम्सन् ह्यांसारख्या धनिक स्त्रियांनीं इलिझबेथ् पीबडी-सारख्या शिक्षक बायांस धनाचें साहाय्य देऊन, किंडर् गार्टन् शिक्षणपद्धति प्रचारांत आणण्यास योग्य साधनें मिळवून दिलीं. बोस्टन्चें स्थानिक सरकार आपल्या सार्वजनिक विद्याखात्यांत किंडर् गार्टन् शिक्षणाला जागा आणि खर्च हीं देईना; तेव्हां बोस्टन्ची महापरोपकारी धनिक बाई मिसेस् क्विन्सी षो. इणें आपल्या शहरांत किंडर् गार्टन् शिक्षण प्रचारांत आणण्यास मदत देण्याचा निश्चय केला. तिणें बोस्टन् मध्यें पुष्कळ किंडर् गार्टन् शाळा धर्मार्थ स्थापून, त्यांच्या उन्नतीकरतां दरवर्षी छत्तीस हजार डालर (म्हणजे सुमारें एक लक्ष आठ हजार रुपये) खर्च करण्याचा क्रम आज बारा वर्षें सतत चालू ठेवला. आतां ह्या शिक्षणक्रमाची योग्यता केवढी आहे, ती सरकारास कळून, त्याणें किंडरगार्टन्पद्धति सार्वजनिक शाळांत चालू करण्याची परवानगी दिली आहे. न्यूयार्कची प्रसिद्ध परोपकारिणी मिसेस् इलिझबेथ् टाम्सन् ही दरवर्षी दीड दोन लक्ष रुपये बालशिक्षणाच्या व उद्योगशिक्षणाच्या कामीं खर्च करिते. तिचें उत्पन्न बहुतेक सगळें मुलांच्या शिक्षणाकडे खर्च होत असून, ती स्वत: अगदीं सन्यासिनीसारख्या साध्या रीतीनें कालक्षेप करिते. इलिझबेथ् पीबडी, मिसेस् षो, मिसेस् टाम्सन् इत्यादि शिक्षित बायांनीं आपलें तन मन धन ह्या सत्कर्मीं खर्च केलें म्हणूनच युनाइटेड् स्टेट्स्चें विद्याखातें इतकें उन्नत दशेस आलें आहे.

युनाइटेड् स्टेट्स्च्या शिक्षित स्त्रिया शिक्षकिणीचें काम दोन प्रकारें करीत आहेत. त्यांतील एक प्रकार विद्याशाळांतून शिकविणें, व दुसरा प्रकार वर्त्तमानपत्रांच्या द्वारें लोकसमाजाला नीतिशिक्षण देऊन, त्यांची बुद्धि सुधारणें, हा होय. सुमारें पंचवीस वर्षांपासून स्त्रियांनीं वर्त्तमानपत्रकाराचा धंदा पतकरला आहे. त्याच्या पूर्वीं वर्तमानपत्रांत ज्याला जें वाटेल त्यानें

तें लिहावें, अशी बहुतेक चाल होती. वर्तमानपत्रांतून अश्लील भाषा घालण्यास फारसा प्रतिबंध नव्हता. हें शिक्षित स्त्रियांस आवडलें नाहीं; कारण तीं पत्रें लहान मुलांच्या आणि मुलींच्याही वाचण्यांत येत असत, यास्तव त्यांणीं हळूहळू वर्तमानपत्रांमधील एकेक भाग आपल्याकडे घेण्याचें आरंभिलें. ही चाल अद्यापि चालू असून, तिजपासून पुष्कळ हित होत आहे. ज्या ज्या वर्तमानपत्रांतून स्त्रियांचे भाग असतात, त्यांत स्त्रियांच्या विरुद्ध अन्याय्यगोष्टी, अथवा नीतिविरुद्ध लेख न यावे, म्हणून फार काळजी घेतली जाते. या शिवाय त्या पत्रांना स्त्रियांची गोड भाषा व लेखनसरणी, यांच्यामुळें फार मनोरंजकत्व प्राप्त होतें. 'न्यूयार्क हेरल्ड्' 'फिलाडेल्फियालेजर्' 'बोस्टन् ट्रान्स्क्रिप्ट्' 'बोस्टन् हेरल्ड्' आणि 'शिकागो इंटर् ओशन्' अशा प्रकारच्या जंगी वर्तमानपत्रांना स्त्रीलेखकांचें पुष्कळ पाठबळ आहे. प्रत्येक प्रसिद्ध वर्तमानपत्रांत स्त्रीलेखकांचा भाग असतोच. आतां वर्तमानपत्रांतून अश्लील भाषा बहुतकरून येत नाहीं. आपल्या आणि मुलांच्या काय काय उणीवा आहेत, मुलांच्या आणि समाजाच्या हिताकरितां काय केलें पाहिजे, व कोणच्या चालींत फेरबदल झाला पाहिजे; पाठशाळांतून शिक्षणक्रम कोणत्या रीतीचा असावा व स्त्रीपुरुषांस सारखा न्याय मिळण्याकरितां कोणत्या प्रकारचे कायदे असावे; इत्यादि गोष्टींचें विवेचन स्त्रियांस वर्तमानपत्रांतून करितां येतें. सृष्टीच्या आरंभापासून जोरदार पुरुषांनीं आपल्या शारीरिक बळाच्या घमंडींत कर्तव्यज्ञानशून्य होऊन, स्त्रियांचीं तोंडें बंद करून ठेविलीं होतीं, तीं आतां उघडलीं आहेत; तीं लोकसमाजाच्या वाईटाकरितां नव्हे, तर हिताकरितां उघडलीं आहेत, अशी प्रतीतिही येत आहे. आतां स्त्रिया एखाद्या मोठ्या वर्तमानपत्राचा भागच घेऊन संतुष्ट न राहतां, त्या स्वतंत्र वर्तमानपत्रें काढूं लागल्या आहेत. बायकांनींच ज्याचें सर्व काम चालविलें

आहे, अशीं वर्तमानपत्रें शेंकडों आहेत. 'बोस्टन् वोमन्स् जर्नल्' 'शिकागो जस्टिशिया' आणि 'यूनियन् सिग्नल्' 'बिआट्रिस् वुइमेन्स् ट्रिब्यून्' 'वुइमेन्स् वर्क् फार् वुइमेन्' 'चिल्ड्रन्स् वर्क् फार् चिल्ड्रन्' 'सेंट् निकल्स्', 'वुइमेन्स् म्यागझीन्' अशीं पुष्कळ पत्रें आणि मासिकपुस्तकें सामाजिक आणि राजकीयव्यवहार आणि सार्वजनिकशिक्षण ह्यांच्या सुधारणेच्या कामांत फार उपयोगीं पडत आहेत. 'यूनियन् सिग्नल्' नांवाच्या साप्ताहिक पत्राची वाढ फार चमत्कारिक रीतीनें झाली. सहासात वर्षांपूर्वी पांच सहा बायकांनीं अडीच हजार डालरांचें भांडवल घेऊन, हें पत्र काढिलें. त्या वेळेस मद्यपाननिषेध हा विषय लोकांचा आवडता नव्हता, आणि आतांही नाहीं. हें पत्र स्त्रियांच्या मद्यनिषेधकमंडळीच्या चालकांनीं काढलेलें असून, हें चालेल कीं नाहीं याचा संशयच होता. तरी आतां तें पत्र लोकप्रिय झालें आहे, असें दिसतें. त्याचें भांडवल आतां पन्नास हजार डालरांइतकें असून, त्याचे वर्गणीदार चाळीस हजारांवर आहेत. हें वर्तमानपत्र चालविणाऱ्या बायकांच्या मंडळीनें मद्यनिषेधक मताच्या प्रसारार्थ आणखी चारपांच वर्तमानपत्रें काढलीं आहेत. सन १८८८ त या मंडळीनें पांच कोटि वीस लक्ष पृष्ठांइतका छापील मजकूर प्रसिद्ध करून, युनाइटेड् स्टेट्स्मध्यें मद्यनिषेधाच्या कामीं फार साहाय्य केलें. याच वर्षी छापील कामाबद्दल त्यांस त्र्याण्णव हजार डालर मिळाले. 'बोस्टन वोमन्स् जर्नल्' हें पत्र सुद्धां चालण्याची पंचाईतच वाटत होती. कारण तें पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांस राजकीय हक्क मिळावे, या मताचें प्रतिपादक आहे. तीस वर्षांपूर्वी युनाइटेड् स्टेट्सचे लोक जसे स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध होते, तसेच ते आज स्त्रियांस राजकीय हक्क मिळण्याच्या विरुद्ध आहेत. परंतु स्त्रियांनीं अविश्रांत उद्योग करून, जसें शिक्षणाच्या संबंधानें लोकमत फिरविलें, तसेंच त्यांनीं ह्या गोष्टीच्या संबंधानेंही लोकमत फिरविण्याचा निश्चय केला आहे; आणि तो तडीस

जाईल अशीं चिन्हें दिसत आहेत. कोठें कोठें वर्तमानपत्रकाराच्या धंद्यांत स्त्रिया पुरुषांहूनही अधिक योग्य आहेत, असें दिसून येतें. आतां निर्मळ मनाच्या स्त्रीपुरुषांना आणि मुलांना दुसरीं वर्तमानपत्रें नाहींत, म्हणून निरुपायास्तव, गचाळ वर्तमानपत्रें वाचण्याची जरूरी राहिली नाहीं.

स्त्रियांनीं वेगळाले धंदे घेतल्यापासून जे उपयोग होतात, त्यांमध्यें स्त्रीवैद्यांचा उपयोग फार महत्त्वाचा आहे. अज्ञानी स्त्रियांस आपल्या व मुलांबाळांच्या प्रकृतीचा सांभाळ करितां येत नाहीं. या त्यांच्या अज्ञानामुळें मनुष्यजातीची फार हानि होते. ह्याकरितां स्त्रियांस वैद्यकीचें ज्ञान असणें अत्यवश्यक आहे. परंतु युनाइटेड् स्टेट्स्‌च्या लोकांचे समज या संबंधानें फार विलक्षण होते. तीस पस्तीस वर्षांपूर्वीं फिलाडेल्फियामध्यें स्त्रियांकरितां म्हणून एक वैद्यविद्यालय स्थापित झालें. त्या वेळीं लोकांनीं त्याच्या स्थापकांचा पुष्कळ पाठलाग केला. लोकांस वाटत होतें कीं, वैद्यक शिकल्यानें स्त्रिया बिघडून जातील; त्यांच्या अंगचा नाजूकपणा नाहींसा होईल; आणि मग त्या गृहकृत्याच्या उपयोगीं राहणार नाहींत. कोणत्याही गोष्टीची माहिती नसली, म्हणजे तिजविषयीं मनुष्याच्या मनांत विलक्षण तर्क येतात. जगांतील अर्धअधिक लोक कोणत्यातरी गोष्टीची माहिती आधीं करून घेतल्यावांचूनच, तिच्याविषयीं आपले मत देण्याची घाई करितात. त्यामुळें राहिलेल्या लोकांच्या मनांतही तिजविषयीं शंका उत्पन्न होते. परंतु, तेच जर आधीं त्या गोष्टीची माहिती करून घेऊन, त्यानंतर तिजविषयीं आपलें बरेंवाईट मत देतील, तर शेंकडो नव्या चाली चालू न केल्यानें आणि नव्या गोष्टी उपयोगांत न आणिल्यानें जगाची जी अतोनात हानि होत आहे, ती होणार नाहीं. स्त्रियांचें वैद्यविद्यालय स्थापित होऊन तीस वर्षें झाल्यावर, आतां युनाइटेड् स्टेट्स्‌च्या लोकांस कळून येत आहे कीं, स्त्रीवैद्यांचा उपयोग समाजाला फार आहे. युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें आजमितीस

एक हजारांवर बायका सनदी वैद्य आहेत. त्यांचें उत्पन्न खर्च वजा जाऊन, दरवर्षी शंभर डालरांपासून पन्नास हजार डालरांपर्यंत आहे. आतां जिकडे तिकडे स्त्रीवैद्यांची चाहा होत आहे. रोग्यांची शुश्रूषा करण्यामध्यें स्त्रिया जितक्या कुशल आहेत तितके पुरुष नाहींत, असा लोकांस पक्का अनुभव आला आहे.

ह्या संबंधानें लोकमतांत केवढा फेरबदल झाला आहे याचें एक उदाहरण एथें देत्यें. वीसएक वर्षांपूर्वीं "फिलाडेल्फिया काउंटी मेडिकल् असोसियेशन्" नांवाच्या प्रख्यात पुरुषवैद्यांच्या सभेनें स्त्रीवैद्यांस बहिष्कार घालून, त्यांचें मुखावलोकन करावयाचें नाहीं असा ठराव केला होता. ह्याचें कारण त्यांनीं असें सांगितलें होतें कीं, स्त्रियांचीं पवित्र मनें वैद्यक शिकल्यानें अपवित्र होतील, आणि त्या अस्वाभाविक वर्तन करूं लागतील. स्त्रियांच्या मेंदूचें वजन पुरुषांच्या मेंदूच्या वजनापेक्षां कमी असल्यानें, त्यांस वैद्यकासारख्या गहन शास्त्रीयविषयामध्यें असावी तितकी प्रवीणता नसणार, म्हणून त्यांच्या हातून पुष्कळ प्राण्यांचा संहार होण्याचा संभव आहे. या आमच्या बंधूंनीं वर सांगितलेल्या दुसऱ्या निमित्तानें स्त्रियांस बहिष्कार घालण्याच्या पूर्वीं, त्यांस आपण यमराजाचे वडील बंधु आहोंत, या गोष्टीचा विसर पडला असावा असें वाटतें. या यमाच्या दादांच्या हातून जितके लोक मरतात, तितके यमीच्या हातून मेलेले कोणाच्या ऐकिवांत नाहींत. इ० स० १८८८ त या "काउंटीमेडिकल् असोसिएशन्"चा गढूळ मेंदू बराच निवळला असावा, अशीं चिन्हें दिसून आलीं. त्यांनीं स्त्रीवैद्यांवरचा बहिष्कार काढून टाकला इतकेंच नव्हे; तर त्यांच्या हातां पायां पडून आर्जवें करून, त्यांस आपल्या प्रख्यात सभेच्या सदस्या करून घेतल्या. पंचवीस वर्षांपूर्वीं ज्यांमध्यें स्त्रीवैद्य सदस्या होत्या, अशा प्रसिद्ध वैद्यसभा एकदोन सुद्धां नव्हत्या. आतां ज्यांमध्यें स्त्रिया सदस्या

नाहींत, असे उत्तम वैद्यसमाज एकदोन सुद्धां सांपडावयाचे नाहींत. वैद्यकासारख्या गहन शास्त्रीय विषयामध्यें कमी मेंदूच्या स्त्रियांची गति आहे किंवा नाहीं, हें पुढच्या गोष्टीवरून कळून येईल. युनाइटेड् स्टेट्‌स्‌मध्यें एक फार वजनदार वैद्यसभा आहे. तिनें नेमलेल्या विषयावर उत्तम निबंध लिहिणाऱ्या वैद्यांस मोठालीं बक्षिसें मिळत असतात. एका प्रसंगीं असें झालें कीं, "स्त्रियांस अस्पर्शसमयीं विश्रांति असण्याची अवश्यकता" ह्या त्या सभेनें नेमलेल्या विषयावर निबंध लिहावयाचा होता. परीक्षेच्या वेळेस उमेदवारांकडून लिहून आलेल्या चार पांच निबंधांपैकीं एक निबंध फार उत्तम ठरून, तो लिहिणारास पांचशें डालर बक्षीस देण्याचा ठराव झाला. हा निबंध लिहिणारानें अशी कांहीं खुबी केली होती कीं, आपल्या निबंधावर सहीच्या ठिकाणीं आपलें सगळें नांव न घालतां, नांवाच्या व आडनांवाच्या आरंभींचीं अक्षरें मात्र घातलीं होतीं. स्त्रीवैद्यांवर या सभेचा मोठा कटाक्ष होता, आणि स्त्रियांकडून असे गहन निबंध येतील अशी त्यांस कल्पना सुद्धां नव्हती. पण बक्षीस देण्याचा ठराव झाल्यानंतर त्यांस कळून आलें कीं, न्यूयार्क शहरची रहिवासी प्रसिद्ध डाक्तर् मेरी पट्‌नम् यकोबी, या बाईनें तो निबंध लिहिला होता, हें कळल्यानंतर त्या बिचाऱ्या पक्षपाती वैद्यसभेला एका बायकोनें असला निबंध लिहिला आणि आपण तिला बक्षीस दिलें, ही गोष्ट कबूल करणें फारच कठीण गेलें. पण बिचारी करते काय? ठराव प्रसिद्ध करून काम फसलें होतें, म्हणून निरुपायास्तव डा० यकोबीला बक्षीस देणें प्राप्त झालें.

न्यू यार्क् शहरामध्यें **न्यू यार्क् इन्फर्मरी** नांवाचें वैद्यविद्यालय आहे, तें युनाइटेड् स्टेट्‌स्‌च्या सरकारी किंवा स्वतंत्र अशा उत्तम वैद्यविद्यालयांत फार प्रतिष्ठित मानलें जात आहे. याची स्थापक एक स्त्रीवैद्य असून, तिची गणना युनाइटेड् स्टेट्‌सच्या उत्तम वैद्यांमध्यें आहे, हें सांगायाला नको.

न्यू यार्क् इन्फर्मरीची स्थापयित्री डाक्तर् इलिझबेथ् ब्लाक्वेल् ही इ० स० १८५० च्या सुमाराला वैद्यविद्येचें अध्ययन करून व फार अनुभव मिळवून युरोपांतून स्वदेशीं आली; तेव्हां स्त्रियांकरतां रोगिभवनें स्थापण्याची आवश्यकता फार आहे, असें तिच्या नजरेस आलें. कारण मोठाल्या सार्वजनिक व प्रतिष्ठित पुरुषवैद्यांच्या देखरेखीखालीं असलेल्या रोगिभवनांतून कमी मेंदूच्या अशा मानलेल्या स्त्रियांना रोग्यांची शुश्रूषा, व शस्त्रक्रिया वगैरे शिकायाला जाण्याची परवानगी नव्हती. इ० स० १८५७ त ह्या उद्योगी बाईनें व तिच्या बहिणीनें मिळून आपलें प्रख्यात रोगिभवन; व त्याला लागून एक वैद्यविद्यालय स्थापिलें. तिच्याचसारख्या उद्योगी व परोपकारपरायण स्त्रिया तिला साहाय्य करूं लागल्या. तिचा कित्ता घेऊन बोस्टन्च्या बायकांनीं इ० स० १८६२ त "न्यूइंग्लंड् हास्पिटल् फार् वुइमेन् एन्ड् चिल्ड्रन्" नांवाचें रोगिभवन स्थापिलें. वैद्यकी शिकून नवीन तयार झालेल्या बायका येथेंही न्यू यार्क् इन्फर्मरीप्रमाणेंच रोग्यांची शुश्रूषा शस्त्रक्रिया इत्यादि गोष्टींचा प्रयोग करून व केलेला पाहून, अमोलिक अनुभव मिळवितात. आमची प्रिय देशभगिनी डा. आनंदीबाइ जोशी फिलाडेल्फियांत वैद्यकी शिकून तयार झाल्यावर, अनुभव मिळविण्याकरितां ह्याच न्यूइंग्लंड् हास्पिटल्मध्यें शिकायाला राहिली होती. बोस्टन्च्या मागून फिलाडेल्फियाच्या स्त्रियांनीं तेथील स्त्रियांच्या वैद्यविद्यालयांस लागून एक स्त्रियांचें आणि मुलांचें रोगिभवन स्थापिलें. तेथेंही वैद्यकी शिकून तयार झालेल्या स्त्रियांस अनुभवशिक्षण देण्याची सोय केलेली आहे. ह्याचप्रमाणें शिकागो शहरांत "शिकागो हास्पिटल् फार् वुइमेन् एन्ड चिल्ड्रन्:" सान् फ्रन्सिस्कोशहरांत "पसिफिक् हास्पिटल् फार वुइमेन् एन्ड् चिल्ड्रन्" सिन्सिनाटाइ शहरांतील "ओहायो हास्पिटल्" आणि मिनेआपोलिस् शहरांत "नार्थ्वेस्टर्न् हास्पिटल्" हीं सात स्त्रियांनीं स्थापिलेलीं व स्त्रियांनींच चालवि-

लेलीं उत्कृष्ट रोगिभवनें व अनुभवविद्यालयें, युनाइटेड्स्टेट्स्च्या उत्तरसंस्थानांतून उत्तराकाशांत विराजमान असलेल्या सप्तर्षींच्या तेजोमय सप्ततारकांप्रमाणें, आपल्या असाधारण तेजानें निरंतर प्रकाशमान होत असून, आपल्याकडे आशायुक्त उत्साहपूर्ण नजर लावून असलेल्या स्त्रीपुरुषसमाजास आनंद देत आहेत. युनाइटेड् स्टेट्सच्या स्त्रियांचा कित्ता घेऊन इंग्लंड्च्या स्त्रियाही असल्या प्रकारचीं रोगिभवनें व अनुभवविद्यालयें स्थापन करीत आहेत; ही आनंदाची गोष्ट आहे.

आजमितीस ह्या देशांमध्यें छत्तीस वैद्यविद्यालयें केवळ स्त्रियांकरितां स्थापिलेलीं आहेत. त्यांमध्यें शिक्षण देण्याचें काम बहुतेक सगळें स्त्रियांकडेसच आहे. मिश्र विद्यालयांतून सुद्धां पुष्कळ स्त्रीवैद्य शिक्षकांचें काम करीत आहेत. यावरून स्त्रिया वैद्यक शिकल्यानें बिघडून जातील असा जो युनाइटेड्स्टेट्सच्या लोकांचा समज होता, तो बदलला आहे असें सिद्ध होतें. स्त्रिया वैद्यक शिकूं लागल्यापासून, तो विषय जाणणाऱ्या लोकांस मनुष्य शरीर आणि शारीरविद्या ह्या फार पवित्र वस्तू आहेत, असें वाटूं लागलें आहे. स्त्रिया शिकावयास जाण्याच्यापूर्वी विद्यालयांतून शारीरशास्त्र शिकवितांना, जे अचकट विचकट प्रकार होत असत, ते आतां अजीबाद बंद झाले आहेत. विद्यार्थिणींच्या मर्यादशील आणि फार स्तुत्य नीतिमत्तेपुढें शारीरशास्त्राचा विचका करणाऱ्या पुरुषशिक्षकांस आणि विद्यार्थ्यांस आपल्या कृतीची लाज वाटूं लागली. आतां स्त्रियांच्या योगानें शारीर शिकविण्याची सरणी आणि भाषा इतकी चांगली झाली आहे कीं, आठ दहा वर्षांच्या लहान मुलांस सुद्धां तें शिकवावें, अशी इच्छा लोकांस उत्पन्न होत आहे.

आणखी एक उपयुक्त धंदा स्त्रियांनीं पतकरलेला आहे. तो न्यायसभांतून वकिली करणें हा होय. इसवी सन १८६८ त सेंट् लुइस् शहरांतील " वाशिंगटन् युनिव्हर्सिटी "नें स्त्रियांस कायदे शिकविण्यास रुकार

दिला. नंतर सन १८६९ त युनाइटेड्स्टेट्स्ची पहिली सनदी वकील आराबेला मान्स्फील्ड् ही बाई सनद मिळवून, वकिली करूं लागली. तेव्हांपासून बहुतेक सगळ्या मोठाल्या युनिव्हर्सिट्यांनीं आपल्या शाळांतून स्त्रियांस कायदे शिकण्याची मोकळीक दिली आहे. कायद्यासारखा गहन विषय स्त्रियांस शिकतां येईल किंवा नाहीं, याविषयीं पुष्कळ लोकांस संशय होता, पण तो आतां नाहींसा होत आला आहे. न्यायगृहांमधून स्त्रीवकिलांचीं उत्कृष्ट कामें त्यांची विशुद्ध न्यायशास्त्रानुसार वाद करण्याची रीति, मोठमोठ्या पुरुषवकिलांची बरोबरी करण्याइतकी त्यांच्या आंगची योग्यता, आणि या सर्वांहून उत्तम असें त्यांचें मर्यादशील सद्वर्तन पाहून, आतां त्यांच्या योग्यतेविषयीं लोकांच्या मनांत संशय राहिला नाहीं. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें शेकडों स्त्रिया सनदी वकील आहेत. त्या इकडील पुरुषांप्रमाणेंच लहान लहान मंडळ्या स्थापून काम करितात. अशा प्रकारच्या एकवीस मंडळ्या नवराबायकांच्या आहेत. त्यांमध्यें नवराही वकील आणि बायकोही वकील आहे.

न्यायगृहांमध्यें अनेक प्रकारचे चांगले वाईट खटले येणार, तेथें स्त्रिया वकिली करूं लागल्यास त्यांची मर्यादा व लज्जाशीलता कशी राहावी. असा संशय काढणारे पुष्कळ लोक होते. परंतु संशय काढणारांनीं ही गोष्ट ध्यानांत आणावयाची होती कीं, न्यायसभांतून केवळ पुरुषांचेच खटले येत नाहींत; तर पुष्कळ बायकांचेही खटले येतात. स्त्रीजातीमध्यें पुरुषजातीइतक्या अपराध करणाऱ्या व्यक्ती जरी सांपडत नाहींत,–( ही गोष्ट फार अभिनंदनीय आणि स्त्रीजातीस फार भूषणप्रद आहे, )–तरी त्यांपैकीं कांहीं थोड्याशा तरी बायका असतातच. त्यांचें सुखदुःख त्यांच्या स्वजातीय वकिलांना जसे समजेल, तसें तें पुरुषांना कळावयाचें नाहीं. जेथें चोहोंकडे पुरुष आहेत आणि एक सुद्धां बायको नाहीं, अशा ठिकाणीं बायका गेल्या म्हणजे त्यांना

किती अवघड पडतें, तें प्रत्येक विचारी मनुष्यास कळण्यासारखें आहे. जेथें संभावित पुरुष आहेत—आणि न्यायगृहांत न्यायाधीश वकील इत्यादि पदस्थ पुरुष संभावित असणें अवश्य आहे—तेथें संभावित स्त्रियांना जाण्यास हरकत नसावी. स्त्रिया वकील असल्यापासून अपराधी बायकांना योग्य न्याय मिळण्याचा पुष्कळ संभव आहे. असो. अनुभवांतीं असें कळून येतें कीं, युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रीवकिलांच्या स्वाभाविक मर्यादशीलपणांत आणि त्यांच्या मानपानांत कांहीं कमताई होत नाहीं. स्त्रीवकील जेथें आहेत, अशा न्यायसभांतून सर्व पुरुषमंडळी त्यांचा मान योग्य रीतीनें राखतात इतकेंच नव्हे; तर न्यायगृहांत तंबाकू ओढणें, अश्लील भाषण करणें, वगैरे अयोग्य वर्तन कोणी करूं नये असे जे साधारण नियम आहेत, ते स्त्रिया न्यायगृहांत गेल्यापासून अधिक उत्तम रीतीनें पाळले जात आहेत. कायदेकानूंमध्यें स्त्रियांचें प्रवीणत्व केवढें आहे हें कोणास पहावयाचें असल्यास, त्यांनीं युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय न्यायसभेंत आणि इतर न्यायसभांतून त्यांचें काम स्वतः पाहिल्यावांचून कळण्यासारखें नाहीं. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें आज शेंकडों वर्षांपासून पुरुष वकिली करीत आहेत आणि स्त्रियांना वकिलीची परीक्षा देण्याचा अधिकार मिळून नुक्तीं कोठें वीस वर्षें झालीं. इतक्यांत त्या शूर बायकांनीं शेंकडों वर्षांपासून वरिष्ठ योग्यतेस चढलेल्या पुरुषवकील मंडळीशीं बरोबरी केली आहे. आतां त्यांच्यांत ओकानेल्, करन्, वेब्स्टर् आणि कोट्स् ह्यांसारखे प्रसिद्ध वकील अजून झाले नाहींत. पण ते होणार नाहींत कशावरून? पुरुषांमध्यें तरी सगळेच तसे कोठें आहेत?

शिकागो शहरामध्यें इ० स० १८६८ पासून 'लीगल् न्यूज्' नांवाचें कायदेकानूंसंबंधी एक मासिकपुस्तक निघत असतें. माइरा ब्राड्वेल् ही त्याची कर्त्री आहे. ही बाई युनाइटेड् स्टेट्स्मधील कायदेकानूंविषयींचीं पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या अशा मंडळ्यांमध्यें, सगळ्यांपेक्षां मोठ्या मंडळीची अध्यक्ष आहे.

या बाईच्या देखरेखीखालीं तयार झालेल्या "ब्राड्वेल्स् आपेलेट् कोर्ट् रिपोर्टस्" नांवाच्या जंगी ग्रंथाची सर्वत्र प्रसिद्धि असून, बहुतेक सगळे वकील त्याचा उपयोग करितात. क्यारोलाइन् व्हाइट् नांवाची आणखी एक बाई 'शिकागो ला टाइम्स्' नांवाचें पाक्षिक पत्र प्रसिद्ध करीत असते. तें-ही त्याच्या उत्तमत्वामुळें वकीलमंडळांत फार प्रसिद्ध आहे. इ० स० १८८६ त मिशिगन् युनिवर्सिटीमध्यें कायदेकानू शिकून तयार झालेल्या आणि शिकत असलेल्या बायकांनीं मिळून, 'एक्विटी क्लब्' नांवाची एक समिति स्थापिली. तिचा उद्देश केवळ युनाइटेड् स्टेट्स्मधील स्त्रियांमध्येंच नव्हे, तर जेथें म्हणून स्त्रियांना वकिली करण्याचा अधिकार मिळाला आहे अशा सर्व राष्ट्रांतील स्त्रियांमध्यें मैत्रीसंबंध स्थापून, एकमेकींस साहाय्य करून स्त्रीजातीची उन्नति करणें, हा आहे. पुरुषजातीला वकिली करूं लागून हजारों वर्षें झालीं असतील, परंतु त्यांनीं कोठें जातिदेशभेद न मानितां, सर्व साधारण पुरुषजातीच्या हितार्थ 'एक्विटी क्लब्' सारख्या मंडळ्या स्थापन केलेल्या ऐकिवांत नाहींत. सुशिक्षित स्त्रियांना कोणतेही अधिकार मिळाल्यास त्या त्यांचा कसा सदुपयोग करितात, ह्याचें हें उत्तम उदाहरण आहे.

चौथा फार महत्त्वाचा धंदा स्त्रियांनीं घेतला आहे. तो धर्मोपदेश करणें हा होय. ख्रिस्ती धर्मस्थापन झाल्यानंतर कांहीं वर्षेंपर्यंत, ख्रिस्ती स्त्रियांना पुरुषांप्रमाणेंच धर्मोपदेश करण्याचा अधिकार होता. त्या काळीं परमेश्वरानें ज्याला आपली पवित्र शक्ति देऊन धर्मोपदेश करण्याच्या कामीं लावलें, तो पुरुष असो किंवा स्त्री असो, अशा देवनियुक्त व्यक्तीनेंच धर्मोपदेश करावा, असा नियम असे. ख्रिस्तानें उपदेशिलेला ख्रिस्तीधर्म फार सोपा असून, त्याचे नियम स्त्रीपुरुषांना सारखे लागू आहेत. ख्रिस्ताचा देव परमेश्वर स्त्रियांस आणि पुरुषांस त्यांचा जातिभेद मनांत न आणितां, सारख्या

रीतीनें आपला पवित्र आत्मा देतो. तो मनुष्यासारखा पक्षपाती नसून, धर्मोपदेश करण्याचें काम केवळ पुरुषांच्याच हातीं सोंपून देत नाहीं. तो योग्य मनुष्याला योग्य देणग्या देतो. कित्येक स्त्रियांस आणि कित्येक पुरुषांस निरनिराळ्या रीतीनें तो त्या देणग्या देत असतो. सौजन्यादि गुण, कलाकौशल्य, विद्वत्ता, दैवीभाव, ह्या देणग्यांपैकीं कांहीं स्त्रीजातीस आणि कांहीं पुरुषजातीसच मिळाव्या, असा कांहीं नियम नाहीं. परंतु ख्रिस्ती धर्म जेव्हां रोमन् लोकांसारख्या स्त्रीजातीस नीच मानणाऱ्या लोकांच्या हातांत गेला, तेव्हां त्यांनीं आपले चांगले वाईट समज ख्रिस्ती धर्मांत सामील केले. रोमन् क्याथलिक् आचार्य आणि संन्यासी हे स्त्रियांस सैतानाप्रमाणें आपल्या शत्रू समजत असत. त्यांनीं व तशाच प्रकारच्या इतर लोकांनीं उपदेशकपणाचा स्त्रियांचा हक्क हिरावून घेतला. धर्मोपदेश करण्याविषयीं त्यांस परमेश्वराची प्रेरणा होत असूनही, पक्षपाती पुरुषांच्या निर्बंधामुळें स्त्रियांस आजपर्यंत मौन धरून, पुरुष सांगतील तें मुकाट्यानें ऐकून घ्यावें लागत असे. पण या एकुणिसाव्या शतकांत ज्ञानाच्या प्रकाशामुळें पुरुषांस आपल्या चुक्या दिसूं लागल्या आहेत. स्त्रियांना धर्मोपदेश करण्याचा अधिकार असावा असें बहुतेक ख्रिस्ती राष्ट्रांतील पुष्पळ निष्पक्षपाती धर्माचार्य म्हणूं लागले आहेत. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें एकशें पांसष्ट स्त्रिया निरनिराळ्या मताच्या सनदी धर्मोपदेशक आहेत. ह्या राष्ट्रांतील लोकांस असा अनुभव येत चालला आहे कीं, पुष्कळ प्रसंगीं स्त्री उपदेशकांकडून जितक्या सोप्या रीतीनें धर्मप्रसाराचें काम होतें, तितकें तें पुरुष उपदेशकांकडून होत नाहीं. ह्या आणि दुसऱ्या कारणांनीं, आपल्या देशांत स्त्री उपदेशक पुष्कळ असाव्यात, ही इच्छा लोकसमूहांत वृद्धिंगत होत चाललेली आहे.

"स्टेनाग्रफी" ह्मणजे लघुलेखन ह्या नावांचा आणखी एक रोजगार स्त्रियांनीं हातीं घेतला आहे. त्यांच्यामध्यें त्या इतक्या कुशल झाल्या आहेत

कीं, आलीकडे युनाइटेड् स्टेट्स्मध्यें मोठाले प्रख्यात वर्तमानपत्रकार व वकील स्त्रीलघुलेखकांस अत्यादरानें आपल्या कचेऱ्यांतून मोठीं जबावदारीचीं कामें देत आहेत. हा रोजगार करणाऱ्या स्त्रियांना साधारण शिक्षकिणींपेक्षां पुष्कळ अधिक पैसा मिळतो. या स्त्रिया वर्षदीडवर्ष लघुलेखनाची पद्धति शिकून थोडीशी उमेदवारी केल्यानंतर, राष्ट्रीय न्यायसभांतून आणि जेथें मोठाल्या वक्त्यांचीं भाषणें होतात त्या ठिकाणीं जाऊन, तीं व्याख्यानें अक्षरशः उतरून घेतात. त्यांस ह्या कामाबद्दल दरतासास पांचांपासून वीस डालरांपर्यंत वेतन मिळतें.

सन १८४० त ह्यारिएट् मार्टिनो नांवाची इंग्लिश विदुषी युनाइटेड् स्टेट्स्मध्यें आली होती, तेव्हां येथील स्त्रियांस सात हलक्याप्रतीचे धंदे करण्याची मोकळीक होती. ते धंदे असेः -१ मुलांस मुळाक्षरें व उजळणी शिकविणें, २ शिवणकाम; ३ खाणावळी घालणें; ४ कोणाच्या तरी घरीं चाकरीस राहणें; ५ छापखान्यांत अक्षरांचे खिळे जुळणें; ६ पुस्तकें बांधणारांच्या कारखान्यांतून पुस्तकांचीं पानें दुमडून टांके मारणें; ७ गिरण्यांत निकृष्टप्रतीचें काम करणें. पण आतां तो मनु पालटला आहे. स्त्रिया विद्यासंपन्न झालेल्या आहेत, तेव्हां ज्यांस ह्यांपेक्षां कांहीं उत्तम प्रतीचे धंदे करण्याची शक्ति आहे, त्या एवढेच धंदे करून संतुष्ट राहत नाहींत. युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय सरकाराकडून आणि संस्थानिक सरकारांकडून जरी त्यांस फारसें सहाय्य व उत्तजेन मिळत नाहीं; तरी त्या आपल्या तीक्ष्णबुद्धि, दृढनिश्चय आणि दीर्घोद्योगीपणा या गुणांच्या मदतीनें परमेश्वरानें त्यांस दिलेल्या कल्पकशक्ती विकासास आणीत आहेत. इ० स० १८८० च्या खानेसुमारीवरून कळतें कीं, युनाइटेड् स्टेट्स्मध्यें स्त्रिया निरनिराळ्या प्रकारचे तीनशें धंदे करीत होत्या. एका मासचुसेट्स् संस्थानांतच दोन लक्ष एकावन्न जहार एकशें अठावन्न स्त्रिया, दोनशें चौऱ्यायशीं वेग-

ळाले धंदे करीत असून, त्यांच्या उत्पन्नाचें मान वर्षास एकशें पन्नास डालरांपासून तीन हजार डालरांपर्यंत आहे.

कोणाकोणाचें असें म्हणणें पडतें कीं, स्त्रिया कल्पक नाहींत; कारण त्यांचा मेंदू कमी आहे. आजपर्यंत जितक्या कल्पना निघाल्या त्या सगळ्या पुरुषांनीं काढिल्या, बायकांना कल्पकशक्ति नव्हती, म्हणूनच असें झालें. आमचें म्हणणें असें आहे कीं, बायकांनीं कल्पना काढल्या नाहींत याचें कारण त्यांच्या मेंदूचा कमीपणा नव्हे, तर त्यांच्या कल्पकशक्तीस विकास पावण्यास त्यांस कोणी अवसर व उत्तेजन मुळींच दिलें नव्हतें. कोठें कोठें असेंही घडून आलें आहे कीं, बायकांनीं स्वतः कल्पना काढून, आपल्या स्वाभाविक उदारपणानें त्या पुरुषांच्या नांवानें प्रसिद्ध होऊं दिल्या. उदाहरणार्थ प्रसिद्ध युरोपियन् गायक व वाद्यवादक बेथोव्हन्, याच्या बहिणीनें पुष्कळ उत्कृष्ट आणि लोकोत्तर माधुर्ययुक्त असे राग आणि रागिण्या रचून, आपल्या भावाच्या नांवानें प्रसिद्ध करूं दिल्या. त्यांच्यायोगानें बेथोव्हन्‌ची कीर्ति अजरामर झाली आहे, पण त्या रागरागिण्या त्याच्या बहिणीनें केल्या हें थोडक्यांसच ठाऊक असेल. त्याचप्रमाणें ज्योतिषशास्त्रज्ञ विल्यम् हर्शेल् याची बहिण क्यारोलईन् हर्शेल् इनें पुष्कळ ग्रह शोधून काढले. आपला भाऊ ज्योतिषशास्त्राचें परिशीलन करीत असतां त्यास तिनें स्वतःच्या अलौकिक गणितशास्त्रपारंगततेनें पुष्कळ साहाय्य केलें. परंतु जिच्या अश्रांत श्रमाच्या व निःस्वार्थ साहाय्याच्या योगानें विल्यम् हर्शेलची एवढी प्रसिद्धि झाली; त्या क्यारोलाईन् हर्शेल्‌ला तिच्या भावाच्या यशाचा वांटा जगानें दिला नाहीं. बेथोव्हेन्‌च्या बहिणीसारख्या बायांनीं आपल्या कल्पना व शोध आपल्या संबंधीं किंवा ओळखीच्या पुरुषांच्या नांवानें प्रसिद्ध होऊं दिले; याचें कारण एक तर त्यांचें स्वाभाविक औदार्य; आणि दुसरें असें कीं, मागल्या काळांत बायकांनीं कोणतीही कल्पना काढून किंवा इतर कृत्य करून, लौकिकांत प्र-

सिद्धीस येणें, हें फार लाजिरवाणें आहे, असा रानटी समज बहुतेक सर्व देशांतील लोकांत होता; आणि आमच्या देशांत तर अजूनही आहे. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें आतांशा कोठें स्त्रियांनीं काढलेल्या कल्पनांस थोडें थोडें उत्तेजन मिळूं लागलें आहे. इतक्यांतच त्यांनीं एकोणीसशें पस्तीस नवीन कल्पना व शोध काढून, युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकारापासून तितक्यांबद्दलचा आपला हक्क नोंदवून घेतला आहे. ह्या कल्पना म्हणजे लहानसान आहेत असें नाहीं; तर ज्यांमध्यें त्या काढणाऱ्या स्त्रियांचें गहन शास्त्रीयविषयांचें ज्ञान स्पष्ट रीतीनें दिसून येत आहे, अशा आहेत. उदाहरणार्थ सन १८४५ त एका बाईनें अंतर्जलदूरदर्शक यंत्र शोधून काढलें. त्याचप्रमाणें एकीनें समुद्रांत प्रवास करणाऱ्या लोकांकरितां प्राणरक्षक कवचें आणि प्राणरक्षक तार्फे बनविले. आणखी एकीनें बाष्पोत्पादक यंत्र निर्माण केलें. दुसऱ्या एकीनें आगगाडीच्या वाफेच्या यंत्रांत सुधारणा केली. एकीनें शहरांतून चालणाऱ्या आगगाड्यांचा नाद कमी व्हावा, म्हणून एक युक्ति काढिली. दुसऱ्या एकीनें पाण्याचा पूर येऊन शेतें वाहून जाऊं नयेत, म्हणून एक युक्ति काढिली, आणखी एकीनें अप्रवर्तक विजेचा शेंडा ( Non-inductive electric cable ) बनविला. तारवांवर धान्य चढविण्याचें यंत्र, दाणा आणि सालपट पृथक् करण्याचें यंत्र, शेत कापण्याचें यंत्र इत्यादि पुष्कळ फार उपयोगी यंत्रें स्त्रियांनीं निर्माण केलेलीं आहेत; ह्यावरून स्त्रिया कल्पक नाहींत असें म्हणण्यास जागा राहात नाहीं.

चीनांत आणि हिंदुस्थानांतही कोठें कोठें स्त्रिया नावाडी आहेत, हें पुष्कळांस ठाऊक असेल. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें साधारण स्त्रियांनीं नावाडीपण करण्याची चाल नाहीं. तरी ह्यापुढें येथील स्त्रिया तो धंदा करूं लागतील असें वाटतें. हड्सन् आणि मिसिसिपी नामक महानद्यांवर चालणाऱ्या ज्या पुष्कळ आगबोटी आहेत, त्यांपैकीं कित्येकांवर नौकाशास्त्रज्ञ स्त्रिया नौकानायक (क्या-

प्टन्) असून, त्या शास्त्रीय रीतीप्रमाणें मोठ्या हुशारीनें आपलें काम चालवीत आहेत. आतां स्त्रिया करीत नसतील असले धंदे युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें फारसे सांपडणार नाहींत. ह्या चाळीस वर्षांमध्यें त्यांस निरनिराळे धंदे करण्याची मोकळीक मिळाल्यापासून, त्यांचे रोजगार धंदे वाढत चालले आहेत. आतां युनाइटेड् स्टेटस्‌मध्यें जितके शेतकरी आहेत, त्यांत शेंकडा सात बायका स्वतः आपलीं शेतें चालविणाऱ्या असून, शिल्पकलेवर निर्वाह करणाऱ्या लोकांपैकीं शेंकडा सोळा स्त्रिया आहेत. सहालक्षांहून अधिक स्त्रिया शिल्पकलेवर आपला निर्वाह चालवीत आहेत. ह्याशिवाय स्वतंत्र व्यापार करणाऱ्या किंवा दुकानदारांच्या गुमास्तिणी साठ हजारांवर आहेत. तारायंत्राचें काम करणाऱ्या, आगगाडीचीं तिकिटें विकणाऱ्या, आणि टपालखात्यांत काम करणाऱ्या बायका हजारों आहेत. लोकांच्या घरांत स्वैंपाक पाणी व घरकाम करून राहाणाऱ्या बायकांची संख्या तेरालक्ष साठहजारांइतकी आहे.

## कायदेशीर हक्क.

युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें सर्व गोष्टींची इतकी सुधारणा झालेली आहे, तरी कायद्यानें स्त्रियांस फारच थोडे हक्क दिले आहेत; हें पाहून सखेदाश्चर्य वाटतें. युनाइटेड् स्टेट्स्‌चे सामाजिक निर्बंध बहुतेक सगळे प्राचीन इंग्लिश् कायद्यांच्या अन्वयें केलेले आहेत. मोशेचे नियम आणि रोमन् कायदे हे इंग्लिश कायद्यांच्या पायांच्या जागीं आहेत. ह्या गोष्टी ध्यानांत आणल्या म्हणजे हल्लींच्या अमेरिकन् कायद्यांच्या दृष्टीनें पाहातां, बायका इतक्या नीच मानल्या जातात कां, ह्या कोड्याचा उलगडा होतो. पश्चिम प्रांतांतील नूतन संस्थानांतून, स्त्रियांकरतां केलेल्या कायद्यांतून बरेच फेरफार झालेले आहेत, त्या संस्थानांतून विवाहित पुरुष आप-

त्या पत्नींच्या समागमें ज्या ( स्वतःच्या ) घरांत राहात असतो, तें घर त्याचें नव्हे, तर त्याच्या बायकोचें असें समजावें, म्हणून कायद्याचा नियम आहे. पण पूर्वेकडील बहुतेक सगळ्या संस्थानांतून बायकांस नवरा मेल्यावर, त्याच्या घरांत चाळीस दिवसांपेक्षां अधिक दिवस भाडें दिल्यावांचून राहण्याची परवानगी नाहीं! मेइन् संस्थानांत दयाळू विद्वान् पुरुषांनीं दुःखसागरांत बुडालेल्या विधवेची कींव येऊन तिला नव्वद दिवस ( बिनभाड्यानें ) आपल्या मयत नवऱ्याच्या घरांत राहातां यावें, अशी व्यवस्था केलेली आहे! आलीकडे कित्येक संस्थानांतून विवाहित बायकांना स्वतः मिळविलेल्या मालमत्तेचा पाहिजे तसा उपयोग करण्याचा हक्क मिळालेला आहे. त्यांनीं घरांत राहून लोकांचे कपडे शिवून, चित्रें काढून वगैरे पैसा मिळविल्यास, त्यावर त्यांचा हक्क नाहीं; घराबाहेर जाऊन मोलमजूरी करून पैसा मिळविला असल्यास मात्र तो पैसा त्यांचा, असें कायद्याचें सांगणें आहे. कितीएक संस्थानांतून बापानें किंवा भावानें दिलेल्या स्थावरजंगम मालमत्तेवर, आणि नवरा मेल्यावर त्याच्या जंगम मालाच्या तृतीयांशावर विवाहित बायकांचा पूर्ण हक्क आहे. पण पुष्कळ संस्थानांतून त्यांस बापानें दिलेल्या किंवा स्वतः मिळविलेल्या मालावर त्यांचा हक्क नसून, नवऱ्याच्या मालमत्तेचा वांटा त्यांस मुळींच मिळत नाहीं.

न्यूयार्क आणि इतर पुष्कळ संस्थानांतून आईला आपल्या अल्पवयी मुलांवर हक्क सांगतां येत नाहीं. बाप जीवंत असतां किंवा मरतेवेळीं इच्छापत्रक करून आपलीं मुलें पाहिजे त्याच्या स्वाधीन करील, तर त्यास शिक्षा होणार नाहीं. आपल्या बायकोच्या इच्छेविरुद्ध तिच्या पोटचीं मुलें लोकांस देऊन टाकण्याचा अधिकार नवऱ्याला आहे. तो वेडा असून त्याणें मुलांविषयीं कांहीं इच्छापत्रक केलें नसल्यास मात्र, आईस आपलीं अल्पवयी मुलें आपल्यापाशीं ठेवून घेतां येतात. प्रतिष्ठितपणें कायदेशीर रीतीनें विवा-

हित झालेल्या स्त्रीपुरुषांचीं मुलें कायद्याच्या दृष्टीनें बापाचीं मुलें म्हणवितात, आईचा त्यांवर यत्किंचित्ही हक्क नाहीं. अविवाहित बायकांचीं किंवा कसबिणींचीं मुलें तेवढीं त्यांच्या आयांचीं समजलीं जातात. दोनतीन वर्षांपूर्वी एका संभावित बाईच्या क्रूर नवऱ्यानें तिचीं कोंवळीं बाळें तिच्या इच्छेविरुद्ध लोकांस देऊन टाकण्याचा प्रयत्न केला. त्या बिचाऱ्या आईला पोटच्या मुलांचा विरह सहन होईना; तेव्हां तिणें आपलीं बाळें आपल्यापाशीं राहून घेतां यावीं म्हणून निरुपायास्तव मानमर्यादेला एकीकडे गुंडाळून ठेवून, सरकारी न्यायकचेरींत "हीं मुलें माझ्या लग्नाच्या नवऱ्याचीं नाहींत," म्हणून खोटी शपथ घेतली, तेव्हां तिचीं मुलें तिला मिळालीं. सभ्य म्हणविणाऱ्या देशांतील कायदे बायकांच्या मानमर्यादेची, मातृप्रीतीची आणि देवानें दिलेल्या नैसर्गिक हक्कांची कशी पायमल्ली करतात पाहा! असले कायदे करणारे पुरुष मानुषराक्षस नव्हेत; पण "ते के न जानीमहे" ह्या वर्गांतील असावे असें वाटतें. क्यान्सस्, न्यूजर्सी आणि आयोवा ह्या तीन संस्थानांत मात्र आयांस आपल्या मुलांवर वारसा सांगतां येतो.

कांहीं वर्षांपूर्वी मासचूसेट्स् व इतर संस्थानांतून बायकांचीं प्रेतें त्यांच्या नवऱ्यांच्या प्रेतांजवळ पुरण्याचा हक्क बायकांस नव्हता, आतां हा कायदा बदलला आहे. बायकांचें लग्न झाल्याबरोबर त्या नवऱ्याच्या बंद्या होतात. धर्माचार्य त्यांकडून 'आम्हीं आपल्या पतीची आज्ञा मानूं,' अशी प्रतिज्ञा करून घेतो; त्यांच्या बापानें किंवा भावानें त्यांस दिलेली स्थावरजंगम मालमत्ता, त्यांच्या अंगावरचे डागडागिने वगैरे झाडून सारें त्यांच्या नवऱ्यांच्या हातीं जातें. कांहीं वर्षांपूर्वी बायकांनीं नेसलेल्या वस्त्रांवरसुद्धां

१ अमेरिकन् लोकसमाजांत त्यांच्या प्राचीन रानटी स्थितीच्या खाणाखुणा अद्याप शिल्लक आहेत, त्यांत विवाहित बायकांचें अत्यंत पारतंत्र्य ही खूण श्रेष्ठ आहे, असें म्हटल्यास चालेल. अमेरिकन् पुरुष आमच्या देशांतील पुरुषांसारखेच

त्यांचा हक्क नसे, पण आतां कायद्यानें नवऱ्यांस आपल्या बायकांचे पोषाक वगैरे विकून किंवा गहाण ठेऊन, आपली तुंबडी भरण्याची मनाई केली आहे.

विवाह आणि विवाहसंबंध तोडणें, ह्या विषयांचे कायदे युनाइटेड् स्टेट्-

---

निलाजरे आहेत. ते ह्मणतात कीं, "आह्मी सारा दिवस काम करून, निढळाचा घाम जिरवून, संसार चालवितों; आणि आमच्या बायकांस खाऊं पिऊं घालतों." पुरुष दररोज आठ, दहा किंवा फार झालें तर बारा तास काम करतात, पण बायकांना पुरुषांची सेवाचाकरी, मुलांची देखरेख, गृहकृत्य वगैरे करण्यांत दररोज सोळा सतरा तास अंग मोडून काम करावें लागतें. मोलमजुरी, शेतकी व दुसरे धंदे करणाऱ्या पुरुषांच्या बायका गृहकृत्य व मुलेंबाळें संभाळून आपल्या नवऱ्यांच्या बरोबरीनें काम करून, निरनिराळे धंदे करण्यांत पुरुषांस मदत देतात, ती निराळीच. असें असूनही कुटुंबाच्या उत्पन्नावर बायकोचा हक्क नाहीं; तिला एकदोन पैसे खर्चास लागले, तर ते नवऱ्याची मनधरणी करून, त्याच्या हजार प्रश्नांस समर्पक उत्तरें देऊन त्याच्यापाशीं भीक मागून घ्यावे लागतात. पण त्याणें ते देण्याचें नाकारलें, तर तिला कायद्यापुढें किंवा लोकसमाजांत आपल्या बहुकष्टार्जित मालावर हक्क सांगतां येत नाहीं इतकेंच नाहीं; तर उलट तिचा नवरा तिच्यावर आपण केवढे उपकार केले तें सांगतो आणि लोकसमाज (पुरुषसमाज) ह्मणतो कीं, पुरुष फार परिश्रम करून, पैसा मिळवून बायकांस अन्नवस्त्र देतात! अहाहा! पुरुषांचे बायकांवर केवढे उपकार हे! बायको घरांत नसल्यास, ती जितकें काम करते तेवढें काम करायाला निदान दोन तीन तरी चाकर ठेवावे लागतील. त्यांस वेतन द्यावें लागतें; चाकर कांहीं मालकाचें फुकटचें खात नाहींत, मालकानें त्यांवर उपकार केले असें ह्मणतां येत नाहीं; पण बायकोनें दहा चाकरांइतकें काम केलें, तरी नवरा तिला खायाला घालतो हे त्याचे तिच्यावर उपकारच होतात!

स्‌च्या निरनिराळ्या संस्थानांतून निरनिराळ्या प्रकारचे आहेत. ह्यामुळें सामाजिक व्यवस्थेंत फार गोंधळ होतो. ह्या देशचे सज्जनांनीं, विशेषेंकरून स्त्रियांच्या मद्यनिषेधक सभेनें व तिच्या पक्षसमर्थकांनीं विवाहसंबंधी कायदे राष्ट्रांत सर्वत्र एकाच प्रकारचे व न्यायसम्मत असे असावे, म्हणून दीर्घप्रयत्न चालविला आहे.

युनाइटेड् स्टेट्‌स्‌च्या जानपदांस अदालतींतून वगैरे आपल्या समान योग्यतेच्या बारा पंचांकडून इन्साफ मिळावा, असा नियम आहे. परंतु स्त्रियांस त्यांच्या समान योग्यतेच्या सजातीय पंचांकडून इन्साफ करून घेण्याचा हक्क नाहीं. पुरुष,—मग ते बायकांपेक्षां शतपट मूर्ख, दुर्व्यसनी किंवा कसेही असोत—राष्ट्रीय व संस्थानिक कायदे करण्यांत पुरुषांचें मत घेतल्यावांचून, कायदे करणाऱ्या मंडळीला हूं का चूं करूं देत नाहींत. पण बायका किती विद्वान्, बुद्धिमान्, विचारी आणि नीतिसंपन्न असल्या, तरी त्यांस राष्ट्रीय व स्थानिक राज्यव्यवस्थेविषयीं आपलें मत देण्याचा अधिकार नाहीं. ह्यास्तव कायद्याच्या नजरेनें पाहिल्यास, पुरुष स्त्रियांहून फार उत्तम आहेत; म्हणून त्यांनीं पंचांच्या ठिकाणीं बसून बायकांच्या खटल्यांचा तपास केल्यास, तो इन्साफ फिर्यादी बायकोच्या समान योग्यतेच्या पंचांनीं केल्यासारखा होत नाहीं. हल्लीं एक वायोमिंग उपसंस्थान शिवाय करून युनाइटेड् स्टेट्‌स्‌च्या इतर कोणत्याही भागांत हा सर्वसाधारण अमेरिकन् जानपदास असणारा मोठा महत्त्वाचा हक्क बायकांस त्या बायका, एवढ्याच कारणावरून मिळालेला नाहीं. तरी इकडच्या उद्योगी बायका आपल्यास राजकीय हक्क मिळावे म्हणून प्रयत्न करीत आहेत; त्यांचा तो प्रयत्न कालक्रमेंकरून सफलही होईल, अशीं सुचिन्हें सर्वत्र दिसून येत आहेत.

## संहत[1] प्रयत्न, राष्ट्रीय समाज.

युनाइटेड् स्टेट्स्च्या लोकसत्ताक राष्ट्राची स्थापना झाली तेव्हां बेंजामिन् फ्रांकलिन् याणें ह्या राष्ट्राच्या मुख्य शिक्यावर "ए प्लुरिबुस् उनुम्" म्ह० "बहुत मिळून एक" हें वाक्य लिहावें, म्हणून सूचना केली. आतां आपण युनाइटेड् स्टेट्स्च्या ज्या भागांत जावें तेथें सदरील वाक्य राष्ट्रीय शिक्यावर लिहिलेलें, आपल्या दृष्टीस पडतें. इतकेंच नाहीं; तर ह्या राष्ट्रांतील लोकांच्या कृतींत पदोपदीं हें वाक्य आपल्या पाहाण्यांत, ऐकण्यांत आणि अनुभवास येतें. युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्राचें बळ तोफखान्यांत, शिलेखान्यांतून किंवा अवाढव्य सैन्यांत नाहीं. तें ह्या देशच्या लोकांच्या विद्यावत्तेंत आणि सदरील वाक्याप्रमाणें "**बहुत मिळून एक,**" ह्या सत्यांत आहे. स्त्रिया अशिक्षित व साधारण लौकिकानुभवशून्य होत्या, तेव्हां त्यांस सदरील सत्याची माहिती नव्हती, म्हणूनच त्यांच्या हातून लोकहिताचीं महत्कार्यें घडून येत नव्हतीं. त्या जसजशा विद्यासंपन्न व बहुदर्शी होऊं लागल्या, तसतसें हें सनातन सत्य त्यांच्या हृदयांत उदित होऊन, दिवसेंदिवस अधिक प्रकाशमान होऊं लागलें.

आपल्या उन्नतिशीलतेबद्दल सर्व पृथ्वींत प्रसिद्धीस आलेल्या युनाइटेड् स्टेट्स्मध्यें, पन्नास वर्षांखालीं एकसुद्धां महत्त्वाची स्त्रीसभा नव्हती. स्त्रिया आपापल्या घरांत बसून किंवा एकाद्या शेजारणीच्या घरीं चारचौघी मिळून गप्पा ठोकीत, किंवा देवळांच्या, भटांच्या किंवा गरीबगुरिबांच्या मदतीकरतां शिवणकाम करीत असत. ह्याहून अधिक महत्त्वाचें कांहीं काम स्त्रियांस करतां येईल, असें कोणाच्या ध्यानीं मनीं सुद्धां आलें नव्हतें. पुरुषांना तर काय पण स्त्रि-

१ पुष्कळ मनुष्यांनीं एकत्र मिळून एकचित्तानें केलेले प्रयत्न. संहत=जुळलेले, संयुक्त.

यांना सुद्धां स्त्रीजातीची योग्यता, शक्ति आणि बुद्धिमत्ता केवढी आहे; हें मुळींच माहित नव्हतें. पन्नास वर्षांखालीं इंग्लंडांत साधारण विद्योन्नतीच्या उद्देशानें "ब्लू स्टाकिंग्स् क्लब्" नांवाची विद्योत्साही स्त्रियांची मंडळी स्थापन झाली; तेव्हां तिचे उद्देश ऐकून सर्व जगास हसूं आलें, "ब्लू स्टाकिंग्स्" हे शब्द सर्वत्र उपहासास्पद झाले. मर्यादशील म्हणविणाऱ्या स्त्रियांस स्त्रीसभेचें नांव आणि स्त्रिया सभेस जाऊन, विद्योन्नतीच्या गोष्टी बोलत आहेत; हें ऐकून, दे माय धरणी ठाय, असें होत असे. स्त्रियांनीं सभेस जाणें व सभांतून बोलणें हीं मोठींच दुष्कर्मे आहेत, असें सगळ्यांस वाटत असे. पण ह्या उन्नतिशील शतकाच्या तेजापुढें सदरील समजाचा अंधकार फार दिवस टिकला नाहीं. फ्रान्सेस् विलर्ड् ह्या अमेरिकन् सरस्वतीनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं,— "ह्या बहुस्तुत एकुणिसाव्या शतकांत पुष्कळ अद्भुत ( शास्त्रीय ) शोध करण्यांत आले; परंतु त्या सगळ्यांत स्त्रीला स्वतःचा शोध लागला, तो फारच अद्भुत आहे." अमेरिकन् स्त्रियांनीं गेल्या चाळीस वर्षांत लहानमोठ्या त्रुटी करून आपल्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या हिताकरतां जे संहत प्रयत्न केले, त्यांच्या इतिहासाचें विवेचन केलें, म्हणजे सदरील गोष्टीचें प्रत्यंतर येतें. इ० स० १८४८ सालीं लुक्रेशियामाट्, इलिजवेथ केडी स्टांटन् इत्यादि दहा पांच धैर्यशाली, उन्नतिशील विदुषी स्त्रियांनीं प्रथम एक महत्त्वाचा स्त्रीसमाज स्थापून, स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीनें विद्याध्ययन, रोजगारधंदे वगैरे करण्याचे आणि राजकारणीं हक्क मिळावे, म्हणून प्रयत्न चालविला. ह्या मितीपासून अमेरिकन् स्त्रियांच्या संहत प्रयत्नास आरंभ झाला म्हटल्यास चालेल. ह्या पुढें इ० स० १८६९ पर्यंत एकाददुसरा लहानसहान स्त्रीसमाज स्थापित झाला असेल, पण त्यानें एखादें महत्त्वाचें कृत्य करून, राष्ट्रीय समाजाचें रूप धारण केलेलें ऐकिवांत नाहीं. इ० स० १८५८ सालापर्यंत केवळ युनाइटेड स्टेट्स्मध्येंच नव्हे, तर पृ-

थ्वीवर कोठेंही "स्त्रियांचा राष्ट्रीय समाज," अस्तित्वांत आला नव्हता. ह्या मितीपर्यंत स्त्रियांना राष्ट्रीय समाज स्थापन करून, सुरळीतपणानें सगळीं कामें चालवितां येतील; ही कल्पना सुद्धां कोणाच्या मनांत आली नव्हती. इ० स० १८६० च्या सुमारास युनाइटेड् स्टेट्स्मध्यें भयंकर युद्ध माजण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. हबशी लोकांच्या दास्याविषयीं दाक्षिणात्य आणि औदीच्य (उत्तरेकडील) संस्थानांच्या लोकांमध्यें वादविवाद उपस्थित झाला; त्यामुळें दोन्ही भागांत वैराग्नि धुमसूं लागला. इ० स० १८६०–६१ त दाक्षिणात्य संस्थानांनीं उत्तरेकडच्या आपल्या देशबांधवांस 'युद्धं देहि,' म्हणून ललकारलें, तेव्हांपासून इ० स १८६५ पर्यंत त्या दोहोंभागांत जो युद्धाग्नि भडकला, त्यामुळें अमेरिकन् कुटुंबांमधून सर्वत्र एकच हाहाकार होऊन गेला. त्या यादवीपासून प्रथम दुःखदारिद्र्ययातनारूपी हालाहल विष उत्पन्न झालें खरें, परंतु त्याच्या मागून लागलींच अमृत आणि चिंतामणि यांसारखीं अद्भुत आणि तेजःपुंज अशीं दोन महारत्नें उत्पन्न झालीं.

प्रेसिडेंट् लिंकन्नें औदीच्य संस्थानांचा मोहोरक्या होऊन, अफ्रिकन् दास्यास प्राणांत शिक्षेचा दंड देऊन, दक्षिणेकडची बंडाळी मोडण्याकरतां सशक्त युद्धक्षम अमेरिकन् पुरुषांस स्वेच्छेनें सेनेंत मिळून, आपल्या देशाची अब्रू राखण्यास बोलावलें. तेव्हां उत्तरेकडच्या संस्थानांतून युद्धाची तयारी केलेली नव्हती. प्रेसिडेंट् लिंकन्च्या बोलावण्याला मान देऊन, औदीच्य शूर पुरुष रणांगणाकडे चालते झाले. तेव्हां त्यांस नेसायाचीं एकरंगी युद्धोपयोगी वस्त्रें (पायजमे बंड्या मोजे वगैरे) नव्हतीं. तीं व युद्धोपयोगी इतर सामान, यांचा पुरवठा करण्यास मंडळ्याही नव्हत्या. युद्धास प्रारंभ झाला, तेव्हां सैनिकांस नेसायाला वस्त्रें पाहिजेत, हें ऐकतांक्षणीं उत्तर संस्थानांतील बहुतेक सगळ्या गांवांच्या बायका भजनालयांतून जमून,

वस्त्रें शिवूं लागल्या. त्यांनीं प्रथम तीन महिन्यांपर्यंत सैनिकांस लागणाऱ्या शिवलेल्या वस्त्रांचा पुरवठा केला. ह्या प्रसंगीं पुष्कळांनीं एकत्र जमून काम केल्यास त्याला केवढें रूप येतें; व त्यापासून समाजास व राष्ट्रास केवढा फायदा होतो, हें स्त्रियांस कळूं लागलें.

पुढें कांहीं काळानें अमेरिकन् यादवीला भयंकर रूप येऊन जिकडे तिकडे युद्ध माजलें, तेव्हां उत्तरेकडील संस्थानांत एक "क्रिश्चन् कमिशन्" नांवाची मंडळी स्थापण्यांत आली. रणांगणांत लढत असलेल्या शिपायांस धर्मोपदेश करून, मरणसमयीं त्यांच्या जीवाला मुक्तिमार्गीं लावण्याकरतां युद्धस्थळीं कांहीं धर्माचार्य पाठवून, योद्ध्यांस पारलौकिक गोष्टींत साहाय्य करणें, हा ह्या मंडळीचा उद्देश होता. ह्या मंडळीस खर्चाला लागणारा पैसा गोळा करण्याचें काम बायकांच्या वांट्यास आलें, व मंडळीचे अध्यक्ष उपाध्यक्षांच्या वगैरे पदव्या पुरुषांनीं घेतल्या. बायकांनीं नानाप्रकारचे काबाड कष्ट करून, कोट्यावधि रुपये मिळवून मंडळीच्या चरणीं अर्पिले, ते घेऊन ह्या धार्मिक मंडळीनें योद्ध्यांस धर्मोपदेश करण्याकरतां शेंकडों धर्मोपदेशकांस युद्धस्थळीं पाठवून दिलें. मंडळीचा उद्देश फारच स्तुत्य होता, ह्यांत संशय नाहीं; परंतु युद्धस्थळीं जखमी झालेल्या, भुकेनें व तहानेनें मरत आणि यातना भोगीत असलेल्या योद्ध्यांस, धर्मोपदेश ऐकण्याची फारशी गोडी नव्हती. पण त्यांच्या जीवांचें पारलौकिक हित करायाला गेलेल्या धर्माचार्यांस योद्ध्यांच्या 'क्षणभंगुर' देहांची यातना कमी करून, त्यांचें ऐहिक हित करण्याचें ज्ञान नव्हतें. आपला हात किंवा पाय जखमी झालेला असून, त्या कठिण प्रसंगीं कांहीं ऐहिक मदतीची जरूरी असतां, ती देण्याच्या बदलीं धर्मोपदेश करीत सुटणाऱ्या भटाची बडबड बिचाऱ्या जखमी योद्ध्यास खपली नाहीं, तर त्यांत त्याची मोठीशी चूक झाली, असें म्हणवत नाहीं. ही गोष्ट ध्यानांत येऊन, दुःखी, कष्टी,

जखमी शिपायांस ऐहिक साहाय्य देण्याकरतां, एक स्वतंत्र मंडळी स्थापणें अवश्य आहे; व ह्या मंडळीनें रणांगणीं जखमी मनुष्यांची सेवाचाकरी करून त्यांचा समाचार घेण्यास बायकांची योजना करावी; असें पुष्कळ स्त्रीपुरुषांस वाटून, त्यांणीं "सानिटरी कमिशन्" नांवाची मंडळी स्थापिली.

ह्या मंडळीचें अस्तित्व आणि तिनें प्रारंभून तडीस नेलेलीं महत्कृत्यें, हीं आश्चर्यकारक होतीं खरींच; पण तीस पाठबळ देऊन, पहिल्यापासून शेवटपर्यंत तिला लागणाऱ्या प्रत्येक सामग्रीचा संग्रह करून, तिची व्यवस्था ठेवणाऱ्या अमेरिकन् स्त्रियांचे पराक्रम पाहून तर जग आश्चर्यानें थक्क झालें. ह्या मंडळीनें शेंकडोंच काय, पण हजारों रोगिशुश्रूषक बायका-पुरुष युद्धस्थळीं पाठविले. मित्रसेनेंतील (आणि शत्रूकडल्याही कांहीं अनाथ) जखमी योद्ध्यांस वेळेवर खाण्यापिण्याची योग्य व्यवस्था केली. रणांगणांत दवाखाने घातले; मेलेल्या योद्ध्यांचीं प्रेतें पुरलीं; असहाय गरीबगुरीब मनुष्यांस योग्य साहाय्य दिलें. अशीं एक का दोन, शेंकडों कृत्यें करण्यास त्या मंडळीला अतोनात पैसा व इतर सामान पाहिजे होतें; तें यावें कोठून? सरकारी खजिन्यांत पैसा नव्हता; व ह्या मंडळीचा अवाढव्य खर्च चालविण्यापुरता पैसा कोणा एकाच्या हातीं नसून, तो असला तरी तितका एकदम देण्याएवढें उदारत्व कोणाच्या अंगीं नव्हतें. ह्या प्रसंगीं सदरील मंडळीच्या कामकरी पोटमंडळींतील प्रमुख बायकांस पैसा गोळा करण्याची एक खाशी युक्ति सुचली. मेरी ए. लिवर्मोर् आणि दुसऱ्या एक दोघी बायांनीं मिळून, ही युक्ति कामीं लावण्याचा बेत ठरविला. त्यांणीं इलिनोइस् व दुसऱ्या संस्थानांतून पुष्कळ लोकांना विनंतिपत्रें पाठवून, आपला उद्देश आणि तो तडीस नेण्याला काय उपाय योजावयाचे, ते कळविले. थोडक्याच काळांत उत्तर संस्थानांतील सगळ्या वर्तमानपत्रांतून अशी वार्त्ता प्रसिद्ध झाली कीं, शिकागो शहरांत कांहीं उद्योगी

बायका मिळून एक जत्रेचा बाजार भरविणार आहेत. उपकारी लोकांनीं पाठविलेले पदार्थ उंच दरानें विकून, त्यांत मिळालेला पैसा ह्या बायका "स्यानिटरी कमिशन्" च्या खर्चास देणार. ज्या उपकारी स्त्रीपुरुषांना ह्या सत्कृत्यास साहाय्य करण्याची इच्छा असेल, त्यांणीं शिकागो शहरांत अमुक बाईच्या पत्त्यावर, आपल्यास लभ्य असतील ते उपयोगी जिन्नस पाठवावे.

ह्या जत्रेच्या उत्पादक बायांनीं असें अनुमान केलें होतें कीं, आपण हें काम सुरळीतपणें तडीस नेल्यास ह्या जत्रेच्या बाजारांतून निदान पंचवीस हजार डालरांइतका नफा होईल. हें ऐकून, विद्वान् गृहस्थ आणि सभ्य वर्त्तमानपत्रकार हंसले. ते म्हणाले, ह्या बायकांना पंचवीस हजार डालर मिळविण्याची अक्कल असणें तर लांबच राहिलें, पण त्यांनीं हा जत्रेचा बाजार आरंभिला आहे त्याची घाण झाली नाहीं म्हणजे पुरे. कोणी अति तिरस्कारसूचक मुद्रेनें, हंसून म्हणाले, अमक्या दिवशीं शिकागोंत 'बटाट्यांची वरात' निघणार आहे. पण त्या शूर, उद्योगी बायकांनीं लोकांच्या उपहासाकडे व निंदेकडे लक्ष दिलें नाहीं. त्या आपापल्या ठिकाणीं होतील तितके प्रयत्न करीत असून रात्रंदिवस मेहनत करून आपला उद्देश सिद्धीस नेण्याच्या कामीं लागल्या. इलिनोइस्‌च्या व दुसऱ्या पुष्कळ संस्थानांतील बायकांनीं शिवलेले कपडे, चमत्कारिक पदार्थ, नानाप्रकारचे मुरंबे, लोणचीं, मिठाई, इत्यादि शेंकडों जिनसा शिकागोंत धाडून दिल्या. मग नेमलेल्या दिवशीं जत्रेचा बाजार उघडला. शिकागोच्या आसपास राहणाऱ्या कांहीं शिष्ट शेतकऱ्यांनीं—ह्या परोपकारी बायकांचा उपहास करणाऱ्या लोकांच्या तोंडांत साखर घालण्याकरतांच कीं काय नकळे,—आपल्या छकड्यांतून भाजीपाला, फुलें, बटाटे, वगैरे पदार्थ लादून मोठ्या समारंभानें जत्रेच्या बाजारांत नेऊन पोंचते केले. बुद्धिमान् व्यवस्थापक

स्त्रियांनीं त्या बाजाराची व्यवस्था फार उत्तम ठेविली. हजारों प्रेक्षक मंडळी त्रिविध आशय मनांत धरून, ह्या जत्रेस गेली, परंतु तेथें गेल्याबरोबर बाजाराची सुव्यवस्था, त्याच्या उत्पादकांचें शिष्टपण, वगैरे पाहून सानंदाश्चर्य पावून, कांहींना कांहीं तरी पदार्थ विकत घेऊन गेली. ह्या जत्रेच्या बाजाराची समाप्ति झाल्यावर लोकसमाजास असें कळून आलें कीं, जत्रा भरविण्यास लागणारा सगळा खर्च पुरून तेथें विकलेल्या पदार्थांपासून जें उत्पन्न झालें, तें सदरील बाजाराच्या उत्पादकांच्या अनुमानाहून पांचपट अधिक होतें. ह्या बाजारांतून "स्यानिटरी कमिशन्" मंडळीच्या उद्योगी बायांनीं सुमारें सव्वालक्ष डालर म्ह० सरासरी पावणेचारलक्ष रुपये नफा करून घेऊन, तो पैसा 'कमिशन्'च्या उपयोगाकरितां पाठवून दिला. ह्यानंतर स्यानिटरी कमिशन्च्या मदतीकरतां पुष्कळ ठिकाणीं असे बाजार भरविण्यांत आले. न्यूयार्क आणि फिलाडेल्फिया ह्या शहरांतून शेवटले दोन बाजार भरविण्यांत आले होते, त्यांतून पहिल्यांत दहालक्ष डालर म्ह० तीस लक्ष रुपये आणि दुसऱ्यांत बारा लक्ष डालर म्ह० छत्तीस लक्ष रुपये नफा झाला. बायकांनीं ह्या बाजारांची कल्पना काढली, त्यांनींच अथपासून इतिपर्यंत त्यांची सगळी व्यवस्था ठेवली; त्यांत विकलेले लहान मोठे बहुतेक सगळे पदार्थ हजारों लक्षावधि बायकांनींच तयार करून पाठविले. ही बायकांची कर्त्तबगारी, हा व्यवस्थेशीरपणा, ही राजकारणी खोलबुद्धि, दूरदृष्टि, आणि दीर्घप्रयत्न पाहून,—आपल्याच आंगीं हे सर्व गुण आहेत म्हणून अहंकार मानून, बायकांना व्यवहारिक व लौकिक कामें करण्याची अक्कल नाहीं अशी वटवट करणाऱ्या—पुरुषांनीं तोंडांत बोटें घातलीं; आणि बायकांची खरी योग्यता ओळखणाऱ्या सज्जनांनीं त्यांस शाबासकी दिली.

" स्यानिटरी कमिशन् " ही मंडळी एक प्रकारची राष्ट्रीय उपकारी मंडळी होती; तींत प्रथम बायकांना लहानमोठ्या हुद्द्यांवर राहून पुरुषांच्या

बरोबरीनें कामें करण्याचा प्रसंग मिळाला. ह्या मंडळीच्या मदतीकरतां जमविलेल्या जत्रांतून व बाजारांतून जे अगण्य फायदे झाले, व अचाट कृत्यें आरंभून तडीस गेलीं, त्यांच्या योगानें बहुतांनीं थोडें थोडें काम करून एकविचारानें सुरळीत, व्यवस्थेशीर कामें केल्यास केवढे महान् महान् उद्देश साधतां येतील, हें सत्य स्त्रियांस उत्तम रीतीनें समजून आलें. आणि स्त्रियांना विद्या, स्वातंत्र्य आणि काम करण्याची मोकळीक मिळाल्यास त्यांच्या हातून केवढालीं कृत्यें सिद्धीस जातात, हें जगास कळून आलें. इंग्लंडच्या प्रसिद्ध परोपकारी फ्लोरन्स् नाइटिंगेल् नांवाच्या बाईनें इंग्लिश् चालीचा पडदपोशीपणा एकीकडे ठेवून, क्रिमियाच्या लढाईंत जाऊन, जखमी शिपायांची सेवाशुश्रूषा करून, युद्धस्थळीं रोग्यांची सुव्यवस्था ठेवून, जगांतील सर्व दयाळू स्त्रियांस उत्तम कित्ता घालून दिला. अमेरिकन् बायकांनीं नाइटिंगेल् बाईचा कित्ता किती उत्तम रीतीनें वळविला तें इ० स० १८६० पासून १८६६ पर्यंत पांच सहा वर्षांचा अमेरिकन् इतिहास वाचल्यानें, चांगलें कळून येतें. अमेरिकन् यादवी प्रारंभ झाल्यावर ती समाप्त होई तोंपर्यंत उत्तर संस्थानांतील स्त्रियांनीं आपलीं घरें संभाळून, पुरुषांचे रोजगार धंदे व इतर कामें संभाळलीं; "क्रिश्चन्" आणि "सानिटरी कमिशन्" ह्या परोपकारी सभांस लागणारे असंख्यात पदार्थ व कोट्यावधि रुपये जमा करून आणून दिले इतकेंच नाहीं; तर शेंकडों हजारों उपकारी स्त्रिया रणस्थळीं जाऊन, थकल्या, भागल्या, जखमी व मरणोन्मुख झालेल्या योद्ध्यांचा समाचार घेऊन रात्रंदिवस त्यांच्या सेवेंत खपूं लागल्या. त्यांनीं उभ्या दुपारीं किंवा मध्यरात्रीं वेळ, अवेळ, तहान, भूक, शारीरिक सुख इत्यादि सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष्य करून, तुंबळ युद्ध चालत असतां आणि इतर समयीं, जेथें म्हणून कोणाला कांहीं साहाय्य देण्याची आवश्यकता असे तेथें स्वतः जाऊन, वेळेवर सर्वांस मदत केली. शेंकडों कोट्याधीश धनिक

स्त्रियांनीं सुखसंपत्तीचीं माहेरघरें आपलीं घरें टाकून, रणांगणांत गेलेल्या देशबांधवांच्या दुःखशमनाकरितां वनवास डोक्यावर घेतला, व तेथें आपला प्राण धोक्यांत घालून, नानाप्रकारचीं सत्कृत्यें करण्यांत शरीरसंपत्ति व स्थावरजंगम मालमत्ता आणि आपले अमोलिक प्राणसुद्धां खर्ची घातले. धन्य त्या साध्वी परोपकारिणी माउल्यांची !

इ. स. १८६५ पासून आजपावेतों युनाइटेड् स्टेटस्मध्यें पुष्कळ स्त्रियांचे समाज स्थापित झाले आणि पुढें होतील. केवळ युनाइटेड् स्टेट्स्मध्येंच नव्हे, तर इंग्लंड्, फ्रान्स्, जर्मनी, फिन्लंड्, नार्वे, इटाली इत्यादि राष्ट्रांतून स्त्रियांचे स्थानिक आणि राष्ट्रीय समाज स्थापित झाले आहेत. त्यांचे उद्देशही पुष्कळ प्रकारचे आहेत. हे स्त्रियांचे राष्ट्रीय समाज अस्तित्वांत येण्यास कारण काय म्हणाल, तर युनाइटेड् स्टेट्स्च्या यादवी युद्धाचेवेळीं स्यानिटरी कमिशन् वगैरे मंडळ्यांच्या द्वारें बायकांच्या अंगीं असलेली कर्त्तबगारी जगापुढें आली आणि बायकांस आपली योग्यता व शक्ति केवढी आहे, बहुतांनीं मिळून एक विचारानें एकादें कृत्य केल्यास त्या संहत प्रयत्नाच्या योगानें केवढालीं अचाट कृत्यें करवतात, हें कळून आलें, हें होय. तेव्हां स्त्रियांनीं ह्या नवीनच लागलेल्या शास्त्रीय शोधाचा चांगला उपयोग करण्यास आरंभ केला. ह्या वीस पंचवीस वर्षांच्या आंत कांहीं नाहीं तरी तीस, चाळीस स्त्रियांचे राष्ट्रीय समाज स्थापित झाले असून, त्यांचीं कार्यें उत्तम व सुव्यवस्थितपणें चाललीं आहेत. अमेरिकन् यादवी समाप्त होऊन स्यानिटरी कमिशन्चें विसर्जन झाल्यावर, युनाइटेड् स्टेट्स्मध्यें शेंकडों किंबहुना हजारों स्त्रियांच्या लहान मोठ्या सभा अस्तित्वांत आल्या. पन्नास वर्षांपूर्वी ज्या शब्दाचें उच्चारण करणेंसुद्धां लाजिरवाणें आहे असें स्त्रियांस वाटत असे, तो शब्द आज सर्वत्र सर्वमान्य झाला आहे. हल्लीं हजार बाराशें रहिवाशी ज्यांत राहातात अशा एखाद्या तरी गांवीं स्त्रियांची एकाददुसरी

सभा नसेल, असा गांव विरळा. लहान गावांतून व मोठ्या शहरांतून जेथें जावें तेथें स्त्रियांच्या "विद्योत्तेजक" "परस्पर सुधारक" "गरीबांच्या साहय्यकारक" "मद्यपाननिषेधक," "नीतिप्रसारक," "मित्रत्ववर्धक," "अनाथरक्षक," "बालरक्षक," "कैद्यांच्या कैवारी," "पतितबायकांचा उद्धार करणाऱ्या," "संगीतोत्तेजक," "परोपकारी," "धर्मसंरक्षिणी," "क्रौर्यनिवारक," "शिक्षणसुधारक," "प्रवासिमित्र," "कामकरीबायकांची देखरेख करणाऱ्या," "बाळशिक्षणसुधारक," "राज्यकारणीं हक्क मागणाऱ्या," "सामाजिक उन्नति करणाऱ्या," "स्त्रियांची उन्नति करणाऱ्या," "धर्मप्रसार करणाऱ्या," "निर्दोषानंदवर्धक," अशा एक का दोन, शेंकडों निरनिराळ्या तऱ्हेच्या स्त्रीसभा कायावाचामनसा सत्कृत्यें करून, समाजाची आणि राष्ट्राची उन्नति करण्याच्या कामांत तत्पर आहेत. पन्नासवर्षांखालीं बायका अज्ञानी असल्याकारणानें, संहत प्रयत्नाची योग्यता केवढी आहे हें न जाणून, आपापल्या ठिकाणीं मनास वाटेल त्या रीतीनें आलाहिदा राहून धर्म, परोपकार इत्यादि कार्यें करीत होत्या; म्हणूनच त्यांच्या हातून कांहीं मोठेंसें काम घडलें नाहीं. आतां अज्ञानाचें राज्य जाऊन, ज्ञानाचें मन्वंतर सुरू झालें आहे. पुष्कळांनीं एकत्र जमून एकमेकांचा सल्ला घेऊन, एक विचारानें संहत प्रयत्न केल्यास पुष्कळ मोठाले फायदे होतील, हें बायकांस कळून आलें आहे. आतां बायका युनाइटेड् स्टेट्स्‌च्या राष्ट्रीय उन्नतीच्या सत्कृत्यांत पुरुषाच्यासमान भागीदार होत आहेत. स्थलसंकोचास्तव मला येथें फार स्त्रीसभांचें वर्णन करतां येत नाहीं, तरी त्यांपैकीं कांहींकांचें स्वरूप व त्यांणीं केलेल्या ठळक ठळक कृत्यांचा संक्षेपानें विचार करूं.

---

१ ह्या ठिकाणीं ज्यांचा संक्षिप्त वृत्तांत सांगितला आहे, त्या सगळ्या सभा स्वतंत्र व निरनिराळ्या उद्देशानें स्थापिलेल्या असूनही, त्यांचा एकमेकांशीं इ-

कोणत्याही देशांत जाऊन पाहा, स्त्रिया ह्या धर्माच्या व नीतीच्या रख-वालदारणी आहेत, असें आपल्या प्रत्ययास येईल. पवित्र व धार्मिक आ-चरण, दानधर्म, ईश्वरभक्ति, धर्मसंरक्षणाकरतां सर्वत्याग करणें, इत्यादि-कांहींकरून, सर्व देशांतील, सर्व जातींतील स्त्रिया स्वधर्माचें संरक्षण करीत आहेत. अलीकडे चाळीस वर्षांत ख्रीस्तधर्मी राष्ट्रांतील स्त्रियांचे हे अ-मोलिक सद्गुण उघाडकीस येऊन, त्यांस स्वविवेकानुसार स्वतंत्रपणें धर्मकृत्यें करण्याची सवड सांपडली असल्यामुळें, जगाचें मोठें हित होत आहे. सुमारें पंचवीस वर्षांखालीं ह्या देशांत स्त्रियांची मिशनरी ( धर्मप्रसारक ) मंडळी प्रथम स्थापित झाली. आतां बहुतेक सगळ्या ख्रिस्ती पंथांच्या लोकांतून बायकांच्या धर्मप्रसारक मंडळ्या स्थापलेल्या आहेत. त्या सगळ्यांत मिळून सुमारें पंधरालक्ष बायका त्या मंडळ्यांच्या सदस्या असून, दरवर्षी वीस लक्ष डालरांहून ( म्ह० ६० लक्ष रुपयांहून ) अधिक वर्गणी देऊन, आपल्या प्रतिनिधींच्या व मंडळ्यांच्या अध्यक्षांच्या द्वारें धर्मप्रसाराकडे आणि निरा-श्रितांस मदत देण्याकडे त्या पैशाचा उपयोग करतात. ह्या सगळ्या स्त्रियांच्या मिशनमंडळ्या दरवर्षी धर्मोपदेशपर वर्त्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांच्या सवालक्षांवर प्रती छापून, सर्वत्र लोकांस वाचायाला देतात. ह्याशिवाय कोट्या-

---

तका निकट संबंध आहे कीं, एका सभेनें हातीं घेतलेलें एकादें महत्त्वाचें काम सिद्धीस नेण्यांत इतर स्त्रीसभांनीं हस्तें परहस्तें सहाय्य केलें नाहीं, असें उदा-हरण मिळणें दुरापास्त आहे. ह्यामुळें अमुक एक सत्कृत्य केल्याचें पूर्ण यश अमक्यासच सगळें मिळालें, असें निश्चयानें ह्मणतां येत नाहीं. अमेरिकन् स्त्रीसभा एकादें काम केल्याबद्दल सगळें यश आपल्यास मिळालें नाहीं, ह्मणून इतर सभांविषयीं मत्सरबुद्धि बाळगीत नाहींत, इतकेंच नव्हे; तर त्या सर्वदा एकमेकांस सहाय्य करण्यास तयार असून एकमेकांच्या जयाबद्दल व कृतार्थते-बद्दल परमानंद पावतात, हें त्यांस भूषण आहे.

वधि लहान लहान धर्मोपदेशपर पत्रकें छापून चोहोंकडे वांटतात. ह्या मंडळ्यांतील स्त्रिया वर्षांतून पांच लक्ष सभा भरवून त्यांतून धर्मपर भाषणें करतात, निबंध वाचतात, व मोठाल्या विद्वान् व प्रख्यात वक्त्यांकडून भाषणें करवितात. सदरील मंडळ्यांचें व सभांचें काम सगळें बायकाच चालवितात. त्यांतून अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीशिणी, व्यवस्थापक, वक्त्या, उपदेशक, खजीनदारणी, वर्त्तमानपत्रकर्त्या, मासिक पुस्तकांच्या कर्त्या, इत्यादि सगळ्या हुद्देदार बायका असून, त्याच सर्व प्रकारचें काम करीत आहेत. त्या केवळ आपणच धर्मकृत्य करून उगीच बसत नाहींत; तर आपल्या लहानग्या मुलांस आणि मुलींस बाळपणापासून ह्या धर्मप्रसारार्थ उद्योग करीत असलेल्या सभांतून घेऊन जाऊन, व पुष्कळ प्रसंगीं केवळ मुलांकरतांच मुलांच्या सभा भरवून, त्यांस धर्मकृत्यें व परोपकार करण्याची अभिरुचि लावून देतात. त्या बरोबर पुष्कळांनीं एकत्र मिळून एक विचारानें कांहीं केल्यास, त्या कामाला केवढी बळकटी येते, व अशा रीतीनें एकमेकांशीं स्नेहानें वागून परस्परांचा सन्मान राखल्यास आपल्याला केवढें सुख होतें, ह्या सत्यांचा ठसा मुलांच्या कोमल, निर्मल हृदयांवर चांगला उमटवून देतात. स्त्रियांच्या मिशनरी मंडळ्यांचें वर्णन करीत असतां एका परम प्रतिष्ठित अमेरिकन् विदुषीनें असें म्हणून दाखविलें कीं—

"पंचवीस वर्षांमागें आमच्या देशी स्त्रियांस सभांतून भाषणें करणें, निबंध वाचणें, सभाध्यक्षाच्या पदावर बसणें, धर्मोपदेश करणें, वर्त्तमानपत्रे चालविणें इत्यादि कृत्यें करण्यापेक्षां चंद्रलोकाचें पर्यटन करून येणें हें अधिक सोपें वाटलें असतें."

हा स्त्रियांचा प्रचंड धर्मप्रसारक समाज अस्तित्वांत आल्यापासून स्त्रियांस दिवसें दिवस आपली योग्यता व शक्ति केवढी आहे हें अधिकाधिक समजून येऊं लागलें. पूर्वीं इतर देशांतून धर्मप्रसार करण्यास केवळ पुरुष उप-

देशकच मिशनमंडळ्यांचे दूत बनून जात असत. ते विवाहित असल्यास मात्र त्यांच्या बायकांना आपल्या नवऱ्यांबरोबर जातां येत असे. पण, त्यांस धर्मोपदेश करण्याची परवानगी व फुरसतही नसे. त्या काळांत बायकांना मुळीं धर्मोपदेशच करतां येणार नाहीं, असा सगळ्यांचा समज होता; मग त्यांणीं एकट्या दूर देशांत जाऊन धर्मप्रसार करण्याची गोष्ट तर लांबच राहिली. हल्लीं सगळ्या कडकडीत ख्रिस्ती मंडळ्यांतून जरी स्त्रियांस धर्माचार्याची दीक्षा देत नाहींत, तरी त्यांमधील शेंकडों अविवाहित आणि विधवा शिक्षित, धार्मिक बायका एकट्यादुकट्या देखील स्वदेशीं किंवा दूरदेशीं हजारों कोसांवर जाऊन, तेथील गरीब आणि श्रीमंत घराण्यांतील स्त्रियांस असत्याच्या व अज्ञानाच्या कचाट्यांतून सोडविण्याच्या सत्कृत्यांत एकनिष्ठेनें तत्पर आहेत. त्यांच्या देशी स्त्रियांच्या धर्मप्रसारक मंडळ्या ह्या धर्मप्रसारक बायकांचा खर्च चालवितात. त्यांनीं स्थापलेल्या मुलांच्या व मुलींच्या शाळांचा खर्च चालवून त्यांचा सांभाळ करतात, आणि त्यांस लागणारी सर्व प्रकारची सामग्री व मदत पाठवितात.

## स्त्रियांच्या जुटी.

ह्याप्रमाणें धर्मप्रसाराकरतां स्त्रियांचे समाज स्थापन होऊं लागल्यावर, कित्येक विदुषी दूरदर्शी बायकांना स्त्रियांच्या "जुटी" अस्तित्वांत आणण्याची उत्कट इच्छा उत्पन्न झाली. सभा आणि जुटी ह्या जरी बहुतांशीं एकाच प्रकारच्या आहेत, तरी त्या दोहोंत एक महत्त्वाचा भेद आहे. समाज किंवा सभा म्हणजे कोणत्या तरी एका मुख्य उद्देशानें स्थापिलेली मंडळी; तो उद्देश साधणें ज्यांस इष्ट असेल अशा एक मताच्या व्यक्तींनांच त्या मंडळीचे सभासद होतां येतें. जुटी स्थापण्यामध्यें असा एकच उद्देश नसतो. निरनिराळ्या प्रकारच्या नाना मतांच्या लोकांचा समावेश

जुटींत होत असून, एकाद्या जुटीला बहुत प्रकारचीं कार्यें करतां येतात. त्यांतील सभासदांचीं मतें व विचार करण्याच्या रीति निरनिराळ्या असल्यानें, "जुटींत" ज्या गोष्टीचा ऊहापोह होतो, तिच्याबद्दल पुष्कळांचीं पुष्कळ मतें ऐकून, प्रत्येक सभासदास बहुदर्शन प्राप्त होतें. स्त्रियांस ह्या प्रकारचें बहुदर्शन मिळणें अवश्य आहे, असें जाणून कांहीं उद्योगी अमेरिकन् बायकांनीं वीस वर्षांखालीं "सरोसिस्" नांवाची पहिली अमेरिकन् स्त्रियांची "जूट" स्थापन केली. सरोसिस् हा शब्द हेल्लेणी (ग्रीक) भाषेंतला असून त्याचा अर्थ समुदाय, किंवा पुष्कळांचें एकवटणें असा होतो. "सरोसिस्" जूट अस्तित्वांत आली, तेव्हां बहुतांस वाटलें कीं तिचा उपयोग काय? स्त्रियांच्या मिशनरी सभा आहेतच, मग जुटी कशाला पाहिजेत? ह्या जुटीनें जिचा कित्ता घ्यावा अशी एकही जूट त्यापूर्वी कोठें नव्हती. "सरोसिस्"च्या उत्पादकांनीं ह्या जुटीचा अमुक एकच उद्देश आहे असें कोणास स्पष्ट सांगितलें नाहीं, तरी त्यांच्या मनांत ह्या जुटीच्या हातून एक महत्कार्य करवावयाचें होतें. त्या काळीं स्त्रियांस पुरुषाप्रमाणें व्यवहारज्ञान नसून, पुष्कळ निराळ्या विचारांच्या बायकांचें एकमेकींशीं दळणवळण नसल्यामुळें, स्त्रिया आपापल्या ठिकाणीं बसून कूपमंडूकांसारख्या कोत्या बुद्धीच्या, दुराग्रही आणि दोष शोधून काढून लोकांवर टीका करण्यांत तत्पर अशा होत्या. बहुसमागमांत बहुविध मतांचें ज्ञान झाल्यास, हा अज्ञानमूलक दुराग्रह नाहींसा होऊन, बायकांना एकविचारानें वागून सोप्या रीतीनें पुष्कळ प्रकारचीं मोठालीं सत्कृत्यें करतां येतील, हें सत्य सरोसिस्‌च्या सृष्टिकर्त्यांस माहित होतें. सरोसिस्‌ची स्थापना झाल्यावर जुटीपासून होणारे पुष्कळ फायदे सर्वांच्या प्रत्ययास आले. सरोसिस्‌नें लवकरच ज्ञानवर्द्धक, मैत्रीवर्द्धक, परोपकारी, अनाथरक्षिणी, इत्यादि नानाप्रकारचें जंगी विश्वरूप धारण केलें. ह्या जुटीनें न्यू यार्क शहरांतील

अनाथ, टाकून दिलेल्या मुलांच्या अवस्थेचा व त्यांच्याकरतां स्थापिलेल्या अनाथगृहांच्या स्थितीचा तपास करून, त्यांची माहिती लिहून प्रसिद्ध केली. ह्याच जुटीनें असलेल्या अनाथगृहांची सुधारणा करून दोन नूतन अनाथबालकगृहांची स्थापना करविण्याचें श्रेय घेतलें. तिणेंच न्यू यार्क शहरांतील कारखान्यांतून वगैरे कामास राहिलेल्या बायकांच्या स्थितीचा तपास करून, कोणत्या कारखान्याचे मालक आपल्या चाकरिणीस कशा रीतीनें वागवितात व त्या कामकरिणी बायकांच्या स्थितींत कोणकोणत्या तऱ्हेची सुधारणा केली पाहिजे, हें लोकसमाजास विदित करून, सदरील बायकांचें मोठें हित केलें. ह्याच जुटीनें प्रथम न्यू यार्क युनिवार्सिटीच्या व कलंबिया विद्यालयाच्या चालकांस अर्ज पाठवून, त्या विद्यालयांतून स्त्रियांसही पुरुषांप्रमाणें अध्ययन करण्याचा हक्क द्यावा, अशी विनंति केली. ह्या जुटीनें जीं शेंकडों फार महत्त्वाचीं व लोकहिताचीं कामें केलीं, त्यांचें वर्णन स्थलसंकोचास्तव येथें करतां येत नाहीं. "सरोसिस्" मध्यें धर्ममतें, राजकारणी गोष्टी व स्त्रियांचे राजकारणी हक्क ह्या तीन विषयांची वाटाघाट करण्याची मनाई आहे. कारण ही जूट सगळ्या प्रकारच्या सभ्य स्त्रियांस ज्ञान देण्याच्या व परोपकार करण्याच्या उद्देशानें स्थापण्यांत आली आहे, तेव्हां धर्मप्रकरणीं वगैरे भाषण करतांना सदस्यांचे एकमेकींशीं वितुष्ट पडूं नये, म्हणून अशी व्यवस्था केलेली आहे. पण सरोसिस्च्या सदस्यांस सदरीं सांगितलेल्या तीन विषयांची गोडी नाहीं असें कोणी समजूं नये. "न्यू इंग्लंड् वोमन्स् क्लब्" "न्यू सेंचुरी क्लब्" वगैरे ज्या पुष्कळ जुटी सरोसिस्च्या लेंकी आहेत, त्यांतून त्या विषयांचा ऊहापोह होत असतो इतकेंच नाहीं; तर त्यांणीं सर्व मतांच्या स्त्रियांस आपल्या समाजांत बोलावून निःस्पृहपणें भाषण करून आपलीं मतें परस्परांस कळवून, कोणाचें कोणाशीं वितुष्ट न आणतां उन्नतिशील मतांचा सर्वत्र प्रसार करण्याचें महाव्रत घेतलें आहे.

ह्या बायकांच्या सभा आणि जुटी केवळ पुरुषांच्या कृतीचें अनुकरण आहे, असें कोणी गोमाजी म्हणतात, पण मीं युनाइटेड् स्टेट्स्मध्यें पाहिलेल्या कित्येक स्त्रीसमाजांशीं आणि जुटींशीं पुरुषांचा कांहीं संबंध नाहीं. बायकांच्या धर्मप्रसारक, मद्यनिषेधक सभा, आणि जुटी ह्यांची मूळस्थिति आणि वाढ, ह्या स्त्रियांच्याच हातून झाल्या आणि होत आहेत. पुरुषांच्या जुटी तितक्या केवळ राजकारणी विषयांची वाटाघाट करण्यास, शुष्क गोष्टीश्राद्ध करणें किंवा आख्यापाख्यांचा नाहीं तर चेंडुफळीचा खेळ खेळून किंवा अशाच दुसऱ्या उपायांनीं मनोरंजन करण्याच्या उद्देशानें, स्थापिलेल्या असतात. परोपकार, विद्योन्नति, अनाथरक्षण, परदुःखपरिहार, वगैरे करण्याकडे त्यांचा फारसा कल नसतो. ह्या पुरुषांच्या जुटींतून सभ्य स्त्रियांचा प्रवेश नसल्यामुळें, तेथें मद्यपान, अशिष्टरीतीचें भाषण इत्यादि अपायकारक व्यसनांचा सुकाळ असतो, असें मीं पुष्कळांच्या तोंडून ऐकिलें आहे. हें खरें असल्यास स्त्रियांच्या जुटींतून पुरुषांच्या जुटींच्या अनुकरणाचा लेशही नाहीं, हें सांगण्यास मला फार संतोष व अभिमान वाटतो.

सरोसिस्ची स्थापना झाल्यावर लवकरच आणखी एक फार महत्त्वाच्या प्रख्यात जुटीची स्थापना झाली. तिचें नांव "वोमन्स् कांग्रेस्" असें आहे. ही जूट स्त्रियांच्या विद्यावृद्धीकरतां पुष्कळ श्रम घेते; म्हणून तिला "स्त्रियांच्या उन्नत्यर्थ स्थापिलेला समुदाय" असेंही म्हणतात. युनाइटेड् स्टेट्स्मधील अनेक ठिकाणच्या उत्तम विदुषी, दूरदर्शी, अनुभवी, व विद्योत्साही स्त्रिया ह्या जुटीच्या सदस्या आहेत. पुष्कळ ठिकाणीं त्या जुटींच्या व्यवस्थापक मंडळ्या असून, दरवर्षीं एकवार कोणत्या तरी नेमलेल्या ठिकाणीं हा समुदाय भरतो. त्या प्रसंगीं विदुषी बाया निरनिराळ्या राजकारणी, सामाजिक सुधारणा, लोकस्थिति, विद्या, कला, शास्त्रीय विषय, काव्यें, इतिहास इत्यादि गहन विषयांवर प्रौढ आणि विचारपूर्ण निबंध लिहून वाच-

तात; आणि भाषणें करतात. तिच्या सदस्यांचा प्रतिष्ठितपणा, विद्वत्ता आणि थोरवी यांमुळें युनाइटेड् स्टेट्स्मध्यें ह्या जुटीचें प्राधान्य मोठेंच आहे. "न्यू इंग्लंड् वोमन्स् क्लब्" नांवाची आणखी एक प्रख्यात बायकांची जूट बोस्टन् शहरांत आहे. तिचाही उद्देश "वोमन्स् कांग्रेस्" प्रमाणें विद्यावृद्धि करण्याचाच आहे. ह्या विद्यावर्द्धक जुटी केवळ पुस्तकी विद्येचाच प्रसार करतात असें नाहीं; त्यांची स्थापना झाल्याबरोबर सदस्यांनीं स्त्रीजातींत आज कोणकोणत्या गोष्टींची उणीव आहे, व ती दूर करण्यास काय उपाय करावे, ह्याविषयीं परस्परांचा विचार घेऊन व्यावहारिक कामें करण्याचें, शिकण्याचा निश्चय केला. व्यवहारज्ञान आणि सभांची व समाजांची व्यवस्थापद्धति शिकून, त्यांचा उपयोग त्यांणीं स्वदेशीं निरनिराळ्या कामांत राबत असलेल्या स्त्रियांची स्थिति सुधारण्यांत व त्यांचें दुःख परिहार करण्यांत केला, व करण्याचा क्रम चालू ठेविला आहे. फिलाडेल्फिया शहरांतील "न्यू सेंचुरी क्लब्" नांवाची स्त्रियांची जूट उन्नतिशीलता व परहितकारिता ह्या तिच्या अमोलिक गुणांवरून फार प्रख्यातीस आली आहे. ह्या जुटीच्या प्रयत्नानें एक "वार्किंग् वोमन्स् गिल्ड्" नांवाची मंडळी स्थापित झाली आहे, निरनिराळे रोजगारधंदे करणाऱ्या सातशांहून अधिक बायका ह्या मंडळीच्या सभासद आहेत. कारखान्यांतून, दुकानांतून वगैरे कामधंदे करून, आपण आपलें पोषण करून घेणाऱ्या बायकांसच केवळ ह्या मंडळींच्या सदस्या होतां येतें. मंडळीच्या सभागृहांत दररोज सायंकाळीं एक दोन तास निरनिराळ्या विषयांचें शिक्षण देण्यांत येतें. रोज सहा किंवा सात वर्गांतून शेंकडों स्त्रियांना आपल्यास हवे ते विषय शिकण्याची सोय आहे. पाकक्रिया, शिवणकाम, कशीदा काढणें, विणणें, व्यायाम हे विषय शिकण्याची आवड थोडीबहुत सर्वांसच आहे. पण ह्या मंडळीच्या सदस्यांपैकीं पुष्कळांस ज्यांची विशेष गोडी आहे, ते विषय

म्हटले म्हणजे काव्यें, इतिहास आणि भाषा हे होत. ह्या मंडळींत एक वि-शेष वर्ग आहे, त्यास "श्रवणमननवर्ग" म्हणतात. ह्या वर्गांतील वा-यका तत्वज्ञान आदिकरून सगळ्या गहन विषयांचें श्रवण व मनन करून, त्यांची वाटाघाट करतात, तेव्हां शिक्षित श्रोतृजनांस त्यांची गहन विचार-शक्ति व खोलबुद्धि पाहून, आश्चर्य वाटतें. "न्यू सेंचुरी क्लब्" सारख्या उद्योगी, उपकारी स्त्रियांच्या जुटीनें ह्या प्रकारची मंडळी स्थापण्याचें मनांत आणलें, म्हणूनच ह्या काबाड कष्ट करून आपलें पोषण करून घेणाऱ्या बायकांस विद्या, सत्समागम व कठिण प्रसंगीं आश्रय मिळण्याची सोय झाली. आलीकडे "न्यू सेंचुरी क्लब्" नें घालून दिलेला कित्ता वळवून इतर पुष्कळ ठिकाणच्या संभावित शिक्षित स्त्रियांनीं कामकरी बायकांच्या उन्नत्यर्थ आणि अनाथ, गैरमाहितगार तरुण स्त्रियांच्या हितार्थ व नीति-संरक्षणार्थ, "वर्किंग् वोमन्स् गिल्ड्" ह्या मंडळी सारख्या पुष्कळ मं-डळ्या स्थापिल्या आहेत. त्यांच्या योगानें कामकरी बायकांचें आणि लोक-समाजाचें किती हित होतें, त्याची इयत्ता कोणाच्यानें करवणार नाहीं.

बोस्टन् शहरांत "वोमन्स् एज्युकेशनल् एन्ड् इंडस्ट्रियल् युनिअन्" म्ह० स्त्रियांची विद्यावर्धक आणि उद्योगवर्धक समिति नांवाची एक समिति आहे. सुशिक्षित, अनुभवी व प्रतिष्ठित घराण्यांच्या स्त्रिया ह्या समितीच्या व्यवस्था-पक असून, त्या पाळीपाळीनें समितिगृहांत येऊन तिचें काम पाहातात. हल्लीं ह्या समितीचीं चार खातीं आहेत; पुढें अवश्य वाटल्यास आणखी पा-हिजे तितकीं खातीं जोडतां येतील.

"पाहुणचारखातें" ह्या नांवाच्या खात्यांत त्या मंडळीच्या व्यवस्थापिका दर आठवड्यास एकदां मित्रमंडळीस, समितीच्या सदस्यांस आणि तिच्या हितेच्छूंस आपल्या समितिगृहांत बोलावून, त्यांचें आदरातिथ्य करतात; ह्या प्रसंगीं सर्वांस बोलावण्यावांचून तेथें जाण्याची मोकळिक आहे. नि-

यमित व्यवस्थापकमंडळीशिवाय आणखी कित्येक माहितगार सभ्य स्त्रिया, ह्या समितीचा आश्रय व मदत मागायाला येणाऱ्या बायकांच्या अडचणींचा वगैरे तपास करून, समितीस शक्त्यनुसार सहाय्य करतात. "धंदेखातें" ह्या नांवाच्या खात्यांत गरीब व उद्योगधंदे करूं इच्छिणाऱ्या बायकांनीं केलेले पदार्थ घेऊन ते चांगल्या दरानें विकून आलेला पैसा, ज्यांचा त्यांस देण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यांत सातशेंहून अधिक बायका कांहींना कांहीं पदार्थ स्वतः तयार करून, आणून देतात. गतवर्षी ह्या खात्यांतून सुमारें सव्वीस हजार डालर म्ह० अठ्याहत्तर हजार रुपये किंमतीचा माल विकण्यांत आला. "कामधंदेखातें" ह्या नांवाच्या खात्यांत चाकरी किंवा मोलमजूरी करूं इच्छिणाऱ्या गरीबगुरीब बायकांस किंवा शिक्षकपद मिळवूं इच्छिणाऱ्या शिक्षित स्त्रियांस योग्य कामें हुडकून व चाकऱ्या लावून देण्याची व्यवस्था केलेली आहे. ह्या खात्यांत "फराळाचें घर" म्हणून एक पोट खातें आहे. तेथें माफक दरानें खाण्यापिण्याचे पदार्थ खरेदी करितां येतात. चाकरिणी, मजुरणी इत्यादिकांकडून काम करून घेऊन काम करवून घेणारांनीं त्यांस योग्य मजूरी न दिल्यास, त्या मजूरणींनीं ह्या मंडळीच्या "रक्षक खात्या"पुढें आपलीं गाऱ्हाणीं आणावीं, म्हणजे हें खातें त्या बायकांस न्याय मिळवून देतें. ह्या समितीचें रक्षक खातें बोस्टन् शहरांत सर्वत्र प्रसिद्ध आहे इतकेंच नाहीं; तर अन्यायी लोकांस ह्या खात्याचा फार दरारा आहे. विद्वान् व प्रख्यात परोपकारी वकील ह्या खात्याच्या तर्फे सरकारी न्यायगृहांतून गरीबगुरीब बायकांचे मुकदमे फुकट चालवितात. कोणी अन्यायी मनुष्यानें काम घेऊन मजूरी न दिल्यास त्याला बोस्टन्च्या ह्या स्त्रियांच्या समितीच्या "रक्षक खात्या"पुढें फिर्याद आणण्याचा आपला उद्देश आहे असें सांगितलें कीं पुरे; दांडग्या व्यक्ती तेव्हांच ताळ्यावर येतात.

ह्या मंडळीच्या धर्तीवर स्थापिलेल्या आणखी पुष्कळ मंडळ्या युनाइटेड

स्टेट्स्‌मध्यें शेंकडों ठिकाणीं आहेत, त्यांस "वुइमेन्स् एक्स्चेञ्जेस्" असें नांव आहे. त्या सगळ्या स्त्रियांनीं चालविलेल्या असून, स्त्रियांनीं करून आणलेल्या वस्तु चांगल्या दरानें विकून, गरीब, काम करून चरितार्थ चालविणाऱ्या व निराश्रित अशा बायकांस मदत करणें हा त्यांचा उद्देश आहे. कोठें कोठें अशा "एक्स्चेञ्ज्" ला लागून एक आश्रम असतो, त्यांत परगांवाहून शहरांत कामाकाजाकरतां येऊन राहिलेल्या स्त्रिया बिऱ्हाडास राहातात. ह्या घरांवर त्या गांवांतील सभ्य, वजनदार स्त्रियांची देखरेख असते. त्यांची व्यवस्था सगळी स्त्रियांच्या मंडळ्यांच्या हातीं असते. त्यांकडून युनाइटेड् स्टेट्स्‌च्या रोजगारधंदे करणाऱ्या स्त्रियांस फार मदत होत आहे.

"यङ् वुइमेन्स् क्रिश्चन् एसोसिएशन्" म्ह० तरुण स्त्रियांची ख्रिस्ती मंडळी नांवाची एक उत्कृष्ट परोपकारी मंडळी ह्या देशांत आहे. तिच्या शाखा बहुतेक सर्व शहरांतून असून, लक्षावधि तरुण स्त्रिया ह्या मंडळीच्या सदस्या आहेत. तरुणस्त्रियांमध्यें ख्रिस्ती धर्माची चर्चा व प्रसार करणें; अज्ञ स्त्रियांस धर्मोपदेश करून सन्मार्गी लावणें; व कामधंदे करून निर्वाह करणाऱ्या स्त्रियांस चांगल्या ठिकाणीं माफक दरानें बिऱ्हाडें वगैरे मिळतील अशी तजवीज करणें; व ज्यांस कोणत्याही प्रकारचें भाषाज्ञान, शास्त्रीय किंवा उद्योगधंद्यांविषयींची माहिती करून घेणें असेल, त्यांस विद्याशिक्षणाची तजवीज करून देणें, असे कित्येक फार स्तुत्य आणि महत्त्वाचे उद्देश साधण्याकरितां ही सभा अस्तित्वांत आली आहे, आणि तिचे ते उद्देश चांगले सिद्धीस जात आहेत.

इ० स० १८४८ त न्यू यार्क संस्थानांतील सेनेका फाल् नांवाच्या ठिकाणीं कित्येक उद्योगी स्त्रियांनीं मिळून स्त्रियांचे राजकारणी हक्क सांभाळणारी एक मंडळी स्थापिली होती, हें मागें सांगितलें आहे. स्त्रियांचे हक्क राखण्याकरतां म्हणून स्थापन झालेली अशा प्रकारची हीच पहिली मंडळी होय.

हिच्याच अनुग्रहानें व हिचाच कित्ता वळवून इतर सगळ्या स्त्रीसभा अस्तित्वांत आल्या आहेत. हिची स्थापना झाली तेव्हां सगळ्या जगानें तिच्या स्थापकांची विडंबना केली. तिच्या वतीनें बोलायाला गेलेल्या स्त्रियांस सभ्य म्हणविणाऱ्या लोकांनीं शेणमार केला; शिव्याशाप दिले; थट्टेखोर पत्रांनीं त्यांचीं अकाळविकाळ चित्रें काढून जगाला हंसविलें; समाजाच्या पुढाऱ्यांनीं आणि लोकमताच्या प्रवर्त्तकांनीं त्यांचा धिक्कार करून, त्यांस वाळीत टाकलें; धर्मोपदेशकांनीं त्यांस धर्मबाह्य, पाखंडी, दुष्ट, चेटकिणी, सैतानाच्या दूती, दुःशील इत्यादि आपल्याच सभ्यतेला शोभणाऱ्या शिव्याशापांनीं ह्या स्त्रियांची संभावना केली. पण काल आणि लोकमत हीं इतकीं प्रतिकूल होतीं, तरी त्या स्त्रियांनीं आपला निश्चय सोडिला नाहीं. आपलें जन्माचें सुख आणि तन मन धन अर्पून ज्यांच्याकरतां त्यांनीं इतका स्वार्थत्याग केला त्या स्त्रियांची देखील गांजणुक कित्येकांनीं सोसून, स्त्रीजातीचें दास्यमोचन करण्याचा दीर्घ प्रयत्न चालविला. आतां ह्या मंडळीस राष्ट्रीय समाजाचें रूप आलें असून, तिच्या शाखा युनाइटेड् स्टेट्स्मध्यें शेंकडों ठिकाणीं आहेत. तिचें मुख्य ठिकाण बोस्टन् शहरांत आहे. ह्या मंडळीच्या तर्फेनें पुष्कळ ठिकाणीं साप्ताहिक, पाक्षिक व मासिक पत्रें व पुस्तकें चालत आहेत. स्त्रियांच्या राजकारणी हक्काची राष्ट्रीय मंडळी इजकडून "वोमन्स् जर्नल्" नांवाचें एक प्रसिद्ध साप्ताहिक पत्र बोस्टन् शहरांत निघत असतें. ह्या मंडळीचें अनुकरण करून इंग्लंड्, क्यानडा, अस्त्रेलिया, फ्रान्स्, डेन्मार्क्, फिन्लंड्, इत्यादि देशांतील स्त्रियांनीं ह्या प्रकारच्या मंडळ्या स्थापिल्या आहेत. युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रियांच्या हक्कांच्या राष्ट्रीय मंडळीच्या प्रयत्नानें ह्या देशांतील स्त्रियांच्या संबंधानें असलेल्या निरनिराळ्या कायद्यांतून पुष्कळ फेरबदल व उन्नति होत आहे. क्यान्सस् संस्थानामध्यें स्त्रियांस म्युनिसिपालिटीसंबंधीं सर्व महत्त्वाचे राजकारणी हक्क मिळाले आहेत. वायोमिङ्

नांवाच्या उपसंस्थानांत स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीनें सर्व राजकारणी हक्क मिळालेले असून, त्यांचा सुपरिणाम सर्वत्र झालेला दिसून येतो. (क्यानडा, अस्त्रेलियांतील इंग्लिश राज्य, आणि इंग्लंड् ह्या देशांतूनही कुमारी आणि विधवा स्त्रियांस म्युनिसिपालिटीचे हक्क मिळाले आहेत.) ह्या मंडळ्यांचे प्रयत्न पुष्कळ अंशीं सफल झाले असून, पुढें थोडक्याच काळांत ते पूर्णरीतीनें फलद्रूप होतील अशीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. चाळीस वर्षांपूर्वी सेनेका फाल्मध्यें स्थापित झालेल्या ह्या महत्त्वाच्या स्त्रीसभेनें, स्त्रियांच्या उन्नतीस पदोपदीं आड येणारा असा जो दुर्भेद्य चालींचा किल्ला लोक समाजानें स्त्रीसमाजाच्या भोंवतालीं घालून स्त्रियांस बंदींत ठेवल्या होत्या, त्या किल्ल्याच्या भिंताडाचा लहानसा भाग खणून पाडून स्त्रियांस ह्या भयंकर कोटाच्या बाहेर जाण्यास थोडीशी वाट काढून दिली. त्या वाटेनें आतां हजारों स्त्रिया जुटी जुटीनें त्या कोटाच्या बाहेर पडून, दास्यमुक्त होत आहेत आणि पुढें होतील. ह्या सभेला आतां सार्वराष्ट्रीयत्व आलें आहे. इ० स० १८८८ च्या मार्च महिन्याच्या शेवटल्या भागांत "अमेरिकन् वोमन् सफ्रेज् एसोसिएशन्" च्या बोलावण्यावरून दहा बारा सभ्य राष्ट्रांतील स्त्रिया वाशिंग्टन् शहरांत आल्या होत्या. त्या वेळीं सदरील सभेनें भरविलेल्या **सार्वराष्ट्रीय स्त्रियांच्या मंत्रसभेंत** प्रत्येक राष्ट्रांत ह्या सभेच्या शाखा स्थापन करण्याचा ठराव होऊन, कांहीं कांहीं ठिकाणीं तो अमलांतही आला आहे. ही सार्वराष्ट्रीय मंत्रसभा स्त्रियांस राजकारणी हक्क मिळवून देण्याकरतांच केवळ स्थापिलेली नाहीं. कोणत्याही कामाकरतां कोठेंही स्त्रियांचे समाज असोत, त्या सर्वांनीं परस्परांशीं मैत्रीचा संबंध ठेवून, एकमेकांस आपले विचार कळवावे व वेळ पडल्यास एकमेकांस मदत करावी, परस्परांस उत्तेजन द्यावें व सर्व राष्ट्रांतील स्त्रियांत मैत्रीसंबंध स्थापावा; असे फार महत्त्वाचे आणि स्तुत्य उद्देश साधण्याकरितां

**सार्वराष्ट्रीय स्त्रियांच्या मंत्रसभे**चा अवतार झाला आहे. हिच्याविषयीं अधिक माहिती पुढें एके ठिकाणीं दिली आहे; ह्मणून एथें हिच्या संबंधानें आणखी कांहीं सांगितलें नाहीं. ह्या देशांत आणखी पुष्कळ स्त्रीसभा फार महत्त्वाच्या आहेत, त्या सर्वांची माहिती देऊं गेल्यास ग्रंथविस्तार फार होईल, म्हणून येथें त्यांचा उल्लेख करीत नाहीं. तरी ह्या देशांतील स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीची थोडी तरी माहिती न दिल्यास हा निबंध अपुरा राहील, म्हणून येथें त्या मंडळीची थोडी माहिती देत आहें.

गतवर्षाच्या ( १८८७ च्या ) नवेंबर महिन्यांत, **टेन**सी संस्थानांतील न्याषविल् नांवाच्या गांवीं, युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यनिषेधक मंडळीचा चवदावा वार्षिक महोत्सव झाला. त्या प्रसंगीं तेथें जाण्याकरितां मला ह्या मंडळीच्या अध्यक्षांनीं निमंत्रण केलें होतें. तो मोठा उत्सव आणि सर्व संस्थानांतील प्रमुख स्त्रियांचा समागम पाहाण्याकरता मी मुद्दाम दोन हजार मैलां इतक्या लांबून न्याषविल् मुक्कामीं गेलें. त्या गांवांत एक आठवड्यापर्यंत स्त्रियांची एकच गर्दी झालेली होती. तेथें ह्या राष्ट्राच्या सर्व संस्थानांतील स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळ्यांच्या प्रतिनिधी होऊन सुमारें तीनशें प्रमुख स्त्रिया आल्या होत्या. ह्या शिवाय तो समारंभ पाहण्याकरतां इतर पुष्कळ स्त्रीपुरुष तेथें आले होते.

टेनसी संस्थान हें ह्या राष्ट्राच्या दक्षिण भागांत मोडत असून, त्या भागांत उत्तरभागांत आहे तितकें स्वातंत्र्य, विद्वत्त्व आणि उद्योगीपणा स्त्रीवर्गांत असलेला कोठें दृष्टीस पडत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीं त्या भागांत स्त्रियांनीं सभेंत भाषण करणें हें कोणाला पसंत नव्हतें, आणि स्त्रियांच्या सभा हे शब्द कोणाच्या स्वप्नींही आलेले नव्हते. तिकडे अद्यापि असावा तसा स्त्रीजातीचा उत्कर्ष झालेला नसून, तीस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळण्याचीं साधनेंही नाहींत. न्याष्विल्ला जातांना मध्यें **केंटकी** संस्थानांतील लूइविल्

नांवाच्या शहरीं राहून, तेथील लोकांच्या आग्रहावरून मला एका सभेंत भाषण करण्याचा प्रसंग आला; त्या प्रसंगीं मी ज्या देवळांत भाषण करणार होतें त्याच्या आचार्यांनीं मला वेदीवर बसण्याचा आग्रह केला. मी तेथें बसणार तर, मजबरोबर त्या गांवांतील कित्येक प्रमुख स्त्रियांनीं वेदीवर येऊन बसावें असा माझा मनोदय होता, परंतु त्या बाया म्हणाल्या, "अहो आम्ही जन्मांत कधीं असें कृत्य केलें नाहीं, तें आतां आमच्यानें कसें करवेल?" मी म्हटलें, "बायांनो, ह्यापूर्वी कधीं तुम्ही वेदीवर बसलां नाहीं, तर आतां, तसें करण्यास प्रारंभ करायाला काय बाध आहे? तुम्ही एकदां माझ्याबरोबर येऊन तेथें बसा तर खऱ्या; मग त्यापासून तुम्हांस कांहीं अपाय झाला, तर पुढें तसें करूं नका म्हणजे झालें." तेव्हां होय नाहीं म्हणतां, पांच सहा बाया वेदीवर बसण्यास कबूल झाल्या; आणि माझें भाषण संपेतोंपर्यंत त्या तेथेंच बसल्या होत्या; तरी त्यांस कांहीं अपाय झाला नाहीं हें सांगायाला नकोच. त्या दक्षिणभागांत बायका जरी पडदपोशी नाहींत, तरी त्यांपैकीं थोड्यांच्याच अंगीं असावें तसें स्वातंत्र्य आणि सभाधृष्टपणा असलेला दिसून येतो.

वर सांगितल्याप्रमाणें न्याष्विल् मुक्कामीं युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यनिषेधक मंडळीचा वार्षिक महोत्सव होणार असें ऐकून, त्याविषयीं तेथील पुष्कळ मनुष्यांनीं पुष्कळ प्रकारचे तर्क केले. ही मंडळी काय आणि कशी आहे, हें कोणास चांगलेंसें माहीत नव्हतें. पुष्कळांस असें वाटलें कीं, हा कांहीं तरी लुटपुटीचा खेळ व अर्ध्या वेड्या, अर्ध्या शहाण्या अशा बायकांच्या युक्तिशून्य कल्पनेचें हें एक सोंग असेल. कित्येक देवळांचे आचार्य 'हें कांहीं तरी अधार्मिक कृत्य असून, ह्या बायका बायबलाची आज्ञा उल्लंघन करून स्त्रीजातीस न शोभणारीं अशीं कृत्यें करीत आहेत,' म्हणून आपल्या देवळांत त्यांस सभा भरविण्याची परवानगी देईनात. शेवटीं तेथील



मिस् फ्रान्सेस् इ. विलर्ड्.

एका सार्वजनिक पुस्तकालयाच्या सभामंडपांत सदरील स्त्रियांची सभा भरविण्याचा निश्चय झाला. न्याश्विलच्या स्थानिक स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीनें भगीरथ प्रयत्न करून, तेथील बायकांस ह्या महोत्सवांत मदत करण्यास रिझवून आणलें. त्या उदार मनाच्या बायांनीं दुरून आलेल्या बायकांस आपल्या घरीं उतरण्यास बोलावून, उत्तम प्रकारें त्यांचा आदरसत्कार केला.

नवंबर महिन्याच्या सोळाव्या तारखेस सकाळीं त्या अद्भुत महोत्सवास प्रारंभ झाला. सभामंडपांत सातशें खुर्च्या अर्धचंद्राकार ओळींनीं मांडलेल्या होत्या. अधिक खुर्च्या मांडायाला त्या सभागृहांत जागा नव्हती. मंडपाच्या सभोंवतीं भिंतीवर निरनिराळ्या संस्थानांच्या पताका, व प्रत्येक संस्थानांतील स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीचें पालवपद लिहून कशिदा काढून शिवलेलीं, नानारंगांचीं निशाणें लावून, आरास केली होती. जेथें अध्यक्ष आणि इतर प्रमुख स्त्रिया बसावयाच्या तेथें, व त्या भोंवतालीं युनाइटेड् स्टेट्स्ची नक्षत्रांक पताका, सुवासिक पुष्पें व नानाप्रकारच्या झाडांच्या पानांचीं तोरणें लावून, वेदी शृंगारण्यांत आली होती.

सकाळच्या नऊ वाजण्याच्या सुमारास सभामंडप स्त्रियांच्या मंडळीनें भरून गेला. तेथें प्रेक्षक समुदायांत पुष्कळ पुरुषही आले होते. मग अध्यक्ष फ्रान्सेस् इ० विलर्ड् यांणीं सर्वांस एकाग्र होण्याविषयीं इशारत देऊन, सभाकार्यास प्रारंभ केला. त्या प्रसंगीं कांहीं प्रमुख स्त्रियांनीं ज्या उत्तम चित्तवेधक प्रार्थना केल्या, जीं मधुर संगीतें गाइलीं, जे हृदयद्रावक उपदेश केले, आणि फ्रान्सेस् बाईनीं जें अप्रतिम, सारयुक्त, चित्तवेधक, महार्थसंपन्न आणि सर्वांगसुंदर असें भाषण केलें, त्या सर्वांचें योग्य वर्णन करण्यास एक महाकवि तेथें हजर असण्याची आवश्यकता होती.

ही पहिल्या दिवसाची पहिली सभा विसर्जन होण्यापूर्वीं त्या गांवांतील

पुष्कळ आचार्यांचीं मतें फिरून, त्यांणीं "आमच्या मंदिरांत येऊन सभा भरवा, भाषणें करा, आमच्यावर एवढी मेहेरबानगी कराच," म्हणून आग्रह करून, ह्या अपूर्व स्त्रियांच्या मंडळीस आमंत्रणें धाडलीं. प्रेक्षकमंडळींत असलेल्या पुरुषांनीं ह्या मंडळीची थट्टामस्करी करण्याचें सोडून, तिच्याविषयीं आपली पूज्यबुद्धि प्रदर्शित करण्यास सुरुवात केली. पुढें तो आठवडा संपेतोंपर्यंत त्या मंडळींतील प्रमुख स्त्रियांनीं दररोज सहा सात ठिकाणीं जाऊन सकाळीं संध्याकाळीं व दुपारून भाषणें करावीं, उपदेश करावे, तरी तेथील लोकांची तृप्ति होईना. त्या आठवड्यांत ह्या समाजांत जे ठराव करण्यांत आले; मागच्या वर्षांत घडून आलेल्या कृत्यांचे जे वृत्तांत वाचण्यांत आले व जी सर्वोत्कृष्ट सभाकार्याची पद्धत लोकांच्या पाहाण्यांत आली तिचें सर्वांगसौंदर्य व सर्वोत्तम व्यवस्था पाहून, इंग्रजी पार्लमेंट् आणि युनाइटेड् स्टेट्स्‌ची कांग्रेस् ह्यांस सुद्धां ह्या मद्यनिषेधक मंडळीचा हेवा वाटल्यावांचून राहिला नसता. त्या प्रसंगीं फ्रान्सेस् इ० विलर्ड् ह्या बाईचें सभापांडित्य, नेतृत्वशक्ति, सभाचालकपणा, उत्कृष्ट व्यवस्था ठेवण्याचें शहाणपण व पार्लमेंटच्या प्राचीन नियमांचें असाधारण ज्ञान, हीं ज्यांच्या पाहण्यांत आलीं, त्यांस ही बाई सरस्वती, राजनीति आणि शासनशक्ति ह्या तीन देवींची एक मूर्ति आहे, असें वाटल्यावांचून राहिलें नसेल!

स्त्रियांस व्यवस्थापूर्वक कोणतेंही काम करतां येत नाहीं, असें पुष्कळ अहंकारी पुरुषांस वाटत असेल; परंतु न्याषविल् मुक्कामीं ह्या स्त्रीमंडळीचा समाज व त्याचीं व्यवस्थेशीर कार्यें ज्यांनीं पाहिलीं असतील, त्यांना कांग्रेस् किंवा पार्लमेंटांतील गडबड व पुष्कळ वेळां घडून येणारी अव्यवस्था ध्यानांत आणून ह्या दोन जगप्रसिद्ध राजकारणी सभांनीं सदरील मंडळीचा कित्ता वळविल्यास वाईट नाहीं, असेंही वाटल्यावांचून राहिलें नसेल.

नवंबरच्या चोविसाव्या तारखेस सायंकाळीं ह्या महोत्सवाची समाप्ति

झाली. त्या प्रसंगीं तेथें आलेल्या स्त्रीसमाजास निरोप देतांना न्याय्‌विल्‌च्या प्रमुख पुरुषांनीं व आचार्यांनीं स्त्रियांविषयीं आपलीं मतें कशीं पालटलीं, आणि ह्या मंडळीचें सभाकार्य व उत्तम व्यवस्था, तिचे सदुद्देश आणि सर्वोपकारी नीति पाहून आपल्यास केवढें सानंदाश्चर्य वाटलें, हें सांगून फार स्तुति करून, मोठ्या सन्मानानें ह्या युनाइटेड् स्टेट्स्‌च्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यनिषेधक मंडळीस निरोप दिला; व पुढच्या वर्षीं पुनः ह्या मंडळीनें तेथें यावें म्हणून आग्रह केला.

एकंदरींत हा उत्सव सर्वांस मोठा आनंदाचा झाला. असा अद्भुत, मनोरम आणि भव्य देखावा मीं जन्मांत कधीं पाहिला नव्हता, तो पाहून, माझ्या जन्माचें सार्थक्य झालें, असें मला वाटलें. गेल्या मार्च महिन्याच्या शेवटीं वाशिंगटन् शहरीं जमलेल्या सार्वराष्ट्रीय स्त्रियांच्या समाजावांचून दुसऱ्या कोणत्याही मंडळीच्यानें किंवा उत्सवाच्यानें ह्या महोत्सवाची व महत्समाजाची बरोबरी करवणार नाहीं.

## स्त्रियांचा क्रूसेड्.

सुराराक्षसी आणि तिचा भाऊ तमाखू यांणीं लोकांच्या घरांत जबरीनें प्रवेश करून, मोठा उत्पात मांडला होता. जो तो आपला “मी पुरुष, मीं कांहीं केलें तरी चिंता नाहीं; मद्य प्याल्यानें श्रमनाश होतो, तमाखू खाल्यानें आणि ओढल्यानें मस्तकांतील ज्ञानतंतूंना विश्रांति मिळते; औषधार्थ किंवा अन्नपचनार्थ थोडेंसें मद्य प्याल्यास कांहीं चिंता नाहीं, ह्याला शास्त्राधार आहे वगैरे कपोलकल्पित कारणें सांगून, हवें तितकें मद्य पिऊन किंवा मादक पदार्थांचें सेवन करून, हातांतील पैसा उधळून टाकूं लागला. नरकाचीं मुक्तद्वारें आणि मनुष्याच्या सर्व नाशाचीं कारणें जीं शौंडिकालयें, तीं चोहोंकडे वाढूं लागलीं. त्यांच्या रंगीत तावदानांच्या

खिडक्या व सुंदर सुशोभित द्वारें पाहून, पुरुषांचीं मनें भुलूं लागलीं. लोकांच्या माना मुरगळून आपली तुंबडी भरणाऱ्या गुत्तेवाल्यांनीं तरुण, वृद्ध, अज्ञान आणि सज्ञान अशा लोकांस निरनिराळ्या तऱ्हेनें भुरळ घालून, आपला व्यापार वाढविण्याचे हजारों उपाय शोधून काढले. त्यांच्या फंदांत पडून दिवसेंदिवस अधिकाधिक पुरुष सर्वस्वास मुकून, सुखाला, संभावितपणाला किंबहुना आयुष्यालाही आंचवूं लागले. त्यांच्यापायीं विचाऱ्या बायकांची व त्यांच्या तान्ह्या, कोंवळ्या लेंकरांची फारच दुर्दशा होऊं लागली. किती हजारों पतिव्रता बायका आपले नवरे ह्या दुर्व्यसनाच्या पायीं सर्वस्वीं बुडत आहेत असें पाहून, मनांतल्या मनांत कुढूं लागल्या. आपल्या जीवापेक्षां प्रियतर मुलगे धर्माला, नीतीला व इहपरलौकिक सुखाला जलांजलि देऊन, सुरेच्या नादीं लागून अनंत नरकांत जात आहेत; हें पाहून किती लक्षावधि आयांचीं काळजें दुःखानें जळूं लागलीं. तरी त्या बिचाऱ्या मुकाट्यानें सर्व यातना भोगूं लागल्या; धर्मशास्त्र आणि लोकरीति, ह्या दोन लोकसमाजाच्या शासकांनीं बायकांना घरांत राहून मुकाट्यानें सर्व गोष्टी ऐकून घेण्यास आज्ञा दिली आहे; ती स्त्रियांनीं शिरसामान्य करून हूं का चूं न करतां, अनंत, असह्य यातना आणि मानसिक दुःखें आजपर्यंत सोसून घेतलीं. परंतु जगांत सर्व गोष्टींला इयत्ता आहे. आपल्यावर अतिशय जुलूम होत आहे, असें पाहून गांडूळासारखा किडादेखील एकादवेळीं स्वसंरक्षणार्थ शत्रूशीं युद्ध करायाला तयार होतो; तेव्हां मनुष्य प्राण्यांस, तशांतून बायकांस किती धीर धरून जुलूम सहन करण्याची संवय असली, तरी त्यांवर होणारे जुलूम अमुक एका सीमेला पोहोंचल्यावर मग त्यांच्यानें त्या जुलमांचा प्रतिकार केल्यावांचून राहवत नाहीं अशी एकादी वेळ येतेच, ह्यांत मोठेंसें नवल नाहीं. ओहायो संस्थानांतील बायकांच्या दारीं असा एक प्रसंग येऊन ठेपला, तेव्हां त्यांनीं आपल्या पडदपोशीस आणि मुकेप-

णास एकीकडे गुंडाळून ठेवून, ज्या शौंडिकांनीं त्यांचे नवरे आणि मुलगे निर्दयपणें त्यांच्या कंवटाळ्यांतून ओढून नेले होते, त्यांशीं झुंजून, आपल्या बाळांचें आणि प्रियांचें संरक्षण करण्याचा निश्चय केला. शेंकडों कुलीन, सहनशील आणि गुणवति स्त्रियांनीं कंबरा बांधून, शौंडिकांच्या विरुद्ध चालविलेल्या क्रूसेडास आपलें साहाय्य दिलें; आणि शत्रूचा पराभव करून आपल्या मुलांचें आणि घरांचें संरक्षण केल्यावांचून रणांगणांतून परतायाचें नाहीं, अशी प्रतिज्ञा केली. ह्या त्यांच्या युद्धांत त्यांनीं कोणांचे गळे कापले नाहींत; कोणांला फसवून त्यांच्या तोंडचा घांस काढून घेतला नाहीं; कोणांचा रक्तपात केला नाहीं, कठोर शब्द बोलून कोणांचीं हृदयें विदीर्ण केलीं नाहींत; बंदुका, तरवारी, तोफा वगैरे प्राणनाशक शस्त्रें घेऊन कोणाला भय दाखविलें नाहीं; तरी त्यांचें नांव ऐकल्या बरोबर अधर्मी परपीडक, परस्वापहारक, मद्यविके त्यांचा व त्यांच्या पक्षपात्यांचा थरकांप होऊं लागला; त्यांचा शांतिलक्षणध्वज पाहून सैतानाला कांपरें सुटलें; आणि त्यांचे मधुर सयुक्तिक उपदेशपर शब्द ऐकून सैतानाच्या किल्ल्याचे पाये डगमगून किल्ले पडूं लागले. अकराव्या आणि बाराव्या शतकांतील क्रूसेड्युद्धें ह्या एकुणीसाव्या शतकांतील अद्भुत अप्रतिम बायकांच्या शांतिमय क्रूसेडापुढें फिक्कीं पडतात. ह्याची आणि त्यांची बरोबरी कधींच होणार नाहीं. मागच्या रानटीपणाच्या काळांतील पुरुषांच्या क्रूसेडांचा उद्देश लोकांचे गळे कापून, मनुष्यरक्ताचा सडा सर्व पृथ्वीवर पाडून, धर्माच्या नांवाला कलंक लाव-

---

१ क्रूसेड्=क्रूसाच्या नांवानें झालेलें युद्ध. अकराव्या शतकाच्या शेवटीं मुसलमानांनीं यरूशालम् काबीज करून स्पेन इत्यादि खिस्ती राज्यें काबीज करण्याचा बेत केला, तेव्हां खिस्तीधर्माभिमानी लोकांनीं स्वधर्मसंरक्षणार्थ मुसलमानांशीं जीं युद्धें केलीं, त्यांस क्रूसेड्स् असें नांव आहे. हीं इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंत चालत होतीं.

ण्याचा होता. एकुणिसाव्या शतकांतील बायकांच्या क्रूसेडाचा उद्देश लोकांचे प्राण वांचवून, त्यांना नरकांतून ओढून काढून, त्यांच्या घरांतून सर्वत्र सुख, शांति आणि आनंद यांची स्थापना करणें, हा होता. इसवी सनाच्या अकराव्या व बाराव्या शतकांतील पुरुषांच्या क्रूसेडांनीं लक्षावधि मनुष्यांचा संहार केला; एकुणिसाव्या शतकांतील बायकांच्या क्रूसेडानें कोट्यावधि मनुष्यांस मृत्यूच्या जाभाडांतून ओढून काढण्याचे उपाय योजले. त्या रानटी क्रूसेडांनीं शांतिराज ख्रिस्त ह्याच्या धर्मास विटाळलें; ह्या अर्वाचीन क्रूसेडानें सोन्यासारख्या त्या पवित्र धर्मास सोहागा लावून उज्ज्वल केला.

इ० स० १८७३ तील डिसेंबर महिन्याच्या २४ व्या तारखेस ह्या अद्भुत "क्रूसेडा"चा प्रथम उद्भव झाला. ओहायो संस्थानांतील हिल्स्बरा नांवाच्या गांवांत कोणी डायो लुइस् नांवाचा गृहस्थ व्याख्यान द्यायाला आला होता. त्यानें तेथील "वाशिंग्टन् कोर्ट हौस्"च्या वक्तृत्व सभेपुढें २४ व्या तारखेस सायंकाळीं "आमच्या मुली," ह्या विषयावर वक्तृत्व केलें. ह्या प्रसंगीं त्यानें मद्य व इतर मादक पेयें, व तंबाखू इत्यादि पदार्थांचा उपयोग केल्यानें मनुष्यजातीची केवढी हानि होते हें सांगून, आपल्या अनुभवास आलेली एक गोष्ट सांगितली. त्याची आई मोठी भाविक व सद्धर्माभिमानि होती. तिला दुर्व्यसनापासून जगाची केवढी हानि होत आहे हें पाहून फारच दुःख वाटत असे. डायोचा बाप सुरेच्या नादीं लागून सर्वस्वास मुकला होता. मिसेस् लुइस्नें त्यामुळें आपल्या सुखाची व संसाराची माती झाली हें पाहून, आपल्या नवऱ्याचा उद्धार करण्याचें मनांत आणलें; आणि आपल्या गांवांतील मनुष्यांचीं हीं दुर्व्यसनें सोडविण्याचा एक नवीन उपाय तिनें शोधून काढला. तिणें स्वतः आपल्या कांहीं मैत्रिणींस बरोबर घेऊन, दारू वगैरे मादक पदार्थ विकणाऱ्यांच्या दुकानीं जाऊन, तेथें देवाची प्रार्थना व उपदेश करून, असा नीच व नाशकारक व्यापार सोडून द्या असें त्या दुकानदारांस म्हणून त्यांच्या

विनवण्या केल्या. पुढें तिच्या ह्या सदुद्योगास यश आलें; त्या गांवांतील गुत्तेवाल्या लोकांनीं आपलीं सगळीं दुकानें बंद केलीं. ही गोष्ट सांगून डायो लुइस् सभेंतील बायकांस उद्देशून म्हणाला कीं, "बायांनो, तुम्ही जर असेंच कराल, तर तुमच्या सदुद्योगास यश आल्यावांचून राहणार नाहीं. मला वाटतें कीं, एक आठवड्याच्या आंत येथील सगळीं शौंडिकालयें बंद होतील. आतां तुम्हांला जर हें कृत्य करायाचें आहे, तर ज्या बाया ह्यांत पुढारीपणा घेतील, त्यांनीं आपली संमति द्यावी." लुइस्चें बोलणें ऐकल्याबरोबर सभेंतील पन्नास बायका ह्या कामास आपली संमति आहे, असें दाखविण्यास उठून उभ्या राहिल्या. त्या नंतर आपल्या अजूबाजूस बसलेल्या मद्यपानविरोधी पुरुषांकडे वळून लुइस् म्हणाला.—" आतां ह्या स्त्रियांनीं हें काम करण्याचें हातीं घेतलें, तर तुमच्यापैकीं कितीजण त्यांस मदत करतील तें सांगा पाहूं ? " त्यावर साठ सत्तर पुरुष उठून उभे राहिले. ह्याप्रमाणें हें कार्य करण्याचें ठरल्यावर ख्रिस्तजयंतीस म्ह० डिसेंबरच्या २५ व्या तारखेस ह्या महत्कृत्याकरतां सकाळीं एक सभा भरविण्याचें ठरलें.

मागल्या रात्रीच्या ठरावाप्रमाणें ख्रिस्तजयंतीच्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां, तेथील प्रेस्बिटीरियन् पंथी लोकांच्या भजनालयांत मोठा लोकांचा जमाव झाला, आणि एक पद गाऊन प्रार्थना झाल्यावर, डायो लुईस् यांणीं आपल्या आईची गोष्ट सांगून, बायकांच्या अंगीं केवढालीं कामें करण्याची शक्ति आहे, आणि त्यांचें सहिष्णुत्व, दीर्घोद्योग आणि प्रेमळ स्वभाव हीं त्यांस अशा प्रकारचीं कामें पार नेण्यास केवढालीं साधनें आहेत, असें सांगून सुमारें एक तासपर्यंत भाषण केलें. त्यांचें भाषण झाल्यावर, तेथें जमलेल्या सर्व मंडळीस डायोलुईस् यांची सूचना फार पसंत पडली, आणि त्याच सकाळीं " बायकांच्या क्रूसेडा"चा प्रारंभ झाला.

ह्या " क्रूसेड् " मंडळींत इतर मंडळ्यांप्रमाणें नियम करून अध्यक्ष, उपा-

ध्यक्ष, चिटणीस आणि खजीनदार निवडून योजण्यांत आल्या; त्या सर्व बायकाच होत्या हें सांगायाला नको. त्या स्त्रीसमाजापैकीं एक दळाला युद्धास पाठविण्यांत आलें. ह्या दळांत बावन्न बायकांनीं योद्ध्यांचे विडे उचलून, एका नूतन संशप्तक[1] वर्गाची सृष्टि केली. ह्या संशप्तक वर्गानें प्रत्येक गुत्तेवाल्याच्या दुकानीं जाऊन, तेथें परमेश्वराची प्रार्थना, उपदेश आणि विनवण्या करून, त्याच्याकडून तो मद्यविक्रयाचा दुष्ट धंदा सोडून, दुसरा एकादा चांगला धंदा धरण्यास प्रवृत्त करावें, असा ठराव झाला. सदरील संशप्तक मंडळास मदत करायाला म्हणून, एक "जबाबदारांची मंडळी" स्थापन झाली. ह्या वर्गांत सदतीस पुरुषांनीं मिळून क्रूसेड्च्या बायकांस जी कांहीं पैशाची वगैरे मदत लागेल, ती देण्याची जबाबदारी आपल्यावर घेतली. ह्या प्रमाणें सर्व तयारी झाल्यावर ह्या मंडळीनें एक पोटमंडळी नेमून, तिणें एक विनंतिपत्र लिहावें, अशी सूचना केली. तें विनंतिपत्र मद्य वगैरे मादक पदार्थ विकणाऱ्या लोकांकडे पाठविण्याचा निश्चय झाला.

सदरील संशप्तक मंडळींनें हिल्सबराची मिसेस् इ. जे. टाम्सन् ह्या बाईस आपलें सेनाधिपत्य देऊन, शत्रूवर हल्ला करण्याचा बेत ठरविला. ह्या पहिल्या युद्धाचा वृत्तांत टाम्सन्‌बाईनीं स्वतः लिहून ठेवला आहे, तो असाः—

"इ० स० १८७३ तील डिसेंबर महिन्याच्या २५ व्या तारखेस सकाळीं आमची "जूट" हळू हळू भीत भीत, राबर्ट वार्ड् नांवाच्या गुत्तेवाल्याच्या "पहिल्या प्रतीच्या" शौंडिकालयाजवळ गेली. ह्या शौंडिकालयाची आख्या गांवांत सर्वत्र पसरलेली असून, तें पाहिल्याबरोबर आम्हांपैकीं कांहींकांचीं तोंडें सुकून गेलीं; आणि कित्येकजणी तर थरथरां कांपूं लागल्या.

---

१ संशप्तक="आपण एक तर शत्रूंचा पराभव करूं, नाहीं तर रणांत पडूं, परंतु युद्धांतून भिऊन पळणार नाहीं;" अशी शपथ घेणारे योद्धे.

राबर्ट वार्ड यास आम्ही त्याच्या दुकानीं येणार हें वर्त्तमान कळलें असावें एवढेंच नाहीं; तर आमचा तेथें येण्याचा उद्देशही त्यास कळला असावा, असें वाटतें. त्यानें मोठ्या सभ्यतेनें आपल्या दुकानाचें दार उघडून आमचें स्वागत केलें, आणि प्रसन्न वदनानें आम्हां सगळ्या आंत जाई तोंपर्यंत दार उघडून धरलें; मग दार लावून तो आपल्या नेमक्या जागेस "बार्" (दारू विकायाला ठेवण्याची ठाणवी) मागें जाऊन उभा राहिला. त्यानंतर आमच्या जुटीच्या प्रमुखानें ( म्ह० स्वतः टाम्सन्बाईनें ) त्यास उद्देशून म्हटलें "बरें मिस्तर् वार्ड्, हा जमाव फार चमत्कारिक आहे, असें तुम्हांस वाटत असेल, नाहीं ? तें कसेंही असो, परंतु आमचा एथें येण्याचा उद्देश काय तो तुम्हांस माहित असेलच." इतक्या अवकाशांत राबर्ट् बराच घामाघूम होत चालला होता. तो म्हणाला "मला डायो लुइस् यांशीं एक दोन गोष्टी बोलावयाच्या आहेत." मिसेस् टाम्सन् म्हणते.—"छे, डायो लुईस् यांचा आमच्या उद्देशाशीं कांहीं संबंध नाहीं. आतां एथें असलेल्या आम्हां बायकांपैकीं कित्येक बायकांचे दुःखानें व चिंतेनें सुकून गेलेले चेहेरे तुम्ही लक्ष लावून पहाल, तर तुमच्या ह्या अपवित्र व्यापाराचा परिणाम काय झाला हें पाहून, आम्ही आज एथें आलों ह्याचें तुम्हांस नवल वाटणार नाहीं. आमचा एथें येण्याचा उद्देश तुम्हांला भय दाखविणें किंवा तुमची निर्भर्त्सना करणें हा नसून, आमचीं हृदयें आणि घरें ज्याच्या योगें फार नुकसान पावतात, असा हा आपला धंदा तुम्ही सोडाल तर, आम्ही आमच्या परधामस्थ मित्रांच्या आणि तारकाच्या नांवानें त्याच्या प्रेरणेप्रमाणें तुम्हांस क्षमा करायाला, व देव तुमच्या अपराधांची क्षमा करो म्हणून प्रार्थना करायाला, एथें आलों आहों."

हें ऐकून बिचारा राबर्ट् वार्ड् अगदीं गोंधळून गेला. ही चांगली संधि आहे असें पाहून टाम्सन् बाईनीं आपल्या मैत्रिणींकडे पाहून म्हटलें "आ-

पण प्रार्थना करूं या." हें ऐकून सर्व बायांनीं तत्काळ गुडघे टेंकून प्रार्थनेस सुरुवात केली. रावर्टही त्या पवित्र जुटीबरोबर परमेश्वराची प्रार्थना करूं लागला. त्यानंतर त्या सर्व बायांनीं मिळून एक भजन गाइलें. ज्या बिचाऱ्या बायकांचे नवरे व ज्या आयांचे मुलगे ह्या शौंडिकालयाच्या पायीं धुळीस मिळून ज्यांच्या सुखाचा सत्यानाश झाला, व ह्या कारणास्तव ज्यांस ह्या दुकानाचें नुस्तें वारेंही सोसत नव्हतें, त्याच बाया आज प्रेमळ मनानें ह्या ठिकाणीं येऊन, ह्या "चुकून दुर्मार्गी लागलेल्या भावास" देवानें सन्मार्गी लावावें, व ह्यानें जगाच्या तारकास आपलेंसें करून घ्यावें, म्हणून प्रार्थना करीत आहेत. "देवप्रीति आहे" हें खोटें नव्हे. त्या अलौकिक प्रीतीचा महिमा केवढा आणि क्षमेचें महत्त्व केवढें याचें वर्णन करून पुरें होणार नाहीं. डायो लुइस्चें भाकित खरें झालें. ह्या अद्भुत संशाप्रकांच्या अव्याहत प्रयत्नानें एका आठवड्याच्या आंत, हिल्सबरांतील सगळीं शौंडिकालयें बंद झालीं !

हिल्सबरांतील क्रूसेड्चा वृत्तांत ऐकून, युनाइटेड् स्टेट्स्च्या इतर पुष्कळ ठिकाणच्या बायकांनींही हिल्सबराच्या बायकांचें अनुकरण केलें. परंतु असे क्रूसेड्स् सर्व काळ टिकणारे नव्हते, म्हणून कांहीं दूरदर्शी स्त्रियांनीं मिळून संहत प्रयत्न करण्याचें मनांत आणिलें. इ० स० १८७४ मध्यें शटोका नांवाच्या ग्रीष्मविहारांत ह्या क्रूसेड्मधून जयी झालेल्या कांहीं स्त्रिया जमल्या होत्या. त्यांनीं मद्यपानाचें व्यसन नाहींसें करण्यास सतत प्रयत्न करण्याच्या उद्देशानें, "**ख्रिस्ती स्त्रियांची मद्यनिषेधक मंडळी**" स्थापन केली. ह्या देशांतील उद्योगी, नीतिमान्, सत्स्त्रियांच्या उद्योगानें हिला लवकरच राष्ट्रीय समाजाचें रूप येऊन, थोडक्याच दिवसांनीं तिणें **युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रियांची राष्ट्रीय मद्यनिषेधक मंडळी** असें नाम धारण केलें.

ह्या मंडळीची शासनपद्धति ही युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय शासन पद्धतीचेंच प्रतिरूप आहे. स्थानिक मंडळी, सुभ्यांच्या मंडळ्या, संस्थानिक मंडळ्या आणि राष्ट्रीय मंडळी अशीं हिचीं चार रूपें आहेत; त्यांतील शासनपद्धतिही फार सुरेख आहे. स्थानिक मंडळींत अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजीनदार, व व्यवस्थापक मंडळी, आणि सभेसंबंधी विशेष कामें करण्याकरतां नेमलेल्या पोटमंडळ्या, इतके भाग असतात. दरवर्षी स्थानिक सभेचा वार्षिक समारंभ होतो, तेव्हां मंडळींतील अधिकाऱ्यांची निवडणूक होऊन, कामावर त्यांची रुजुवात होते. ह्याचप्रमाणें सुभ्याच्या संयुक्त मंडळ्यांचा वार्षिक समारंभ होतो, तेव्हां त्यांतील अधिकारिणी सर्वांचें मत घेऊन निवडल्या जातात. ह्याच रीतीनें संस्थानिक आणि राष्ट्रीय मंडळ्यांच्या अधिकारिणी दरवर्षी सर्वांचें मत घेऊन निवडल्या जातात. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें ह्या मंडळीच्या शाखा दहाहजारांवर असून, त्यांत सुमारे अडीच लक्ष स्त्रिया सभासद आहेत. स्थानिक मंडळी आपल्या ठिकाणीं स्वतंत्र आहे, तरी तिच्या अंगीं बळकटी यायाला व दुसऱ्या मंडळ्यांशीं ऐक्य व मैत्री राखण्याकरितां तिला आपले कांहीं महत्त्वाचे अधिकार सुभ्याच्या मुख्य मंडळीस द्यावे लागतात; तसेंच सुभ्यांच्या मंडळ्यांना, आपले कांहीं अधिकार संस्थानिक मंडळीस, आणि संस्थानिक मंडळ्यांना आपले कित्येक महत्वाचे हक्क राष्ट्रीय मंडळीस द्यावे लागतात. ह्या योगानें त्यांच्यांत स्वातंत्र्य आणि एकी राहून, त्यांस बळकटी येते. ह्या मंडळीची शासनपद्धति, सुरळित आणि व्यवस्थेशीर काम करण्याची रीति, व कायदेशीरपणा फार प्रशंसनीय व युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय शासनपद्धतीप्रमाणेंच अद्भुत आहे. स्त्री जातीमध्यें असलेल्या नानाप्रकारच्या शक्ती निरनिराळ्या व्यक्तींमध्यें आकाशांतील वाफेप्रमाणें जिकडे तिकडे विखरून पडून, अनियमित व कार्यकारित्वशून्य अशा होत्या; त्या ह्या मंडळींत येऊन संहत झाल्यावर,

वाष्पयंत्रांत एकवटून संयमित झालेल्या वाफेप्रमाणें नानाकार्यकारिणी झाल्या आहेत. हिच्या योगानें स्त्रियांस कधींकाळीं ठाऊक नसलेला योग्य स्वाभिमान व शासकपणा, कार्यकारिता आणि नेतृत्व, हे गुण युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रियांमध्यें असाधारण व आश्चर्यकारक रीतीनें वृद्धि पावत आहेत. हिच्या प्रसादानें निरनिराळ्या मतांच्या व नाना जातींच्या स्त्रियांमध्यें जे हानिकारक मतभेद आणि जातिद्वेष होते ते नाहींसे होऊन, त्यांच्या जागीं निष्कपट मैत्री व भगिनीप्रेम हीं वाढत जात आहेत.

सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतून जितक्या म्हणून मंडळ्या आहेत, त्या सर्वांत ही मंडळी श्रेष्ठ आणि महत्तम आहे, असें म्हणण्यास मला अगदीं संकोच वाटत नाहीं. ह्या मंडळीनें हातांत घेतलें नसेल असें सत्कृत्य जगांत फार विरळा; हिच्या आईसारख्या ममताळू हृदयांत कोणाविषयीं दया नाहीं, असें उदाहरण कोठेंच नसेल; आणि ह्या मंडळीच्या अंगीं असलेले शौर्य, गांभीर्य, धैर्य, आणि क्षमा हे गुण एक परमेश्वरावांचून, दुसऱ्या कोणाच्या अंगीं इतके पूर्णत्वास प्राप्त झाले नसतील. ह्या देशांत व दुसऱ्या पुष्कळ देशांतून ज्या बायकांच्या मिशनरी मंडळ्या आहेत त्या म्हणजे लहानसहान महत्त्वाच्या आहेत असें नाहीं, त्यांनीं कोट्यावधि रुपये खर्चून, आणि सर्व प्रकारें स्वार्थशून्य होऊन, परकीय लोकांस सद्धर्ममार्गीं लावण्याचा उद्योग केला व चालविला आहे. त्यांची स्तुति करावी तितकी थोडीच; परंतु त्या मंडळ्यांत नानाप्रकारचे मतभेद असल्यानें त्याच्यात असावी तितकी एकी नसून, त्यांच्या हातून ह्या मद्यनिषेधक मंडळीच्या हातीं आहेत, तितकीं सत्कृत्यें होत नाहींत. स्त्रियांच्या खिस्ती सभेंत केवळ "एवंजलिकल्" म्हणविणाऱ्या मतांचाच समावेश होतो. इतर मतांच्या मनुष्यांस त्यांच्याकडून मदत मिळत नाहीं. इतर जितक्या ज्ञानवर्धक व परोपकारी मंडळ्या आहेत, त्या आपापल्यापरी फार उत्तम व लोकोपयोगी असल्या, तरी त्यांची ह्या मंड-

ळीशीं तुलना करतां येणार नाहीं; . ंची संख्या थोडी व त्यांचे उद्देश-ही ससीम आहेत. परंतु स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीचे उद्देश बहुत व फार महत्त्वाचे आहेत. हींत मतविरोध नाहीं; सर्व मतांच्या सर्व जातींच्या आणि सर्व प्रकारच्या स्त्रिया हींत मिळून, एकीनें काम करतात. हिच्या स्थानिक, संस्थानिक, राष्ट्रीय आणि सार्वराष्ट्रीय अशा क्रमिक शाखा; हिचे उत्तम सर्वमान्य आणि सर्वांस पाळतां येणारे असे सोपे पण दृढ नियम; हिची अलौकिक, सर्व प्रकारच्या राज्यव्यवस्थांपेक्षां उत्तम व सर्वत्रांस एकवटून धरणारी, अशी असाधारण व्यवस्था; ह्यांविषयीं विचार करून पाहिला म्हणजे, ही मंडळी ह्या युगाच्या ईश्वरी सृष्टींतील अद्भुत चमत्कारांचें शिरोभूषण आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. हल्लीं ह्या मंडळीचीं चाळीस पंचेचाळीस खातीं असून, हिणें जीं निरनिराळीं कृत्यें करण्यास हातीं घेतलीं आहेत, त्यांची यादी येणें प्रमाणें.—

१ निरनिराळ्या ठिकाणीं आपल्या मंडळींतील प्रतिनिधि, वक्त्या बायका पाठवून, मद्यपाननिषेधक मंडळ्या स्थापणें.

२ सार्वराष्ट्रीय स्त्रियांच्या मद्यपाननिषेधक मंडळ्या स्थापण्याकरतां, सर्व राष्ट्रांतून दूती पाठवून, किंवा पत्रव्यवहारद्वारा सदरील काम करणें.

३ युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें वसाहत करायाला आलेल्या परदेशी लोकांमध्यें मद्यपाननिषेधक मताचा प्रसार करणें.

४ दाक्षिणात्य आणि औदीच्य संस्थानांतून असलेल्या, अल्प काळापूर्वीं दास्यमुक्त झालेल्या हबशी जातीच्या लोकांत, मद्यपाननिषेधक मताचा, विद्येचा व नीतीचा प्रसार करणें.

५ तरुण स्त्रियांमध्यें नीतिमत्तेचा व मद्यपाननिषेधक मताचा प्रसार करणें.

६ लहान मुलांस नीति, व मद्यपाननिषेधक मत शिकवून त्यांची उन्नति करणें.

७ मद्य व इतर मादक पदार्थ यांचें सेवन केल्यानें तें करणाराच्या वंशजांस परंपरेनें किती अपाय होतात, हें लोकांस समजावून देणें.

८ आरोग्यरक्षणविद्या शिकवून आरोग्याशीं व मद्यपानवर्जनाशीं किती निकट संबंध आहे, हें लोकांस समजावून देणें.

९ विद्याशिक्षणांत कोणते फेरफार केले पाहिजेत, ह्याचा विचार करून, सर्व मुलांस राष्ट्रीय सार्वजनिक शाळागृहांतून मद्यपान व मादक पदार्थांचें सेवन ह्यांपासून केवढाले अनर्थ होतात, ह्याविषयीं शास्त्रीय शिक्षण मिळावें, असा प्रयत्न करणें.

१० वरिष्ठ शाळांतून आणि विश्वविद्यालयांतून सदरीं सांगितल्याप्रकारचें शिक्षण मिळावें असा प्रयत्न करून, ह्या विद्यालयांतून शिकणाऱ्या तरुण स्त्रीपुरुषांमध्यें मद्यपाननिषेधक मताचा प्रसार करणें.

११ लहान बालकांकरतां बालोद्यान किंवा "किंडर् गार्डन्" शाळा स्थापून, त्यांस उत्तम बालशिक्षण देणें व चांगलें वळण लावणें.

१२ आदित्यवारच्या, म्हणजे दर आदित्यवारीं मुलांस व मोठ्या माणसांस धर्मशिक्षण देण्याकरतां स्थापिलेल्या ज्या शाळा आहेत, त्यांची उन्नति आणि वृद्धि करून, त्यांत मद्यपाननिषेधक मताचा प्रसार करणें.

१३ मद्यपानवर्जक मताचा प्रसार करणारे असे ग्रंथ, वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, आणि लहान मोठीं पत्रकें छापून प्रसिद्ध करणें.

१४ वाईट, अश्लील अनीतिपर आणि मादकपदार्थसेवनास उत्तेजन देणारे असे ग्रंथ, पत्रें, पुस्तकें वगैरे प्रसिद्ध होऊं नयेत, म्हणून प्रयत्न करणें.

१५ काबाड कष्ट करून पोट भरणाऱ्या, मेहेनती आणि उद्योगी लोकांस मद्यपानवर्जनापासून केवढे फायदे आहेत, हें समजावून देणें.

१६ पार्लमेंटच्या नियमांच्या धर्त्तीवर सभा, समिती आणि मोठाल्या मंडळ्या स्थापण्याची, त्या चालविण्याची वगैरे रीत शिकविणें, व सभांचे

साधारण आणि विशेष नियम काय आहेत, हें बायकांस व मुलांस समजावून देणें.

१७ स्त्रियांच्या व पुरुषांच्या मद्यपानवर्जक मंडळ्या स्थापून, त्यांमध्यें व्यवस्था ठेवून, त्यांकडून काम करविण्याची रीति शिकविणें.

१८ तंबाखू अफू भांग इत्यादि मादकपदार्थसेवन केल्यानें केवढाले अनर्थ होतात, व मनुष्यशरीरांवर त्यांचा किती वाईट परिणाम होतो, हें लोकांस समजावून देणें.

१९ औषधांमध्यें मद्यार्कयुक्त पातळ औषधांचा उपयोग न व्हावा एतदर्थ प्रयत्न करणें, व मद्यार्कयुक्त औषधें देण्याची जरूरी नाहीं असें शास्त्रीय व रासायनिक प्रयोग करून, प्रमाणसिद्ध करून दाखविणें.

२० सर्वत्र सद्धर्मप्रसार करणें.

२१ पुष्कळ ठिकाणीं लोकांस धर्मपुस्तकं वाचून ऐकवून, धर्मग्रंथांत मद्यपानाचा निषेध केलेला आहे, अशी लोकांची समजूत घालून देणें.

२२ लहानमोठ्या बंदीखान्यांतून असलेल्या कैद्यांचा समाचार घेणें, त्यांस धर्म, नीति आणि मद्यवर्जनापासून होणारे फायदे, ह्यांविषयीं शिक्षण देणें; तुरुंगांतील व पोलीस स्टेशनांमधील कैदी व अनाथगृहांत राहणारीं माणसें ह्यांचा समाचार घेऊन, त्यांस साहाय्य करणें.

२३ आगगाड्यांवरून व आगगाड्यांच्या स्टेशनांतून वगैरे काम करीत असलेल्या मजूरांस, व कामदारांस भेटून, त्यांस मद्यपानवर्जक मताची माहिती करून देणें; व त्यांस धर्म आणि नीति शिकवून त्यांची आत्मिक उन्नति करणें.

२४ नावाडी, आणि नौकासेनेंत काम करणारे व जमीनीवर लढणाऱ्या सेनेंतील सैनिक, यांस धर्म आणि नीति, शिकवून, मद्यपानवर्जनापासून होणाऱ्या फायद्यांविषयीं त्यांची समजूत घालून देणें.

२५ धर्ममंदिरांतून " प्रभुभोजन " नामक संस्काराच्या वेळीं मद्यार्क-युक्त द्राक्षारसाचा उपयोग होऊं नये, म्हणून प्रयत्न करणें.

२६ ख्रिस्ती मंडळ्यांतून विशेष प्रार्थनेकरतां नेमलेल्या आठवड्यांत एक विशेष दिवशीं मद्यपानवर्जक सभेच्या कामाच्या उत्कर्षाकरतां सर्व ख्रिस्ती मंडळ्यांनीं परमेश्वराची प्रार्थना करावी, ह्याविषयीं प्रयत्न करणें.

२७ नीतिसंबंधी शुद्धता लोकांमध्यें वाढेल, ह्याविषयीं प्रयत्न करणें.

२८ मोर्मनपंथी बायकांमध्यें नीति, धर्म व मद्यपाननिषेधक मत यांचा प्रसार करणें.

२९ युनाइटेड् स्टेट्स्च्या लोकांनीं आदित्यवारीं व्यापार किंवा दुष्कृत्यें न करतां, तो दिवस पवित्र मानून, त्या दिवशीं ईश्वरभजन करण्यांत काळ घालवावा, ह्याविषयीं प्रयत्न करणें.

३० संभावित स्त्रियांच्या घरोघर जाऊन, तेथें लहान लहान समितींतून मद्यपाननिषेधक मताचा प्रसार करणें.

३१ दवाखान्यांतून, रोगिभवनांतून आणि इतर ठिकाणीं जेथें रोगी, दुःखी, किंवा म्हातारीं माणसें असतील त्यांस फुलें व इतर आनंदकारक पदार्थ नेऊन देणें.

३२ जेथें जत्रा किंवा मेळे भरत असतील त्या ठिकाणीं मद्यपाननिषेधक मताचा प्रसार करणें; आणि हरतऱ्हेनें तेथें मद्याचा क्रयविक्रय होऊं न देण्याचा प्रयत्न करणें.

३३ युनाइटेड् स्टेट्स्च्या निरनिराळ्या संस्थानिक सरकारांस अर्ज करून, राष्ट्रांत मद्याचा व्यापार बंद करविण्याचा प्रयत्न करणें.

३४ नीतिप्रसाराच्या आणि मद्यपाननिषेधाच्या कामीं साहाय्यार्थ, स्त्रि-यांना कायदे करण्याचे वगैरे राजकारणी हक्क मिळावे, एतदर्थ प्रयत्न करणें.

३५ पतित स्त्रियांचा उद्धार करून, त्यांस कांहींतरी उद्योगशिक्षण देऊन

सन्मार्गी लावणें; अनाथ निराश्रित स्त्रिया कामाकाजाला राहिल्या असतील, तेथें कोणाकडून त्यांवर जुलुम होत असल्यास किंवा त्यांचा जन्म बिघडण्याचा संभव असल्यास, त्यांचें संरक्षण करणें; बीभत्स व अश्लील ग्रंथ व चित्रें प्रसिद्ध होऊं नयेत ह्याविषयीं प्रयत्न करणें; आणि सामाजिक शुद्धतेचा जेणेंकडून सर्वत्र प्रसार होईल, असे नानातऱ्हेचे उपाय योजणें.

३६ शिकागो शहरांत युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यपाननिषेधक मंडळीनें स्थापन केलेल्या दवाखान्याच्या व रोगिभवनाच्या उन्नतीचे व त्याची उपयोगिता वाढण्याचे उपाय करून, तेथें मद्यपानवर्जक मताचें वैद्यक शिकवून, स्त्रीवैद्य तयार करणें.

३७ सर्व राष्ट्रांमध्यें शांति स्थापन होऊन, कोणाच्यामध्यें वाद, वितुष्ट पडल्यास त्यांनीं परस्परांशीं युद्ध न करतां तिऱ्हाईत राष्ट्रांच्या निवाड्याप्रमाणें आपलीं भांडणें मिटवावीं; अशाविषयीं निरनिराळ्या राष्ट्राध्यक्षांचीं मनें वळवून, युद्ध करण्याची क्रूर व राक्षशी चाल बंद करण्याचा प्रयत्न करणें.

३८ निरनिराळ्या शहरांतील आणि गांवांतील परोपकारी मंडळ्यांस साहाय्य करणें.

हीं अडतीस मुख्य कामें असून आणखी पांच सहा अवांतर कामें स्त्रियांच्या मद्यपाननिषेधक मंडळीच्या हातून होत आहेत, त्यांचीं नांवें येथें सांगितलीं नाहींत.

ह्या चाळीस पंचेचाळीस खात्यांचीं कामें करायाला ठिकठिकाणीं पोटमंडळ्या नेमलेल्या असून, त्या सर्वांवर देखरेख करणारी एकेक अधिकारिणी असते. त्या अधिकारिणीनें दरवर्षीं प्रत्येक संस्थानांत व उपसंस्थानांत ह्या खात्याच्या संबंधानें कायकाय करण्यांत आलें, ह्याची माहिती थोडक्यांत लिहून, स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्यपाननिषेधक मंडळीच्या मुख्याधिकारिणीस

द्यावी. अशी निरनिराळ्या प्रकारची माहिती ह्या महासभेच्या वार्षिक-वृत्तपुस्तकांत छापून प्रसिद्ध होते. निरनिराळ्या ठिकाणीं मंडळीचा खर्च चालण्याकरतां मंडळीच्या प्रत्येक सभासदानें अर्धा डालर—म्ह० सरासरी दीड रुपया—वर्षाची वर्गणी द्यावी, असा ठराव आहे. ह्याशिवाय पुष्कळ उदार स्त्रिया आणि गृहस्थ ह्या मंडळीला मोठाल्या देणग्याही बऱ्याच देतात.

ह्या मंडळीनें हातीं घेतलेल्या सगळ्या कामांची व प्रत्येक शाखेंत त्यांनीं काय काय केलें आहे, ह्याची माहिती संक्षेपानें देऊं गेल्यास देखील एक स्वतंत्र पुस्तक लिहावें लागेल; म्हणून मी तसें करण्याच्या भरीस पडत नाहीं. मंडळीचीं सगळींच कामें फार महत्त्वाचीं आहेत; परंतु त्या सर्वांत एक अतिशय महत्त्वाचें आहे त्याचा उल्लेख एथें केलाच पाहिजे. युनाइटेड् स्टेट्स्-मध्यें मोठ्या माणसांप्रमाणेंच लहान मुलांनाही बहुतांनीं एकत्र मिळून, एकीनें काम करण्याचें शिक्षण मिळतें; असें मागें सांगितलेंच आहे. ह्या देशांतील मोठ्या माणसांप्रमाणेंच लहान मुलांमध्येंही सभा स्थापून सभेच्या द्वारानें कांहीं तरी विशेष काम करण्याची चाल आहे. भूतदयेच्या, विद्योन्नतीच्या, परोपकाराच्या, धर्मप्रसाराच्या वगैरे हजारों लहान मुलांच्या मंडळ्या ह्या देशांत असून, त्यांमधील लक्षावधि मुली आणि मुलगे पुष्कळ प्रकारचीं चांगलीं कामें करीत आहेत. ह्यांपैकीं युनाईटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय ख्रिस्ती स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीच्या प्रयत्नानें ज्या मुलांच्या मद्यनिषेधक मंडळ्या स्थापण्यांत आल्या, त्यांची संख्या दीडहजारां जवळ जवळ असून, मुली आणि मुलगे मिळून सुमारें दीडलक्ष बालकें त्यांचीं सभासद आहेत! तीं सगळीं आपापल्या आयांच्या किंवा शिक्षकिणींच्या मदतीनें ह्या उत्कृष्ट मंडळ्यांचें काम चांगल्या रीतीनें चालवीत असून, त्या सर्व मुलांनीं आम्ही कधीं मद्य पिणार नाहीं, अशी प्रतिज्ञा केलेली आहे.

ती राखण्यास शक्ति व दृढनिश्चय त्यांच्या हृदयांत उत्पन्न व्हावा ह्या करितां स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळ्या अजरामर उद्योग करीत आहेत. आदित्यवाऱ्च्या धर्मशिक्षणाच्या शाळांमधून, ह्या स्त्रियांच्या प्रयत्नानें मद्यनिषेधाच्या संबंधाचें शिक्षण मुलांस दिलें जात असून, ह्या शाळांतील चौतीस हजार मुलांनीं आम्ही मद्यास शिवणार नाहीं, अशी शपथ घेतली आहे. ह्या असाधारण दीर्घोद्योगी बायांनीं आज सात वर्षें सतत प्रयत्न करून, युनाइटेड् स्टेट्स्च्या सदतीस संस्थानांतील सरकारांकडून सार्वजनिक शाळांमध्यें मुलांस मद्यनिषेधाच्या संबंधानें शास्त्रीय शिक्षण मिळावें, अशा अर्थाचे कायदे करून घेऊन, ते अमलांत आणविले. ह्या सगळ्या संस्थानांतील सार्वजनिक शाळांतून ज्यांस मद्यनिषेधाच्या संबंधानें शास्त्रीय शिक्षण मिळत आहे, अशा मुलांची संख्या पांसष्ट लक्षां( ६५००००० )वर आहे. शास्त्रीय रीत्या शिक्षण देऊन, मद्य आणि इतर मादक पदार्थांच्या सेवनानें मनुष्यशरीरावर किती वाईट परिणाम होतात, ह्याविषयींची सोदाहरण माहिती जी ह्या लक्षावधि मुलांस मिळत आहे, तिचा कांहींनाकांहीं तरी स्थायिक सुपरिणाम त्यांच्या मनावर होईलच. ज्या मोठाल्या व्यक्ति मद्यपानाच्या व्यसनांत आकंठमग्न झाल्या आहेत, त्यांस उपदेश दिल्यानें फारसा फायदा होणार नाहीं असें समजून, ह्या शहाण्या, दूरदर्शी स्त्रियांनीं भाविवंशाची सुधारणा करण्याकरतां, मुलांचें शिक्षण चांगलें असावें म्हणून अश्रांत प्रयत्न चालविले आहेत.

मेइन् आणि आयोवा, ह्या संस्थानांत आज पुष्कळ वर्षांपासून तेथील संस्थानिक सरकारांनीं मद्यनिषेधाचे कायदे करून, मद्यनिर्माणाची व मद्यविक्रयाची मनाई केली आहे; परंतु मद्यविक्रेत्यांच्या कूटनीतिपुढें सरकारांचा कांहीं उपाय चालत नाहीं. गुप्त रीतीनें मद्याचा व्यापार तेथें चालतच आहे. सरासरी दोन वर्षांमागें क्यान्सस् संस्थानांतील बायकांना म्युनिसिपालि-

टीच्या संबंधानें फार महत्त्वाचे राजकारणी हक्क मिळाले. तेव्हां त्यांनीं प्रथमतः ज्या महत्त्वाच्या कामांत आपल्या हक्कांचा उपयोग केला, तें त्या संस्थानांतील मद्याचा व्यापार अजीबात बंद करणें, हें होय. त्यांपैकीं अर्ध्या अधिक स्त्रिया मद्यनिषेधक मंडळीच्या सभासद होत्या. त्यांनीं गुप्त रीतीनें कोठें मद्याचा व्यापार होऊं नये, अशाबद्दल खटपट चालविली. स्त्रियांचें पाठबळ नसल्यामुळें, मेइन्‌ संस्थानांतील पुरुषांच्यानें आज पंचवीस सव्वीस वर्षांत जें काम करवलें नाहीं, तें स्त्रीपुरुषांच्या संयुक्त शक्तीच्या बळानें क्यान्सस्‌ संस्थानांतील लोकांनीं दोन वर्षांच्या आंत बहुतेक तडीस नेलें. युनाइटेड्‌ स्टेट्स्‌च्या राष्ट्रीय शासकसभेंत क्यान्सस्‌च्या वतीनें गेलेला एक कारभारी ( सेनेटर्‌ इंगल्स्‌ ) असें म्हणतो कीं,[1] 'क्यान्सस्‌मध्यें मद्यपानानें झिंगून पडलेला मनुष्य, म्हणजे एक कधींच न घडणारी अशी आश्चर्याची

---

1 PROHIBITION IN KANSAS.—Senator Ingalls, in the *Forum* for August, thus speaks of "Prohibition in Kansas": "Kansas has abolished the saloon. The open dram-shop traffic is as extinct as the sale of indulgences. A drunkard is a phenomenon. The bar-keeper has joined the troubadour, the crusader, and the mound-builder. The brewery, the distillery, and the bonded warehouse are known only to the archæologist. It seems incredible that among a population of 1,700,000 people, extending from the Missouri River to Colorado, and from Nebraska to Oklahoma, there is not a place which the thirsty or hilarious wayfarer can enter, and, laying down a coin, demand his glass of beer. This does not imply that absolute drouth prevails everywhere, or that 'social irrigation' has entirely disappeared. But the habit of drinking is dying out. Temptation being removed from the young and the infirm, they have been fortified and redeemed. The liquor-seller, being proscribed, is an outlaw, and his vocation disreputable. Drinking, being stigmatized, is out of fashion, and the consumption of intoxicants has enormously decreased. Intelligent and conservative observers estimate the reduction at 90 per cent: it cannot be less then 75."

गोष्ट बनून राहिली आहे. मद्याचीं दुकानें व लहान पिठे, हे केवळ पुरातन पडीक इमारतींचा शोध करणाऱ्या, अशा पुरातनतत्ववेत्यांसच ठाऊक असावेत.' क्यान्सस्च्या स्त्रियांस जेव्हां कित्येक राजकारणी हक्क मिळाले, तेव्हां त्या संस्थानांतील एका गांवाच्या कांहीं कुचेष्टेखोर पुरुषांनीं—( स्त्रियांस राजकारणी हक्क देणें बरोबर नाहीं; त्यांस राजकारणाचीं महत्त्वाचीं कामें करतां येणार नाहींत, असें सोदाहरण सिद्ध करून दाखविण्याकरितां )—आपल्या गांवांतील एका घराणदार लेंकुरवाळ्या बाईला आपल्या गांवची मेयर् ( Mayor, म्हणजे एकाद्या शहरांत संस्थानाचे कायदे अमलांत आणून गांवचा राज्यकारभार चालविणारा मुख्याधिकारी ) केली. ह्या बाईला मेयर् करणाऱ्या मनुष्यांस ती बाई पदारूढ झाल्याच्या दुसऱ्याच दिवशीं असें कळून आलें कीं, स्त्रियांस राज्यकारभार चालवितां आणि कायदे अमलांत आणितां येणार नाहींत, असें आपलें अनुमान चुकीचें होतें. त्या बाईनें मेयर्चा अधिकार घेतल्याबरोबर, गांवांतलीं लहान मोठीं मद्यविक्रयाचीं ठिकाणें, जुगाराचीं ठाणीं व अशाच प्रकारचीं बेकायदेशीर कृत्यें करण्याचीं ठिकाणें शोधून, बंद करून टाकलीं. गांवांतील स्त्रियांनीं आणि सज्जन पुरुषांनीं तिला गुप्त ठिकाणें शोधून काढण्यांत पुष्कळ मदत केली. तिचा कारभार त्या गांवांतील लोकांस फारच पसंत पडत असून, ती फार व्यवस्थित आणि उत्तम रीतीनें आपला अधिकार चालवीत आहे. युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय ख्रिस्ती स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीच्या सभासदांस कांहीं वर्षांपूर्वी स्त्रियांस राजकारणी हक्क असण्याची गरज नाहीं, असें वाटत होतें. पण आतां ह्या पंधरा वर्षांमध्यें त्यांनीं केलेल्या अतोनात परिश्रमांपासून जसें फल उत्पन्न व्हावें, तसें तें झालें नाहीं. ह्यास कारण म्हटलें म्हणजे केवळ राजकीय हक्कांचा अभाव होय, असें त्यांच्या अनुभवास आलें आहे. मद्याचा व्यापार करणारे बहुतेक सगळे

पुरुष आहेत. त्यांनीं कोट्यवधि डालर् ह्या व्यापारांत घातले आहेत. त्यांचे अनुयायीही पुष्कळ पुरुष आहेत. त्या सर्वांस राजकारणी हक्क असून, ते मद्यनिषेधक कायदे करण्याच्या संबंधानें चाललेला ह्या स्त्रियांचा प्रयत्न निष्फळ व्हावा, अशा रीतीनें आपलें मत देतात. तेव्हां जिकडे बहुमत, तिकडेच कायद्याचें बळ असणार. कायदे करण्यांत तर स्त्रियांच्या पक्षाला शून्य, आणि पुरुषांच्या, तशांतून मद्यविकेत्या व मद्यपी पुरुषांच्या पक्षास कायदे करण्याचे हक्क असून, त्यांस पैशाचेंही पाठबळ आहे. त्यांपैकीं कांहीं हक्क स्त्रियांस मिळाल्यावांचून, त्यांच्यानें ह्या मद्यराक्षसाचा मोड करवणार नाहीं; असें पुष्कळ स्त्रियांस आणि पुरुषांस वाटूं लागलें आहे. म्हणून स्त्रियांस राजकारणी हक्क मिळावे ह्या संबंधानें त्यांचे अश्रांत प्रयत्न चालले आहेत.

युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीची महामान्य अध्यक्ष बाई मिस् फ्रान्सेस् इ. विलर्ड हिच्या कल्पक कार्यकारिणी शक्तीच्या योगानें, व तिच्या मैत्रिणींच्या मदतीनें, एक सार्वराष्ट्रीय स्त्रियांची मद्यनिषेधक मंडळी स्थापित झाली आहे. इ० स० १८८३ त विलर्ड् बाईच्या मनांत ही कल्पना आली. पुढें ह्या मंडळीच्या संबंधानें सगळे बेत ठरून, तिचें काम कोणत्या रीतीनें करावयाचें, ह्याविषयींच्या कल्पना परिपक्क दशेस आल्या नंतर, इ० स० १८८४ त ही **सार्वराष्ट्रीय स्त्रियांची मद्यनिषेधक मंडळी** स्थापित झाली. मिसेस् मेरी क्लेमेंट् लेवेट् ही साहसी, पराक्रमी आणि दृढनिश्चयी बाई ह्या मंडळीची दूती होऊन, सर्वत्र मद्यनिषेधक मंडळ्या स्थापण्याच्या उद्देशानें, पृथिवीप्रदक्षिणा करायाला निघाली. ती पहिल्यानें हवाईद्वीपांत गेली, मग अस्ट्रेलिया, जापान, चीन, सिंहल, हिंदुस्थान, मदगस्कार आणि अफ्रिका इत्यादि देशांत जाऊन तिणें शेंकडों मद्यनिषेधक मंडळ्या स्थापन केल्या. आतां ती यूरोपांतील सगळ्या देशांत जाणार आहे. ही एकटी निराश्रित, असहाय बाई ह्या महत्कृत्याकरतां नि-

घाली, तेव्हां तिच्या हातांत पैसा नव्हता, मनुष्य कोणी बरोबर नव्हतें, तरी तिचा देव परमेश्वर आणि तिचा सत्कर्म करण्याचा दृढनिश्चय, तिच्या बरोबर आहे. ती जेथें जाईल, तेथें तिला योग्य सहाय्य मिळतें. आतां बहुतेक सगळ्या सभ्य राष्ट्रांतून स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळ्या स्थापन होऊं लागल्या आहेत. युनाइटेड् स्टेट्स्च्या स्त्रियांचा उत्साह व कर्त्तव्यदक्षता पाहून, इंग्लंड्च्या स्त्रियांच्या आंगांतही आवेश आला. त्यांनीं "ब्रिटिश् वोमन्स् टेम्परेन्स् एसोसिएशन्" नांवाची राष्ट्रीय स्त्रियांची मद्यनिषेधक मंडळी स्थापली असून, तिच्या हातून पुष्कळ सत्कर्मं होत आहेत. क्यानडांतही एक राष्ट्रीय स्त्रियांची मद्यनिषेधक मंडळी आहे; तिणें त्या देशांत मद्याचा क्रयविक्रय होऊं नये, ह्याविषयीं फार निकराचा प्रयत्न चालविला आहे. अस्त्रेलिया, हवाईद्वीपें, मदगस्कार आणि अफ्रिका ह्या देशांतूनही अशा सभा आहेत. माझ्या हिंदुस्थानी बहिणींनो, तुम्ही कां मागें राहिलां? आमच्या देशांत अशी एक राष्ट्रीय मंडळी अवश्य असली पाहिजे. ह्या सार्वराष्ट्रीय स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीकडून एक मोठा थोरला अर्ज सर्व राष्ट्रांच्या शासकांकडे जाणार आहे. "तुम्हीं आपापल्या देशांतून मद्याचा व मादक पदार्थांचा क्रयविक्रय बंद करा," म्हणून सगळ्या राष्ट्रांतील स्त्रिया राष्ट्रशासकांस विनंति करणार आहेत. आमच्या हिंदुस्थानच्या सगळ्या स्त्रियांनीं ह्या अर्जावर सह्या केल्या पाहिजेत; तो अर्ज चोहोंकडे पोंचून सह्या घेण्याचा प्रयत्न सर्वांनीं करावा. ह्या महत्कृत्यास हस्तेंपरहस्तें सहाय्य करणार नाहीं, असा अवर स्वभावाचा मनुष्य आमच्या हिंदुस्थानांत एक देखील न निघो, अशी त्या जगन्नियंत्यापाशीं आमची प्रार्थना आहे. आतां ह्या सार्वराष्ट्रीय स्त्रियांच्या मद्यनिषेधक मंडळीच्या अध्यक्षस्थानीं मिस् फ्रान्सेस् इ. विलर्ड् ह्या बाई आहेत. ह्यांच्या अध्यक्षतेखालीं आज कांहीं नाहीं तरी, दहालक्ष बायका सर्व पृथ्वीवर मद्यनिषेधाच्या संबंधानें उद्योग

करीत आहेत. ही मद्यनिषेधक मंडळी म्हणजे, सर्व देशांतील **स्त्रियांचें संयुक्त लोकसत्ताक राष्ट्र** होय. ह्या स्त्रिया आपल्या पांढऱ्या फितीच्या[१] पवित्र बंधनानें, ह्या शांतीच्या आणि प्रीतीच्या खुणेनें सर्व पृथ्वीला मैत्री बंधनांत बांधून, एकवट करीत आहेत. सर्व राष्ट्रांतील स्त्रियांमध्यें शांति, प्रीति व मैत्री ह्या अमोलिक, सर्वसुखधाम गुणत्रयाचा प्रसार करीत आहेत. हजारों वर्षांपासून ज्यांच्या हातांत हत्यारें आहेत, ज्यांच्या शरीरांत बळ आहे, व जे समाजाचे चालक व शासक आहेत, अशा पुरुषांच्यानें, राजराजांच्यानें, विद्यादिग्गजांच्यानें, जें महत्कृत्य झालें नाहीं, तें ह्या अज्ञ अबला म्हणून धिक्कारलेल्या बायकांनीं केलें. हे परमेश्वरा, तूं धन्य आहेस! तूं अहंकाऱ्यांचा गर्व मोडून टाकायाला, जगानें धिक्कारलेलीं अशींच माणसें साधनीभूत करितोस. तुझ्या हातीं एकादें तृण देखील वज्रासारखें अपार शक्तिमान् होतें!

---

## व्यापारधंदे.

युनाइटेड् स्टेट्स्‌च्या राज्यव्यवस्थेच्या व स्त्रियांच्या स्थितीच्या खालोखाल फार महत्त्वाचा व विचारणीय विषय म्हटला म्हणजे, येथील उद्योगधंदे हा होय. युनाइटेड् स्टेट्स्‌ला आज जें इतकें महत्त्व आलेलें आहे, तें बहुतांशीं त्यांतील उद्योग धंद्यांच्या संबंधानेंच आलेलें आहे. त्या उद्योगधंद्यांचें स्वरूप सांगण्यापूर्वी त्यांस उत्तेजन देणाऱ्या ज्या कित्येक गोष्टी आहेत, त्यांचा प्रथम विचार करूं.

---

१ यु० स्टे० च्या व सार्वराष्ट्रीय स्त्रि० म० नि० मंडळीच्या स्त्रिया मंडळीची खूण पांढरी फीत, ही वक्षस्थलावर धारण करतात; ह्याचा अर्थ त्या बाया ह्या मंडळीचें पवित्र काम मनापासून व हृदयाची प्रीति देऊन करतात व सर्व मनुष्यांवर त्यांची प्रीति आहे अशी आहे.

इकडच्या बहुतेक सर्व गोष्टींचें सार्वजनीनत्व हें त्यांच्या उत्कर्षाचें मुख्य साधन आहे. गांवांतले रस्ते, जाण्यायेण्याचीं साधनें म्हणजे गाड्या, दुकानांतून पदार्थ विकण्याची रीति, विद्यालयें, वर्तमानपत्रें, पुस्तकालयें माहिती मिळविण्याचीं ठिकाणें इत्यादि आवश्यकीय गोष्टी तितक्या अगदीं सोप्या व सर्वांच्या उपयोगांत येण्यासारख्या केलेल्या असतात, हें मागें सांगितलेंच आहे.

## सरकारी लोकोपयोगी कृत्यें.

युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय शासनपद्धतीचें स्वरूप पाहतां ती लोकांच्या सोईकडे किती लक्ष्य देऊन केलेली आहे, हें तेव्हांच कळून येतें. राष्ट्राचें शासन सुरळीतपणें चालल्यानें राज्यांत शांति राहून लोकांस सुख होतें, आणि सर्व व्यवहार चांगले चालतात, हें तर खरेंच आहे. परंतु तेवढें राष्ट्राचें शासन केल्यानेंच सरकाराचें कर्तव्य केल्यासारखें झालें असें नाहीं. तर जेणेंकरून सर्व लोकांस अधिक सुखसोई प्राप्त होतील, असलीं लोकोपयोगी कृत्यें करणें हेंही आपलें कर्तव्यच आहे; असें समजून युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकारानें तसलीं कामें करण्याचें हातीं घेतलें आहे. त्यांपैकीं मुख्य मुख्य कामें कोणतीं हें एथें थोडक्यांत सांगतों.

**कृषिविद्याविभाग**—ह्या खात्यांत सरासरी दहा हजार मनुष्यें काम करीत असून, त्यांपैकीं बहुतेक लोक फुकट काम करितात. ह्या खात्याचें वरिष्ठ कार्यालय वाशिंग्टन् शहरांत आहे. ह्यांत जे लोक फुकट काम करितात त्यांचें कर्तव्य हेंच कीं, ते राहातात तेथें व आसपासच्या भागांत शेतांची स्थिति कशी आहे; परगांवीं आणि इतर देशीं मालाची रवानगी करण्यास भाडें काय लागतें; आणि शेतांवर व मळ्यांवर पडून असलेल्या मालाची किंमत व तोच माल शहरांत आल्यावर त्याचा भाव; त्या

त्या ठिकाणीं उपयोगांत येणाऱ्या पदार्थांचा तपशील व ते कोणच्या ठिकाणाहून येतात इत्यादि गोष्टींची खबर देणें. ही खबर मिळाल्यानंतर कृषिविद्याविभागाच्या कार्यालयाकडून ती दर महिन्यास वाक्याच्या रूपानें प्रसिद्ध होऊन, मुख्य मुख्य ठिकाणच्या व्यापारी लोकांच्या सभांस वर्तमानपत्रांच्या चालकांस वगैरे वांटून देण्यांत येते. त्यामुळें व्यापाऱ्यांला व विशेषंकरून शेतकऱ्यांस फार मदत होते. (ह्या देशांतले शेतकरी आमच्या हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांप्रमाणें अक्षरशत्रु नसतात. त्यांला लिहावयास येत असून आपल्या शेताची उन्नति कशी करावी व त्यास कोणकोणतीं साधनें अवश्य आहेत, हें त्यांस पुस्तकें, व वर्तमानपत्रें व सदरीं लिहिल्या प्रकारचे वाके वाचून कळून घेतां येतें.) ही खबर समजल्यावर व्यापारी आणि शेतकरी आपापला माल विकावयाचा तो किती किमतीचा आहे, व जो आपणास विकत घ्यावा लागतो त्याचा भाव काय आहे, निरनिराळ्या ठिकाणचे मजुरीचे दर काय आहेत इत्यादि गोष्टी समजून घेऊन, आपलीं कामें सुरळीतपणें करीत असतात. युनाइटेड् स्टेट्स्च्या शेतकी खात्यांतून नानाप्रकारचीं बियें सगळ्या देशभर वांटली जातात. तीं जिकडे तिकडे पेरून, कोणच्या जमिनींत कोणत्या प्रकारचें शस्य किती व काय केल्यानें जास्त उत्पन्न होईल, कोणत्या जमिनीचा गुण कसा आहे, इत्यादि माहिती फार खरकाईनें मिळवून छापून प्रसिद्ध केली जाते. ह्याचप्रमाणें निरनिराळ्या प्रदेशांतील शस्यनाशक कीटक प्राण्यांची आणि पक्ष्यांची उत्पत्ति, स्थिति आणि लय हे कसे होतात, याचा शोध प्राणिशास्त्र, कृषिविद्या व रसायनशास्त्र उत्तम रीतीनें जाणणाऱ्या लोकांकडून करविला जातो. त्याची माहिती छापून, प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक शेतकऱ्यांच्या मंडळ्यांस वांटून दिली जाते. वाशिंग्टन् शहरांत या खात्याच्या उपयोगाकरितां जी जमीन दिली आहे, तींत सगळ्या देशांत व सर्व प्रकारच्या हवेंत उत्पन्न होणाऱ्या

शस्यांचीं व फळांमुळांचीं वियें, कांदे वगैरे लावून तीं ह्या देशांत उगवतात कीं नाहीं, याची परीक्षा पाहण्यांत येते. मग तीं या देशाच्या कोणत्या भागांत चांगलीं होतील हें समजून घेऊन, त्या भागांत त्यांची लागवड करितात. याप्रकारें विदेशांतून या देशांत आणलेलीं पुष्कळ फळें, मुळें, फुलें, आणि शस्यें एथें उत्पन्न होऊन, युनाइटेड् स्टेट्स्चें वैभव भरभराटीस आणीत आहेत. उदाहरणार्थ वेहियांतून आणलेलीं नारिंगेंच घ्या. कांहीं वर्षांपूर्वीं हीं नारिंगें दक्षिण कालिफोर्नियांत आणून लाविलीं. तीं आतां तिकडच्या प्रांतांतील फार उत्तम फळें मानिलीं जातात. त्यांच्या व्यापारापासून तिकडच्या वागाईती करणाऱ्या लोकांस अतोनात संपत्ति मिळत आहे. ऊंस, चहा इत्यादि विदेशी पदार्थ या देशांत उत्पन्न होतील, असें ह्याच खात्याकडून लोकांस समजलें. आतां त्यांच्या उत्पन्नापासून सर्व देशास पुष्कळ फायदा होत आहे. ह्या खात्यांतील अधिकारी परदेशांतून बीं आणून तें आपल्या देशांत लावूनच स्वस्थ बसतात असें नाहीं; तर त्यांपैकीं प्रत्येक शस्याचे गुण काय आहेत, त्यांत पुष्टिकारित्व कितपत आहे, त्यांस रोग कोणकोणत्या प्रकारचे होतात, व ते रोग घालविण्याचे उपाय काय आहेत, आपल्या देशांत झाडें किती प्रकारचीं आहेत, कोणत्या झाडाचें लांकूड कोणत्या कामाच्या उपयोगीं पडतें, इतक्या गोष्टींचा खोल शोध करून, त्याची माहिती छापून प्रसिद्ध करितात. त्याचप्रमाणें गुरें, घोडे, मेंढरें डुकरें इत्यादि उपयोगी प्राण्यांचे स्वभाव निरनिराळ्या जाती व त्या जातींच्या संयोगापासून कसकशी अवलाद उत्पन्न होत्ये, त्यांच्या रोगांचीं निदानें व ते घालविण्याचे उपाय, इत्यादि गोष्टींची सर्व माहिती देशभर लोकांस सांगून, हें खातें राष्ट्राचें अतोनात हित करीत आहे.

**अंतरीक्षविद्याविभाग.**—कृषिविद्याविभागाप्रमाणेंच; युनाइटेड् स्टेट्स् सरकारानें हा अंतरिक्ष विद्याविभाग सर्व लोकांच्या आणि राष्ट्रीय

व्यापाऱ्याच्या साहाय्याकरितां स्थापिलेला आहे. ह्या तीन हजार मैल रुंदीच्या आणि दोन हजार मैल लांबीच्या विशाळ राष्ट्रांत अंतरीक्षविद्याविभागाचीं दीडशें ठाणीं आहेत, आणि ह्यांचें मुख्य ठिकाण वाशिंग्टन् शहरांत आहे. तेथें सदरील दीडशें ठिकाणांहून हवामाना विषयींच्या आणि अंतरीक्षांतील दुसऱ्या फेरफाराच्या वातम्या दररोज दोनदां येतात. येथें ज्योतिषविद्येंत आणि अंतरीक्षविद्येंत फार कुशल असे लोक युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकारानें अंतरीक्षविद्येची माहिती करून देण्याकरितां नेमलेले आहेत; ते ह्या दीडशें ठिकाणांतल्या हवामानांतील सगळ्या फेरफारांचें टिपण करून, त्याची व्यवहारोपयोगी माहिती राष्ट्रांतील सर्व ठिकाणांस पाठवितात. ही माहिती तारायंत्राच्या द्वारानें पाठविली जाते. लहान मोठ्या शहरांतून आणि गांवांतून सगळ्या प्रकारच्या व्यापारी लोकांच्या व शेतकऱ्यांच्या हजारों सभा आहेत; त्यांच्या लहानमोठ्या कार्यालयांतून, आगगाडीच्या स्टेशनांतून, आणि सर्व बंदरांतील नावांच्या धक्यांवर ही माहिती यथास्थित रीतीनें सर्व लोकांस कळावी, अशी तजवीज केली आहे. हिच्या योगानें व्यापाऱ्यांना, आगगाड्या चालविणाऱ्यांना, प्रवास करणाऱ्यांस, नावांमधील कामदारांस आणि शेतकरी, वाणी, उदमी वगैरे लोकांस ह्या राष्ट्रांतील कोणच्या ठिकाणीं कोणच्या वेळेस हवेंत कसकसा फेरफार होणार व त्या फेरफाराशीं आपल्या कामाचा काय संबंध आहे, हें कळून येतें. मग त्या फेरफाराच्या योगानें आपल्या कामास धक्का पोंहचणार नाहीं, असे उपाय योजण्यास अगदीं आळस किंवा उशीर होत नाहीं. समुद्रकिनाऱ्यावरील आणि नदीतीरावरील मुख्य मुख्य बंदरांतून अशाच प्रकारची दिनचर्येची माहिती देणारीं ठाणीं स्थापिलेलीं आहेत. तेथून हवेच्या फेरफाराची माहिती वाशिंग्टन् शहरांत जाते; त्यानंतर त्या माहितीला व्यवहारोपयोगी करून,

युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकाराच्या नाविकसैन्याचे मुख्य अधिकारी, सर्व बंदरांतून ती माहिती पाठवून देतात. ह्याच प्रमाणें समुद्रकिनाऱ्यावरून महा सरोवरांच्या आणि नद्यांच्या तीरांवरून असलेल्या विकट ठिकाणामध्यें जेथें नावावगैरे फुटून मनुष्यांची प्राणहानि होण्याचा संभव असतो, त्या ठिकाणीं **प्राणरक्षक ठाणीं** स्थापिलेलीं आहेत. तेथें लहान लहान प्राणरक्षक होड्या व पाण्यांत बुडत असलेल्या मनुष्यांस साहाय्य करण्याचीं सर्व साधनें ठेवलेलीं असतात; आणि भर तुफानाच्या वेळीं समुद्रांत उडी टाकायाला देखील न भिणारे, हुशार, साहसी, आणि अनुभवीक असे पुरुष मोठाले पगार देऊन बुडणाऱ्या मनुष्यांचें साहाय्य करण्याला ठेवलेले असतात.

ज्याच्या योगानें तुफानांत सांपडलेल्या लक्षावधि लोकांचे प्राण वांचले आहेत, त्या प्राणरक्षक खात्याप्रमाणेंच आणखी एक फार उपयोगी खातें सरकारच्या खर्चानें चालत असून, फार उत्तम काम करीत आहे. त्याला **दीपगृहविभाग** म्हणतात. युनाइटेड् स्टेट्स् सरकारानें १८८० पर्यंत समुद्रांतील भयंकर खडकांवरून ९०० दीपगृहें बांधिलीं आणि नदीतीरांवरून एक हजार (१०००) आकाशदीप लावण्याचीं स्थळें बांधिलीं, आणि त्यांचा खर्च आपल्या तिजोरींतून चालविला आहे. समुद्रामधील निरनिराळ्या ठिकाणीं जेथें गेल्यानें तारूं फुटण्याचें भय असेल, त्या प्रदेशांतून दीपनौका नांगरून ठेवलेल्या आहेत. ह्या सगळ्या नावांतून रात्रीच्या वेळेस आणि धुकें वगैरे पडून अंधार झाला असल्यास, दिवे लावतात. त्यांचा प्रकाश फार दूरवर पोंहचतो, तो पाहून ज्या ठिकाणीं तो दिवा लाविला आहे, तेथें एखादा भयंकर खडक आहे असें समजून, नावा-चालविणारे लोक आपल्या नावा दुरून नेतात. ह्या योगानें हजारों नावा फुटून बुडायाच्या आणि लक्षावधि मनुष्यें बुडून मरावयाचीं वांच-

तात. दररोज हवामानाची व अंतरीक्षाची परीक्षा करून कोठें तुफान हो-णार व कोठें होणार नाहीं, इत्यादि सर्व माहिती दररोज प्रत्येक बंदरांत व नावांच्या धक्क्यावर दिली जाते. एकाद्या धक्याजवळ तुफान होऊन तेथें पोंहचणाऱ्या नावा धोक्यांत पडतील असें वाटल्यास, वादळाचीं निशाणें उभारून, नौकानायकांना आपापल्या नावा त्या धक्यापासून किंवा बंदरा-पासून दूर ठेवण्याविषयीं सूचना केली जाते. ह्या सामुद्रिक आणि नद्या व सरोवरें ह्यांवर घडून येणाऱ्या फेरफाराची हवामानाची वगैरे माहिती देण्याचें काम युनाइटटेड् सेट्स्च्या राष्ट्रीय नौकासेनाधिपतीकडे आहे. नद्यांवरून आकाशदिव्यांचे स्तंभ बांधणें, नदीमार्ग चांगले करून उ-न्नतीस आणणें, सरोवरांतील व नद्यांतील नावांचे धक्के व समुद्रांतील बं-दरें सुधारून लोकोपयोगी करणें इत्यादि कामें युनाइटटेड् स्टेट्स्च्या सेना-खात्याकडे व नौकासेनाविभागाकडे सोंपवून दिलेलीं आहेत. युना-इटेड् स्टेट्स् सरकाराची जी थोडीशी खडी फौज आहे, तिजमधील शिपायांस आणि अधिकाऱ्यांस बसल्या बसल्या खायाला देण्याची त्या सरकाराची चाल नाहीं. ते जें अन्न खातात त्याबद्दल त्यांनीं अंग मो-डून काम केलेंच पाहिजे. ह्या सेनाद्वयाला कोठें कोणाशींलढून लो-कांचा प्राणनाश करण्याचे प्रसंग फार थोडे येतात. म्हणून त्यांचा उप-योग बहुतकरून लोकोपयोगी कृत्यें करण्यांत आणि लोकांचे प्राण रक्षण करण्यांत होतो, ही गोष्ट मोठी अभिनंदनीय आणि युनाइटेड् स्टेट्स्च्या प्रजासत्तेस गौरवावह आहे.

युनाइटेड् स्टेट्स्च्या सरकारानें स्थापलेलें नदी, सरोवरें आणि समुद्र ह्यांच्या किनाऱ्यांची वगैरे **मोजणी करणारें खातें**ही व्यापाराच्या संबंधानें फार महत्वाचें आहे. ह्या खात्यांतील अधिकारी आणि त्यांचे मद-तनीस समुद्रतीरें, आखातें, उपसागर, खाड्या, सरोवरें, नद्या, बंदरें इत्यादि-

कांच्या गुणावगुणांचा चांगला तपास करून, कोणतीं ठिकाणें व्यापारास अनुकूल आहेत, त्यांत उत्तम मध्यम आणि कनिष्ठ प्रतीचीं कोण कोणतीं आहेत, आणि कोणतीं प्रतिकूल आहेत, कोठें काय केल्यानें तें बंदर किंवा ठिकाण व्यापाराच्या कामीं पडेल इत्यादि गोष्टीची सविस्तर माहिती देतात. ह्या खात्यांतील अधिकाऱ्यांनीं अक्षांश साधण्याची युक्ति शोधून काढिली; मेक्सिकोच्या उपसागरांतील भरती ओहटीचें प्रकरण काय आहे, ह्याचा शोध करून, तेथें ती एकदांच येण्याचें कारण शोधून काढलें. समुद्राच्या आंतील महौघ आणि भोंवरे ह्यांच्या तावडींतून नावा कशा सोडवाव्या आणि ते नौकायानास अनुकूल करून घ्यावे कसे इत्यादिकांचे उपाय शोधून काढून, समुद्रावरील व्यापाराच्या उन्नतीस चांगली मदत दिली.

वाशिंगटन् शहरांत राष्ट्रीय सरकाराची सनदा व विशेषाधिकार देण्याची कचेरी आहे. तेथें हें राष्ट्र अस्तित्वांत आल्यापासून आजपर्यंत जे नवे शोध निघाले, नव्या युक्ती निघाल्या व नानातऱ्हेची शिल्पकला दाखविणारे नवे पदार्थ आणि हत्यारें वगैरे घडण्यांत आलीं, त्यांचे नमुने व प्रतिकृति प्रदर्शनार्थ ठेवलेल्या असून, त्यांच्याबद्दल त्यांच्या निर्माणकर्त्यांस ह्या कचेरींतून सनदा व विशेषाधिकार देण्यांत आले व येत आहेत. ह्या सनदा देण्यांत सरकार आपली पिशवी भरण्याकडे नजर देत नसून, माफक दरानें त्या देऊन, शिल्पी लोकांच्या हक्कांचें संरक्षण करितें, आणि कलाकौशल्यास उत्तेजन देतें. वाशिंगटन् शहरांत जें सर्वोत्कृष्ट दर्शनयोग्य स्थळ आहे, तें ही सनदा देण्याची कचेरी होय. एथें जाऊन वर सांगितलेल्या निर्मित वस्तूंच्या प्रतिकृतींचे नमुने पाहिले, म्हणजे युनाइटेड् स्टेट्स्च्या लोकांच्या कलाकौशल्याची व कल्पकशक्तीची धन्य धन्य आहे, असें वाटल्यावांचून राहाणार नाहीं. ह्या राष्ट्राला स्वातंत्र्य आल्यानंतर सुमारें पन्नास वर्षें राष्ट्रांत सुव्यवस्था लागण्यास आणि युद्धापासून वगैरे झालेलें

नुकसान भरून काढण्यासच लागलें. तितक्या वर्षांत इकडील लोकांच्या कल्पकशक्तीचा फारसा विकास झाला नाहीं; परंतु १८३६ पासून १८८० पर्यंत ह्यांची कल्पकशक्ति फार वेगानें वाढत गेली. ह्या ४४ वर्षांमध्यें तीन लक्षांहून अधिक नवीन युक्त्या, कल्पना, यंत्रें इत्यादिकांबद्दल विशेषाधिकार सनदा देण्याच्या कचेरींतून लोकांस मिळाले. चाळीस वर्षांपूर्वी ह्या कचेरींतून दरवर्षी पांच सहाशेंहून अधिक सनदा मिळत नव्हत्या. आतां वर्षाकाठीं चोवीस किंवा पंचवीस हजारां इतक्या कल्पनांबद्दल सनदा देण्यांत येत आहेत.

निरनिराळ्या प्रकारचे शोध व अनेक तऱ्हेची माहिती यांनीं भरलेलीं वृत्तपुस्तकें सरकारी खर्चानें छापून जो मागेल त्याला फुकट देण्यांत येतात, आणि राष्ट्रांतील प्रत्येक वजनदार सभेस, पुस्तकालयास आणि कचेरीस धाडून दिलीं जातात. वाशिंग्टन्‌च्या सरकारी छापखान्यांत काम करणाऱ्या लोकांच्या वार्षिक वेतनाकरतांच केवळ एकेचाळीस लक्ष चाळीस हजार रुपये खर्ची पडतात. ह्या छापखान्यांत चारशें खिळे जुळणारे, पन्नासजण प्रुफें तपासणारे, आणि दीडशें छापणारे लोक, बारामहिने रात्रंदिवस काम करीत असतात. येथें छापण्यास एकलक्ष रीम कागद लागत असून, वर्षाकाठीं कमींत कमी पंचाहत्तर कोटि पृष्ठां इतका मजकूर छापून निघतो. कृषिविद्याविभागवृत्ताचें जें पुस्तक ह्या छापखान्यांतून छापून निघतें, त्याच्या तीन लक्षांवर प्रती दरवर्षी फुकट वांटून दिल्या जातात. ह्याच प्रमाणें **भूगर्भविद्याविभाग, मोजणीखातें, मनुजजातिविद्याविभाग, मत्स्यादिजलचरप्राणिविद्याविभाग, राष्ट्रीयपदार्थसंग्रहालयाची माहिती** देणारें इत्यादि पुष्कळ खातीं आहेत. युनाइटेड् स्टेट्स्‌च्या सरकाराच्या लोकोपयोगी कृत्यांचें हें केवळ दिग्दर्शन मात्र झालें. त्या कृत्यांचीं नुसतीं नांवें व त्यांजबद्दलची थोड थोडी माहिती दिल्यास

देखील कित्येक पुस्तकें लिहावीं लागतील, म्हणून तसें करण्याच्या भरीस न पडावें हें बरें.

युनाइटेड् स्टेट्स्चे लोक व्यापारधंद्यामध्यें सर्वश्रेष्ठ झाले आहेत, ह्यास ह्या देशांतील राज्यशासनपद्धति आणि सरकाराचीं लोकोपयोगी कृत्यें हीं तर फारच साधनीभूत झालीं आहेत, ह्यांत संशय नाहीं; परंतु ह्यांच्या श्रेष्ठतेचीं मुख्य साधनें निराळींच आहेत. **उद्योगप्रियता, स्वावलंबन, आत्मशासन** आणि **संहतप्रयत्न** हीं जीं सर्वश्रेष्ठ व सर्व प्रकारच्या वैभवाचीं व उन्नतीचीं आदिकारणें, तीं ह्या लोकांमध्यें असलेलीं सर्वत्र दिसून येतात. हींच त्यांच्या महत्वाचीं मुख्य साधनें होत. ह्या राष्ट्रास स्वातंत्र्य मिळून ह्यांतील स्वतंत्र जानपदशासनाच्या इतिहासास आरंभ झाला, तेव्हां युनाइटेड् स्टेट्स् म्हणजे बहुतेक सगळा अरण्यमय देश होता. जी थोडीबहुत लोकवस्ती होती, ती अट्लांटिक् समुद्राच्या किनाऱ्यावर होती. आणि तींतही मनुष्यांचें दळणवळण असावें तसें नव्हतें. एका गांवाहून किंवा संस्थानांतून दुसऱ्या ठिकाणीं जायाला चांगले रस्ते नव्हते. प्रवास करणें म्हणजे सर्व दुःखाचें मूळ असून, ज्याला कधीं प्रवास करावा लागत नाहीं तो सुखी, अशी आमच्या देशांतील लोकांची समजुत होती[1] तिचीं मुख्य कारणें म्हटलीं म्हणजे प्रवासाच्या गैरसोई ह्या होत. नद्यांना पूल नाहींत तेव्हां ओढ्यांना व नद्यांना वगैरे पूर आले, म्हणजे आठ आठ दहा दहा दिवस आलीकडच्या कांठीं पावसांत भिजत, थंडींत थिजत, आणि चिखलांत कुजत पडून राहिलें पाहिजे. रस्त्यावरून गाड्यांचीही अशीच गत; कोठें गाडी चिखलांत पुरायाची, कोठें धोंड्यांवर आपटायाची कोठें वाळवंटांत अडायाची इ०, इ०. त्यावर आणखी जंगली श्वापदांचें, चो-

१ पंचमेऽहनि षष्ठे वा शाकं पचति स्वे गृहे । अनृणीचाप्रवासी च स वारिचर मोदते ॥ महाभारत, वनपर्व.

रांचें आणि वणव्याचें भय. बरें इतक्याही अडचणी सोसून गाडीवान आणि मोलकरी हमाल ह्यांचा जाच सोसून देखील मनुष्याची सुटका व्हावयाची नाहीं. पुढें ज्या ज्या गांवांत जावें तेथें आंत जातांना आणि बाहेर येतांना गांवच्या दारावर बसलेले जकातदार हटकून भेटावयाचेच! मग काय पुसतां? गांठोडीं बांधलेलीं सोडायाचीं, सोडलेलीं बांधायाचीं, प्रत्येक चिंधीची दवीची आणि पुरचुंडीची तलाशी द्यायाची, गांठोडीं अटकून पडायाचीं, माल हरवायाचा असे एक कीं दोन त्रास! वाटसरूला बिचाऱ्याला वाटायाचें कीं एक वेळ यमदूत भेटला तर पुरवला, पण हा जकातदार भेटायाला नको! अशा सगळ्या प्रवासाच्या अडचणी जेथें असतील, तेथील लोकांस 'अप्रवासी मनुष्य सुखी होय,' असें वाटण्यांत मोठेसें नवल नाहीं. पण इकडच्या लोकांनीं आपल्या असामान्य उद्योगीपणाच्या योगानें ह्या सगळ्या अडचणी दूर करून टाकल्या. ह्यांना जितक्या अडचणी आल्या तितक्यांनीं ह्यांच्या उत्साहाचा भंग न होतां, तो शतगुण वाढला. इ०. स०. १८३३ पर्यंत ह्यांनीं एक लक्ष पंधरा हजार मैल लांब सडका बांधून, त्याकाळीं लोकवस्ती झालेल्या भागांतून सर्व मनुष्यांना जाण्यायेण्याची व माल नेण्याआणण्याची सोय करून दिली, आणि दोन हजार मैल लांबीचे कालवे खोदले. त्याकाळीं इतका उद्योग होता, तरी आतांप्रमाणें सर्वत्र सर्व सोई झालेल्या नव्हत्या. म्युनिसिपालिट्यांची स्थिति फार नादान होती. अधिकाऱ्यानें "नोटीस" दिल्यावर देखील शिपाई धाडल्यावांचून घरपट्टी वसूल होत नसे. गांवांतील मळ काढून रस्ते साफ करण्याचें काम बहुतेक डुकरांवर सोंपून दिलेलें असे. गांवांतील रस्त्यांवर फारसे दिवे लावण्याची चाल नव्हती. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था बहुतेक आमच्या देशांतील गांवांतून— मुंबई, कलकत्ता, मद्रास, पुणें इत्यादि शहरांवांचून इतर ठिकाणीं—आहे तशीच होती. विहिरी व तळीं यांतील पाणी आणि घरांत टाक्यांत सांठवून

ठेवलेलें पावसाचें पाणी, ह्यांवर निर्वाह चालत असे. अशी अगदीं साधारण व्यवस्था असण्याचें कारण उद्योगाची उणीव नव्हे; तर आमच्या तिकड-ल्यासारख्या सर्वत्र वसाहत झालेल्या देशांत ज्या अडचणी कधीं कोणाला ठाऊक नाहींत त्या इकडे होत्या, हें होय. जमीन लागवडीला आणायाची होती, गांवें वसवावयाचीं होतीं, समाजसंस्थापना करावयाची होती, जंगल कापायाचें होतें, रस्ते करायाचे होते, जाण्यायेण्याला जलमार्ग आणि स्थलमार्ग शोधून काढायाचे होते, काम करण्यास मनुष्यें थोडीं तेव्हां ती उणीव नाहींशी करायाला यंत्रें शोधून काढायाचीं होतीं; अशा सगळ्या अनिवार्य अडचणींमुळें देशाच्या उन्नतीचें काम कांहीं काळपर्यंत अगदीं मंदगतीनें चाललें होतें.

इ० स० १८३० पासून वर सांगितलेल्या अडचणी थोड्या थोड्या दूर झाल्यानंतर, उन्नतीचें काम झपाट्यानें चालूं लागलें. आतां ह्या अडचणी सगळ्या दूर झाल्या असून, अमेरिकन् लोकांच्या सर्व उद्योग धंद्यांस प्रचंड राक्षसी रूपें येऊं लागलीं आहेत. आतां यंत्रें मनुष्यांचीं व हत्ती, घोडे, बैल, उंट इत्यादि मेहनती जनावरांचीं कामें करूं लागलीं आहेत. आग विझविण्याच्या कामीं, पाणी सर्व शहरांतील नळांतून नेण्याकरतां, वर्तमानपत्रें छापण्यांत, कापडें तयार करण्यांत वगैरे जसा यंत्रांचा उपयोग होतो, तसाच साधारण घरांमधून देखील पुष्कळ यंत्रांचा उपयोग आहे. हे लोक थोड्या काळांत व थोड्या मनुष्यांनीं पुष्कळ काम करतां येईल अशा प्रकारचीं यंत्रें निर्माण करण्याच्या कामांत फार प्रख्यातीस आलेले आहेत. ह्यांच्यांत बहुतेक सगळीं कामें यंत्रांच्या मदतीनें करण्याची चाल पडून गेलेली आहे. कपडे यंत्रानें शिवायाचे, जोडे व पुस्तकें यंत्रानें बांधावयाचीं, खिळे, टांचण्या, भांडीं आणि हत्यारें, वैद्यकींत लागणारीं शस्त्रें इत्यादि पदार्थ यंत्रानें करायाचे, दिवे यंत्रानें लावायाचे, कापड, मोजे, बंड्या इत्यादि यंत्रानें विणावयाच्या. पीठ दळायाचें, शेतांत पेरणी करायाची, धान्य कापायाचें, गव-

ताच्या व धान्याच्या कणसांच्या जुड्या बांधावयाच्या, भात, गहूं इत्यादि धान्य कांढून, धान्य आणि फोल वेगळीं करायाचीं, पीठ दळल्यानंतर तें चाळून सपीठ, रवा आणि कोंडा निराळा करावयाचा, लांकडें तासावयाचीं व कापून त्यांच्या फळ्या करावयाच्या, इत्यादि सर्व कामें यंत्रांच्या मदतीनें करितात. यंत्रानें काम करण्याची ह्यांची चाल कोठवर जाऊन पोंचेल हें सांगवत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीं जीं कामें मनुष्याच्या हातांवांचून दुसऱ्या कोणत्याही साधनानें होणें असंभाव्य आहे असें सर्वांस वाटत होतें, तींच कामें आज यंत्रांनीं होत असलेलीं सर्वांच्या दृष्टीस पडत आहेत. फार तर काय पण मोठमोठ्या दुकानांतून विकलेल्या पदार्थांची किंमत पोतनिसाजवळ नेऊन देण्यास देखील, यंत्रें केलेलीं असतात. वाफेच्या यंत्रांच्या सहाय्यानें कोंबड्यांचीं वगैरे अंडीं उबवून त्यांचीं जीवंत पिलें करतां येतात. ह्या उपायानें पुष्कळ ठिकाणीं कोंबड्यांची "लागवड" होत आहे. एका उद्योगी मनुष्यानें गणित करून असें अनुमान काढलें आहे कीं, युनाइटेड् स्टेट्स्मध्यें पदार्थ निर्माण करण्यांत ज्या यांत्रिकशक्तीचा उपयोग होत आहे, ती चौतीस लक्ष दहा हजार आठशें शाण्णव (३४१०८९६) घोड्यांच्या शक्ती इतकी आहे. पैकीं चौसष्टशतांश ($\frac{६४}{१००}$) वाफेची आणि छत्तीस शतांश ($\frac{३६}{१००}$) पाण्याची आहे. ह्या दोन मुख्य शक्तींनीं युनाइटेड् स्टेट्स्च्या यंत्रांच्या प्राणस्थानीं राहून कोट्यावधि माणसांचें काम चालविलें आहे.

आपल्या देशांतील पुरातनग्रंथांमध्यें ज्यांस पंचमहाभूतें म्हटलें आहे, तीं पृथ्वी, जल, अग्नि, वायु आणि आकाश अशीं सगळीं ह्या अमेरिकन् लोकांची चाकरी करीत आहेत, असें अनुभवास येतें. एथें इतकीं यंत्रें आहेत तरी, मनुष्याच्या मेहनतीची किंमत कमी नाहीं इतकेंच नव्हे; तर तिला दिवसेंदिवस फारच तेजी येत चालली आहे. इकडे अगदीं साधा-

रण प्रतीच्या मजुरास कमींतकमीं म्हटले तरी दररोज दीड किंवा दोन रुपये मिळतात. एक धंदा करून आपला निर्वाह चालत नाहीं, असें कळून आल्यास, त्या मनुष्याला दुसरा कोणताही धंदा करण्याची मनाई नाहीं. ह्या देशामध्यें जातिभेद आणि वर्गभेद नाहीं हें पूर्वी सांगितलेंच आहे. भटाच्या मुलानें भट, सुताराच्या मुलानें सुतार आणि लोहाराच्या मुलानें लोहारच झालें पाहिजे, असा नियम नसल्यानें प्रत्येक मनुष्याला आपल्याला रुचेल तो धंदा करण्याची मोकळीक आहे; यामुळें असें होतें कीं, जो मनुष्य जें काम करण्यास योग्य आहे तोच तें करतो. अशानें भलत्याच्याच हातीं भलतें काम पडण्याचा संभव फार कमी आहे. प्रेसिडेंट् ग्रांट् युनाइटेड् स्टेट्स्चा सेनानायक होण्यापूर्वी कातडीं कमावण्याचें काम करीत होता. पुढें तो प्रख्यात सेनाधिपति आणि ह्या देशचा राष्ट्राध्यक्ष झाला. प्रेसिडेंट् गार्फील्ड् हा पूर्वी साधारण शाळेचा शिक्षक होता. प्रेसिडेंट् लिंकन् शेतकऱ्याचा मुलगा असून त्यानें अगदीं निकृष्टस्थितींत असलेल्या लांकडें तोडणाऱ्या मजुराच्या कामापासून तों सर्वांत श्रेष्ठ अशा राष्ट्राध्यक्षाच्या कामापर्यंत सर्व कामें केलीं. इकडे जो उठतो तो शिक्षक, कारकून, वकील किंवा सरकारचा नौकर होऊं पाहात नाहीं. आमच्या देशांतील सोनार, सुतार, लोहार इत्यादि धंदे करणाऱ्या लोकांतले आणि ब्राह्मणांचे मुलगे कोठें थोडेंसें लिहायावाचायाला शिकले कीं, लागलीच "**चाकरी** पाहिजे **चाकरी,**" म्हणूं लागतात मग त्यांना भांडीं ठोकावयाचें, जोडे शिवायाचें, लांकूड तासायाचें वगैरे काम नीच मनुष्याचें आहे, असें वाटूं लागतें. इकडे अगदीं त्याच्या उलट प्रकार आहे. इकडच्या मोठमोठाल्या विद्यालयांतून लांबलचक पदव्या घेऊन निघालेले पुरुष आणि स्त्रिया, हातीं लागेल तें काम करायाला मागें सरत नाहींत. इकडे मनुष्याच्या उद्योगाला आणि श्रमाला मान आहे, चाकरीला म्ह० आमच्या तिकडच्या सारख्या

श्ववृत्तीला मान नाहीं. इकडच्या रस्ते झाडणाऱ्याला व मोऱ्या उकरून काढणाऱ्याला जितका मान आहे, तितका तो आमच्या तिकडल्या पदवीधारी रावसाहेब, रावबहादर, राजासाहेब, नबाबसाहेब इ० इ० प्रस्थांना देखील नाहीं. इंग्लंडामध्यें देखील साधारण उदीम करणाऱ्या किंवा मोलमजुरी करणाऱ्या मनुष्याचा फार अनादर होतो; अशा मनुष्याची भेट राजा किंवा राणी घेत नाहीं, असें ऐकिलें आहे. हिंदुस्थानांत तर उदीमधंदे करणाऱ्या जातींना नीच मानलें आहे. ज्यांच्या योगानें देशास संपन्नता व उन्नतस्थिति यायाची, त्यांचा व उद्योगाचा जेथें असा अनादर होतो, तेथें वैभव राहील कशाला ?

ज्या ज्या गांवांत यंत्रें आणि कारखाने पुष्कळ असतात अशा ठिकाणीं दिवसेंदिवस जास्ती उद्योगी लोक राहात आहेत. तरी एकेच ठिकाणीं सर्व मनुष्यें राहायाला येऊन, गर्दी करून टाकीत आहेत असें नाहीं. एके ठिकाणीं राहून आपला परिणाम लागत नसल्यास दुसऱ्या शेंकडों ठिकाणीं जाण्याचे रस्ते खुले आहेत. हा देश फार मोठा असून, एथें उद्योगही पुष्कळ आहेत. ह्या विस्तीर्ण देशांत अद्यापि वसाहतही पुष्कळ झालेली नाहीं. तेव्हां नव्या ठिकाणीं जाऊन वसाहत करण्यालाही अडचण नाहीं. ह्या पुष्कळ कारणांनीं मनुष्यास एथें एकेच ठिकाणीं राहून एकाद्या शहरास दरिद्र आणण्याचें, किंवा उपाशीं मरण्याचें कांहीं कारण पडत नाहीं. ज्या मनुष्याच्या अंगांत कोणतें तरी काम करण्याची शक्ति आहे, तो युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें कोठेंही गेला, तरी उपाशीं मरणार नाहीं. जे आळशी असून काम करण्याची हयगय करितील, किंवा व्यर्थ अभिमान बाळगून, अमुक काम मिळालें तरच करीन नाहींतर करणारच नाहीं असें म्हणतील, ते लोक उपाशीं मरूं लागले तर त्यांची दया कोणास येत नाहीं.

कामाकाजाच्या आणि व्यापाराच्या भरभराटीच्या संबंधानें मोठाल्या शहरांमधून मनुष्यसंख्या, जाग्याची किंमत आणि घरें, दुकानें व

कारखाने इत्यादिकांची संख्या जी वाढत चालली आहे, ती फारच आश्चर्यकारक आहे. या शहरांच्या वाढीचीं एक दोन उदाहरणें देतें. इ० स० १८८०मध्यें युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें जीं पन्नास महानगरें व्यापाराच्या आणि दुसऱ्या महत्त्वाच्या विषयांत फार प्रख्यात होतीं, त्यांपैकीं १५ नगरें १८३० सालीं अस्तित्वांतच आलीं नव्हतीं. तीं बांधण्याकरितां आंखून ठेविलेल्या बखळी मात्र होत्या, पण त्या जमिनीची नांगरणी वगैरे कांहींएक झाली नव्हती. आतां तीं नगरें इतकीं भरभराटीस आलीं आहेत कीं, त्यांच्यापैकीं अगदीं लहान नगरांत देखील रहिवाशांची संख्या चाळीस हजारांखालीं नाहीं. आतां ज्या शिकागो शहरांत सात लक्षांवर मनुष्यांची वस्ती आहे, तें शहर १८३३ त भविष्याच्या पोटांत होतें. तेथें शहर बांधावयाचें याबद्दल विचार मात्र चालला होता. इ० स० १८३४ सांत त्या ठिकाणीं बरीच वस्ती झाली होती. आतां जितक्या जाग्यावर सगळें शिकागो शहर वसलें आहे, तितकी जागा विकत घेण्यास त्या सालीं जितका पैसा लागला असता, तितका आतां मोठ्या रस्त्यांवरून सहा फूट जागा विकत घेण्यास लागेल असें म्हणतात. इतकी जाग्याची किंमत तेथें वाढली आहे. हा सगळा प्रताप मनुष्यवस्तीच्या वाढीचा आणि व्यापाराच्या भरभराटीचा होय. त्या शहरांत व्यापाराची भरभराट केवढी आहे याचें अनुमान पुढें दिलेल्या आंकड्यांवरून थोडें तरी करितां येईल. शिकागो शहरांत तीन वस्तूंचे व्यापार फार मोठे आहेत. पैकीं एक चिरीव लांकूड, दुसरी धान्य आणि तिसरी पशू. ह्यांत दरवर्षीं चार अब्ज फूट चिरीव लांकूड, नव्वद कोट फूट तक्ते, एक अब्ज साठ कोटि मण धान्य, पन्नास लक्ष डुकरें, वीस लक्ष गुरें आणि दहा लक्ष मेंढरें इतक्यांची विक्री होते. याशिवाय तेथील लोखंडाचे व पोलादाचे कारखाने म्हणजे कमी फायद्याचे आणि महत्त्वाचे आहेत असें नाहीं. शिकागो शहरांत आणि ते-

थून तीस मैलांवरील एक असे मिळून आगगाडीच्या रस्त्याच्या पोलादी कांबी तयार करण्याचे कारखाने दोनचार आहेत. त्यांतून पांच लक्ष टन् वजनाच्या पोलादाच्या कांबी दरवर्षास तयार होतात. या कांबी आमच्या सगळ्या पृथ्वीच्या भोंवताळून आगगाडीच्या रस्त्याचा एक वेढा घालण्यास पुरतीलशा असतात.

शिकागो शहराच्या खालोखाल सान्फ्रन्सिस्को शहराचीही वाढ अशीच विलक्षण रीतीची झालेली आहे. इ० स० १८४४ त जेथें आतां सान् फ्रन्सिस्को शहर आहे त्या ठिकाणीं नुसतीं पन्नास मनुष्यें जाऊन राहिलीं होतीं. आतां तेथें अडीच लक्ष मनुष्यांची वस्ती आहे. १८४७ त ह्या ठिकाणीं एक जंगी वाडा बांधण्यास पुरेल इतकी जागा विकत घेण्यास शंभर डालर लागत होते. तेवढीच जागा घेण्यास आतां बारा किंवा पंधरा हजार डालर लागतात. त्या शहरांत आतां दहा कोट डालर म्हणजे ३० कोट रुपये किमतीच्या मालाचा व्यापार होत असतो. न्यू यार्क् शहरासमोर हडसन् नदीच्या पलीकडच्या तीरावर जर्सी सिटी नांवाचें शहर आहे. इ० स० १८४० त त्या शहरामध्यें तीन हजार सत्तर मनुष्यांची वस्ती होती, ती १८८० त एक लक्ष वीस हजार सातशें बाविसांपर्यंत वाढली. त्याचप्रमाणें ब्रुक्लिन् नांवाचें शहर न्यू यार्क् शहरच्या दुसऱ्या बाजूस आहे तेंही जर्सी सिटीप्रमाणें च न्यू यार्क् शहराचें उपनगर म्हणविलें जातें. इ० स० १८३० त या नगराची लोकसंख्या बाराहजारां इतकी होती, तीच १८८० त पांच लक्ष सासष्ट हजारांइतकी झाली. ओहायो संस्थानांत क्लीव्हलंड् नांवाचें शहर आहे, त्याची लोकसंख्या इ० स० १८३० त एक हजारांवर नव्हती, तीच १८८० त एक लक्ष साठ हजारां इतकी झाली. विस्कान्सिन् संस्थानांतील मिल्वोकी नांवाचें शहर १८३४ त दोन झोंपड्यांचें होतें, तें १८३५ त एक लहानसें खेडें झालें;

आणि १८८० त तें एक लक्ष पंचवीस हजार लोकवस्तीचें शहर बनलें. आज तेथें कोट्यावधि डालर किमतीच्या मालाचा व्यापार होत आहे. इ० स० १८४० त आतांचें मिनेसोटा नांवाचें संस्थान केवळ निर्जन अरण्य होतें. इ० स० १८४८ त त्या सगळ्या संस्थानांत मिळून सारीं ३००० मनुष्यें राहात होतीं. आतां तेथें दहा बारा लक्ष मनुष्यांची वस्ती झाली आहे. ह्या संस्थानांतील सेंट् पाल् आणि मिनेआपोलिस् ह्या दोन शहरांची वाढ तर अत्यंत आश्चर्यकारक आहे. इ० स० १८८० त सेंट् पाल् शहरांत सरासरी एकेचाळीस हजार लोकांची वस्ती होती, आणि मिनेआपोलिस्मध्यें सत्तेचाळीस हजार लोक राहात होते. १८८५ त सेंट्पालची लोकवस्ती एक लक्ष अकरा हजारांवर, आणि मिनेआपोलिस्ची लोकसंख्या एक लक्ष तीस हजारांवर वाढली. मिनेआपोलिस् येथून दरवर्षी साडेबावन्न लक्ष पिपें गव्हांच्या मैद्यानें भरून सर्व पृथ्वीवर विकण्याकरतां रवाना केलीं जातात. मिनेआपोलिस्मध्ये वर्षाकांठीं जे पदार्थ निर्माण होत आहेत, त्यांची किंमत अठरा कोटि रुपयांवर आहे, असें म्हणतात. एथें इ० स० १८८४ ह्या वर्षी दोन लक्ष शेचाळीस हजार नऊशें पंचायशीं आगगाडीचे डबे मालानें भरून आले आणि त्यांहून अधिक बाहेर गेले. सेंट् पाल् शहरामध्येंही व्यापाराची भरभराट अशीच आहे. ह्याचप्रमाणें ड्युलुथ्, इंडियानापोलिस्, क्यान्सस् सिटी, आलिघेनी सिटी इत्यादि अति अर्वाचीनकाळीं स्थापित झालेल्या शहरांची गोष्ट आहे. आतां युनाइटेड् स्टेट्स्मध्यें पाहिजे तेथें जा, अशा प्रकारचीं शहरें गंधर्वनगरांसारखीं जरी एका रात्रींत उद्भवून वृद्धि पावलीं, तरी तीं दिवस उजाडल्यावर अदृश्य न होतां जागच्याजागीं चिरस्थायी होऊन दिवसेंदिवस आणखी वाढत आहेत, असें दिसून येईल.

ही जी एवढी झपाट्याची वाढ होत आहे, हें इकडल्या लोकांच्या उद्यो-

गाचें फळ होय. इकडच्या लोकांना आमच्या देशांतील लोकांसारखें गमत गमत सावकाश रीतीनें काम करण्याला वेळ नाहीं. ह्यांना वेळाची किंमत केवढी आहे हें उत्तम रीतीनें कळतें. आमच्या तिकडे दुकानदार दुकानामध्यें लोडाशीं वसून, सावकाशपणें सवदा विकतात. कोणीं गिऱ्हाइक दुकानामध्यें गेलें म्हणजे वाण्याला तराजू तयार करण्यालाच अर्धा घटका लागते. मग तो हळूच जसा कांहीं एकादा तत्वज्ञानी गूढ विचारांत निमग्न असलेला एकदम ध्यानांतून निघून आपल्या या पार्थिव वस्तूंकडे दुर्लक्ष्य करून इकडे तिकडे पाहूं लागतो, अशा मुद्रेनें गिऱ्हाइकाला आपला सवदा देतो. त्या वेळीं भाव ठरविण्यांत कांहीं वेळ मोडतो. अशी वेळ मोडण्याची आणि लोडाशीं टेंकून काळ घालविण्याची रीति युनाइटेड् स्टेट्स्‌च्या लोकांत असती, तर आजला ह्या राष्ट्राचा मागमूस पृथ्वीवर राहिला असता कीं नसता कोण जाणे ?

आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती अशी कीं, हे लोक प्रत्येक कामाकरतां सरकारच्या तोंडाकडे पहात बसत नाहींत. ह्या देशांतील सरकार जरी लोकनियुक्त सरकार आहे, आणि कायद्यास अनुसरून जी गोष्ट लोक करा म्हणतील ती सरकारास केलीच पाहिजे, तरी लोकोपयोगी कामांकरितां बहुतकरून सरकारापाशीं भिक्षा मागण्याच्या भरीस कोणी पडत नाहींत. नवीन कारखाने काढायाचे, रस्ते बांधायाचे, लोखंडी रस्ते करायाचे, कालवे खणावयाचे, नौका निर्माण करावयाच्या किंवा एकादें लहानसेंच दुकान घालावयाचें झालें, तरी हे लोक पुष्कळजण एकवट होऊन, काम करितात. ह्या देशांत प्रत्येक कामाला एकेक **मंडळी** आहे. शिवणारी, जोडे करणारी, कापुस पिंजणारी, मातीचीं भांडीं करणारी, कांच निर्माण करणारी, लेखण्या, सुया, टांचण्या, दोरा, वगैरे करणाऱ्या मंडळ्या, अशा सर्व प्रकारच्या मंडळ्या आहेत. मला

वाटतें कीं, "संभूय[1] समुत्थान" जें आमच्या देशांत मन्वादि स्मृतींतून आणि कोशांतून नाममात्रावशिष्ट असून, ज्याचें नांवदेखील आतां बहुतेक सगळ्या लोकांस विसरत आलेलें आहे, तें ह्या देशांत जितक्या उन्नत आणि पूर्ण दशेस आलें आहे, तितकें तें कोठेंच आलें नसेल. असें लहान किंवा मोठें काम नाहींच कीं, ज्याची व्यवस्थापक एकाद दुसरीतरी मंडळी नाहीं. प्रत्येक कामाच्या जशा मंडळ्या आहेत, तशा एकेकप्रकारचा धंदा करणाऱ्या लोकांच्याही मंडळ्या असून, त्या फार मोठाल्या आहेत. उ० शेतकऱ्यांची, कापडाचा व्यापार करणाऱ्यांची, सर्व साधारण पदार्थांचा व्यापार करणारांची, जोडे निर्माण करणारांची, तयार केलेले कपडे विकणारांची, पीठ विकणारांची, मासे, भाजीपाला वगैरे विकणारांची, मद्याचा व्यापार करणारांची, गुरें, घोडे, मेंढरें, किंवा डुकरें विकणारांची, हमालांची, लोहारांची, सुतारांची, गवंड्यांची, पाथरवटांची, शिंप्यांची, सोनारांची—(एथें शिंपी सोनार इत्यादि जाती नसून तीं व्यवसायानुरूप घेतलेलीं नांवें आहेत, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे)—इत्यादि हजारों प्रकारच्या मंडळ्या आहेत. त्यांमधून असणारे लोक आपल्या व्यवसायबंधूंस मदत करतात, एकमेकांस आपला अनुभव सांगतात, आपलें काम कोणत्या रीतीनें केल्यास उत्तम, लोकप्रिय व फायदेशीर होईल, आणि काय केल्यानें आपल्यावर परकीयांची छाप बसणार नाहीं, इत्यादिक विचारणीय विषयांचा उहापोह करून बहुमतानें संमत ठरेल तें कार्य करतात. ह्यामुळें त्यांस फार बळकटी येते. ह्या लोकांना दोन मनुष्यांच्या जुटीपासून तों लक्षावधि मनुष्यें ज्यांचीं सदस्य आहेत, असल्या मंडळ्यांचीं देखील कामें कांहीं गडबड, आणि बडबड न करितां सुरळीतपणें यथास्थित रीतीनें चा-

---

१ पुष्कळ जणांनीं एकत्र मिळून व्यापार इत्यादि व्यवहारिक गोष्टी करणें, ह्यास संस्कृत भाषेंत 'संभूय समुत्थान' ह्मणतात.

लवितां येतात. इकडील तारायंत्रें, आगगाड्या, जलयानें, डांक, इत्यादि बहुतेक सगळ्या गोष्टी स्वतंत्र लोकस्थापित मंडळ्यांनीं केलेल्या आहेत. त्यांस सरकारांतून योग्य अधिकाराचे परवाने मिळाले आहेत. ह्या मंडळ्या ह्यांच्या स्वावलंबनाचें फळ असून, ह्यांतून सर्व लोकांना आत्मशासनाचे नित्यशः नवे नवे धडे मिळतात. उद्योगप्रियता, संहत प्रयत्न, स्वावलंबन आणि आत्मशासन ह्या चार गोष्टी स्पर्शमणी सारख्या आहेत. त्या ज्या राष्ट्रांतील लोकांमध्यें उपलब्ध असतील, त्यांनीं ज्या वस्तूला स्पर्श केला तिचें सोनें होतें. त्यांचा स्पर्शच असा कांहीं विलक्षण, बळकट आणि कार्यकारी असतो कीं, तो ज्या पदार्थास होईल त्याचें सोनें झाल्यावांचून हातीं धरलेला पदार्थ त्यांच्या हातून सुटतच नाहीं!

ह्या देशांतील लोहमार्ग आणि जलमार्ग—(जे ह्या लोकांच्या अश्रांत उद्योगानें आज राजमार्गासारखे सुगम आणि सुखप्रवास झाले आहेत)—व्यापाराच्या कामीं अत्यंत उपयोगीं पडत आहेत. त्यांचा विस्तार केवढा आहे ह्याची कल्पना देखील करणें सुलभ नाहीं. हा महादेश आमच्या हिंदुस्थानाच्या दुपटीहून अधिक—सरासरी अडीच पट—आहे. इ० स० १८८० च्या खानेसुमारीवरून कळतें कीं, ह्या देशाचा विस्तार पस्तीस लक्ष सत्तेचाळीस हजार तीनशें नव्वद (३५४७३९०) चौरस मैल होता. ह्या राष्ट्राला ऐक्य आणणारीं जीं पुष्कळ साधनें आहेत, त्यांत देशाची स्वाभाविक रचना ही कांहीं कमी महत्वाची नाहीं. एक अलास्का संस्थान शिवाय करून, बाकी २९७०००० चौरसमैल देशाचा भाग अखंड आहे. उत्तरेस ब्रिटिश् अमेरिका किंवा कानडा, पूर्वेस अट्लांटिक् महासमुद्र, दक्षिणेस मेक्सिकोचा उपसागर आणि मेक्सिकोचीं स्वतंत्र संस्थानें, आणि पश्चिमेस प्रशांत (पसिफिक्) महासागर अशा ह्या अखंड देशाच्या चतुःसीमा आहेत. ह्याच्या पूर्वेस आणि पश्चिमेस मोठाले डोंगर असून मध्य प्रदेश बहुतेक सपाट जमीन आहे. दोन्हींक-

डच्या डोंगरांतून व उत्तरेकडच्या उंच प्रदेशांतून पुष्कळ नद्या देशाच्या कें-द्राकडे वाहात येऊन बहुतेक दक्षिणेकडे मेक्सिकोच्या उपसागरांत मि-ळाल्या आहेत. बहुतेक सगळ्या नद्या मध्य प्रदेशांतून वाहात जात अ-सल्याकारणानें जिकडेतिकडे जमीनीला गोड पाण्याचा विपुल पुरवठा अ-सून, ती फार पिकाऊ आहे. ह्या शिवाय ह्या नद्या म्हणजे व्यापाराचे रा-जमार्ग आहेत. त्यांच्या योगानें अंतर्देश वाणिज्याला (देशाच्या आंतील व्यापाराला) अतोनात मदत होते. इकडच्या नद्याही फार लांब लांब आहेत. ह्या देशांतील सगळ्या नद्यांत मोठी नदी म्हटली म्हणजे (मिसूरी व मिसिसिपी मिळून झालेली) मिसिसिपी नदी होय. ही साडेचार हजार (४५००) मैल लांब असून, हिचें पात्र सरासरी तीन हजार फूट रुंद असतें. हिच्यांत सरासरी तीन हजार नऊशें (३९००) मैलपर्यंत मोठाल्या वाफेच्या नावा जातात. हिच्या उपनद्या आणि शाखा मिळून हिच्यावर नावा चालण्याच्या मार्गांची लांबी पस्तीस हजार (३५,०००) मैल आहे असें म्हणतात. मिसिसिपी ह्या (उत्तर अमेरिकेंतील आमच्या तांबड्या भावं-डांच्या भाषेंतील) शब्दाचा अर्थ, 'जलांचा बाप' असा होतो. ह्या महान-दाचा अवाढव्य विस्तार पाहिला, म्हणजे त्याचें नांव अन्वर्थक आहे, असें वाटल्यावांचून राहायाचें नाहीं. कार्नेगी नांवाच्या एका अमेरिकन् ग्रंथ-काराचें असें म्हणणें आहे कीं, "यूरोपांतील वोल्गा नांवाची नदी शिवाय करून त्या खंडांतल्या सगळ्या नद्या एकवट केल्यास त्यांचा आकार व पाण्याचें मान मिसूरी मिसिसिपी एवढें होईल." हा महानद आमच्या देशांतील गंगा नदीच्या तिप्पट मोठा आहे. राकीपर्वतश्रेणीच्या पूर्वेस ज्या नद्या वाहात आहेत, त्यांची सगळ्यांची मिळून लांबी चाळीस हजार (४०,०००) मैलांहून अधिक असून, त्यांच्या दुप्पट म्ह० ८०,००० इतका नदीतीर प्र-देश आहे. ह्या शिवाय राकीपर्वताच्या पश्चिमेकडे ज्या कलंबिया, साक्र-

मेंटो, सान्व्हाकीन्, इत्यादि महा नद्या हजारों कोस देशांतून वाहून समुद्रास मिळत आहेत त्या निराळ्याच. आणखी ह्या नद्यांचा परस्परांशीं मेळ करून व्यापाराची वृद्धि करण्यासाठीं यु. स्टे. मध्यें इ० स० १८८० पर्यंत साडेचार हजार मैल लांब कालवे खोदण्यांत आले, त्यांस ७९५०००००० डालर खर्च पडला. फिलाडेल्फिया, बाल्टिमोर्, न्यू आर्लीन्स् पोर्टलंड्, इत्यादि ठिकाणें जीं मोठमोठालीं बंदरें म्हणविलीं जातात, तीं समुद्रापासून पुष्कळ दूर नद्यांच्या तीरांवर आहेत. तेथें वर्षांतून हजारों आगबोटी येतात जातात. तेथें मोठाले धक्के बांधिलेले असून, तीं जंगी व्यापाराचीं ठिकाणें आहेत. ह्या देशांत नद्या मोठाल्या आहेत तशीं सरोवरें ही फार मोठीं आहेत. अमेरिकेचे पंच महाऱ्हद (सुपीरियर, ह्युरन्, मिशिगन्, ईरी, आणि ऑंटेरियो) हे एकेक गोड पाण्याचे सागरच आहेत, म्हटलें तरी चालेल. त्यांमध्यें पुष्कळ आगबोटींच्या आणि शेंकडों नांवाच्या द्वारें अतोनात व्यापार होत आहे.

---

१ युनाइटेड् स्टेट्स्च्या मुख्य महासरोवरांची लांबी आणि विस्तारः—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| केयूगा सरोवर | लांबी | ३८ मैल, | विस्तार | १०४ | चौरस मैल. |
| जोर्ज् सरोवर | ,, | ३६ ,, | ,, | ११० | ,, |
| साल्ट् लेक् (खारें) सरोवर | | ७५ ,, | ,, | २४० | ,, |
| ऑंटेरियो सरोवर | ,, | १९० ,, | ,, | ६३०० | ,, |
| ईरी सरोवर | ,, | २४० ,, | ,, | ९६०० | ,, |
| ह्युरन् सरोवर | ,, | २५० ,, | ,, | २१००० | ,, |
| मिशिगन् सरोवर | ,, | ३४० ,, | ,, | २२००० | ,, |
| सुपीरियर् सरोवर | ,, | ३६० ,, | ,, | ३२००० | ,, |

ह्यांशिवाय सोळा सतरा मैल लांबीचीं व दहा मैलांच्या आंतील लांबीचीं सरोवरें ह्या देशांत पुष्कळ आहेत. एक साल्ट लेक् शिवाय करून बाकी सगळीं

ह्या सरोवरांच्या तीरावरचीं ड्यूलुथ्, टोलिडो, बफेलो, शिकागो इत्यादि मोटमोठालीं शहरें न्यू यार्क्, बोस्टन्, न्यू आर्लीन् यांसारख्या भव्य बंदरांची बरोबरी करीत आहेत. आगबोटी ह्या अमेरिकन् लोकांच्या कल्पनासंभूत आहेत; त्यांच्यापासून सगळ्या जगाला फायदा होत आहे. ज्या पहिल्या बाष्पनौकेनें अट्लांटिक् महासागर उतरून वाफेच्या साहाय्यानें नव्या आणि जुन्या भूखंडांतील मनुष्यांची गांठ घालून दिली, ती अमेरिकेहून गेली होती. ह्या बाष्पनौकांच्या द्वारानें ह्या देशाचा व्यापार इतर देशाशीं जरी फारसा चालत नाहीं, (कारण तो बहुतेक सगळा इंग्लंडानें पछाडून घेतला आहे) तरी देशांतल्यादेशांत जो व्यापार होत आहे, तो फारच आश्चर्यकारक आहे. एका ओहावो नदीवर आगबोटींच्या व नांवाच्या योगानें दरवर्षी दोन अब्ज चाळीस कोटि (२,४०,००,००,०००) रुपये किमतीच्या मालाचा व्यापार होतो, असें चांगल्या माहितगार मनुष्यांकडून समजतें. ह्या देशांतील अगणित लोहमार्ग हें आणखीं एक व्यापाराचें मोठें साधन आहे. इ० स० १८५० पर्यंत इकडचे लोहमार्ग आणि आगगाड्या फार वाईट होत्या; आणि त्यांपासून प्रवाशांनाही पुष्कळ त्रास होत होता. आतां तो त्रास, त्या अडचणी, ते आगगाड्यांच्या स्टेशनांवरून लागणारे विलंब, व तो आगगाड्यांचा दीर्घसूत्रीपणा सगळा नाहींसा झाला आहे. इ० स० १८३०त ह्या देशामध्यें सारा तेवीस मैल लोखंडी रस्ता घातलेला होता. इ० स० १८८७ त (म्ह० इकडे लोखंडी रस्ते निर्माण होऊं लागून पंचावन्न वर्षांच्या आंत) ह्या देशांत एक लक्ष बेचाळीस हजार सातशें पस्तीस (१४२७३५) मैल लांब लोखंडी रस्ते सर्वत्र बनले असून त्यांवर आगगाड्या चालू आहेत. ह्यांपैकीं चौपन्न हजार दोनशें

---

सरोवरें गोड्या पाण्याचीं असून, त्यांमध्यें ह्या पृथ्वीवर असलेल्या सगळ्या गोड पाण्याच्या एक तृतीयांशाचा सांठा आहे असें ह्मणतात.

ऐशीं (५४२८०) मैल लांब लोहमार्ग इ० स० १८७३ पासून १८८३ पर्यंत ह्या दहा वर्षांत निर्माण झाले. सगळ्या युरोपांतील लोहमार्ग मिळून देखील युनाइटेड् स्टेट्स्च्या लोहमार्गाइतके लांब नाहींत; इ० स०१८८७ त युनाइटेड् स्टेट्स् शिवाय करून पृथ्वीच्या इतर सर्व ठिकाणीं मिळून कायते १,५०,०१२ मैल लांब लोहमार्ग अस्तित्वांत आले होते. युनाइटेड् स्टेट्स्-मध्यें लोहमार्ग जितक्या जलदीनें निर्माण केले जात आहेत, त्या मानानें पाहूं गेलें असतां आणखी दहा बारावर्षांच्या आंत ह्या देशामध्यें सगळ्या पृथ्वीं-तील लोखंडी रस्त्यांहून अधिक लोहमार्ग निर्माण केले जातील, असा रंग दिसत आहे. (इ० स० १८८० त सगळ्या हिंदुस्थानांत मिळून दोनशें ञ्याहत्तर मैल लांब लोखंडी रस्ते तयार झाले; त्याच्याच पुढच्या वर्षीं ह्या देशांत अकरा हजार पांचशें मैल लोहमार्ग निर्माण झाले! ह्यावरून हिंदुस्थान युनाइटेड् स्टेट्स्च्या किती मागें आहे हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे!) हे जलमार्ग आणि लोहमार्ग राष्ट्ररूपी देहांतील रक्तवाहिन्यांसारखे आहेत. ह्यांतून ह्या राष्ट्राच्या व्यापाररूपी जीवनरक्ताचा अव्याहत प्रवाह चाल-लेला आहे. ह्या दोन साधनांनीं देशांतील व्यापाराला जी अतोनात मदत होत आहे तिचें नुस्तें अनुमान देखील करवणार नाहीं. दरवर्षीं मोठाल्या सरोवरांतील नावांवरून आणि आगबोटींवरून जो माल नेला जातो, त्याचें वजन दोन कोटि पंचावन्न लक्ष टन् म्ह० एकाहत्तर कोटि चाळीस लक्ष (७१,४०.००,०००) मण; नद्यांवरील नावांवरून आणि आगबोटींवरून जाणाऱ्या मालाचें वजन तीन कोटि चाळीस लक्ष टन्, म्ह० पंचाण्णव

---

१ चांगल्या आधारावरून समजतें कीं इ० स० १८८० त सगळ्या यूरोपां-तील लोहमार्ग एक लक्ष चौदा हजार दोनशें बासट मैल लांब होते. तेव्हां युनाइटेड्स्टेट्सचे लोह मार्ग सगळ्या यूरोपखंडांतल्या लोहमार्गांहून अठ्ठावीस हजार चारशें ञ्याहत्तर मैल अधिक लांब आहेत असें सिद्ध होतें.

कोटि वीस लक्ष (९५,२०,००,०००) मण, आणि देशांतल्या देशांत आणि गाड्यांवरून सर्वत्र जाणाऱ्या मालाचें वजन एकुणतीस कोटि दहा लक्ष टन् म्ह० आठ अब्ज चौदा कोटि ऐंशीं लक्ष (८.१४,८०,००,०००) मणां-इतकें असतें! हा जलमार्गाच्या आणि लोहमार्गाच्या योगानें देशांतल्या देशांत होणारा युनाइटेड् स्टेट्स्चा अवाढव्य व्यापार, ग्रेट् ब्रिटन्च्या सर्व परदेशांशीं होणाऱ्या व्यापाराहून सहापट मोठा आहे! ह्यांत परदेशी लोकांचा वांटा बिलकुल नाहीं.

ह्या देशी व्यापारास आणि राष्ट्राच्या उत्कर्षास फारच साधनीभूत असा आणखी एक आश्चर्यकारक पदार्थ युनाइटेड् स्टेट्स्मध्यें आहे; तो कोणता म्हणाल तर येथील तारायंत्र, आणि त्याचाच पोटभेद टेलिफोन्, हा होय. सात लक्ष साठ हजार (७,६०,०००) मैल लांब टेलेग्राफ्च्या तारांचें अद्भुत जाळें ह्या देशांत सर्वत्र पसरलेलें आहे! तें मानवशरीरांतील ज्ञानतंतुजालाप्रमाणें ह्या देशाच्या ज्ञानतंतुजालाच्या ठिकाणीं असून, फार कार्यकारी आणि महत्त्वाचें असें राष्ट्राचें अंग आहे. बेंजमिन् फ्रांक्लिन्नें विद्युल्लतेचा शोध लावल्यापासून, एतद्देशीय लोकांनीं विजेकडून असंख्य कामें करवून घेण्याचा क्रम चालविला आहे. ही वीज टेलिग्राफ्मधून ह्यांच्या जासुदाचें काम करते, टेलिफोन्मधून दूतीचें काम करते, गाड्या चालविते, दिवे लावते, यंत्रें चालविते, रोग बरे करिते, आणि मुलामे लाविते! ती करीत नाहीं अशीं कामें फार थोडीं असतील. प्रत्येक मोठ्या दुकानांत, वखारींत, सावकाराच्या व सरकारी कचेरींत आणि मोठ्या सभागृहांत तारायंत्र आणलेलें असतें. त्याच्या योगानें (आलीकडच्या बाजूस यंत्राच्याजवळ कोणी बसलेलें नसतां,) जगांतील कोणत्याही ठिकाणांतून धाडलेलें वर्तमान छापून निघतें! कोणत्या ठिकाणीं हवा बदलली, धान्याचा, कापडाचा, धातूंचा व नाण्यांचा भाव कोठें कसा आहे, इत्यादि शेंकडों प्रकार-

ची उपयुक्त माहिती टेलिग्राफ्च्या आणि टेलिफोन्च्या योगानें मिळण्यास सोपें पडतें.

देशी व्यापारास उत्कर्ष आणणारें आणखी एक साधन आहे, तें हें कीं, ह्या महादेशांत कोठला माल कोठें गेला, तरी त्यावर जकात मुळींच लागत नाहीं. आगगाड्या आणि नावा यांवरून माल फार स्वस्तदरानें धाडतां येतो; आणि ठिकठिकाणीं तो उघडून दाखविण्याचा त्रास आणि जकात देण्याचा खर्च नसल्यामुळें, सर्वांस माफक दरानें सोईवार मिळून, विकणारांसही त्यापासून पुष्कळ फायदा होतो. बाह्य देशांतून ह्या राष्ट्रांत येणाऱ्या मालावर बरीच मोठी जकात आहे. ह्या देशांतील कित्येक लोकांचें म्हणणें आहे कीं, ही आयात मालावरची जकात काढून टाकल्यास व्यापारास फार उत्तेजन येईल. जोंपर्यंत ह्या देशांत शिल्पकला उत्तम दशेस येऊन देशांतील उद्योगधंद्यांची भरभराट झाली नव्हती, तोंपर्यंत आयात मालावर जकात असणें फार हितावह होतें; कारण जकात असल्यामुळें परदेशी माल देशांत महाग विकत असून, देशी माल स्वस्ता असल्या कारणानें बहुत लोक देशी मालच घेत असत. युनाइटेड् स्टेट्स्चे व्यापारधंदे आणि शिल्पकला आतां फार भरभराटीस आल्या आहेत; आतां आयात मालावर जकात असण्याचें फारसें कारण नाहीं. तरी इकडचे बहुतेक सगळे लोक ही जकात काढून टाकण्याच्या विरुद्ध आहेत. व्यापारांत काय आणि कशांत काय, परदेशाची छाप आपल्यावर बसूं नये, व आपण कोणाचे बंदे होऊन राहूं नये, म्हणून हे लोक फार जपतात. जो माल आपल्या देशांत पुष्कळ होत असून, व्यापाराकरतां परदेशाला पाठविण्यांत येतो, त्याच जातीचा माल परदेशांतून इकडे आला तर तो विकत घेण्यास कोणी मागेंपुढें पाहात नाहीं. अशा पदार्थांच्या विनिमयानें कांहीं नुकसान नसून, उलट फायदाच आहे. परंतु कोणत्यातरी वस्तूच्या व्यापा-

राला किंवा उपयोगाला अजून उन्नत दशा आली नाहीं, तो बेतापेक्षां अधिक परदेशांतून आणवून घेऊन, हे लोक देशी उद्योगाला आणि व्यापाराला धक्का पोंचूं देत नाहींत. प्रत्येक पदार्थाकरतां विलायतेच्या तोंडाकडे पाहात बसणाऱ्या, विलायतेच्या ओंजळीनें पाणी पिणाऱ्या, स्वदेशी उद्योगाची व व्यापाराची हानि करून, विलायती माल वापरणाऱ्या आमच्या देशी लोकांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. विलायतेहून आलेला चहा घेतल्यानें व तिकडचे कपडे नेसल्यानें माझ्या देशी उद्योगधंद्यास धक्का पोंचत आहे, म्हणून मी तसला चहा मुळींच पिणार नाहीं व विलायती कपडेही नेसणार नाहीं; मोटेंधोटें जसलें देशी कापड मिळेल तसलेंच नेसेन, असें अमेरिकन् मनुष्यानें म्हटलें व तशी कृति करून दाखविली! म्हणून आज ह्या देशाला एव्हढी संपन्नता आली आहे. आणि आम्ही काय केलें? आम्ही आपलें सोनें देऊन विलायती जस्ताचीं भांडीं घेतलीं; आपले माग बंद करून विलायती स्वस्तें कापड नेसायाला लागलों; आम्ही उत्तर अमेरिकेंतल्या इंडियन् लोकांप्रमाणें कांचेच्या चकाकणाऱ्या रंगीबेरंगी मण्यांच्या सौंदर्याला भुलून, कांचेचे मणी व मद्य भरून आलेल्या कांचेच्या बाटल्या घेऊन, आपली रत्नभूमि परदेशी लोकांस विकून टाकली. आणि आतां त्या मद्यानें आमचे प्राण जात आहेत आणि त्या फुटक्या कांचा आमच्या पायांना लागून आम्हास मोठाल्या जखमा होत आहेत, म्हणून हाका मारीत बसलों. म्हणून आमचा देश इतका हीन अवस्थेंत आहे! युनाइटेड् स्टेटस् आणि हिंदुस्थान हीं परस्परांच्या उलट दिशेस आहेत, हें ह्यावरून चांगलें लक्ष्यांत येतें.

एथपर्यंत ह्या देशांतील व्यापारधंद्यांस उत्कर्ष आणणाऱ्या साधनांचें थोडेंसें दिग्दर्शन केलें. आतां ह्या अध्यायाच्या प्रतिपाद्य विषयाकडे वळूं.

शेतकी, शिल्पकाम, आणि खाणी खणणें असे ह्या देशांतील व्यापारधंद्यांचे साधारण तीन भाग करतां येतील.

## शेतकी.

हा युनाइटेड् स्टेट्स्च्या लोकांचा मुख्य धंदा आहे. ह्या देशांत इतर सगळ्या गोष्टींप्रमाणें शेतकीही शास्त्रीयरीत्या करण्यांत येत असून, दिवसेंदिवस तिच्यांत अधिक उन्नति होत चालली आहे. याचें कारण ह्या देशांतले शेतकरी लोक अक्षरशत्रु नसून, त्यांपैकीं बहुतेकांस लिहितां वाचतां येतें. ते शेतकीच्या संबंधानें निघणारीं पत्रें, पुस्तकें, वगैरे वाचतात; आणि तिच्या उन्नतीस साधनीभूत शास्त्रीयक्रिया आणि रासायणिक प्रयोग उपयोगांत आणितात. "E pluribus unum" (ए प्ल्यूरिबस् यूनम्) म्हणजे बहुत मिळून एक, ह्या नीतिवाक्याचा उपयोग जसा इतर गोष्टींत आहे, तसाच तो शेतकीमध्येंही आहे. ह्या देशांत न्याशनल् ग्रांज् म्हणजे "राष्ट्रीय कृषकसमिति" नांवाची एक सभा आहे. ही राष्ट्रीय कृषकसभा ज्या नीतीच्या दृढ आधारावर उभारलेली आहे, तिचीं मूलतत्त्वें काय आहेत, हें आम्हास सदरील सभेच्या प्रतिज्ञावाक्यांवरून समजतें. तीं अशीं:—"मुख्य गोष्टींत ऐकमत्य; अवांतर व साधारण गोष्टींत विचारस्वातंत्र्य आणि सर्व गोष्टींत मैत्री असावी. आमच्या व्यवसायाची आणि व्यवसायबंधूंची उन्नति जेणेंकरून होईल, अशाविषयीं फार काळजी घेऊन, आणि आमच्यामध्यें सारख्या रीतीनें श्रमविभाग होऊन, सगळ्यांना न्याय्यरीतीनें आपापल्या श्रमाचें फळ मिळावें, म्हणून आम्ही प्रयत्न करूं." या सभेच्या शाखा या राष्ट्रांत प्रत्येक गांवीं आहेत म्हटलें तरी चालेल. या समितीमधून पुरुष आणि बायका समान योग्यतेच्या मानिल्या जातात. समितीच्या संबंधानें पुरुषांस जितके हक्क आहेत तितके सगळे बायकांना दिलेले आहेत. दा

समितीचा इतिहास लिहिणारा गृहस्थ म्हणतो कीं,–" आपल्या बायकोला किंवा बहिणीला जेथें जातां येईल, अशा ठिकाणीं अपवित्रतेचा आणि अनीतीचा प्रवेश होणार नाहीं." ह्याच कारणावरून राष्ट्रीय कृषकसमितीनें संभावित स्त्रियांना आपल्या सदस्या करून घेतल्या आहेत. खेडे गांवांतून आणि शेतांवरून राहणाऱ्या शेतकऱ्यांस कर्मणुकीकरितां शहरांतील नाटकें, तमाशे, गानसभा, उत्तम व्याख्यानें व इतर नानाप्रकारचे ज्ञानवर्धनाचे उपाय लभ्य नसतात. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत शेतकीच्या संबंधाचीं कामें करण्यांत त्यांचा सगळा वेळ जातो. त्यांस कर्मणुक होऊन, त्यांच्या ज्ञानाचीही अभिवृद्धि व्हावी, हें फार इष्ट आहे. ह्याबद्दल कृषकसभेचे प्रयत्न निरंतर चाललेले असतात. सभेच्या नियमांला अनुसरून वर्षांतून पुष्कळ वेळा निरानिराळ्या विषयांवर प्रसिद्ध विद्वान् वक्त्यांकडून व्याख्यानें करवितात व भाषणें करवितात. फावलेल्या वेळांत निरनिराळे विषय शिकण्याची ज्या स्त्रीपुरुषांची इच्छा असेल, त्यांस ते शिकण्याची सोय ह्या मंडळ्यांकडून करून दिली जाते. युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय कृषिविद्याविभागाकडून प्रसिद्ध झालेली शेतकीसंबंधी माहिती व इतर पुस्तकें वाचून प्राप्त झालेलें व अनुभवजन्य ज्ञान, आणि सदरीं सांगितलेल्या कृषकसमितीच्या द्वारें उपलब्ध होणारें नानाविषयांचें ज्ञान आणि ऐक्यसुख, यांच्यायोगानें इकडील कृषकमंडळी दिवसेंदिवस फार उद्योगी, उन्नत, सुखी आणि धनिक होत चालली आहे.

हें राष्ट्र स्वतंत्र झाल्यापासून येथील जानपदांनीं व राष्ट्राच्या शासकांनीं शेतकीच्या उन्नतीची फार काळजी घेतली आहे. ह्या राष्ट्राचा पहिला अध्यक्ष जोर्ज् वाशिंग्टन् हा बहुकार्यव्यापृत असूनही, तो जातीनें कृषिविद्याविभागावर देखरेख ठेवीत असे. जेफर्सन्, वेब्स्टर्, आडम्स्, क्ले, ह्यांसारखे तत्त्वज्ञानी, धुरंधर, राजकारणी पुरुष स्वतः शेतकी करीत होते. अशीं

उत्कृष्ट उदाहरणें पाहून, लोकांस शेतकी हा धंदा प्रतिष्ठितपणाचा आहे असें वाटून, तो करण्यास उत्साह उत्पन्न व्हावा, आणि त्यामुळें शेतकऱ्यांची योग्य मान्यता सर्वत्र असावी हें साहजिक आहे. युनाइटेड् स्टेट्स्च्या एकंदर संपत्तीचा एक चतुर्थांश शेतकीच्या कामांत घातलेला असून, देशाच्या वार्षिक उत्पन्नाचा चतुर्थांश शेतकीपासून होतो.

एथें शेतकऱ्यांमध्यें काय आणि कोणामध्यें काय, बापानें केलें तेंच लेंकानें करायाचें, अशी चाल नाहीं. एकाद्या मनुष्याच्या वंशांत उत्पन्न झालेल्या असंख्य पुरुषांनीं आपल्या हजाराव्या पूर्वजानें जशी कुऱ्हाड धरली होती, जसा पन्हळ किंवा नाला खणला होता, जसा नांगर जमीनींत बसविला होता, किंवा जसें मधाचें पोळें नाहींतर गवताच्या काड्या विणून कोटें केलें होतें, किंवा वारूळ रचलें होतें, त्या "येनास्यपितरो याता ये न याता: पितामहा:," सारख्या परंपरागत क्रमानें एकादें काम करणें, ह्यांस अशक्य वाटतें. ह्यांची कल्पकशक्ति आणि शास्त्रीयज्ञान, हीं प्रत्येक व्यावहारिक गोष्टीमध्यें उपयोगांत आलेलीं आहेत. एथें शेतकींत देखील यंत्रांचा उपयोग करितात. मोठाल्या शेतांतून नांगरणारें आणि पेरणारें वाफेचें यंत्र एकदोन मनुष्यांच्या मदतीनें शेंकडों मनुष्यांचें काम करतें. बहुतेक सगळ्या लहानमोठ्या शेतांवर शेतकापणी करून पेंढ्या बांधणारें यंत्र एका माणसाच्या मदतीनें पन्नास साठ माणसांचें काम करीत असतें. अशा प्रकारचीं शेंकडों यंत्रें शेतकीच्या कामीं उपयोगीं पडत आहेत, त्यांचीं नांवें देखील आमच्या देशांत कोणाला ठाऊक नसून, केवळ पुस्तकांतील वर्णन वाचून त्यांचा उपयोग काय व कसा होतो, हें कोणास समजावयाचें नाहीं. इ० स० १८८० त जीं सुधारलेलीं आउतें आणि यंत्रें एतद्देशीय शेतकरी वापरीत होते, त्यांची किंमत पंचेचाळीस कोटि डालर म्हणजे एक अब्ज पस्तीस (१,३५,००,००,०००) कोटि रुपयांइतकी होती. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें

जी अतोनात जमीन लागवडीला आणण्यास उपयुक्त आहे, तिजवर काम करण्यास माणसांची विपुलता नाहीं. म्हणून शेतकऱ्यांना यंत्रांचें साहाय्य अवश्य घ्यावें लागतें. ह्या आवश्यकतेनेंच अमेरिकन् लोकांच्या कल्पक बुद्धीस मोठें उत्तेजन येऊन, हजारों यंत्रांची सृष्टि होत आहे; आणि शेतकी व दुसरे धंदे करणारे लोक मोठ्या उत्सुकतेनें नवीनच अस्तित्वांत आलेल्या यंत्रांचा उपयोग करीत आहेत.

इ० स० १८८० च्या खानेसुमारीवरून समजतें कीं, युनाइटेड् स्टेट्स्मध्यें ( आलास्का नांवाच्या मोठ्या उपसंस्थानांतील जमीन शिवाय करून ) लागवडीस आणण्याजोगी जमीन पंधरा लक्ष ( १५,००,००० ) चौरस मैल आहे. (आमच्या हिंदुस्थानाचा एकंदर विस्तार तेरा लक्ष त्र्यायशीं हजार पांचशें चौरस मैल आहे; तेव्हां यु० स्टे०च्या लागवडीस आणण्याजोग्या जमीनीचा विस्तार आमच्या सगळ्या देशापेक्षां मोठा आहे, असें म्हणावें लागतें.) ह्या देशामध्यें सगळी जमीन नवीन आहे; कारण इंग्लिश् वगैरे यूरोपियन् लोकांची वसाहत होण्यापूर्वी ही जमीन कोणी कधींच लागवडीला आणली नव्हती. जिकडेतिकडे जंगल आणि गवत वाढून राहिलेलें होतें. अर्वाचीन लोकांस ह्या देशाच्या इतिहासाची जितपत माहिती आहे तिजवरून कळतें कीं, सृष्टीच्या प्रारंभापासून यूरोपियन् लोक इकडे वसाहत करीत तोंपर्यंत ह्या भूमीला कधीं नांगराचें दर्शन झालें नव्हतें. तेव्हां अनादिकालापासून जंगलें वाढून घट्ट झालेल्या जमीनीवरचें रान कापून, ती नांगरून सवरून लागवडीस आणायाची म्हणजे फार मेहनतीचें व अत्यंत कठिण काम आहे, हें कोणाला सांगायाला नको. पण धन्य इकडल्या लोकांच्या उद्योगाची आणि निरलसतेची ! त्यांनीं ह्या काळापर्यंत कमींतकमी म्हटली तरी दोन लक्ष सत्याण्णव हजार चौरस मैल जमीन लागवडीला आणिली आहे ! ह्या शतकाच्या प्रारंभीं युनाइटेड् स्टेट्स्मध्यें सु-

मारें पांसष्ट हजार चौरस मैल जमीन लागवडीस आणलेली होती. त्यानंतर साठ वर्षांत आणखी एक लक्ष पन्नास हजार चौरस मैल जमीन नांगरून शस्योत्पादक करण्यांत आली. इ० स० १८६० पासून १८८० पर्यंत ब्यायशीं हजार चौरस मैल जमीन लागवडीस आणली गेली! इकडे जमीनदार आणि कुळें फारशीं नाहींत, असें मागें एके ठिकाणीं सांगितलें आहे. दाक्षिणात्य संस्थानांतून राहणाऱ्या लोकांच्या जमिनी फार मोठाल्या होत्या; त्यांवर इबशी दास काम करीत असत. आतां ते काळे लोक दास्यमुक्त होऊन, पूर्वीं होते त्याच ठिकाणीं बहुतेक सगळे राहिले आहेत. ते मोठाल्या जमिनींच्या मालकांपासून शेताचे लहान लहान तुकडे भाड्यानें घेऊन त्यांवर शेतकी करतात. त्यांस शेतें विकत घेण्यापुरती शक्ति आली ह्मणजे, मग भाड्यानें घेतलेल्या शेतांची किंमत त्यांच्या मालकांस देऊन तीं त्यांपासून घेतील असा संभव आहे. जमीन विकत देण्याघेण्याविषयींचे कायदे ह्या देशांत फार सोपे आहेत. पश्चिमेंतील संस्थानांतूनही बरींच मोठमोठालीं शेतें पुष्कळांच्या ताब्यांत आहेत. परंतु हा जमीनदारीपणा व कुळांचा वर्ग देशांत असूं नये, अशी पुष्कळांची इच्छा असलेली दिसते. आतां बहुतेक शेतकरी स्वतःच्या विकत घेतलेल्या लहान लहान शेतांवर काम करीत आहेत. युनाइटेड् स्टेट्स्‌ मध्यें एकंदर चाळीस लक्ष शेतें आहेत, त्यांपैकीं सरासरी तीन चतुर्थांश इतकीं शेतें स्वतंत्र लोकांच्या स्वाधीन असून, त्यांचे मालकच त्यांवर काम करीत आहेत. इकडील चाळीस लक्ष पांच हजार नऊशें सात (४०,०५,९०७) शेतांपैकीं ३,२२,३५० शेतें भाडोत्री लावलेलीं आहेत; ६,९९,२४४ शेतें सरकतदारांच्या मालकींत आहेत; आणि एकुणतीस लक्ष चौऱ्यायशीं हजार तीनशें सहा (२९,८४,३०६) शेतें स्वतंत्र लोकांच्या मालकींत आहेत. साधारण मानानें पाहूं गेल्यास एकेक शेत एकशें चौतीस एकरांचें असतें.

तरी हजार बाराशें एकरांहून अधिक मोठालीं शेतें कमींत कमी तीसएक हजारां इतकीं निघतील. इकडे शेतकीच्या उपयोगी जमीनीही ब-याच स्वस्त्या मिळतात. हल्लीं कांहीं संस्थानांतून एक एकर जमीनीला सरासरी साठ रुपये पडतात. अट्लांटिक् समुद्राजवळील कित्येक औदीच्य संस्थानांतून जमिनीची किंमत एकरामागें २२ रुपयांपासून १०२ रुपयां पर्यंत आहे. दिवसेंदिवस जसजशी लोकसंख्या आणि वसाहतदारांची संख्या वाढत जात आहे, तसतशी जमीन महाग होत आहे. इ० स० १८५० पासून १८८० पर्यंत जमिनीची किंमत दुपटीहून अधिक झाली आहे.

लागवडीस आणिलेल्या आणि आणण्याजोग्या जमिनीपैकीं बहुतेक सगळी जमीन सपाट असून शेतकीच्या कामांत यंत्रांचा पुष्कळ उपयोग होतो. पाण्याचा पुरवठा चोहोंकडे विपुल आहे. शेतकरी लोक आपल्या उद्योगांत मेहनत आणि यंत्रांचा उपयोग करण्यांत आळस करीत नाहींत. ते हरतऱ्हेनें ही सुपीक जमीन अधिक पिकाऊ करण्यास झटतात. ह्या सर्व अनुकूल कारणांमुळें युनाइटेड् स्टेट्स्ची शस्यसंपत्ति आतांच फार मोठी आहे, आणि उत्तरोत्तर तिची अभिवृद्धि अतिशय होत जाणार. इ० स० १८८० त अकरा कोटि ऐशीं लक्ष एकर जमिनींत सरासरी दोन अब्ज सत्तर कोटि (२,७०,००,००,०००) मण म्हणजे दर एकराला सरासरी तेवीसमण छत्तीस शेर (पक्के) धान्य उत्पन्न झालें! ह्यापैकीं १,७५,००,००,००० मण मका, ४६,००,००,००० मण गहूं, ४०,७०,००,००० ओट्स् आणि बाकी इतर धान्यें होतीं. मका, कापूस, आणि गहूं, हीं ह्या देशांतील मुख्य शस्यें आहेत. डुकरें, गुरें आणि घोडे इत्यादि जनावरांस इकडे बहुत करून मकाच चारतात. डुकरें तर मक्यावांचून दुसरें कांहीं खात नाहींत. माणसांमध्येंही मक्याचा बराच खप होतो. इ० स० १८८० त सर्व देशास पुरून उरलेला तीन कोटि रुपयांहून अधिक किमतीचा मका

बाह्य देशांस पाठविण्यांत आला. इ० स० १८६० पर्यंत ह्या देशांतील लोकांस परदेशांतून गहूं आणण्याची गरज होती. आतां एथें सगळ्या पृथ्वींत उत्पन्न होणाऱ्या ह्या शस्याचा एक चतुर्थांश उत्पन्न होतो. इ० स० १८६० त ह्या देशामध्यें १७,३०,००,००० मण गहूं उत्पन्न झाला होता; १८७०त तो २८,७०,००,०००मण झाला; पुढें १८८०त४५,९०,००,००० मण आणि १८८४ त ५०,००,००,००० मण गहूं उत्पन्न झाला! ह्यावरून गहूं वगैरे शस्यांचें उत्पन्न इकडे किती जलदीनें वाढत जात आहे ह्याचें थोडें बहुत अनुमान करतां येईल. सत्तावीस वर्षांपूर्वीं एतद्देशीय लोकांना बाहेरून गहूं आणावा लागत होता. पण इ० स० १८८० त ह्या देशांतील सगळ्या माणसांस पुरून उरलेला ५९,००,००,००० रुपये किंमतीचा गहूं परदेशांत रवाना झाला.

इ० स० १७७६ पासून ह्या देशांतील लोक कापसाची लागवड करूं लागले. प्रथम इकडे कापसाची उत्पत्ति आणि त्यापासून कांहीं फायदा होईल किंवा नाहीं, ह्याचा संशयच होता; तरी त्यांनीं कापसाची लागवड करायाची म्हणून एकदां निश्चय केला, तो अर्धवट नव्हता. हा देश स्वतंत्र झाल्यावर लवकरच एली व्हिट्नी नांवाच्या एका मनुष्यानें कापूस व सरक्या निराळ्या काढायाचें यंत्र निर्मिलें. तेव्हांपासून कापसाच्या लागवडीस भरभराट येऊं लागली. ह्या नवीनच उत्पन्न होत असलेल्या शस्याचा देशांत उपयोग होऊन देशी मालाचा खप व्हावा, म्हणून बाह्य देशांतून येणाऱ्या कापडावर भारी जकात बसविण्यांत आली; तेव्हां अर्थातच देशी माग पुष्कळ होऊन सर्वत्र देशी सुताचें कापड तयार होऊं लागलें. इ० स० १८३० सालापूर्वीं इकडील कापूस बहुतेक सगळा इकडेच खपत असे. तरी ह्या वर्षांत सरासरी नऊ कोटि रुपये किमतीचा कापूस बाहेर पाठविण्यांत आला होता. इ० स० १८८० त ह्या देशांत ५७५७३९७ गठे

कापूस उत्पन्न झाला; पैकीं, ६६,००,००,००० रुपये किमतीचा कापूस अन्य देशांस धाडण्यांत आला. ह्यापैकीं दोन तृतीयांश कापूस इंग्लंडांत खपला. इंग्लंड जें कापड करून आमच्या देशांत स्वस्त्या दरानें विकतें, तें बहुतेक अमेरिकेच्या कापसाचें असतें. इकडच्या कापसाचे सूत फार बारीक आणि उत्तम होतें. राइ नांवाचें एक धान्य आहे, त्याच्या भाकरी करतात. तेंही इकडे पुष्कळ उत्पन्न होतें. १८८० सालांत हें धान्य २,००,००,००० मण उत्पन्न झालें. तसेंच जव किंवा सातू ४,४०,००,००० मण उत्पन्न झालें. ओट्स् नांवाचें धान्य ४०,७०,००,००० मण उत्पन्न झालें. तसेंच बटाट्यांचें उत्पन्न २०,३०,००,००० मण झालें. पूर्वेस आणि पश्चिमेच्या विस्तीर्ण मैदानांतून पुष्कळ उत्कृष्ट गवत उत्पन्न होतें. इ० स० १८८० त १,००,८०,००,००० मण गवत बाजारांत विकलें गेलें. तंबाखूची लागवड इकडे फारच होत आहे. सहा लक्ष अडतीस हजार एकर जमीनीवर ह्या अरिष्ट शस्याची पेरणी होत आहे. ह्या कारणानें इकडे पुष्कळ तंबाखू उत्पन्न होते. तींतून अर्धी ह्या देशांत खपते आणि अर्धी तंबाखू बाहेर पाठविण्यांत येते. ह्या देशांत जिकडे तिकडे बहुत प्रकारच्या फळांची समृद्धि आहे. इ० स० १८८० त उत्पन्न झालेल्या फळांची किंमत सहा कोटि रुपयांहून अधिक होती. त्या सालांत उत्पन्न झालेल्या एतद्देशीय शस्यांची किमत एकंदर नऊ अब्ज सहा कोटि (९,०६,००,००,०००) रुपयांवर होती. आणि १८८४ त उत्पन्न झालेल्या शस्यांची किंमत आठ अब्ज सोळा कोटि पंचेचाळीस लक्ष (८,१६,४५,००,०००) रुपयां इतकी होती, असें चांगल्या आधारावरून समजतें.

डुकरें, गुरें, कोंबडीं इत्यादि प्राणी इकडे भाजीपाल्यासारखे समजले जात असून, इतर शस्यांप्रमाणेंच त्यांचीही "लागवड" होते असें मागें एके ठिकाणीं सांगितलें आहे. इ० स० १८८० मध्यें पांच कोटि सदुसष्ट लक्ष पन्नास हजार

(५,६७,५०,०००) डुकरें; चार कोटि साठ लक्ष (४,६०,००,०००) गुरें, (पैकीं एक कोटि ऐशीं लक्ष (१,८०,००,०००) दुभत्या गाई होत्या. (इकडच्या गाई आमच्या देशांतील गाईसारख्या पावशेर अच्छेर दूध देणाऱ्या नाहींत. ह्यांस खायाला पुष्कळ मिळतें; शास्त्रीयरीत्या ह्यांची चांगली वाढ होईल व ह्यांची स्थिति आणि शरीरसंपत्ति उन्नतदशेस येईल असा प्रयत्न चाललेला असतो. ह्या गाई खरोखरच घटोध्नी; म्हणजे घागरभर दूध ज्यांच्या ओटींत असतें, अशा आहेत). चार कोटि पन्नास लक्ष (४,५०,००,०००) मेंढरें; आणि एक कोटि वीस लक्ष (१,२०,००,०००) घोडे, इतकीं जनावरें ह्या देशांत होतीं. आणि आतां तर त्यांची अभिवृद्धि फारच झाली असेल. ह्या सगळ्या जनावरांचा उपयोग ह्या देशांत तर आहेच. इकडील साडेपांच कोटि मांसप्रिय मनुष्यांस ह्या जनावरांच्या मांसाचा पुरवठा होऊन, परदेशीं धाडायालाही पुष्कळ राहतें. थोड्या वर्षांपासून डुकरांचें वगैरे मांस वाळवून परदेशांत विकण्यासाठीं पाठविण्याचा क्रम चालू झालेला आहे. डुकरांचें, गुरांचें व मेंढरांचें जें मांस दर वर्षी परदेशांत पाठविण्यांत येतें, त्याची किंमत सवापस्तीस कोटि (३५,२५,००,०००) रुपयांहून अधिक आहे. इ० स० १८८० त ह्या देशांत तीस लक्ष मण लोंकर उत्पन्न झाली. "लोणी–खवा–आंडीं–सभा"—(नांव थोडेंसें चमत्कारिक आहे, ह्यास उपाय नाहीं!)—नांवाच्या मंडळीच्या वार्षिक वृत्तावरून कळतें कीं, युनाइटेड् स्टेट्स्‌मधील लोणी, खवा वगैरे दुभत्याच्या पदार्थांचें वार्षिक उत्पन्न तीस कोटि (३०,००,००,०००) रुपयांहून अधिक आहे. इ० स० १८८० सालांत युनाइटेड् स्टेट्स्‌च्या शेतकऱ्यांची मिळकत—(खर्च वजा करून त्यांच्या पदरीं पडलेला नफा)—एक अब्ज पांसष्ट कोटि (१,६५,००,००,०००) रुपयांहून अधिक होती. मोठ्यांचें सगळेंच मोठें!

## शिल्पकला.

इ० स० १७७६ सालापूर्वी उत्तर अमेरिकेंतील तेरा इंग्लिश् वसाहती सर्व प्रकारें परतंत्र होत्या. त्यांवर इंग्लिश् सरकारचें एकाधिपत्य असल्यामुळें, जेणेंकरून इंग्लंडास व तेथें राहाणाऱ्या लोकांस फायदा होईल, असल्याच प्रकारचे कडक कायदे त्या तेरा वसाहतींतून चालू केलेले होते. हीं संस्थानें स्वतंत्र होण्याच्या सुमारास तिसरा जोर्ज् इंग्लंडचा राजा होता; त्याची कारकीर्द तर ह्या लोकांस फारच असह्य झाली. ह्या देशांत येणाऱ्या व येथून जाणाऱ्या प्रत्येक पदार्थावर जकात होती. ह्यांना स्वतंत्रपणें परराष्ट्रांशीं व्यापार करण्याची मोकळिक नसून, केवळ इंग्रजी दरानें इंग्रजी वाण्यांबरोबरच व्यापार करावा असा निर्बंध होता. ह्यांनीं लोखंड वगैरे धातू खाणींतून काढून इंग्लंडास पाठवावे, त्यांचे पदार्थ करूं नयेत; फार तर काय, पण घोड्याच्या नाळास लागणारी एकाद दुसरी चूक देखील ह्या देशीं तयार करून घेण्याचा अधिकार येथील वसाहतदारांस नसावा, असें पुष्कळ इंग्रजांचें म्हणणें होतें. जे जे पदार्थ येथून तयार होऊन इंग्लंडास जात असत, त्यांवर फार जबर जकाती होत्या. पदार्थ नेतांना जकात, आणतांना जकात, पदार्थांच्या क्रयविक्रयावर कर, असे उठतां बसतां कर देऊन ह्यांच्या "नाकांत दम" आला. जमिनीपासून एक फूट उंचीवर ज्याच्या कांड्याचा व्यास दोन फुटांइतका असेल असलें झाड कापण्याचा अधिकार वसाहतदारांस नव्हता. ह्या आणि अशाच दुसऱ्या अनेक प्रकारच्या पारतंत्र्यसूचक नियमांनीं हे लोक अगदीं जखडून गेले होते. ह्यांच्या व्यापारधंद्यांस उत्तेजन नव्हतें. करभारानें ह्यांच्या पाठी आणि डोकीं वांकून गेलीं होतीं. शेवटीं स्टांप् आक्ट् आणि चहावरचा कर ह्यांच्या योगानें ह्या लोकांची स्वातंत्र्येच्छा बलवती होऊन, ह्यांनीं आपल्या मानेवरून इंग्लंड्चें जूं काढून झुगारून दिलें; व आपल्या हातापायांतील इंग्रजी काय-

ह्यांच्या विड्या तोडून टाकल्या. इ० स० १७८५ त स्वातंत्र्यसंग्रामाचा शेवट होऊन राष्ट्रांत शांतता स्थापित झाली, व राष्ट्रशासन सुरळीतपणानें चालूं लागलें. देशाच्या व्यापारास जेणेंकडून उत्तेजन येईल असे कायदे एकामागून एक भराभर अस्तित्वांत आले. तेव्हांपासून ह्यांच्या ऊर्जित दशेस आरंभ झाला. इ० स० १७९० पासून १८२० पर्यंत यूरोप खंडांत जीं कित्येक युद्धें झालीं, त्यांमुळें त्या खंडांतील व्यापारास धक्का बसून युनाइटेड् स्टेट्स्च्या व्यापारास उत्तेजन मिळालें. ह्याच्यापुढें इ० स० १८६० पर्यंत एथील व्यापारधंद्यांस कांहीं प्रतिबंध नव्हता. पुढें पांच वर्षेपर्यंत ह्या राष्ट्रावर युद्धाची धाड आली, तेव्हां व्यापाराचें मोठें नुकसान झालें. त्यानंतर इ० स० १८६६ पासून आजपर्यंत एथील उद्योगधंदे अव्याहत चालत असून ह्यांचें सगळें नुकसान भरून आलें आहे, इतकेंच नव्हे, तर हें राष्ट्र सगळ्या पृथ्वींतील राष्ट्रांत धनवत्तर म्हणविणाऱ्या इंग्लंडाहूनही अधिक संपत्तिमान् झालें आहे. एथें वसाहत केल्यापासूनच अमेरिकन् लोकांनीं शिल्पकलेची उन्नति करण्यांत मन घातलें, तें इतकें कीं, वसाहती झाल्यावर थोड्या वर्षांनींच इंग्रजांस ह्यांचें भय वाटून, इकडे शिल्पकला मुळींच उदयास येऊं न देण्याच्या उद्देशानें त्यांस कडक कायदे करावे लागले. तरी इ० स० १८३० पर्यंत इकडे शिल्पकला फारशी भरभराटीस आली नव्हती. त्या काळापर्यंत राष्ट्रांत शांति स्थापन होऊन शिल्पकला व इतर उद्योगधंदे ह्यांचा पाया दृढ करण्यांतच सर्व वेळ गेला. आतां ह्या देशांत शिल्पकला किती उन्नत दशेस येऊन पोहोंचली आहे, हें ज्यानें स्वतः पाहिलें नाहीं, त्याला कळण्यासारखें नाहीं.

ही कला दिवसें दिवस अधिक उन्नत होत चालली आहे. कांहीं वर्षी पूर्वी शिल्पकलेंत इंग्लंड् सगळ्या पृथ्वींत श्रेष्ठ होतें. आतां ह्या कामांत युनाइटेड् स्टेट्स्नें त्याच्या श्रेष्ठतेचें हरण केलें आहे. प्रत्येक कामामध्यें

आतां यंत्रांचा उपयोग व्हावयाला लागल्यानें प्रत्येक उद्योगाला राक्षसी रूप येत आहे. यंत्रांच्या साहाय्यानें पीठ दळणें हा धंदा सगळ्यांत मोठा आहे. ह्या देशांत चोवीस हजार (२४,०००) पीठ दळण्याचीं यंत्रें आहेत, त्यांमधून दररोज पन्नास लक्ष (५०,००,०००) पक्के मण पीठ दळून निघतें. इ० स० १८८० त ह्या धंद्यास लावलेलें भांडवल त्रेपन्न कोटि बावीस लक्ष (५३,२२,००,०००) रुपयांइतकें होतें; आणि त्या वर्षांत तयार झालेल्या पिठाची किंमत दीड अब्ज (१,५०,००,००,०००) रुपयांइतकी होती. हें पीठ अमेरिकन् लोकांतच काय, पण सगळ्या यूरोप खंडांतल्या लोकांस पुरून उरेलसें आहे. अमेरिकन् लोकांनीं तयार केलेलें पीठ, यूरोप, जापान, चीन, हिंदुस्थान इत्यादि देशांत पुष्कळ खपत आहे. पीठ दळण्याच्या खालोखाल खाटिकाचा धंदा फार मोठा आहे. ह्यांतही यंत्रांचा फार उपयोग होतो. वधार्थ आणलेल्या जनावरास यंत्राच्या अलीकडे आणून उभें केलें म्हणजे एका मिनिटाच्या आंत त्याचा गळा कापून, त्याच्या अंगाचें चामडें, आंतडीं वगैरे काढून, मसाला भरून बांधून तयार होतें. मग पांच मिनिटांच्या आंत यंत्राच्या दुसऱ्या बाजूस उभा राहिलेल्या मनुष्याच्या हातांत पडतें. शिकागोशहरांत हा पशुवधाचा कारखाना फार मोठा आहे. इतर ठिकाणींही असले पुष्कळ कारखानें आहेत. इ० स० १८८० त शिकागोमध्यें ५२,५०,००० डुकरें व २५,००,००० गुरें मारून त्यांच्या शरीरांत मसाला भरून तयार करून विकण्याकरतां पाठविण्यांत आलीं. ह्या धंद्यास लावलेलें भांडवल सुमारें पंधरा कोटि (१५,००,००,०००) रुपयांइतकें असून, ह्या कामास लावलेल्या मनुष्यांचा वर्षाचा पगार तीन कोटि पंधरा लक्ष रुपयांहून अधिक आहे. एका वर्षांत सतरा लक्ष गुरें, बावीस लक्ष मेंढरें आणि एक कोटि साठ लक्ष डुकरें मारून मसाला घालून

बांधून, मनुष्यांच्या खाण्याकरतां सर्व पृथ्वीवरच्या भाजीबाजारांतून पाठवून देण्यांत आलीं.

लोखंड आणि पोलाद ह्यांचे पदार्थ निर्माण करण्यामध्यें युनाइटेड् स्टेट्स्‌ची योग्यता इंग्लंडच्या खालोखाल आहे. पृथ्वींत सर्वत्र लागणाऱ्या लोखंडी पदार्थांपैकीं एक पंचमांश, आणि पोलादी पदार्थांपैकीं एक चतुर्थांश पदार्थ युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें तयार होतात. इ० स० १८८३ च्या सालीं ह्या देशांत तयार झालेल्या लोखंडी आणि पोलादी पदार्थांची किंमत एक अब्ज वीस कोटि (१,२०,००,००,०००) रुपयां इतकी होती. ज्या अव्याहत वायुवेगानें ह्या धंद्याची उन्नति व वृद्धि होत आहे, त्याच्या मानानें पाहूं गेलें असतां १८९० पर्यंत युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें लोखंडी व पोलादी पदार्थ इंग्लंडाहून अधिक तयार होतील असा रंग दिसत आहे. इ० स० १८७० त एथें दहा लक्ष वीस हजार (१०,२०,०००) पक्के मण पोलादाचे पदार्थ बनविण्यांत आले; आणि त्याच्या पंधराव्या वर्षी म्ह० इ० स० १८८५ त तीन कोटि चौऱ्यायशीं लक्ष अठ्ठावन्न हजार तीनशें चौसष्ट (३,८४,५८,३६४) पक्के मण पोलादाचे पदार्थ निर्माण करण्यांत आले! युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें लोखंडाच्या खाणी पुष्कळ आहेत, आणि येथील लोकांच्या असाधारण उद्योगानें त्या खाणींतील धातु जेथल्या तेथें पडून न राहातां, मनुष्यजातीच्या उपयोगास येऊन, ह्या देशाची संपत्ति वाढवितील. तांबें, पितळ, कांसें इत्यादि धातूंचे पदार्थ आणि यंत्रें निर्मिण्याचेही मोठाले कारखाने आहेत; त्यांत पुष्कळ भांडवल घातलें असून त्यांतून तयार झालेल्या पदार्थांची किंमत इ० स० १८८१ मध्यें चौसष्ठ कोटि वीस लक्ष (६४,२०,००,०००) रुपयांहून अधिक होती. लांकडें कापून घरें बांधण्याच्या वगैरे उपयोगाकरितां विकणें हा एक फार मोठा धंदा आहे. तो दुसऱ्या कोणत्याही देशांत आहे किंवा नाहीं ह्याची मला माहिती नाहीं.

पण युनाइटेड् स्टेट्स्‌मध्यें जितकीं अरण्यें आहेत तितकीं तीं इतर देशांत नसतील असें अनुमान आहे; किंवा तीं असलीं तरी इतर देशांतील लोकांनीं लांकडांच्या व्यापारांत अजून पाऊल पुढें टाकलें नाहीं एवढें खरें आहे. इ० स० १८८० त चाळीस हजार लोक ह्या धंद्यावर पोट भरीत होते. ह्या धंद्यांत घातलेलें भांडवल सुमारें साठ कोटि (६०,००,००,०००) रुपयांइतकें असून, कापून तयार झालेल्या लांकडाची किंमत एकूणसत्तर कोटि अठ्याण्णव लक्ष सहा हजार एकशें सत्यायशीं (६९,९८,०६,१८७) रुपयांइतकी होती. मिशिगन्, विस्कान्सिन्, मिनेसोटा, आरेगन्, आणि उत्तर क्यालिफोर्निया ह्या संस्थानांत आणि वाशिंग्टन् टेरिटोरी नांवाच्या उपसंस्थानांत फारच मोठालीं अरण्यें आहेत. कांहीं भाग तर असे आहेत कीं जेथें अरण्यांतल्या झाडांवांचून दुसरें कांहींच उत्पन्न व्हावयाचें नाहीं. ह्या सगळ्या अरण्यांतून उद्योगी लोक अतोनात लांकूड कापून आपल्या देशांत व इतर देशांत विकून धनिक होत आहेत. इकडे ओक्, चेरी, मेपल्, मोहागनी, अक्रोड, इत्यादि नाना जातींचें टिकाऊ, सुरेख आणि मोलवान् लांकूड फारच उत्पन्न होतें; तें कापून तयार करून यूरोपांत पाठवितात. युनाइटेड् स्टेट्स्‌च्या सुवर्णभूमींत चारशें निरनिराळ्या प्रकारचें उपयोगी लांकूड उत्पन्न होत आहे! ह्याच्या खालोखाल मोठा व्यापार म्हटला म्हणजे कापसाचा. ह्यांत घातलेलें भांडवल इ० स० १८८० मध्यें बासष्ट कोटि चाळीस लक्ष (६२,४०,००,०००) रुपये असून, देशांत उत्पन्न झालेल्या कापसाच्या पदार्थांची किंमत अडतीस कोटि वीस लक्ष (३८,२०,००,०००) रुपये होती. एथें पिकलेला अतोनात कापूस इंग्लंड् आणि इतर देशांत विकला जातो, म्हणून एथें कापड फार उत्पन्न होत नाहीं. तरी ह्या देशांतील लोकांस पुरून उरेल, इतकें कापड उत्पन्न करण्यांत येतें. ह्याच्या खालोखाल लोंकरीचा व्यापार फार मोठा आहे.

ह्यांत घातलेलें भांडवल साडेशेचाळीस कोटि (४६,५०,००,०००) रुपये असून, देशांत तयार झालेल्या लोंकरीच्या पदार्थांची किंमत सरासरी तितकीच असावी असें अनुमान आहे. शायशीं हजारांवर मनुष्यें ह्या धंद्यानें आपला चरितार्थ चालवीत आहेत. लोंकर, सूत इत्यादिकांनीं मिश्र अशा देशी विणलेल्या पदार्थांची किंमत इ० स० १८८० त एकूणीस कोटि सत्त्यायशीं लक्ष पन्नास हजार (१९,८७,५०,०००) रुपयां इतकी होती. ह्याच सालांत रेशमाच्या व्यापारांत पांच कोटि सत्तर लक्ष (५,७०,००,०००) रुपयांचें भांडवल घातलेलें असून, देशी उत्पन्न झालेल्या रेशमी कापडाची वगैरे किंमत पांच कोटि पंचावन्न लक्ष (५,५५,००,०००) रुपयांहून अधिक होती. लोंकरींचे, रेशमाचे व सूत, लोंकर व रेशीम ह्यांचे विणून केलेले पायमोजे, हातमोजे इत्यादि जे पदार्थ त्या वर्षांत निर्माण झाले, त्यांची किंमत अठरा कोटि साठ लक्ष (१८,६०,००,०००) रुपयां तकी होती. ह्या देशांतील लोकांस गालीचे निर्माण करावयाला लागून अजून पंचवीस वर्षें झालीं नाहींत. इतक्याशा काळांतच हा धंदा फार भरभराटीस आला आहे. इ० स० १८८० त ह्या देशांत निर्माण झालेल्या गालीच्यांची वगैरे किंमत सहा कोटि बावन्न लक्ष पन्नास हजार (६,५२,५०,०००) रुपये होती. जोडे शिवण्याचा धंदाही फार महत्वाचा आहे. यांत्रिक साधनानें इतर धंद्यांप्रमाणेंच ह्याचीही फार उन्नति झाली आहे. पन्नास वर्षांमागें ह्या देशांतील मोचाला आमच्या तिकडच्या मोच्याप्रमाणेंच जोडे शिवायाला फार वेळ आणि मेहेनत लागत असे. त्या काळीं रोज एक जोडा तयार केला, म्हणजे मोचाला मोठी कृतकृत्यता वाटत असे. आतां यंत्राच्या साधनानें एक मनुष्य एक दिवसांत तीनशें जोडे शिवून तयार करतो! इ० स० १८८० मध्यें ह्या देशांत जोडे करण्याच्या मोठमाठोल्या गिरण्या तीन हजार होत्या. त्यांत सरासरी ब्याण्णव लक्ष मनुष्यें काम करीत होतीं.

थोड्या वर्षांपूर्वी युनाइटेड् स्टेट्स्च्या लोकांना लागणारीं सगळीं घड्याळें यूरोपांतून येत होतीं. आतां युनाइटेड् स्टेट्स्मध्यें इतकीं घड्याळें तयार होत आहेत कीं, तीं येथील सगळ्या लोकांना पुरतात इतकेंच नाहीं, तर युरोपांतील बहुतेक देशांत आणि हिंदुस्थानांत त्यांचा खप फार होत आहे. इकडे दुसऱ्या सगळ्या उद्योगांप्रमाणेंच घड्याळें करण्याचे कारखाने फार मोठाले व अतिशय उन्नत स्थितीस आलेले आहेत. इ० स० १८५० च्या सुमाराला ह्या देशांतील घड्याळें करण्याच्या उत्तम कारखान्यांत रोजचीं चार पांच घड्याळें तयार झालीं म्हणजे फार, असें समजत होते. आतां तशाच कारखान्यांतून रोजचीं बारा तेराशें घड्याळें तयार होत आहेत. रोजचीं इतकीं घड्याळें तयार करणारे चार पांच मोठाले कारखाने आहेत. त्यांच्या कामाला खळ म्हणून कधींच नाहीं. एका कारखान्यांतून दरमाहा सहा हजार घड्याळें एका लंडन शहरासच पाठविण्यांत येतात. कांहीं वर्षांनीं हीं स्वस्तीं, सुरेख आणि सोइस्कर घड्याळें सर्व पृथ्वींतील लोक आपल्यापाशीं बाळगूं लागतील. ह्याचप्रमाणें अमेरिकन् लोकांनीं केलेलीं शिवण्याचीं यंत्रें सर्वत्र प्रचारांत येतील. इ० स० १८८० तीन कोटि पंचावन्न लक्ष एकूणनव्वद हजार पांचशें चौसष्ट (३,५५,८९,५६४) रुपये किमतीचीं शिवण्याचीं यंत्रें निर्माण झालीं. तशींच रुप्याचीं भांडीं, सोन्याचे दागिने व नग इत्यादि नकशीदार काम इकडे फार उत्तम होतें. लांकडावर चित्रें खोदणें व कोरींव काम ह्यांमध्यें युनाइटेड् स्टेट्स्चे करागीर फार कुशल आहेत. इकडे आणखी शेंकडों धंदे आहेत. ह्या लहानशा निबंधांत त्या सर्वांचें यथास्थित वर्णन करणें संभवत नाहीं. शिल्पकला किती जलदीनें उन्नतीस आली व येत आहे, ह्याचें अनुमान देखील करणें कठिण आहे. इ०स० १८५० त शिल्पकलेनें निर्मिलेल्या पदार्थांची किंमत सहा अब्ज अठरा कोटि रुपयांइतकी होती. इ०स० १८८० त एक खर्व सहा अब्ज

अडसष्ट कोटि (१,६,६८,००,००,०००) रुपये किमतीचे पदार्थ ह्या देशांत निर्माण झाले. ह्याच सालीं इंग्लंदामध्यें शिल्पकलेनें निर्मित झालेल्या पदार्थांची किंमत एक खर्व दोन अब्ज पंधरा कोटि पन्नास लक्ष रुपयां इतकी होती; ह्यावरून इंग्लंडापेक्षां युनाइटेड् स्टेट्स्मध्यें चार अब्ज अठ्ठावन्न कोटि पन्नास लक्ष रुपयांचा माल, जास्त निर्माण होतो, असें सिद्ध झालें.

## खाणी.

युनाइटेड् स्टेट्स्ची सुवर्णभूमि केवल वरच्या पिकाऊपणानेंच स्वर्णभूमि झालेली आहे, असें नाहीं. सृष्टिदेवीनें ह्या स्वतंत्र राष्ट्राला बाहेरून जसें सगळ्या सुखसोईनीं समृद्ध केलें आहे, तसेंच जमीनीच्या खालीं ह्या राष्ट्रांतील असंख्य खनिरूपी तळघरांतून रत्नांचे व मौल्यवान् धातूंचे अक्षय निधि ठेविलेले आहेत. सृष्टिदेवी ह्या असंख्य विशाळ तळघरांत बसून अमेरिकन् लोकांकरतां किमया करून, मातीचें सोनें करीत आहे. राष्ट्राच्या पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण या चाऱ्ही सीमांच्या मध्यें असलेल्या हिरव्या चार कुरणांच्या, आनंददायक सुपीक समृद्ध शस्यक्षेत्रांच्या, गगनचुंबित वृक्षराजिमंडित अरण्यांच्या, सुखसमृद्ध जनपूर्ण गांवांच्या आणि वरून शोभाहीन आणि ओसाड दिसणाऱ्या मैदानांच्या खालीं पृथ्वीच्या खोल तळघरांतून युनाइटेड् स्टेट्स्च्या भाग्यशाली लोकांकरतां सृष्टिदेवीनें अनंत सोनें, रुपें, शिसें, तांबें, पारा, निकेल, मीठ, कोळसे, खनिज तेल ज्वालाग्राही खनिजवात, उत्तम प्रकारचे दगड, गंधक इत्यादि अनेक पदार्थ सांठवून ठेवलेले आहेत. वांसरूं दूध पितांना जसें एक एकदां आपल्या मुसकटानें आईच्या ओटीला धक्का देतें त्याबरोबर गाय अधिक दूध सोडते, त्याच प्रमाणें अमेरिकन् मनुष्यांनीं एकेकदां आपल्या मातृभूमीची पाठ थोडीशी कोठें खाजविली कीं, पुरे, ती लागलीच खुष होऊन,

आपल्या अनंत रत्नभांडारांतून असंख्य धातु आणि रत्नें काढून, आपल्या मुलांच्या स्वाधीन करिते. हे अमेरिकन् लोक आपल्या उद्योगाच्या आणि शोधकपणाच्या योगानें इतके भाग्यशाली झाले आहेत कीं, त्यांनीं हातांत माती धरिली तरी तिचें सोनें होतें.

ह्या देशांतील खनिज पदार्थांत दगडी कोळसा मुख्य आहे. सगळ्या पृथ्वींतील कोळशांच्या खाणींचें क्षेत्रफळ चार लक्ष चौरस मैल आहे, म्हणतात. पैकीं ग्रेट्ब्रिटन्च्या संयुक्त राज्यांत बारा हजार चौरस मैल कोळशांच्या खाणी आहेत. युनाइटेड् स्टेट्स्मध्यें ज्या कोळशांच्या खाणी आहेत त्यांचें क्षेत्रफळ तीन लक्ष चौरस मैल आहे, असें चांगल्या आधारावरून समजतें! पृथ्वींतील सर्व कोळशांच्या खाणींपैकीं तीन चतुर्थांश युनाइटेड् स्टेट्स्मध्यें आहेत, ही गोष्ट सहसा कल्पनेंत येण्यासारखी नाहीं. तरी ती खरी आहे. कोळशाची विपुलता ह्या देशांतील सर्व प्रकारच्या व्यापारांची व उद्योगांची भरभराट करण्यांत पुष्कळ अंशीं कारणीभूत झाली आहे म्हटल्यास चालेल. ह्या देशांत जरी पृथ्वींतील तीन चतुर्थांश कोळशांच्या खाणी आहेत, तरी एथें अजून इंग्लंडा इतके कोळसे खाणींतून खणून काढिले जात नाहींत. ह्याचें कारण इकडे कोळशांच्या खाणी खणूं लागून अजून फार वर्षें झालीं नाहींत हें एक आणि सोनें रुपें, तांबें लोखंड, दगडी तेल इत्यादि मोलवान् खनिज पदार्थ अतोनात आहेत, ते खणून काढण्याच्या गडबडींत ह्या लोकांना कोळशाची तितकी अवश्यकता वाटत नाहीं, हें दुसरें. तरी गेल्या सालीं ह्या देशांत दोन अब्ज चोवेचाळीस कोटि अडुसष्ट लक्ष (२,४४,६८,००,०००) पक्के मण कोळसे खणून काढण्यांत आले.

सगळ्या पृथ्वींत मिळून दोन लक्ष एकूणनव्वद हजार नऊशें चाळीस (२,८९,९४०) मण सोनें आहे असें म्हणतात. पैकीं अर्धें अधिक सोनें अमेरिका खंडांतून निघालेलें आहे. इ० स० १८८०पासून इनाइटेड् स्टेट्स्मध्यें

दरवर्षास सुमारें, नऊ कोटि सदतीस लक्ष पंचाहत्तर हजार (९,३७,७५,०००) रुपये किंमतीचें (म्हणजे दर वर्षी सर्व पृथ्वींतून निघणाऱ्या सोन्यापैकीं एक तृतीयांश) सोनें निघतें. इतर सर्व कारखान्यांप्रमाणेंच सोनें खणण्याचा उद्योगही मोठ्या झपाट्यानें चालत आहे. इ० स० १८५१ पासून १८६० पर्यंत दरवर्षी खणून काढलेल्या सोन्याची किंमत सरासरी दीड कोटि रुपयांइतकी होत असे. त्या बदलीं आतां वर्षाकाठीं सवानऊ कोटि रुपयांहून अधिक किमतीचें सोनें निघतें. रुप्याचीही अशीच गोष्ट आहे. एथें दरवर्षी तेरा कोटि सत्यायशीं लक्ष पन्नास हजार (१३,८७,५०,०००) रुपये किमतीचें रुपें निघतें. चिली आणि युनाइटेड् स्टेट्स् ह्या दोन देशांत मिळून पृथ्वींतील अर्धे अधिक तांबें निघतें, असें म्हणतात. इ० स० १८८० त ह्या देशामध्यें सात लक्ष छपन्न हजार मण तांबें निघालें, आणि पुढें चार वर्षांनीं दरसाल त्याच्या दुप्पट निघूं लागलें. १८८४ त सतरा लक्ष एकुणऐंशीं हजार पांचशें चाळीस मण तांबें खाणींमधून काढण्यांत आलें! शिशाच्या खाणीही इकडे पुष्कळ आहेत. इ० स० १८३० च्या सुमारास दरवर्षी सरासरी सवा दोन लक्ष मण शिसें खाणींतून निघत होतें. आतां वर्षाकाठीं कमींत कमी एकुणचाळीस लक्ष वीस हजार (३९,२०,०००) मण शिसें जमीनींतून काढलें जातें. इ० स० १८७० पूर्वी ह्या देशांतील खाणींतून अगदीं थोडें जस्त निघत असे. आतां एथें वर्षाकाटीं पावणेतेरा लक्ष मणांहून अधिक (१२,८०,००० मण) शिसें निघतें.

खनिज तेल उर्फ दगडी तेल किंवा "राकेल" इकडे फारच निघतें. कांहीं वर्षांपूर्वी इकडे कोळशाचें तेल तयार करण्याचे कारखाने झाले होते. पण पेन्‌सिल्वेनिया संस्थानांतील कित्येक ठिकाणीं ह्या खनिज तेलाचे झरे पुष्कळ असून, तेल नदीच्या पाण्याबरोबर वाहून चाललेलें आहे, असें लोकांच्या लक्षांत आलें; तेव्हां त्यांणीं जिकडे तिकडे मोठाल्या

नावव्या खणून, त्यांमधून हें तेल काढण्याचा क्रम सुरू केला. आतां युनाइटेड् स्टेट्स्‌चें "राकेल" सर्व पृथ्वीवर जातें. खनिज तेलाकरतां खोल खाणी व कुवे खणीत असतांना ज्वालाग्राही खनिजवात उर्फ "ग्यास" मिळाला. तो ह्या देशांत पुष्कळ आहे. पेन्सिल्वेनिया संस्थानां-तील कांहीं गांवांतून सगळ्या कारखान्यांतील वाफेचीं यंत्रें गिरण्या इत्यादि ह्या ज्वालाग्राही वाताच्या योगानें चालतात. तेथें स्वैंपाक करणें थंडी-च्या दिवसांत घरामध्यें उष्णता आणणें, दिवे लावणें वगैरे सगळें काम ग्यासाच्या योगानेंच चालतें. ह्याशिवाय रासायनिक प्रयोगांत ग्या-साचा फार उपयोग आहे, ह्याच्यायोगानें कांच, लोखंड आणि पोलाद हीं देखील निर्मळ करण्यांत येतात. पिट्स्‌बर्ग नांवाच्या शहराजवळ ज्या शेंकडो ग्यासाच्या विहिरी आहेत, त्यांपैकीं एका विहिरींतूनच दररोज तीन कोटि घनफुट ग्यास निघतो म्हणतात !

इ० स० १८४९ त क्यालिफोर्निया संस्थानांत सोनें आहे असा शोध लागतांक्षणीं, पूर्वेकडील संस्थानांतील लोकांनीं पसिफिक् महासागराच्या तीराकडे धांव घेतली. तेव्हांपासून जो उठतो तो आपला खाणी खणण्यास पश्चिमेकडे जातो. कालराडो, नेवाडा, कालिफोर्निया इत्या-दि निर्जन अरण्यमय प्रदेशांतून गंधर्वनगरांप्रमाणें एकेका रात्रींत मोठालीं नगरें निर्माण झालीं. रानें होतीं तेथें नगरें व मोठाल्या मै-दानांतून जेथें गवत वाढत होतें तेथें शस्यसमृद्ध शेतें झालेलीं दिसूं ला-गलीं. कोठें कशाची तरी खाण सांपडली किंवा एकाद्या ठिकाणीं कोणता तरी उपयोगी पदार्थ आहे किंवा उत्पन्न करतां येईल असें कळलें म्हणजे पुरे; ह्या लोकांच्या आंगांत जसें काय वारें शिरल्यासारखें होतें. मग सगळे तिकडे धांवत सुटतात; आणि पर्वतप्राय अडचणी पलीकडे सारून अभीष्ट-सिद्धि करून घेतात. ह्यांच्या उद्योगाचें आणि व्यापाराचें यथास्थित वर्णन

करीत बसल्यास मोठाले ग्रंथ लिहावे लागतील. उद्योगधंद्यांच्या योगानें ह्या देशास (खर्चवेच जाऊन) प्रतिवर्षी जें उत्पन्न त्याचा तपशील असा:—

एक अब्ज पासष्ट कोटि (१,६५,००,००,०००) रुपये शेतकीचें उत्पन्न.

सोळा कोटि साडेसत्यायशीं लक्ष(१६,८७,५०,०००)रुपये खाणींचें उत्पन्न.

सहा कोटि पंधरा लक्ष (६,१५,००,०००) रुपये शिल्पकलेचें उत्पन्न.

दोन कोटि साडेसतरा लक्ष (२,१७,५०,०००) रुपये माशांचें उत्पन्न.

दोन कोटि साडेअकरा लक्ष (२,११,५०,०००) रुपये अरण्यांतील लांकडाचें उत्पन्न.

दोन कोटि साडेसतरा लक्ष (२,१७,५०,०००) इतर पदार्थांचें उत्पन्न.

ह्याप्रमाणें सर्व उद्योगधंद्यांपासून होत असलेलें वार्षिक उत्पन्न एकंदर एक अब्ज चौऱ्याण्णव कोटि एकुणपन्नास लक्ष (१,९४,४९,००,०००) रुपयांइतकें आहे!

ह्या पृथ्वींत जितकीं राष्ट्रें आहेत त्यांपैकीं सगळ्यांत ब्रिटिश् राष्ट्र फार श्रीमंत आहे, अशी त्याची ख्याति आहे. ब्रिटिश् राष्ट्र पुष्कळ वर्षांचें जुनें आहे. आजपर्यंत उद्योगधंदे करून व दुसऱ्या उपायांनीं त्यानें आपल्या भांडारांत एक निखर्व तीन खर्व ऐशीं कोटि (१,३,०८०,००,००,०००) रुपयांइतकी संपत्ति सांठवून ठेविलेली आहे. युनाइटेड् स्टेट्स्‌चें लोकसत्ताक राष्ट्र सरासरी सवाशें वर्षांचें आहे. त्यानें आपल्या लोकोत्तर उद्योगाच्या एकाच साधनानें इतक्याशा काळांत एक निखर्व चार खर्व सहा अब्ज पंचायशीं कोटि (१,४६,८५,००,००,०००) रुपयांइतकें धन आपल्या भांडारांत सांठविलें आहे! युनाइटेड् स्टेट्स् इंग्लंडाहून देखील संपत्तिमान् आहे, असें सहसा कोणाला वाटायाचें नाहीं, पण तसें आहे खरें.

ह्या देशांत वसाहत करायाला आलेले लोक मुळचे धनी नव्हते; आणि जे अजून वसाहत करायाला येत आहेत तेही धनी नाहींत. परंतु

एथें आल्यावर त्या उद्योगशील लोकांनीं उद्योगधंदे करून इतकें धन मिळवून ठेवलें. आतां ह्या धनिकांचे वंशज गर्भश्रीमंत होणार. मग आमच्या तिकडच्या गर्भश्रीमंत लोकांनीं जसे दिग्विजय करून, "घटं भित्वा पटं छित्वा, कृत्वा रासभरोदनं । येन केन प्रकारेण," कीर्ति मिळविली, तसेच इकडचे गर्भश्रीमंतही दिवे लावून, घरादारांला' आग लावून त्यांची राखरांगोळी करितील असें कित्येकांस आजपासून भय पडलें आहे. तरी हा देश अशा प्रकारच्या कुलदीपकांच्या ( कुल जाळणारांच्या ) पायीं आमच्या देशाइतका निकृष्टावस्थेस पोंचेल, अशी भीति बाळगण्याचें बलवत्तर कारण कांहीं दिसत नाहीं. युनाइटेड् स्टेट्स् हा देश एका मोहोळासारखा आहे. एथें काम करणाऱ्या मधमाशा तेवढ्या जीवंत राहायाच्या, आळशी भोजनभाऊ नरमाशांना एथें जागा नाहीं. जोंपर्यंत त्यांचें काम आहे तोंपर्यंत उद्योगी मधमाशा त्या आळशांस वांचूं देतात. काम झाल्याबरोबर त्या अन्नाच्या काळांना व भुईच्या भारांना दंश करून मारून टाकितात. जे मुळचे दरिद्र लोक उद्योगाच्या व विद्येच्या बळानें आज धनकुबेर होवून बसले आहेत, ते आपल्या उन्नतीचें कारण काय, हें पक्कें जाणतात. ते आळशी, निरुद्योगी लोकांस आश्रय देत नाहींत. आणि खयुत्रांचीं, माजरांचीं वगैरे लग्नें लावण्यांत, निकृष्ट प्रकारच्या ऐषआरामांत, किंवा साहेबांना मेजवान्या देऊन आतसबाजी उडविण्यांत आणि नाटक तमाशे व नाच पाहाण्यांत आपला बहुकष्टार्जित पैसा उधळीत नाहींत. ते त्याचा सदुपयोग करतात. आमच्या तिकडल्या ऐतिहासिक नऊकोटि नारायणालाच काय, पण मोठालीं राज्यें विकत घेण्यास पुरेल इतका पैसा ज्यांच्या हातीं आहे असे धनिक इकडे पुष्कळ आहेत. ते भाविवंशाच्या उन्नत्यर्थ आणि विद्यावृद्ध्यर्थ आपल्या श्रीमंतीला शोभतील अशा पुष्कळ चांगल्या संस्था करून जा-

तात. ट्रेवर व कारकोर्न ह्या नांवाच्या धनिकांनीं प्रत्येकीं तीनतीन लक्ष रुपये विद्यालयें स्थापिण्याकरितां दिले. विल्स्टन्, वाकर्, हिचकाक् व विंक्ले ह्यांनीं प्रत्येकीं पांच लक्ष रुपये; कोल्गेट्, आणि क्रोझर्, यांणीं प्रत्येकीं आठ लक्ष रुपये; सिने आणि वसी यांणीं प्रत्येकीं दहा लक्ष रुपये; स्टोन् याणें बारा लक्ष रुपये, फिनिक्स् याणें चाळीस लक्ष, व्यांडर बिल्ट् आणि व्यासर् यांणीं वीस वीस लक्ष, क्लार्क् याणें पंचवीस लक्ष, ग्रीन् नांवाच्या गृहस्थानें तीस लक्ष, रिच् नांवाच्या मनुष्यानें चाळीस लक्ष, पार्कर् याणें सत्तर लक्ष रुपये, स्टीवन्जिरार्ड आणि जान्म् हापकिन्स् यांणीं एकेककोटि रुपये विद्यालयांच्या स्थापनेकरतां दिले. सदर्न् पसिफिक् रेल्वेचा अध्यक्ष आणि क्यालिफोर्निया संस्थानाच्या वतीनें युनाइटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रीय सभेंत असलेला कारभारी लीलंड् स्टान्फर्ड् याणें आपल्या एकुलत्या मृत मुलाच्या स्मरणार्थ नऊ कोटि रुपये खर्च करून एक विश्वविद्यालय स्थापन केलें आहे. हें त्या धनकुबेरांचें महदौदार्य परम स्तुत्य अशा विद्यावृद्धीच्या कामीं लागत आहे. जोंपर्यंत ह्या देशांतील श्रीमंत लोक आपल्या पैशाचा असा सद्व्यय करितील, आणि जोंपर्यंत एथें विद्येचें प्राधान्य राहून शाळेंत शिकलेली विद्या व्यवहारोपयोगी करण्याकडे लोकांचा कल असेल, तोंपर्यंत ह्या देशाला आमच्या तिकडल्यासारख्या शिरःशून्य केतुग्रहसम गर्भश्रीमंतांपासून भय बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं !

**पहिला भाग समाप्त.**